म.ग्र.सं. ठाणे
विषय : ...चरित्र...
सं.क्र. : ८५६

पुण्य श्लोक

# छत्रपति शिवाजी

( पूर्वार्ध )

: लेखक :

साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास

REFBK-0010313

★

मूल्य ८ रुपये

पुण्यश्लोक

# छत्रपति शिवाजी

(पूर्वार्ध)



: लेखक :

साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास

# पुण्य श्लोक

# छत्रपति शिवाजी

## ( पूर्वार्ध )

ग्रंथालय ठाणे
१०३९३
क्र.
(स्थळ प्रत)

: लेखक :

साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास

REFBK-0010313

मूल्य ८ रुपये

मुद्रक व प्रकाशक : **शंकर रामचंद्र दाते**
यशवंत छापखाना, ६२३/४ सदाशिव, पुणें २.

२८३३५ साहित्य
८५६ आगम

विजयनगरच्या हिंदु साम्राज्याचे प्रतिष्ठापक



महामुनि विद्यारण्य

# अर्पणपत्रिका

जगद्गुरु स्वामी विद्यारण्यांनीं एकवार अधिष्ठिलेल्या
कांचीकामकोटीच्या शांकरपीठाला आज विभूषित करणारे
माझे आध्यात्मिक गुरु

**कामकोटि पीठाधीश्वर जगद्गुरु**
**श्रीमत् शंकराचार्य चंद्रशेखर भारती**

यांच्या चरणांना वंदन करून

पुण्यश्लोक शिवछत्रपतींच्या मानससृष्टीच्या पार्श्वभूमीचे
उत्पादक व विजयनगरच्या हिंदू साम्राज्याचे प्रतिष्ठापक
कर्नाटक प्रतिष्ठापनाचार्य

**श्रीमद्विद्यारण्य महामुनींच्या पवित्र स्मृतीला**

मी हा ग्रंथ अर्पण करतों.

**बाळशास्त्री हरदास**

# प्रास्ताविक

साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांनीं यंदा छत्रपति श्री शिवाजी महाराज यांच्यावर जीं व्याख्यानें दिलीं तीं या व्याख्यानमालेचा पूर्वार्ध होय. या व्याख्यानमालेंत त्यांनीं शिवाजी पूर्वकालीन घटनांचें सविस्तर विवेचन केलें असून पुढील वर्षीच्या व्याख्यानमालेंत प्रत्यक्ष छत्रपति शिवाजी महाराजांचें चरित्र कथन करण्यांत येणार आहे. म्हणून या वर्षीच्या ग्रंथास पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी (पूर्वार्ध) असें म्हटलें आहे.

या व्याख्यानांतून मुसलमानी आक्रमणाचें स्वरूप, त्याचा प्रत्यक्ष प्रतिकार दक्षिणेंत कां होऊं शकला याची कारणमीमांसा, विजयनगरचें साम्राज्य कोणत्या परिस्थितींत व कसें निर्माण झालें, त्याची वाढ कशी झाली व पुढें त्याचा विनाश कां व कसा झाला याचें विवेचन, विजयनगरच्या साम्राज्याचा सांस्कृतिक वारसा छत्रपति शिवाजी महाराजांकडे कसा आला, महाराष्ट्रांतील संतांनीं व महंतांनीं स्वराज्यस्थापनेपूर्वी या भूमींत श्रद्धाकेंद्र कसें निर्माण केलें व शिवाजी महाराजांचें देवा ब्राह्मणांचें स्वराज्य स्थापन होण्याची पूर्वतयारी कशी केली,या सर्व घटनांचा इतिहास ग्रंथांत कथन केला आहे.

वाचकांना हीं व्याख्यानें नवा दृष्टिकोन दाखविणारी व उद्बोधक वाटतील असा विश्वास वाटतो.

**प्रकाशक**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| पहिलें | अवतारकार्याचें स्वरूप | १ |
| दुसरें | इस्लामी आक्रमणाचे परिणाम | २२ |
| तिसरें | भारताचा सर्वांगीण अधःपात | ५० |
| चौथें | दक्षिण भारतांतील सांस्कृतिक पुनरुत्थान | ७६ |
| पांचवें | महामंत्री श्रीमन्माधवाचार्य | ९६ |
| सहावें | श्रीमन्माधवाचार्य विद्यारण्य | ११९ |
| सातवें | विजयनगरच्या साम्राज्याची मध्याह्न | १४५ |
| आठवें | साम्राज्याचा अधःपात व अन्त | १७३ |
| नववें | शिवाजी महाराजांचे पूर्वज | १९३ |
| दहावें | शहाजीराजांचें कार्य | २२१ |
| अकरावें | महाराष्ट्रांतील संतांचें कार्य | २५१ |
| बारावें | श्री ज्ञानेश्वर | २८० |
| तेरावें | श्री एकनाथ ते श्री तुकाराम | ३१४ |
| चौदावें | श्री समर्थ रामदास | ३३९ |
| पंधरावें | राष्ट्रगुरु व राजगुरु | ३७१ |
| सोळावें | उपसंहार | ४०१ |

28335
846
90393

# पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी

## ( पूर्वार्ध )

### प्रकरण पहिलें

## अवतारकार्याचें स्वरूप

पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीच्या या पवित्रदिनीं प्रस्तुत व्याख्यानमालेच्या रूपानें त्यांच्या चरणीं भात्र-पुष्प समर्पण करण्याची संधि आपण मला प्राप्त करून दिली, याबद्दल मी आपला अत्यंत कृतज्ञ आहें. पुण्याच्या अधिकारी वाक्पीठावरील ही माझी व्याख्यानमाला अत्यंत उचित आहे. या वर्षी प्रतापगडावरील छत्रपति शिवरायांच्या स्मारकाच्या उद्‌घाटन-समारंभाच्या निमित्तानें परस्परविरोधी विचारप्रवाहांच्या संघर्षां-तूनहि श्रीशिवरायांच्या जयघोषाचे जे निनाद उमटले, त्यांनीं महाराष्ट्राचे दिक्कोन निनादित झाले आहेत. श्रीशिवरायांच्या जीवनचरित्राचा या पुण्यनगरीशीं अनेकविध नात्यांनीं प्रत्यक्ष संबंध आलेला आहे. शिवछत्रपतींचें प्रत्यक्ष वास्तव्य कांहीं काळ येथें होतें. येथेंच त्यांनीं दिल्लीपतीचा प्रबल सेनापति शाहिस्तेखान याचीं बोटें तोडलीं, व त्याच्या मुलाला ठार मारून, लज्जेनें काळवंडलेलें तोंड घेऊन त्याला दिल्लीला परत पाठविलें. त्यामुळें पुण्यनगरीची वास्तुदेवता व शिवछत्रपति यांचा घनिष्ठ संबंध आहे. अटकेपार झेंडे फडकाविणाऱ्या शिवछत्रपतींच्या पराक्रमी राजकीय प्रतिनिधींनीं तर भारतीय राष्ट्राच्या राजनगरीचाच सन्मान या नगरीला प्राप्त करून दिला होता. म्हणूनच येथें शिवरायांचें यशोगान अत्यंत उचित ठरतें.

---

चैत्र शु. १५, शके १८८०, दि. ४ एप्रिल १९५८.

## दिक्कालातीत विभूतिमत्त्व

इतिहासाच्या कालखंडांत असे अनेक महापुरुष होतात कीं, प्राचीन काळची माहिती म्हणून त्यांचे इतिहास अनेक लोक वाचतात. पण या महापुरुषांचें महत्त्व त्यांच्या त्यांच्या कालखंडापुरतेंच असतें. त्यामुळें ज्ञान व मनोरंजन एवढेंच त्यांच्या जीवनगाथेच्या वाचनाचें मूल्य असतें. पण इतिहासांत असेंही अलौकिक विभूतिमत्त्व कधींकधीं प्रकट होतें कीं, ज्याचें मूल्यमापन कालाच्या सीमारेषेंत येऊं शकत नाहीं. या विभूतिमत्त्वाचें स्मरण कोणत्याहि काळीं व कोणत्याहि परिस्थितींत दीपस्तंभाप्रमाणें समाजाचें मार्गदर्शन करतें. तें रेडियमच्या कणाप्रमाणें अखंड स्फुरणशाली असतें. शिवछत्रपतींचें विभूतिमत्त्व हें अशाच अलौकिक योग्यतेचें आहे. भारतांतील स्वातंत्र्यदेवीच्या प्रत्येक उपासकाला व युगपरिवर्तनाच्या संधीची वाट पाहणाऱ्या प्रत्येक द्रष्टया क्रांतिकारकाला छत्रपति शिवाजी महाराज हे आपलें आराध्य दैवत वाटत आले आहेत. भारताचे आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनीं आपल्या स्वातंत्र्यप्रयत्नांची स्फूर्ति छत्रपति शिवाजी महाराज यांच्या पासूनच घेतली होती. भारतांतील स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे महान् प्रवर्तक लोकमान्य टिळक यांनीं आपल्या राजकीय चळवळीचा प्रारंभ श्रीशिवछत्रपतींच्या स्मृतिमहोत्सवाच्या रूपानेंच केला होता. 'अभिनव भारत' या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भारतव्यापी महान् संघटनेच्या सदस्यत्वाची शपथ छत्रपति शिवाजी महाराजांच्या छायाचित्रासमोर घेण्यांत येत असे. या उत्सवाचें लोण पुढें बंगालपर्यंत पोहोचलें. शिवछत्रपतींच्या नांवाचें महत्त्व केवळ महाराष्ट्रीयांनाच वाटलें असेंनाहीं; तर भारतांतील सर्वच द्रष्टया पुरुषांना त्यांचें नांव हें एक महान् आकर्षणकेन्द्र वाटत आलें आहे. महायोगी श्री अरविंद घोष यांची प्रतिभाही पुण्यश्लोक छत्रपतींच्या स्मृतीनें मुखरित होऊन बाजीप्रभु या त्यांच्या स्फूर्तिशाली काव्याची निर्मिति झाली.

भारतीय स्वातंत्र्ययुद्धाचे अंतिम सेनानी सुभाषचंद्र बोस हे इ. स. १९३७ मध्यें विजयरत्न मुजुमदार यांच्याशीं झालेल्या भाषणांत म्हणाले कीं, "लौकरच एक दिवस असा उजाडेल कीं, हिंदी लोकांना आपल्या स्वातंत्र्ययुद्धांत शिवाजी महाराजांचें उदाहरण गिरवावें लागेल. परकीय सरकारला हाकलून लावण्यासाठीं आपल्याला त्यांच्याच मार्गानें गेलें पाहिजे." मुजुमदारांनीं त्यावर त्यांना विचारलें, 'कोणत्या मार्गानें म्हणतां ? "अत्याचारी कीं अनत्याचारी"? सुभाषचंद्रांनीं उत्तर दिलें, "तुम्हांला वाटेल त्या. माझें विधेय स्पष्ट आहे. शिवाजी! शिवाजी! शिवाजी! "

## छत्रपतींचें राज्य हें हिंदुराज्य होतें

छत्रपति शिवाजी महाराजांचें हें जें प्रांत-भाषा-भेदातीत अधिष्ठान आहे तें विसरून वर्तमानकालीन मर्यादित समस्यांच्या परिसरांत त्यांना ओढणें म्हणजे त्यांच्या भव्यतेला अकारण मर्यादा घालण्यासारखें आहे. शिवछत्रपतींचा जन्म महाराष्ट्रांत झाला हें खरें आहे; मराठी भाषा ही त्यांची मायबोली होती हेंहि खरें आहे; त्यांच्या घोडयांच्या टापांनीं सह्याद्रीचीं गिरिशिखरें मुखरित झालीं हेंहि खरें आहे; त्यांनीं जें स्वराज्य स्थापन केलें तें महाराष्ट्रांतच हेंहि ऐतिहासिक सत्य आहे; पण त्या समवेतच हेंही नीटपणें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, छत्रपतींचें स्वराज्य हें महाराष्ट्रीय राज्य नव्हतें तर तें हिंदु राज्य होतें. या देशांत त्यांनीं यावनी आक्रमणाला तोंड देऊन हिंदुराज्य प्रतिष्ठापित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. भारतांतील यच्चयावत् हिंदु-मात्रासाठीं शिवाजी महाराज होते. केवळ एखाद्या प्रांतासाठीं ते नव्हते. त्यांची ही धारणा त्यांच्या मनोवृत्तीची ओळख असणाऱ्या त्यांच्या सर्व प्राचीन चरित्रकारांनीं मान्य केलेली आहे. त्यांचें ध्येय दिल्लीपतीला पदच्युत करून भारतीय राष्ट्राच्या अस्मितेच्या पायावर उभारलेलें स्वराज्य प्रतिष्ठापित करण्याचें होतें.

शिवछत्रपतींच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रांत त्यांच्या बालवयांतील मन:स्थितीचें उत्कृष्ट चित्रण केलेलें आहे. आपल्या वडिलांबरोबर विजापूरला राहात असतां शिवछत्रपतींच्या मनांत कोणते विचार घोळत यांचें चित्रण करतांना सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रांत म्हटलें आहे : "आपण हिंदु व हे यवन परम नीच, यांपरतें नीच दुसरें कोण आहे? त्यांची सेवा करणें, त्यांचें अन्न भक्षणें, आर्जवें करणें, त्यांस नमस्कार करणें यांनीं माझे प्रकृतीस फार त्रास उत्पन्न होतो. धर्माची निंदा पाहणें परम अनुचित दिसतें. आपण रस्त्यांनीं जातां गोवध होतो तें पाहतांच त्याचा शिरच्छेद करावा ऐसे वाटतें व श्रम वाटतात. गाईस पीडा पहावी त्याहून आपलें जीवित्व व्यर्थ. वडील काय म्हणतील हेंच संकट येऊन पडतें; नाहींतरी पाहतांच समयीं गाईस पीडा करणाऱ्याचा वध करवावा हें मनांत येतें. मुसलमानांचा संसर्ग करणें चांगलें नाहीं. तसेंच पादशाही दरबारास जाणें अथवा हरएक अमीर याचें घरीं जाणें ठीक नाहीं. परत येतांच शिवाजी राजे यांनीं स्नान करावें, दुसरीं वस्त्रें घ्यावीं, ऐसें करूं लागले."

छत्रपति शिवाजी महाराजांच्या अंत:करणाची प्रेरणा यावरून स्पष्ट झाल्याविना राहात नाहीं. या चरित्रकारांनीं ती प्रेरणा पुढील वाक्यानें आणखीच स्पष्ट केली आहे : "आपण हिंदु! दक्षिण देश सर्व म्लेंच्छांनीं ग्रासिला धर्म अगदीं बुडाला. तेव्हां धर्मरक्षणार्थ प्राणही वेचून धर्म रक्षावा आणि आपले पराक्रमानें नवीन दौलत संपादावी. देवावर व दैवावर भार घालून पुरुषप्रयत्न अवलंबन करावे. त्यास दैव जसजसें साह्य होईल तसतसें अधिक करीत जावें."

शिवदिग्विजय ग्रंथांत असलेलें पुढील वाक्य या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचें आहे. "हिंदूचें राज्य तुम्ही हरण केलें. प्राचीन अधिकार या राज्याचा आमचाच आहे." तात्पर्य छत्रपति शिवाजी महाराज यांना महाराष्ट्रराज्य प्रतिष्ठापित करावयाचें नसून या देशावर राज्य करण्याचा ज्यांचा अधिकार त्या हिंदूचें व तेंही हिंदु

अस्मितेच्या पायावर आधारलेलें राज्य प्रतिष्ठापित करावयाचें होतें हें त्यांच्या प्राचीन चरित्रकारांना पूर्णपणें आकलन झालेलें आहे. पण या सर्वांपेक्षां स्वत: शिवछत्रपतींनींच आपल्याला काय निर्माण करावयाचें आहे हें आपल्या एका पत्रांत स्पष्ट केलें आहे. तें पत्र त्यांचें स्वत:चेंच असल्यामुळें त्याच्याइतका निर्विवाद पुरावा दुसरा कोणताही असूं शकत नाहीं. इ. स. १६४५ सालीं रोहिर खोऱ्याचा व वेलखंड खोऱ्याचा कुळकर्णी दादाजी नरसी प्रभू याला पाठविलेल्या पत्रांत छत्रपति शिवराय लिहितात, "श्री रोहिरेश्वर तुमचे खोऱ्यांतील आदि कुलदेव, तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंदरीलगत स्वयंभू आहे. त्याणीं आम्हांस यश दिल्हें; व पुढे तो सर्व मनोरथ **हिंदवी स्वराज्य** करून पुरविणार आहे."

शिवछत्रपतींचा प्रयत्न कशास्तव होता हें समजावयास आतां आणखी दुसऱ्या कोणत्याही पुराव्याची कांहीं एक आवश्यकता नाहीं. म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं शिवछत्रपतींना प्रणाम करतांना त्यांचें पुढीलप्रमाणें यथार्थ वर्णन केलें आहे :—

हे ! हिंदुशक्तिसंभूत दीप्ततम तेजा !
हे ! हिंदुतपस्यापूत ईश्वरी ओजा !
हे ! हिंदु श्रीसौभाग्य भूतिच्या साजा !
हे ! हिंदूनृसिंहा, नमो शिवाजी राजा !

पण एक राज्यसंस्थापक अथवा आपल्या जमातीचें राज्य प्रतिष्ठापित करणारा एवढेंच छत्रपति शिवाजी महाराजांचें स्थान आहे काय ? पाश्चात्य इतिहासलेखकांनीं एक यशस्वी दरवडेखोर म्हणून छत्रपति शिवाजी महाराजांचा उल्लेख केलेला आहे. ग्रँड डफसारखे इतिहासकारहि या गोष्टीला बळी पडले आहेत असें दृष्टोत्पत्तीला येतें. शिवाजीनें आपल्या कर्तृत्वाच्या प्रारंभकाळांत बादशाही खजिन्यावर आक्रमण करून तो लुटल्यामुळें त्याला पाश्चात्य लेखकांनीं दरोडेखोरांच्या सदरांत बसविलें आहे. पण स्वार्थासाठीं धनाची लुटालूट करणारा

मनुष्य दरोडेखोर असतो. शिवछत्रपतींच्या परंपरेचा विचार केला तर त्यांची परंपरा राजवंशाची होती हें ध्यानांत येतें. कृत्याचें बाह्य स्वरूप जरी दिसावयास एकच असलें तरी तें करणाऱ्या व्यक्तीचें स्थान व उद्दिष्ट यांवरूनच त्या कृत्याचें नैतिक अधिष्ठान ठरत असतें. या दृष्टीनें शिवभारत व राधामाधवविलासचंपू या दोन शिवकालीन ग्रंथांवरून छत्रपति शिवाजी महाराज हे राजवंशांतील पुरुष होते हें स्पष्ट दिसतें. ही माहिती पाश्चात्य लेखकांना नसल्यामुळें शिवाजीच्या पूर्वजांना व शिवाजीलाही त्यांनीं दरोडेखोर ठरविलें आहे. पण शिवाजीचा आजा मालोजी हा राजा होता; शिवाजीचे वडील शहाजी हेही राजे होते; व राजवंशांत उत्पन्न झालेल्या शिवाजीनें स्वतःच्या राज्यविस्तारासाठीं आपल्या शत्रुराष्ट्रावर हल्ले चढवावयास प्रारंभ केला होता. ही भूमिका ध्यानांत घेऊन त्यांच्या सर्व कृत्यांकडे पाहिलें असतां त्यांचीं कृत्यें हीं शास्त्रशुद्ध राजनीतीच्या मर्यादेंत बसतात हें ध्यानांत येईल.

पण छत्रपति शिवाजी महाराज हे अपहारक नसून केवळ राज्यसंस्थापक होते असें मला म्हणावयाचें नाहीं. मला यापुढेंही जाऊन असें म्हणावयाचें आहे कीं, केवळ राज्यसंस्थापकाहूनही त्यांची भूमिका अनेक पटींनीं श्रेष्ठ व उदात्त होती. कुशल राजकारणी व साहसी पुरुष विशिष्ट परिस्थितीचा लाभ घेऊन स्वतंत्र राज्यप्रतिष्ठापना करतात. फ्रान्समध्यें झालेल्या राज्यक्रांतीच्या वातावरणाचा आपल्या बुद्धिमत्तेनें व साहसानें लाभ घेऊन नेपोलियनही सम्राट् झाला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर उत्पन्न झालेल्या अंदाधुंदीचा फायदा घेऊन निझाम उल्मुल्कानें आपलें राज्य दक्षिणेंत प्रतिष्ठापित केलें. हसनगंगू बहामनीनेंही यापूर्वीं असेंच बहामनी राज्य निर्माण केलें होतें. हैदराची यशस्वी दरवडेखोरी तर प्रसिद्धच आहे. पण या साहसी व धैर्यशाली राजपुरुषांहून छत्रपति शिवाजी महाराजांची योग्यता किती तरी पटीनें वेगळी व मोठी आहे.

## ईश्वरी अवतार

शिवछत्रपतींना केवळ राज्यसंस्थापक मानणें हें त्यांच्या महत्तेला सीमित करण्यासारखें आहे. त्यांच्या कार्याचें स्वरूप एखाद्या राज्यसंस्थापकाहून अधिक व्यापक होतें, व तें म्हणजे समाज-जीवनांत मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना करणें, धर्माचें पुनरुज्जीवन, संस्कृतीचें संरक्षण व चिरंजीव अस्मितेच्या एका महान् राष्ट्राचें पुनरुत्थान करणें हें होय. त्यामुळें त्यांचें कार्य हें ईश्वरी कार्य आहे असें त्यांच्या प्राचीन चरित्रलेखकांनीं म्हटलें आहे. पेशव्यांच्या बखरींत छत्रपतींच्या कार्याचें वर्णन करतांना म्हटलें आहे, "शहाजी राजे मोगलाईंतच होते. त्यांस मोंगलांनीं हिंदु धर्माचा उच्छेद करून म्लेंच्छमय करावें, या दुर्वृत्तीस प्रवर्तक झाला तें देवास न साहे. यवनांचें पारपत्य करून हिंदुधर्म स्थापावा याजकरितां शिवाजी महाराज यांजवर श्रीचा कृपानुग्रह होऊन– त्या कालीं साता वर्षांचे होते– वय लहान होत्साता तेव्हांपासून मोठमोठीं अमानुष कर्मे करून राज्य मिळविलें. म्लेच्छादि शत्रु पादाक्रांत करून धर्मक्षेत्रादि महास्थानें, तीर्थांची व देवाची स्थापना, पूजा, ब्राह्मणा-पासून ब्रह्मकर्म यागादि करवून श्रीरामेश्वरापासून गोदातीरपर्यंत धर्मस्थापना केली."

शिवछत्रपतींच्या पुष्कळच नंतर उत्पन्न झालेल्या लोकांनीं त्यांची महत्ता जाणून त्यांच्याविषयीं असें म्हटलें असें नव्हे, तर त्यांच्या समकालीन महान् द्रष्टयांना व निरीक्षकांनाही त्यांच्या कार्याविषयीं असेंच वाटत होतें. त्यांच्या समकालीन द्रष्टयांनीं, कवींनीं व लेखकांनीं त्यांचें वर्णन 'ईश्वरी अवतार' म्हणून केलें आहे. शिवछत्रपतींना प्रत्यक्ष पाहिलेला, त्यांचा समकालीन, प्रतिभा-संपन्न संस्कृत कवि परमानंद याला त्यांच्या भव्य व्यक्तिमत्त्वाचा जो साक्षात्कार झाला त्यामुळें त्यांच्या जीवनावर महाभारता-सारखें एक महाकाव्य लिहिण्याचा संकल्प करून त्यानें शिव-भारताची रचना केली. आपल्या काव्याच्या प्रारंभीं तो म्हणतो :–

"एकवीरां भगवतीं गणेशं च सरस्वतीम् ।
सद्गुरुं च महासिद्धं सिद्धानामपि सिद्धिदम् ।।
प्रणिपत्य प्रवक्ष्यामि महाराजस्य धीमतः ।
चरितं शिवराजस्य भरतस्येव भारतम् ।।
कलिकल्मषहारीणि हारीणि जनचेतसाम् ।
यशांसि शिवराजस्य श्रोतव्यानि मनीषिभिः ।।
योऽयं विजयते वीरः पर्वतानामधीश्वरः ।
दाक्षिणात्यो महाराजः शाहराजात्मजः शिवः ।।
साक्षान्नारायणस्यांशः त्रिदशद्वेषिदारणः । "

—(शिवभारत, अध्याय १ ला, श्लोक २१ ते २५)

(देवी एकवीरा, गणेश, सरस्वती व सिद्धांनाही सिद्धि देणारे महासिद्ध सद्गुरु यांना वंदन करून महाबुद्धिशाली शिवराजाचें हें चरित्र मी वर्णन करतों. भरताचें जसें महाभारत, तसेंच हें शिव-भारत आहे. बुद्धिमान् लोकांनीं नेहमी कलीचे दोष जाण्यासाठीं सर्व लोकांचें चित्त आकर्षून घेणारें शिवछत्रपतींचें हें कीर्तिगान अखंड ऐकावें. डोंगरी किल्ल्यांचे अधीश्वर, दक्षिणापथाचे अधीश्वर, शहाजी राजांचे पुत्र शिवछत्रपति म्हणजे देव-द्वेष्ट्यांचें विदारण करणाऱ्या अखंड जयशाली नारायणाचे साक्षात् अंश होत.)

आणखी एका ठिकाणीं परमानंद कवीनें "विष्णोरंशो विशेषेण लोकपालांशसंभवः । देवद्विजगवां गोप्ता दुर्दान्तो यवनान्तकः । " या शब्दांनीं शिवछत्रपतींचें वर्णन केलेलें आहे. शिवछत्रपतींच्या ध्येयाचें व त्यांच्या ईश्वरी कार्याचें स्वरूप स्पष्ट करतांना प्राचीन रूपकपद्धतीचा आश्रय करून पृथ्वी, ब्रह्मदेव व महाविष्णु यांचा जो संवाद परमानंद कवीनें वर्णिलेला आहे तो मनन करण्यासारखा आहे. पृथ्वी म्हणते :—

"नाहूयन्ते दिविषदो न हूयन्ते हुताशनाः ।
न वेदा अप्यधीयन्ते नाभ्यर्च्यन्ते द्विजातयः ।।
न सत्राणि प्रवर्तन्ते तथैव च मखक्रियाः ।
न दानानि विधीयन्ते विहीयन्ते व्रतानि च ।।

खिद्यन्ते साधवस्सर्वे भिद्यन्ते धर्मसेतवः ।
म्लेच्छधर्माः प्रवर्धन्ते हन्यन्ते धेनवोऽपि च ॥
सज्जना यान्ति विलयं व्रजन्ति क्षत्रियाः क्षयम् ।
प्रादुर्भूतमिदानीं मे यवनेभ्यो महद्भयम् ॥ ”

(देवांचें कोणी आवाहन करीत नाहीं; अग्नींत कोणी हवन करीत नाहीं; वेदांचेंही अध्ययन सुटलें आहे; ब्राह्मणांचा सत्कार बंद झाला आहे; सत्रें आणि यज्ञक्रिया यांना फाटा मिळाला आहे; दानें आणि व्रतें संपुष्टांत आलीं आहेत; सज्जनांस दुःख होत आहे; धर्मनिबंध मोडले जात आहेत; म्लेच्छधर्म वृद्धि पावत आहे; गाईंची हत्या घडत आहे; साधूंचा नाश होत आहे; क्षत्रिय लयास चालले आहेत. अशा प्रकारें हल्लीं यवनापासून मला मोठें भय उत्पन्न झालें आहे. ”

—(शिवभारत, अ. ५, श्लोक ४० ते ४३)

विष्णु म्हणतात :—

“स्थापयिष्यामि धर्मस्य मर्यादां भुवि शाश्वतीम् ।
यवनान् सादयिष्यामि पालयिष्यामि देवताः ॥
पुनः प्रवर्तयिष्यामि सप्ततन्त्वादिकाः क्रियाः ।
क्षेमं गवां विधास्यामि स्थितिं चापि द्विजन्मनाम् ॥
प्रतिज्ञायेति भगवान् सत्यलोकाय मां विभुः ।
समनुज्ञातवान् भद्रे स्वयं भूतभविष्यवित् ॥

—(शिवभारत, अ. ५, श्लोक ५५ ते ५७)

(मी पृथ्वीवर धर्माची शाश्वत मर्यादा स्थापीन, यवनांचा उच्छेद करीन, देवांचें रक्षण करीन, यज्ञादि क्रिया पुन्हा सुरू करीन, गाई व ब्राह्मण यांचें पालन करीन, असें मला वचन देऊन, हे कल्याणि, भूतभविष्य जाणणाऱ्या भगवानानें मला सत्यलोकास जाण्यास अनुज्ञा दिली.)

कवि परमानंद हा कांहीं झालें तरी कवि असल्यामुळें प्राचीन पद्धतीप्रमाणें आपल्या काव्यनायकाला गौरवून त्याला त्यानें ईश्वरी

अवतार म्हणणें स्वाभाविक आहे व त्यामुळें त्याचें तितकेसें महत्त्व नाहीं असें कित्येकांना वाटण्याचा संभव आहे. वस्तुतः महाभारतासारख्या महाकाव्याचा विषय होण्याची पात्रता शिवछत्रपतींत होती, म्हणूनच कवींद्र परमानंदाला शिवभारताची स्फूर्ति झालेली आहे. मर्यादापुरुषोत्तम श्री रामचंद्र झाले, म्हणून महर्षि वाल्मीकींची प्रतिभा मुखरित झाली. पूर्णावतार श्रीकृष्ण झाले म्हणून महर्षि व्यासांनीं महाभारत निर्माण केलें. त्यामुळें परमानंदांच्या उद्गारांतून शिवछत्रपतींच्या विषयींची तीव्र धारणा व्यक्त झाल्याविना राहत नाहीं. पण कवींपेक्षांहि श्रेष्ठ अशा तत्त्वज्ञ, वीतराग, सिद्ध, साक्षात्कारी द्रष्टयांचीही या संबंधांतील भूमिका पाहिल्यावर मन आश्चर्यानें स्तिमित झाल्याविना राहात नाहीं. विवाहमंडपांतून ज्यानें वैराग्याकडे झेप घेतली, गोदावरीच्या प्रवाहांत मासे शरीर तोडीत असतांही नामसमाधि भंग होऊं दिली नाहीं, प्रत्यक्ष ईश्वराचा साक्षात्कार घेऊन त्याच्या आदेशानुरूप ज्यानें आपलें जीवनकार्य प्रारंभिलें, असत्याचा ज्याच्या जिभेला कधीं स्पर्श झाला नाहीं, व मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्राशिवाय अन्य कुणाच्याही गुणसंकीर्तनांत ज्याची वाणी कधीं रंगली नाहीं, इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष शिवछत्रपतीही आपलें ताठ मस्तक ज्याच्या पायांवर नमवीत होते त्या श्रीसमर्थ रामदासांची शिवछत्रपतींविषयींची हीच धारणा होती ही गोष्ट किती विस्मयकारक आहे! श्री समर्थ म्हणतात,

तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥
देवधर्म गोब्राह्मण । यांचें करावया संरक्षण ।
हृदयस्थ आला नारायण । प्रेरणा केली ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हाकरितां ॥
आणिकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनि कित्येक राहती।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारली ॥

कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।
कित्येकांस आश्रय जाले । शिव कल्याण राजा ।
सकळकर्ता तो ईश्वरु । तेणें केला अंगिकारु ।
तया पुरुषाचा विचारु । विरळा जाणे ॥
न्यायनीति विवेक विचार । नाना प्रसंग प्रकार ।
परीक्षणें परांतर । देणें ईश्वराचें ॥
महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें ।
अद्भुतचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥
यश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणांसी नाहीं सीमा ।
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचे ॥
धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
जाले, आहेत, पुढें होणार । देणें ईश्वराचे ॥

शिवछत्रपतींच्या ध्येयवादाची व कार्याच्या फलश्रुतीची ही भव्यता केवळ महाराष्ट्रांतील दृष्टयांनींच ओळखली होती असें नव्हे, तर त्यांच्या जीवनाशीं ज्यांचा ज्यांचा थोडाही संबंध आला त्या त्या सर्वंच द्रष्टयांना त्यांच्या भव्य विभूतिमत्त्वाचा हा साक्षात्कार झाल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. शिवछत्रपतींचा समकालीन महातेजस्वी कवि भूषण याचा या दृष्टीनें निर्देश करण्यासारखा आहे. भूषण हा उत्तर भारताचा शिवछत्रपतींच्या काळचा एक प्रसिद्ध महान् कवि होता. छत्रपति शिवाजी महाराजांची व त्याची प्रत्यक्ष भेट झालेली होती. भूषण हा इतका स्वाभिमानी कवि होता कीं, मोगल दरबारच्या विलासी वातावरणांत प्रवेश करणें शक्य असून सुद्धां दैवयोगानें राज्यपद प्राप्त करून घेतलेल्या पापात्म्यांच्या वर्णनानें त्यानें आपली वाणी कधींही कलंकित होऊं दिली नाहीं. शिवछत्रपतींच्या विभूतिमत्त्वालाच त्यानें आपल्या कवितेचीं भावपुष्पें समर्पण केलेलीं आहेत. शिवछत्रपतींच्या महत्तेचें व कार्याचें समालोचन करतांना त्यानें आपली निष्ठा इतक्या अव्यभिचारीपणानें प्रकट केली आहे कीं, शिवराजभूषण या आपल्या अलंकारशास्त्रावरील विख्यात ग्रंथांत अलंकारांचीं लक्षणें देऊन उदाहरणें

२४३३५ चरित्र
५८६ ३०।१।५८

देतांना त्यानें श्रीशिवछत्रपतीवरीलच कविता केवळ उद्धृत केलेल्या आहेत. शिवछत्रपतींच्या महत्तेविषयीं लिहितांना तो म्हणतो:—

राखी हिन्दुवानी, हिन्दुवान को तिलक राख्यो,
अस्मृति पुरान राखे वेद विधि सुनी मैं।
राखी रजपूती, रजधानी राखी राजन की,
धरामें धरम राख्यो, राख्यो गुन गुनी मैं।
'भूषन' सुकवि जीति हद्द मरहट्टन की,
देस देस कीरति बरवानी तव सुनी मैं।
साहि के सपूत सिवराज समसेर तेरी,
दिल्ली दल दाबी कै दिवाल राखी दुनी मैं ॥
वेद राखे विदित, पुरान राखे सार युत,
रामनाम राख्यो अति रसना सुघर मैं।
हिन्दुन की चोटी रोटी राखी है सिपाहिन की,
कान्धे मे जनेऊ राखे माला राखी गर मैं।
मीडि राखे मुगल, मरोरि राखे पातसाह,
बैरी पीसि राखे, बरदान राख्यो कर मैं।
राजन की हद्द राखी, तेग बल शिवराज,
देव राखे देवल, स्वधर्म राख्यो घर मैं ॥
देवल गिरावते फिरावते निसान अली,
ऐसे डूबे राव राने, सबी गये लबकी।
गौरा गनपति आप औरन को देत ताप,
आपनी ही बार सब मारि गये दबकी।
पीरा पयगंबरा दिगम्बरा दिखाई देत
सिद्ध की सिधाई गई रही बात रब की।
कासी हू की कला जाती, मथुरा मसजीद होती
सिवाजी न होता तो सुन्नत हो जाती सब हिंदुओंकी ॥

—(शिवाबावनी कविता ४९, ५१ व १९)

(हे शहाजीचे वीर पुत्र शिवाजी महाराज! तुम्हीं आपल्या खड्गानें हिंदुत्वाचें संरक्षण केलें आहे. हिंदूंचा तिलक राखला आहे. श्रुति, स्मृति व पुराणांतील आचारधर्मांचें संरक्षण केलें आहे. रजपुतांचा क्षात्रधर्म व राजांच्या राजधान्यांना आपणच स्थैर्य प्राप्त करून दिलें आहे. पृथ्वीवर धर्म आपण राखला आहे. गुणिजनांमधील श्रेष्ठ गुणांचें अस्तित्व आपल्यामुळेंच राहिलें आहे. आपण महाराष्ट्राची महात्मता वाढविली आहे व महाराष्ट्राला श्रेष्ठता प्राप्त करून दिली आहे. आपली कीर्ति दिगंत पसरलेली आहे. आपल्या दिव्य खड्गानें दिल्लीपतीच्या सेनेचा पराभव करून जगांत हिंदूंच्या मानमर्यादेचें संरक्षण केलें आहे. वेदांचें आणि पुराणांचें सामर्थ्य आपल्यामुळें टिकून राहिलें आहे. आपल्यामुळें भाविकांच्या जिव्हेवरील रामनामाचें अस्तित्व शिल्लक राहिलें आहे. हिंदूंच्या पवित्र शिखेला व सैनिकांच्या भाकरीला आपल्यामुळें संरक्षण मिळालें आहे. यज्ञोपवीतांना व पवित्र माळांना आपण वांचविलें आहे. मोगलांच्या सामंतांचाच नव्हे, तर बादशहाचा आपण धुव्वा उडविलांत. निगहानुग्रहाचें सामर्थ्य आपण प्रकट केलें आहे. देवळांतील देव व घरांमधील धर्म केवळ आपल्यामुळें शिल्लक राहिला आहे. सभोवतालीं सर्वत्र यवनांचे विनाशकारी कार्य अक्षुण्णपणें चालू असतां व यवनसैनिकांनीं मंदिरें पाडून त्यांच्या जागीं अल्लाचा ध्वज फडकाविला असतां राजे महाराजे भयग्रस्त व पतित होऊन तोंड देखील बाहेर काढीत नाहींत. थोडेसें पूजाविधानांत चुकलें तर भक्तांनाच ताप देणाऱ्या देवी, गणपति आदि देवतांना आपल्यावरील या यावनी संकटाचा प्रतिकार करणें अशक्य वाटून ते लपून बसले आहेत. सिद्धांची सिद्धि समाप्त होऊन जिकडेतिकडे पीर, पैगंबर, फकीर, अवलिया यांचेंच साम्राज्य पसरलें आहे. अशा स्थितींत जर शिवाजी महाराज झाले नसते, तर काशी कळाहीन होऊन मथुरेची मशीद झाली असती; इतकेंच नव्हे तर सर्व हिंदूंची सुनता होऊन बीजाला एकही हिंदू शिल्लक उरला नसता.)

भूषणाचे हे शब्द इतके तेजस्वी आहेत कीं, त्यावर कोणतीही पुष्टि जोडण्याची आवश्यकता नाहीं. शिवाजी महाराजांना हा अवतारी पुरुषाचा मान कां प्राप्त झाला असेल ? शिवछत्रपतींच्या कितीतरी पटीनें अधिक राज्यविस्तार करणारे अनेक हिंदुसम्राट् या देशांत झाले. पण त्यांना कोणी ईश्वरी अवतार म्हटलेलें नाहीं. शिवछत्रपतींना मात्र समर्थासारख्यांनींही हें विशेषण लाविल्याचें आढळून येतें. अवताराच्या कार्याचें स्पष्टीकरण करतांना पूर्णावतार भगवान् श्रीकृष्णांनीं श्रीमद्भगवद्गीतेंमध्यें चौथ्या अध्यायांत पुढीलप्रमाणें तें केलेलें आहे :—

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।। ७ ।।
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।। ८ ।।

(ज्या ज्या वेळीं अधर्माचें अभ्युत्थान होतें व धर्माला ग्लानि येते, त्या त्या वेळीं मी अवतार धारण करतों. साधूंचें संरक्षण, व दुर्जनांचा विनाश, आणि धर्माची संस्थापना अथवा पुनरुज्जीवन हीं अवताराचीं त्रिविध कार्यें होत.) यांपैकीं कोणतेंही एकच कार्य पार पाडणाऱ्या महापुरुषाला 'विभूति' असें म्हणतात, व हीं तीनही कार्यें जो पूर्ण करतो त्याला 'अवतार' असें म्हणतात.

श्रीशिवछत्रपतींच्या काळांत जिकडे तिकडे अधर्माचें संपूर्ण अभ्युत्थान झालें होतें व धर्माला संपूर्णपणें ग्लानि आलेली होती. अशा वेळीं छत्रपति शिवाजी महाराजांनीं धर्माची ग्लानि झाडून त्याचें तेज वाढविलें, अधर्माचा नायनाट केला, म्लेंच्छांचें सारें बंड पार मोडून काढलें, व निरपेक्ष मानवी मूल्यांच्या भूमिकेवरून सज्जनांना संपूर्ण संरक्षण दिलें. समर्थांनीं म्हटलें आहे :—

"विप्रीं सांडिला आचार । क्षेत्री सांडिला विचार ।
नीतिमर्यादा उडाली । भक्ति देवाची बुडाली ।।
नाहीं पापाचा कंटाळा ।"

" कित्येक दावल मलकास जाती । कित्येक पीरास भजती ।
स्वधर्माचा लोप झाला । अधर्मी जन प्रवर्तला ।। "

साधूंना जीवित कठिण झालें होतें व दुर्जनांचें बंड जिकडे तिकडे वाढलें होतें. समर्थ म्हणतात :—

" कितीएक ते तांम्रबंदीच गेले । कितीएक महाराष्ट्र बंदी निमाले ।
कितीएक ते छंद नाबंद काई । कितीएक बेबंद ते ठायि ठायी ।।
कितीएक ते घ्राण कर्णेचि घेती । किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टविती ।
किती मोट बांधोनि ते बूडवीती । पिछोडेचि बांधोनि हीरोनि नेती ।।
म्लेच्छ दुर्जन उदंड । बहुता दिवसांचें माजलें बंड । "

या पृथ्वीच्या पाठीवर धर्मरक्षक कोणीहि उरलेला नाहीं, मानवी मूल्यांचें परित्राण यापुढें सर्वस्वी अशक्य आहे अशा घोर निराशेचा अंधार सर्वत्र पसरला होता. या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं । हें दारुण सत्य तीर्थयात्रेच्या मिषानें साऱ्या भारताचें सुसूक्ष्म निरीक्षण केल्यावर श्रीसमर्थांसारख्या तरल प्रतिभेच्या दीर्घदर्शी पुरुषालाही पदोपदीं प्रत्ययास येत होतें. अशा स्थितींत तत्कालीन जगांतील सर्वांत बलाढ्य सत्तेविरुद्ध स्वतःच निर्माण केलेल्या निष्ठावंत पण मूठभर अनुयायांच्या बळावर एक पुरुष स्वार्थनिरपेक्ष धर्मबुद्धीनें दंड थोपटून उभा ठाकला आणि समर्थांच्याच शब्दांत सांगावयाचें तर अत्युग्र निश्चयाच्या त्या अविकंपित महामेरूनें कवींचें ईप्सित व द्रष्टयांचें स्वप्न साकार करून दाखविलें. श्रीसमर्थ म्हणतात :—

स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेचि होतसे ।
हिंडता हिंडता गेलों । आनंदवनभूवना ।।
कल्पांत मांडला मोठा । म्लेच्छ दैत्य बुडावया ।
कैपक्ष घेतला देवीं । आनंदवन भूवनीं ।।

बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावलें ।
अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवनभूवनीं ।।
बुडाला औरंग्या पापी । म्लेच्छ संहार जाहला ।
मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें । आनंदवनभूवनीं ।।
येथून वाढला धर्म । रमाधर्म समागमें ।
संतोष मांडला मोठा । आनंदवनभूवनीं ।।

हें ईश्वरी अवतारानेंच करावयाचें कार्य शिवछत्रपतींनीं पूर्ण केलेलें पाहून श्रीसमर्थांना ते ईश्वरी अवतार वाटले तर त्यांत नवल नाहीं व म्हणूनच त्यांच्या तोंडून हिंदुमात्राला उद्देशून संभाजीच्या निमित्तानें ––

" शिवराजास आठवावें । जीवित्व तृणवत् मानावें ।
इह परलोकीं राहावें । कीर्तिरूपें ।।
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप ।
शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ।।
शिवराजाचें कैसें बोलणें । शिवराजाचें कैसें चालणें ।
शिवराजाची सलगी देणें । कैसे असे ।।"

हा संदेश जीवनादर्श म्हणून बाहेर पडलेला आहे. छत्रपति शिवाजी महाराजांच्या विभूतिमत्त्वाकडे या दृष्टीनें पाहिलें म्हणजे नेपोलियन प्रभृति राज्यसंस्थापकांहून ते कितीतरी श्रेष्ठ योग्यतेचे वाटूं लागतात. ते वीर, उत्कृष्ट सेनानायक, श्रेष्ठ मुत्सद्दी, थोर राजनीतिज्ञ, धुरंधर पराक्रमी व आदर्श राज्यकर्ते तर होतेच; पण अशा सर्व लोकांहून कितीतरी पटीनें श्रेष्ठ अशी धर्मसंरक्षकाची व संस्कृतिसंजीवकाची त्यांची भूमिका होती. त्यामुळें लोकांनीं तर त्यांना ईश्वरी अवतार म्हटलेंच, पण कर्तृत्वाच्या क्षेत्रांत पहिलें पाऊल टाकतांना वयाच्या पंधराव्या अथवा सोळाव्या वर्षींच आपलें कार्य हें ईश्वरी कार्य आहे अशी त्यांची स्वत:चीच दृढ धारणा होती, व त्यामुळें तें यशस्वी होईलच असा, भोवतालीं निराशेचा घन अंधकार पसरलेला असतांनासुद्धां, त्यांचा आश्चर्य-कारक दृढ आत्मविश्वास होता. कार्यक्षेत्रांत पाऊल टाकण्याच्या

वेळीं आपल्या लहान वयांतच त्यांनीं प्रवर्तित केलेली संस्कृत राजमुद्रा ही त्यांच्या या आत्मविश्वासाचें एक महान् प्रतीकच होय. ती राजमुद्रा पुढीलप्रमाणें आहे :—

प्रतिपच्चन्द्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।

(प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणें जिचें विकसन निश्चित आहे, ती शहाजीचा पुत्र जो शिवाजी त्याची ही राजमुद्रा विश्ववंद्य असून विश्वकल्याणासाठींच तिचें अस्तित्व आहे.) त्यांतील 'भद्राय' या शब्दानें शिवछत्रपतींचा ध्येयवाद जसा व्यक्त झालेला आहे तसा प्रतिपदेच्या चंद्रकोरीच्या गंभीर उपमेनें यशाविषयींचा त्यांचा आत्मविश्वासही परिपूर्ण रीतीनें व्यक्त झालेला आहे. प्रतिपदेच्या चंद्रकोरीची ही उपमा अत्यंत समर्पक आहे. प्रतिपदेची चंद्रकोर जशी दिसत नाहीं, पण तिचें पूर्णचंद्रांत रूपान्तर होणें जसें निश्चित असतें, त्याचप्रमाणें सभोवारचीं संकटें व स्वतःच्या प्रयत्नांचें अत्यंत अस्पष्ट स्वरूप निराशा उत्पन्न करणारें असलें, तरी या ईश्वरी कार्यांतील यश निश्चित आहे असें छत्रपति शिवाजी महाराज या उपमेनें ध्वनित करीत आहेत.

पण ही संस्कृत राजमुद्रा शिवछत्रपतींच्याच प्रतिभेची निर्मिति असेल काय ? असें पुष्कळ प्रत्ययहीन आक्षेपकांना वाटण्याचा संभव आहे. या सर्व संशयात्म्यांच्या संशयाची निवृत्ति करणारें स्वतः शिवछत्रपतींनींच लिहिलेलें एक पत्र उपलब्ध आहे. तें म्हणजे मागें उल्लेखिलेले रोहिरखेडचे दादाजी नरसी प्रभू यांना शिवछत्रपतींनीं पाठविलेलें पत्र होय. या पत्रांत शिवछत्रपतींनीं आपलें कार्य ईश्वरी कार्य असल्याचा स्पष्ट निर्वाळा दिला आहे. ते लिहितात, "हें राज्य व्हावें असें श्रीचे मनांत फार आहे."

खड्गाला शिवछत्रपतींनीं हें जें धर्मराज्यनिर्मितीचें दैवी अधिष्ठान प्राप्त करून दिलें, त्यामुळें ते मानवतेचाच अमर अलंकार ठरले आहेत. या ध्येयवादानें त्यांचें कार्य हें जनताजनार्दनाचेंच कार्य ठरलें व प्रदीर्घ काळ जीवनमरणाच्या संकटांत सांपडलेल्या

एका महान् राष्ट्राच्या जीवनाकांक्षेचें शिवछत्रपति हे प्रतीक ठरल्या-मुळें त्यांनीं प्रारंभ केलेला संघर्ष व निर्माण केलेलें निष्ठावंत जीवन यांचें स्वरूप व प्रभाव हीं हिंदुजीवनांतील नेहमीं परिचयाच्या असणाऱ्या घटनांहून वेगळ्याच उत्स्फूर्त स्वरूपाचीं दिसून आलीं. विजयनगरचा अंतिम सम्राट रामराजा याचें सैन्य, विजयाच्या ऐन सीमारेषेवर उभें असतां, तो धारातीर्थीं पडतांच कच खाऊन पळून गेलें; व विजयनगरच्या साम्राज्याचा संपूर्ण विध्वंस झाला. जर एका रामराजाच्या विध्वंसाचा व शिरच्छेदाचा सूड म्हणून त्याचे सेनापति व सैनिक पळून न जातां तसेंच ठाण मांडून रणांत उभे ठाकले असते तर एवढें मोठें, दोनशें वर्षे एकसारखें वर्धिष्णु राहिलेलें हिंदु साम्राज्य खात्रीनें स्मृतिशेष झालें नसतें. पानिपतच्या रणसंग्रामांत मध्यान्हापर्यंत जयश्रीनें मराठ्यांच्या बाजूनें आपला कौल दिला होता. पण सेनेचे नेते विश्वासराव रणांगणांत गोळी लागून ठार होतांच सेनापति भाऊसाहेब पेशवे शोकविव्हल होऊन हत्तीऐवजीं घोड्यावर स्वार झाले. विश्वासरावांच्या मृत्यूनें कच खाऊन मराठी सेनापति "धनी गेला आतां लढावयाचें कशास," असें एकमेकांस म्हणूं लागले व भाऊसाहेब पेशवे दिसेनासे होतांच मराठी सैनिक वाट फुटेल तिकडे पळूं लागले. हानि व अपजय यांनीं मराठ्यांना मिठी मारली व जयश्रीनें दुराणीला माळ घातली.

तालीकोट व पानिपत या दोन्ही घटनांत एक विलक्षण दृश्य दिसतें. तालीकोटच्या संग्रामांत रामराजा घोड्याऐवजीं पालखींत बसला असतां लोकांस तो दिसावा म्हणून त्याच्या जवळच्या लोकांनीं घोड्यावर बसण्याची त्याला परोपरीनें विनंति केली. तसेंच पानिपतमध्यें विश्वासराव ठार होतांच ते गेले हें लोकांना समजूं नये म्हणून भाऊसाहेबांनीं त्यांचें प्रेत कांहीं वेळ तसेंच हत्तीशीं बांधून ठेवलें व भाऊसाहेब स्वतः घोड्यावर स्वार होत असतांना त्यांच्या बरोबरीच्या लोकांनीं त्यांना घोड्यावर स्वार न होतां हत्तीवरच सर्वांना दिसेल अशा पद्धतीनें बसण्याची

परोपरीनें विनंती केली. या सर्व घटनांचा अर्थ असा आहे कीं, युद्ध हें आपलें नसून तें आपल्या धन्याचें वा नेत्याचें आहे अशी या लोकांची धारणा होती. युद्धापाठीमागें असलेल्या कोणत्याही उदात्त प्रेरणा त्यांच्या मनांत तरी नव्हत्या. पण शिवाजी महाराजांच्या संघर्षामागें संपूर्ण राष्ट्राचा उत्कट पाठिंबा होता. तो संघर्ष शिवाजी या व्यक्तीचा नसून सबंध राष्ट्रपुरुषाचा आहे व शिवाजी हें त्याचें केवळ प्रतीक आहे अशी एकात्म राष्ट्रजीवनाची भव्य धारणा त्यांच्यामागें उभी होती. तालीकोट व पानिपतपेक्षांहि बिकट प्रसंग शिवछत्रपतींच्या काळीं आले असतांना शिवछत्रपतींचा महाराष्ट्र राष्ट्रीय अस्मितेच्या या तेजस्वी धारणेनें संकटांना पचवून सदैव जयिष्णु व वर्धिष्णूच राहिला. हें प्रमेय सिद्ध करणारीं तीन ठळक उदाहरणें दाखवितां येण्यासारखीं आहेत.

पहिलें उदाहरण छत्रपति शिवाजी महाराजांच्या आग्रा येथील बंदिवासाचें होय. शिवछत्रपति आग्र्याला गेले त्या वेळीं बहुतेक सर्व मराठी मुलूख औरंगजेबाचा सर सेनापति जयसिंग याच्या अधीन झाला होता. बंदिवासांत अडकल्यानंतर ते जीवितावस्थेंत परत येतील अशी कोणालाही आशा नव्हती. अशा विलक्षण अवस्थेंत सुद्धां स्वराज्याच्या सूत्रधारांचा थरकाप उडाला नाहीं. त्यांनीं शिवछत्रपतींच्या धोरणानुरूप स्वराज्य राखून दाखविलें.

याहीपेक्षां रोमांचकारी घटना छत्रपति संभाजी महाराजांच्या वधानंतरची होय. लक्षावधि सैन्य बरोबर घेऊन क्रूरकर्मा अलमगीर बादशहा मराठी राज्य धुळीस मिळविण्यासाठीं महिनोगणती महाराष्ट्रांत ठाण मांडून बसला होता. स्वराज्याचें सामर्थ्य व साधनसंपत्ति शत्रूसमोर टिकून राहण्यासारखी नव्हती. अशा स्थितींत राजवधाचा दारुण आघात त्यांना सहन करावा लागला. असावध स्थितींत त्यांचा राजा बंदी झाला. त्याचे हालहाल करून त्याला क्रूरपणें ठार मारण्यांत आलें. त्याचे डोळे काढले गेले, जीभ छाटली गेली, व शिरच्छेद करून त्याच्या शरीरांत पेंढा भरला गेला.

आजवर क्रौर्यपूर्ण हत्यांनीं लोक हाय खाऊन शरण येतात अशी इस्लामी क्रूरकर्म्यांची अनुभवावर आधारलेली धारणा होती. पण छत्रपतींच्या स्वराज्याचा त्यांना वेगळा अनुभव आला. संभाजीच्या बलिदानानें मराठे खचले नाहींत तर चिडून उठले. त्यांची वस्तुतः दयनीय अवस्था झाली होती. त्यांचा राजा मारला गेला होता, राणी व राजपुत्र मोगलांच्या कैदेंत होते, दुसरा नेता छत्रपति राजाराम सुदूर दक्षिणेंत जिंजीच्या आश्रयानें होता, त्यांची राजधानी गेली होती, सिंहासन अदृश्य झालें होतें, व राजछत्र फाटून त्याचे तुकडे झाले होते; पण अशाही स्थितींत पुढें होईल तो नेता, हातीं येईल तें शस्त्र, व आकाशमंडपाचेंच राजछत्र करून, संपूर्ण महाराष्ट्र धर्मयुद्धाच्या जाणिवेनें औरंगजेबावर तुटून पडला. एक शिवाजी नसून प्रत्येक घराघरांत धर्मसरक्षणार्थ कटिबद्ध झालेला शिवाजी आहे याचा यवनांना प्रत्यय आला. डोळ्यांदेखत तंबूचे सोन्याचे कळस कापून नेलेले औरंगजेबानें पाहिले. तो त्या तंबूंत नव्हता ही अल्लाची त्यावर कृपाच म्हटली पाहिजे. नाहीं तर त्याचेंच मस्तक संताजी घोरपड्यांच्या खड्गानें अंतराळांत उडालें असतें.

स्वराज्य गाडून टाकण्यासाठीं आलेल्या औरंगजेबालाच येथें ससैन्य 'दफन' व्हावें लागलें. या घटना काय सिद्ध करतात? शिवछत्रपतींचा संघर्ष हा त्यांचा स्वतःचा नसून तो राष्ट्रपुरुषाचा संघर्ष होता. ती एक महान् जनक्रांति होती, हेंच ह्या घटना सिद्ध करीत नाहींत काय? जगावयाचा निर्धार केलेल्या राष्ट्रीय इच्छाशक्तीचें उत्कट प्रतीक म्हणजे शिवाजी महाराज होते. म्हणून ते नुसते राज्यसंस्थापक नसून राष्ट्रनिर्माते आहेत; राजपुरुष नसून राष्ट्रपुरुष आहेत.

पुष्कळ लोक असें समजतात कीं शिवछत्रपतींनीं मराठी सत्ता उत्पन्न केली. पण इतिहासाचा नीट मागोवा घेतला तर असें आढळून येईल कीं, मराठी सत्ता शिवछत्रपतींच्या आधींच दक्षिण भारतांत निर्माण झालेली होती. ती विखुरलेली होती, ती शिवाजी

महाराजांनीं एकत्रित केली, व एका महान् ध्येयसूत्रानें ती संघटित करून तिला व्यापक तत्त्वज्ञानाची बैठक त्यांनीं निर्माण करून दिली, आणि समान संकटाच्या जाणिवेनें राष्ट्रीय जीवनाकांक्षा तिच्यांत निर्माण केली. म्हणून शिवछत्रपति हे चिरंजीव व प्राचीनतम भारतीय राष्ट्राच्या ज्वलंत जीवनाकांक्षेचें प्रतीक म्हणून ह्या राष्ट्राचें अखंड स्फूर्तिकेन्द्र होऊन राहिले आहेत व पिढ्यानुपिढ्या ते तसेच राहतील असें त्यांचें विभूतिमत्त्व आहे.

नवभारताचे एक राष्ट्रपुरुष न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे हे आपल्या Rise of the Maratha Power या ग्रंथांत म्हणतात, " He did not create the Maratha power; that power had been already created, though scattered in small centres all over the country. He sought to unite it for a higher purpose by directing it against the common danger. This was his chief merit and his service to the country and in this, consists his chief claim upon the grateful remembrance of his people. It was not for nothing that the people looked up to him as their inspired leader. He felt the inspiration himself and communicated it to those about him, not only in one generation, but for gererations more to come after him, till the idea of re-establishing Hindu power throughtout the country was realized at once in the great centres or camps which the Mara thas established in all parts of the Indian continent."

(शिवछत्रपतींनीं मराठी शक्ति उत्पन्न केली नाहीं. ती शक्ति त्यापूर्वींच उत्पन्न झालेली होती. मात्र ती राष्ट्रांत ठिकठिकाणीं विखुरलेल्या छोट्याछोट्या केन्द्रांभोवतीं गोळा झालेली होती. शिवछत्रपतींनीं उदात्त ध्येयासाठीं ती एकसूत्रित केली व समान राष्ट्रीय संकटाविरुद्ध तिचा उपयोग करून घेतला. शिवछत्रपतींचें खरें विभूतिमत्त्व येथेंच प्रकट झालेलें असून त्यांनीं केलेल्या राष्ट्रकार्याचें

प्रधान स्वरूप हें आहे. याच कारणास्तव ते आपल्या राष्ट्रबांधवांच्या श्रद्धेचा विषय झाले आहेत. लोक त्यांना उगाच कांहीं दैवी प्रेरणेचा पुरुषोत्तम मानीत नव्हते. त्यांना स्वतःलाच त्या प्रेरणेचा प्रत्यय होता; आणि भोवतालच्या सर्व लोकांच्यांत त्यांनीं तीच प्रेरणाशक्ति भरून दिली. पिढ्यांमागून पिढ्या त्यांनीं या प्रेरणा-शक्तीनें भारून टाकल्या. त्या संपूर्ण भारतांत हिंदु साम्राज्य प्रस्थापित होईपर्यंत या प्रेरणेनेंच अखंड क्रियाशील होत्या. )

शिवछत्रपतींच्या अवतारकार्याचें हें स्वरूप ध्यानांत घेतलें म्हणजे सन्मानानें जगूं इच्छिणाऱ्या एका महान् राष्ट्राची रसरशीत जीवनशक्ति त्यांच्या रूपानें साकार झाली होती याचा प्रत्यय येतो. पण या महान् राष्ट्रांत ही उत्कट जीवनाकांक्षा जळजळीत-पणें निर्माण व्हावी असे कोणते आघात या राष्ट्रावर चालू होते व झाले होते हें पाहणें अवश्य आहे.

✦ ✦ ✦

प्रकरण दुसरें

# इस्लामी आक्रमणाचे परिणाम

शिवछत्रपतींच्या उदयापूर्वीचा महाराष्ट्र देशाचा इतिहास भारताच्या इतिहासाशीं संलग्न असून त्या इतिहासाचें संपूर्ण समालोचन केलें तर या राष्ट्रांत त्यांच्या रूपानें जी धगधगीत जीवनाकांक्षा प्रकट झाली तिची नीट उपपत्ति लागते. हा एकंदर इतिहास भारतीय धर्माच्या, भारतीय संस्कृतीच्या, भारतीय जीवन-मूल्यांच्या, व भारतीय समाजाच्या भारतीयत्वाच्या रोमांचकारी व दुःखपूर्ण विध्वंसाचा इतिहास आहे. भारतावर इस्लामी आक्रमणें प्रारंभ होण्यापूर्वी वेगवेगळ्या लोकांचीं आक्रमणें झालीं नाहींत असें नाहीं. पण भारतांत यापूर्वी झालेलीं येथील राजांचीं परस्पर

युद्धें व परकीय आक्रमकांशीं भारतीयांचीं झालेलीं युद्धें याचें स्वरूप, व भारतावर झालेल्या इस्लामी आक्रमणाचें स्वरूप हें कधींही एकसारखें नव्हतें. इस्लामेतर युद्धें व आक्रमणें हीं केवळ राज्यासाठीं व संपत्तीसाठीं असत. चंद्रगुप्त मौर्याच्या वेळीं परस्परांवर राज्यासाठीं झालेल्या राजांच्या आक्रमणाचें तर असें वर्णन आढळतें कीं, राजांचीं सैन्यें परस्परांशीं युद्धें करीत, तरी शेजारच्या प्रदेशांतून शांतपणें आपली शेती करीत असणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांचा उपसर्ग पोहोंचत नसे. त्यामुळें एकाद्या राज्यांतील परिवर्तनानें लोकांच्या जीवनपद्धतीवर कोणताही परिणामकारक आघात होत नसे. परकीय लोकांच्या धनतृष्णेचा नागरिक जीवनाला उपसर्ग पोहोंचत असला, तरी तो केवळ धनापुरताच असे. त्याहून अधिक असा सर्वस्वनाशाचा अनुभव कधीं या आक्रमणांतूनही येत नव्हता. पण इस्लामी आक्रमण हें या स्वरूपाचें आक्रमण नव्हतें. तें सर्वभक्षक व राष्ट्रजीवनाला संपूर्णपणें उद्ध्वस्त करून टाकणारें आक्रमण होतें. केवळ जीवनावरच नव्हे, तर राष्ट्राच्या श्रद्धाजीवनावर आघात करणारें तें आक्रमण होतें.

हा अनुभव केवळ भारताचाच नसून तो एक प्रकारें जागतिक अनुभव आहे असें म्हटलें तरी चालेल. इस्लामी सत्ताकेन्द्र अस्तित्वांत आल्यानंतर त्या सत्ताकेन्द्राच्या सैनिकांनीं युरोपकडे आपली दृष्टि वळवून स्पेनपर्यंतचे जे देश धुळीला मिळविले, त्यांचा इतिहास भारतासारखीच साक्ष देईल. इस्लामी विचारसरणींत असें कांहीं असल्याचा प्रत्यय या आक्रमणाच्या भक्ष्यस्थानीं पडलेल्या सर्वच समाजांना आला कीं, इस्लामेतर असें कांहीं जिवंत राहूंच द्यावयाचें नाहीं असा या प्रणालीचा संकेत आहे. अलीकडे भारतामध्यें एका रासायनिक व मिश्र संस्कृतीला जन्म देऊं इच्छिणारे लोक असें प्रतिपादन करीत असतात कीं, इस्लामचें हें आक्रमण त्यांत शिरलेल्या गझनीच्या महम्मदासारख्या अथवा महम्मद घोरीसारख्या कांहीं लुटारूंच्या नेतृत्वामुळें इतकें विध्वंसकारी

ठरलें; वस्तुत: त्यांतील जुने खलिफा हे उच्च कोटीचे पुरुष होते. पण हें म्हणणें भ्रमपूर्ण आहे. रामधारी सिंह दिनकर या हिंदी जगांतील एका लेखकानें 'संस्कृतिके चार अध्याय' या एका वर्षापूर्वीं प्रसिद्ध झालेल्या आपल्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, "जिस इस्लामका स्वरूप अबूबक्र, उमर, उस्मान, और अली जैसे खलिफाओंनें सवारा था, उसके अनुयायी सच्चरित्र, दयाळू, उदार और ईमानदार थे।" ग्रंथकर्ता येथें ज्या उमर खलीफाचें नांव घेऊन त्याला हें प्रशस्तिपत्रक देतो, त्याच्याविषयीं सुप्रसिद्ध इतिहासकार गिबन यानें आपल्या रोमन साम्राज्याच्या इतिहासावरील विश्वविख्यात ग्रंथांत जें लिहिलें आहे तें मनन करण्यासारखें आहे. या उमर खलिफाच्या वेळीं अमरू नांवाच्या एका सरदारानें अलेक्झांड्रियावर स्वारी करून विजय संपादन केला. तेथील प्रचंड ग्रंथसंग्रहालयासंबंधीं त्यानें खलिफाला विचारणा केली. त्यावर अरबी वंशाच्या या उमर खलिफानें जें उत्तर दिलें तें गिबननें आपल्या विख्यात रोमच्या इतिहासांत पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे :—

The well-known answer of Omer was inspired by the ignorance of a fanatic. "If these writings of these Greeks agree with the book of God, they are useless and be not preserved; if they disagree, they are pernicious, and ought to be destroyed. The sentence was executed with blind obedience. The volumes of paper or parchment were distributed to the four thousand baths of the city; and such was their incredible multitude that six months were barely sufficient for the consumption of this precious fuel."

— (The Decline and Fall of the Roman Empire Vol. V. 534.)

(या सरदाराला उमरनें जें उत्तर दिलें तें धर्मवेडाचें द्योतक होतें. त्यानें सांगितलें कीं, 'ग्रीकांच्या ह्या ग्रंथांतील ज्ञान व

कुराणांतील ज्ञान एकच असेल तर एकाच ज्ञानाचीं अनेक पुस्तकें असण्याचें कारण नाहीं. म्हणून तीं नष्ट करून टाकावीं व जर कुराणाशीं विसंवादी असें तें ज्ञान असेल तर तें अपकारक आहे म्हणून तें नष्ट करणें अवश्य आहे. म्हणून तें नष्ट करावें.' त्या सरदारानें ती आज्ञा तंतोतंत अंमलांत आणली व अलेक्झांड्रिया शहरांतील चार हजार स्नानगृहांना या ग्रंथांचें जळण पुरविण्यांत आलें. तें सहा महिने पुरण्याइतकें मोठें होतें.)

तात्पर्य, कांहीं लुटारूंनीं अत्याचार केले आहेत असें एका रासायनिक संस्कृतीच्या निर्मितीसाठीं खोटा इतिहास बनवून लोकांना सांगणें ही केवळ सत्याची वंचना होय. मोठमोठे धर्मगुरू, काज़ी, मुल्ला, मौलवी, सत्ताधारी यांना इस्लामेतरांचा विध्वंस करण्याच्या दिलेल्या आज्ञांकडे उघड्या डोळ्यांनीं पाहिलें तर या विचारप्रणालींतच हीं विध्वंसाचीं व आक्रमणाचीं बीजें असलीं पाहिजेत याची खात्री पटते. सर मूर यांनीं लिहिलेलें महम्मद पैगंबराचें चरित्र व पामरनें केलेलें कुराणाचें भाषांतर पाहिलें तर या विध्वंसकारी प्रवृत्तीचा परिपूर्ण उलगडा होतो. इस्लामेतर हा काफर असून त्याला कोणत्याहि प्रकारचा सन्मान देण्याचें कारण नाहीं व त्याच्या ताब्यांतील प्रदेश अपवित्र असल्यामुळें तो स्वतःच्या ताब्यांत आणणें हें आपलें कर्तव्य होय; व स्त्रिया, मुलें, धन इत्यादि जें जें कांहीं त्याचें असेल त्या त्या सर्वांवर आपलाच स्वामित्वाचा हक्क असून सर्व जग इस्लाममय करणें हें आपलें कर्तव्य होय, अशी इस्लामच्या अनुयायांची दृढ धारणा असते. प्रथम पैगंबरांनीं हा धर्म जरी शांततेच्या मार्गानें पसरविण्याचा प्रयत्न केला, तरी त्यांना त्यांत जे वाईट अनुभव आले त्यामुळें त्यांनीं तलवारीनें धर्मप्रसार करण्याचा आदेश दिला. हा आदेश देतांना त्यांच्या स्वतःच्या त्यासंबंधांत काय मर्यादा होत्या, ह्या त्यांच्या त्यांनाच माहीत; परंतु त्यांच्या अनुयायांनीं मात्र धर्माचीच आज्ञा समजून एका हातांत मशाल व दुसऱ्या हातांत खड्ग घेऊन इस्लामेतर जगताच्या विध्वंसनाच्या कार्यास प्रारंभ केला. पैगंबरानंतर

इस्लामचें नेतृत्व खलिफांच्याकडे आलें. त्यांच्याकडे असलेले अधिकार पाहिले तर ते इस्लामी जगताचे सर्वाधिकारी होते असें ध्यानांत येईल. ते अधिकार पुढीलप्रमाणें :—

(१) कुराणाचें समर्थन करणें व त्यांतील धर्माचा जगभर प्रसार करणें.

(२) कुराणेतर धर्मांच्या अनुयायांना नष्ट करणें व त्यांच्या धर्माचें स्थान स्वत:कडे घेणें.

(३) इस्लामी देशांना संरक्षण देणें; न्याय, सैन्य, कोश, पारितोषिक, दंड व अन्य राज्याधिकारांच्या बाबी या बाबतींत इस्लामी देशांतील सत्तांचें नियंत्रण करणें.

(४) इस्लामेतरांच्या विरुद्ध धर्मयुद्ध घोषित करणें, त्यांच्यावर झिजिया कर लादणें, त्यांचा प्रदेश ताब्यांत घेणें, त्यांना गुलाम करणें; त्यांचा संहार करणें, अथवा पैसे घेऊन त्यांना सोडून देणें.

या सर्व बाबी पाहिल्या तर खलिफांच्या अधिकाराच्या व्यापकतेची व सर्वनियंत्रकत्वाची खरी कल्पना येते. या खलिफांनींच इस्लामेतरांच्यावर ते केवळ इस्लामचे अनुयायी नाहींत, येवढ्याच एका कारणास्तव झिजिया नांवाचा अपमानास्पद कर वसविला. या विचारप्रणालीमुळें मुसलमानांची संपूर्ण नीतिमत्ता ही अत्यंत विध्वंसक ठरली. शत्रूवर दया दाखविणें, त्यांच्याविषयीं हृदयांत मृदुता धारण करणें, हें ते पाप समजत. जितावर वर्चस्व गाजविण्याकरितां, धर्म म्हणून ते विश्वासघात, क्रौर्य, आणि संहार यांचा सहज अवलंब करीत. लढाऊ लोकांची कत्तल करणें, निरपराध्यांना गुलाम करणें, स्त्रियांना बळजबरीनें भ्रष्ट करून गुलाम म्हणून जनानखान्यांत खेचणें, मुलूख जाळून बेचिराख करणें, इतरांचीं प्रार्थनामंदिरें व मूर्ति फोडून अपमानाचा चरचरीत डाग त्यांच्या हृदयावर सदोदित राहण्यासाठीं या प्रार्थनामंदिरांचें अथवा उपासनामूर्तींचे दगड मशिदींच्या पायऱ्यांना लावणें, इत्यादि गोष्टी हा त्यांचा खेळ होता.

या तऱ्हेच्या आक्रमणाचा हिंदु लोकांना पूर्वीं कधींही अनुभव

नव्हता. दुर्बळास मारूं नये; शरणागतास अभय द्यावें; शत्रूच्या स्त्रियांचा सुद्धां माताभगिनीप्रमाणें सन्मान राखावा, ही नीति सर्व सामान्यत: हिंदूंच्या हाडीमांसीं शतकांनुशतकें खिळलेली होती. युद्धाचे सुद्धां माणुसकीला धरून त्यांनीं एक विशिष्ट नीतिशास्त्र उत्पन्न केलें होतें. मेगॅस्थेनिसनें यासंबंधांत असे उद्‌गार काढले आहेत कीं, इतर राष्ट्रांमध्यें ही सर्वसामान्य गोष्ट आहे कीं, युद्ध सुरू झाल्यावर शत्रूचा प्रदेश बेचिराख करावा; पण भारतांत हा प्रकार कधींही दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. उलट भूमीला अत्यंत पवित्र समजण्यांत येतें.

युद्धांत कोणाला मारावें व कोणाला मारूं नये या संबंधांत सूक्ष्म विवेक करणाऱ्या भारताच्या प्राचीन द्रष्ट्यांनीं युद्धांनाही मानवी मूल्यांवर अधिष्ठित केलें होतें. सातव्या शतकापर्यंत या पद्धतीनें जीवन घालविलेल्या हिंदूंवर त्यांच्या कल्पनासृष्टींतही न येणारी अशी ही इस्लामी आक्रमणाची टोळधाड इ. स. ७११ मध्यें येऊन कोसळली; आणि तिच्या त्या अपरिचित स्वरूपामुळें भारतीय राष्ट्राला विलक्षण धक्का बसला. या वेळीं वालिद नांवाचा खलिफा इस्लामी जगताचें नियंत्रण करीत होता. त्याच्या आज्ञेवरून महम्मद बिन कासीमनें सिंध प्रांतांत देवल बंदरावर स्वारी केली. त्या बंदरांत एक मोठें मंदिर होतें. त्या मंदिरावर एक उंच ध्वज होता. कासीमनें ज्या वेळीं स्वारी केली त्या वेळीं त्या मंदिरांतील मूर्तीच्या व वरील ध्वजाच्या सामर्थ्यानें यवनांचा आपोआप पराभव होईल अशा भाबड्या कल्पनेनें तेथील राजा व हिंदू स्वस्थ राहिले. आणि शेवटीं महंमदानें आपला मोर्चा प्रथम त्या देवळावरच वळवून तेथील मूर्तीचे शतशः तुकडे केले आणि देवालय लुटलें व लोकांची बेसुमार कत्तल केली. असें सांगतात कीं, सरसकट स्त्रीपुरुषांची तो कत्तल करीत असतांना त्यानें आपल्यावर दया करावी म्हणून तेथील हिंदूंनीं त्याची प्रार्थना केली; पण त्यानें असें उत्तर दिलें कीं, मला संरक्षणाची आज्ञा नसून केवळ कत्तलीची आज्ञा आहे.

त्यानंतर तो मुलतानवर चालून गेला. तेथें त्याला एका ब्राह्मणानें देवालय दाखविलें. या देवालयांत सुवर्णमुद्रांनीं भरलेल्या एका हंड्यावर एक सुवर्णाची मोठ्या मनुष्याच्या आकाराची मूर्ति होती. तिचें वजन २३० मण होतें, व खालच्या हंड्यांत १३२० मण सोनें होतें. कासीमनें तें सर्व लुटलें. सहस्रावधि लोक त्यानें बळानें मुसलमान केले. त्यांत सहस्रावधि बुद्ध भिक्षु व भिक्षुणी होत्या. ब्राह्मणाबाद इत्यादि कित्येक शहरें त्यानें लुटलीं व साठ हजार स्त्रीपुरुषांना तलवारीच्या धाकानें इस्लामी धर्मांत ओढलें.

श्री. चिंतामणराव वैद्य हे आपल्या मध्ययुगीन भारताच्या इतिहासांत लिहितात. "भारतीय जीवनांत प्रथमच मुस्लिम युद्धपद्धतीच्या सर्वभक्षक भयानक स्वरूपाचा परिचय झाला. आपल्या घोर कत्तलींनीं कासीमनें जणूं सिंधमधील हिंदु व बुद्धांच्या समोर एक नवेंच उदाहरण प्रस्तुत केलें." सिंधच्या दाहीर राजाला ठार मारून कासीमनें त्याच्या दोन मुली खलिफाकडे भेट म्हणून पाठविल्या. या मुलींनीं कासीमनें आपल्याला भ्रष्ट केलें असल्याची खोटीच वार्ता खलिफाला सांगितली. त्यामुळें संतापून जाऊन खलिफानें कासीमला गोणत्यांत बांधून बुडवून ठार मारलें. कासीमच्या पाठोपाठ इ. स. १००१ मध्यें महम्मद गझनीनें हिंदुस्थानवर स्वारी केली. पहिल्याच स्वारींत त्याला इतकी लूट मिळाली कीं, त्यानंतर त्यानें लुटीसाठीं हिंदुस्थानवर वारंवार स्वाऱ्या केल्या. त्याच्या ह्या स्वाऱ्यांतील त्यानें दाखविलेल्या क्रौर्यासंबंधानें स्मिथ असें लिहितो कीं, "It would be tedious to relate in full the story of all his murderous expeditions," मूर्तिपूजेचें पातक धुवून काढल्यानें अल्लाची आपल्यावर कृपा होते या कल्पनेनें त्यानें देवालयामागून देवालयें उद्ध्वस्त केलीं व अगणित संपत्ति लुटली. केवळ नगरकोटच्या देवालयाचा विध्वंस करून त्यानें जी हिरेमाणकें एकत्र केलीं होतीं त्यांची नोंद सुद्धां करतां येणें अशक्य ठरलें. प्रसिद्ध सोमनाथाचें मंदिर ज्या वेळीं त्यानें लुटलें त्या वेळीं त्यानें पन्नास हजार लोकांची कत्तल केली होती.

हिंदूंच्या जीवनांत हा आक्रमणाचा प्रकार नव्यानेंच उदयास आल्यामुळें त्यांचे परिचित नीतिनियम त्यांना घातक ठरले. वंचक क्रौर्य व राक्षसी विध्वंसनाच्या तांडवानें येथील हिंदुसत्ता पार कोलमडून पडली. ते शौर्यांत कमी पडले नसून पशुवृत्तींत व राक्षसीपणांत कमी पडले होते. इ. स. ११९३ मध्यें महम्मद घोरीनें वंचकतेनें दिल्लीपति पृथ्वीराजाचा वध केल्यावर मुस्लिम सत्ता भारतांत स्थिरपद झाली. यापूर्वी इ. स. ११९१ मध्यें महम्मद घोरीची भारतावर पहिली स्वारी झाली होती. या स्वारींत पृथ्वीराज चव्हाणानें त्याचा पराभव करून त्याला बंदी केलें होतें. पण त्यानें क्षमायाचना करून जीवदान मागतांच उदार पृथ्वीराजानें त्याला अभयप्रदान केलें. वस्तुत: घोरीसारख्या राक्षसी प्रवृत्तीच्या शत्रूचें स्वरूप कासीम व गझनीच्या महम्मुदाच्या आक्रमणानंतर येथील हिंदु राजांनीं ओळखावयास हवें होतें. पण तसें तें न ओळखल्यामुळें पृथ्वीराजानें घोरीला जीवदान दिलें व त्याचा परिणाम त्याला भोगावा लागला. पृथ्वीराजाच्या हत्येनंतर इस्लामी सत्ता कुतुबुद्दिन ऐबकापासून हिंदुस्थानांत स्थिरपद झाली व यानंतर औरंगजेबापर्यंत वेगवेगळ्या घराण्यांचे जे वेगवेगळे सत्ताधीश दिल्लीपति म्हणून नांदले त्यांनीं, त्यांच्या ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांनीं व तदितर भारतांतील स्वतंत्र मुसलमानी सत्तांनींही क्रौर्य, संहार व विध्वंसाचें एक भीषण युगच प्रवर्तित केलें. इस्लामेतर जें जें कांहीं असेल तें तें सर्व नष्ट करून टाकणें हेंच या सर्व सत्तांचें ब्रीद होतें. सज्जनांतले सज्जन इस्लामाधिपति सुद्धां इस्लामेतरांच्या बाबतींत क्रूरकर्मे राक्षसच ठरले आहेत. इस्लामी आक्रमकांच्या विशेषांची जर वर्गवारी केली तर ते पुढीलप्रमाणें सांगतां येतील :—

(१) स्त्रिया व मुलें यांचें अपहरण व विटंबना.

(२) मूर्तिभंग, देवालयांचा विध्वस व अपमान म्हणून मूर्तींचे व देवालयांचे दगड मशिदींच्या पायऱ्या म्हणून उपयोगांत आणणें.

(३) लुटालूट, जाळपोळ, सामुदायिक धर्मान्तर व संहार.

(४) क्रौर्य.
(५) धर्मवेडेपणा.
(६) कृतघ्नता, वंचकता व असत्य.
(७) न्यायाचें ढोंग.
(८) विलास, ऐषआराम व लंपटपणा.

भारतांतील संपूर्ण यावनी आक्रमणाचा सुसंगत इतिहास देणें हा या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय नाहीं. त्यामुळें तो सुसंगत इतिहास येथें देण्याचें कारणहि नाहीं. संबंध राष्ट्रच्या राष्ट्र शिवछत्रपतींच्या उदयापूर्वी केवढ्या भीषण विपत्तींत सांपडलें होतें व राष्ट्रजीवन नष्ट होण्याचा प्रसंग कसा ओढवला होता, याची यथावत् कल्पना येण्यासाठीं प्रख्यात अशा कांहीं घटना व परकीय आणि एतद्देशीय इतिहाकारांनीं काढलेले निष्कर्ष व महत्त्वाचे निर्णयच येथें देतों. म्हणजे त्यावरून या भीषण विपत्तीची यथावत् कल्पना येईल.

महम्मद घोरीनंतर दिल्लीच्या सिंहासनावर बसलेल्या कुतुबुद्दिन ऐबक या बादशहासंबंधीं स्मिथनें म्हटलें आहे :—

"He was a typical specimen of the ferocious central Asian warriors of the time, merciless and fanatical. His valour and profuse liberality to his comrades endeared him to the bloodthirsty historian of his age ... All the eaders in the Muslim couquest of Hindustan similarly rejoiced in committing wholesale massacres of Hindu idolaters, armed or unarmed. Their rapid success was largely due to their pitiless 'frightfulness ', which made resistance terribly dangerous, and could not always be evaded by humble submission." —(The Oxford History of India Vincent A. Smith P.223.)

ऐबकच्या नंतर गादीवर आलेला त्याचा जावई अल्तमश यानें उज्जयिनी येथील महाकालीच्या मंदिराचा विध्वंस करून त्याची मशीद बनविली होती. त्यानंतरचा सुलतान बल्बन हा तर क्रौर्याचा

मूर्तिमंत पुतळा होता. त्यानें बारा सहस्र हिंदूंची कत्तल केली. गौड प्रांतांत त्यानें ज्या रक्तनद्या वाहविल्या व प्रेतांचे जे खच पाडले त्याला सीमा नाहीं. त्याच्याविषयीं स्मिथ लिहितो :—

He had no regard for human life, and no scruples about shedding blood. He was indeed a ruthless king. Fear and awe took possession of all men's hearts. He never laughed. He was stern and bloody. By Royal command many of the rebels were cast under the feet of elephants, and the fierce Turks cut the bodies of Hindus in two. About a hundred met their death at the hands of the flayers, being skinned from head to foot; their skins were all stuffed with straw and some of them were hung over every gate of the city. The plain of Hauz-Rani and the gates of Delhi remembered no punishment like this, nor had he ever heard such a tale of horror." —(The Oxford History of India. Vincent A. Smith p. 228)

अल्लाउद्दीन खिलजी हा तर मूर्खपणा व क्रूरता यांचा मूर्तिमंत पुतळाच असून स्त्रीसौंदर्याचा भयानक शिकारी म्हणून प्रसिद्ध आहे. पद्मिनीसाठीं चितोडवर झालेली त्याची स्वारी प्रसिद्धच आहे. त्यानें सोरटी सोमनाथचें मंदिर दुसऱ्यांदा लुटलें व गुजराथचा राजा कर्णराय याच्यावर स्वारी करून साऱ्या प्रांताची धुळधाण केली. त्याची लावण्यवती स्त्री कमलदेवी व तिची मुलगी देवलदेवी यांच्या दुर्दशेस तर पारावार उरला नाहीं. अल्लाउद्दीननें तिच्या नवऱ्याला ठार मारून तिला आपल्या जनानखान्यांत खेचलें पण तेवढ्यानें तिचें दुर्दैव संपलें नाहीं. अल्लाउद्दीनच्या पश्चात् दिल्लीच्या गादीवर बसलेल्या खुश्रूनेंहि तिच्या देहाची हवी तशी विटंबना केली. हिंदूंच्या संबंधांत अल्लाउद्दीन खिलजीनें जी नीति अवलंबिली होती तिचें वर्णन करतांना सर जदुनाथ सरकार यांनीं आपल्या हिस्टरी ऑफ औरंगजेब या ग्रंथांत म्हटलें आहे :—

Allauddin treated the Hindus very contemptuously, cruelly and revengefully. Once Allauddin asked the Qaji, " according to our religious books how should Hindus behave ? " The learned Qaji Mughis-ud-din declared to Allauddin khilji, in accordance with the teaching of the books on cannon Law:-" The Hindus are designated in the Law as 'payers of tribute' (kharaj-Guzar); and when the revenue officer demands silver from them, they should without question and with all humility and respect tender gold. If the officer throws dirt into their mouths they must without reluctance open their mouths wide to receive it. By these acts of degradation are shown the extreme obedience of the Zimmi. the glorification of the true faith of Islam, and the abasement of false faiths. God himself orders them to be humiliated, (as He says, 'till they pay Ziziya') with the hand and are humbled.... The prophet has commanded us to slay them, plunder them, and make them captive......No other religious authority except the great Imam (Hanifa) whose faith we follow, has sanctioned the imposition of the Jiziya on Hindus. According to all other theologians, the rule for Hindus is 'Either death or Islam. ' (Zia Barani 290 )

—( History of Aurangzib Vol. III—Sarkar P. 252 )

अल्लाउद्दिनाच्या राज्यांत पुढीलप्रमाणें आज्ञा होत्या " हिंदूंना बसावयास घोडा मिळू नये. हिंदूंनीं हत्यारें बाळगूं नयेत. त्यांनीं कधींहि उंची पोषाख करूं नये. आपल्या जमिनीचें अर्धे उत्पन्न त्यांनीं सरकारला दिलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर गाईम्हशींवर सुद्धां त्यांना कर द्यावा लागे. हिंदु अंमलदारांच्या बायकांनीं

मुसलमानांच्या घरीं नोकरी करावी. मुसलमान अंमलदार पाहिला कीं हिंदूंनीं त्याला लवून नमस्कार करावा. डॉ. आंबेडकर यांनीं आपल्या Thoughts on Pakistan मध्यें Lanepoole या लेखकाचे अल्लाउद्दीनसंबंधीं जे उद्‌गार नमूद केले आहेत त्यावरून त्याच्या हिंदु प्रजेचें आर्थिक जीवन त्यानें कसें उद्ध्वस्त केलें होतें याची कल्पना येते. तो म्हणतो :–

"The taxes were to be levied equally on the rich and the poor, at so much per acre, so much per animal. Any collectors or officers taking bribes were summarily dismissed and heavily punished with sticks, pincers, the rack, imprisonment, and chains. The new rules were strictly carried out, so that one revenue officer would string together 20 Hindu notables, and enforce payment by blows. No gold or silver, not even the betal-nut, so cheering and stimulative to pleasures, was to be seen in Hindu houses and the wives of the impoverished native officials were reduced to taking service in Muslim families. Revenue officers came to be regarded as more deadly than the plague; and to be a Government clerk was disgrace, worse than death; in so much that no Hindu would marry his daughter to such a man."— (Thoughts on Pakistan, p. 56.)

या सर्व आरंभींच्या मुस्लीम सत्ताधाऱ्यांत महम्मद तघलकाच्या क्रूर कर्मांचीं वर्णनें करतांना स्मिथनें असे उद्‌गार काढले आहेत कीं,

"Mahomed Taghlak was guilty of acts which the pen shrinks from recording."— (The Oxford History of India, by Vincent A. Smith P. 238.)

त्याच्या क्रूर कृत्यांचीं केवळ दोनच उदाहरणें येथें देतों. म्हणजे त्यांवरून त्याच्या पाशवी हृदयाची कल्पना येईल. महिकावतीच्या



२४३३५
८४४
परिग्र...
३०/७/५८

बखरींत त्यानें एका बंडखोराला केलेल्या शिक्षेचें जें वर्णन केलेलें आहे तें पुढीलप्रमाणें आहे :—

"निकाम अलिकाने दिल्लीस पातशहास कागद लिहिला कीं, सोम ठाकूर देसला मोठा लांचखाऊ कुफराणदार आसामी आहे. त्याला दस्त केल्यावाचून देशाची मशागत होत नाहीं. त्यावरून पातशहानें सोम देसला व पायरुत यांना दिल्लीस बोलावून घेतलें व तेथें त्यांचे प्राण हरण केले. पायरुताची खाल काढिली. सोम देसल्याचें पोट चिरून आंतड्याची वात वळून व चरबीचें तेल जाळून त्याचा दिवा लाविला." (महिकावतीची बखर, वि. का. राजवाडे प्रस्तावना, पृष्ठ ६०) या क्रूरकर्म्याचें याहूनहि अधिक क्रूर वर्णन इतिहासकारांनीं त्याच्या प्रत्यक्ष पुतण्याच्या संबंधांत घडल्याचें वर्णिलें आहे. त्याचा पुतण्या त्याच्याविरुद्ध बंड करून उठला असतां त्यानें दक्षिणेपर्यंत पाठलाग करून त्याची काय अवस्था केली याचें इब्नबतूता या लेखकाच्या आधारें A forgotten Empire या ग्रंथांत Robert Seewell यानें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे :—

The Sultan ordered the prisoner to be taken to the women, his relations, and these insulted him and spat upon him. Then he ordered him to be skinned alive, and his skin, torn off his flesh was cooked with rice. Some was sent to his children and his wife, and the remainder was put into a great dish and given to the elephants to eat, but they would not touch it. The Sultan ordered his skin to be stuffed with straw, to be placed along with the remains of Bahadur Bura, and to be exhibited through the country."—(A forgotten Empire. P. 18).

तघलक घराण्यांतील मुस्लीम बादशहांमध्ये फेरोजशहा तघलकाला सज्जन समजण्यांत येतें. त्याच्यासंबंधीं व्हिन्सेन्ट

स्मिथ यानें अकबराच्या चरित्रांत असें म्हटलें आहे कीं, " एका ब्राह्मणानें आपल्या घरीं मूर्तीची पूजा केली म्हणून फेरोझशहा तघलकनें त्यास सार्वजनिक ठिकाणीं जिवंतच जाळून टाकलें. मुसलमान ज्या प्रदेशांत राहतात त्यांत कांहीं हिंदूंचीं देवालयें बांधिलीं होतीं म्हणून त्यांना ठार मारल्याबद्दल तो प्रौढी मिरवीत असे. झिजिया कराची माफी देऊन त्यानें अनेक हिंदूंस मुसलमान करून घेतलें. या फेरोझशहा तघलकाची डायरी प्रसिद्ध आहे. आपल्या डायरींत तो म्हणतो, "I cut off the heads of the elders of this sect, and imprisoned and banished the rest, so that their abominable practices were put an end to."

"Under divine guidance I destroyed these edifices and I killed those leaders of infidelity who seduced others into error and the lower orders, I subjected to stripes and chastisement, until this abuse was entirely abolished."

" I ordered that the leaders of these people and the promoters of this abomination should be put to death. I forbade the infliction of any severe punishment on the Hindus in general, but I destroyed their idol temples and instead thereof raised mosques."

" I encouraged my infidel subjects to embrace the religion of Prophet, and I proclaimed that everyone who respected the creed and became a Musalman should be exempt from the Jiziya or Poll-tax. Information of this came to the ears of the people at large, and great numbers of Hindus presented themselves, and were admitted to the honour of Islam. Thus they came forward day by day from every quarter, and, adopting the faith, were exonerated from the Jiziya, and were favoured with presents and honours."—(Oxford History of India, Page 250.)

बाहेरून येणारे आक्रमक मुसलमान हिंदुस्थानांतील मूर्ति-पूजकांचा विध्वंस करण्यासाठींच आपण येत आहोंत असें वारंवार उद्घोषित करीत असत. तैमूरलंग यानें भारतांत शिरतांना केलेली घोषणा सर जदुनाथ सरकार यांनीं आपल्या औरंगजेबाच्या चरित्रांत स्वतःच्या अभिप्रायासह पुढीलप्रमाणें दिलेली आहे :–

"When Taimur, for instance, was tempted by the report of the vast wealth of India, to come and plunder it, he announced his aim to be 'to overthrow their temples and idols and become Ghazis Mujahids before God—since the inhabitants are chiefly polytheists and infidels, and idolaters and worshippers of the Sun, by the order of God and his prophet it is right for us to conquer them," (Elliot iii 396) This motive sanctified all his massacres and outrages in the eyes of his fellow-believers."—(History of Aurangjeb, Page 255–56.)

तैमूरलंगानें पांच दिवस दिल्लींत राहून दिल्लीचा संपूर्ण विध्वंस केला. त्याच्या संहारसत्रांत एक लाख लोकांची आहुति पडली. रस्त्यांत प्रेतांचा नुसता खच पडला होता. एका हातांत मशाल व दुसऱ्या हातांत खड्ग असें त्याचें वर्णन करतां येईल. मोगल घराण्याच्या आधींचा दिल्लीचा सुलतान शिकंदर लोदी हाही असाच क्रूरकर्मा होता. बुद्धिवाद व मुस्लिम धर्मप्रचारक यांचें कसें वाकडें आहे याचें एक मजेदार उदाहरण या शिकंदर लोदीच्या उदाहरणांत सांपडतें ईश्वरी प्रसाद, यासंबंधीं, आपल्या मध्ययुगीन इतिहासाच्या ग्रंथांत लिहितात :—

"There was a Brahmin living in a village near Lucknow. He used to propound that 'if a person follows, no mather what religion, sincerely, he is liked by God." The Kazis of Lucknow tried to rebut the statement, but the Brahmin defeated them in argument

by dint of erudition. Shikandar held a big Darbar and got the point argued by nine Moulavis, but in spite of that the Brahmin would not give up his way. Even though a threat was held out to him that 'Either be a Musalman or you will be beheaded', he would not give in. Ultimately Shikandar ordered him to be killed.'—(The History of Medieval India by Ishwari Prasad, Page 489.)

दिल्लीच्या गादीवर आलेल्या मोगल सुलतानांनींही यापेक्षां वेगळा इतिहास निर्माण केलेला नाहीं. या मोगल सम्राटांतील सर्वांत अधिक सज्जन म्हणून ज्याचें वर्णन करण्यांत येतें व मध्यंतरींच्या काळांत राष्ट्रपुरुष म्हणून भारतीय देशभक्त ज्याचा उत्सव महोत्सवही साजरे करूं लागले, त्या अकबराचें उदाहरण केवळ घेतलें तरी इस्लामी सत्तांच्या नीतिमत्तेची संपूर्ण कल्पना आल्याविना राहात नाहीं. बादशहा अकबरापाशीं मनुष्यवधाच्या विविध योजना असून स्त्रीलावण्याचा तर तो महान् शिकारी होता. रजपुतांचा विख्यात इतिहासकार कर्नल टॉड यानें आपल्या The Annals and Antiquities of Rajastan या ग्रंथाच्या पहिल्या भागांत लिहिलें आहे, "नवरोजच्या सणाच्या निमित्तानें अकबर हा मोठमोठ्या रजपूत कुळांच्या इभ्रतीला धुळीला मिळवीत असे, यांत अणुमात्रही संशय नाहीं. एकटा पराक्रमी पृथ्वीराजच काय तो आपल्या धर्मपत्नीच्या धैर्यामुळें व विक्रमामुळें या मान-भंगाच्या विपत्तींतून वांचला होता. त्याची धर्मपत्नी ही सुविख्यात मेवाडच्या राजघराण्यांतील होती. एका खुशरोजच्या प्रसंगीं बादशहा अकबर या राजकन्येचें लावण्य पाहून वेडा झाला आणि ती त्या यात्रेंतून संध्याकाळीं आपल्या निवासस्थानीं परत जाण्यास निघाली तेव्हां तिचा मार्ग बुद्धिपुरस्सर रोखण्यांत आल्याचें तिला कळून आलें. तिचा गोंधळ उडाला. एवढ्यांत बादशहा अकबर प्रेमयाचना करीत तिच्याशीं लगट करूं लागला.

त्यासरशीं ती सिंहिणीसारखी चवताळली. तिनें आपल्या म्याना-मधून खंजीर काढून तो अकबराच्या छातीशीं भिडविला. ओरडावें तर आपलें ढोंग बाहेर पडेल आणि न ओरडावें तर प्राणांशीं गांठ अशा परिस्थितीमुळें अकबर घाबरला व सोडून देण्याविषयीं तिचीच प्रार्थना करूं लागला. तिनें त्याच्याकडून स्त्रीजातीच्या व आपल्या घराण्याच्या वाटेस जाणार नाहीं अशी शपथ घेवविली तेव्हांच त्याची मुक्तता होऊं शकली.

अकबरानें जयपूरचा बिहारी मल्ल व जोधपूरचा मालदेव ह्यांच्या मुली व विकानेरच्या कल्याणमल्लाची पुतणी ह्यांच्याशीं जी लग्नें लावलीं तीं या राजघराण्यांना संकटाची तरवार दाखवूनच होय. त्याच्या मनुष्यवधाच्या युक्त्यांतील एक चमत्कारिक युक्ति पाहण्यासारखी आहे. व्हीलर लिहितो, He (Akbar) had another way of getting rid of his enemies which is revolting to civilization. He kept a poisoner in his pay, He carried a box with three compartments, one for betal. another for digestive pills, a third for poisoned pills. No one dared to refuse to eat what was offered him by the Padshah. The offer was esteemed as an honour. How many were poisoned by Akbar is unknown. The practice was in full force during the reigns of his suceessors." –(History of India by Wheeler Vol. IV Part I, pp. 174–75)

सज्जन म्हणवण्यांत येणाऱ्या अकबराची जेथें ही अवस्था तेथें जहांगीरसंबंधानें कांहीं बोलावयासच नको. हत्तीच्या पायीं लोक रगडले जात असतांना तें पाहणें हा त्याच्या करमणुकीचा विषय होता. आपल्या एका पुतण्याला त्यानें एकदां सिंहाच्या तोंडांत हात घालावयास सांगितलें. तें त्यानें नाकारतांच त्याला जन्मभर अंधारकोठडींत सडत पडावें लागलें. आपल्या आत्मचरित्रांत स्वत: चालविलेल्या हत्यासत्रासंबंधीं तो म्हणतो.

"During the reign of my father and subsequently of my own, there is scarcely a province in the empire in which either in battle or by the sword of the executioner five or six hundred thousand human beings have not at various periods fallen victims to this fatal disposition to discontent and turbulence."

—( Memoirs of the Emperor Jehangir by Major David P. 128.)

जहांगीरच्या बादशहानाम्यामध्यें त्याची मनोवृत्ति चांगलीच प्रकट झाली आहे. डॉ. आंबेडकर यांनीं आपल्या Thoughts on Pakistan मध्यें या बादशाहनाम्यांतील दिलेला एक उतारा या दृष्टीनें पाहण्यासारखा आहे तो असा--

" It had been brought to the notice of his Majesty, says the historian, that during the late reign (of Akbar) many idol-temples had been begun but remained unfinished at Banaras, the great stronghold of infidelity. The infidels were now desirous of completing them. His Majesty, the defender of the Faith, gave orders that at Banaras and throughout all his dominions in every place all temples that had been begun should be cast down. It was reported from the province of Allahabad that 76 temples had been destroyed in the district of Banaras."

—(Thoughts on Pakistan by Dr. Ambedkar. Page 54.)

मोगल बादशाहीच्या या धर्मवेडचा सूत्रधारांत सगळ्यांत भयानक पुरुष म्हणजे साधु या नांवानें ओळखण्यांत येणारा औरंगजेब बादशहा होय. क्रूरकर्मा औरंगजेबानें स्वत:च्या बंधूंच्या व पित्याच्या संबंधांत केलेल्या वर्तणुकीविषयीं आपल्याला कांहींही कर्तव्य नाहीं. पण हिंदूप्रजेसंबंधानें त्याच्या धोरणाचा जो परिपाक झाला तो मात्र विचारांत घेण्यासारखा आहे. राज्यकारभाराचीं

सूत्रें हातांत घेतल्यावर त्यानें हिंदु विद्यापीठें व मंदिरें नष्ट करून टाकण्यासाठीं ९ एप्रिल १६६९ रोजीं एक कायदाच अस्तित्वांत आणला. मथुरेच्या केशवराजाचे व काशीच्या विश्वनाथाचें मंदिर त्यानें नष्ट केलें हें प्रसिद्धच आहे. पण प्रांतोप्रांतींच्या अधिकाऱ्यांकडून त्यांच्या त्यांच्या प्रांतांतील मंदिरांच्या व विद्यापीठांच्या विध्वंसनाचें कार्य जोरांत व पद्धतशीरपणें चालू आहे कीं नाहीं याचा तो सूक्ष्म आढावा घेत असे. हें काम इतक्या व्यापक प्रमाणावर चालू होतें कीं, त्यासाठीं एक स्वतंत्र केन्द्रसरकारचें कार्यालय व खास अधिकारी यांची निर्मिति करण्यांत आली. मनुष्यसंहाराच्या व इस्लामेतरांवरील अत्याचारांच्या मुळाशीं इस्लामचा धर्मवृक्ष वेगानें फोफावावा अशी त्याची तीव्र मनीषा होती. पण ती त्याच्या या माणुसकीला काजळी फासणाऱ्या साधनांनींच विफल ठरली. त्याचे चरित्रकार जदुनाथ सरकार हे लिहितात :—

"The leaders of Hindu religion and society were systematically repressed, to deprive the sect of spiritual instruction, and their religious gatherings, and processions were forbidden in order to prevent the growth of solidarity and a sense of communal strength among them. No new temple was allowed to be built, nor any old one to he repaired, so that the total disappearance of all places of Hindu worship was to be merely a question of time." (Page 254)

"Outside their own realms, the destruction of temples and the slaughter of Hindus sanctified every war of agression. Thus a frame of mind was produced in the Muslim community which habitually regarded plunder and homicide as the purest of human acts as 'exertion in the path of God." (Page 255)

When a class of men is publicly depressed and harassed by law and executive caprice alike, it

merely contents itself with dragging on an animal existence. With very generous instinct of the soul crushed out of them, with intellectual culture merely adding a keen edge to their sense of humiliation, the Hindus could not be expected to produce the utmost of which they were capable; their lot was to be hewers of wood and drawers of water to their masters, to bring grist to the fiscal mill, to develop a low cunning and flattery as the only means of saving what they could of the fruits of their own labour. Amidst such social conditions, the human hand and the human mind cannot achieve their best; the human soul cannot soar to its highest pitch. The barrenness of the Hindu intellect and the meanness of spirit of the Hindu upper classes are the greatest condemnation of Muhamadan rules in India. The Islamic political tree, judged by its fruit, was an utter failure.' —(History of Aurangjeb by Jadunath Sarkar. P. 269.)

सर्व हिंदूंनाच नव्हे तर यच्चयावत् इस्लामेतरांना अपमानास्पद वाटणारा जिझिया कर औरंगजेबानें पुन्हां सुरू केला. त्याविरुद्ध त्याच्या साम्राज्यांत प्रचंड आंदोलन झालें. पण त्यानें तिकडे दुर्लक्ष केलें. एकदां तर त्याच्या प्रार्थनेचा रस्ता अडवून दिल्लीच्या नागरिकांनीं सत्याग्रह केला. पण त्या लोकांचें न्याय्य म्हणणें ऐकून घेण्याऐवजीं औरंगजेबानें लोकांच्या अंगावर हत्ती घालून त्यांना तुडवीत आपला मार्ग मोकळा केला. औरंगजेबाची स्त्रीविषयक नीति त्याच्या अधिकाऱ्यांच्या वर्तनावरून अजमावितां येण्यासारखी आहे. जदुनाथ सरकार हे 'हिस्टरी ऑफ औरंगजेब या आपल्या ग्रंथांत लिहितात :—

"For instance, we read how a local 'Faujdar' named Mursid Quli Khan Turkman (who died in 1638) took advantage of his campaigns against refractory tenants to

gratify his Lust. When the villagers were defeated, he seized all their most beautiful women and placed them in his harem. Another practice of this licentious officer is thus described in the Masir-ul-Umara (Page 422)

"On the birthday of Krishna, a vast gethering of Hindu men and women takes place at Govardhan on the Jamuna opposite Mathura. The Khan painting his forehead and wearing a dhoti like a Hindu, used to walk up and down in the crowd. Whenever he saw a woman whose beauty filled even the Moon with envy, he smashed her away like a wolf pouncing upon a flock, and placing her in the boat which his men had kept ready on the bank, he sped to Agra. The Hindu (for shame) never divulged what had happened to his daughter.

मनूची या परकीय प्रवाशानें मोगलांच्या दरबारांत पन्नास वर्षें वास्तव्य केलें असल्यामुळें त्याच्या अनुभवांना ऐतिहासिक महत्त्व आलें. त्याचे कांहीं अभिप्राय पहा :—

"सर्व जगाला हें माहीत आहे कीं, मुसलमान अतिशय विषय-लोलुप असतात. आणि म्हणूनच सर्वांचेंच विशेषत: सरदार व राजे यांचें थोडया बायकांवरून भागत नाहीं. यासाठीं आपली वासना तृप्त करण्यासाठीं ते इतर मार्ग शोधीत असतात. शहाजहानच्या स्वत:च्या जनानखान्यांतील स्त्रिया त्याच्या वासनेला पुऱ्या न पडून तो दरबारांतील सरदारांच्या बायकांशीं संधान बांधीत असे. आणि या वर्तनापायींच त्यास मृत्यु आला."

—(मनूची भाग १, पृ. १९२-९३)

"या मोगलांत दोन विशेष परंपरेनें आलेले आढळतात. एक म्हणजे भावानें भावाचा खून करणें, आणि दुसरा कीं, जो बहुतेक त्यांच्या सर्व मोठ्या लोकांत दिसतो, तो म्हणजे प्रसंग पडला म्हणजे कुराणाची शपथ घेऊन व गोड बोलून वचन देणें आणि प्रसंग निभावला म्हणजे दिलेलें वचन साफ नाकारणें.

—(मनूची खंड १, पृ. १०७)

"औरंगजेबाचें जीवन म्हणजे केवळ ढोंग; दिसायला सच्छील व धार्मिक प्रवृत्तीचें, पण खरोखर घातकी व पापी!" "त्याच्या सर्वच लबाडया व ढोंगें मी सांगू लागलों तर तीं केव्हांच संपणार नाहींत." —(मनूची खंड ३, पृ. २५३-२५६)

"ऐहिक व पारलौकिक या दोन्ही दृष्टींनीं पाहतां हा देश राहण्यास योग्य नाहीं. ऐहिक दृष्टीनें पाहिलें तर कोणावर विश्वास म्हणून टाकण्याची सोय नाहीं. बोलतात त्याच्या उलट खरें असेल असेंच मानून चालावें लागतें. मैत्रीचा त्यांनीं फारच बहाणा केला तर मग अतिशयच जपावें लागतें. याप्रमाणें जेथें न्यायबुद्धि नाहीं, वचनाची चाड नाहीं अशा देशांत आत्मोन्नति कोठली?" —(मनूची खंड २ रा, पृ. ३२४)

सर जदुनाथ सरकार आपल्या औरंगजेबावरील ग्रंथांत म्हणतात "जे लढाईंत मेले ते तुलनेनें भाग्यवान् म्हणावयाचे! .... ज्या स्त्रिया जिवंत राहिल्या व पकडल्या गेल्या त्यांच्या दुर्दैवाला पारावार नव्हता. त्या सामान्य नव्हत्या, राजांच्या आया व मुली होत्या! त्यांना भ्रष्ट करून जनानखान्यांत कोंबण्यांत आलें. तेथें एखादा दिवस धन्याची वासना तृप्त करण्याचें हृदयशून्य व प्रेमरहित साधन व्हायचें आणि बाकी सारा जन्म गृहिणीच्या वैभवाचा किंवा मातेच्या आनंदाचा अनुभव न घेतां कैदखान्यांतल्याप्रमाणें दुःखांत कंठावयाचा! (भा १, पृ. २७)

स्वारी करावयास जाणाऱ्या मोगल सैन्याचें इतिहासकारांनीं केलेलें वर्णन पहाः— "ज्या मार्गानें सैन्य जाईल त्या मार्गांत जे लोक आढळत त्यांची कत्तल होई किंवा त्यांना कैद केलें जाई. दुतर्फा रस्त्यांवरील घरें लुटलीं जात आणि मुलुख बेचिराख केला जाई. याप्रमाणें सर्व प्रदेशांत येतांना आणि जातांना लूट, नासधूस कत्तल सारखी चाले." (इलियट् आणि डायसन् यांचा इतिहास, भाग ७, पृष्ठ. ३०)

"भरभराटींत असलेलीं गांवें कायमचीं बुडालीं आणि लोकसंख्या कमी झाली." –(यदुनाथ सरकारकृत औरंगजेबाचा इतिहास.)

औरंगजेबाच्या धर्मवेडानें इस्लामेतर प्रजेची कशी दैना उडाली होती याचें विदारक चित्र सुरतेहून दि. २२ जानेवारी १६६७ सालीं इंग्रज व्यापाऱ्यांनीं ईस्ट इंडिया कंपनीला लिहिलेल्या पत्रव्यवहारांत पहावयास सांपडतें. एका पत्रांतील वर्णन पहा :– "या राजाच्या (औरंगजेब) मुसलमान धर्माच्या करड्या अंमलामुळें राज्यांत सर्वत्र अशांतता उत्पन्न झाली आहे. त्याच्या धर्माचे जे अनुयायी नाहींत अशा सर्व लोकांचा व त्यांतल्या त्यांत वाणी आणि हिंदू लोकांचा फार छळ होत आहे. त्यामुळें प्रजेंत एकमेकांशीं व्यवहार होणें बंद पडलें आहे. एखाद्या मुसलमानास एखाद्या वाणी सावकाराचें कर्ज देणें असेल तर त्याचें कर्ज बुडविण्यास्तव त्यानें कर्ज देण्याबद्दल तगादा केला असतां त्या मुसलमानानें मुहंमद पैगंबरास तो वाणी शिव्या देतो असें काजीस जाऊन सांगितलें व एक दोन खोटे साक्षीदार हजर केले (असे साक्षीदार गांवांत वाटेल तितके आहेत) म्हणजे त्या वाण्याची सुंता करून त्यास मुसलमान करण्यांत येत असे. याप्रमाणें शेंकडों लोकांची गत झालेली असून सर्वांच्या अंतःकरणांत धडकी भरली आहे. राजाकडून (औरंगजेबाकडून) मुसलमानांस मिळणाऱ्या प्रोत्साहनानें मुसलमान लोक इतके बेताल झाले आहेत कीं, मुसलमान फकीर दिवसा वाणी लोकांच्या दुकानांत घुसून बीभत्स चाळे करतात व ते जें कांहीं मागतात तें त्यांस दिल्याशिवाय ते दुकानांतून जात नाहींत. परधर्मीयांस बाटवून मुसलमान करणें, देवळें पाडून त्या ठिकाणीं मशिदी बांधणें याशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीकडे या राजाचें लक्ष नाहीं."

— (शिवाजीची राजनीति पृ. ३१७)

रावबहादूर सरदेसाई यांनीं केलेलें पुढील वर्णन पहा : "परचक्र आलें रे आलें कीं सामान्य जनसमुदायाची स्थिति फार वाईट होत असे. जे धीर व पराक्रमी असत ते लढून मृत्यूला कवटाळीत.

स्त्रिया शत्रुभयानें पटापटा अग्निकाष्ठें भक्षण करीत. मुलेंबाळें तरी सुरक्षित रहावी म्हणून आईबाप त्यांना कोठें तरी पोहोंचवून अपत्यविरहाचें दुःख गिळीत व पळून जात. जवळ असलेली मिळकत व इतर सोनें-नाणें वगैरे जिन्नस पुरून दृष्टी-आड करण्यांत येत, भांडींकुंडीं विहिरींत टाकलीं जात. हा नित्याचा क्रम असल्यामुळें बाह्यत: सदैव गरिबी व हायहाय दाखविण्याचा प्रचार पडला. कपडालत्ता, धान्य कांहीं असलें तरी त्याच्या उपभोगाची चोरी असे. पैसे मोजावयाचे झाले तर ते गुप्तपणें ! कांहीं खावयाचें झालें तर तें चोरून ! कारण, आपणा-जवळ कांहीं आहे असा संशय येणें हें बरें नव्हतें. अखंड अस्वास्थ्य, क्षणभंगुरता, अस्थिरता, चिंता व औदासीन्य यांमुळें विलास, आराम व उपभोग या कल्पना जळून खाक झाल्या होत्या. पिकांची वाताहत होई. शेतांत धान्य पिकलें तर घरीं येण्याची पंचाईत व धान्य घरीं आलें तर तें खपवावें कसें हा प्रश्न. त्यामुळें वीसवीस वर्षें धान्य घरांतील पेवांत कुजत पडत असे. दळणवळण अगदीं बंद होई. एक गांव सोडून दुसऱ्या गांवास जावयाचें म्हणजे मोठा प्रयास व संकट वाटे. व्यापाऱ्यांनाहि, जकाती, दस्तुऱ्या वगैरेंचा त्रास होई. चौक्या, पहारे असूनसुद्धां लुटालुटीची भीति व उपद्रव नेहमी असे. जीव कसा जगेल, अब्रू कशी राहील आणि बायका व मुलें कशीं सुरक्षित राहतील अशी विवंचना सारखी असल्यामुळें हिंदूंचे हाल या काळांत किती झाले असतील याची कल्पनाच करवत नाहीं." —(मराठी रियासत भाग १, पृ. ३६९).

हें जें उत्तरेंत दमनयंत्र चालू होतें तेंच दक्षिण भारत, गुजराथ, काश्मीर, बंगाल, खानदेश इत्यादि विभागांतहि असेंच चालू होतें. फार काय, पण जेथें मराठ्यांना नोकरीवर ठेवण्यांत येत असे त्या विजापूरच्या आदिलशाहीचीं जीं फर्मानें अथवा राजाज्ञा प्रसिद्ध आहेत त्यांतील केवळ एकच उतारा येथें देतों म्हणजे कल्पना येईल. ते असें :—

The Hindus should be appointed as Karkuns. Public demonstration of Holi, Diwali, Dasara and other festivals should be banned, but private observances of Hindu festivities should not be interfered with. If any Muslim happens to treat a Hindu with disrespect, the matter should be ignored. It should be the look-out of the Government that no Hindu, however powerful he may be, has an advantage over a Muslim. Jiziya should be levied on the Hindus and other idolaters and renegades. according to the injunctions of the Muhammadan law. Those wealthy who lead an easy-going life have to pay one tola 'four Kanj and four Khams Kanj' of silver every month. Those wealthy who stick to work have to pay half a tola and 'two Kanj and too Khams Kanj' of silver every month : the traders, employers and professional men have to pay a quarter of a tola, "one Kanj and one khams Kanj " Orphans, minors under fifteen years of age, slaves, blind and sick persons, paralytic, very old and faquirs should be exempted from the payment of the Jiziya. The payer should personally appear at the court and make the payment of the Jiziya while standing and the officer authorised to recieve the payment should accept it while seated on a chair."

--(India Historical Records Commission, proceedings of meetings Vol. XVII pp 124 )

विख्यात मुस्लिम इतिहासकार फेरिश्ता यानें गुलबर्ग्याच्या गादीवरील अकरावा सुलतान हुमायून बहामनी याला क्रूरकर्मा असें संबोधून त्याच्या कृत्यांचें जें वर्णन केलें आहे तें दक्षिणेंतील मुस्लिम सत्ताधीशांचें प्रातिनिधिक वर्णन समजावयास योग्य आहे. फेरिश्ता म्हणतो, "या क्रूरकर्म्यानें स्वतःच्या भावाला वाघाकडून फाडविलें, कडकडलेल्या तेलांत व आधणाच्या पाण्यांत जिवंत

माणसांना टाकून मारलें; आणि निरपराधी अबलांना त्यांच्या घरांतून ओढून आणून भर चौकांत मांगहृदयी गुंडांकडून त्यांची इतकी विटंबना करविली कीं, त्या विटंबनेचें वर्णन शब्दांनीं करतां येणार नाहीं. या हुमायून बहामनीनें स्वत: कित्येकदां मिरवणुकींतून वधूंना नेऊन भ्रष्ट करावें आणि नंतर त्यांना त्यांच्या वरांच्या घरीं पोहोचतें करावें."–(फेरिश्ता, खंड २ रा, पृ.४५४)

यावनी राजसत्तेकडून त्या वेळीं ज्या शिक्षा होत असत त्यांचें यथार्थ वर्णन कुणाला पहावयाचें असल्यास श्रीसमर्थ रामदासांच्या दासबोध ग्रंथांतील आधिभौतिक दु:खाचें वर्णन पहावें. कांहीं ओव्या येथें उद्धृत करतों.

" प्राणी राजदंड पावत । जेर बंद चाबूक वेत ।
दरे मार तळवेमार होत । या नांव आदिभूतिक ।।
मोघरी मार बुधले मार । चौखरून डंगारणे मार ।
बुक्क्या गचांड्या गुडघे मार । या नांव आदिभूतिक ।।
तीरमार सुळी देती । नेत्र वृषण काढिती ।
नखोनखीं सुया मारिती । या नांव आदिभूतिक ।।
कानी खुंट्या आदळिती । अपानी मेखा मारिती ।
खाल काढून टाकिती । या नांव आदिभूतिक ।।
सिसे पाजणें वीष देणें । अथवा शिरच्छेद करणें ।
कां पायातळी घालणें । या नांव आदिभूतिक ।।
सीरा ओढून घेती । टेंभे लावून भाजिती ।
ऐशा नाना विपत्ती । या नांव आदिभूतिक ।। "

केवळ यवन सत्ताधारीच नव्हेत तर भारतीय जीवनाचा ग्रास करणाऱ्यांत, काजी, मुल्ला, मौलवी व फकीर हेही अग्रेसर होते. काजींना दिलेल्या सनदांतून काजीनें करावयाच्या कामांपैकीं हिंदूंच्या देवालयांतील मूर्ति फोडणें हें एक काजीचें काम असे असें वाड पारसनीसकृत सनदापत्रांच्या संग्रहग्रंथावरून दिसतें. मुस्लिम धर्मसंप्रदायापैकीं सूफी पंथाला इस्लामच्या कडवेपणाविरुद्ध बंड

करणारा संप्रदाय म्हणून ओळखतात, व पुष्कळदां भागवत धर्म व सूफी पंथ यांच्यांत साम्य दाखविण्याचा वेडगळ प्रयत्नही रासायनिक संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांकडून होत असतो. पण भारतांतील सूफी पंथाचा इतिहास असें सांगतो कीं, कडव्या इस्लामच्या अनुयायांत व त्यांच्यांत कांहींहि फरक नव्हता. पृथ्वीराज चव्हाणाच्या काळीं ख्वाजा मोईनोद्दिन चिश्ती या नांवाचा एक सूफी संत हिंदुस्थानांत आला व त्यानें अजमेर विभागांत हिंदूंना मुसलमान करावयाचा सपाटा चालविला. पृथ्वीराज चव्हाणानें त्याला विरोध केल्यामुळें त्यानें शहाबुद्दिन घोरीला भडकावून पृथ्वीराज व घोरी यांचें युद्ध घडवून आणलें. पृथ्वीराजाच्या विनाशानंतर महम्मद घोरीनें या सूफी संताचें दर्शन घेतलें होतें. एका हिंदु सरदाराच्या मुलीला त्यानें बळजबरीनें मुसलमान करून तिच्याशीं निका लावला. मुस्लिम धर्माचा कडवा प्रचारक म्हणून अकबर, जहांगीर व शहाजहान यांच्यासारख्या बादशहांनींहि त्याच्या दर्ग्याला भेटी दिलेल्या आहेत. त्याचा पट्टशिष्य कुतुबुद्दीन बख्त्यार काकी हा सुलतान अल्तमशचा प्रमुख सल्लागार होता. त्याचा प्रशिष्य निझामोद्दिन अवलिया यानें तर आपल्या शिष्यां-करवीं मुस्लिम धर्मप्रसाराचें रानच उठविलें होतें. पन्नास–साठ वर्षें दिल्लीस राहून यानें शेकडो प्रचारक सर्वत्र पाठविले. त्यांतील एक शेख मुंतजबोद्दीन ऊर्फ जर्जरीवक्ष हा सन १३०० मध्यें ७०० धर्मप्रचारक बरोबर घेऊन दौलताबादेजवळ खुल्दाबाद येथें येऊन राहिला. तो १३०९ मध्यें मेल्यावर त्याचा वडील भाऊ बुऱ्हाणोद्दीन गरीबशहा नवीन ७०० प्रचारक घेऊन खुल्दाबादेस गेला व भावाचें अपुरें कार्य पुढें चालवूं लागला. अवघ्या दहा वर्षांत केवळ महाराष्ट्रांत १४०० शिष्य ज्या निजामोद्दीननें पाठविले त्याचा धर्मप्रसार इतर प्रांतांतून कसा चाललाअसेल याची कल्पना करावी. गुलाम, खिलजी व तुघलक या तीन घराण्यांतील आठ सुलतानांची कारकीर्द निजामोद्दीननें पाहिली. सुलतान बल्बननें तर आपली मुलगीच त्याला दिली होती. निजामोद्दीन व सुलतान

मुबारक खिलजी यांचा कांहीं निमित्तानें खटका उडाला; त्यानंतर थोड्या दिवसांतच मुबारक मारला गेला. त्याला मारणारा खुसरोखान निजामोद्दीनच्या विरुद्ध होताच; त्याचाहि १–१॥ महिन्याच्या आंत निकाल लागला. त्यानंतर गयासुद्दीन तघलख हा गादीवर आला. पण पुढें तोहि निजामोद्दीनचा विरोध करूं लागल्यावर आकस्मिक रीतीनें दिल्लीस मृत्यु पावला. या सर्व गोष्टींवरून सूफी साधूंचा तत्कालीन राज्यव्यवस्थेंत केवढा वरचष्मा होता हें दिसून येईल.

पृथ्वीराजाच्या कारकिर्दींत जसा मोईनोद्दिन चिस्ती अजमेरास जाऊन राहिला होता, तसेंच यादवांच्या कारकिर्दींत देवगिरीजवळच खुल्दाबाद येथें मोमिन आरिफ व जलालुद्दीन हे दोन साधु येऊन राहिले होते. ह्या दोघांना काय किंवा वर सांगितलेले जर्जरीबक्ष व गरीबशहा यांना काय, देवगिरी व खुल्दाबाद हींच गांवें राहण्यास योग्य कां वाटावींत ही विचार करण्यासारखी बाब आहे. शेकडों गरीबांची सोय हे साधू लोक करीत असत. त्यामुळें लोकांची कल्पना अशी होई कीं, परमेश्वर त्यांना अमूप द्रव्य देतो व त्याचा ते दानधर्मांत उपयोग करतात. या दानधर्मा-मुळेंच मुंतजबोद्दीनला 'जर्जरीबक्ष' असें टोपण नांव मिळालें होतें. या वेळीं देवगिरीचे दौलताबाद होऊन यादव घराणें दिल्लीचें मांडलिक बनलें होतें. ही गोष्ट लक्षांत घेतां जर्जरीबक्षाचें प्रस्थ लोकांत वाढावें म्हणून त्याला रोज धनाचा पुरवठा गुप्तपणें करण्याची जबाबदारी मांडलिक झालेल्या देवगिरीच्या राज्यावर पडली असावी हें न सांगतां कोणाच्याही लक्षांत येईल.

बऱ्हाणपूर, अहमदनगर, कंधार, औरंगाबाद, एरंडोल, गंगापूर, हैद्राबाद, मातूर, गुलबर्गा, बेदर, विजापूर, मंगरूळपीर, तालीकोट, शहापूर, एलिचपूर, खंगसमार, नाशिक, पैठण, वैजापूर, पुणें, अहमदावाद, कवठाळ अशा शेकडों ठिकाणीं या लोकांचें धर्म-प्रसाराचें काम चाललेलें असे. आणि त्यांत दुवा देण्यापासून दंडेली मारामारीपर्यंतचे सर्व प्रकार नित्य घडत. अनेक राजे व सुलतान

या फकीर लोकांविषयीं आदरभाव ठेवून असत. सिराजुद्दीन जुवेदी या गुलबर्ग्याच्या साधूनें बहामनी सुलतानाच्या तीन पिढ्या पाहिल्या. प्रत्येक राज्यारोहणप्रसंगीं हजर राहून राजाच्या कमरेला तो तरवार बांधीत असे. हसन गंगू बहामनीनें आपल्या राज्यारोहणसमयीं बुऱ्हाणोद्दीनच्या समाधीसाठीं पांच मण सोनें व दहा मण चांदी भेट पाठविली होती.

पंजाबचा राहणारा शाहाबाबू वऱ्हाडांत मातूर(माहूर?) येथें स्थायिक झाला. तो व त्याचे साथीदार यांनीं तेथील मंदिरें तोडून व हिंदु जमीनदारांस बाटवून तेथें आपला जम बसविला.

कवठाळ (खानदेश) च्या शाहवारीचा हाच प्रकार. सतत उभा राहून कुराणाचें पठण करणारा निजामुद्दीन यानें पैठणास जाऊन तेथील एका योगिनीच्या सुप्रसिद्ध काली मंदिरावर हल्ला चढवून ती योगिनी, तिचें तें मंदिर व ते भक्तगण या सगळ्यांचा निःपात केला आणि तेथें आपला मठ थाटला. दुसरे एक मौलाना साहेब जर्जरीबक्षाचे सहकारी यांनीं पैठणच्या रेणुकादेवीचें मंदिर पाडून तेथें आपली वसाहत केली; तेथेंच त्याचा दर्गा आहे.

अबदुल लतीफ दावर उल्मुल्क हा मूळचा गुजराथेंतला एक सरदार. गुरु शहाअलम ह्याच्या उपदेशानें तो परमेश्वराच्या भक्तीकडे वळला. पुढें सन १४८८ चे सुमारास सौराष्ट्रांत आमरण येथें तो मारला गेला. तेथेंच त्याची कबर आहे. यालाच दावलमलिक असें नांव रूढ झालें. त्याचे छल्ले महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं असून त्याचे उरूस प्रतिवर्षीं होत असतात.

शहाजहान, मलिकंबर यांचा गुरु सादिकअल्ली ऊर्फ सरमस्त यानें एका मठांतील गोसाव्यास काढून देऊन त्या मठाच्या जागेवर आपला मठ जमविला. तेथेंच त्याचा दर्गा आहे.

सूफी पंथासारख्या मवाळ समजण्यांत येणाऱ्या पंथांतील साधुपुरुषांची व धर्मगुरूंची जर इतकीं अन्यायी कृत्यें आहेत, तर कडव्या इस्लाम धर्मगुरूंचे काय असेल ? सतत सातशें वर्षे या हृदयशून्य , जीवनशोषक, आक्रमक व विध्वंसक वरवंटयाखालीं

ठेचलें जाणारें भारतीय राष्ट्रजीवन मृतवत् होऊन त्याचा सर्वतोमुख अधःपात झाला असला तर त्यांत आश्चर्य कसलें ? या आक्रमणाला भारतीय राष्ट्रजीवनांतील अंतर्गत शक्तींनीं कांहींच प्रतिकार केला नाहीं काय ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
90393
दा. क्र.

## प्रकरण तिसरें

# भारताचा सर्वांगीण अधःपात

मागच्या परिच्छेदांत वर्णन केलेल्या सर्वभक्षक इस्लामी आक्रमणाचा विचार केला तर शतकांनुशतकें अशा स्वरूपाच्या आक्रमणाखालीं पिचलेल्या समाजाचा आत्मप्रत्यय कसा नष्ट झाला असेल याची कल्पना येईल. या आक्रमणासमोर पांडित्याचा, सद्‌गुणांचा, आध्यात्मिक विकसनाचा, विशुद्ध चारित्र्याचा अथवा कोणत्याहि गोष्टींचा कांहींच उपयोग नव्हता. त्यामुळें कांहीं कडव्या लोकांनीं जीवननिष्ठा अभंग राखण्यासाठीं देव व धर्माच्या बलिवेदीवर हौतात्म्याचा स्वीकार केला असला तरी सर्वसामान्य जनतेंत हा कडवेपणा राखण्याचें धैर्य असण्याची शक्यता नसल्यामुळें कसें तरी जगावयाचें एवढा एकच भाव त्यांच्यांत उरला. कांहीं स्वार्थानें, कांहीं अगतिक म्हणून, कांहीं मृत्युभयानें तर कांहीं विशेष प्रलोभनानें राजसत्तेचे अंकित झाले व साऱ्या राष्ट्रांत निष्ठाशून्य जीवनाची एक मोठी लाटच उसळली. या लाटेचीं किती तरी प्रत्यंतरें इतिहासांत आढळून येतात. तीं पाहिलीं म्हणजे सर्वभक्षक पारतंत्र्यांत राष्ट्राचा केवढा अधःपात होऊं शकतो याची यथार्थ कल्पना येते. मानसिंहासारखे शूर व बाणेदार रजपूत आपापल्या मुली व बहिणी यवन सत्ताधीशांच्या भोगदासी बनविण्यांत भूषण मानूं लागले होते. त्यांच्यासारख्या

तोलदार रजपुताच्या दृष्टीनें 'जोधाबाईचा अकबराशीं विवाह झाला असला तरी ती अंत:पुरांत तुळशीवृंदावनाची पूजा करते' हा धर्मनिष्ठेच्या कौतुकाचा विषय झालेला होता. पारतंत्र्याच्या वृक्षाला नेहमींच येणारीं जी स्वार्थांधता, परधार्जिणेपणा व आत्माभिमानशून्यता हीं फळें त्यांचें भारत जणूं आगर बनलें होतें. दुराचारी, घातकी व क्रूर अशा या राजसत्तांच्या सैन्यांत हिंदूंचें क्षात्र स्वत:च्याच बांधवांचे गळे कापण्यांत भूषण मानीत होतें. रजपूत, मराठे, जाट इत्यादि हिंदू लढवय्यांची खड्गेंच मुस्लीम राज्याला नवेनवे प्रदेश प्राप्त करून देत होतीं. विध्वंसनाचें घोर तांडव करण्याऱ्या सुलतानांविषयीं त्वेष वाटण्याऐवजीं हिंदू लोकांना काय वाटत असे याचें इलियट् अँड डाऊसन यांच्या इतिहासांतील पुढील वर्णन पहा : 'सकाळच्या प्रहरीं बादशहा वाड्याच्या खिडकींत येऊन बसल्यावर त्याचें दर्शन घेतल्यावांचून अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा कित्येक हिंदूंचा नियम असून त्यांना "दर्शनी" असें म्हणत. याला राजनिष्ठा म्हणावें कीं बावळटपणा ?' हिंदुरीतिरिवाज, प्रार्थनापद्धति व आचार विचार आश्रयाच्या अभावीं व आक्रमकांच्या शोषक नीतीनें हिंदू जीवनांतून नष्ट होऊन त्यांच्या जागीं इस्लामी आचार-विचार देव-देवता व रीतिरिवाज यांनीं हिंदू समाजजीवनांत स्थान मिळविलें. फकीर, पीर, दर्गे, कबरी, व पंज्याच्या स्वाऱ्या यांच्या भजनीं हिंदू बहुजनसमाज लागला. इतकेंच नव्हे तर त्यांतच धर्मनिष्ठा आहे असें मानूं लागला. फकिरांची भक्ति करणें, दर्ग्यांना नवस करून तेथील पीरांची उपासना करणें, मुसलमानांच्या सणांत फकीरा देणें, दर्ग्यांना नैवेद्य दाखवून तेथील प्रसाद भक्षण करणें, ताजे व पंजे यांच्या उरुसांत स्वत फकीर होऊन भीक मागणें आणि त्यांच्या मिरवणुकींत 'सवारी' अंगांत आली म्हणून नाचणें या गोष्टी हिंदूंच्या धर्माचाराचा एक महत्त्वाचा भाग म्हणून बहुजन समाजाच्या हृदयांत प्रतिष्ठेचें स्थान मिळवून बसल्या होत्या. केवळ जगावयाच्या इच्छेनें समाजाच्या मनांत

शिरलेल्या आत्माभिमान शून्यतेचीं हीं प्रतीकें आजसुद्धां आपलें तें प्राचीन स्थान कशीं पटकावून आहेत हें समाजाचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां ध्यानांत येतें. पतनाच्या या प्रवाहानें योद्धे, बहुजन समाज व पंडित या साऱ्यांनाच ग्रासलेलें होतें. परब्रह्मापासून तर सगुण साकार अवतारापर्यंत सर्वांवर उपनिषद् वाङमय असतांना विजेत्यांचा देव जो 'अल्ला' त्याच्यावर उपनिषद् कां नसावें म्हणून भारतीय पंडितांनीं 'अल्लोपनिषदा'ची रचना केली ! संस्कृत भाषा केवढीहि सुंदर व श्रेष्ठ असली तरी राज्यकर्त्यांच्या भाषेच्या संस्पर्शाविना तिची श्रेष्ठता व रमणीयता खरी खुलायची नाहीं अशा जाणिवेनें "त्वत्कीर्तिर्वेरटारसीद जलधिम् या थाटाचीं उर्दू क्रियापदें असलेली रचना बाहेर पडूं लागली. हिंदू राजांचे आश्रय झिडकारून देववाणीचें पांडित्य यवन बादशहांच्या आश्रयांत गौरव व धन्यता अनुभवूं लागलें. रसगंगाधरासारख्या साहित्य शास्त्रावरील मूर्धन्य ग्रंथाचा कर्ता व गंगालहरी, लक्ष्मीलहरी, या-सारख्या प्रसन्न मधुर काव्याचा निर्माता पंडितराज जगन्नाथ हा शहाजहान बादशहाच्या आश्रयानें होता, त्याला जयपूरच्या हिंदू राजानें आपल्या राजसभेचें भूषण होण्यासाठीं बोलाविलें असतां त्यानें त्याला जें उत्तर दिलें तें या दृष्टीनें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तें असे : 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा मनोरथान् पुरयितुं समर्थः। अन्यैर्नृपालैः परिदीयमानं शाकाय वास्याल्लवणाय वा स्यात् ।'

(माझे मनोरथ पूर्ण करण्याचें सामर्थ्य केवळ दिल्लीश्वर व जगदीश्वर या दोघांच्यांतच आहे. बाकी राजांनीं मला कांहीं देण्याचें मनांत आणलेंच तर तें फार तर माझ्या मीठ मिरचीला पुरण्या-इतपतच राहील.)

भारताच्या या सर्वांगीण पतनाला कारणीभूत होणारी इस्लामी सत्ता तत्कालीन हिंदू सम्राटांनीं व पराक्रमी राजांनीं दृढमूल कशी होऊं दिली हा महत्त्वाचा प्रश्न आहे. वस्तुतः हिंदूंचें शौर्य अतुलनीय होतें व शौर्याबरोबरच येथें आक्रमक म्हणून आलेले समाजचे समाज पचवून टाकण्याची भारतीय संस्कृतीची शक्तीहि नष्ट झालेली

नव्हती. देशचे देश पादाक्रान्त करून धुळीस मिळविणाऱ्या इस्लामी आक्रमणाच्या प्रवाहाला कित्येक शतकें थोपवून धरणाऱ्या रजपुतांचा पराक्रमी इतिहास, हिंदूंचें शौर्य कसें अतुलनीय होतें हें सिद्ध करावयास पुरेसा आहे. विख्यात इतिहासाचार्य चिंतामणराव वैद्य हे आपल्या भारताच्या मध्ययुगीन इतिहासावरील ग्रंथांत रजपुतांसंबंधीं लिहितात, 'अरबांच्या दिग्विजयसिंधूचा ओघ उत्तर आफ्रिका भिजवून जिब्राल्टरच्या सामुद्रधुनींतून स्पेनमध्यें घुसला व पिरॅनीज पर्वत ओलांडून फ्रान्समध्यें उतरला. पुढें तो फ्रेंच लोकांच्या शौर्यखडकावर आदळून भंग पावला ! त्याच अरबांच्या दिग्विजयसिंधूचा दुसरा ओघ पूर्वेच्या बाजूनें मेसापोटेमिया, इराण व बलुचिस्थान यांस उदरांत घेऊन व सिंधुनद पार होऊन सिंध प्रांत बुडवून पुढें चालला. तो गेहलोट रजपुतांनीं थोपवून धरून शतशः विदीर्ण केला.' अरबांना खंबायतपर्यंत पिटाळून लावणारा बाप्पा रावळ, खलिफा अल्मामुनचा मद भंग करणारा खुमाण, अल्तमशचा पराभव करणारा जैत्रसिंह, बलबनच्या सैन्याला गुजराथमधून हांकून लावणारा राणा समरसिंह, ज्यांच्या नांवाच्या उच्चारानें मुसलमान सत्ताधाऱ्यांना कांपरें भरावें ते महाराणा हम्मीर व क्षेत्रसिंह, महंमद खिलजीला दातीं-तृण धरून पळावयास लावणारा चंडप्रताप राणा कुंभ, रजपूतच काय पण समस्त हिंदूंनाच प्रातःस्मरणीय असणारा प्रताप अशीं किती तरी अतुलनीय शौर्याचीं प्रतीकें असलेलीं नांवें हिंदू शौर्याचें उदाहरण म्हणून उल्लेखितां येतील. चितोडच्या महाराणा राजसिंहानें तर जन्मभर आठवण राहील असा धडा औरंगजेबाला शिकविला होता. औरंगजेबाचा पराभव करून त्यानें नर्मदेच्या तटाकीं असलेल्या मोंगलांच्या प्रदेशांत एकच हाहाकार उडवून दिला. काजी व मौलवींना पकडून त्यानें त्यांच्या दाढया छाटून टाकल्या व अत्याचारांचा सूड म्हणून कुराणाच्या सहस्रावधि प्रति विहीरींत फेकून देऊन इस्लामच्या स्मारक चिन्हांचा विध्वंस केला. पराक्रमाप्रमाणेंच हिंदू संस्कृतीची पचनशक्तीही अत्यंत प्रखर

होती. ग्रीक, हूण, शक, बर्बर इत्यादि अनेक समाजांना या संस्कृतीनें पचवून पार आत्मसात् केलें व त्यांच्या त्यांच्या अधिकारांप्रमाणें त्यांना समाजजीवनांत स्थान देऊन वेगळें उरूं दिलें नाहीं. पण यावनी आक्रमणाच्या वेळीं हिंदू शौर्य व संस्कृतीची ही पचनशक्ति उपयोगी पडूं शकली नाहीं.

यावनी आक्रमण यशस्वी व्हावयास मुख्यत: तीन कारणें झालीं. तीं तीन कारणें म्हणजे (१) शत्रूच्या स्वरूपाची ओळख नसणें व त्याच्याशीं त्याच्याच पद्धतीनें वागावयाची मनाची सिद्धता नसणें, (२) मुसलमानांच्या सामुदायिक धर्मांतराच्या पद्धतीमुळें त्या आक्रमणकारी सत्तांचे पंचमस्तंभ भारताच्या प्रत्येक प्रदेशांतून निर्माण होणें व बळानें परधर्मांत गेलेल्या या बांधवांना परत स्वधर्मांत घेण्याची समाजानें सोय करण्याऐवजीं त्यांना सदाचें समाजांतून बहिष्कृत करणें व (३) बळानें इस्लामी आक्रमकांच्या जनानखान्यांत ओढून भ्रष्टविण्यांत आलेल्या आपल्याच माता भगिनींना परत आश्रय देण्याऐवजीं तेथेंच सडत पडूं देण्याच्या वृत्तीचा अवलंब. इस्लामियांची नृशंस सत्ता दृढ व्हावयास हिंदु शौर्य कमी पडलें हें कारण नसून या तीन गोष्टींनीं ती सत्ता येथें दृढमूल झाली. या त्रिविध कारणांसमोर अलौकिक शौर्य, असीम साहस व हौतात्म्यहि हतप्रभ ठरलें. यांपैकीं पहिल्या कारणाची मीमांसा मागच्या प्रकरणांत केलेलीच आहे. उर्वरित कारणेंच या दृष्टीनें खरीं महत्त्वाचीं आहेत.

सारें जग इस्लाममय करून टाकावयाचें हें इस्लामी आक्रमणाचें महत्त्वाचें उद्दिष्ट असे. त्यामुळें इस्लामी आक्रमण एखाद्या प्रदेशा-वर झालें कीं प्रथम सहस्रावधि लोकांना तरवारीचें पातें डोक्यावर लटकत ठेवून इस्लामची दीक्षा देण्यांत येई. जेथें हा प्रयोग करण्यांत आलेला नाहीं असें एकहि इस्लामी आक्रमण इतिहासांत आढळणार नाहीं. या पद्धतीनें ज्यांचें इस्लामीकरण करण्यांत आलें, त्यांचा त्या धर्मांतरासंबंधांत वस्तुत: कांहीं दोष नव्हता. त्यांपैकीं कोणीहि स्वेच्छेनें इस्लामचा अंगीकार केलेला नव्हता.



28335

कोणाच्या तोंडांत बळेंच गोमांस कोंबून, कोणाची बळेंच सुंता करून, तर कोणाचे अनन्वित हाल करून त्यास परधर्मांत ओढण्यांत आलेलें होतें. त्यांचीं हृदयें आपल्या धर्मांत परत येण्यासाठीं निश्चितपणें तडफडत होतीं. पण हिंदुसमाजानें त्यांच्या अगतिकतेचा विचार न करतां प्रवेशद्वारेंच बंद करून टाकलीं! एकदां कोणत्याहि परिस्थितींत इस्लाममध्यें गेल्यावर परत आपल्या मूळच्या समाजांत जावयाची वाट बंद होते, ती कधींच मोकळी होऊं शकत नाहीं हें दृष्टोत्पत्तीस येतांच अगतिकतेनें त्यांना इस्लाम धर्मांत राहणें भाग पडलें. अर्थातच त्यांनीं आपल्या नव्या बांधवांबरोबर राहून त्यांनाच सर्वतोपरि साहाय्य करण्याचें व्रत अंगीकारलें. कांहींनीं खऱ्या स्वधर्मांत येण्याचे सारे प्रयत्न विफल होत असलेले पाहून आपल्याला प्रवेश नाकारणाऱ्या हिंदूंचा त्वेषानें इतका भयंकर सूड घेतला कीं मूळच्या कडव्या मुसलमानांनाही संकोच वाटावा. मुळांत धर्म प्रसारासाठीं ज्यांना बाटविलें त्यांना त्यांचा समाज परत घेत नसल्यामुळें ते आपलेच साह्यकारी होतात हें पाहतांच केवळ धर्मप्रसारच नव्हे, तर राज्यवृद्धीचें महत्त्वाचें साधन म्हणून धर्मांतराचें हें सत्र मुसलमांनानीं अधिकच वेगानें चालविलें. त्याचा एक भयानक परिणाम असा झाला कीं, जेथें जेथें मुसलमानी सत्ताधीश व साधु पोहोंचले तेथें तेथें त्यांचे नवे साह्यकारी व हितचिंतक संघशः निर्माण झाले. त्यामुळें हिंदू खड्ग केवढेंही पराक्रमी असलें तरी आपापल्या प्रदेशांतूनच असणाऱ्या परसत्तेच्या या नव्या सामर्थ्यकेन्द्रासमोर त्याला हतप्रभ होणें क्रमप्राप्तच ठरलें. महंमद बिन कासीमनें सिंधवर केलेल्या पहिल्या स्वारीच्या वेळीं त्यानें जे लोक बाटविले त्यांचा त्याला पुढें साहाय्यक म्हणून उपयोग झाला. महंमद गझनीनें पंजाबमध्यें जें धर्मांतर बळानें घडवून आणलें त्यामुळें त्याच्या प्रत्येक स्वारीच्या वेळीं त्याला साहाय्यक मिळत गेले व हाच क्रम सतत चालू राहिला. मुसलमान राजांनीं सैनिक जातीचें जें धर्मांतर घडवून आणलें त्याचा तर त्यांना राज्यवृद्धीसाठीं अतिशय उपयोग झालेला

आहे. बाटलेल्या लोकांना सर्व तऱ्हेचे सन्मान मिळत असल्यामुळें त्यांपैकीं कांहींना पूर्वधर्मांत येण्याची इच्छाही उरली नाहीं. या बाटलेल्या लोकांनीं हिंदुधर्माच्या विध्वंसनाचें कार्य अतिशय जोमानें केलें आहे. ओरिसामधील हिंदूंचा कर्दनकाळ ठरलेला 'काला पहाड' हा मूळचा हिंदू ब्राह्मण होता. मुसलमानांनीं त्याला बळानें बाटविल्यावर स्वधर्मांत येण्यासाठीं त्यानें अनेक प्रयत्न केले. पण सर्वांना पावन करणाऱ्या पुरीच्या पतितपावनाच्या पुजाऱ्यांनीं सुद्धां त्याला परत स्वधर्मांत घेण्याचें नाकारलें. तेव्हां चिडून त्यानें हिंदुमंदिराचा व जीवनाचा इतका विध्वंस केला कीं, 'काला पहाड' हा भीतिवाचक शब्दच होऊन राहिला. अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापति मलिक कफूर हा मूळचा हिंदु. तो मुसलमान होतांच अल्लाउद्दीनचा उजवा हात होऊन दक्षिणेंतील हिंदूंचा तो प्रत्यक्ष काळ बनला. देवगिरीवर झालेल्या यवनांच्या दुसऱ्या आक्रमणाचें नेतृत्व अल्लाउद्दिनाच्या आज्ञेनें यानेंच स्वीकारलेलें होतें. रामदेवराव यादवाला यानेंच बंदी करून दिल्लीला पाठविलें. इ. स. १३०७ मध्यें वरंगळच्या प्रतापरुद्रदेवाचा पराभव करून त्यानें सारा प्रांत उद्ध्वस्त करून टाकला. द्वारसमुद्राचे होयसळ व पांड्य राजे यांना उद्ध्वस्त करून यानें रामेश्वरपर्यंत धडक मारली व विजयाचें स्मारक म्हणून रामेश्वरलाच मशीद उभारून आपल्या इस्लाम प्रेमाची प्रकट साक्ष दिली. जहांगीरच्या सर्व युद्धांत अग्रेसर असणारा त्याचा सेनापति महाबतखान हा रजपूत सरदार संग्राजित याचा मुलगा होता. फेरोझशहा तघ्लक्चा महामंत्री मखबुलखान हा तेलंगणांतील उच्च कुळांतला हिंदु होता. मुसलमान झाल्यावर हिंदूंना बाटविण्याचें कार्य यानें इतक्या जोमानें केलें कीं धर्मवेड्या फेरोजशहाचा तो कंठमणि झाला. 'मखबुलखान हाच खरा सुलतान असून मी केवळ नाममात्र आहे' असें फिरोजशहा म्हणत असे. इमादशाहीचा संस्थापक फत्तेउल्ला हा मूळचा तैलंग ब्राह्मण होता. अहमदाबादच्या इस्लामी सत्तेचा पाया घालणारा मुजफर-शहा

हा मूळचा हिंदूच होता. देवालयांचा विध्वंस करण्याच्या कामांत तो अग्रेसर असून सोरटी सोमनाथाचा विध्वंस यानें पूर्ण केला. निझामशाहीचा (बहामनी) संस्थापक हा मूळचा तिमाप्पा बहिरव या नांवाचा ब्राह्मणच होता. काश्मीरच्या ब्राह्मण प्रधानानें इस्लाम धर्माचा स्वीकार केल्यावर मुस्लिम राज्यकर्त्यांना हिंदु-विध्वंसनाच्या कार्यांत त्यानें अतोनात साह्य केलें. यांतील बंगालच्या जितमल्लासारखे न्यूनगंडाच्या भावनेनें स्वखुशीनें इस्लामचा स्वीकार करणारे अतिशय थोडे होते. बहुतेक बळानेंच इस्लाम धर्मांत ओढले गेले. स्वधर्माचीं दारें बंद झाल्यानें व इस्लामच्या परिसरांत यथेष्टाचरणाची मुभा आणि ऐश्वर्याची दारें मोकळीं झाल्यानें ते तेथेंच राहिले. सिपाही, सारवान, सलतानगर, शेखदास, राठोड, रफूगार, मोमिन, लोहाणा, महात, मलिक, मणियार, मकवाना, बोहरी, वागवान, पिंजारी, नाईकवारी, नवायत, नक्षबंद, धूळधोया, ठाकूर, घेरमेहदी, खोकार, कामलिया, कासबती इत्यादि जातींच्या जाती संघशः इस्लामी सत्ताधाऱ्यांनीं मुसलमान केल्या. हिंदुराजांनीं अनेक ठिकाणीं मुसलमानांचा पराभव करून त्यांना पिटाळून लावल्यावरही या आपल्या धर्म-बांधवांना स्वधर्मांत परत घेतलें गेलें नाहीं. त्यामुळें मुस्लिम सत्तांचे हे पंचमस्तंभ सदाचें शल्य म्हणूनच येथें राहिले व मुसलमान आक्रमकांना त्यांचा वेळोवेळीं उपयोग झाला.

स्त्रीविषयक नीतीनें तर हिंदू समाजाची सर्वांत अधिक हानि केली. मुसलमानांच्या स्त्रिया पळविण्याच्या रीतींत केवळ कामुक-पणा व लंपटपणा हीं दोनच कारणें नव्हतीं तर जितांच्या हृदयां-वर अपमानाचा चरचरीत डाग देणें व संख्याभिवृद्धि हीं महत्त्वाचीं कारणें त्यांत अनुस्यूत होतीं. यांतही संख्याभिवृद्धीचें अमोघ साधन हें कारण बलवत्तर होतें. केवळ उपभोग व प्रजननाचें साधन-यंत्र या पलीकडे कोणत्याहि दृष्टीनें त्यांनीं स्त्रियांच्याकडे पाहिलें नाहीं. त्यांच्या धर्मानें त्यांना विवाहित स्त्रिया म्हणून चार या

संख्येची मर्यादा घातलेली असली तरी शत्रुस्त्रियांना अथवा काफरांच्या स्त्रियांना रखेल्या म्हणून ठेवण्याची परवानगी दिलेली होती. या गुलाम स्त्रियांची संख्या किती असावी याला कोणतीहि मर्यादा नव्हती. सामान्यत: या स्त्रियांच्या इच्छेविरुद्ध त्यांचा उपभोग घेणें योग्य नाहीं असें त्यांचा धर्म म्हणत असला तरी जर असा उपभोग कोणी घेतला तर त्यांचा दयाळू परमेश्वर त्यांना शिक्षा करण्याऐवजीं क्षमा करतो असें त्यांच्या मार्गदर्शकांनीं त्यांना आश्वासन दिलेलें होतें. कुराणाच्या इंग्रजी अनुवादांतील कांहीं परिच्छेद या दृष्टीनें पाहण्यासारखे आहेत ते असे :—

Do not compel your slave girls to prostitution when they desire chastity · · · But he who does compel them verily God after they are compelled, is forgiving and compassionate.

मुस्लिम धर्मग्रंथांतून आढळणाऱ्या या व अशा स्वरूपाच्या आज्ञांमुळें चेतविल्या गेलेल्या इस्लामच्या अनुयायांनीं जगांत जीं अनन्वित कृत्यांची परंपरा उत्पन्न केली त्यामुळेंच शेवटीं इतिहासकारांना मानवतेचा शत्रु म्हणून इस्लामाला संबोधणें भाग पडलें आहे. महंमदाचा चरित्रकार मूर यानें असें म्हटलें आहे कीं, " The sword of Mahamad and the Kuran are the most stuborn enemies of civilization and liberty and truth which the world has yet Known (Life of Mahamad P. 521-22)

कुराणाचीं भाषांतरें चुकीचीं असून मूळ कुराण फार शुद्ध भावनांचें आहे व त्यांतील उपदेश फार उच्च भूमिकेचा आहे असें कांहीं म्हणतात. कांहीं लोक तर त्या संबंधांत मौलाना महंमदअल्ली यांचीही साक्ष काढतात. या संबंधांत निर्णायक मत देणें कठिण आहे. कारण कुराणाच्या अर्थासंबंधीं व त्यांतील आज्ञांच्या उद्दिष्टांसंबंधी ' नैको मुनिर्यस्य वच: प्रमाणम् ' अशी अवस्था आहे. कुराणाचा आधार घेऊन भारतांतील काजी, मुल्ला, मौलवी व इस्लामी राज्यशासन यांनीं आंखलेलें धोरण, काढलेल्या राजाज्ञा,

व दिलेले निर्णय कसे परमावधीचे नृशंस व अत्याचारी होते हें आपण मागच्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. हेच लोक वस्तुतः कुराण-प्रतिपादित धर्माचे परंपरागत प्रतिनिधि असल्या-मुळें ते त्याचा जो अर्थ लावीत होते तोच प्रमाण मानला पाहिजे. या दृष्टीनें मूरचें म्हणणें इतिहासावरून सिद्धच होणारें आहे. महंमदअल्लीचें म्हणणें ग्राह्य समजावयाचें असलें तर आपल्या धर्माचा आधार घेऊन ते जें जें बोलले तें तें प्रमाण समजणें आवश्यक आहे. व त्यांचें वचनप्रामाण्य मानलें तर त्यांचा धर्म फारच भयंकर ठरतो. त्यांचीं पुढील कांहीं मुक्ताफळें पहा. लखनौ व अजमेर येथें मुस्लिम मेळाव्यासमोर ते उद्गारले : ' However pure Mr. Gandhi's character may be, he must appear to me from the point of view of religion, inferior to a musalman even though he be without character. ' Yes, according to my religion and creed, I do hold that adulterous and fallen musalman be better than Gandhi "( Thoughts on pakistan p. 301-2)

गांधीजींच्या सारख्या पुण्य पुरुषापेक्षां व्यभिचारी मुसलमानाला श्रेष्ठ मानावयाची साम्प्रदायिकता शिकविणारा महंमदअल्लींचा धर्म मानवी मूल्यांचा शत्रुच ठरत नाहीं काय? कॉमरेड रॉय असें म्हणतात कीं, 'कुराणांतील मूळ उपदेश शांततेचा असतांना अनु-यायांनीं त्याला क्रौर्य, जाळपोळ, संहार यांनीं विकृत रूप दिलें. इस्लामच्या अनुयायांत रानटी व अर्धरानटी, तसेंच, तुर्क व मोगल हे समाविष्ट झाल्यामुळें इस्लामचा इतिहास काळवंडलेला आहे. ' तसें कां होईना. आपल्याला महंमद पैगंवरसाहेबांच्या चांगल्या प्रेरणेविपयीं व मूळ कुराणाच्या भलेपणाविषयीं वाद करावयाचा नसून भारतावर इस्लामच्या नांवाखालीं आलेल्या सर्वभक्षक विपत्तीचें स्वरूप पाहणें येवढेंच आपलें उद्दिष्ट आहे व त्या दृष्टीनें रॉय म्हणतात ती इस्लामची केवळ काळी छायाच भारतावर पडली हें निर्विवाद आहे. एक धार्मिक कर्तव्य व संख्यावृद्धीचें

अमोघ साधन म्हणून मुस्लिम सत्ताधीशांनीं व आक्रमकांनीं प्रत्येक संधीचा लाभ घेऊन सहस्रावधि लक्षावधि, हिंदू स्त्रिया आपल्या भोगदासी बनविल्या. वस्तुत: त्यांतल्या स्त्रियांचा कांहीं अपराध नव्हता. पण पुढें समाजानें त्यांना भ्रष्ट झाल्याच्या सबबीवर आपल्या समाजजीवनांत परत येण्याचीं सारीं दारें बंद करून टाकलीं.पुढें हिंदूंचे दिवस येऊन त्यांनीं मुसलमानांना पिटाळून लावलें पण त्यांच्या अपवित्र सहवासांत दारुण नरक यातना भोगीत असलेल्या आपल्या माताभगिनींना सोडविण्याचा विचार चुकून सुद्धां कोणाच्या मनांत आला नाहीं! हिंदू स्त्रियांच्या विशिष्ट संस्कारामुळें त्यांच्याशीं झालेला विवाह सुखपर्यवसायी होतो व त्यांचा समाज त्यांना परत घेत नसल्यामुळें त्या एकदां भ्रष्टविल्या कीं आपल्याच होतात हें मुस्लिम आक्रमकांना अनुभवास येतांच त्यांनीं स्त्रीजीवनाची राखरांगोळी केली. इस्लामी सत्ता येथें दृढमूल व्हावयास व हिंदूंची प्रतिकारशक्ति अंतीं निष्प्रभ ठरावयास मुख्यत: हीं कारणें झालीं.

अर्थात् या कडक जातिनिर्बंधांचेंहि एक महत्त्वाचें कारण होतें. व तें ध्यानांत न घेतां आपल्या तत्कालीन पूर्वजांना दोष देणें इष्ट नाहीं. इ. स. १९४५ च्या सह्याद्रि मासिकाच्या नोव्हेंबर महिन्याच्या अंकांत प्रा. आळतेकर यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ते लिहितात, 'हिंदुस्थानावर पूर्वीं ग्रीक, कार्थियन्, शक, कुशान व हूण लोकांनीं आक्रमण करून हिंदूंचा पराभव केला होता. पण थोड्याच अवधीमध्यें या सर्व विजेत्यांना हिंदु संस्कृतीनें जिंकलें व हिंदू बनविलें. आतां हें खरें कीं, मुसलमानी जेत्यांची धर्मनिष्ठा अत्यंत कडवी असल्यामुळें त्यांना हिंदू करणें शक्य नव्हतें. पण त्यांच्याकडून आमिष दाखवून अगर जबरदस्तीनें जे लोक बाटविण्यांत येत होते त्यांना हिंदू समाजानें परत घ्यावयास पाहिजे होतें. तसें करण्याची इष्टता देवलादि स्मृतिकारांना पटली होती. व त्यांच्या उपदेशाप्रमाणें इ. स. १००० पर्यंत बाटलेले लोक परत हिंदुधर्मांत घेतले जात होते. हें मुसलमानी इतिहासकारसुद्धां

कबूल करतात. पण आमच्या शुद्धाशुद्धतेच्या अवास्तव कल्पनांमुळें ही प्रथा पुढें थांबली व त्यामुळें आमचें फार नुकसान झालें.’

आचारांतील ही अवास्तव शुद्धाशुद्धतेची कल्पना म्हणजेच कडवेपणा होय. हा कडवेपणा तत्कालीन लोकांनीं कां पत्करला असेल? अशा तऱ्हेच्या भयानक संकटांत सामाजिक जीवन निर्मळ राखावयास शुद्धतेच्या बाबींतल्या कडवेपणाविना दुसरा मार्गच नसतो. एरवीं संस्कृतीचा मूळ शुद्ध प्रवाहच गढूळ होऊन तिची मूळ अस्मिताच लुप्त होण्याचा संभव असतो. ज्या वेळीं पराक्रमाचें संरक्षण मिळण्यासारखें नसतें, त्या वेळीं कडक निर्बंधांचें हें कवचच सांस्कृतिक अस्मितेचें अथवा समाजाच्या जीवनतत्त्वांचें संरक्षण करून त्यांना मूळ स्वरूपांत टिकवून धरूं शकतें हें ओळखूनच त्यांनीं या धोरणाचा स्वीकार केला असला पाहिजे. या धोरणाच्या अतिरेकाचे परिणाम राष्ट्राला त्यानंतर मात्र पुष्कळच भोगावे लागले याचें आजचें उदाहरण म्हणजे काश्मीरचा प्रश्न होय. काश्मीरचे महाराज हरिसिंगजी यांच्या आजोबांच्या वेळीं काश्मीरच्या सर्व मुसलमानांनीं स्वतःला हिंदू करून आपल्या मूळ जातींत समाविष्ट करून घेण्याविषयीं काश्मीर नरेशांना प्रार्थना केली होती. ते सारे मूळचे हिंदू क्षत्रिय असून बळानेंच बाटविण्यांत आलेले होते. काश्मीर नरेशांना ती त्यांची विनंति मान्य झाली व त्यांनीं एक मोठा समारंभ घडवून आणून त्यांच्या हिंदूकरणाच्या बाबतींत राजपुरोहिताची अनुज्ञा मागितली. पुरोहितानें त्याला विरोध केला व राजावर आपल्या तोंडी विरोधाचा कांहीं परिणाम होत नाहीं, असें पाहून पुरोहित व त्याचे सल्लागार अन्य ब्राह्मण यांनीं राजमहालासमोरच्या जलाशयांत प्रवेश करून ओरडून असें सांगितलें कीं, ‘तू या पतितांना जर हिंदुधर्मांत घेत असशील तर आम्ही येथें आत्महत्त्या करतों व या ब्रह्महत्त्येचें पातक तुला लागेल.’ सश्रद्ध राजानें त्या कुलगुरूच्या हत्त्येचें व ब्रह्महत्त्येचें पातक लागूं नये म्हणून स्वधर्मांत परत येऊं इच्छिणाऱ्या त्या मुसलमानांना प्रवेशद्वार बंद केलें. आजचा काश्मीरचा

प्रश्न तरी, त्या राजपुरोहितानें इतका त्रागा केला नसता तर शिल्लक राहिला असता काय? अथवा राजानें त्या वेळीं थोडेसें ब्रह्महत्त्येचें पातक पत्करलें असतें तर पुढें ज्या कितीतरी पटीनें अधिक प्रमाणांत ब्रह्महत्त्या, स्त्रीपावित्र्यहत्त्या, बालहत्त्या व गोहत्त्या घडल्या त्या टळल्या नसत्या काय?

हिंदू खड्ग केवढेंहि धारदार असलें तरी सर्वभक्षक इस्लामी सत्ता येथें दृढमूल व्हावयास व तिची राष्ट्राच्या जीवनरसाचा शोष करण्याची प्रक्रिया येथें सफल व्हावयास हीं कारणें व विशेषत: त्यांतील पंचमस्तंभांची निर्मिति हें प्रधान कारण झालें. यांशिवाय आणखीहि एक महत्त्वाचें कारण झालें. हिंदूंच्या या पराभवाचें मूळ पुष्कळ लोक बौद्ध व जैनांच्या आत्यंतिक अहिंसा-वादांत शोधण्याचा प्रयत्न करीत असतात पण हें खरें नाहीं. या संप्रदायांच्या आत्यंतिक अहिंसातत्त्वाचा प्रभाव त्यांच्या सर्व-सामान्य अनुयायांच्या मनावरच जर पडला नाहीं तर बहुजन समाजावर तो कोठून पडणार? सम्राट हर्षवर्धनासारख्या दिग्विजयी बौद्ध सम्राटाचे पराक्रमच हें मत कसें चुकीचें आहे हें सिद्ध करावयास पुरेसे आहेत. हिंदूंच्या या पराभवाचें खरें कारण एकात्म राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अभाव हें होतें. संस्कृति व धर्म यांच्यावर केवढीहि श्रद्धा असली, व प्रत्येकाच्या व्यक्तिगत जीवनांत धार्मिक पद्धतीनें वागण्याची केवढीहि आस्था दिसून येत असली, तरी आपण एका धर्माच्या, संस्कृतीच्या व जीवन-दृष्टीच्या सूत्रांत उपनिबद्ध असल्यामुळें एक आहोंत याची प्रखर जाणीव अंत:करणांत जागृत नव्हती. समान संकटाच्या जाणिवेनें तरी ती जागृत होण्याची आवश्यकता होती. पण तसें घडलें नाहीं. जें थोड्या ठिकाणीं घडलें त्यालाहि पुष्कळ काळ जावा लागला. त्यामुळें, एरवीं अनेक दुर्गुण असले तरी मुसलमान तेवढा एक या एकात्मतेच्या जाणिवेनें ते जसे रसरसलेले होते तसे हिंदू तेवढा एक या एकात्मतेच्या जाणिवेनें हिंदू कांहीं भारलेले नव्हते. समष्टिजीवनाची ही एकात्मता केव्हांच संपलेली

होती; व तिच्या जागीं व्यक्तिवाद व फुटीरपणा हीं नांदत होतीं. महाराणा प्रतापानें आपल्याबरोबर भोजन करण्याचें नाकारलें म्हणून राजा मानसिंगाला क्रोध आला; पण मोगल हे आपल्या राष्ट्रीय अस्मितेचें समग्र निखंदन करणारे शत्रु आहेत या भावनेनें तो प्रतापच्या ध्वजाखालीं लढावयास कधींच आला नाहीं. आपल्या राजसूय यज्ञांत पृथ्वीराज आला नाहीं म्हणून राजा जयचन्दानें त्याचा मानभंग करण्याच्या उद्देशानें शहाबुद्दीन घोरीला निमंत्रण दिलें; पण घोरी हा आपल्या दोघांचाहि शत्रू आहे ही जाणीव जयचंदाला कधींच होऊं शकली नाहीं. इ. स. १३१० मध्यें दक्षिणेंतील पांड्य देशाचा राजा मारवर्मन कुलशेखर हा मृत्यु पावला. त्यानंतर त्याच्या राज्यासाठीं वीरवर्मन व जटावर्मन-सुंदर या त्याच्या दोन पुत्रांत संघर्ष सुरू झाला. तेव्हां आपल्याला राज्य मिळावें म्हणून जटावर्मन सुंदरनें अल्लाउद्दीन खिलजीचें साह्य मागितलें. पण खिलजी हा आपल्या राष्ट्राचा शत्रू असल्यामुळें त्याच्या विरुद्ध आपण दोन बंधूंनीं एक होण्याची आवश्यकता आहे; मग त्यामुळें राज्याचा विभाग कोणाला कमी-अधिक प्रमाणांत मिळाला तरी चिंता नाहीं असा विचार कांहीं त्यांपैकीं एकाच्याहि मनांत चुकूनसुद्धां आला नाहीं. विख्यात इतिहास-संशोधक कै. दत्तोपंत आपटे यांनीं विक्रमशाली रजपुतांच्या अपयशाची जी मीमांसा केली आहे, ती या दृष्टीनें अत्यंत उद्बोधक आहे. कै. आपटे लिहितात, 'राजपूत योद्धे मानधन, शूर, नीतीची चाड बाळगणारे होते. तथापि विदेशी लोकांशीं कसें वागावें याची कल्पना त्यांना नव्हती. आपसांतील भांडणांत परक्यांची मदत घेतांना त्यांच्या यशानें शेजारच्या राजापेक्षां किती पटीने राजकीय संकट अधिक ओढवणार आहे हें रजपुतांना समजण्याजोगें नव्हतें. या त्यांच्या अज्ञानाचा परिणाम त्यांना भोंवला. त्या उलट मुसलमानहि लोभी, धाडसी, माहितगार, चलाख, साहसी, स्वार्थाविषयीं सावध, न्यायनीतीची चाड न

बाळगणारे व धर्मांध असे असल्यामुळें त्यांनीं हिंदू राजांचा पराभव करून त्यांचें सिंहासन बळकावलें. या क्रांतीचा परिणाम आधींच राजकारणविमुख असलेल्या हिंदुसमाजावर अधिक दैववादी बनण्यास कारणीभूत झाला.'

तत्कालीन हिंदू समाजाचा हा दुर्गुण त्याच्या सर्व श्रेष्ठतेचा व सद्‌गुणांचा विध्वंस करणारा ठरला. तत्कालीन पंडितांना चतुर्दशविद्या येत होत्या; पण संघजीवनाच्या विद्येंत ते अनभिज्ञ होते. संत, महंत तपस्वी लोकांचें व्यक्तिजीवन उंच पातळीवर नेणाऱ्या धर्मतत्त्वांचा ते प्रसार करीत होते; पण संघधर्माचा महामंत्र त्यांच्याच हृदयांत स्फुरलेला नव्हता तर ते दुसऱ्यांना तो सांगण्याची शक्यता कोठून असणार? कलावंतांना सगळ्या कला येत होत्या; पण संघजीवनाच्या कलेला ते पारखे झालेले होते. राष्ट्रीय अस्मितेच्या अधिष्ठानावर ज्या वेळीं भारतांत संघजीवन जगण्याची प्रवृत्ति प्रखर होती, त्या वेळीं हिंदुराष्ट्राचा उत्कर्षच होत गेला. पण मुस्लिम आक्रमणाच्या वेळीं या समष्टि-धर्माची, संघनिष्ठेची अथवा राष्ट्रीयत्वाची जाणीवच नव्हती. मुसलमान आक्रमक अनेक दुर्गुणांचे आगर असले तरी त्यांना या संघधर्माची परिपूर्ण जाणीव होती. आपापसांत त्यांनींहि एकमेकांचे गळे कापले. भावांचे डोळे काढणें, चुलत्याला अथवा बापाला फसवून कैदेंत घालणें अथवा ठार मारणें, नातलगांचे खून करणें इत्यादि अनेक गोष्टी त्यांच्यांत चालत. पण 'परैः सह विरोधे तु वयं पंचाधिकं शतम्' (आपापसांत भांडण भांडावयाचें असेल तेव्हां आपण पांच व कौरव शंभर आहेत; पण दुसऱ्या – परक्यांशीं संघर्ष उत्पन्न झाला तर मात्र ते व आपण मिळून एकशेपांच आहोंत) हें युधिष्ठिराचें समष्टिजीवनाचें तत्त्वज्ञान हिंदूंच्या ऐवजीं मुसलमानांतच अधिक प्रभावीपणानें उतरलें होतें. मुसलमान आपापसांत लढले असले तरी हिंदू व मुसलमानांच्या युद्धांत कोणी प्रबल मुसलमानी सरदार हिंदुपक्षाकडून मुसलमानांशीं लढला असल्याचें सहसा दाखवून देतां येणार

नाहीं. उलट आपल्या हिंदू स्वामीला ऐन वेळीं दगा देऊन ते आपल्या धर्मबांधवांच्या गळ्यांत पडले व हिंदुपक्षाचा त्यांनीं संहार केला असेंच आढळून येतें. महाप्रतापी राणा संग याच्या बाबराशीं झालेल्या शेवटच्या युद्धापूर्वी त्याचें छोटचा मोठ्या मुसलमान सरदारांशीं अनेकवार संघर्ष झाले होते व त्यांत त्यांचा पराभव करून त्यानंतर राण्यानें त्यांना अतिशय औदार्यानें वागविलें होतें. पण बाबराशीं झालेल्या युद्धांत यांपैकीं कोणीहि राण्याला साह्य न देतां सारेच्या सारे बाबरच्या पक्षाला जाऊन मिळाले. दक्षिणेंतील बहामनी राज्याचे तुकडे झाल्यावर जीं पांच मुसलमानी राज्यें अस्तित्वांत आलीं तीं शेवटपर्यंत एक-मेकांशीं झगडत होतीं. पुढें तर त्यांनीं एकमेकांना बुडविलेंही. पण सुप्रसिद्ध राक्षसतंगडीच्या लढाईंत हे पांचही मुसलमान सुलतान 'इस्लाम संकटांत आल्याच्या' जाणिवेनें संघटित झाले. इतकेंच नव्हे तर विरोधी हिंदुपक्षांत असणारे मुसलमान सरदारहि ऐन वेळीं आपल्या हिंदू स्वामीचा पक्ष सोडून मुसलमान बंधूंना जाऊन मिळाले. याच्या उलट हिंदूंची अवस्था होती. मोंगल साम्राज्यशाहीचे आधारस्तंभ कोण होते ? कोणी मोंगल साम्राज्य वाढविलें ? राजा मानसिंग, राजा भगवानदास, बीरबल, तोडर-मल, राणा जसवंतसिंग, मिर्झा राजा जयसिंग, सवाई जयसिंग हेच मोंगल साम्राज्यमंदिराचे खरे आधारस्तंभ होते. सिंधच्या दाहीर राजाच्या पदरीं पांचशें अरबांची एक तुकडी होती. महंमद बिन कासिमनें ज्या वेळीं दाहिरावर स्वारी केली त्या वेळीं या अरब सैनिकांनीं दाहीर राजाला असें खडखडीत उत्तर दिलें कीं, 'महंमद कासिमचें सैन्य हें इस्लामचें सैन्य आहे. आम्ही आमच्या धर्मबांधवांविरुद्ध कधींच लढणार नाहीं.' याच्या उलट त्याच वेळीं दुसरें दृश्य दिसून आलें. महंमद कासीमच्या सैन्या-समोर, सिंधवर स्वारी करतांना सिंधूनदाचें विशाल पात्र कसें तरून जावें हा बिकट प्रश्न होता. त्या वेळीं त्याच्या साहाय्यासाठीं कोण धावून आलें असेल ? त्या वेळीं सिंधूच्या पात्रांतील एका

बेटाचा अधिकारी मोक्वाबसय्या या नांवाचा हिंदू मनुष्य होता. दाहिराचें व त्याचें कांहीं कारणास्तव वांकडें होतें. केवळ व्यक्तिवादासाठीं त्यानें परस्पर दाहिराचा नाश व्हावा म्हणून नौका व वाटाडे पाठवून महंमद कासीमला सिंधूनद पार करावयाचा मार्ग दाखविला व स्वराष्ट्राचा शत्रू घरांत घेतला. एकाच वेळीं व एकाच घटनेच्या संबंधांत घडलेलीं हीं दोन उदाहरणें काय दर्शवितात? पुष्कळ वेळां तर परक्या शत्रूंनीं आधींच जेरीस आणलेल्या आपल्या धर्मबंधूंचा गळा कापण्याचें कामही या हिंदू राज्यसत्तांनीं केलें आहे. इ. स. १२९५ मध्यें रामदेवराय यादवाचा मुसलमानांनीं पराभव केल्यावर वरंगळच्या प्रतापरुद्रानें त्याच्यावर स्वारी करून अनंतपूर व बल्लारी हे त्याच्याच राज्याचे लचके तोडले व द्वारसमुद्राच्या बल्लाळानें यादवांचा वनवासी प्रांत गिळंकृत केला. यादवराजे या दोषापासून मुक्त होते असें नाहीं. इ. स. १२३५ मध्यें मुसलमानांनीं परमारचा पराभव केल्यानंतर जर्जर झालेल्या परमारांच्या परिस्थितीचा लाभ घेऊन विजय संपादन करावा या इच्छेनें विख्यात सिंधण यादवाचा मुलगा कृष्ण यादव यानें परमारांच्यावर हल्ला चढविला. असें दृश्य कांहीं या काळांत आढळलें नाहीं कीं, एका हिंदू राजसत्तेवर आक्रमण होतांच ती राष्ट्रीय विपत्ति समजून हिंदुमात्र प्रत्याक्रमणासाठीं गोळा झालेला आहे.

समष्टिजीवनाची अथवा संघधर्माची जाणीव हीच वस्तुत: राष्ट्रजीवनाची प्राणज्योति होय. पुढें मुसलमानांच्यांतून ही जाणीव लुप्त झाली व समर्थांच्या आणि शिवछत्रपतींच्या प्रभावानें ती मराठ्यांत उत्पन्न झाल्याबरोबर मराठे विजयी झाले. मराठेशाहीच्या उत्तरार्धांत ती जाणीव लोपतांना मराठ्यांना दिसत होती. यशवंतराव होळकर इ. स. १८०३ मध्यें प्रतिनिधींना लिहिलेल्या पत्रांत म्हणतात: 'आजपर्यंत हिंदूराज्य सर्वांनीं एकदिल राहून चालविलें. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतींत गृहकलह होऊन राज्यविपर्यास पडोन हिंदुधर्म नाहींसा होण्यास मूळ जाहलें. त्याचें

छेदन करण्यास सर्व एकदिल झाले पाहिजेत, तर हिंदूंची कायमी राहील. आम्ही इंग्रजासी लढण्याचा क्रम आरंभिला आहे. तो यावद्देह चालवावा असें मनांत आहे. परंतु एकानेंच असा प्रकार करून बाकीच्यांनीं तमाशा पाहून आपापली दौलत सांभाळून असावें यांतील परिणाम कसा, हें चित्तीं विचारून ज्यांत हिंदुधर्माची कायमी तें करावें.' पण मराठी धुरीणांना हा संघधर्म संभाळतां न आल्यानें या गुणांत त्यांच्याहून सहस्रपटीनें श्रेष्ठ असलेल्या इंग्लिशांनीं त्यांना पदच्युत करून भारताचें सिंहासन स्वाधीन करून घेतलें. समष्टिजीवनाच्या प्रखर जाणिवेचें राष्ट्राच्या संरक्षणाच्या व उत्कर्षाच्या दृष्टीनें केवढें महत्त्व आहे हें या उदाहरणांवरून उघड होतें. यावनी आक्रमणाच्या वरवंट्याखालीं ठेंचल्या जाणाऱ्या हिंदूंचे मानापमानाचे भाव अत्यंत प्रखर होते, पण ते व्यक्तिनिष्ठ होते, समष्टिनिष्ठ नव्हते.

धारदार हिंदू खड्गाच्या पराजयाची व इस्लामच्या भारत-विजयाची ही अशी ऐतिहासिक मीमांसा आहे. प्रदेशचे प्रदेश या कारणांनीं मुसलमानांनीं घशांत घातले व शतकानुशतकें संपूर्ण हिंदुजीवन तुडवून टाकलें. कोठें डोकें वर काढावयाची सोय नव्हती व निराशेचा अंधकार इतका पसरलेला होता कीं, कधीं काळीं पुनरुत्थानाच्या सूर्यकिरणाचें दर्शन होण्याची आशासुद्धां नव्हती. या अंधकार युगाचें समर्थ रामदासांनीं केलेलें वर्णन हृदयाला घरें पाडणारें पण वस्तुस्थितीची यथार्थ कल्पना देणारें आहे. समर्थ म्हणतात :—

"लोकें स्थानभ्रष्ट झाली। कितेक तेथेंच मेली।
उरली ते मराया आली। गांवावरी ॥
माणसा खावया धान्य नाही। आंथरूण पांघरूण तेही नाही।
घर कराया सामग्री नाही। काय करिती ॥
कितेक अनाचारी पडिली। कितेक याती भ्रष्ट जाली।
कितेक ते आक्रंदली। मुलेंबाळें ॥
कितेकीं विषें घेतली। कितेक जळीं बुडाली।
जाळिली ना पुरली। किती एक ॥

कांहींच पाहतां धड नाही । विचार सुचेना कांहीं ।
अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडिले लोक ।।
प्राणिमात्र जाले दु:खी । पाहतां कोण्ही नाही सुखी ।
कठिण काळें ओळखी । धरीनात कोण्ही ।।
लोक बहुत प्रस्तावले । किती येक जाजावले ।
किती येक ते कावले । उद्वेगरूपी ।। ”

“ विसां लोकांत लोकांत येकचि राहिले ।
तेणें उदंड उदंड दु:खचि साहिले ।।
हौस कैची रे कैची रे कैची रे गायाला ।
कोठे जावें रे जावें रे जावें मागायाला ।।
दास म्हणे रे भगवंता किती पाहसी सत्त्व ।
काय वांचोनी वांचोनी ने परतें जीवित्व ।।
किती धरावें धरावें धरावें ते सत्व ।
जाली शरीरें शरीरें शरीरें निस्सत्व ।। ”

आपल्या उत्तर भारतांतील प्रवासांत राष्ट्रजीवनाची ही अवस्था पाहून व 'या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं' हें प्रत्यक्ष अनुभवून आत्महत्येची समर्थांसारख्या दीर्घदर्शी, कणखर हृदयाच्या व द्रष्टया पुरुषालाही वारंवार स्फूर्ति झाली, तेथें सर्वसामान्यांची कथाच काय ? एकदां तर निराशेच्या भरांत समर्थ हिमालयांतील हिमकुंडांत प्रत्यक्ष प्राणत्याग करावयास निघालेही होते.

अशा भीषण परिस्थितींत व्यक्तिगत नव्हे,–प्रांतीयहि नव्हे–तर 'हिंदवी स्वराज्या'ची घोषणा करीत एक नुकताच तारुण्यांत पदार्पण केलेला राजपुरुष आपलें खड्ग तळपवूं लागल्याचें पाहून या सर्व विशुद्ध हृदयांना तो ईश्वरी अवतार वाटला असला तर त्यांत आश्चर्य कसलें ? त्या राजराजेश्वराला पाहून ' इन्द्राजिमिजम्भ-पर वाडव सुअम्भ पर कान्ह जिमि कंस पर तिमिम्लेच्छवंस पर सेर सिवराज है" असें भूषणाच्या प्रतिभेला वाटलें तर त्यांत आश्चर्य कसलें ? हा युगपरिवर्तनाचा अग्रदूत भोसल्यांचें राज्य स्थापूं इच्छीत नव्हता, मराठ्यांचेंहि नव्हे, तर 'हिंदवी स्वराज्य'

स्थापूं इच्छीत होता व या कामीं आपल्याला ईश्वरी प्रेरणा झाली असल्याची त्याची निश्चिति होती. भारतीय राष्ट्राच्या विशुद्ध अस्मितेच्या पायावर त्यानें हें स्वराज्य निर्माण केलें.

उत्तर भारतांतील मोठमोठ्या धर्मनिष्ठ राजांनाही हिंदू अस्मितेच्या विशुद्ध स्वरूपाचें जें ज्ञान नव्हतें त्याचा संपूर्ण आविष्कार या राजराजेश्वराच्या स्वराज्यांतून व जीवनांतून झालेला आढळून येतो. आपला राज्याभिषेक त्यानें विशुद्ध प्राचीन भारतीय पद्धतीनें केला. प्राचीन भारतीय राज्यघटनेचा पुनरुद्धार करण्यासाठीं त्यानें अष्टप्रधानांची अमात्यसंस्था पुनरुज्जीवित केली. अभिषेक होतांच आपल्या राजकीय व्यवहारांतील संस्कृत संज्ञाचें पुनरुज्जीवन करावें, दास्याचें चिन्ह असलेल्या यावनी संज्ञा संपूर्णपणें नष्ट कराव्या व स्वराष्ट्राचा व्यवहार विशुद्ध स्वरूपाच्या स्वभाषेंतूनच चालवावा या प्रखर आकांक्षेनें रघुनाथ पंडितांकरवीं राज्यव्यवहारकोशाची निर्मिति केली. राज्यव्यवहारकोशाच्या प्रस्तावनेंतील श्लोकांत रघुनाथपंडित म्हणतात—

" कृते म्लेच्छोच्छेदे भुवि निरवशेषं रविकुला- ।
वतंसेनात्यर्थं यवनवचनैर्लुप्तसरणिम् ।।
नृपव्याहारार्थं स तु विबुधभाषां वितनितुम् ।
नियुक्तोऽभूद् विद्वान् नृपवरशिवच्छत्रपतिना ।।
सोऽयं शिवच्छत्रपतेरनुज्ञां मूर्धाभिषिक्तस्य निधाय मूर्ध्नि ।
अमात्यवर्यो रघुनाथनामा करोति राजव्यवहारकोशम् ।।
विपश्चित्संमतस्यास्य किंस्यादज्ञविडम्बनैः ।
रोचते किं क्रमेलाय मधुरं कदलीफलम् ।। "

( सूर्यकुलावतंस श्रीशिवछत्रपतींनीं या पृथ्वीवरून यवनांचा उच्छेद केल्यानंतर यावनी भाषेंतील राजनैतिक व्यवहाराची भाषासरणी ही लुप्त झाली हें पाहून मला संस्कृत भाषेंत हा

राजव्यवहार कोश करण्यासाठीं त्यांनीं नियुक्त केलें. तो रघुनाथ नांवाचा त्यांचा अमात्य मूर्धाभिषिक्त श्रीशिवछत्रपतींची आज्ञा शिरसा वंद्य मानून राजव्यवहार कोश करीत आहे. विद्वानांना व विचक्षणांना हा प्रयत्न मान्य आहे. त्यामुळें अज्ञ लोकांच्या उपहासाकडे लक्ष देण्याचें कारणच नाहीं. नाहीं तरी कांटे खाणाऱ्या उंटाला मधुर केळीं कशीं आवडणार? ) या उघड उघड दिसणाऱ्या ठळक गोष्टींवरूनसुद्धां छत्रपतींनीं केवळ हिंदुराज्याचें पुनरुत्थान घडविलें आहे असें सिद्ध होतें. ही स्फूर्ति त्यांना कोठून मिळाली असेल ? अर्थातच ही स्फूर्ति मिळण्याचें एकच स्थान त्या वेळीं असलेलें दिसून येतें. व तें म्हणजे विशुद्ध हिंदू अस्मितेवर आधारलेलें विजयनगरचें साम्राज्य होय. शिवाजीच्या या स्फूर्तिस्थानाची मीमांसा करतांना विख्यात इतिहाससंशोधक श्री. त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनीं अत्यंत मार्मिक व उद्बोधक विवेचन केलेलें आहे. ते म्हणतात :——

"शिवाजीस त्याच्या बाराव्या वर्षीं शहाजीनें बंगलोरहून महाराष्ट्रांत रवाना केलें तेव्हां त्याबरोबर आपले विश्वासू अधिकारीही त्यानें मदतीस नेमून पाठविले. हे सर्व अधिकारी बंगलूरसभोंवतालच्या प्रदेशांत वाकबगार झालेले होते. म्हणजेच ते विजयनगरच्या जुन्या राज्यपद्धतीशीं सुपरिचित होते. त्या राज्याचा इतिहास त्यांना चांगलाच माहीत असला पाहिजे. शहाजीच्या बंगलूर येथील दरबाराचें जें वर्णन संस्कृत कवींनीं केलें आहे त्यावरून त्यानें विजयनगरसारख्या जुन्या हिंदूराजसभेचें उघड अनुकरण केलेलें दिसतें. असें अनुकरण करूं म्हटल्यास त्या काळीं महाराष्ट्रांत प्रतीक शिल्लक नव्हतें. सर्व मुसलमानी झालेल्या महाराष्ट्रांत त्या काळीं अस्सल आनुवंशिक हिंदू राज्यपद्धति कोठली दृष्टीस पडावयाची? शिवाजीनें निजामशाही, आदिलशाही व कदाचित् मोगलशाही दरबारांत मुसलमानी संस्कृतीचें स्वरूप अनुभविलें होतें. पण जिवंत अबाधित चालत आलेलें असें हिंदू संस्कृतीचें स्वरूप त्यास प्रथम बंगलूर व त्या सभोंवारच्या राज्यांतच पहावयास मिळालें असलें

पाहिजे. रामायण महाभारताचें शिक्षण मिळून शिवाजीच्या बालमनांत स्वभावतःच जणूं हिंदू संस्कृतीचें बीज रुजलें होतें. सभोंवारच्या मुसलमानी अंमलाची जाचणी त्याच्या रक्तांत गर्भापासून स्वानुभवानेंच भिनली होती. अशा पूर्वतयारीचा बाल-शिवाजी दोन वर्षें–दहावें व अकरावें–बंगलूरच्या नूतन वातावरणांत आला. तेथें त्याच्या तीव्र कल्पनाशक्तीस काय दिसलें? तर हिंदू व इस्लामी संस्कृतींतील मूलभूत भिन्नता, त्यांचा तत्त्वतःच असणारा विरोध, संस्कारक्षम बालमनावर, तीव्र कल्पनेच्या व तीव्रतर भावनेच्या शिवाजीच्या मनावर या विरोधाचा कायम ठसा उमटला. या विरोधानेंच त्याच्या आयुष्याचें ध्येय निश्चित झालें. आणि हें ध्येय बंगलूरच्या आसमंतांत, विजयनगरच्या पडछायेंत कायम ठरलें.

"जर वरील विचारप्रणालि आपण अमान्य केली तर आपणांस शिवाजीच्या आयुष्याची संगति लावतां येणार नाहीं. आणि ही गोष्ट कोण्याहि चरित्रलेखकास मोठीशी भूषणावह नाहीं. त्याचें तीव्र धर्मप्रेम, त्याची धार्मिक गूढात्मता दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें उकलितां येणार नाहीं. त्या गूढात्मतेनेंच शिवाजी जसा बनला तसा बनला होता. काळ आपल्यास जरूर व लायख तीं नररत्नें त्या त्या काळीं प्रसवितो हें खरें, पण त्याबरोबर हेंही खरें कीं, महापुरुष, निदान शिवाजीसारखे महापुरुष हे आपल्या अंतरात्म्यांतील निश्चित ध्येयाचे पुतळे बनलेले असतात. त्यांचे निश्चय हे त्यांच्या गूढात्मतेच्या किमयेनें त्यांचे स्वभावगुण बनून जातात; इतके कीं, त्यांचें पृथक्करण पुनः त्याच देहीं, महापुरुषांच्या त्याच अवतारांत शक्य होत नाहीं. शिवदिग्विजयांत वर्णन केलेली शिवाजीची विजापुरांतील बालपणची मनोवृत्ति किंवा मोठेपणचें आग्र्याच्या दिवाण-इ-आम दरबारांतील त्याचें वर्तन, यांची मीमांसा शिवाजीची उपरिनिर्दिष्ट मनोरचना कबूल केल्या-खेरीज करतां येणार नाहीं. बंगलूरच्या पूर्ण हिंदू वातावरणांतील हिंदू राजसभेचें, हिंदू संस्कृतीचें सोज्वल, सात्त्विक दृश्य व विजापूर

आग्र्याच्या वातावरणांतील मुसलमानी संस्कृतीचें भीषण राक्षसी दृश्य, कीं जेथें औरंगजेबानें राज्य मिळविण्यासाठीं भाऊ, पुतणे, बहिणी, बाप कोणासही ओळखलें नाहीं–यांतील नैतिक (म्हणजेच शिवाजीच्या दृष्टीनें धार्मिक) विरोधानेंच शिवाजीचें हृदय बनलें होतें; त्या विरोधानेंच त्याचें भवितव्य निश्चित ठरविलें, त्या विरोधाच्या न पुसल्या जाणाऱ्या आठवणीनेंच तो हिंदुजातीचा पुनरुत्थापक व हिंदुधर्माचा तारक म्हणून इतिहासांत प्रसिद्ध झाला.

"हिंदुधर्माचे आचार न चुकतां पाळण्यांत दिसून येणारी त्याची धार्मिकता, कथापुराणादि श्रवणांत दिसून येणारी त्याची उत्कटता, कोणत्याहि पंथाच्या गुरूपुढें नम्रपणें मान वाकविण्याची त्याची तत्परता, देवळें, ब्राह्मण, वेदशाळा यांच्या ठायीं दिसून येणारें त्याचें दातृत्व, अतिशय त्रास सोसून व प्रसंगीं जीव धोक्यांत घालूनहि तीर्थयात्रा करण्यांत दिसून येणारा त्याचा श्रद्धाळूपणा, आणि सर्वांहून जास्त ढळढळीतपणें अंगांत भवानी संचारण्याच्या गूढ रोमहर्षण समाधिप्रसंगांत दिसणारी त्याची मौलिक आत्मिकता, या सर्व गोष्टी शिवाजी कसा होता हें ठरविण्यास पुरेसा आधार आहेत. त्यावरून त्याच्या मनाचा आरसा स्पष्ट दिसू शकतो. जर कोणी या गोष्टींवर विश्वास ठेवून, त्यांचा अर्थ समजून, त्यांवरून शिवाजीचें मन आकलन करूं पहात नसेल, तर त्याला शिवाजी कसा होता हें समजणार नाहीं; त्याच्या आचरणाची संगति लावतां येणार नाहीं, त्याच्या आयुष्याचें मर्म ध्यानांत येणार नाहीं.

"शिवाजीच्या जाज्वल्य हिंदुधर्माच्या अभिमानाचें उगमस्थान पूर्ण हिंदुत्वाचें वारें खेळत असलेलें बंगलूरच असलें पाहिजे. कारण तेथेंच त्यास त्या धर्माचें विश्वरूप दर्शन घडणें शक्य होतें. महाराष्ट्रांत त्या काळीं अशी गोष्ट शक्य नव्हती. ही गोष्ट रामदासांच्या महाराष्ट्रवर्णनांत पूर्णपणें प्रतिबिंबित झालेली आहे. इतिहासशास्त्राच्या तत्त्वज्ञान्यास विरोधाचा उपयोग व्यक्तीच्या वाढीस किती उपकारक होतो हें सांगावयास नकोच. शिवाजी हा कदाचित् बंगलुराहून तिरुपतीच्या यात्रेस जाऊन येतांना वेलुरास

विजयनगरचें शेवटचें सिंहासन पाहून आला असेल. अशी गोष्ट घडली असेल तर त्याच्या मनावर या गोष्टीचा केवढा परिणाम झाला असेल याची कल्पना केली पाहिजे. शिवाजीनंतर एक शतकानें नानासाहेब पेशवा दक्षिणेकडे गेला, तेव्हां त्याचेहि डोळे तेथील हिंदू राजांच्या संस्कृतीनें दिपले. त्यापूर्वी नानासाहेब उत्तरेस गेला होता व त्यानें तिकडील मुसलमान व रजपूत सत्ताधीशांचें वैभव पाहिलें होतें. त्यांच्याशीं तुलतां त्यास दक्षिणच जास्त सुसंस्कृत वाटली. यावरून शिवकालीन दाक्षिणात्य हिंदू संस्कृतीच्या अतीव उच्चत्वाची कल्पना येऊं शकेल. ही संस्कृति विजयनगरच्या साम्राज्यानें मुसलमानांचा विटाळ न होऊं देतां टिकविली व वाढविली होती. शिवाजीनें ती पाहिली तेव्हां तिचाच अभिमान त्याच्या अंगांत संचारला त्यांत नवल तें काय? मानसशास्त्रदृष्ट्या विचार करतां शिवाजीचें ध्येय विजयनगरदर्शनानें ठरलें असें म्हणणें सयुक्तिक आहे.

"पण वरील विचारप्रणालीवर एक आक्षेप येण्यासारखा आहे. व तो आधिभौतिकवादी इतिहासकारांकडून. ते म्हणतील हें सर्व मनोविश्लेषण व्यक्तिगत कल्पनातरंगरूप आहे. तसें कदाचित् असूं शकेल. पण तसें तें होतेंच असें म्हणतां येणार नाहीं. त्यासाठीं प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींचा ऐतिहासिक पुरावा पाहिजे.

"तर्कशास्त्रास पटणारा असा पुरावा गोळा करावयाचा तर शिवाजीच्या काळाच्याही थोडें मागें गेलें पाहिजे. महाराष्ट्रांत जशी स्वातंत्र्याच्या ध्येयाची ज्योत, अंतर्मनांत कां होईना, तेवत राहिली तशी ती उत्तरेंतील हिंदुराज्यांत कां राहिली नाहीं या प्रश्नाच्या उत्तरांत वरील आधिभौतिकवाद्यांच्या प्रश्नाचें उत्तर सांठविलेलें आहे. या गोष्टीचें कारण एकच. महाराष्ट्राला जिवंत हिंदू विजयनगरचा शेजार होता; तसा रजपूत राजांना तो नव्हता. अनेक शतकें मार खाल्ल्यानें राजपूत राजांत न्यूनगंडाचा संचार झाला होता. बाहेरून कोठून मदत येईल, अशी आशा करावयास

आधारभूत असें हिंदुराज्य त्यांच्या शेजारास राहिलें नव्हतें. पुष्कळ दिवस मुसलमानांत राहिल्यामुळें हिंदुत्वाची त्यांची ओळख पुसट होत चालली होती. हें असेंच चालावयाचें, मुसलमानांपुढें आपण अगतिक, अशीच त्यांची मति झाली होती. त्यामुळें मोगल दरबारांतील मनसबदारीचें ध्येयच त्यांनीं मुकर केलें किंवा त्यांना अगतिकत्वानें करावें लागलें. पण मराठ्यांची स्थिति तशी नव्हती. असंतुष्ट मराठा तुंगभद्रा ओलांडून विजयनगरास जाऊं शके. यात्रेच्या निमित्तानें दक्षिणेस जाऊन मराठा विजयनगर पाहून येत असल्यामुळें हिंदुत्वाची त्याची ओळख पुसट झाली नाहीं, किंवा त्याच्या मनांतील स्वातंत्र्येच्छा मरूं शकली नाहीं."

—(विजयनगर स्मारक ग्रंथ. पृष्ठ ६८ ते ७१)

तात्पर्य, सारा उत्तर भारत शतकानुशतकें तुडवीत मुस्लिम आक्रमणाचा रावण दक्षिणेकडे वळला व त्यानें आपला अत्याचारी हात विद्युत्गतीनें रामेश्वरापर्यंत पोहोंचविला असतांना एका महान् तपस्व्याच्या प्रेरणेनें एक तेजस्वी खड्ग तुंगभद्रेच्या तटाकीं अंतराळांत तळपलें. व त्या खड्गानें तो अत्याचारी हात तेथेंच तोडून हिंदुराष्ट्राच्या विशुद्ध अस्मितेचें वैभवशाली स्वरूप विजयनगरच्या साम्राज्याच्या रूपानें प्रकट केलें, व तीनशें वर्षें राखलें, म्हणूनच भारतीय संस्कृति जिवंत राहिली व शिवछत्रपतींच्या कार्याचा पाया सिद्ध झाला. कोण तो महान् तपस्वी ? व तें विद्युद्गर्भ तेजस्वी खड्ग धारण करणारा हात तरी कोणाचा? शिवछत्रपति व समर्थ यांच्या पूर्वीं झालेल्या या अपूर्व ब्रह्म-क्षात्र संगमाचें काय स्वरूप होतें?

✦ ✦ ✦

## प्रकरण चौथें

# दक्षिण भारतांतील सांस्कृतिक पुनरुत्थान

विजयनगरच्या रूपानें दक्षिण भारतांत जी यशस्वी राज्यक्रांति झाली तिचें अधिष्ठान स्वधर्माचें व स्वराष्ट्राचें संरक्षण हेंच होतें व तेंच सूत्र आपण पुढें चालवीत आहोंत असा आत्मविश्वास शिवकालीन धुरंधर राजनीतिविशारदांनाहि होता. विख्यात राजनीतिज्ञ रामचंद्रपंत अमात्य आपल्या राजनीतींत म्हणतात, "आपली ही संस्कृति म्हणजे केवळ ईश्वरदस्त; या संस्कृतीची अखंडता चिरंजीव व्हावी हें त्या जगन्नियंत्यास परम आवश्यक. तदनुसार या संस्कृतीच्या अभिमानाचा कीर्तिलाभ हरिहर-बुक्कण, माधव-सायण,. अशा बंधुद्वयांच्या विभागास आला; त्यांनीं विजिगीषु होऊन विजयनगर स्थापलें; जगद्विप्लवासारख्या त्या विस्खलित प्रसंगांत बरी सूक्ष्मबुद्धि चालवून, जे संस्कृतिनिष्ठ परंपरासेवक बुद्धिमंत कृतकर्मे होते त्यांचे ज्या त्या उपायें मनोधारण करून, त्यांची विचारबुद्धि हळूहळू वाढवून, ते सर्वहि आपलाले अधिकारानुरूप संस्कृतिरक्षणाविषयीं सानुरक्त उद्योगतत्पर केले. त्यांच्या पराक्रमानें बळी झाल्यावर अखिल भरतभूमि जिंकून जगदीश्वर बनलेल्या, सर्व लोकांस त्राहि भगवन् करून सोडलेल्या, अशा दिल्लीश्वर महमद तुघलख पातशहास दक्षिणेंतून घालवून लाविलें. आणि अशा रीतीनें भारतीय संस्कृतीची अखंड ज्योत तशीच पुढें तेवत राखण्याचें श्रेय संपादून आपलें नांव इतिहासांत अजरामर केलें." (अमात्यांची राजनीति)

दक्षिण भारतांतील स्वधर्म व स्वराष्ट्र यांच्या संरक्षणाच्या तत्त्वांवर अधिष्ठित असलेल्या महान् क्रांतीचें स्वरूप स्पष्ट होण्यासाठीं तिची पार्श्वभूमि लक्षांत घेणें आवश्यक आहे. इसवी सनाच्या अकराव्या व बाराव्या शतकांत दक्षिण भारतांत चालुक्यांचें साम्राज्य होतें. हें साम्राज्य अनेक बाह्य व अंतर्गत

२७३३५ २१५४ ३०१.२१५

कारणांनीं नष्ट झाल्यावर संपूर्ण दक्षिण भारत चार स्वतंत्र हिंदू सत्तांमध्यें विभागला गेला. यादव राजघराण्याचें राज्य नर्मदे-पासून दक्षिणेस कृष्णानदीपर्यंत पसरलेलें असून त्याची राजधानी देवगिरी ही होती. त्याच्या आग्नेय दिशेला काकतीय राजवंशाचें राज्य असून वरंगळ ही त्यांची राजधानी होती. कर्नाटक प्रांतावर होयसल राजघराण्याचें राज्य असून द्वारसमुद्र ही त्याची राजधानी होती. कावेरीपासून कन्याकुमारीपर्यंतच्या प्रदेशावर पांड्य वंशाचें राज्य असून मदुरा ही त्याची राजधानी होती. या चार प्रमुख सत्तांसमवेतच चोल, केरळ, पल्लव, कदंब, आनेगोंदी इत्यादि छोटीं राज्येंहि अनेक होतीं.

उत्तर भारताप्रमाणेंच या राज्यांच्या सूत्रधारांतहि एकात्म राष्ट्रावादाची अथवा संघजीवनाची कोणतीही कल्पना नव्हती. उत्तर भारतांतील प्रलयाची लाट ही हिंदुधर्माचाच ग्रास करणारी आहे व आपल्या संरक्षणासाठीं आपण एक झालें पाहिजे हें त्यांना त्या संकटाचे प्रत्यक्ष तडाखे बसल्याविना कसें समजावें ? दक्षिणें-तील यादव, काकतीय, होयसळ व पांड्य या चार प्रमुख राजांच्या सरहद्दी एकमेकांना लागून असल्यामुळें त्यांच्यांत कटकटी व युद्धें नेहमींच चालू असत. अशा स्थितींत इ. स. १२९३ च्या शेवटीं शेवटीं अल्लाउद्दीन खिलजीची दक्षिणेंत देवगिरीवर स्वारी झाली. त्याचा चुलता जलालुद्दीन खिलजी हा त्या वेळीं दिल्लीला सुलतान असून त्याच्या दरबारांत अल्लाउद्दीनविरुद्ध वातावरण उत्पन्न झालें होतें. त्याची झळ आपणाला पोहोंचूं नये म्हणून तो दक्षिणेकडे वळला. देवगिरीच्या यादवांच्या जवळ अपार संपत्ति आहे असें त्याला कळलें होतें. त्याच्या ह्या देवगिरीच्या स्वारींत रामदेव-राव यादवाचा पराभव होऊन अल्लाउद्दीनला अपार संपत्ति मिळाली. प्रथम केवळ लुटीसाठीं आलेल्या या सुलतानाला समृद्ध हिंदु राज्यांची या स्वारीनें नीट कल्पना आली व हीं समृद्ध राष्ट्रें आपापसांत भांडत असून सैनिकसामर्थ्याच्या दृष्टीनें दुबळीं आहेत हें ओळखून प्रत्यक्ष आपलें साम्राज्य जरी प्रस्थापित करतां

न आलें तरी त्यांना आपल्या धाकांत ठेवून वेळोवेळीं अपार द्रव्य उकळतां येईल हें त्यानें ओळखिलें. आपल्या चुलत्याला ठार मारून स्वत: दिल्लीचा सुलतान झाल्यावर त्यानें प्रथम वायव्ये-कडून वारंवार आक्रमण करणाऱ्या टोळ्यांचा बंदोबस्त केला व उत्तरेकडील साम्राज्याची घडी नीट बसवून दक्षिणेकडे दृष्टि वळविली. त्याला साम्राज्य विस्ताराऐवजीं द्रव्यतृष्णा होती. त्यामुळें दक्षिणेकडील राज्यें पूर्ण नष्ट करण्याऐवजीं तेथें बजवज-पुरी चालू ठेवणें हें त्याच्या अधिक हिताचें होतें. त्याला स्वारी-साठीं कांहींतरी निमित्त हवें होतें. तें निमित्तही मिळालें. देवगिरीच्या रामदेवराव यादवानें पहिल्या स्वारीच्या वेळीं अल्लाउद्दीनला खंडणी दिली असली तरी दुसऱ्याच वर्षी त्यानें ती देणें बंद केलें. त्याबरोबर अल्लाउद्दीननें आपला सेनापति मलिक काफूर याला इ. स. १३०७ मध्यें प्रबळ सैन्य देऊन देवगिरीवर पाठविलें. हा मलिक काफूर ' बाटगा ' मुसलमान होता. याचा उल्लेख मागें केलाच आहे. त्यानें रामदेवरावाला जिंकून व पकडून दिल्लीला पाठवून दिलें. तेथें अल्लाउद्दिनानें पूर्वीपेक्षां किती तरी पट अधिक खंडणी घेऊन रामदेवरावाला सोडलें. देवगिरीचा व्यवहार पूर्ण करून मलिक काफूरनें दक्षिणेंतील इतर राजांच्याकडे दृष्टि वळविली व पहिला घास वरंगळचा घेतला. तेथील काकतीय वंशाचा राजा प्रतापरुद्र याचा पराभव करून त्यानें त्याचा सगळा प्रदेश उद्ध्वस्त करून टाकला. प्रतापरुद्रदेवानें त्याला अपार धन देऊन कसाबसा आपला जीव व मोडकळीस आलेलें राज्य वांचविलें. त्यानंतर त्याची दृष्टि विष्णुवर्धन अथवा वीरबल्लाळ होयसळ याच्याकडे वळली व द्वारसमुद्रावर त्यानें आक्रमण केलें. हें आक्रमण १३१० सालीं झालें. वीरबल्लाळ होयसळ हा मोठा धोरणी पुरुष होता. त्यानें आपल्या प्रदेशाची विशेष नासधूस न होऊं देतां संपत्ति देऊन दिल्लीच्या सुलतानाचें मांडलिकत्व पत्करिलें. त्यानंतर दक्षिणेंत सगळ्यांत प्रबल असलेल्या पांड्य राजाच्या प्रदेशांत हस्तक्षेप करण्याची संधि त्याला

मिळाली. त्या वेळीं पांड्य देशाचा राजा मारवर्मन कुलशेखर हा मृत्यु पावला व त्याचीं दोन मुलें वीरवर्मन व जटावर्मन सुंदर यांच्यांत सिंहासनासाठीं संघर्ष उत्पन्न झाला.

जटावर्मन सुंदरनें अल्लाउद्दीन खिलजीची स्वतःला साह्य करण्यास्तव विनवणी केली. मलिक काफूरनें ससैन्य पांड्याच्या राज्यांत प्रवेश केला व वीरवर्मनचा पराभव करून जटावर्मन सुंदरला आपला एक मांडलिक म्हणून अथवा खरें म्हणजे केवळ बाहुलें म्हणून मदुरेच्या गादीवर बसविलें. एवढेंच करून मलिक काफूर स्वस्थ बसला नाहीं. त्यानें पुढें रामेश्वरपर्यंत धडक मारून आपल्या विजयाचें स्मारक म्हणून तेथें एक मशीद उभारली व प्रदेश बेचिराख करून अपरंपार लूट मिळवून तो परतला. या लुटींत त्याला ३१२ हत्ती, १२००० घोडे, ७६००० मण सोनें व मोत्यांच्या आणि रत्नांच्या अगणित राशी मिळाल्या. मलिक काफूर परतल्यानंतर एक दोन वर्षें दक्षिणेंत शांतता होती. देवगिरीचा रामदेवराव यादव याचा १३०९ मध्यें देहान्त होऊन त्याचा जावई हरपाळदेव हा देवगिरीचा राजा झाला. त्यानें तीन वर्षांच्या आंत आपल्या प्रदेशांतील मुसलमानांना हाकलून देऊन स्वातंत्र्याची घोषणा केली. इ. स. १३१६ मध्यें अल्ला-उद्दीनचा अंत होऊन मुबारक खिलजी गादीवर आला. त्या संधीचा लाभ घेण्याच्या दृष्टीनें दक्षिणेंतील साऱ्याच सत्तांनीं दिल्लीच्या सुलतानाचें आधिपत्य झुगारून दिलें. तें पाहून संतापानें मुबारक खिलजीनें इ. स. १३१८ मध्यें देवगिरीवर स्वारी केली. व हरपालदेवास पकडून जिवंतपणें कातडें सोलून ठार मारिलें. त्याचा सेनापति खुश्रूखान यानें इतर हिंदू राजांजवळून खंडणी घेतली. मुबारक खिलजीची पाठ वळतांच दक्षिणेंतील राजांनीं पुन्हां आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याचा प्रयत्न चालविला. देवगिरीचें राज्य मात्र मुबारक खिलजीनें संपूर्णपणें बुडविलें होतें. राजवंश नष्ट करून त्यानें देवगिरीला मुसलमान सुभेदाराची

नियुक्ति केली व सर्व नाकेबंदीच्या ठिकाणीं मुसलमान सरदार व लष्कर ठेवून मुसलमानी सत्ता दक्षिणेंत स्थिरपद केली. या घटनेनें मुसलमानी आक्रमणाचें स्वरूप दक्षिणेंतील राजांच्या ध्यानांत येऊं लागलें. इ. स. १३२० मध्यें खिलजी घराणें नष्ट होऊन त्या जागीं तघलक घराणें दिल्लीच्या गादीवर आलें. पहिला सुलतान घियासुद्दीन तघलक याच्या काळीं वरंगळच्या प्रतापरुद्रानें मुसलमानी सत्ता झुगारून देऊन स्वातंत्र्याची घोषणा केली. त्याबरोबर घियासुद्दीनचा मुलगा उलुघखान यानें इ. स. १३२३ मध्यें त्याच्यावर स्वारी करून साऱ्या राज्याचा विध्वंस केला व प्रतापरुद्रदेवाला दिल्लीला बंदी म्हणून पाठवून दिलें. प्रतापरुद्र-देवाचा तेथेंच अंत झाला. त्यानंतर लौकरच आपल्या बापाला ठार मारून उलूघखान दिल्लीच्या सिंहासनावर बसला. त्यानें महंमद तघलक हें नांव धारण केलें. हें पाहून त्याचा आतेभाऊ बहाउद्दीन यानें त्याच्याविरुद्ध बंड केलें. हा त्या वेळीं दक्षिणेंतील सागरचा सुभेदार होता. याचें व महंमद तघलकाचें नक्की काय नातें होतें या संबंधीं इतिहासकारांत मतभेद आहेत. कोणाच्या मतें तो आतेभाऊ होता, कोणाच्या मतें तो मामेभाऊ होता तर कोणाच्या मतें तो पुतण्या होता.त्याच्या बंडाचा बीमोड करण्यासाठीं महंमद तघलकानें दक्षिणेवर स्वारी केली. तघलकाच्या सैन्यानें देवगिरीजवळ बहा-उद्दीनाचा पराभव केला तेव्हां तो पळून कंपिलदेवाच्या आश्रयास गेला. त्यानें हिंदूंच्या पद्धतीप्रमाणें त्याला आश्रय दिला. महंमदानें संतापून त्याला स्वतःच्या स्वाधीन करावयास्तव कंपिलदेवाला धमकाविलें. त्यानें तें न ऐकल्यामुळें महंमदानें त्याच्यावर स्वारी केली. कंपिलदेवाचा मुलगा कुमार रामनाथ युद्धांत मारला गेला. महंमदाच्या भयानें कंपिलदेवानें कुटुंबियांसह आत्महत्त्या केली. त्याच्या उरलेल्या अकरा मुलांना महंमदानें मुसलमानी धर्माची दीक्षा दिली व कंपिली आणि आनेगोंदी येथील राज्यें खालसा करून तेथें आपल्या वतीनें मुसलमान सुभेदाराची नियुक्ति केली. पुन्हां कोणी डोकें वर काढूं नये म्हणून त्यानें आनेगोंदी येथें

आपल्या प्रबळ सैन्याचा तळ ठेविला. लवकरच त्यानें आपल्या पुतण्याला पकडलें व अंत:पुरांतील स्त्रियांकडून त्याची हवीतशी विटंबना करवून त्याला ठार मारिलें. फेरिश्ता असें म्हणतो कीं, 'त्यानें त्याचें मांस भातांत शिजविलें व तें त्याच्या बायकामुलांकडे खाण्यास्तव पाठविलें.' असें सांगतात कीं या खाद्याचीं ताटें हत्तींच्या समोर मांडलीं असतां ते त्याला स्पर्श करीनात. महंमद तघलकानें साम्राज्यविस्ताराचें धोरण आंखतांना राज्यांमागून राज्यें खालसा करण्याचें धोरण स्वीकारलें होतें. त्यानें वरंगळ, मदुरा, श्रीरंगपट्टण इत्यादि राज्यें संपूर्णपणें नष्ट करून द्वारसमुद्राचें राज्यें नष्टप्राय केलें. देवगिरी, वरंगळ, मदुरा व आनेगोंदी येथील राजवंश बुडवून मुसलमान सुभेदारांची नियुक्ति केली व विंध्यपर्वतापासून दक्षिण समुद्रापावेतों इस्लामी सत्ता प्रतिष्ठापिली. पुडुकोट्टाई व रामनद येथें महंमदाची सत्ता असल्याचे शिलालेख सांगतात. त्यावरून त्याच्या राज्याचा विस्तार मदुरेपलीकडे थेट दक्षिण-टोंकापर्यंत होता असें दिसतें.

इतक्या दूरवर राज्याचा विस्तार झाल्यावर सैन्याच्या हालचाली करणें व सुव्यवस्था राखणें दिल्लीस रहाणाऱ्या सुलतानाला त्या वेळीं तरी अवघडच होतें. मध्यवर्ती ठिकाणीं राजधानी असावी ही कल्पना महंमदाला या कारणानेंच स्फुरली व त्यानें दिल्लीहून देवगिरीला राजधानी नेण्याचा मोठा खटाटोप केला. याच वेळीं जलालुद्दीन हसनशहा यानें संपूर्ण तामीळप्रांत इस्लामी सत्तेखालीं आणल्यामुळें महंमदानें प्रसन्न होऊन त्याला मदुरेची सुभेदारी दिली. देवगिरीवरूनहि मदुरेचा कारभार सुव्यवस्थित चालविणें कठीण असल्यामुळें त्यानें देवगिरी ते मदुरा या मार्गावरील सर्व नाक्यांच्या ठिकाणीं इस्लामी लष्कर ठेविलें. त्रिचनापल्लीजवळच्या कन्ननूर नांवाच्या खेड्यांत मुसलमानी लष्कराचें ठाणें असल्याचा पुरावा उपलब्ध आहे.

यावनी आक्रमण याप्रमाणें आपला प्रभाव दाखवूं लागल्यावर आजवर स्वतंत्र असलेल्या हिंदू राजांच्या डोक्यांत त्या आक्रमणाच्या खऱ्या स्वरूपाचा प्रकाश पडला. दक्षिणेंतील अनेक शहरांचा

विध्वंस झाला. मदुरेच्या विश्वविख्यात मंदिराचाही विध्वंस करण्यांत आला. सुंदर देवळें पाडलीं गेलीं. पवित्र मूर्ति फोडण्यांत आल्या. ठिकठिकाणीं मशिदी दिसूं लागल्या, असंख्य निरुपद्रवी लोकांच्या कत्तली झाल्या. हिंदू स्त्रियांचीं अपहरणें होऊन त्यांच्या अब्रूची हवी तशी धूळधाण झाली व सर्व दृष्टींनीं अत्याचार, अनाचार यांचें सर्वत्र थैमान सुरू झालें. या सांस्कृतिक आक्रमणाची परिपूर्ण कल्पना व त्याच्या प्रतिकाराची इच्छा होयसळ घराण्याचा राजपुरुष वीरबल्लाळ ह्याच्या मनांत प्रथम आली. मुसलमानांच्या पहिल्या प्रबळ प्रवाहासमोर टिकाव धरण्याची शक्यता नाहीं हें ओळखून त्यानें नम्रता धारण केली व इतर सारीं राज्यें बुडत असतां आपलें राज्य वांचविलें. प्रत्यक्ष मुस्लिम सैन्याचा उपसर्ग पोहोंचणार नाहीं अशा तिरुवण्णामळई या ठिकाणीं त्यानें आपली राजधानी नेली व तात्पुरतें द्वारसमुद्र सोडिलें. लवकरच त्यानें आपली अंतर्गत बंडाची सिद्धता परिपूर्ण केली. त्याला पुनरुत्थानाची संधीहि मिळाली.

सुलतान महंमद तघलक याच्या विक्षिप्त व अघोरी कृत्यांनीं त्याच्या लोकांतच असंतोष पसरून उत्तर भारतांतील सिंध, कच्छ, गुजराथ, बंगाल इत्यादि प्रांतांतील सुभेदारांनीं सुलतानाविरुद्ध उठाव केला. प्रत्यक्ष उत्तरेंत ही बंडाळी चालू असतां दक्षिणेंतील प्रांतांत सुव्यवस्था राखण्याइतकें सैन्यबल तेथें ठेवणें सुलतानाला अशक्यच होतें. सुलतानाची ही स्थिति ध्यानांत येतांच त्याच्या दक्षिणेंतील सुभेदारांनींहि स्वतंत्र होण्याचा प्रयत्न चालविला. मदुरेच्या सुभेदारानें तर सुलतानाची सत्ता झुगारून देऊन आपण स्वतंत्र राजे असल्याचें घोषित केलें. गमाविलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याची इतकी उत्कृष्ट संधि जागृत हिंदू मनांना दुसरी कोणती मिळणार होती ?

मदुरेच्या सुभेदारानें बंड करतांच त्याच्या मागोमाग वीर-बल्लाळानें यवनांचें मांडलिकत्व झुगारून, स्वातंत्र्यघोषणा केली. महंमद तघलक दक्षिणेंत येऊं शकत नाहीं याची निश्चिति पटतांच

देवगिरीचा सुभेदार व मदुरेचा सुभेदार यांच्यांतील दळणवळणाचीं सर्व ठाणीं उद्ध्वस्त करून त्यानें त्या दोघांचा संबंध तोडून टाकला. नवी राजधानी तिरुवण्णामळईपासून रामेश्वरापर्यंत, ठिकठिकाणीं नाकेबंदी करून मदुरेच्या सुभेदारास कोंडींत धरावयाचा त्यानें प्रयत्न चालविला होता असें इब्न बतूता या आफ्रिकन प्रवाशानें लिहिलें आहे. त्यानंतर त्यानें मदुरेच्या इस्लामी सत्तेवर एकामागून एक जोरकस आघात प्रारंभ केले. बहुतेक सर्व प्रदेश जिंकून कन्ननूर (त्रिचनापल्ली) पर्यंत तो येऊन पोहोंचला. तेथें एक लक्ष पंचवीस सहस्र सैन्यासह त्याचा तळ होता. मदुरेजवळ मोठी हातघाईची लढाई झाली. दुर्दैवानें वीरबल्लाळाला यश यावयाचें नव्हतें. युद्धांत विजयाचें पारडें वीरबल्लाळाकडे झुकत आलें असतां एकाएकी शस्त्राघातानें त्याला धारातीर्थी मरण आलें व त्याची ही सगळी उभारणी एक प्रकारें वाया गेली. वीरबल्लाळाच्या या मृत्यूच्या थोडे दिवस आधींच विजयनगरची स्थापना त्याच्या सहकार्यानें झाली होती असें मद्रास विश्वविद्यालयांतील इतिहासाचे प्राध्यापक व विख्यात इतिहाससंशोधक डॉ. एस्. कृष्णस्वामी अय्यंगार यांचें म्हणणें आहे.

धर्म व संस्कृतीच्या संरक्षणासाठीं स्वतंत्र राजशक्ति निर्माण करण्याची आवश्यकता केवळ राज्य गेलेल्या व अपमानित झालेल्या राजेलोकांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली असें मानणें मात्र चुकीचें ठरेल. दक्षिणेंतील हिंदू राजांच्या एकंदर त्या विषम परिस्थितींतील हालचालींकडेहि पाहिलें तर त्यांच्यांत समानसंकटाच्या जाणीवे-मुळेंहि एकात्म राष्ट्रभावना अथवा संघधर्माची भावना निर्माण झाल्याचें आढळून येत नाहीं. यवन सेनापतींनीं जर्जर केलेल्या आपल्या हिंदुबंधूंच्यावर तुटून पडून स्वतःचा स्वार्थ साधण्याचींच कित्येक उदाहरणें आहेत

विजयनगरच्या राज्यस्थापनेच्या मुळाशीं मात्र व्यक्तिवादा-ऐवजीं ध्येयनिष्ठेची आधारशिला आहे. सर्वच्या सर्व हिंदू संप्रदायाचें

एकसूत्रीकरण करण्याचा प्रयत्न या सत्तेकडून झालेला आहे. द्वैती, अद्वैती, वीरशैव, वीरवैष्णव, जैन, लिंगायत इत्यादि अनेक भेदांनीं फुटलेल्या हिंदुसमाजाला पद्धतशीरपणें हिंदुत्वाच्या एका सूत्रांत समान भूमिकेवर राखण्याचा प्रयत्न विजयनगरच्या प्रारंभकाळांत तेथील राजांकडून झाला असल्याचें आढळून येतें. विजयनगरचा दुसरा सम्राट् बुक्क अथवा बुक्कण याच्या काळीं जैन आणि वैष्णव यांच्यांत महावाद्यें व कलश वापरावयाच्या अधिकारासंबंधीं तंटे उत्पन्न होऊन जैनांनीं बुक्करायाकडे वैष्णवांकडून झालेल्या अन्याया-संबंधांत आवेदनपत्र पाठविलें. इ. स. १३६८ च्या बुक्करायाच्या एका शिलालेखांत असें म्हटलें आहे कीं, 'राजानें जैनांचे हात वैष्णव आचार्यांच्या हातांत देऊन वैष्णव व जैन धर्मांत भिन्नत्व नाहीं असें प्रकट केलें आणि आज्ञा केली कीं या जैन दर्शनाला पूर्वींप्रमाणें पंचमहावाद्यें आणि कलश यांचा उपयोग करण्याचा हक्क आहे. वैष्णवांकडून जैन दर्शनाला अडथळा आला किंवा प्रगति झाली तरी तो अडथळा आपलाच व प्रगतीहि आपलीच असें वैष्णवांनीं समजावें. श्रीवैष्णवांनीं याबाबत सर्व राज्यांतील वस्तींत एक शासन घोषित करावें. यावच्चंद्रदिवाकरौ वैष्णव जैन दर्शनाचें संरक्षण करीत राहतील. वैष्णव आणि जैन हे एकच आहेत त्याबद्दल द्विधाभाव धरण्यांत येऊं नये. व्यक्तिवाद, संप्रदाय-वाद इत्यादि भेदांना एका राष्ट्रजीवनाच्या सूत्रांत ग्रथित करण्या-चाच हा प्रयत्न नाहीं काय ? विजयनगरचें राजसिंहासन हें वैदिक धर्म, चातुर्वर्ण्यात्मक प्राचीन भारतीय समाजरचना व भारतीयांचे जीवनविषयक कल्याणकारी सिद्धान्त यांच्या संरक्षणा-साठीं व संवर्धनासाठीं निर्माण झालें आहे हें तेथील राजांनींच ठिकठिकाणीं उल्लेखिलें आहे. विजयनगरच्या राजांच्या परंपरेंत मेरुमण्याप्रमाणेंच असलेला श्रेष्ठ सम्राट् कृष्णदेवराय हा शक्ती-प्रमाणेंच शारदेचीहि उपासना करणारा पुरुष होता. त्यानें आपल्या-जाम्बवतीकल्याणम् नांवाच्या नाट्यकृतींत जें भरतवाक्य घातलें आहे तें या दृष्टीनें ध्यानांत घेण्यासारखें आहे तें वाक्य पुढीलप्रमाणें.

धर्मं पादचतुष्टयेन कृतवत् स्थैर्यं समालम्बताम् ।
चातुर्वर्ण्यमुपैतु कर्म सततं स्वस्वाधिकारोचितम् ॥
शेषक्ष्माधरनायकस्य कृपया सप्तार्णवीमध्यगम् ।
रक्षन् गामिह कृष्णरायनृपतिः जीयात् सहस्रं समाः ॥

(सत्य, दया, तपश्चर्या व दान या चारहि पायांवर अधिष्ठित असलेल्या धर्माला कृतयुगाप्रमाणें स्थैर्य लाभो. चातुर्वर्ण्यात्मक समाजरजनेंतील समाजाच्या प्रत्येक घटकाला आपापल्या अधिकारानुरूप आपापलें कर्तव्य पार पाडण्याची सदैव स्फूर्ति असो. व परमेश्वराच्या कृपेनें या तत्त्वांवर अधिष्ठित असणारें राज्य करणारा महाराज कृष्णदेवराय याला पुष्कळ वर्षें आयुष्य लाभो.) चार वर्ण व अनेक संप्रदाय, अनेकविध जाति यांचें एकात्मतेच्या सूत्रांत एकसूत्रीकरण करून विजयनगरच्या सम्राटांनीं राष्ट्रधर्म अथवा संघधर्म किती कुशलतेनें पुनरुज्जीवित केला होता याचें वर्णन करतांना डॉ. सॅलॅटोर म्हणतात :—

Here, however, we may observe that the adjustment of the duties of, and the distribution of patronage to the four Varnasramas and the eighteen castes was indeed a problem which called forth the ingenuity of Vijayanagara rulers. For, in addition to the need of reconciling the differences between the various communities, without lowering in any way the prestige of the Hindu monarchs as promoters of the Dharma, there was the grave question of defending the country against an ever watchful enemy who was waiting for opportunity of crushing the Hindu Empire. The fact that the monarchs of Vijayanagara were able to achieve both these ends for a considerable length of time, in spite of the many short-comings in their political system, is enough to prove that, so far as the social side of their history is concerned, they must have conferred on the people those advantages of person, property and religion which assured them the heartiest

co-operation of the people in times of grave political crisis. The existence of the four great varnasramas and the eighteen sub-sects proved no barrier to them. On the other hand, their public avowal to promote sakala-varna-srama dharmas, may have been partly responsible for their success. Instead of championing the cause only of the four original varnas, they took upon themselves the duty of protecting all the varnas. This meant that especially in regard to the various sects and sub-sects, on condition that these latter confined themselves to their own swadharma or duties proper to their individual caste they could reasonably expect of their rulers the same patronage which was extended by the state to the four great Varnasramas. Only in this light can we understand the co-operation between the Vijayanagara Government and their people for the realization of the country against a relentless enemy. (Social and Political Life in Vijayanagar Empire by B. A. Saletore, Volume II P.26–27)

विजयनगरच्या साम्राज्याच्या जन्मकाळीं दक्षिण भारताचें वातावरण सम्प्रदाय भेद, मतभेद व पंचभेद यांनीं चांगलेंच बुजबुजाटलेलें असून या भिन्न भिन्न मतपंथसंप्रदायांचे वादविवाद व एकमेकांवर विजय मिळवून आपापल्या पंथाचे अनुयायी वाढविण्याचें कार्य जोमानें चाललेलें होतें. दक्षिणेंतील वेगवेगळे राजवंश या मतपंथभेदापासून अलिप्त नसून कोणत्या ना कोणत्या सम्प्रदायाचे ते अनुयायीच असत. दक्षिणेंतील बहुजनसमाज शृंगेरीच्या श्रीमच्छंकराचार्यांच्या पीठाचा अनुयायी असल्यामुळें अद्वैततत्त्वज्ञानावर आधारलेल्या शिवोपासनेचा प्रचार फार मोठा होता. द्वारसमुद्र, आनेगोंदी, विजयनगर, चोल, पांड्य, केरळ येथील राजसिंहासनें शृंगेरीच्या आचार्यपीठाच्या शिष्यवर्गांत मोडत होतीं. दक्षिणेंतील असेंच दुसरें प्रभावी धर्मपीठ श्रीमदानंदतीर्थ मध्वाचार्यांचें असून त्यांचें केन्द्र उडुपी येथें होतें. विजयनगरच्या

उदयकाळीं या द्वैतपीठावर श्रीमदक्षोभ्यतीर्थ या नांवाचे मध्वाचार्य असून त्यांनीं अद्वैतवाद्यांवर अनेकदां वादरणांत विजय संपादन केलेले होते. त्यामुळें द्वैत पीठहि त्या काळीं प्रभावी होतें. अक्षोभ्य-तीर्थांनीं स्वामी विद्यारण्यांचा **मूळबाग** येथें वादरणांत पराभव केल्याचा पुढीलप्रमाणें उल्लेख प्रसिद्ध आहे :—

असिना तत्त्वमसिना परजीवप्रभेदिना ।
विद्यारण्यं महारण्यमक्षोभ्यमुनिरच्छिनत् ॥

( परब्रह्म व जीव यांच्या भेदपर औपनिषदिक तत्त्वज्ञानाच्या खड्गानें अक्षोभ्यमुनीनीं विद्यारण्यरूपी महान् अरण्य तोडून टाकलें. ) याच्या उलट अद्वैतवाद्यांच्या मतानुसार विद्यारण्यांनींच अक्षोभ्यतीर्थ मध्वाचार्यांचा पराभव केला असें असून त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे :—

अक्षोभ्यं क्षोभयामास विद्यारण्यो महामतिः ।

( महाबुद्धिशाली विद्यारण्यांनीं कधींहि क्षुब्ध न होणाऱ्या अक्षोभ्यमुनींनाहि आपल्या प्रतिभेनें पराभूत करून क्षुब्ध केलें. ) यांतील सत्याचा निर्णय करणें कठिण असलें तरी द्वैतमताचा प्रभाव त्यांतून व्यक्त होतो यांत शंकाच नाहीं.

श्रीमद्रामानुजाचार्यांच्या विशिष्टाद्वैतमताचें अथवा श्रीवैष्णव सांप्रदायाचेंहि प्राबल्य त्या काळीं चांगलेंच असून त्यांचे पीठाचार्य लोकाचार्य वेदान्तदेशिक या नांवाचे होते. या मताचे संस्थापक श्रीमद्रामानुजाचार्य हे मूळचे चोल देशचे. पण तेथील राजा शैव असल्यामुळें त्याच्या त्रासानें त्यांनीं तो प्रदेश सोडून म्हैसूर प्रांतां-तील श्रीरंगपट्टण येथें आपलें मुख्य पीठ स्थापन केलें. त्या काळीं बिट्टिदेव अथवा विष्णुवर्धन या नांवाचा राजा तेथें राज्य करीत होता. तो मूळचा शैव पंथाचा होता. पण रामानुजाचार्यांच्या प्रभावानें तो श्रीवैष्णव पंथाचा अनुयायी झाला. व त्याच्या राज्याच्या आश्रयानें या पंथाची पुष्कळच भरभराट झाली.

जैन मताचाहि प्रभाव विजयनगरच्या उदयाच्या वेळीं चांगलाच होता. म्हैसूर प्रांतांतील श्रवण बेळगोळ येथें त्यांचें मुख्य पीठ असून इतर पंथीयांशीं त्यांचे वादविवाद व संघर्ष नेहमीं चालत. या पंथानेंही दक्षिणेंतील राजघराण्यांच्या अंतःपुरापर्यंत प्रवेश केलेला होता. द्वारसमुद्राच्या होयसळ राजघराण्यांतील एक राजा भीमराय याची राणी भीमदेवी ही प्रसिद्ध पंडित जैनाचार्य अभिनव चारुकीर्ति यांची शिष्या असून, तिनें बेळगोळ येथें जैनांचा एक तीर्थंकर शांतिनाथ याच्या मूर्तीची स्थापना केली असें एपिग्राफिया कर्नाटिका, खंड २ यांतील उल्लेखावरून ध्वनित होतें. विद्याचक्रवर्ती, विद्यानाथ, मल्लिनाथ, नेमिनाथ, मल्लिकार्जुन आदि प्रथम श्रेणीचे जैन पंडित त्या काळीं विद्यमान असून त्यांचें पांडित्य व पवित्र जीवन यांचा लोकमतावर विलक्षण प्रभाव होता.

याशिवाय बसवेश्वरानें काढलेल्या वीरशैव अथवा लिंगायत सम्प्रदायाचाहि प्रचार त्या वेळीं प्रभावशाली असून त्यांचें मुख्य पीठ म्हैसूरच्या परिसरांतील श्रीशैलम् येथें होतें.

स्वतः विजयनगरचे सम्राट् आपल्या व्यक्तिगत जीवनांत यांपैकीं वैदिक धर्मांतर्गत कोणत्या ना कोणत्या तरी सम्प्रदायाचे अनुयायी होतेच. विजयनगरच्या सिंहासनावर (१) संगम (२) साळुव (३) तुळुव आणि (४) आरवीडु या चार घराण्यांतील राजपुरुषांनीं राज्य केलें. पहिलें संगम घराणें शिवोपासक असून 'श्री विरूपाक्ष' ही त्यांची देवता होती. हे राजे शृंगेरीच्या आचार्यपीठाचे शिष्य असून ते आपल्या कागदपत्रांवर स्वतःच्या हातांनीं 'श्रीविरूपाक्ष' असें लिहीत. त्यानंतरचीं तिन्ही राजघराणीं विष्णु देवतेची उपासक होती. व या राजघराण्यांतील राजे आपल्या कागदपत्रांवर स्वतःच्या हातानें 'श्रीराम' असें लिहीत. पण वैयक्तिक उपासनेची ही आवड त्यांच्या राजकीय व सार्वजनिक संघजीवनाला कधींही बाधक ठरली नाहीं. ते व्यक्तिजीवनांत शैव किंवा वैष्णव होते. राजकीय व सार्वजनिक जीवनांत ते हिंदू राष्ट्राचे कर्णधार व सर्व मत-पंथ-संप्रदायांचा स्वतःत एक-

सूत्रात्मकतेनें समावेश करून घेणाऱ्या भारतीयांच्या एकात्म राष्ट्रजीवनाचे खरेखुरे प्रतिनिधि होते. विजयनगरच्या सिंहासनावर अधिष्ठित झालेला दुसरा राजपुरुष बुक्कराय अथवा बुक्कण यानें वैष्णव व जैनांचा तंटा मिटवितांना स्वीकारलेलें धोरण व काढलेलें राजपत्रक मागें उल्लेखिलेंच आहे. त्याच्या या भूमिकेची निदर्शक असणारीं आणखी किती तरी उदाहरणें आहेत. राज्यकारभारांतील महत्त्वाच्या स्थानीं विजयनगरच्या सम्राटांनीं केवळ राष्ट्रहिताच्या दृष्टीनें पंथनिर्विशेष दृष्टीचा स्वीकार केलेला होता. विजयनगरच्या सिंहासनावरील दुसऱ्या हरिहर राजाचा सेनापति इरुगप्पा हा कट्टर जैन होता. या राज्याच्या संस्थापकाचा सेनापति चैचप्पा हा तर 'नानार्थरत्नमाला' या जैन कोशाचा कर्ता असून त्यानें खास विजयनगरमध्यें 'कुंत-जिनालय' बांधलें होतें. या गादीवरील दुसऱ्या देवराय नांवाच्या राजाला तर 'ब्राह्मणकल्पतरु' ही पदवी असूनही त्यानें विजयनगरच्या पानसुपारी बाजारांत अर्हत् चैत्यालय बांधविलें होतें. विजयनगरचा विख्यात सम्राट् कृष्णदेवराय हा स्वतः वैष्णव होता. पण त्याच्या औदार्याची साक्ष दक्षिणेंतील सिंहाचलम्‌पासून रामेश्वरम्‌पर्यंतचीं सर्व देवालयें अजूनही देतात. श्रीमद्वल्लभाचार्यांना कनकाभिषेक करून त्यानें त्यांचा गौरव केल्याचा जसा उल्लेख 'वल्लभाचार्यचरितम्' या ग्रंथांत आढळतो, त्याचप्रमाणें सोमनाथाच्या 'व्यासयोगिचरित' या ग्रंथांत त्यानें माध्वपंथालाही प्रोत्साहन दिल्याचा उल्लेख आढळतो. स्वतः वैष्णव असतांनाही कृष्णदेवरायानें हंपी येथील विरूपाक्ष मंदिराचें नव्यानें बांधकाम करून तेथें भव्य गोपुर बांधविलें. राजाच्या या वर्तनाचा परिणाम निरनिराळ्या धर्मपंथांच्या आचार्यांवरहि झाल्यावांचून राहिला नाहीं. काशीविलास क्रियासक्ति हा पाशुपत-धर्मगुरु असतांनाहि त्यानें बंगलोर जिल्ह्यांतील वागट या गांवांतील वैष्णव मंदिराला भरीव भूमिदान दिल्याचा उल्लेख वागट येथें सांपडलेल्या कोरीव शिलालेखांत आहे. कृष्णदेवरायाच्या साहित्यिक प्रभावळींत वैष्णव पंडितांबरोबरच नंदी, तिमण्णा,

मादय्यगारी, मल्लन्न, धूर्जटी यांसारख्या कट्टर शैव व ब्राह्मणां-बरोबरच कंदुकूरु रुद्र यासारखे सोनारहि अग्रस्थानीं होते. यच्च यावत् सर्व पंथांचें वाङमय त्या काळीं राजाश्रयानें भरभराटीस आलेलें होतें. विजयनगरच्या राजाश्रयानेंच वेदांवर भाष्यग्रंथ निर्माण झाले. या भाष्यग्रंथांची महती इतकी विलक्षण आहे कीं, सर्वतंत्रस्वतंत्र प्रज्ञेची ऐट मिरविणाऱ्या मोठमोठ्या अहंमन्य पाश्चात्य व त्यांच्या प्रकाशांत आपली पाऊलवाट चांचपडणाऱ्या पौरस्त्य पंडितांनाहि या वेदभाष्यांचें साह्य घेतल्याविना वेदांचा उलगडा करतां येण्याची शक्यता नाहीं. साम्राज्याच्या प्रारंभकाळींच भारतीयांचे राष्ट्रीय ग्रंथ जे वेद त्यांचा अर्थ प्रकाशांत आणून त्यांना स्थिरपदत्व प्राप्त करून देण्याची ही कल्पनाच किती मूलगामी आहे! या कल्पनेचें जनकत्व विजयनगरच्या सम्राटांकडेच आहे. ऋग्वेदभाष्याच्या प्रारंभींचा उल्लेख या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. तो असा :—

तत्कटाक्षेण तद्रूपं दधत्बुक्कमहीपतिः ।
आदिशन्माधवाचार्यं वेदार्थस्य प्रकाशने ॥
स प्राह नृपतिं राजन् सायणार्यो ममानुजः ।
सर्वं वेत्त्येष वेदानां व्याख्यातृत्वेन युज्यताम् ॥
इत्युक्तो माधवार्येण वीरबुक्कमहीपतिः ।
अन्वशात्सायणाचार्यं वेदार्थस्य प्रकाशने ॥

(महाराजाधिराज बुक्कानें माधवाचार्यांना वेदांच्या अर्थावर प्रकाश टाकणारें भाष्य लिहिण्याचा आदेश दिला. त्यावर त्यांनीं बुक्क नरेशांना असें सांगितलें कीं, माझा धाकटा बंधु सायन हें सारें वेदरहस्य जाणतो. आपण त्याच्याकडेच हें कार्य सोंपवावें. त्यांच्या इच्छेनुसार हें वेदांच्या अर्थप्रकाशनाचें कार्य बुक्करायांनीं सायणाचार्यांकडे सोंपविलें.) काव्य, नाट्य, संगीत, चित्रकला इत्यादि क्षेत्रांतील प्रगतीचा विषय सोडून केवळ या वेगवेगळ्या धर्मपंथांचें, विजयनगरच्या साम्राज्यांत निर्माण झालेलें तत्त्वज्ञान

व धर्म या विषयांवरील वाङ्मय पाहिलें तरी हिंदुत्वाच्या सर्वांगीण प्रगतीसाठीं व तदंतर्गत सर्व संप्रदायांच्या विकसनासाठीं विजयनगरचें राजसिंहासन कसें आधारभूत होऊन राहिलेलें होतें याची कल्पना येते. उपरिनिर्दिष्ट परस्परविरोधी असलेल्या प्रमुख सम्प्रदायांचेंच साहित्य घ्या.

## अद्वैत पंथ

(१) भारतीतीर्थ :–(१) वाक्यसुधा (२) वैयासिक न्यायमाला.

(२) श्रीशंकरानंद यति :–(१) ईशावास्य दीपिका (२) केनोपनिषद् दीपिका (३) मुंडकोपनिषद् दीपिका. (४) तैत्तिरीयोपनिषद् दीपिका (५) श्वेताश्वतरोपनिषद् दीपिका (६) बृहदारण्यकोपनिषद् दीपिका (७) आत्मपुराण.

(३) श्रीमाधवाचार्य विद्यारण्य :–(१) जैमिनीय न्यायमालाविस्तर (२) पंचदशी (३) जीवन्मुक्तिविवेक (४) विवरणप्रमेयसंग्रह (५) अनुभूतिप्रकाश (६) बृहदारण्यक वार्तिकसार (७) उपनिषद् दीपिका (८) शांकरदिग्विजय (९) पराशर माधव (१०) कालमाधव (११) चरणव्यूहभाष्य.

(४) श्रीसायणाचार्य :–(१) पुरुषार्थ सुधानिधि (२) यज्ञतंत्र सुधानिधि (३) तैत्तिरीय संहिता भाष्य (४) ऋग्वेदभाष्य (५) सामवेद भाष्य (६) शुक्ल यजुर्वेद भाष्य (७) अथर्ववेद भाष्य (८) तैत्तिरीय ब्राह्मण भाष्य (९) तैत्तिरीय आरण्यक भाष्य (१०) ऐतरेय ब्राह्मण भाष्य (११) ऐतरेय आरण्यक भाष्य (१२) वंश ब्राह्मण भाष्य (१३) शतपथब्राह्मण भाष्य.

## द्वैत सम्प्रदाय (माध्व)

(१) अक्षोभ्यतीर्थ :–माधवतत्त्वसारसंग्रह.

(२) जयतीर्थ :–(१) तत्त्वप्रकाशिका-सुधा (२) न्यायविवरण

(३) प्रमेय-दीपिका (४) न्यायदीपिका (५) प्रमाण-पद्धति (६) वादावलि (७) अध्यात्मामृत तरंगिणी (८) शतापराधस्तोत्र.

### विशिष्टाद्वैत संप्रदाय (श्रीवैष्णव)

(१) वेदान्तदेशिक :–(१) यादवाभ्युदय (२) हंस-संदेश (३) संकल्प-सूर्योदय (४) तत्त्वटीका (५) तात्पर्यचंद्रिका (६) न्यायसिद्धान्तांजन (७) अधिकरणसारावलि (८) रहस्यत्रयसार.

### शुद्ध शैवागम

(१) माधवमंत्री : – (१) शैवाम्नायसार व (२) सूतसंहिता व्याख्या.

(२) नरहरि :– निषध दीपिका.

### जैन वाङ्मय

(१) वाहुबलि – धर्मनाथ.

(२) मधुर – गुम्मत

(३) चंद्रकीर्ति – परमागमसार.

### वीरशैव अथवा लिंगायत

(१) मंगरस – खगेन्द्रमणिदर्पण.

(२) भीमकवि – बसवपुराण.

या शिवाय माधव, दिवाकर, नीलकंठ, कुमारधूर्जटि, कुमार डिंडिम, यज्ञनारायण आदि संस्कृत कवि व नाटककार, अप्पय्यदीक्षित, श्रीनिवासदीक्षित आदि आलंकारिक, कल्याणकीर्ति, जिन देवण्ण, कोटेश्वर, नेमण्ण, वाहुबली, पद्मरस, शांतरस, गुणचंद्र आदि जैन साहित्यिक व लक्कण्ण दंडेश, चामरस, बत्तलेश्वर, आदि अनेकानेक वीरशैव कवि व ग्रंथकार यांचें अलौकिक योग्यतेचें साहित्य ध्यानांत घेतलें तर हिंदुत्वाच्या कक्षेंतील सर्व मतसम्प्रदायांना विजयनगरचें साम्राज्य कल्पवृक्षासारखें होऊन राहिलें होतें हें

प्रत्ययास येतें. संस्कृतबरोबरच कन्नड, तामिळ व तेलगू या दक्षिणेंतील जनभाषांचें या राज्यांत सारखेंच संरक्षण, पोषण व संवर्धन झालेलें आहे. कर्नाटकी, तामिळ व तेलगू या भाषा बोलणाऱ्या त्रिविध प्रजेला या राजसिंहासनाविषयीं सारखाच आधार व आपुलकी वाटत आलेली आहे. किंबहुना हंपीपासून तर रामेश्वरम् पर्यंतच्या दक्षिणेंतील यच्चयावत् हिंदुमात्राला या सिंहासनाविषयीं आत्मीयता वाटत आलेली आहे. हिंदुधर्माच्या संरक्षणासाठींच या सिंहासनाची निर्मिति झालेली होती. भारतीय राष्ट्रीयतेच्या अस्मितेचीच आधारशिला या सिंहासनाला होती. इ. स. १३४७ मधील काटवल्ली (शिमोगा जिल्हा) येथील ताम्रपटांत पहिल्या हरिहराचा धाकटा भाऊ मारप्पा वोडेयर याच्या राज्याचें व त्याच्या आज्ञेवरून त्याचा मंत्री माधव यानें दिलेल्या अग्रहार दानाचें वर्णन आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, 'कलियुगांत आपलें कसें होणार याची चिंता वाटून धर्म परमेश्वराकडे गेला, तेव्हां त्याच्या विनंतीवरून परमेश्वरानें संगम घराण्याचा (विजयनगरचा पहिला राजवंश) उदय घडवून आणला. याच संगमाला कामांबिकेचे पोटीं हरिहर हा मुलगा झाला.'

याप्रमाणें विजयनगरचें राजसिंहासन हें केवळ राज्यासन नसून तें धर्माधिष्ठित राजसिंहासन असल्यामुळें कोणत्याहि धर्माचा द्वेष हा त्याचा पाया नसून आपल्या राष्ट्रीयत्वाचें शत्रुत्व न करणाऱ्या मुसलमान व ख्रिश्चन प्रजेचाहि त्या राज्यांत कधींहि छळ झालेला नाहीं. उलट त्यांच्याहि विकसनाला व उपासनासम्प्रदायांना स्वातंत्र्य होतें. मद्रास युनिव्हर्सिटींतील एक प्राध्यापक व प्राचीन इतिहासाचे गाजलेले संशोधक श्री. रामचंद्र दीक्षितार यांनीं आपल्या एका लेखांत म्हटलें आहे कीं, 'महाराज देवराय यानें आपल्या राजधानींत आपल्या मुसलमान प्रजेकरितां एक मशीद बांधून दिली. तसेंच आपल्या सिंहासनापुढें एका उच्चासनावर कुराण शरीफची एक प्रत ठेवली. त्यामुळें मुसलमान लोकांस आपण आपल्या धर्माच्या विरुद्ध वर्तन न

करतां कुराण शरीफ पुढेंच बंदगी करीत आहोंत असें वाटूं लागलें. देवरायानें सुरू केलेली पद्धत महाराजा सदाशिव व रामराय यांचे वेळींहि सुरू ठेवली गेली. रामरायानें मुसलमान लोकांच्या धर्माचरणांत बिलकूल ढवळाढवळ केली नाहीं. विजयनगरच्या राजांनीं ज्योतिषशास्त्राची पूर्ण माहिती असलेल्या बाबानाथ नांवाच्या मुसलमान अवलियाचे दर्ग्याची महती वाढविली. पहिल्या वेंकटरायानें तर हिंदुधर्माचार्य व पाद्री लोक यांच्या धर्मचर्चेंत भाग घेतला होता. त्यानें ख्रिस्त्यांना चंद्रगिरी व वेलोर येथें चर्च बांधण्यास परवानगी दिली.'

छत्रपति शिवरायांच्या जीवनांतून याच धार्मिक धोरणाचा आविष्कार झालेला आहे. कृष्णाजी अनंत सभासद यांच्या बखरींत लिहिलें आहे कीं, 'मुलुखांत देव-देवस्थानें जागजागीं होतीं त्यांस दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून यथायोग्य चालविलें. मुसलमानांचे पीर, मसिदी ह्यांचें दिवाबत्ती नैवेद्य स्थान पाहून चालविलें.' (सभासद बखर पृ. २५, २६) काफीखानासारख्या मुसलमान इतिहासकारानेंही शिवछत्रपतीसंबंधीं असें म्हटलें आहे कीं. 'त्यानें आपल्या सैनिकांकरितां असा सक्त नियम केला होता कीं, सैनिक ज्या ज्या ठिकाणीं लुटालूट करण्यास जातील तेथें तेथें त्यांनीं मशिदीस, कुराण ग्रंथास, अथवा कोणत्याहि स्त्रीस तोशीस अगर त्रास देऊं नये. जर एखादा कुराणाचा ग्रंथ त्यांच्या हातीं आला तर त्याबद्दल पूज्यभाव दाखवून तो आपले मुसलमान नोकराचे स्वाधीन करीत असे.' शिवछत्रपतींच्या चरित्राचें रहस्य उलगडावयास या विजयनगरच्या पार्श्वभूमीची आवश्यकता यासाठींच आहे. छत्रपति शिवराय अथवा विजयनगरचे राजपुरुष यांच्या या वर्तनाचें रहस्य त्यांच्या जाज्वल्य धर्मनिष्ठेंत आहे. त्यांनीं हें धोरण सनातन हिंदुधर्माच्या राजनीतींत अंतर्भूत असणाऱ्या तत्त्वांना अनुलक्षून स्वीकारलें होतें. मनुस्मृतीच्या आठव्या अध्यायांतील ४१ व्या श्लोकांत असें सांगितलें आहे कीं, 'राजानें नवीन प्रदेश

जिंकल्यावर आपली राजकीय सत्ता प्रस्थापित केल्यावर जिंकलेल्या प्रदेशांतील प्रजेला आपल्या धर्मान्वयें वागण्याची पूर्ण मोकळीक द्यावी.' विजयनगरचें या संबंधांतील धोरण दुआर्ते बार्बोस या पोर्तुगीझ प्रवाशाच्या साक्षीवरून अधिकच स्पष्ट होतें. दुआर्ते बार्बोस हा, पृथ्वीला जलमार्गानें प्रदक्षिणा करून गॅलिलिओचा पृथ्वी गोल असल्याचा सिद्धान्त प्रत्यक्ष सिद्ध करण्याचा युरोपखंडांतील सर्व लोकांत पहिला मान ज्यानें मिळविला त्या मॅगेलन ह्या विख्यात प्रवाशाचा मेहुणा होय. तो विजयनगरच्या साम्राज्यांत कांहीं वर्षे होता. त्यानें आपल्या प्रवासवृत्तांत लिहिलें आहे कीं, 'विजयनगरांतील मार्गांतून सर्व राष्ट्रांच्या व सर्व धर्मांच्या असंख्य लोकांचा घोळका झालेला दृष्टीस पडतो. अनेक मूर व्यापारी व बनिये, देशांतील अत्यंत सधन उच्चवर्णीय लोक, यांव्यतिरिक्त देशाच्या निरनिराळ्या भागांतील ज्यांना येणें, राहणें व व्यापार करणें शक्य आहे असे असंख्यात लोक, तेथें गोळा होतात आणि अतिशय मोकळेपणानें व सुरक्षित रीतीनें राहतात. कोणापासूनहि त्यांना कसलाही उपद्रव होत नाहीं, किंवा ते कोठून आले, ते कोणता पंथ पाळतात, कीं ते मूर वा, ख्रिस्ती वा उच्चवर्णीय (हिंदू) आहेत, यांपैकींहि कांहीं कोणी त्यांना विचारीत नाहीं. . . . . . . सर्वांच्याच संबंधांत कडक न्याय व सत्य पाळण्यांत येतें. राजा प्रत्येक इसमास स्वच्छेनें फिरण्यास व ज्याच्या त्याच्या धर्माप्रमाणें अगर पंथाप्रमाणें वागण्यास स्वातंत्र्य देतो. इतकेंच नव्हे तर अशा इसमास कोणत्याही प्रकारें त्रास देत नाहीं अथवा तो ख्रिस्ती, यहुदी, मुसलमान अथवा मूर्तिपूजक आहे असा तपासहि पण करीत नाहीं.'

तात्पर्य, तुंगभद्रेच्या तटाकीं सर्वभक्षक इस्लामी आक्रमणाला अवरुद्ध करून दक्षिणेंतून इस्लामी वर्चस्वाचीं पाळेंमुळें उखडून टाकणाऱ्या खड्गाच्यामागें धर्म पुनरुत्थानाची भव्य प्रेरणा व

भारतीय राष्ट्राच्या अस्मितेचें म्हणजेच हिंदुत्वाचें मत, पंथ,सम्प्रदायातीत विशुद्ध अधिष्ठान होतें. तें खड्ग विजयनगरच्या साम्राज्याचे संस्थापक हरिहर व बुक्कराय यांचें होतें व त्या मागची सांस्कृतिक पुनरुत्थानाची व धर्मपुनरुत्थानाची प्रेरणा श्रीमन्माधवाचार्य अथवा शृंगेरीच्या जगद्गुरु श्रीमदाद्य शंकराचार्यांच्या धर्मपीठावरील २२ वे आचार्य स्वामी विद्यारण्य यांनीं निर्माण केलेली होती. भारतांत उत्पन्न झालेल्या भारतीय भावनांच्या संरक्षणासाठीं धर्मराज्याच्या प्रतिष्ठापनेची स्फूर्ति धर्मकार्यार्थंच उत्पन्न झालेल्या आचार्यपीठाला होणें किती स्वाभाविक आहे !

✦ ✦ ✦

प्रकरण पांचवें

# महामंत्री श्रीमन्माधवाचार्य

श्रीमन्माधवाचार्य अथवा स्वामी विद्यारण्य ही मध्ययुगीन भारताच्या इतिहासांतील अलौकिक विभूति असून 'अद्यापि 'तत्तुल्यकवेरभावादनामिका सार्थवती बभूव' हे उद्गार त्यांच्या विषयीं कुणी काढले तर ते सर्वस्वी यथार्थ ठरतील. मृत्यूच्या गर्तेच्या सीमारेषेवर असलेल्या भारतीय राष्ट्राच्या कानांत पुनरुत्थानाचा महामंत्र फुंकून या महापुरुषानें तेजस्वी, सामर्थ्यशाली व वैभवपूर्ण राष्ट्रजीवन निर्माण करून दाखविलें. भारतीय संस्कृतीचा पुनरुज्जीवक, हिंदुधर्माचा संरक्षक, धर्मराज्याचा प्रणेता, वसिष्ठ, शुक्र व कौटिल्यासारखा धुरंधर राजनीतिविशारद, शुक, याज्ञवल्क्याप्रमाणें ब्रह्मनिष्ठ, देवी शारदेच्या कंठांतील

देदीप्यमान कौस्तुभ, सर्वतंत्रस्वतंत्रप्रज्ञ, सर्व विद्यांचा महासागर, व सर्व अलौकिक सद्‌गुणांचा आकर असणाऱ्या या महापुरुषाच्या संबंधांत 'सर्वज्ञः स हि माधवः' हा वापरण्यांत येणारा वाक्प्रयोग वस्तुस्थितीचेंच यथार्थ दर्शन घडविणारा आहे. रक्तपिपासू यवनांच्या सीमातीत महत्त्वाकांक्षेला व आततायी ताण्डवाला अवरोध करणारी प्रचंड राष्ट्रशक्ति संजीवित करून दक्षिण भारतांत प्रबल हिंदू साम्राज्याची प्रतिष्ठापना करणें हें माधवाचार्यांचें सर्वांत महत्त्वाचें कार्य होय.

## जन्म व गुरुपरंपरा

श्रीमन्माधवाचार्यांचा जन्म शके १२१७ (इ. स. १२९५) मध्यें झाला. पराशर माधव या नांवाच्या आपल्या ग्रंथांत माधवाचार्यांनीं स्वतःचा पुढीलप्रमाणें कुलवृत्तान्त दिलेला आहे.

> श्रीमती जननी यस्य सुकीर्तिर्मायणः पिता ।
> सायणो भोगनाथश्च मनोबुद्धिसहोदरौ ।।
> यस्य बोधायनं सूत्रं शाखा यस्य च याजुषी ।
> भारद्वाजं कुलं यस्य सर्वज्ञः स हि माधवः ।।
> —(पराशरमाधव, प्रस्तावना श्लोक ६ व ७)

या वर्णनावरून असें दिसतें कीं, माधवाचार्यांच्या वडिलांचें नांव मायण असून आईचें नांव श्रीमती असें होतें. त्यांचें सूत्र बोधायन, शाखा याजुषी (कृष्णयजुर्वेद) व गोत्र भारद्वाज होतें. सायण व भोगनाथ हे त्यांचे दोन धाकटे बंधु होत. श्रीमन्माधवाचार्य हे कृष्ण यजुर्वेदी तैत्तिरीय शाखेचे आन्ध्र ब्राह्मण होते. त्यांचे धाकटे बंधु वेदभाष्यकार सायण यांनींच 'अस्माकमान्ध्राणां' असा स्वतःचा उल्लेख केलेला आहे. श्रीमन्माधवाचार्य व त्यांचे बंधु हे शृंगेरीच्या शांकरपीठाचे तत्कालीन आचार्य जगद्‌गुरु श्री विद्यातीर्थ महेश्वर यांचे शिष्य असून भारतीतीर्थ, श्रीशंकरानंद व श्रीकंठ असे त्यांचे आणखी तीन गुरु होते. श्रीमद्‌विद्यातीर्थ महेश्वर यांचें नांव मध्ययुगीन भारतांतील पंडित, तपस्वी,

प्रभावसंपन्न व व्यापक दृष्टिकोणाच्या महापुरुषांमध्यें अग्रगण्य असून धर्मासाठीं नवें साम्राज्य निर्माण करण्याची स्फूर्ति माधवाचार्यांना त्यांच्यापासूनच प्राप्त झाली असली पाहिजे असें मानावयास पुष्कळ जागा आहे. त्यांचें पूर्वाश्रमींचें नांव सर्वज्ञ विष्णु असें होतें. त्यांच्या अलौकिक पांडित्यामुळें मूळच्या विष्णु या नांवामागें सर्वज्ञ हें विशेषण लागलें असावें हें उघडच आहे. ते मूळचे बिल्वारण्य येथील राहणारे असून अनेक शास्त्रांत पारंगत व महान् तपस्वी होते. लंबिका योगपद्धतींत हे निष्णात असून चक्राधिष्ठित त्रिपुर-सुंदरी देवीचे ते महान् उपासक होते. अष्टदिग्गजांप्रमाणें त्यांचे आठ शिष्य त्या काळीं भारतीय संस्कृतीच्या महान् ज्ञानभांडाराचे दक्षिणेंतील प्रतिनिधी म्हणून प्रसिद्ध होते. विद्यातीर्थ महेश्वर हे प्रथम ३५ वर्षें कामकोटि पीठाचे अधीश्वर असून त्या काळांतच माधवाचार्यांनीं त्यांच्याजवळ विद्याग्रहण केलें असावें. त्यानंतर पंधरा वर्षें त्यांनीं हिमालयाच्या दुर्गम वातावरणांत एकान्तसाधना केली व शब्दज्ञानाबरोबरच 'परे च निष्णात' होऊन परत आल्यावर त्यांनीं शृंगेरीचें आचार्यपीठ विभूषित केलें. विद्यातीर्थांनाच विद्येश, विद्यानाथ, विद्याशंकर हीं अनेक संबोधनें असल्यामुळें केवळ वेगवेगळ्या नांवांवरून त्या परस्परभिन्न व्यक्ति होत्या हा इतिहासलेखकांपैकीं कांहींचा तर्क आधारहीन आहे. विद्यातीर्थ महेश्वरांच्या दिव्य तपस्येमुळें व अलौकिक पांडित्यामुळें संपूर्ण दक्षिणेंत शृंगेरीच्या आचार्यपीठाचा प्रभाव विलक्षण होता. माधवाचार्यांना आपल्या या सद्‌गुरुनाथांविषयीं केवढी विलक्षण श्रद्धा होती हें त्यांनीं आपल्या ग्रंथांतून त्यांना ठिकठिकाणीं जें वंदन केलें आहे त्यांतील वर्णनावरून दिसून येतें. अनुभूतिप्रकाश, जीवन्मुक्तिविवेक, जैमिनीयन्यायमालाविस्तर इत्यादि स्वतःच्या ग्रंथांतून माधवाचार्यांनीं केलेलें गुरुवंदनच पहा. ते म्हणतात :—

> अन्तःप्रविष्टः शास्तेति अंतर्यामी श्रुतीरितः ।
> सोऽस्मान् मुख्यगुरुः पातु विद्यातीर्थमहेश्वरः ॥
>
> —(अनुभूतिप्रकाश)

२७३३५ ८४६ ९९

जीवन्मुक्तिविवेकेन तमो हार्दं निवारयन् ।
पुमर्थमखिलं देयाद् विद्यातीर्थमहेश्वरः ।।
—(जीवन्मुक्तिविवेक)

प्रणम्य परमात्मानं श्रीविद्यातीर्थरूपिणम् ।
जैमिनीयन्यायमाला श्लोकैः संगृह्यते स्फुटम् ।।
—(जैमिनीयन्यायमालाविस्तर)

(शरीराच्या आंत राहून सर्वांवर नियंत्रण ठेवणारा असें वेद ज्यांचें वर्णन करतात ते आमचे मुख्य गुरु विद्यातीर्थ महेश्वर आमचें संरक्षण करोत. जीवन्मुक्ति विवेकानें हृदयांतील अज्ञानाचा अंधार नष्ट करून विद्यातीर्थ महेश्वरांनीं आम्हांला चतुर्विध पुरुषार्थांची प्राप्ति करून द्यावी. श्रीविद्यातीर्थरूपी परमेश्वराला प्रणाम करून मी ही श्लोकबद्ध जैमिनीयन्याय-माला रचितों). माधवाचार्यांचे बंधु सायणाचार्य यांनींही आपल्या ऋग्वेदावरील भाष्याच्या प्रारंभीं परमेश्वरज्ञानानें विद्यातीर्थ महेश्वरांना पुढीलप्रमाणें वंदन केलें आहे :—

यस्य निःश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत् ।
निर्ममे तमहं वन्दे विद्यातीर्थमहेश्वरम् ।।

वेद ज्याचीं निःश्वसितें आहेत व ज्यांनीं वेदांपासून अखिल जगताची निर्मिति केली त्या विद्यातीर्थ महेश्वरांना मी वंदन करतों. श्रीविद्यातीर्थ महेश्वर हे माधवाचार्यांचे जसे, तसेच विजयनगरच्या सिंहासनावरील पहिल्या संगम राजवंशाचेहि गुरु होते. हरिहर व बुक्क या विजयनगरच्या पहिल्या दोन राजपुरुषांनीं शृंगेरीच्या आचार्यपीठाला दिलेल्या देणग्यांचें वर्णन करणारा एक शिलालेख 'एपिग्राफिआ कर्नाटिकां'त श्रृंगेरी नं. १ या नांवानें प्रसिद्ध असून त्याचा प्रारंभच 'विद्यातीर्थाय गुरवे परस्मै तेजसे नमः' या वाक्यांनीं झालेला आहे. विद्यातीर्थ महेश्वर हे त्या काळीं दक्षिण भारतांतील सांस्कृतिक आन्दोलनाची महान् प्रेरक शक्ति असून

त्यांच्याविषयीं लोकांच्या मनांत प्रगाढ श्रद्धा होती. आपल्या या गुरूच्या स्मरणार्थ श्रीमन्माधवाचार्यांनीं शृंगेरी येथें अत्युत्कृष्ट शिल्पकलेचें निदर्शन असलेलें विद्याशंकराचें मंदिर बांधलेलें आहे. म्हैसूर युनिव्हर्सिटींतील इतिहासाचे अध्यापक व म्हैसूरच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याचे डायरेक्टर डॉ. एम्. एच्. कृष्ण, एम्. ए., डी. लिट् हे विजयनगर स्मारक ग्रंथांतील आपल्या लेखांत या मंदिराविषयीं लिहितात, 'तें अत्यंत सुंदर व भव्य आहे. किंबहुना विजयनगरच्या ३५० वर्षांच्या कारकिर्दींत दक्षिणेंत शिल्पकलेचे जे कांहीं उत्कृष्ट नमुने निर्माण झाले, त्यांत विद्याशंकर मंदिर प्रमुख आहे.'

श्रीमन्माधवाचार्यांचे दुसरे गुरु भारती कृष्णतीर्थ हे होत. ते विद्यातीर्थ महेश्वरांचे शिष्य असून त्यांच्यानंतर शृंगेरी पीठावर अधिष्ठित झाले होते; यावरूनच त्यांचा पांडित्य व तपस्येचा अधिकार स्पष्ट होतो. भारती कृष्णतीर्थांनाच अद्वैत ब्रह्मानंद असेंहि म्हणतात. वाक्यसुधा व वैभासिक न्यायमाला हे दोन भारतीतीर्थांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. 'सर्वेषां तु प्रथमसुखदं भारतीतीर्थमाहुः' या शब्दांनीं माधवाचार्यांनीं त्यांच्याविषयींची आपली श्रद्धा प्रकट केलेली आहे. माधवाचार्यांना त्यांच्या उत्तरायुष्यांत भारतीतीर्थ स्वामींनींच संन्यासदीक्षा व 'विद्यारण्य' हें अभिधान दिलें. भारतीतीर्थांच्या नंतर शृंगेरीच्या पीठावर विद्यारण्यांची नियुक्ति झाली. विद्यारण्यांचा अपूर्ण राहिलेला विख्यात पंचदशी हा ग्रंथ भारतीतीर्थांनीं पूर्ण केला असें म्हणतात.

माधवाचार्यांचे तिसरे गुरु श्रीकंठनाथ हे होत. ते कांचीपुरम्चे रहिवासी असून शांकर तत्त्वज्ञानाचे गाजलेले पुरस्कर्ते व भगवान् श्रीशंकराचे निस्सीम उपासक होते. श्रीकंठनाथ हे केवळ माधवाचार्यांचेच नव्हे तर माधव, सायण व भोगनाथ ह्या तिन्ही बंधूंचे विद्यागुरु होते.

माधवाचार्यांचे चौथे विद्यागुरु श्री शंकरानंद यति हे होत. हे विद्यातीर्थ महेश्वरांचे शिष्य असून पुण्यश्लोकमंजरीमध्यें त्यांचा इतिहास पुढीलप्रमाणें दिलेला आहे.

श्रीमध्यार्जुनबालचंद्रमखिराट् सूनुर्महेशाह्वयः ।
विद्यातीर्थपदान्नियम्य समयेष्वद्वैतमुद्योतयन् ॥
अध्यास्त प्रतिकामकोटि शरदो द्वात्रिंशतं देहिनाम् ।
द्वैतध्वान्तनिवारणो नवमठी नाथो नवश्शंकरः ।

श्रीशंकरानंद यतींचें पूर्वाश्रमीचें नांव महेश असून ते बालचंद्र मखिराट् यांचे पुत्र होत. त्यांचें जन्मस्थान मध्यार्जुन हें असून ते विद्यातीर्थ महेश्वरांच्या अष्ट दिग्गज शिष्यांपैकीं एक होते. कामकोटि पीठावर विद्यातीर्थ महेश्वर अधिष्ठित असतांना ते हिमालयांत तपस्येसाठीं गेले असल्याचा मागें उल्लेख केलाच आहे. त्यांच्या बरोबर शंकरानंद यति हे सेवेप्रीत्यर्थ राहिले होते असें म्हणतात. पुढें गुरूच्या आज्ञेवरून कामकोटि पीठाचीं सूत्रें त्यांनीं स्वतःकडे घेतली. ते अद्वैत मठाचे अत्यंत प्रभावी प्रचारक असून आपल्या प्रभावानें त्यांनीं माध्वसम्प्रदायाची प्रगति रोखून धरली होती असें म्हणतात. आपल्या गुरूच्या आदेशानुसार त्यांनीं अद्वैत मताच्या प्रसारार्थ पुण्यगिरी, शिवगंगा, अवन्ती, संकेश्वर, कोल्हापूर, हंपी विरूपाक्ष इत्यादि आठ मठांची स्थापना केली. शिवाय कामकोटि पीठाचे ते आचार्य असल्यामुळें 'नवमठीनाथ' अशी त्यांची पदवी होती. श्रीनृसिंहतापनीयोपनिषद् भाष्यांत 'श्रीशंकरानंदशिष्यविद्यारण्यविरचितम्' असा विद्यारण्यांनीं उल्लेख केलेला असून पंचदशीच्या प्रारंभीं विद्यारण्यांनीं आपल्या गुरुदेवांना पुढील प्रमाणें वंदन केलेलें आहे :—

" नमः श्रीशंकरानंदगुरुपादाम्बुजन्मने ।
सविलासमहामोहग्राहग्रासैककर्मणे ॥१॥
तत्पादाम्बुरुहद्वन्द्वसेवानिर्मलचेतसाम् ।
सुखबोधाय तत्त्वस्य विवेकोऽयं विधीयते ॥२॥"

—(पंचदशी-तत्त्वविवेक प्रकरण)

मराठी ग्रंथ संग्रहालय
ना. क्र. 90393

(कार्यासह मूळ अविद्यारूप नक्राचा नाश करणें हेंच ज्याचें मुख्य कर्म आहे अशा श्रीमत् शंकरानंद गुरूंच्या पदकमलाला माझा

नमस्कार असो. त्या गुरूंच्या पदकमलद्वयाची सेवा केल्यानें ज्यांचें चित्त निर्मल झालें आहे त्यांना अनायासानें बोध व्हावा म्हणून हा तत्त्वाचा विवेक करण्यांत येत आहे.)

श्रीशंकरानंद यांनीं अनेक उपनिषदांवर दीपिका नांवाच्या टीका लिहिल्या असून आत्मपुराण नांवाचा उत्कृष्ट वेदान्तग्रंथ लिहिला आहे याचा उल्लेख मागच्या प्रकरणांत केलेलाच आहे.

असो. माधवाचार्यांची गुरुपरंपरा कोणत्या योग्यतेची व केवढी तपस्वी होती याची यावरून कल्पना येईल.

## माधवाचार्यांचें अलौकिक पांडित्य

उत्तरायुष्यांत संन्यासदीक्षा ग्रहण केल्यावर माधवाचार्यांनीं 'विद्यारण्य' हें जे नांव धारण केलें तें त्यांच्या अनंतप्रवाही पांडित्याच्या दृष्टीनें अत्यंत अन्वर्थक होतें यांत शंका नाहीं. विद्येची अशी एकहि शाखा नव्हती कीं जेथें माधवाचार्यांचें नांव मेरुमण्याच्या जागीं नसेल. नोबेल प्राइज् मिळविणारा विख्यात फ्रेंच लेखक अनातोले फ्रान्स यानें असें म्हटलें आहे कीं, 'एखाद्या राष्ट्राच्या संस्कृतीचा संपूर्ण निधि केवळ पांचदहा मेंदूंत समाविष्ट झालेला असतो. तशीच तत्कालीन संपूर्ण भारतीय संस्कृति माधव व त्यांचे बंधु सायण यांच्या ठिकाणीं समाविष्ट झालेली होती. माधवांचे ग्रंथ व त्यांत चर्चिलेले विषय पाहिले म्हणजे या गोष्टीची कल्पना येते. (१) पराशरमाधव हा माधवाचार्यांचा पहिला ग्रंथ होय. 'पराशरस्मृतीचें कलियुगाच्या आचारधर्माच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्व असूनहि पूर्वीं कोणी तिच्यावर टीकाग्रंथ न लिहिल्यामुळें मी तें कार्य करीत आहे' असें माधवाचार्यांनीं या ग्रंथांच्या प्रारंभींच म्हटलें आहे.

पराशरस्मृतिः पूर्वैर्न व्याख्याता निबन्धृभिः ।
मयाऽतो माधवार्येण तद्व्याख्यायां प्रयत्यते ॥

या ग्रंथानंतर धर्माकरणाचा कालनिर्णय करण्यासारख्या सूक्ष्म व किचकट विषयावर त्यांनीं (२) कालमाधव या नांवाचा दुसरा ग्रंथ लिहिला.

व्याख्याय माधवाचार्यो धर्मान्पाराशरानथ ।
तदनुष्ठानकालस्य निर्णयं वक्तुमुद्यतः ॥

याप्रमाणें धर्मशास्त्र व ज्योतिषाशीं संबध असलेल्या विषयांवर ग्रंथरचना केल्यावर त्यांची दृष्टि श्रौतधर्माकडे व तत्प्रतिपादक मीमांसा शास्त्राकडे वळली. व त्यांनीं मीमांसा शास्त्रावर (३) जैमिनीय न्यायमाला या नांवाचा तिसरा ग्रंथ निर्माण केला.

श्रुतिस्मृतिसदाचारपालको माधवो बुधः ।
स्मार्तं व्याख्याय सर्वार्थं द्विजार्थं श्रौत उद्यतः ॥
प्रणम्य परमात्मानं श्रीविद्यातीर्थरूपिणम् ।
जैमिनीयन्यायमाला श्लोकैः संगृह्यते स्फुटम् ॥

न्याय म्हणजे वेदांतील कर्मकांडाची जैमिनीनें केलेली अधिकरणरूप अथवा प्रकरणवार व्यवस्था होय. ( जैमिनिप्रोक्तानि धर्मनिर्णायकान्यधिकरणानि न्यायः) माधवाचार्यांनीं या जैमिनीप्रोक्त शास्त्राचें स्वरूप आपल्या ग्रंथांतून स्पष्ट केलें. हा ग्रंथ केवळ पंडितांनाच समजण्याइतका दुर्बोध झाल्यामुळें बुक्करायाच्या आज्ञेवरून माधवाचार्यांनीं त्यावर विस्तृत टीका स्वतःच लिहून ग्रंथाला 'जैमिनीय-न्यायमाला-विस्तर' असें नांव दिलें.

स खलु प्राज्ञजीवातुः सर्वशास्त्रविशारदः ।
अकरोज्जैमिनिमते न्यायमालां गरीयसीम् ।
तां प्रशस्य सभामध्ये वीरश्रीबुक्कभूपतिः ।
कुरु विस्तरमस्यास्त्वमिति माधवमादिशत् ॥
निर्माय माधवाचार्यो विद्वदानन्ददायिनीम् ।
जैमिनीयन्यायमालां व्याचष्टे बालबुद्धये ॥

या श्रौत ग्रंथाचे बारा अध्याय असून त्यांत एकंदर नऊशेसात अधिकरणें व सत्तावीसशेंपंचेचाळीस सूत्रें आहेत.

याशिवाय (४) पंचदशी (५) जीवन्मुक्तिविवेक (६) विवरण-प्रमेयसंग्रह (७) अनुभूति प्रकाश (८) बृहदारण्यक वार्तिकसार (९) उपनिषद्दीपिका (१०) भगवद्गीताभाष्य (११) महावाक्यनिर्णय (१२) आत्मानात्मविवेक हे अद्वैत वेदान्त प्रति-पादक ग्रंथ; (१३) शांकर दिग्विजय हा श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या चरित्रावरील काव्यात्मक ग्रंथ (१४) गोत्रप्रवरनिर्णय (१५) चरणव्यूह भाष्य (१६) पाणिनीशिक्षाभाष्य (१७) गोभिल गृह्य-सूत्रभाष्य (१८) दर्शपूर्णमास प्रयोग हे प्रकरण ग्रंथ व (१९) संगीत-सार हा संगीतशास्त्रावरील अभिनव ग्रंथ हा माधवाचार्यांचा अलौकिक ग्रंथसंभार आहे.

दुर्दैवानें माधवाचार्यांचे हे सर्वच ग्रंथ आज उपलब्ध नाहींत. उदाहरणार्थ त्यांचा संगीतसार हा ग्रंथ आज उपलब्ध नाहीं. त्या ग्रंथाची माहिती तंजावर येथील विख्यात संगीतज्ञ राजा रघुनाथ नायक याच्या 'संगीत सुधा' या ग्रंथावरून मिळते. हा संगीत सुधा ग्रंथ रघुनाथ नायकानें लिहिलेला नसून त्याचा दिवाण गोविंद दीक्षित यानें लिहिला व आपल्या धन्याचें नांव त्यावर घातलें असें म्हणतात. या ग्रंथांत 'संगीतसारं समवेक्ष्य विद्यारण्याभिध-श्रीचरणप्रणीतम्' असा माधवाचार्य अथवा श्रीमविद्यारण्य यांच्या ग्रंथाचा उल्लेख आहे.

माधवाचार्यांच्यासारखेच त्यांचे धाकटे बंधु सायण व भोगनाथ हे प्रकाण्डपंडित होते. सायणांनीं तर वेदग्रंथांवर भाष्यें लिहून आपलें नांव सदाचें अजरामर करून ठेविलें आहे. त्यांचे ग्रंथ त्यांच्या सर्वंकष प्रतिभेची साक्ष देतात. ते असे :— (१) सुभाषित सुधा-निधि (२) प्रायश्चित्त सुधानिधि (३) आयुर्वेद सुधानिधि (४) अलंकार सुधानिधि (५) धातुवृत्ति सुधानिधि (६) पुरुषार्थ नुधानिधि (७) यज्ञतंत्र सुधानिधि (८) तैत्तिरीय संहिताभाष्य (९) ऋग्वेद भाष्य (१०) सामवेदभाष्य (११) यजुर्वेद (काण्व) भाष्य (१२) अथर्ववेद भाष्य (१३) तैत्तिरीय ब्राह्मण भाष्य (१४) तैत्तिरीय आरण्यक भाष्य (१५) ऐतरेय ब्राह्मण भाष्य

(१६) ऐतरेय आरण्यक भाष्य (१७) ताण्ड्य ब्राह्मण भाष्य (१८) षड्विंश ब्राह्मण भाष्य (१९) सामविधान ब्राह्मण भाष्य (२०) आर्षेय ब्राह्मण भाष्य (२१) देवताध्याय-ब्राह्मण-भाष्य (२२) उपनिषद् ब्राह्मण भाष्य (२३) वंश-ब्राह्मण-भाष्य (२४) शतपथ ब्राह्मण भाष्य.

माधवाचार्यांचा धाकटा बंधु भोगनाथ हा आपल्या बंधूंसारखाच पंडित असून प्रतिभासंपन्न कवि होता. सायणाचार्यांनीं आपल्या अलंकारसुधानिधि या ग्रंथांत अलंकारांचीं लक्षणें सांगून उदाहरणाविषयीं 'तेषामुदाहरणानि भोगनाथकाव्येषु द्रष्टव्यानि' (उदाहरणें भोगनाथाच्या काव्यांतून पहावीं) असें लिहिलें आहे. (१) रामोल्लास (२) त्रिपुरविजय (३) उदाहरणमाला (४) महागणपतिस्तव (५) शृंगारमंजिरी (६) गौरीनाथाष्टक व (७) दृग् दृश्य विवेक या त्यांच्या वाङ्मयकृति होत.

## श्रीमन्माधवाचार्य व विद्यारण्य एकच.

श्रीमन्माधवाचार्य अथवा शृंगेरीच्या शांकरपीठाचे अधिपति श्रीमद्विद्यारण्य मुनि हे एकच असून त्यांनींच दक्षिण भारतांतून इस्लामी आक्रमण थोपवून सीमापार करण्यासाठीं सांस्कृतिक पुनरुत्थानाची प्रखर आकांक्षा दक्षिण भारतांत निर्माण केली व संगम राजवंशाला सर्व प्रकारें साह्य करून त्यांच्या करवीं सांस्कृतिक एकात्मतेच्या अधिष्ठानावर धर्मसाम्राज्याची स्थापना केली. ही गोष्ट अलीकडे कांहीं इतिहाससंशोधकांनीं अमान्य करून आपला वेगळा सूर लाविलेला आहे. त्यांच्या मतांची तपासणी करणें आपल्या पुढील विवेचनाच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

Social and Political life in the Vijayanagar Empire या ग्रंथाचे लेखक डॉ. बी. ए. सालेटोर यांनीं विजयनगर स्मारक ग्रंथांतील आपल्या लेखांत पुढीलप्रमाणें स्वतःचें मत मांडलें आहे.

'शृंगेरी मठस्थ विद्यारण्य श्रीपाद यांच्या साहाय्यानें इ. स. १३३६ मध्यें हरिहर ओडेयर पहिला यानें विजयनगरची स्थापना केली या म्हणण्याला विश्वसनीय पुरावा नाहीं हें यापूर्वीच सांगितलें आहे. [तें असें : विजयनगरच्या संस्थापनेशीं विद्यारण्य श्रीपाद यांचा संबंध जोडला जातो आणि या गोष्टीवरून तेलगू पक्षाला कांहीं सामर्थ्य मिळतें. परंतु विद्यमान शिलालेख, आणि वाङमयीन उल्लेख यांवरून विद्यारण्यांचा हा संबंध असिद्ध आहे. कारण संस्थापकांचा उपाध्याय हा राजगुरु होता. आणि कर्नाटकांतीलच कालामुख या वर्गांतील होता, याबद्दल आतां संशय राहिलेला नाहीं. दुसरा हरिहरराय आणि दुसरा देवराय या दोघांचाहि राजगुरु क्रियाशक्ति देव ओडेयर या नांवाचा होता अशाबद्दल लेखी उल्लेख आहेत (ताम्रपट इ. स. १३७८ व १३७९ आणि शिलालेख इ. स. १४४२) अशा परिस्थितींत विद्यारण्य श्रीपाद यांचा संबंध मान्य करतां येत नाहीं.] त्यालाच दुजोरा देणारा पुरावा खुद्द शृंगेरी मठांतूनच आपल्याला मिळतो. विद्यारण्य कालज्ञान या ग्रंथांत समाविष्ट झालेल्या विद्यारण्य कृति या प्रकरणावरूनहि विद्याशंकर किंवा विद्यातीर्थ, आणि विद्यारण्य ह्या दोन व्यक्ति असून विद्यारण्य हे विद्यातीर्थांचे शिष्य होत असें सिद्ध होतें. म्हणजे विद्यातीर्थ हेच गादीवर होते असें म्हणतां येतें. अर्थात् १३३६ किंवा १३४६ मध्येंहि विद्यारण्य श्रीपाद हे हम्पीच्या जवळपास देखील असण्याचा संभव नव्हता. मग त्यांचा नगरस्थापनेशीं संबंध कोठून असणार? विद्यारण्य श्रीपादांचा काळ ठरविण्यास आणखीहि एकदोन गमकें आहेत. त्यांची श्रौत्रसूत्रावरील टीका प्रसिद्ध आहे. ती टीका करण्यास त्यांचें मन वळविणाऱ्याचें नांव आपणांस अधिकृत रीतीनें कळतें. प्रयोगरत्नमाला या ग्रंथाचा लेखक चौंडप्पाचार्य हा प्रधान होता. त्यानें स्वतःच त्या ग्रंथांत विद्यारण्य श्रीपादांना विनंति केल्याचें लिहिलें आहे. चौंडप्पा हा विजयनगर संस्थापक क्रियाशक्ति यांचा शिष्य होता. क्रियाशक्ति यांच्या गुरुत्वाबद्दलचा पुरावा आधीं आपण पाहिलाच

आहे. तेव्हां क्रियाशक्तीच्या शिष्याकडून सूचना मिळालेला विद्यारण्य श्रीपाद हा संस्थापकांना प्रेरणा देणारा गुरु असूं शकत नाहीं असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. विद्यारण्यानें १३७८ मध्यें बुक्करायाचा मुलगा यदुगिरी विरूपाक्ष राय याजकडून कांहीं मागणी केल्याचा उल्लेख आढळतो. त्यावरून या वेळीं तो गादीवर असण्याचा संभव स्पष्ट होतो. असा पुरावा १३३६ बद्दल मिळत नाहींच.

श्री. सॅलॅटोर यांच्या म्हणण्यांत संशोधनापेक्षां आग्रहीपणाचा भाग अधिक आहे. विजयनगरची स्थापना ज्या वेळीं झाली त्या वेळीं विद्यारण्य या नांवाचे कुणीही पुरुष शृंगेरीच्या शंकराचार्यांचे गादीवर असण्याचा संभवच नव्हता. विजयनगरचे संस्थापक माधवाचार्य हे १३६५ मध्यें निवृत्त झाल्यावर त्यांनीं संन्यास घेतला व नंतर त्यांना विद्यारण्य हें नांव प्राप्त झालें आहे. त्यामुळें विद्यारण्य श्रीपाद हें त्यांचें संन्यासानंतरचें नांव पुढें जरी कितीहि प्रसिद्धीस आलें असलें तरी तें विजयनगरच्या स्थापनेच्या वेळीं कसें आढळावें ? सॅलॅटोर म्हणतात त्याप्रमाणें विजयनगरच्या स्थापनेच्या वेळीं विद्यारण्यांचे गुरु विद्यातीर्थ महेश्वर हे शृंगेरीच्या गादीवर आचार्य होते हें खरेंच आहे; पण ते गादीवर असतांना त्यांचे शिष्य माधवाचार्य यांनीं आपल्या गुरूच्या आज्ञेनुसार विजयनगरची स्थापना करण्यास कांहींहि प्रत्यवाय दिसत नाहीं. श्री. सॅलॅटोर म्हणतात, त्या क्रियाशक्ति देवाचा विजयनगरच्या राज्याच्या संस्थापनेशीं यत्किंचितहि संबंध नाहीं. सॅलॅटोर म्हणतात त्याप्रमाणें क्रियाशक्तिदेव हा दुसऱ्या हरिहररायाचा अथवा दुसऱ्या देवरायाचा राजगुरु असल्यानें तो विजयनगरच्या संस्थापकाचा राजगुरु होता हें कसें सिद्ध होणार? कारण, हे दोघेहि विजयनगरचे संस्थापक नव्हेत. विजयनगरचा संस्थापक पहिला हरिहर ओडेयर असून त्याचा काळ इ. १३३६ ते १३५५ आहे. दुसरा हरिहर हा पहिल्या बुक्करायानंतर विजयनगरच्या गादीवर आलेला तिसरा राजा असून त्याचा काळ इ. स. १३७७ ते १४०४ हा आहे व

दुसरा देवराय हा त्या गादीवरील आठवा राजा असून त्याचा काळ इ. स. १४२३ ते १४४६ हा आहे. तेव्हां हे दोघेहि विजयनगरचे संस्थापक नव्हते हें स्पष्ट आहे. त्यामुळें क्रियाशक्तिदेव हा राजगुरु असला तरी तो त्याच्या पूर्वींच्या पिढीचा राजगुरु असूं शकत नाहीं. विजयनगरचा तिसरा राजा दुसरा हरिहर याच्या गुरूला विजयनगरचा संस्थापक पहिला हरिहर याचा गुरु ठरवण्याचा आग्रह पुराव्याशिवाय धरणें म्हणजे ब्रह्मेन्द्रस्वामी धावडशीकर हे शाहू छत्रपतींचे गुरु होते म्हणून त्यांना छत्रपति शिवाजी महाराजांचे गुरु ठरविलेंच पाहिजे असा आग्रह धरण्यासारखेंच हास्यास्पद व अशास्त्रीय आहे. याच्या उलट पहिल्या हरिहराचा कुलगुरु कोण होता हें शोधून काढणें अधिक अगत्याचें आहे, व त्या बाबतींत निर्विवाद पुरावा सांपडतो. तो पुरावा म्हणजे पराशर माधवीय या आपल्या विख्यात ग्रंथांत स्वतः माधवाचार्यांनींच केलेला उल्लेख होय. तो उल्लेख पुढीलप्रमाणें आहे :—

इन्द्रस्यांगिरसो बलस्य सुमतिः शैब्यस्य मेधातिथिः ।
धौम्यो धर्मसुतस्य वैन्यनृपतेः स्वौजानिमेर्गौतमिः ।।
प्रत्यग्दृष्टिररुंधतीसहचरो रामस्य पुण्यात्मनो ।
यद्वत्तस्य विभोरभूत्कुलगुरुर्मन्त्री तथा माधवः ।।

—(पराशर माधव उपक्रमणिका ४)

(देवराज इंद्राचा जसा बृहस्पति, बलाचा जसा सुमति, शैब्याचा जसा मेधातिथि, युधिष्ठिराचे जसे धौम्य, निमीचा जसा शतानंद, मर्यादा पुरुषोत्तम रामचंद्रांचे जसे वसिष्ठ त्याप्रमाणेंच माधवाचार्य हे विजयनगरच्या प्रथम सम्राट् हरिहराचे नुसते मंत्रीच नव्हे तर कुलगुरुहि होते.) तेव्हां विजयनगरच्या संस्थापकाचे कुलगुरु अथवा राजगुरु क्रियाशक्ति ओडेयर नसून माधवाचार्य होते हें स्पष्ट आहे. प्रत्यक्ष शृंगेरी मठाचा पुरावा पाहिला तर विजयनगरचे संस्थापक माधवाचार्य हे संन्यास घेऊन विद्यारण्य झाल्यावर पूर्वी नसलेलीं विशेषणें हीं शृंगेरीच्या पीठाच्या बिरुदावलींत समाविष्ट झालेलीं

दिसून येतात. तीं विशेषणें म्हणजे 'सर्वतंत्रस्वतंत्रादि राजधानी श्रीमद्विद्यानगर महाराजधानी कर्णाटक सिंहासन प्रतिष्ठापनाचार्य' हीं होत. विद्यारण्य गादीवर येण्याच्या आधीं नसलेलीं व त्यानंतर प्रवर्तित झालेलीं हीं विशेषणें विद्यारण्यांचा विजयनगरशीं असलेला संबंधच स्पष्ट करतात. क्रियाशक्ति या नांवाचा कोठेंहि असा महत्त्वाचा उल्लेख नाहीं. शृंगेरी मठाचा व विजयनगरच्या संस्थापकांचा मात्र विलक्षण संबंध दृष्टोत्पत्तीस येतो. विजयनगरच्या स्थापनेनंतर शृंगेरीचे पीठस्थ आचार्य व विद्यारण्यांचे गुरु विद्यातीर्थ महेश्वर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विजयनगरच्या नरेशांनींच शृंगेरी येथें उत्कृष्ट शिल्पसौंदर्यानें नटलेलें विद्याशंकर मंदिर स्थापन केलें. विजयनगरचें विद्यानगर हें नांव विद्यारण्यांच्यामुळेंच पडलेलें आहे. विजयनगरच्या संस्थापकांनीं इ. स. १३४४ सालीं दिल्लीच्या मुसलमान बादशहाचा पराभव केल्यानंतर त्या विजयाच्या प्रसंगीं आपल्या सर्व बंधूंसहित शृंगेरीच्या आचार्यांचें दर्शन घेतलें. त्या वेळीं तेथें वैयासिक न्यायमालेचे निर्माते श्रीभारतीतीर्थ हे सिंहासनावर होते. त्यांनीं आचार्यांची महापूजा करून एक मोठें दानपत्र दिलें. हें दानपत्र विजयोत्सवासाठींच देण्यांत आलें होतें. त्याच्या प्रारंभीं पुढील वाक्य आहे. 'विजयोत्सवं ख्यापयितुं अकरोद्धर्ममुत्तमम् ।' मूळ दानपत्र उल्लेखिणारें एक शासनपत्र शृंगेरी मठांत असून तें कानडींत आहे. त्याच्या प्रारंभींच्या मजकुराचा आशय पुढीलप्रमाणें आहे :—

'स्वस्ति श्रीजयाभ्युदय शके वर्ष १२६८ पार्थिव संवत्सर फाल्गुन वद्य प्रतिपदा गुरुवार या दिवशीं स्वस्ति श्रीमान् महामंडलेश्वर, शत्रूचा कर्दनकाळ, वचनभ्रष्टांचा शासनकर्ता, श्री वीर हरियप्प वडेयर, कपण्ण वडेयर, बुकण्ण वडेयर, मारप्प वडेयर जामात बलप्प दंडनायक, कुमार सोमण्ण वडेयर यांनीं मुख्य भारतीतीर्थ श्रीपाद व त्यांचे शिष्य शृंगेरी तीर्थांत वास करून अनुष्ठानार्थ सेवेस राहिलेले ब्राह्मण ४८ यांस दिलेल्या दानाचा व शिलाशासनाचा क्रम ...'

ज्या दुसऱ्या हरिहराचा श्री. सॅलॅटोर यांनीं उल्लेख केलेला आहे त्यानें विद्याशंकर मंदिराच्या व्यवस्थेसाठीं इ. स. १३८६ मध्यें शृंगेरीला भेट दिली असतां दिलेलें जें दानपत्र आहे तें या दृष्टीनें अत्यंत उद्बोधक आहे. दानपत्रांतील मजकूर कानडींत असून त्याचा मराठींत भावार्थ पुढीलप्रमाणें :– पूर्वी आमचे परंपरागुरु वेदभाष्यप्रवर्तक विद्यारण्य श्रीपाद यांनीं लोकानुग्रहार्थ पंपातीरनिवासी श्रीविरूपाक्षप्रसादित तपोबलानें विद्यानगर निर्माण करून तेथें हरिहर महाराय यांस गोदेवब्राह्मणांच्या परिपालनार्थ सिंहासनावर पट्टाभिषेक केला. त्यानंतर श्रीमत् राजाधिराज राज परमेश्वर शत्रुकुलकुमुदमार्तंड श्रीवीरप्रताप श्रीमत् हरिहरराय यांनीं सुखसत्कथाविनोदांत कर्नाटक राज्य प्रस्थापित करून विद्यारण्य श्रीपाद यांच्या चरणापाशीं विनंति केली कीं, शृंगेरी येथें शंकराचार्यांनीं निर्माण केलेल्या धर्मपीठस्थानीं मठ व अग्रहार असावा. असा मनोदय व्यक्त करून मल्लिकार्जुन श्रीशंकरस्वामी शारदाम्बा यांनीं येथें देवपूजा व वेदशास्त्र इत्यादि चालविलेल्या धर्मकार्यार्थ भूस्वास्थ्य असावें एतदर्थ शृंगेरीपूर – विद्यारण्यपूर – येथें अग्रहार निर्माण करून २५० वृत्ति परिकल्पून त्याचें त्यानें विद्यारण्यस्वामींच्या चरणाला समर्पण केलें." (एपिग्राफिया ऑफ कर्नाटिका खंड ६, शृंगेरी ११, पृष्ठ १७६.)

यानंतर दिलेल्या दानाचें संपूर्ण वर्णन असून ब्रह्मीभूत स्वामी श्रीविद्यारण्यांच्या स्मरणार्थ अग्रहारांना विद्यारण्यपूर हें नांव देण्यांत आलें आहे. श्रीमत् स्वामी विद्यारण्य यांच्या विजयनगरच्या धर्मराज्यनिर्मितींत असलेला भाग स्वतः दुसऱ्या हरिहराच्या या दानपत्रावरून सुस्पष्ट होत असल्यामुळें श्री. सॅलॅटोर यांच्या प्रतिपादनाच्या वैयर्थ्यासंबंधीं अधिक लिहिण्याचें कारण नाहीं. हंपी येथील शिलालेखानेंही विद्यारण्यांचें हें कर्तृत्व स्पष्ट केलें आहे. तो शिलालेख असा.

२४३३५ ८५६

नागेष्वर्के नमितनृपतेश्शालिवाहस्य याते।
धातोरब्दे शुभसमुचिते मासि वैशाखमासि ।।
शुक्ले पक्षे सुरगुरुयुते सौम्यवारे सुलग्ने।
सप्तम्यां श्रीविजयनगरीं निर्ममे निर्ममेंद्रः ।।

(शालिवाहन शके १२५८ – इ. स. १३३६ – मध्यें धातुनाम संवत्सरीं वैशाख शुद्ध सप्तमीला मघा नक्षत्र असतांना निर्ममेन्द्र म्हणजे संन्याशी लोकांत सर्वश्रेष्ठ अशा शृंगेरीच्या शांकरपीठानें विजयनगरीचें निर्माण केलें.) श्रीमत् विद्यारण्यांच्या या विजयनगरशीं असलेल्या संस्थापकत्वाच्या संबंधामुळेंच विजयनगरचें विद्यारण्य हें नांव पडलेलें आहे. विद्यारण्य कालज्ञानाचा श्री. सॅलॅटोर उपयोग करून घेऊं इच्छितात. त्या कालज्ञानांतच विद्यारण्यांनीं ही नगरी निर्माण केली असा स्पष्ट उल्लेख आहे. तो असा :––

विज्ञापयत आर्याय गुरवे विश्रुताय च।
विद्यारण्याय मुनये वेदव्यासकृपावते ।।
तच्छ्रुत्वा वचनं योगी समायातस्तदन्वितः ।
तां स्थलीं स समीक्ष्याथ राजधानीं महीभुजः ।
तद्वंशजानामन्येषां कर्तुमेवोपचक्रमे ।।
धात्रब्दे सितसप्तम्यां वैशाखे मासि भास्करे ।
दिक्संख्यायुक्तबाणाद्विचन्द्रयुक्तशकान्विते ।।
रचिता नगरी रम्या पुरुषाकृतिशालिनी ।"
— (विद्यारण्य–कालज्ञान)

(ज्या जागीं विजयनगर निर्माण झालें त्या जागेचा तो अद्‌भुत चमत्कार पाहून त्या नोकरांनीं राजाला व स्वामी विद्यारण्यांना तो वृत्तान्त सांगितला. तो ऐकल्याबरोबर विद्यारण्यांनीं स्वतः तेथें येऊन तें स्थल पाहिलें व तेथेंच राजधानी निर्माण केली.)

विजयनगरचे राजे व शृंगेरीचे आचार्यपीठ यांचा संबंध अतिशय जुना आहे असें दिसतें. होयसळ बल्लाळ, हरिहर व

बुक्कराय यांनीं शृंगेरीला सर्वतोपरी साह्यच केलेलें आहे; तत्कालीन प्रवाशांचीं प्रवासवृत्तें, वाङ्मयीन व शिलालेखांतील उल्लेख, नेलोर व कोलार येथील दानपत्रें व बुक्यानिन यानें संगृहीत केलेल्या ग्रामपद्धतींवरूनहि विद्यारण्यांचा विजयनगरशीं असलेला संबंध संस्थापकत्वाचा होता असेंच दिसतें. पुण्यश्लोकमंजिरी, गुरुरत्नमाला, सुषमा, गुरुवंश, महाकाव्य, राजकालनिर्णय, कालज्ञान इत्यादि ग्रंथांतील उल्लेख हीच गोष्ट सिद्ध करतात. एका अपूर्ण शिलालेखांत 'मूर्तिमंत दिव्यतेजोनिधि' असा विद्यारण्यांचा उल्लेख आहे. शृंगेरी मठाला विजयनगरच्या राजांनीं दिलेलीं व आजतागायत चालू असलेलीं भूमिदानें त्या पीठाचा विजयनगरशीं असलेला संबंध स्पष्ट करतात. त्यांतील कांहीं सनदा तर शृंगेरी पीठाशीं संबंध नसलेल्या वैष्णव देवस्थानांतून सांपडलेल्या आहेत. वाङ्मयीन पुरावे तर शेंकडो आहेत. नंदी तिमण्णाचें पारिजातापहरणम्, राजनप्पाचें अच्युताभ्युदयम्, तिरुमलांबाचें वरदाम्बिकापरिणयम्, बसवराजाचें शिवतत्त्वरत्नाकर, तिरुमलरायाचा चिक्कदेव वंशावलि हे सर्व ग्रंथ राज्यसंस्थापक म्हणून विद्यारण्यांचेंच नांव घेतात. श्री. जी. आर. सुब्रह्मण्य पंतलु यांनीं तेलगु वाङ्मयाच्या सुवर्णकालासंबंधीं लिहितांना विद्यारण्यांनीं विजयनगर संस्थापनेच्या कालीं केलेल्या कार्याचे उल्लेख तेलगू वाङ्मयांत रूढ आहेत हें दाखविलें आहे. विजयनगर घराण्याच्या धर्माविषयीं लिहितांना विख्यात इतिहास-संशोधक श्री. सी. आर. कृष्णम्माचारी यांनीं विद्यारण्यांकडेच विजयनगरची व विजयनगर साम्राज्याची रचना व स्थापना करण्याचें श्रेय असल्याचें प्रतिपादन केलें आहे. विद्यारण्य पादपद्माराधक व कर्नाटकप्रतिष्ठापनाचार्य असें विद्यारण्यांचे नंतर गादीवर आलेल्या सर्व आचार्यपीठाधिष्ठित व्यक्तींना लावण्यांत येणारें विशेषणहि हीच गोष्ट सिद्ध करतें. तेव्हां विद्यारण्य हे विजयनगरच्या साम्राज्याचे संस्थापक होत ही गोष्ट पुराव्यांनींच सिद्ध होणारी आहे.

हे विद्यारण्य म्हणजेच विजयनगरचा पहिला राजा हरिहर ओडेयर याचे कुलगुरु व मंत्री माधवाचार्य होत. या संबंधांत कालनिर्णयाच्या दृष्टीनें संशोधकांत एक मोठा घोटाळा उत्पन्न झालेला दिसतो. तो असा कीं, विद्यारण्यांनीं विजयनगरच्या स्थापनेच्या पूर्वींच इ. स. १३३१ सालीं संन्यास ग्रहण केला होता ही समजूत होय. वस्तुतः विद्यारण्यांनीं आपल्या उत्तर आयुष्यांत संन्यास घेतलेला आहे. विजयनगरच्या स्थापनेच्या पूर्वी, स्थापनेच्या वेळीं (१३३६ इसवीमध्यें) व स्थापनेनंतरहि राज्य स्थिरहोईपर्यंत कित्येक वर्षें त्यांनीं संन्यास घेतलेला नव्हता; तर त्या वेळीं ते माधवाचार्यच होते. त्यांच्या जीवनाची तपासणी करतांनाहि कांहीं चमत्कारिक स्वरूपाचे घोटाळे अनेकांनीं करून ठेवलेले आहेत. रा. मणूरकर यांनीं स्वामी विद्यारण्यांचें एक चरित्र लिहिलेलें आहे. त्या चरित्रांत शक व सन यांचे असेच घोटाळे झालेले आहेत. त्यांनीं माधवाचार्यांचा जन्म शके ११८९ (इ. स. १२६७) हा दिला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें माधवाचार्यांचे धाकटे बंधु भोगनाथ यांनीं शके १२५० (इ. स. १३२८) मध्यें संन्यास घेतला व माधवाचार्यांनीं शके १२५३ (इ. स. १३३१) मध्यें संन्यास घेतला. भोगनाथांनीं जगद्गुरु भारतीतीर्थ या नांवानें श्रृंगेरीला पीठस्थ आचार्य म्हणून शके १३०२ म्हणजे इ. स. १३८० पर्यंत काम केलें; व नंतर ते समाधिस्थ झाले. पुढें विद्यारण्य गादीवर बसले. आणि त्यांनीं जगद्गुरु म्हणून शके १३०८ पर्यंत म्हणजे इ. स. १३८६ पर्यंत कारभार करून ते समाधिस्थ झाले. विजयनगरची स्थापना शके १२५८ (इ. स. १३३६) मध्यें झाली. इ. स. १३४४ मध्यें द्वारसमुद्र, वरंगळ, तैलंगण, मलबार वगैरे ठिकाणच्या राजांसह दिल्लीच्या सुलतानाशीं लढून त्याचा पराभव केला आणि मुसलमानांना दक्षिणेंतून हांकून लावलें इ. मणूरकरांच्या या म्हणण्याचा विचार केला तर फारच चमत्कारिक घोटाळे उत्पन्न होतात. पुण्याचे उपनिषत्तीर्थ श्री. जोग हे आपल्या पंचदशीच्या प्रस्तावनेंत लिहितात: "वरील

सनांचें परीक्षण केल्यावर आपणांस असें दिसून येतें कीं, माधवाचार्यांनीं ६४ व्या वर्षी संन्यास व त्यानंतर पांच वर्षांनीं हरिहर रायाकरवीं विजयनगरची स्थापना केली व त्यांनीं मंत्री म्हणून वयाच्या ६९ व्या वर्षापासून ११३ व्या वर्षापर्यंत काम केलें व पुढें सहा वर्षांनीं म्हणजे ११९ व्या वर्षी ते समाधिस्थ झाले. संन्यासदीक्षा घेऊन विद्यारण्य हें नांव धारण केल्यावर त्यांना 'सर्वज्ञ: स हि माधव:' असा आपला उल्लेख करावयाचा अधिकार प्राप्त होत नाहीं. ग्रंथांतून बुक्क राजाचा मंत्री म्हणून माधवाचार्य असा उल्लेख आढळतो; विद्यारण्य असा उल्लेख नाहीं. त्यामुळें रा. मणूरकर यांचें म्हणणें ग्राह्य मानतां येत नाहीं."

कालनिर्णयाच्या संबंधांत आणखी एक चमत्कारिक घोटाळा झालेला आहे. श्री. सीवेल (Mr. Sewell) यांच्या पुस्तकांत एका शिलालेखाचा उल्लेख आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, "In A. D. 1380 Harihara expelled the Mohamedans from Goa, Madhavacharya being his minister." अल्बुकर्कनेंहि असें म्हटलें आहे कीं, "In A. D. 1367, however, the Hindu minister of Harihara reconquered the city (Goa) and it remained a part of the great Hindu Kingdom of Southern India, for more than 70 years."

या दोन्ही उल्लेखांचा इत्यर्थ असा कीं, इ. स. १३८० मध्यें दुसऱ्या हरिहराच्या वेळीं त्याचे मंत्री माधवाचार्य यांनीं गोवा प्रांत परत जिंकून घेतला व त्यानंतर ७० वर्षेपर्यंत तो प्रांत हिंदूंच्याच ताब्यांत होता. ही गोष्ट जर खरी मानली तर माधवाचार्य हे त्यांच्याच एका स्तोत्रांत उल्लेखिल्याप्रमाणें वयाच्या ८५ व्या वर्षी संन्यास घेऊन नंतर वयाच्या ११० वर्षापर्यंत राज्यकारभार करीत होते; आणि गोवें प्रांत जिंकण्याचा त्यांचा काळ लक्षांत घेतला तर जवळजवळ पन्नास वर्षें राज्यकारभार करून त्यांनीं नंतर निवृत्ति पत्करली व एकंदर २०० वर्षेपर्यत त्यांना जीवन लाभलें होतें असें मानणें भाग पडतें. विख्यात

संशोधक श्री. बी. सूर्यनारायणराव यांनीं या शृंगापत्तीची उपपत्ति लावतांना इतकें दीर्घ जीवन लाभलेलीं माणसें असूं शकतात असें प्रतिपादन केलें आहे. पण हा सर्व घोटाळा केवळ नामसादृश्यामुळें उत्पन्न झालेला आहे. माधवाचार्य यांच्या कालखंडांत माधव या नांवाच्या आणखी दोन व्यक्ति होत्या असें दिसतें. आणि नांवांच्या घोटाळ्यामुळें एकमेकांचें कर्तृत्व एकमेकांवर लादून लेखकांनीं घोटाळा उत्पन्न केलेला आहे. ज्यांनीं गोवा परत जिंकून हिंदू साम्राज्यांत समाविष्ट केला ते विद्यारण्य माधवाचार्य नसून दुसऱ्या हरिहराचे महामात्य माधवमंत्री हे होते. आणि माधवमंत्री हे स्वतंत्र पुरुष आहेत. माधवाचार्यांचा व त्यांचा कांहीं संबंध नाहीं.

## माधवमंत्री व माधवाचार्य

माधवमंत्री व माधवाचार्य या दोन भिन्न व्यक्ति आहेत ही गोष्ट प्रथम श्री. बी. सूर्यनारायणराव यांनींच प्रकाशांत आणली. गोवा प्रांत हा माधवाचार्यांनीं जिंकला नसून त्या वेळीं माधवाचार्य राजकारणनिवृत्त झालेले होते. गोवाप्रांत हिंदू राज्यांत समाविष्ट करून घेण्याचें कार्य माधव मंत्र्यानें पार पाडलेलें आहे. गोवा जिंकल्यावर विजयनगरच्या सम्राटांनीं या माधव मंत्र्यालाच तेथील राज्यपाल नियुक्त केलें. या विजयानंतर त्याला 'गोवापुराधीश्वर' ही अन्वर्थ पदवीहि मिळाली. या विजयाच्या स्मरणार्थ माधव-मंत्र्यानें कुच्चर या गांवाचें माधवपूर असें नामकरण करून तो गांव चोवीस विद्वान् ब्राह्मणांना दान दिला. या अग्रहार-प्रदानाचा ताम्रपट पुढीलप्रमाणें आहे: 'स्वस्ति श्रीशके त्रयोदशाधिक-त्रिशतोत्तरसहस्रगते वर्तमाने प्रजापतिसंवत्सरे वैशाखमासे कृष्ण-पक्षे अमावास्यायां सौम्यदिने सूर्योपरागे पुण्यकाले स्वस्ति श्रीमन्महामंत्रीश्वर उपनिषन्मार्गप्रवर्तकाचार्यः श्रीमन्माधवराजः कुंजरविषयवर्तिनं कुच्चरनामानं ग्रामं माधवपुरमिति प्रथितनामानं अग्रहारं कृत्वा ब्राह्मणेभ्यो ददौ।' श्रीमद्विद्यारण्य माधवाचार्यांच्या एकाहि ग्रंथांत अथवा लेखांत त्यांनीं स्वतःला माधवराज असें

म्हटल्याचें दाखवून देतां येणार नाहीं. माधवमंत्री व माधवाचार्य या दोन भिन्न व्यक्ति असून गोवा जिकण्याच्या घटनेचा माधवाचार्यांशीं कांहीं संबंध नाहीं हें यावरून स्पष्ट होईल. माधवमंत्री हा प्रथम पहिल्या हरिहर राजाचा धाकटा भाऊ मारप्पा वडेयर याचा मंत्री होता. इ. स. १३४७ च्या शिलालेखांत त्याच्याविषयीं पुढीलप्रमाणें वर्णन आहे :—

कल्लासनान्मारपभूमिपाल: सम्प्राप्य राज्यं दिशि पश्चिमायाम् ।
गोमंतशैले वरचंद्रगुप्तौ स्थित्वा सुखं सम्यगपालयत्प्रजा: ।।

धर्मेण तस्य परिपालयत: प्रजानां
राज्ञोधिराज्यगहनाम्बुधिकर्णधार: ।
प्रज्ञावलेन गुरुमप्यतिसन्दधानो
मंत्री महानजनि माधवनामधेय: ।।

— (एपि. कर्नाटिका खंड ८.)

मारप भूमिपाल (मारप्पा वडेयर) पश्चिमेचें राज्य कल्लासनांपासून घेऊन गोमंत पर्वतराजींत चंद्रगुप्ती येथें सुखानें आपलें प्रजापालनाचें कर्तव्य करीत असतां राजव्यवहाररूपी अगाध समूहाचा जणूं कर्णधारच असा स्वत:च्या प्रज्ञाबलानें बृहस्पतीपेक्षांहि वरचढ असणारा माधव नांवाचा त्याचा श्रेष्ठ मंत्री होता.

मारप्प वडेयरचा मंत्री असतांनाच माधवमंत्र्यानें करंब प्रांत (दक्षिण कानडा) जिंकून विजयनगरच्या साम्राज्यांत समाविष्ट केला व होनावरच्या सुलतानाला जिंकून विजयनगरचें मांडलिकत्व पत्करण्यास त्यास भाग पाडलें. मारप्पाच्या मृत्यूनंतर बुक्क राजानें त्याला आपल्या मंत्रिमंडळांत स्थान दिलें. श्रीमद्विद्यारण्य माधवाचार्य व माधवमंत्री यांच्यांतील सुस्पष्ट भेद श्री. नरसिंहाचार्य व बी. सूर्यनारायणराव यांनीं प्रथम प्रकाशांत आणला. त्यांची तुलना व भेद पुढीलप्रमाणें आपल्या सायणचरित्रांत श्री. कोलंगडे यांनीं दाखविलेला आहे.

| | माधवाचार्य | माधवमंत्री |
|---|---|---|
| पिता | मायण | चाउंड उर्फ चौंड |
| आई | श्रीमती | माचाम्बिका |
| गोत्र | भारद्वाज | आंगिरस |
| गुरु | विद्यातीर्थ | काशीविलास क्रियाशक्ति |
| दैवत | भुवनेश्वरी | त्र्यंबकेश्वर |
| पंथ | अद्वैत स्मार्त | पाशुपत शैव |
| जात | कर्नाटकस्थ आंध्रब्राह्मण | गौडसारस्वत ब्राह्मण |
| शाखा | यजुर्वेदी तैत्तिरीय | ऋग्वेदी |
| हुद्दा | विजयनगरचा महामंत्री व राजगुरु | मारप्प वडेयरचा मंत्री व सेनापति |
| वसतिस्थान | विजयनगर | जयंतीपूर |
| नांव | माधव; माधवाचार्य; माधवमंत्री; माधवअमात्य; विद्यारण्य | माधव; माधवाचार्य; माधवमंत्री; माधवअमात्य; बनवासी, गोव्याचा राज्यपाल |
| ग्रंथ | पराशरमाधव; पंचदशी आदि अनेक ग्रंथ | सूत संहितेवरील तात्पर्यदीपिका नांवाचा एकच टीकाग्रंथ |
| बिरुदावलि | कर्नाटकसिंहासनस्थापनाचार्य वेदमार्गप्रतिष्ठापनाचार्य; विद्यारत्नमहोदधि; जगद्गुरु श्रीमत्च्छंकराचार्य | दण्णायक; राज्यपाल; मंत्रिवर्य; माधवराज; माधवराज वडेयरू, उपनिषन्मार्गप्रवर्तक इ. |

— (श्रीसायणाचार्य. लेखक रा. गो. कोलंगडे पृ. १४४)

यावरून विजयनगरसाम्राज्यसंस्थापक माधवाचार्य विद्यारण्यांचा व गोवें जिकण्याचा कांहीं संबंध नाहीं हें स्पष्ट होईल, व त्यामुळें त्यांच्या आयुष्याची शंभर वर्षे वयाच्यावर ओढाताण करण्याचा व त्यासाठीं शंभरावर जगलेल्या लोकांची यादी सादर करून वाद घालण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं हेंहि ध्यानांत येऊं शकेल.

आणखीहि एक माधव त्या वेळीं असल्याचें दिसतें. तो म्हणजे माधवाचार्यांचे धाकटे बंधु वेदभाष्यकार सायणाचार्य यांचा मुलगा म्हणजे स्वतः विद्यारण्य माधवाचार्यांचाच पुतण्या होय. त्यानेंच सुप्रसिद्ध 'सर्वदर्शनसंग्रह' ग्रंथाची रचना केली. सर्वदर्शनसंग्रहाच्या प्रारंभीं असलेला पुढील श्लोक पहा :—

श्रीमत्सायणदुग्धाब्धिकौस्तुभेन महौजसा ।
क्रियते माधवार्येण सर्वदर्शनसंग्रहः ।।

(श्रीमत्सायणाचार्यरूपी क्षीरसागरापासून जन्म पावलेला तेजस्वी कौस्तुभमणि जो माधवाचार्य तो हा सर्वदर्शनसंग्रहनामक ग्रंथ करीत आहे.)

असो. विजयगनरच्या साम्राज्याचे संस्थापक विद्यारण्य माधवाचार्यासंबंधींच्या अलीकडेच उत्पन्न झालेल्या वादंगाचें हें स्वरूप पाहिल्यावर त्यांतील सारहीनतेसंबंधीं अधिक विवेचन करण्याचें कारण उरत नाहीं. माधवाचार्यांनीं या स्वतंत्र धर्मसाम्राज्याची निर्मिति कशी केली तें पाहणें अत्यंत उद्बोधक आहे.

दक्षिणेंतील यावनी आक्रमणाच्या पहिल्याच धक्क्यानें त्याचें सर्वभक्षक स्वरूप ध्यानांत येऊन दक्षिणेंतील हादरून गेलेल्या राजसत्ता, धर्मसिंहासनें व सामान्य जनता यांना धर्मरक्षणात्मक कार्याच्या एकात्म सूत्रांत उपनिबद्ध करावयास श्रृंगेरीचे तत्कालीन व्यापक दृष्टीचे आचार्य विद्यातीर्थ महेश्वर हे पुढें आले. त्यांचें लोकांवर विलक्षण प्रभुत्व होतें व आलेली आक्रमणाची लाट संपूर्ण राष्ट्रजीवनाचाच ग्रास करणारी आहे याची त्यांना परिपूर्ण जाणीव असल्यामुळें संप्रदायभेदातीत समष्टिधर्माचें अथवा संघधर्माचें आवाहन त्यांनीं केलें. त्यांच्याकडे दक्षिण भारतांतील सारे पंडित व हिंदुधर्मांतर्गत भिन्न भिन्न मत-पंथ-संप्रदायांचे लोक आकृष्ट होऊं लागले. समान संकटाच्या जाणिवेनें राष्ट्रधर्माची प्रखर जाणीव सर्वांच्याच अंतःकरणांत उत्पन्न झाली. वेदान्तदेशिकांसारखे रामानुज संप्रदायी व अक्षोभ्यतीर्थासारखे मध्वाचार्य यांनाहि या इस्लामी

आक्रमणाची झळ लागल्यामुळें शृंगेरीच्या नेतृत्वाखालीं, सर्वांनाच समान शत्रूविरुद्ध एक व्हावें अशी प्रेरणा होणें स्वाभाविकच होतें. पण राष्ट्रजीवनाचें संपूर्ण संरक्षण स्वधर्माची राजसत्ता निर्माण झाल्याशिवाय होणारें नव्हतें. अशी राजसत्ता ज्याच्या द्वारें प्रस्थापित होऊं शकेल अशा राजपुरुषाच्या शोधांत आचार्य विद्यातीर्थ महेश्वर व त्यांचे शिष्योत्तम श्रीमन्माधवाचार्य होते. आपल्या या कार्याला आवश्यक तो दैवी कृपाप्रसाद मिळावा म्हणून हंपी येथील भुवनेश्वरीच्या मंदिरांत माधवाचार्य घोर तपश्चर्या करीत होते. त्यांची ही तपश्चर्या ज्या प्रदेशांत चालू होती तो प्रदेश स्वतंत्र होता. पाहतां पाहतां तेथील स्वाभिमानी राजवंश इस्लामच्या आगींत भस्मसात् होऊन प्रदेश बेचिराख झाला तरीहि तेथील लोकांच्या स्वाभिमानाचा स्फुल्लिंग राखेंतहि धगधगतच होता. माधवाचार्यांना हवा होता तो राजपुरुष तेथें मिळाला. त्याला हाताशीं धरून त्यांनीं स्फुल्लिंगावरील राख झटकून टाकली व आनेगोंदीच्या त्या भस्मराशींतून नवें देदीप्यमान साम्राज्य निर्माण केलें. कोण असेल हा भाग्यशाली राजपुरुष?

✦ ✦ ✦

प्रकरण सहावें

# श्रीमन्माधवाचार्य विद्यारण्य

विद्यारण्य माधवाचार्यांनीं विजयनगरची स्थापना केली याचा अर्थ आजवर असा समजण्यांत येत असे कीं, त्यांच्यापूर्वी विजयनगर मुळींच अस्तित्वांत नव्हतें. पण ही कल्पना बरोबर नाहीं. विजयनगर त्यापूर्वी अस्तित्वांत असून आक्रमकांच्या अत्याचारांच्या होळींत तें भस्मसात् झाल्यावर त्या भस्मांतून माधवाचार्यांनीं

त्याची पुनश्च नवनिर्मिति केली हें श्री. बी. सूर्यनारायणराव यांनीं आपल्या Never to be Forgotten Empire या ग्रंथांत विजयनगरच्या राजवंशाच्या वर्तमानकालीन कुलपुरुषांकडून मिळालेल्या राजवंशावलीच्या आधारें सिद्ध केलें आहे. चालुक्य महाराजांचा पुत्र विजयध्वज हा मूळ विजयनगरचा संस्थापक होय. त्याच्या पूर्वीचे राजे आनेगोंदी येथें राज्य करीत. रामायणकालीन महान् योद्धा वाली याचा हा मूळचा प्रांत. वालीचा धाकटा बंधु सुग्रीव रामचंद्राच्या कृपाप्रसादानें किष्किधाप्रांताचा राजा झाला. सुग्रीवानंतर तें राज्य वालीचा महापराक्रमी पुत्र व सुग्रीवाचा युवराज अंगद याच्याकडे आलें. त्यानें किष्किधेचें नांव बदलून अंगदनगरी अथवा अंगदी असें ठेविलें. या अंगदीचेंच रूपांतर होऊन अनागोंदी असें नांव पडलें असावें असा संशोधकांचा तर्क आहे. बी. सूर्यनारायणराव लिहितात, " The name Anagondi seems to suggest that it was formerly in existence as Angadi or the city of Angada, the powerful son of Vali. But in later days the people might have been easily induced to change Angadi into Anagondi, as it was mostly used for keeping the large number of elephants, the Rajas of Vijayanagar owned from time to time. The want of 'na' was cleverly supplied and the people made it to appear as ana, elephant, and gandi a lane or street for keeping them. I do not however attach much importance to these philological quibbles, beyond that it is a mere guess of mine and I leave the readers of this Volume to draw their own inferences.

— (Never to be Forgotten Empire, Introduction P. 20)

असो. या अनागोंदीच्या प्राचीन हिंदू राजवंशांत महाराज चालुक्याचा पुत्र विजयध्वज इ. स. १११७ सालीं गादीवर आला. त्यानें इ. स. १११७ ते इ. स. ११५६ पर्यंत राज्य केलें. त्यानेंच तुंगभद्रेच्या दक्षिणतटाकीं प्रथम विजयनगर वसविलें. डोंगराळ

प्रदेशांत लहान लहान पर्वतराजींनीं परिवेष्टित अशा ठिकाणीं ही नवी राजधानी स्थापन करतांना त्यानें अपूर्व बुद्धिमत्ता प्रकट केली होती यांत शंका नाहीं. या नव्या राजधानीच्या स्थापनेचा हेतु उत्तरेकडून येणाऱ्या परचक्रांपासूनची सुरक्षितता हाच होता. इ. स. ११५० सालीं या राजधानीची स्थापना करण्यांत आली. तिचें महत्त्व आणि वैभव त्याच वेळीं वाढीला लागलेलें होतें. माधवाचार्यांच्या दोनशें वर्षें तरी पूर्वीं याप्रमाणें विजयनगरची स्थापना झालेली आहे. विजयध्वजानंतर त्याचा मुलगा अनुवेम हा इ. स. ११५७ मध्यें विजयनगरच्या गादीवर बसला व त्यानें इ. स. ११७९ पर्यंत राज्य केलें. त्यानंतर त्याचा मुलगा नरसिंह देवराय हा विजयनगरच्या गादीवर आला. त्यानें १२४६ पर्यंत म्हणजे ६७ वर्षें राज्य केलें. इतकें दीर्घकालीन जीवन लाभलेला राजपुरुष विरळा. त्याच्या राज्यकालांत विजयनगरची भरभराट होऊन त्याच्या ऐश्वर्याची कीर्ति उत्तर भारतांतील मुस्लिम सत्ताधाऱ्यांच्या कानांपर्यंत पोहोंचली होती. त्यानंतर त्याचा मुलगा रामदेवराय यानें १२७१ पर्यंत म्हणजे २५ वर्षें राज्य केलें. त्यानंतर त्याचा मुलगा प्रतापराय यानें १२९७ पर्यंत म्हणजे २६ वर्षें राज्य केलें. त्याचा मुलगा जम्बुकेश्वरराय हा १२९७ मध्यें विजयनगरच्या गादीवर आला. त्यानें १३३४ पर्यंत म्हणजे ३७ वर्षें विजयनगरचें राज्य केलें. प्राचीन विजयनगरचा हा शेवटचा राजपुरुष होय. याच्याच उत्तर आयुष्यांत यावनी आक्रमणाच्या धगधगीत होळींत या राजवंशाची व त्याचबरोबर विजयनगरच्या वैभवाचीहि आहुति पडली.

## जम्बुकेश्वराचा आत्मयज्ञ

जम्बुकेश्वर विजयनगरच्या सिंहासनावर असतांना इ. स. १३२० मध्यें दिल्लीचा महंमद तघलक याची दक्षिण भारतावर जी स्वारी झाली तिची पहिली जोराची धडक या राज्यालाच सहन करावी लागली. Fernad Nuniz हा पोर्तुगीज प्रवासी लिहितो कीं आनेगोंदीचा राजा जम्बुकेश्वर याचें व दिल्लीच्या सुलतानाचें

युद्ध सतत १२ वर्षें सुरू होतें. आपल्या सैनिकांपैकीं निवडक पांच सहस्र लोकांना घेऊन शेवटीं राजानें डोंगरी किल्ल्यांचा आश्रय केला. प्रजाजनांना सततचा आक्रमणाचा त्रास नको म्हणून त्यानें या युक्तीचा अवलंब केला होता. पण शेवटीं शत्रूचा वेढा उठण्याची शक्यता नाहीं व अधिक दिवस युद्ध चालवितां येण्याचीहि शक्यता नाहीं असें पाहून राजा जम्बुकेश्वरानें अंतिम निर्णय घेतला. शत्रूला शरण जाण्याची व स्वत:चा मानभंग करून घेण्याची कल्पना त्याच्या मानी मनाला पटण्यासारखी नव्हती. त्यानें समरांगणांत क्षत्रियोचित वृत्तीनें प्राणत्याग करावयाचा निर्णय घेतला. आक्रमक मुसलमानांच्या चारित्र्याची पूर्ण कल्पना असल्या-मुळें स्त्रियांच्या विनवणीवरून त्याच्या अनुयायांनीं किल्ल्यांतील आपल्या बायकामुलांची स्वत:च्या हातानें खांडोळी उडविलीं राजानें किल्ल्यांबाहेरील शत्रूंवर निकराचा हल्ला चढविला. शेवटचा मनुष्य छाटला जाईपर्यंत कोणीहि मागें पाऊल घेतलें नाहीं. सर्व जणांनीं धारातीर्थीं आपले देह समर्पण केले. केवळ राजाचा मंत्री, कोषा-ध्यक्ष व आणखी चार अधिकारी असे सहा जण किल्ल्यांत राहिले होते. त्यांना महंमदानें कैद केलें. राजाच्या बाणेदारपणाचा त्या राक्षसी वृत्तीच्या पुरुषावरहि परिणाम झाल्याविना राहिला नाहीं. त्या बंदिवान अधिकाऱ्यांच्या विनंतीला मान देऊन महंमदानें राजाचें शव आनेगोंदीला नेऊन त्यावर संस्कार करण्याची अनुज्ञा दिली. तदनुसार राजधानींत अंत्यसंस्कार करण्यांत आला. राजाच्या या बाणेदार वर्तनामुळें त्याच्याविषयीं लोकांच्या अंत:करणांत सदाचें स्थान उत्पन्न होऊन ते त्याला सत्पुरुषाप्रमाणें समजूं लागले.

महमद तघलकाच्या या विजयानंतर आनेगोंदी व विजय-नगरच्या प्रजाजनांवर संहार, लूट व दास्याच्या अनेक जाचांचा केवढा कहर गुदरला असेल हें सांगावयास नकोच. जिवंत नरक-यातनेच्या कुंडांत सतत दोन वर्षें त्या प्रजाजनांना काढावीं लागलीं. तघलकानें तेथें दोन वर्षे वास्तव्य करून तो सारा प्रदेश पूर्ण

उद्ध्वस्त केला. असें सांगतात कीं, जम्बुकेश्वराच्या मुलांनाहि त्यानें इस्लामची दीक्षा दिली. महंमदाच्या या अत्याचारामुळें त्रस्त होऊन प्रजाजनांतील नामवंत लोकांनीं अरण्याचा व पर्वतराजींचा आश्रय केला. पण राजा जम्बुकेश्वराच्या पराक्रमी प्राणार्पणाचें ज्वलंत उदाहरण डोळ्यांसमोर असल्यामुळें त्याचे शूर प्रजाजन स्वस्थ बसले नव्हते. ते अरण्यांतून वृकयुद्धपद्धतीनें त्या अरेराव सुलतानाच्या सैन्याभोंवतीं घिरट्या घालून त्याला शक्य तितका त्रास देत होतेच. दोन वर्षें स्वतःच्या राजधानीपासून दूर राहिल्यामुळें दिल्लीच्या आसमंतांतील प्रदेशांत बंडाळी उद्भवून प्रांत स्वतंत्र होत असल्याच्या वार्ता महंमद तघलकाच्या कानांवर येऊं लागल्या. त्यासरशीं आनेगोंदीला एका मुस्लिम सुभेदाराची नियुक्ति करून व आपल्या सैन्याचा कांहीं विभाग त्याच्या स्वाधीन करून बादशहानें ससैन्य दिल्लीकडे प्रयाण केलें. बादशहा जातांच आनेगोंदीच्या लोकनेत्यांनीं अरण्यांतून बाहेर येऊन त्या सुभेदारावर चढाई केली. या सुभेदाराचें नांव मलिकनबी असें होतें. त्यानें घाबरून किल्ल्यांत आश्रय घेतला. पण आनेगोंदीच्या त्या स्वातंत्र्यवीरांनीं त्याचे बाहेरचे सारे मार्ग रोखून धरल्यामुळें त्याला शरण जाऊन तेथून पळ काढण्याखेरीज दुसरा मार्ग उरला नाहीं. त्यानें बादशहाला सर्व परिस्थिति कळविली. प्रजेनें परक्या मानलेल्या आपल्या सुभेदाराला हट्टानें तेथें ठेवण्यांत आपला साराच प्रदेश जाईल व विद्वेषाची आग सतत धुमसत राहिल्यानें येवढ्या संपन्न प्रदेशापासून आपला कांहींच लाभ होणार नाहीं हें ओळखून बादशहानें एक युक्ति केली. राजा जम्बुकेश्वराच्या ज्या सहा अधिकाऱ्यांना त्यानें पूर्वीं पकडून नेलें होतें त्यांना मुक्त करून त्यांतील एकाला त्यानें त्या प्रजेचा राजा केलें व इतरांना त्याचे मंत्री म्हणून त्याच्या स्वाधीन करून आपल्या वतीनें त्या प्रदेशाचा कारभार करावयास सांगितलें. स्वतःचा राजा पाहिल्यावर बंडखोर आपोआप उपशम पावतील, आपलें सार्वभौमत्व निर्बाध राहील अशी त्याची कल्पना होती. त्याची पहिली कल्पना सफल झाली पण दुसरी मात्र सफल झाली नाहीं. त्यानें जम्बुकेश्वराच्या प्रधान

मंडळांतील निवडलेला हा राजा म्हणजे विजयनगरच्या पहिल्या संगम राजवंशाचा मूळ पुरुष हरियप्प वडेयर अथवा महाराज हरिहर होय.

## संगमवंश व हरियप्प वडेयर

विजयनगरचा पहिला राजवंश चंद्रवंशीय यादवांचा असून महाराज हरिहराच्या पित्याचें नांव संगम अथवा संगमेश्वर व मातेचें नांव शारदा असें होतें. संगम या नांवामुळेंच या राजवंशाचें नांवहि संगम असें रूढ झालें. संगम अथवा संगमेश्वराच्या पित्याचें नांव बुक्क व मातेचें नांव मागाम्बिका असें होतें. हा द्वारसमुद्राच्या होयसळ राजघराण्याचा मांडलिक असून त्याचें राज्य म्हैसूर विभागांतील शिमोगा प्रांतांत होतें. पराक्रम व धर्मपरायणता यांमुळें होयसळच्या राजसभेंत राजा संगमाचें नांव चांगलेंच प्रख्यात झालेलें असून त्याचीं अनेक दानपत्रें प्रसिद्ध आहेत. त्याला पांच मुलें होतीं. त्यांतील हरिहर व बुक्कराय हे आपल्या कर्तृत्वानें दक्षिण भारताच्या इतिहासांत अमरता पावले आहेत. राजा संगम व त्याची संतति यांविषयीं पुढीलप्रमाणें उल्लेख आढळतो :--

"सोमवंश्या यतः श्लाघ्या यादवा इति विश्रुताः ।
तस्मिन् यदुकुले श्लाघ्ये सोऽभूत् श्रीसंगमेश्वरः ।।
येन पूर्वविधानेन पालिताः सकलाः प्रजाः ।
— (एपि इ. खंड नेल्लूर नं. १९ पृ, १२१)

तस्मादुदभवन् पञ्च तनयाः शौर्यशालिनः ।
कल्पावनिरुहाः पूर्व कलशाम्बुनिधेरिव ।।
आदौ हरिहरः क्ष्माभृदथ कम्पमहीपतिः ।
ततो बुक्कमहीपालः पश्चान्मारपमुदुपौ ।।
—(एपि. इ. खं. ३, पृ. २५)

( कीर्तिमान् चंद्रवंशाच्या यादव शाखेंत आपल्या प्रजेचें पूर्वीच्या धर्मपद्धतीप्रमाणें पालन करणारा संगमेश्वर नांवाचा राजा झाला.

त्याला शौर्यशाली असे पांच पुत्र झाले. क्षीरसमुद्रांतून जन्म पावलेल्या पांच कल्पवृक्षांप्रमाणेंच ते सकल मनोरथ पूर्ण करणारे होते. या महापराक्रमी मुलांचीं नांवें राजा हरिहर, राजा कम्प, बुक्कराय, मारप्प वडेयर व मुदुप्प वडेयर अशीं होतीं." राजा संगमेश्वराच्या पत्नीचें शारदा हे मूळचें नांव असलें तरी तिचा वेगवेगळ्या दानपत्रांतून मागाम्बिका, गौराम्बिका, कामाक्षी' मानाम्बिका इत्यादि वेगवेगळ्या नांवांनीं उल्लेख आढळतो. असो.

संगमेश्वराचा ज्येष्ठ पुत्र हरिहर हा काकतीय राजांच्या पदरीं आपला बंधु बुक्कराय याच्याबरोबर मोठ्या अधिकारावर होता. या दोन्ही बंधूंच्या नांवाचीं संक्षिप्त रूपें हुक्क व बुक्क अशीं आढळतात. मुसलमानी आक्रमणाच्या लाटेखालीं तें राज्य बुडाल्यावर आनेगोंदीचा राजा जम्बुकेश्वर याच्या पदरीं ते राहिले. त्यांचें शौर्य व कर्तृत्व पाहून राजा जम्बुकेश्वरानें आपल्या प्रधान-मंडळांत हरिहराची नेमणूक केली. बादशहा महंमद तघलक यानें आनेगोंदीचा राजवंश बुडवून त्याच्या हरिहरादि अमात्यांना बंदींत टाकल्यावर पुनश्च त्यानें मागें उल्लेखिलेल्या कारणास्तव हरिहराची त्या राज्यावर नेमणूक केली. दुसरें मत असें आहे कीं, जम्बुकेश्वराच्या वधानंतर हरिहर आश्रयार्थ द्वारसमुद्राच्या वीर-बल्लाळ होयसळ राजाकडे निघून गेला व पुढें मुस्लिम आक्रमणाची धाड द्वारसमुद्रावर येण्याचा संभव दिसूं लागतांच आपल्या उत्तर सीमेचें संरक्षण करण्यासाठीं राजा वीरबल्लाळानेंच हरिहराची महामंडलेश्वर म्हणून त्या विभागावर नेमणूक केली.

पण या मताचा प्रकट प्रतिवाद करून डॉ. एम. एच. कृष्ण यांनीं दि. २६-१२-३६ रोजीं हंपी येथें विजयनगर षट्शत-सांवत्सरिक उत्सवाच्या प्रसंगीं केलेल्या भाषणांत तें मत खोडून काढलें आहे. ते म्हणतात, 'हरिहर मूळ कोठचा? आनेगोंदीच्या राज्यांतील कीं होयसळांच्या राज्यांतील हा मतभेदाचा मुद्दा आहे. महंमद तघलकानें देवगिरी व तेलंगण जिंकल्यानंतर आपल्या साम्राज्याचा दख्खन हा एक सुभा निर्माण केला होता. पण त्याचा

शेजारच्या कंपिल राजाशीं तंटा सुरू झाला. कारण त्यानें महंमद तघलकाचा पुतण्या बहाउद्दीन याला आश्रय दिला होता. नंतर युद्ध झालें त्यांत कंपिल व त्याचा वीरपुत्र कुमारराम हे कामास आले. तेव्हां कंपिलाचें राज्य बुडविण्यांत आलें व त्या जागीं मलिकनबी याला सुभेदार नेमलें. परंतु तेथील प्रजेनें बंड केलें, तेव्हां तघलकानें कंपिलाचा एक मंत्री त्याच्या कैदेंत होता त्याची निवड केली व सन १३३५ च्या सुमारास नवा राजा गादीवर बसविण्यांत आला. हाच तो हरिहर होय. हा हरिहर पूर्वीं आनेगोंदीच्या राज्यांत एक अधिकारी होता. कित्येकांच्या मतें विजयनगरचे मूळ संस्थापक होयसळचे अंकित होते. परंतु मला ही गोष्ट संमत नाहीं. कारण कोणत्याहि जुन्या उल्लेखांत हरिहर व बुक्क हे स्वतःला होयसळांचे अंकित मानीत आहेत असें दिसत नाहीं.'

असो. याप्रमाणें एका वेगळ्या राजकीय विचारानें प्रेरित होऊन महंमद तघलकानें हरिहराला आपल्या वतीनें स्मशान बनलेल्या आनेगोंदीचा राजा म्हणून नियुक्त केलें. राजा जम्बुकेश्वराचा कोणीहि वारस नसल्यामुळें त्याच्या स्वातंत्र्यप्रेमी व तेजस्वी प्रजेनें पूर्वीच्या अमात्य मंडळांतीलच एकाच्या आगमनाचें स्वागत करून राजा म्हणून त्याचा स्वीकार केला. हरिहर नांवाला बादशहाकडून नियुक्त झालेला असला तरी राजा जम्बुकेश्वराचा आत्मयज्ञ व आपल्या प्रजेचें स्वाभिमानाचें प्रखर तेज याची त्याला परिपूर्ण जाणीव होती. हें दास्याचें बंधन झुगारून देऊन स्वतंत्र होण्याची त्याचीहि इच्छा होतीच. अशा स्थितींत त्याला मार्गदर्शकाची व साहाय्यकाची आवश्यकता होती. त्याचें भाग्य उजळलें. जगद्गुरु विद्यातीर्थ महेश्वरांचे महान् तपस्वी शिष्य श्रीमन्माधवाचार्य यांचा राजा हरिहराच्या जीवनांत प्रवेश झाला. त्याचें व्यक्तिजीवन धर्मसंरक्षणाच्या पवित्र ध्येयवादानें उजळलें. त्याच्या खड्गाला धर्माचें ऊर्जस्वल अधिष्ठान लाभलें. वैभवशाली हिंदुधर्मसाम्राज्याचें केन्द्र दक्षिण भारतांत प्रतिष्ठापित झालें.

## श्रीमन्माधवाचार्य व राजा हरिहर

श्रीमन्माधवाचार्य हे राजा जम्बुकेश्वराच्या आत्मार्पणानंतरच्या काळांत हम्पी येथील भुवनेश्वरीच्या मन्दिरांत धर्मरक्षणाचें सामर्थ्य प्राप्त होण्यासाठीं घोर तपश्चर्या करीत होते याचा उल्लेख मागें केलेलाच आहे. त्यांचे गुरु विद्यातीर्थ महेश्वर यांच्या प्रेरणेनें सर्व मत, पंथ, संप्रदायांच्या एकीकरणाचें कार्य दक्षिणेंत यापूर्वींच सुरू झालें असल्याचाही उल्लेख मागें केलाच आहे. धर्माचें राज्यसिंहासन अस्तित्वांत आल्यावांचून व त्याच्या द्वारें यावनी सत्तेचे अवशेष दक्षिणेंतून पूर्णपणें खणून काढल्यावांचून धर्मसंरक्षण खऱ्या अर्थानें होण्याची शक्यता नाहीं हें स्वतः माधवाचार्य व त्यांचे गुरु पूज्यपाद विद्यातीर्थ महेश्वर जाणून होते. राजा जम्बुकेश्वराच्या वधानंतर कोणत्याहि प्रकारें कच न खातां महंमद तघलकासारख्या क्रूरकर्म्याशीं वर्षानुवर्षें लढत राहून शेवटीं त्याच्या सुभेदाराला पळवून लावण्याचा जो विक्रम व प्रखर स्वाभिमान तेथील प्रजेनें प्रकट केला होता त्यावर दीर्घदर्शी माधवाचार्य अत्यंत प्रसन्न झाले. जेथें मूळ स्वाभिमानाचेंच भस्म झालें असेल तेथें कोण काय करणार? पण तो जेथें प्रखर स्वरूपांत असेल तेथें त्यावर फुंकर घालून आपल्या बुद्धिशक्तीनें नवें विश्व निर्माण करतां येईल असें त्यांना वाटलें. राजा हरिहराला हाताशीं धरून माधवाचार्यांनीं, खालीं धगधगीत असलेल्या जम्बुकेश्वराच्या विजयनगरच्या राखेंतून नवें विश्व घडवावयास प्रारंभ केला.

### रूपककथेचा उलगडा

स्वतः माधवाचार्यांनींच आपल्या **कालज्ञान** या ग्रंथांत हरिहराची व त्यांची भेट कशी झाली व त्यांतून विजयनगरच्या स्थापनेची घटना कशी घडून आली याचें रूपककथेच्या आश्रयानें वर्णन केलें आहे, तें पुढीलप्रमाणें :--

तुंगभद्रानदीतीरे हस्तिकोणाह्वये पुरे।
निवसन्तौ कदाचित्तौ मृगयागमनोत्सुकौ ।।
तुंगभद्रां नदीं तीर्त्वा दक्षिणे दिग्विभागके।
विपिने तु परिश्रान्तं दृष्ट्वा क्षुद्रं मृगं पुनः ।।
शशस्य ग्रहणार्थाय भटाः श्वानचयं ततः।
अमुञ्चंस्तेष्वभिग्रस्तो मृगस्तानभ्यदुद्रुवत् ।।
प्रपलाय्य गताः श्वानाः स मृगोऽन्तर्दधे पुनः।
तदाश्चर्यं मन्यमाना मृगयाजीविनो भटाः ।
भूपालयोः समाचख्युः तद्वृत्तान्तं तु तत्र तौ ।।
विज्ञापयत आर्याय गुरवे विश्रुताय च।
विद्यारण्याय मुनये वेदव्यासकृपावते ।।
तच्छ्रुत्वा वचनं योगी समायातस्तदन्वितः।
तां स्थलीं स समीक्ष्याथ राजधानीं महीभुजः ।।
तद्वंशजानामन्येषां कर्तुमेवोपचक्रमे।
धात्रब्दे सितसप्तम्यां वैशाखे मासि भास्करे ।।
दिक्संख्यायुक्तबाणाद्विचन्द्रयुक्तशकान्विते।
रचिता नगरी रम्या पुरुषाकृतिशालिनी ।।

— (विद्यारण्यकृत कालज्ञान)

(हरिहर व बुक्कराय हे तुंगभद्रा नदीच्या तीरावरील आनेगोंदी येथें राज्य करीत असतां एकदां मृगयेसाठीं ते तुंगभद्रा ओलांडून दक्षिण तीरावरील अरण्यांत गेले. तेथें एक ससा पाहून त्यांनीं आपले शिकारी कुत्रे सशावर सोडले. तों एक विलक्षण चमत्कार त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आला. तो चमत्कार असा कीं, सशानें पळून न जातां त्या कुत्र्यांच्यावर उलटून त्यांना जोरजोरानें असे चावे घेतले कीं तीं सारीं शिकारीं कुत्रीं पार पळून गेलीं. राजाबरोबरच्या शिकाऱ्यांनीं तो चमत्कार राजाला सांगितला. त्याबरोबर राजानें स्वतःहि ती परीक्षा पाहून तें एक विलक्षण आश्चर्य स्वतःचे गुरु जे वेदव्यासांचें कृपापात्र श्रीमन्-माधवाचार्य त्यांना हा चमत्कार सांगितला. माधवाचार्य यांनीं ती

अद्भुत जागा स्वत: पाहण्याची इच्छा दर्शविली, व त्या जागेची पहाणी करून त्यांनीं राजा हरिहराला तेथेंच स्वत:ची राजधानी करावयास सांगितलें; व तदनुसार शालिवाहन शके १२५८ धातुनामसंवत्सर वैशाख शुद्ध सप्तमी, मघा नक्षत्रावर भव्य अशा विजयनगरची स्थापना करण्यांत आली.)

येथें ससा आणि शिकारी कुत्रा हें रूपक अत्याचारी मुसलमानी आक्रमकांसमोर गोगलगाय बनलेला दक्षिणेंतील हिंदू समाज व आक्रमक मुसलमान समाज यांवरील रूपक आहे हें सहज उलगडण्यासारखें आहे. शिकारी कुत्रा ज्याप्रमाणें नेहमींच सशाची शिकार करतो व ससा नेहमींच एक तर पळून तरी जातो अथवा शिकारी कुत्र्याच्या हातून मृत्युमुखीं तरी पडतो, त्याप्रमाणें हिंदूंची तत्कालीन अवस्था होती हें मागें साधार दिग्दर्शित केलेंच आहे. अशा स्थितींत जम्बुकेश्वराच्या निधनानंतर आपला स्वातंत्र्य-संघर्ष अखड चालवून मलिकनबी या महंमद तघलकाच्या सुभेदाराला हुसकून लावण्याचें जें तेज त्याच्या प्रजाजनांनीं म्हणजेच तेथील हिंदूंनीं प्रकट केलें, तें सशानें शिकारी कुत्र्यांना पळवून लावण्याइतकेंच आश्चर्यजनक व स्तिमित करून सोडणारें होतें. माधवाचार्यांनीं हा चमत्कार पाहिला व धर्मासाठीं आवश्यक तें शक्तिकेन्द्र निर्माण करावयास हाच योग्य प्रदेश आहे हें ओळखून राजा हरिहराच्या आकांक्षेला पल्लवित केलें व अंकितत्व झुगारून देऊन व स्वतंत्र होऊन धर्मराज्याच्या प्रतिष्ठापनेची प्रेरणा दिली. जुन्या विजयनगरचेंच त्यांनीं पुनरुज्जीवन केलें. आपल्या या विद्यानिधि मार्गदर्शकाच्या अथवा गुरूच्या स्मरणार्थ राजा हरिहरानें या प्राचीन नगराचें नांव विद्यानगर असें ठेविलें व माधवाचार्यांनींच आपलें प्रधानमंत्रिपद स्वीकारून धर्मसाम्राज्याचें त्यांनींच चित्रित केलेलें हें सुवर्णस्वप्न साकार करण्यासाठीं प्रत्यक्ष साहाय्यक होण्याची त्यांना प्रार्थना केली. माधवाचार्यांनीं मंत्रिपदाची धुरा आपल्या स्कंधावर घेतली. जगद्गुरु विद्यातीर्थ महेश्वरांची तपस्या व शृंगेरीचें सामर्थ्य यामुळें आपोआपच या महान् प्रयत्नांच्या पाठीशीं उभें राहिलें.

## महामात्य माधवाचार्य

महामात्य माधवाचार्यांनीं हरिहराचें राज्य प्रथम स्थिरपद करून दक्षिणेंतील नष्ट झालेल्या छोट्या मोठ्या हिंदू राज्यांतील व्यवसायहीनतेमुळें भटकणाऱ्या लढवय्यांना व सैनिकांना आपल्या राज्यांत उदार आश्रय देऊन त्यांची सैन्यांत भरती करण्याचा उपक्रम प्रारंभ केला. त्यामुळें राजा हरिहराचें सैन्यबळ चांगलेंच वाढलें. आपले विश्वासू दूत ठिकठिकाणीं मुसलमानी आक्रमणामुळें खिळखिळ्या झालेल्या व नाममात्र उरलेल्या वारंगळ, देवगिरी, पांड्य, चोल इत्यादि राजवंशाकडे व त्या त्या राजवंशाच्या परिसरांतील सरदार, सुभेदार व इतर तोलाच्या लोकांकडे पाठवून त्यांना धर्मराज्याच्या प्रतिष्ठापनेसाठीं बद्धपरिकर झालेल्या हरिहराच्या ध्वजाखालीं येण्याविषयीं त्यांनीं आवाहन केलें. मलिकनबी सुभेदाराला दक्षिण भारतांतून हाकलून लावण्यासाठीं राजा जम्बुकेश्वराच्या प्रजाजनांनीं जी उठावणी केली तिच्यांत माधवाचार्यांचा हात होता असें एक मत आहे. राजा हरिहराला नव्या राजधानींतील राजसिंहासनावर प्रतिष्ठापित करतांना गोब्राह्मणप्रतिपालनाचा म्हणजे धर्मरक्षणाचाच ध्येयवाद त्यांच्या डोळ्यांसमोर होता व त्यासाठींच ही मंत्रिपदाची धुरा त्यांनीं पत्करलेली होती. या दृष्टीनें पुढील उल्लेख मनन करण्यासारखा आहे.

पंपातीरनिवासश्रीविरूपाक्षप्रसादतः ।
तपोबलेन लोकानामनुग्रहविधित्सया ।।
निर्माय विद्यानगरं नृपं हरिहराभिधम् ।
गोदेवद्विजरक्षार्थमभ्यषिञ्चन्नृपासने ।।

—(एपि. इं. खण्ड ३६, शृंगेरी ११, पृ. ३६२)

(पम्पा तीरावर निवास करणाऱ्या भगवान् श्रीविरूपाक्ष देवाच्या कृपाप्रसादानें, तपोबलानें, लोककल्याणाच्या हेतूनें श्रीमत्

गाधवाचार्यांनीं विद्यानगराची प्राणप्रतिष्ठा करून त्या ठिकाणीं गाई, देव व ब्राह्मण यांच्या संरक्षणार्थ हरिहर नांवाच्या राजाला राज्याभिषेक केला.) याप्रमाणें हरिहराचाराज्यविस्तार हा या आवाहनाचा हेतु नसून स्वदेश व स्वधर्माचें संरक्षण हा त्याचा हेतु असल्यामुळें संकटाची झळ लागलेल्या या राजवंशानें या आवहानाचें स्वागत केलें, व साऱ्या दक्षिणेंत संघधर्माच्या या मृत्युंजय महामंत्राचा प्रभाव दिसूं लागला. संघधर्माची जणीव नसल्यामुळेंच हिंदूंचा वारंवार पराभव होत होता हें मागें दाखविलेंच आहे. या धर्माचा प्रखर प्रकाश पसरूं लागतांच माधवाचार्यांच्या नेतृत्वाखालीं हें हिंदू धर्मराज्य वेगानें विजयी, विशाल व समर्थ साम्राज्यांत परिणत होऊं लागलें. कर्नाटकांतील कलादगीपर्यंतचा प्रदेश अधीन करून त्याच्या रस्क्षणासाठीं बादामीचा दुर्ग बांधण्याचें कार्य विजयनगरच्या संस्थापनेनंतर पहिल्या चार वर्षांतील आहे. इ. स. १३३८ सालीं दक्षिण कानडा प्रांतावर स्वारी करून हरिहरानें पश्चिम समुद्रापर्यंत आपला प्रभाव गाजविला. इ. स. १३४२ सालीं होनावरचा यवन सुभेदार जलालुद्दीन याच्या छातीवर हरिहराचा धाकटा भाऊ मारप्पा वडेयर याचें खड्ग रोखलें जातांच त्यानें दिल्लीपतीचें अंकितत्व सोडून विजयनगरचें मांडलिकत्व स्वीकारलें. त्यामुळें दक्षिण कानडाचा मंगळूरपर्यंतचा सर्व भाग विजयनगरच्या आधिपत्याखालीं आला. लवकरच वरंगळवर आक्रमण करून राजा हरिहरानें तेथील मुसलमान सुभेदार इम्मद-उल्-मुल्क याचा पराभव करून त्याला हाकलून दिलें व इस्लामियांनीं बळानें घशांत घातलेला तो प्रांत विजयनगरच्या साम्राज्यांत समाविष्ट केला. मदुरेचा सुभेदार ग्यासुद्दीन याच्याशीं झालेल्या युद्धांत द्वारसमुद्रचा होयसळ राजवंश संपूर्णपणें नष्ट झाल्यामुळें तें राज्य माधवाचार्यांच्या प्रयत्नानें विजयनगरच्या साम्राज्यांत समाविष्ट करण्यांत येऊन त्याचें प्रांताधिपत्व हरिहराचा धाकटा बंधु प्रौढप्रताप बुक्कराय याला देण्यांत आलें. याप्रमाणें कोलार, अनंतपूर, म्हैसूर, चित्रदुर्ग, कडूर, शिमोगा इत्यादि अनेक विभाग विजयनगरच्या राज्यांत

समाविष्ट होऊन हिंदूंची प्रबल मध्यवर्ती सत्ता निर्माण करण्यांत माधवाचार्यांनीं यश मिळविलें. जे ध्येयवादी होते ते स्वयंप्रेरणेनें या कार्यांत समाविष्ट झाले व जे स्वार्थवादी नि महत्कार्याचें महत्त्व न ओळखणारे होते त्यांना खड्गबळानें दमवून अभेद्य आघाडी निर्माण करण्यांत अमात्य माधव यशस्वी झाले.

## दिल्लीपतीचा पराभव

विजयनगरचें हें नवोदित धर्मराज्य याप्रमाणें बद्धमूल होत असतांना त्याच्यावर एक महान् आपत्ति येऊन कोसळली. प्रत्येकच संघर्षप्रधान महत्कार्याला या प्रसंगांतून जाण्याचें दिव्य पत्करावेंच लागतें. वरंगळचा मुसलमान सुभेदार इम्मद-उल-मुल्क याचा पराभव करून त्याचा प्रदेश विजयनगरनें जिंकून घेतल्याचा उल्लेख मागें केलाच आहे. हा इस्लामी सुभेदार पराभूत होऊन दौलताबादला (देवगिरीला) पळून गेला व तेथून त्यानें दिल्लीच्या बादशहाला हरिहर स्वतंत्र होऊन आपलें राज्य दृढमूल करीत असल्याची व दक्षिणेंतून इस्लामी सत्ता संपूर्णपणें उखडून टाकण्याचा त्याचा प्रयत्न मूळ धरूं लागल्याची वार्ता कळविली. ही वार्ता येतांच मोठें सैन्य बरोबर घेऊन, या चिमुकल्या राज्याला पूर्णपणें धुळीस मिळविण्यासाठीं दिल्लीपति महम्मद तघलक विजयनगरवर चालून आला. बादशहा चालून येतांच हरिहरानेंहि त्याच्याशीं धडक दिली. या युद्धांत चंचल जयश्रीनें हरिहराला विजयाची माळ घातली. व तो जो आजवर दिल्लीपतीचा नांवाला तरी 'महामंडलेश्वर' होता त्याऐवजीं स्वतंत्र राजा झाला. त्याच्या या विजयाचें वर्णन पुढीलप्रमाणें आढळतें :--

तत्र राजा हरिहरो धरणीमशिषाच्चिरम् ।<br>
सुत्राम सदृशो येन सुरत्राणः पराजितः ।।

—(एपि. इंडिका, खं. ३, २४)

(राजा हरिहराचें काय वर्णन करावें ? त्यानें महेन्द्रासारख्या सुलतानाचा देखील पराभव केला.) या महान् विजयानंतर

२७३ ५ १२ ७१ ४९/८

शृंगेरीला जाऊन त्यानें आपल्या बंधूंसह त्या पीठाची पूजा केली व त्यांच्या साहाय्याविषयींच्या कृतज्ञताबुद्धीनें मागच्या प्रकरणांत उल्लेखिलेलें अग्रहारांचें मोठें दानपत्र आचार्यपीठाला समर्पण केलें. हंपी येथील भगवान् श्रीविरूपाक्ष हें हरिहराचें कुलदैवत होतें. राजाचें राजपत्रांवरील हस्ताक्षर 'श्री विरूपाक्ष' असें लिहिण्यांत येई. या विजयाच्या स्मरणार्थ विरूपाक्ष मंदिराचा जीर्णोद्धार करून हरिहरानें तें मोठ्या भव्य व आकर्षक स्वरूपांत बांधलें. विजयनगरचें राजचिन्ह वराह हें असून राजमुद्रेवर व नाण्यांवर त्याचा ठसा असे. यज्ञवराहानें हिरण्याक्षाचा वध करून दैत्यांच्या अधीन असलेल्या पृथ्वीचा उद्धार केला व दैत्याधीन झालेल्या भरतभूमीचा पुनरुद्धार करण्यासाठींच विजयनगरचें खड्ग उपसण्यांत आलें होतें. त्यामुळें हें राजचिन्ह अत्यंत अन्वर्थ होतें हें सांगावयास नकोच. राजा हरिहराचे तिघेहि बंधु पराक्रमी असून राज्यविस्तारास त्यांचें फार मोठें साह्य झालें आहे. महाराज बुक्काचा यापूर्वी उल्लेख केलाच आहे. तिसरा भाऊ कंपण्ण ओडेयर यानें मन्मेयदेव याचा पराभव करून उदयगिरीचा महत्त्वाचा दुर्ग व नेल्लूर व कडाप्पा हे प्रदेश विजयगनरला जोडले. इतर ठिकाणीं नाकेबंदी झाल्यामुळें वरंगळहून मुसलमान पूर्वेच्या रोखानें नेल्लूर प्रांतांतून उदयगिरीवरून दक्षिणेंत उतरत असत. तेथील राजा मन्मेयदेव हा अत्यंत दुबळा असून यावनी लाट अडविण्याचें त्याच्यांत सामर्थ्य नव्हतें. त्यामुळें स्वतःच्या राज्याच्या संरक्षणासाठीं त्यानें या आक्रमक मुसलमानांचा मार्ग रोखून न धरतां त्यांच्याशीं साहाय्यकाच्या धोरणानें वागावयास प्रारंभ केला. दक्षिणेंतील हिंदू पुनरुत्थानाला हें मोठेंच संकट असल्यामुळें उदयगिरी स्वाधीन करून घेणें ही राजकीय दृष्टीनें अत्यावश्यकच गोष्ट होती. कम्पानें उदयगिरी अधीन होतांच उदयगिरीवर एक प्रबल सैन्याचा भाग सदाचा ठेवून पूर्वेकडून येणारा मुस्लिम आक्रमणाचा ओघ सदाचा रोखून धरला. श्रीमन्माधवाचार्यांचे धाकटे बंधु प्रसिद्ध वेदभाष्यकार सायणाचार्य हे या कंपाचे अमात्य होते. आपल्या

जगद्विख्यात बंधूप्रमाणें सायणाचार्य हे महापंडित व राजनीतिधुरंधर तर होतेच; पण खड्ग गाजविणारे पराक्रमी वीरहि होते. उदयगिरीवर चालून येणाऱ्या अनेक आक्रमकांची त्यांनीं खोडकी जिरविली. चोल नरेश चम्प अथवा शंभुवराय याचा पराभव करून त्यांनीं जो आपला प्रताप प्रकट केला त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें आढळतें :—

> जगद्वीरस्य जार्गात कृपाणः सायणप्रभोः ।
> किमित्येते वृथाटोपा गर्जन्ति परिपन्थिनः ।।
> दिष्टया दैष्टिकभावसंभृतमहः सम्पद्विशेषोदयम् ।
> जित्वा चम्पनरेन्द्रमूर्जितयशाः प्रत्यागतः सायणः ।।

(जगद्वीर सायणाच्या हातांत तळपतें खड्ग असतांना शत्रूंनीं कितीहि कंठशोष केला तरी त्याचा काय उपयोग होणार ? संपत्तीनें मदांध झालेल्या महाराज चम्पाचा पराभव करून विख्यात कीर्ति सायणाचार्य परतले.) कम्पराज व त्याचा पुत्र संगमराय या दोहोंचेहि सायणाचार्य मंत्री होते.

हरिहराच्या या स्वातंत्र्यप्रयत्नाच्या वेळींच या नवोदित धर्मराज्याला दक्षिणेंतच एक सदाचें संकट उपस्थित झालें होतें व तें म्हणजे बहामनी राज्याचें होय. इ. स. १३४७ मध्यें महंमद तघलकाविरुद्ध दक्षिणेंतील मुसलमान सरदारांनीं जीं बंडें केलीं त्यांत या राज्याचा उदय झाला. गुलबर्गा येथें त्याची राजधानी होती. पहिला सुलतान अल्लाउद्दीन हसन यानें दिल्लीपतीचा जो प्रदेश हरिहरानें आपल्या राज्यास जोडलेला होता त्यावर आपला अधिकार सांगावयास प्रारंभ केला. हा अधिकार प्रस्थापित करण्यासाठीं भीमा नदी उतरून त्यानें विजयनगरच्या प्रदेशावर आक्रमण केलें. कृष्णेच्या उत्तरेचा कांहीं प्रदेश तोडून देऊन दाननीतीनें माधवाचार्यांनीं हें संकट टाळलें. इ. स. १३५५ सालीं हरिहर कालवश होऊन त्याचा विक्रमशाली व कर्तृत्ववान् बंधु बुक्कराय हा विजयनगरच्या सिंहासनावर आला. अकुमलच्या शिलालेखांत हरिहराचें पुढीलप्रमाणें वर्णन आढळतें :—

यत्पादः परराजरत्नमुकुटी सघांतजांघाळिको ।
यत्पाणिर्नवपारिजातसुषमापांडित्यवैतंडिकः ।।
यन्मूर्तिः करुणापयोधिलहरी माधूर्यसूर्योदयः ।
तस्मै हरिहरभूपतेरणविदे तिष्ठेत कः पार्थिवः ।।

हरिहराच्या निधनानंतर महामात्य माधवाचार्य कांहीं काळ निवृत्त होऊन वाराणशीला जाऊन राहिले होते.

## बुक्कराय व माधवाचार्य

बुक्कराय गादीवर येतांच त्याला माधवाचार्यांची निवृत्ति चांगलीच जाणवली. व त्यानें शृंगेरीचे तत्कालीन पीठस्थ आचार्य श्री भारतीतीर्थ यांना मध्यस्थी घालून वाराणशीहून माधवाचार्यांना पुनश्च मंत्रिपद स्वीकारावयास बोलावून घेतलें. श्रीमन्माधवाचार्य आतां वृद्ध झाले होते. पण बुक्करायाच्या आग्रहासाठीं त्यांनीं मंत्रिपदाचा स्वीकार केला. दहा वर्षेपर्यंत म्हणजे इ. स. १३६५ पर्यंत त्यांनीं ही मंत्रिपदाची धुरा संभाळली. बुक्कराय गादीवर येण्याच्या वेळीं राज्यांत जे अंतर्गत कलह होते त्यांची नीट व्यवस्था करून त्यानें राज्यविस्ताराकडे आपली दृष्टि वळविली. इ. स. १३५८ मध्यें त्यानें मलबारवर सैन्य पाठवून तेथील लहरी राजा कुर्बत हसन कांगू याचा पराभव केला, व त्याचा प्रदेश विजय-नगरच्या साम्राज्यांत समाविष्ट केला. बुक्काचा हा विजय पाहून व आपण महामात्याच्या अधिकारपदावर राहणें इष्ट नाहीं असें ठरवून माधवाचार्यांनीं आपले धाकटे बंधु वेदभाष्यकार सायणाचार्य यांच्याकडे मंत्रिपद सोपवून ते राजकारणनिवृत्त झाले. इ. स. १३६५ या वर्षीं भारतीय ब्राह्मण्याच्या तत्त्वास अनुसरून माधवा-चार्यांनीं यापुढचा आपला काळ ग्रंथलेखन व सायणाचार्यांच्या अलौकिक ग्रंथांचें समालोचन या कार्यांत घालविला. लवकरच बुक्करायाच्या मंत्रिमंडळांत एका महाप्रतापी पुरुषाला समाविष्ट करून घेण्यांत आलें. तो प्रथम, बुक्काचा धाकटा बंधू मारप्पवडेयर

याचा अमात्य होता. या प्रतापी पुरुषाचें नांव माधवमंत्री. याचें वृत्त यापूर्वी दिलेंच आहे. श्रीमन्माधवाचार्य वयाच्या ७० व्या वर्षी स्वेच्छेनें मंत्रिपदावरून निवृत्त झाले. पुढच्या दहा वर्षांचा काळ त्यांनीं स्वस्थ चित्तानें विशुद्ध ज्ञानोपासनेंत घालविला. त्यानंतर इ. स. १३८० मध्यें श्रीशंकरानंद यतीकडून वयाच्या ८५ व्या वर्षी विधिपूर्वक संन्यासदीक्षा ग्रहण करून ते विद्यारण्य-मुनि या अभिधानानें शृंगेरीच्या आचार्यपीठावर अधिष्ठित झाले. बुक्करायाचे पराक्रम व विजयनगरच्या धर्मसाम्राज्याचा विकास ते पहात होते. शृंगेरीचें नैतिक अधिष्ठान या सिंहासनाला त्यांच्या रूपानें प्राप्त झालें होतें.

इ. स. १३५५ ते १३७६ हा बुक्करायाचा राज्यकाल होय. इ. स. १३६६ मध्यें म्हणजे माधवाचार्यांच्या निवृत्तीनंतर एकच वर्षानें कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील कांहीं किल्ल्यांच्या संबंधांत त्याचा बहामनी सुलतान महंमदशहा याच्याशीं कलह सुरूं झाला. बुक्करायानें सुलतानावर आक्रमण करून मुद्गलवर विजय मिळविला. सुलतान महंमदशहाचेंही सैन्यबळ भक्कम होतें. तो मुद्गलजवळ सैन्याची छावणी करून राहिला. पुढें पाऊस पडून सर्व प्रदेश युद्धास निरुपयोगीझाल्यामुळें बुक्करायाला अदोनीपर्यंत माघार घेणें भाग पडलें. इ. स. १३६६ च्या जुलै महिन्यांत अदोनी येथें या दोन प्रबल सत्ताधीपांचें भयंकर युद्ध होऊन त्यांत शेवटीं बहामनी सुलतान विजयी झाला. सुलतानानें विजयनगरपर्यंत बुक्करायाचा पाठलाग करून विजयनगरला वेढा दिला. एक महिनापर्यंत हा वेढा चालू होता. पण राजधानी अभेद्य आहे असा सुलतानाला प्रत्यय आला. राजधानीवरील हें संकट लवकर दूर व्हावें असें बुक्करायालाहि वाटत होतें; व मिळालेला विजय सन्मानानें घेऊन जावें अशा मनोवृत्तींत सुलतानहि आलेला होता. एक महिन्याच्या वेढयानें तोहि टेकीस आलेलाच होता. शेवटीं बुक्करायाकडून त्याला बरीच मोठी रक्कम देण्याचें आश्वासन मिळालें, व तेवढया-वर संधि होऊन सुलतान वेढा उठवून निघून गेला.

या वेळीं दक्षिणेंत तुंगभद्रेपासून दक्षिणेकडचा प्रदेश यावनी लांछनापासून विमुक्त झालेला होता. एकच शल्य उरलेलें होतें व तें म्हणजे मदुरेचें इस्लामी राज्य होय. तेथील सुलतान अल्लाउद्दीन शिकंदर हा जसा अत्याचारी, तसाच पराक्रमीहि होता. सत्तेच्या दृष्टीनें संपूर्ण दक्षिणेंतून अत्याचारी यवनांचें निर्मूलन करावयास्तव कटिबद्ध झालेल्या बुक्कानें या सुलतानाचें पारिपत्य करण्याच्या कामीं आपला मुलगा कम्प अथवा कम्पराय याची नियुक्ति केली. कम्प त्या वेळीं कोलार प्रांताचा प्रांताधिप असून तो मूळवागल येथें रहात असे. त्याच्याबरोबर मोठी प्रबल सेना व स्वतःचे गोपण्ण ओडेयर व मंगप्पा दन्नायक हे दोन प्रबल सेनापतीहि बुक्कानें दिले. कम्पानें प्रथम हिंदू बंडखोरांचा समाचार घेऊन त्यांना नमविलें. कांजीवरम्चा चोल राजा शंभुवराय व वन्यराज हे ते बंडखोर हिंदू सामंत होत. या बंडखोरांना चेंचून काढल्या-नंतर कम्परायानें मदुरेवर आक्रमण केलें. तेथें झालेल्या भयंकर रणकंदनांत कंपाचा सेनापति मंगाप्पा यानें सुलतान अल्लाउद्दीन शिकंदर याला कंठस्नान घालून वीरबल्लाळाच्या वधाचा सूड उगविला व मुसलमानी सत्तेचीं पाळेंमुळें खणून काढून तो प्रदेश विजयनगरच्या साम्राज्यांत समाविष्ट केला. तात्पर्य, इ. स. १३२४ सालीं मुसलमानांच्या घशांत गेलेली मदुरा इ. स. १३७१ सालीं विमुक्त झाली. तेथील भव्य राजप्रासादावर व हिंदुमंदिरांच्या वैभवशाली शिखरांवर हिंदूंचा राष्ट्रध्वज डौलानें फडकूं लागला. मदुरेंतील सुभव्य मंदिरांतील पूजाअर्चा बंद पाडून यवनांनीं देवळांना कुलुपें ठोकलीं होतीं. कंपरायानें तीं तोडून काढून पुन्हा तेथील पूजाअर्चा प्रारंभ केल्या. शंखांच्या गंभीर नादानें वातावरण पुन्हा निनादित झालें व हिंदुधर्मसंस्थेला नवचैतन्य मिळालें. यवनांनीं जप्त केलेली हिंदुमंदिरांची भूसंपत्ति कंपरायानें मोकळी केली. मदुरा मुक्त झाली तरी श्रीरंगपट्टण अजून यवनांच्या मिठींत होतें. तें श्रीवैष्णव धर्माचें मूळपीठ असल्यामुळें हिंदूंच्या दृष्टीनें त्याचें अतोनात महत्त्व होतें. इ. स. १३२७ मध्यें मदुरेच्या

सुलतानानें तें जिकल्यावर तेथील श्रीरंगनाथाच्या मूर्तीचा विध्वंस होईल हें ओळखून वैष्णवांनीं ती मूर्ति तिरुपति येथें सुरक्षित ठेवली होती. मदुरा-विजयानंतर कंपरायाचे सेनापति गोपणार्य हे श्रीरंगपट्टणवर चालून गेले व मुस्लिम सत्तेचा कलंक पूर्णपणें नष्ट करून श्रीरंगपट्टण त्यांनीं मुक्त केलें. तिरुपतीहून रंगनाथाची मूर्ति परत आणून तिची पुनश्च श्रीरंगपट्टणला स्थापना करण्यांत आली. कांहीं दिवस कंपरायानें त्या विभागांत निवास करून दक्षिण दिग्विजय पूर्ण केला. विजयनगरची विजयी सेना दक्षिण समुद्रास जाऊन भिडली. महामात्य माधवाचार्यांचें स्वप्न पूर्ण झालें. दक्षिणेंत यवनांचें पुसटतें सुद्धां पदचिन्ह राहिलें नाहीं. जें सुवर्ण-स्वप्न साकारलेलें प्रत्यक्ष पाहण्यासाठीं विद्यातीर्थ महेश्वरांची तपस्या व माधवाचार्यांचें कर्तृत्व खर्ची पडलें तें या दक्षिण दिग्विजयानें संपूर्णपणें प्रत्यक्षांत आलेलें पाहून राजकारणनिवृत्त वृद्ध माधवाचार्यांच्या डोळ्यांत केवढे आनंदाश्रू तरळले असतील! श्रीरंगपट्टणच्या श्रीरंगनाथमंदिराच्या महाद्वारावर गोपणार्याचा हा वैभवशाली विक्रम पुढीलप्रमाणें शिलाटंकित केलेला आजहि पहावयास मिळतो :—

आनीयानीलशृंगद्युतिरचितजगद्रञ्जनादञ्जनाद्रेः ।
चेज्ज्रामाराध्य कंचित् समयमथ निहत्योड्वनुष्कान् तुरुष्कान् ॥
लक्ष्मीक्ष्माभ्यामुभाभ्यां सह निजनिलये स्थापयन् रंगनाथम् ।
सम्यग्वर्यां सपर्यां कुरुत निजयशो दर्पणो गोपणार्यः ॥
—(एपि. इंडिका, खंड ६ वा, नं. ३३, पृ. ३२३)

(तिरुपतीहून श्रीरंगनाथाला आणून श्रीदेवी, व भूदेवीसहित-त्याचीपुनः प्रतिष्ठापना करून श्रीगोपणार्यानें आपलें यश प्रतिष्ठापित केलें आहे.) इ. स. १३७३ मध्यें कंपराय दक्षिणदिग्विजय करून परत आल्यावर त्याचें राजधानींत केवढें भव्य स्वागत झालें असेल ! कंपरायाची पत्नी गंगदेवी ही आचार्य त्र्यंबक क्रियाशक्तीची शिष्या असून महापंडिता व सिद्धहस्त कवयित्री होती. तिनें

आपल्या पतीच्या या दक्षिण दिग्विजयावर 'मदुराविजयम्' या नांवाचें एक उत्कृष्ट काव्य लिहिलेलें आहे. या काव्यांत आपल्या श्वशुराची राजधानी असलेल्या विजयनगरचें या राजस्नुषेनें जें हृदयंगम वर्णन केलेलें आहे त्यावरून तिच्या कल्पनाविलासाच्या उत्तुंगतेची जशी कल्पना येते, तशीच विजयनगरच्या भौतिक व सांस्कृतिक वैभवाचीहि कल्पना येते. उदाहरणार्थ पुढील वर्णन पहा :—

"तस्यासीद्विजया नाम विजयार्जितसम्पदः।
राजधानी बुधैः श्लाघ्या शक्रस्येवामरावती ।।
सुरलोकान्तसंक्रान्तस्वर्णदी मत्सरादिव।
परिखाता महो यान्त्या परीता तुङ्गभद्रया ।।
लक्ष्मीलतालवालेन क्ष्मावधूनाभिशोभिना।
चक्राचलप्रकारेण प्राकारेण परिष्कृता ।।
स्फुरन्मणिप्रभाहूतपुरुहूतशरासनैः।
सुमेरुशृंगसंकाशैः गोपुरैरुपशोभिता ।।
उत्फुल्लचम्पकाशोकनागकेसरकेसरैः।
वसंतवासभवनैरारामैरभितो वृता ।।
कस्तूरीहरिणाक्रान्तकर्पूरकदलीतलैः।
मनोभवमहादुर्गैः महिताकेलिपर्वतैः ।।
कमलामोदमधुरैः कलहंसकुलाकुलैः।
क्रीडासरोभिः सहिता मणिसोपानमञ्जुलैः ।।
यशस्तोमैरिवाशेषनगरी विजयार्जितैः।
सौधैः प्रकाशितोत्सेधा शरदम्भोदपाण्डुरैः ।।
विकसद्वनितावल्ली विलासवनवाटिका।
दक्षिणाशा सरोजाक्षी फाललीलाललाटिका ।।
द्विजराजसमुल्लासनित्यराकानिशीथिनी ।
गन्धर्वगणसान्निध्यनव्यदिव्यवरुथिनी ।।
भुजंगसंवसंवासभूतेशमुकुटस्थली ।
सुमनस्तोमसंचारसुवर्णगिरिमेखला ।।

लीलेव दृष्टिवृद्धीनां शालेव सकलश्रियाम् ।
मालेव सर्वरत्नानां वेलेव सुकृतांबुधेः ॥
यस्यां प्रासादशृंगेषु लग्नं मार्तण्डमण्डलम् ।
संधत्ते वीक्ष्यमाणानां सौवर्णकलशभ्रमम् ॥
यत्सौधचंद्रशालासु विहरन्त्यो मृगेक्षणाः ।
शशांकमवलम्बन्ते मुक्ताकंदुकशंकया ॥
यत्र सौधेषु संगीतमृदंगप्रतिनादिषु ।
अकाण्डे ताण्डवारम्भं वितन्वन्ति शिखण्डिनः ॥
पद्मरागोपलोत्कीर्णप्रासादप्रान्तवर्तिनः ।
सन्ततं यत्र दृश्यन्ते सान्ध्या इव बलाहकाः ॥
सन्ध्यासु यत्र निर्यान्ति जालेभ्यो धूपराजयः ।
अन्तः प्रदीपिकालोकचकितध्वान्तसन्निभाः ॥
यद्दीर्घिकासु माणिक्यमयसोपानचारिभिः ।
क्षणदास्वपि चक्राह्वैः विरहो नानुभूयते ॥
यदङ्गनामुखाम्भोजलावण्यालाभलज्जितः ।
कलङ्कच्छद्मना चन्द्रो व्यनक्ति हृदयव्यथाम् ॥
यत्र स्त्रीणां कटाक्षेषु यूनां हृदयहारिषु ।
पुष्पास्त्रसंचये वाञ्छं मुञ्चते पञ्चसायकः ॥
मरालैः मञ्जुमञ्जीरशिञ्जिताकृष्टमानसैः ।
लीलागतिमिव प्राप्तुं सेव्यन्ते यत्र योषितः ॥
यत्रावलग्नसादृश्यं वाञ्छाविमतमम्बरम् ।
प्रायः पयोधरोत्सेधैः निरुन्धन्ति पुरन्ध्रयः ॥
यत्र वामभ्रुवामेव काठिन्यं स्तनमण्डले ।
कौटिल्यं कबरीभारे कार्श्यं मध्ये च दृश्यते ॥ ”

—(मदुराविजयम्, IV V. 43)

( त्या श्री बुक्करायाची महेन्द्राच्या अमरावतीप्रमाणें भव्य व सुंदर राजधानी असून सौंदर्याच्या तज्ज्ञांनीं तिची वारंवार प्रशंसा केलेली होती. स्वपराक्रमानें अनेकांच्यावर विजय संपादन करून

राजानें तिचें महत्त्व वाढविलें होतें. स्वर्गाला परिखा असलेल्या मंदाकिनीच्या मत्सरानेंच जणू तुंगभद्रेनें या राजधानीला आपली परिखा घातलेली होती. तिला भव्य प्राकार होते. मेरूच्या शिखराप्रमाणें उंच व आपल्या रत्नखचिततेनें इंद्रधनुष्याला लाजविणारीं अशीं अनेक गोपुरें, फुललेले चंपक, अशोक इत्यादि वृक्ष ज्या उद्यानांतील वसंतवासभवनांत आहेत अशीं अनेक उद्यानें त्या राजनगरींत होतीं. उत्कृष्ट केलीपर्वत व कलहंसांच्या किलबिलाटांनीं निनादित झालेल्या अनेक पुष्करिणी असून त्यांच्या पायऱ्या रत्नखचित आहेत. शरद् ऋतूंतील मेघाप्रमाणें पांढऱ्या रंगाच्या व राजघराण्याच्या विजयाचीं जणूं प्रतीकेंच असणाऱ्या अशा अनेक सौधांनीं ती नगरी सुशोभित होती. द्विजराजांच्या नित्य उल्हासानें (द्विजराज म्हणजे चंद्र व ब्राह्मण) तेथील प्रत्येक रात्र नित्य पौर्णिमा होती. सर्व प्रकारच्या अभिवृद्धीचा तेथें सहजविलास आहे. सर्व प्रकारच्या वैभवाचें तें निवासस्थान आहे. सर्व रत्नांची ती जणूं माळ आहे व सुकृताच्या समुद्राची ती जणूं मर्यादा आहे या नगरीचे प्रासाद इतके उंच आहेत कीं, त्याच्या वरच्या शिखरांना उदयाच्या वेळीं टेकणारें सूर्यबिंब पाहून लोकांना तेथें जणू कीं काय सुवर्णकलशच ठेवलेला आहे असें वाटतें. या प्रासादांच्या सौधावरील चंद्रशालांत विहार करणाऱ्या हरिणाक्षी, मोत्याच्या कंदुकाच्या भ्रमानें चंद्राला स्पर्श करतात. सौधासौधावर होणाऱ्या संगीताच्या मैफलींतून वाजणाऱ्या मृदंगांचा घनगंभीर नाद ऐकून तो मेघांचाच नाद आहे अशा समजुतीनें भलत्याच वेळीं मोर आपल्या नृत्याला प्रारंभ करितात. आमच्या या राजनगरींत चक्रवाकांच्या जोडप्यांना विरह कधींहि सहन करावा लागत नाहीं. कारण रात्रीच्या वेळीं सुद्धां येथील बाहुल्यांच्या मणिमय पायऱ्यावरून फिरणारे चक्रवाक व चक्रवाकी एकमेकांना पाहूं शकतात. आमच्या राजनगरींतील स्त्रिया इतक्या लावण्यसंपन्न आहेत कीं तसें लावण्य आपल्याला प्राप्त झालें नाहीं, म्हणून लज्जित होऊन चंद्र काळया डागाच्या मिषानें जणूं स्वतःची

हृदयव्यथाच व्यक्त करीत असतो. युवकांच्या हृदयांचें पाणी पाणी करणारे येथील स्त्रियांचे सामर्थ्यशाली कटाक्ष पाहून मदनाला आपल्या पुष्परूपी अस्त्रांचा संचय करण्याची इच्छा उरत नाहीं. स्त्रियांच्या पदन्यासाच्या वेळीं त्यांच्या चरणनूपुरांच्या नादानें आकृष्ट झालेले राजहंस त्यांच्यापासून गतिलीलेचें शिक्षण घेण्या-साठीं सतत त्यांच्या सहवासांत राहण्याचा प्रयत्न करीत असतात. या सबंध नगरींत काठिण्य फक्त वामाक्षींच्या स्तनमंडलाच्या ठिकाणीं, कौटिल्य फक्त त्यांच्या कुरळचा केसांच्या ठिकाणीं, व कृशता केवळ त्यांच्या कटिप्रदेशाचे ठिकाणींच दृष्टोत्पत्तीस येते, अन्यत्र नाहीं.)

या विदुषी राजस्नुषेनें आपल्या विख्यात श्वशुराचा निर्देश करतांना 'कर्नाटलोकनयनोत्सवपूर्णचंद्र:' या शब्दानें केला आहे. मूळच्या विजयनगरचें श्रीमद् विद्यारण्यांच्या संस्मरणार्थ राजा हरिहरानें जें विद्यानगर असें नांव ठेवलें होतें तें कंपरायाच्या या वैभवशाली दक्षिण दिग्विजयाच्या स्मृतीसाठीं त्यांच्याच संमतीनें पुनश्च विजयनगर असें नांव ठेवण्यांत आलें. बुक्काच्या राजवटींत भौतिक ऐश्वर्याप्रमाणेंच विजयनगरचें सांस्कृतिक ऐश्वर्यहि अतोनात वाढलेलें होतें. वेदभाष्याचें प्रवर्तन त्याच्याच इच्छेनें झालें आहे. यावरून त्याची धारणा व्यक्त होणारी आहे. या जयशाली व महापराक्रमी राजाचें देहावसान इ. स. १३७६ सालीं झालें. त्याच्या दोनच वर्षें आधीं ज्यानें रामेश्वरावर हिंदुध्वज फडकाविला तो त्याचा विक्रमशाली पुत्र कंपराय कालाधीन झाला होता. बुक्काचें पुढील वर्णन त्याच्या योग्यतेची कल्पना देणारें आहे.

आसन् हरिहर: कम्पो बुक्करायमहीपति: ।
मारपो मुद्दपच्चेति कुमारास्तस्य भूपते: ।।
पञ्चानां मध्यगस्तेषां प्रशास्ते बुक्कभूपति: ।
प्रचण्डविक्रमो मध्ये पाण्डवानामिवार्जुन: ।।
भग्ना: कलिंगाऽमितशौर्यवृत्तेर्वंगा विभिन्नांगविघूर्णनेत्रा: ।
आन्ध्राश्च रंध्राणि विशन्ति यस्य बाहूग्रखड्गेन विशीर्यमाना: ।।

तुरुष्काः शुष्कवदनाः पाण्ड्यभूपाः पलायिताः ।
स्वभुजार्जितवीर्येण तस्मिन् राज्यं प्रशासति ।।
बुक्करायो भवेच्छ्रीमान् भुजार्जितपराक्रमः ।
मेदिनी च प्रजा येन स्वपुत्रा इव रक्षिताः ।।
राजाधिराजतेजस्वी यो राजपरमेश्वरः ।
भाषालंघितभूपालभुजंगमविहंगमः ।।
राजराजभुजंगो य. पररायभयंकरः ।
हिंदुरायसुरत्राण इत्येतैरुपशोभितः ।।
विद्याभिधाननगरी विजयोन्नतशालिनी ।
विद्यारण्यकृता तस्यां रत्नसिंहासने स्थितः ।।
यस्मिन् षोडशदानानां धरायां परिशोभितम् ।
दानाम्बुधारया तस्य वर्धते धर्मपादपः ।।

—(एपि. कर्नाटिका, खंड १०, मुळबागल, १५८, पृ. १३५)

(त्या संगम भूपालाचे हरिहर, कम्प, बुक्कराय, मारप्प व मुदप्प असे पांच पुत्र होते. या पांचांपैकीं मधला जो बुक्कराय तो मध्यमपांडव अर्जुनाप्रमाणें प्रचंड पराक्रमी होता. त्याच्या बाहुप्रतापानें व खड्गप्रतापानें कलिंग, वंग व आंध्र भग्न झाले; तुरुष्क शुष्कमुख झाले; पांड्य भूप पळून गेले. विक्रमशाली बुक्कराय जसा पराक्रमी तसाच प्रजावत्सलहि होता. त्यानें प्रजा व पृथ्वी यांचें आपल्या मुलाप्रमाणें संरक्षण केलें. हा तेजस्वी महाराजाधिराज अनेक राजांचा परमेश्वर म्हणजे सम्राट् होता. शत्रुराजांना तो अत्यंत भयंकर असून त्याला राजाधिराज, राजपरमेश्वर, हिंदुराय, सुरत्राण (सुलतानाचा पराभव करणारा) राजराजभुजंग व पररायभयंकर अशा विरुदावलि होत्या. अखंड विजयांच्या परंपरेमुळें उन्नत झालेली, विद्यारण्यांनीं संस्थापिलेली जी विद्या नांवाची नगरी, तेथें रत्नखचित राजसिंहासनावर बसून त्यानें सर्वोत्कृष्ट षोडश दानें दिलीं होतीं. दानाच्या पाण्याच्या संतत धारेनें त्याचा धर्मवृक्ष अखंड वर्धमान होता. स्वतः माधवाचार्यांनींच बुक्काचें आपल्या 'जैमिनीन्यायमालाविस्तर' या ग्रंथांत पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे :—

'युक्तिं मानवतीं विदान्स्थिरमतिर्भेदे विशेषार्थभाक् —।
गाप्तोहः क्रमकृत्प्रयुक्तिनिपुणः श्लाघ्याति देशोन्नति ।।
नित्यस्फूर्त्यधिकारवान्गतसदाबाधः स्वतन्त्रेश्वरः ।
जागर्ति श्रुतिमत्प्रसंगचरितः श्रीबुक्कणक्ष्मापतिः ।।

— (जैमिनिन्यायमालाविस्तर)

(उत्कृष्ट तर्कवादाचा ज्ञाता, स्थिरबुद्धि, भेदप्रक्रियेंत विशेष निपुण, राजनीतिकुशल, प्रशंसनीय देशोन्नति करणारा, नित्य-स्फूर्तीचा अधिकारी, सर्व प्रकारच्या संकटांवर मात करणारा, स्वतंत्र सम्राट् व आपल्या चारित्र्यांतून नि व्यवहारांतून वेदप्रणीत धर्माचा सदैव आविष्कार करणारा बुक्कराय अखंड जागृत आहे.) सायणमाधवांच्या व तत्समकालीनांच्या साहित्यप्रपंचाची मागेंच कल्पना दिलेली आहे. या साहित्यप्रपंचाकडे पाहिलें तरी दक्षिण भारताच्या तत्कालीन सांस्कृतिक वैभवाची कल्पना येऊं शकते. बुक्कानंतर त्याची पहिली राणी गौरांबिका हिचा पुत्र हरिहर इ. स. १३७७ सालीं गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दींत श्रीमन् माधवाचार्यांनीं दोन महान् विजय पाहिले. त्याचा सेनापति चन्नापा ओडेयर यानें आदोनीवर स्वारी करून तेथें ठाण मांडून बसलेल्या सुलतानाला पिटाळून लावलें व हरिहरानें लवकरच कोंकण यवनांच्या दास्यांतून मुक्त केलें. या जयशाली घटनांच्या वेळीं माधवाचार्य हे जगद्गुरु विद्यारण्य झाले होते. आपण लावलेल्या साम्राज्यवृक्षाची वाढ पहात पहात व पंचदशीसारखे भारतीय अध्यात्माचे अनेक नन्दादीप उजाळीत इ. स. १३८६ सालीं श्रीमद् विद्यारण्य समाधिस्थ झाले. त्याच्या निधनानंतर लौकरच माधवमंत्र्यानें गोवा विमुक्त करून विजयनगरच्या साम्राज्याची सीमा पूर्वसमुद्राला भिडविली.

श्रीमन्माधवाचार्य विद्यारण्य ही भारताच्या इतिहासांतील अपूर्व विभूति होऊन गेली. ज्ञान, तपस्या, विद्वता, कर्तृत्व, राजनीति-पटुता, प्रतिभा या अलौकिक गुणांचा इतका प्रचंड निधि

मानवतेच्या इतिहासांत सहसा आढळणार नाहीं. संन्यास व कर्म-योग यांचें इतकें अपूर्व संगमस्थान दुसऱ्या कोणत्याहि व्यक्ति-मत्त्वांत आढळत नाहीं. श्रीमदाद्यशंकराचार्य व श्रीमदार्य चाणक्य यांच्या विभूतिमत्त्वाचें श्रीमन्माधवाचार्य विद्यारण्य हें जणू संगमस्थान होतें. समर्थांच्याहि कांहीं शतकें पूर्वीं त्यांनीं अंगीकृत केलेलें कार्य इतक्या भक्कमपणें माधवाचार्यांनीं पार पाडिलेलें आहे. विजयनगरचें साम्राज्य स्मृतिशेष झालेलें असलें तरी जोंवर या देशाचें अस्तित्व आहे व वैदिक धर्माचें अस्तित्व आहे तोंवर माधवाचार्यांचें कीर्तिशरीर 'नास्ति तेषां यशःकाये जरामरणजं भयं' अशा स्थितींतच राहील. हिंदुधर्म मृत्युंजय आहे ही इतिहासाची साक्ष आहे. हिंदुराष्ट्र मृत्युंजय आहे हा इतिहासाचा संकेत आहे. माधवाचार्य विद्यारण्य हे मृत्युंजय राहणार हें निर्विवाद आहे. या अवतारी महानुभावाची एक आसनस्थ मूर्ति हंपी येथें स्थापन केलेली आहे आसनस्थ श्रीमद् विद्यारण्य व्याख्यानमुद्रा धारण करून श्रीचक्रासमोर बसले आहेत अशी त्या मूर्तीची ध्यान-मुद्रा आहे. जणूं सर्वसमर्थ प्रतापशाली, सर्वमंगल जीवन जगण्याचा ते या राष्ट्राला संदेशच देत आहेत !

✦ ✦ ✦

प्रकरण सातवें

# विजयनगरच्या साम्राज्याची मध्याह्न

विजयनगरच्या साम्राज्यसिंहासनावर एकंदर चार राज-वंशांनीं राज्य केलें. संगम, साळुव, तुळुव व आरवीडु हे ते चार राजवंश होत. साम्राज्याचा प्रारंभ दक्षिणदिग्विजय करणाऱ्या कंपरायानें केला. या महान् हिंदू साम्राज्यानें दुसऱ्या साळुव

राजवंशांतील द्वितीय राजपुरुष सम्राट् कृष्णदेवराय याच्या वेळीं उत्कर्षाची परिसीमा गाठलेली होती. स्वराज्यांत शिल्पकला, तत्त्वज्ञान, साहित्य, वैभव व पराक्रम या सर्व दृष्टींनीं राष्ट्रजीवन कसें समृद्धीचें शिखर गांठतें याचें निदर्शनच कृष्णदेवरायाच्या वेळीं निर्माण झालें होतें.

इस्लामशीं टक्कर देऊन हिंदुत्व जिवंत ठेवणें हें जें विजयनगरचें कार्य तें कंपरायानें दक्षिणेपुरतें पूर्ण केलें. पण उत्तर सीमेवर होणाऱ्या उपद्रवाला आळा घालण्याचें काम विजयनगरला जन्मभर पुरून उरलें. दक्षिणेंत सर्वांत प्रथम आक्रमण करणाऱ्या दिल्लीच्या सुलतानांची सत्ता महम्मद तघलकानंतर इतकी खिळखिळी झालेली होती कीं, दिल्लीपतीकडून दक्षिणेकडे स्वारी होण्याचा संभव महम्मद तघलकानंतर उरलेला नव्हता. महमद तघलकानंतर दिल्लीच्या सिंहासनावर आलेल्या फेरोझशहा तघलकानें उत्तरेकडील स्वतःच्या साम्राज्याचें संरक्षण करण्याचें व दक्षिणेकडे ढुंकूनहि न पाहण्याचें धोरण स्वीकारलें होतें. त्यानंतर लवकरच दिल्लीवर समरकंदच्या तैमूरलंगाची जी भयानक स्वारी झाली तिनें दिल्लीची सत्ता इतकी खिळखिळी होऊन गेली होती कीं त्यानंतर जवळ जवळ एक शतकपर्यंत दिल्लीहून दक्षिणेकडे स्वारी होण्याचा संभवही उरला नव्हता. याप्रमाणें दिल्लीपतीचें भय नसलें तरी दिल्लीपतीच्या साम्राज्यांतूनच फुटून निघालेली एक स्वतंत्र व प्रबल यावनी सत्ता विजयनगरबरोबरच जन्म पावली होती व वाढत होती. ही सत्ता दक्षिणेंतच असून तिची राजधानी गुलबर्गा ही होती. ही सत्ता म्हणजे हसनगंगू बहामनी यानें स्थापन केलेली बहामनी सत्ता होय. फेरोझ तघलकाच्या वेळेपासूनच उत्तरेकडील आक्रमणाचें भय नाहींसें झाल्याचें पाहून दिल्लीच्या साम्राज्यांतून फुटून निघालेल्या बहामनी सुलतानानें दक्षिणेकडे आपली सत्ता वाढविण्याचा जोराचा प्रयत्न प्रारंभ केला व या आक्रमणाला पायबंद घालण्यासाठीं आपल्या उत्तर सीमेवरील हा अनिवार्य संघर्ष विजयनगरला सतत चालविणें

भाग पडले. विजयनगर व बहामनी राजे यांच्या ह्या संघर्षाचा इतिहास एकतर्फी लिहिलेला आहे. मुस्लिम इतिहासकार फेरिश्ता प्रभृतींनीं वारंवार असें दाखविलें आहे कीं, या संघर्षांत बहामनी सुलतानांचा नेहमीं विजय होई. त्यांनीं विजयनगरच्या राजांना खंडणी देणाऱ्या मांडलिकाच्या योग्यतेस पोहोचविलें होतें. पण हें साफ खोटें आहे. महाराज कृष्णदेवरायाला आजारी स्थितींत रणांगणांत नुसतें उभे ठाकलेले पाहतांच बहामनी सुलतानानें पळ काढला व रामराजाचें चरणचुंबन करून निझाम-शहानें आपला जीव वांचविला ही गोष्ट ध्यानांत घेतली तर विजयाच्या ह्या घोषणा किती एकतर्फी व चुकीच्या आहेत याची कल्पना येते. हरिहररायाच्या सैन्यानें विजयनगरच्या भोंवतीं पडलेला सुलतान मुजाहिदचा वेढा उठवून त्याला परत पाठविलें व अदोनी येथें बहामनी सुलतानांचा पराभव करून विजय-नगरच्या रायानें तुरुष्कांना अदोनीवरून व गोव्यांतून हाकलून दिलें असे स्पष्ट शिलालेख आहेत. या घटनांच्या प्रसंगींहि मुसल-मान इसिहासकार विजयनगरच्या राजाकडून खंडणी मिळाल्या-मुळें बहामनी सुलतान परत गेला असें लिहूं लागले तर त्याला कवडीचीहि किंमत देण्याचें कारण नाहीं हें स्पष्टच आहे.

मुसलमानांच्या निर्विवाद पराभवाचीं कितीतरी उदाहरणें या संघर्षांत घडून आलेलीं आढळतील. उदाहरणार्थ, अदोनीच्या ईशान्येस पानगल नांवाचा किल्ला असून त्यावर विजयनगरच्या रायाचें स्वामित्व होतें. फिरोझ बहामनीनें इ. स. १४१७ मध्यें तो किल्ला घेण्याचें ठरवून त्याला दोन वर्षे वेढा घातला. तो घेणें अशक्य आहे असें दिसून आल्यावर फेरोझ बहामनी परतूं लागला. त्यासरशीं विजयनगरचा राजा देवराय यानें विजयनगर व तेलंगण येथील संयुक्त फौजा घेऊन त्याच्यावर इतका जोराचा हल्ला चढविला कीं मुस्लिम सैन्याची दाणादाण होऊन फेरोझ बहामनी पळून गेला व त्याचा मुख्य सेनापति ठार झाला. विजयी हिंदूंनीं त्याचा पाठलाग करून त्याचा प्रदेश उद्ध्वस्त

केला व सहस्रावधि यवनांचा पराभव केला. पुढें या धक्क्यानें फेरोझला मृत्यु आला. अशा या पराक्रमी देवरायानें आपली मुलगी सुलतानाला दिली होती असा खोटा प्रचार करावयासहि फेरिश्ताला दिक्कत वाटत नाहीं !

या सर्व घटनांचा विचार केला तर आंध्र युनिव्हर्सिटींतील श्री. गुर्ती व्यंकटराव यांच्या निर्णयावर कोणालाही येणें भाग पडेल. ते लिहितात कीं, ‘बहामनी सुलतान व विजयनगरचें राज्य यांचीं युद्धें अखंड किंवा अतिशय परिणामकारक अशीं केव्हांच झालीं नाहींत. जितक्या वेळां सुलतान जय पावले, बहुतेक तितक्याच वेळां ते पराभव पावले. पहिला बुक्क किंवा पहिला देवराय यांजवर मिळविलेल्या जयापेक्षां मुजाहिद शहा व फेरोज-शहा यांचे त्यांनीं केलेले पराभव कमी तीव्र नव्हते. तरीहि रायांनीं सुलतानावर कोणत्या अटी लादल्या याची माहिती फेरिश्ता व अली हे मुसलमान इतिहासकार मुळींच देत नाहींत. सुलतानांना विजयनगर हें बळकट स्थळ केव्हांच घेतां आलेलें नाहीं; व तें दुर्भेद्य होतें, तोंवर सुलतानास वार्षिक खंडणी भरण्याचें रायांना कांहीं कारण नव्हतें, या गोष्टीकडे हें पश्चात्-कालीन बखरकार दुर्लक्ष करतात. समकालीन परदेशी प्रवासी विजयनगरच्या राज्याच्या भरभराटीची व प्रभावाची साक्ष देतात, व बहामनी सुलतानांना रायांनीं खंडणी भरल्याचें त्यांपैकीं कोणीच सांगत नाहीं. वस्तुस्थिति अशी दिसते कीं, त्या दोहोंपैकीं कोणतेंहि एक राज्य दुसऱ्यास मांडलिक बनविण्यास असमर्थ होतें व तंटा बहुतकरून प्रदेशाबद्दल असे. बहामनी सुलतान प्रबल झाले कीं ते तरवारीच्या जोरावर रायाकडून द्रव्य उकळीत. रायांनीं खंडणी म्हणून हें द्रव्य केव्हांच दिलें नाहीं. वार्षिक खंडणी म्हणून सुलतानांच्या खजिन्यांत भरणा करण्याची तर गोष्टच बोलावयास नको. आपल्या सामान्य प्रजाजनांची लूट व कत्तल थांबविण्यासाठीं शत्रूस दिलेला पैसा यापलीकडे ही संपत्ति देण्याबाबत त्यांची निराळी कल्पना नव्हती. मोठेपणाच्या कल्पनेनें ग्रासले गेलेले

मुसलमान बखरकार या व्यवहारास खंडणी हें मोठें नांव उगीचच देत असतात.' --(विजयनगर स्मारकग्रंथ, पृष्ठ २८१)

विजयनगरचा इतिहास वाचतांना शिलालेख, दानपत्रें आदि तत्कालीन उपलब्ध अस्सल ऐतिहासिक पुराव्यावरच भर ठेवणें कां आवश्यक आहे हें यावरून लक्षांत येईल. पहिल्या संगम राजघराण्याची कारकीर्द एका शतकाहून अधिक टिकली. या काळामध्यें विजयनगरवर उत्तरेकडून मुसलमानांचे हल्ले होत असत. कधीं विजयनगरच्या राजांनीं कुरापत काढल्यामुळें तर कधीं स्वतःच्याच स्फूर्तीनें हे हल्ले होत. पण या युद्धांत दोन-तीनदांच विजयनगरला काय ती माघार घ्यावी लागली. तेवढी सोडली तर विजयनगरच्या विक्रमशाली सैन्यानें आपली सीमा उत्तम प्रकारें संभाळली होती. या सतत युद्धामुळें हिंदूंची प्रतिकार-शक्ति वाढली व दुसऱ्या देवरायाच्या कारकिर्दीत सैन्याची नव्या पद्धतीवर रचना करण्यांत येऊन साम्राज्याच्या अंतर्गत व्यवस्थेचें व संघटनेचें कार्य सुरू झालें. मुस्लिम सत्तांच्या काळांत व युद्धकाळांत जी अव्यवस्था माजली होती ती नष्ट करून जुन्या हिंदुपद्धतीनुसार साम्राज्यांत संपूर्ण सुव्यवस्था निर्माण करण्यांत आली. परंपरागत चालीरीतींचे आपण पुरस्कर्ते आहोंत असें या साम्राज्याचे संस्थापक व त्यांच्या नंतरचे राजे अभिमान-पूर्वक सांगत असत. परंपरागत तत्त्वांचा त्यांनीं इतक्या कसोशीनें व उत्कटत्वानें मान राखला कीं त्यामुळेंच ते जनतेंतील सर्व थरांत प्रिय झाले. साम्राज्यसंस्थापकांनीं खेड्यांत चालू असलेली ग्रामसंस्थेची घटना बुद्ध्या कधींही बदलली नाहीं. आज खेड्यांच्या राज्ययंत्रांतील लोकसत्तात्मक प्राण व स्थानिक स्वायत्तता ही जर नाहींशी झाली असली तर त्याचा दोष विजयनगरच्या राजांना लावतां येणार नाहीं. जुन्या सनदा नव्या करून देणें, शहरें व प्रांत यांच्या नव्या नांवाबरोबर जुन्या नांवाचाहि उल्लेख करणें, प्रांताचे जुने विभाग कायम ठेवणें, जुनीं चलनीं नाणीं

चालू ठेवणें, हीं कृत्यें विजयनगरच्या राजांनीं प्रजाजनांचीं मनें दुखविलीं न जावीं व जुन्या राजघराण्यांचा आदर राखला जावा याच हेतूनें केलीं. धार्मिक बाबतींत राज्यकर्त्यांनीं तटस्थपणा ठेवला तसा तो सामाजिक बाबतींतहि ठेविला. सामाजिक बाबतींत या राज्यकर्त्यांनीं जर कधीं हात घातला असला तर तो सर्वांनीं शांततेनें रहावें या हेतूनेंच घातला असेल. केव्हां केव्हां कांही बाबींपुरते कायदेहि त्या सरकारनें केले आहेत. इ. स. १४२५ मध्यें पडईविडु राज्य (हल्लीचा अर्काट जिल्हा) येथील कानडी, तामील, तेलगू व गुजराथी या पोटजातींचे ब्राह्मण अर्क पुष्करणी येथील गोपीनाथाच्या देयालयांत देवासमोर जमले. त्या सर्वांनीं एक पत्र लिहून काढलें, व जे ब्राह्मण कन्यादानाशिवाय इतर पद्धतीने लग्न करतील ते राजाकडून शिक्षेस पात्र होतील व जातिबहिष्कृत करण्यांत येतील असें घोषित केलें. अशा सारख्या महत्त्वाच्या बाबतींत मात्र राज्यकर्ते हात घालीत असत. हुंड्याची पद्धत, तिचे भयंकर परिणाम व ते थांबविण्याकरितां या राजांनीं केलेले प्रयत्न यांचे दाखले जुन्या कागदपत्रांतून सांपडतात. या वेळीं साम्राज्याचा विस्तार दक्षिणेकडे वाढून सीमेपर्यंत सर्व दक्षिण द्वीपकल्पाचा त्यांत समावेश होऊं लागला होता. दुसऱ्या देवरायाच्या कारकीर्दींत समुद्रांतील वाहतुकीवर व व्यापारावर देखरेख ठेवण्याचें काम लव-कण उपाख्य लक्ष्मण या स्वतंत्र अधिकाऱ्याकडे देण्यांत आलें. त्याला दक्षिण समुद्राचा स्वामी अशी पदवी होती. परंतु ह्या वेळीं किंवा पुढें केव्हांही विजयनगरचें आरमार किंवा व्यापारी जहाजें अशीं कधींच नव्हती. पूर्वीं चोल राजांचीं व नंतर पांड्यांचींहि जलयानें होतीं. विजयनगरचीं मात्र जहाजें नसावीं हें थोडें चमत्कारिक दिसतें. डॉ. एस. कृष्णस्वामी अय्यंगार यांनीं याचें कारण असें उल्लेखिलें आहे कीं, ‘ किनाऱ्यावरील व्यापार मार्कोपोलो हिंदुस्थानांत आला त्या वेळेपासूनच मुसलमानांच्या हातीं जाऊं लागला होता. तो आतां पूर्णपणें मुसलमानांच्या हातीं गेला असावा व त्यामुळेंच विजयनगरला

जहाजें ठेवण्याची आवश्यकताच भासली नसावी. हें एक वैगुण्य वगळलें तर साम्राज्याची अंतर्गत व्यवस्था उत्तम प्रकारें करण्यांत आली होती.'

पहिल्या संगम राजवंशाचें कार्य दक्षिण भारत विमुक्त करणें, उत्तरसीमा नीट संभाळणें व साम्राज्याची योग्य संघटना करून राज्यकारभार सुरळीत धर्तीवर आणणें हें होतें. तसेंच जुन्या हिंदुपद्धतीप्रमाणें सर्व विद्या व विशेषत: धर्मविषयक ज्ञान गुरुशिष्यपरंपरेनें चालत असे. परचक्राच्या वावटळींत व युद्धाच्या धामधुमींत ही परंपरा टिकणें अशक्य आहे हें ओळखून साम्राज्याच्या उदयाबरोबर राज्यांतील सर्व विद्वानांना एकत्रित करून ग्रंथनिर्मितीच्या द्वारें या ज्ञानाच्या संरक्षणाचा व संवर्धनाचा भक्कम प्रयत्नहि या पहिल्या राजवंशाकडून झाला. येथें या राजवंशाचें काम संपलें. हा राजवंश इ. स. १३३६ ते १४८७ पर्यंत टिकून पुढें नष्ट झाला. या राजवंशांतील शेवटचा राजा दुसरा विरूपाक्ष हा इ. स. १४६५ मध्यें गादीवर आला. हा फार विक्षिप्त व क्रूर होता. मदिरा व मदिराक्षी यांखेरीज त्याला कशाचीही चाड नव्हती. त्याच्या कारकिर्दींत साम्राज्यावर अनेक संकटें कोसळलीं. एकदां भटकळ येथील अरब व्यापाऱ्यांवर त्याचा रोष होऊन त्यांची सरसकट हत्या करण्याची आज्ञा त्यानें आपल्या होनावर येथील अधिकाऱ्यांना दिली. दहा सहस्र लोक या आज्ञेनें प्राणास मुकले. त्याच्या या कृत्याचा सूड घेण्याच्या हेतूनें इ. स. १४६९ मध्यें महम्मदशहा बहामनीच्या आज्ञेवरून त्याचा प्रधान महम्मद गवान यानें गोव्यावर स्वारी करून गोवा व कोंकणपट्टी विजयनगरच्या साम्राज्यांतून हिसकावून घेतले. याच सुमारास मदुरेच्या पांड्य राजानेंहि उचल घेऊन कांचीवरम्पर्यंत चाल करून सर्व प्रदेशाची धुळधाण केली. महम्मदशहानें इ. स. १४८० मध्यें राजमहेन्द्री व कोंडापल्ली घेऊन कोंडवीड येथील भव्य देवालयाचा नाश केला व मशीद बांधली. मशिदीच्या स्थापनेच्या वेळीं कांहीं ब्राह्मणांना

आपल्या हातानें ठार करून त्यानें गाझी ही पदवी धारण केली होती. यानंतर सुलतानानें दक्षिणेस मालूर व कांचीवरम्‌पर्यंत दौड करून कांचीवरम् लुटून फस्त केलें. सर्व दिशांनीं सारखा पराभव होत राहिल्यामुळें विरूपाक्षाविरुद्ध जिकडे तिकडे असंतोष माजला व त्यांतच त्याच्याच ज्येष्ठपुत्रानें त्याचा वध केला. या मुलानें राज्यपद नाकारल्यामुळें त्याचा धाकटा भाऊ पदेयराय हा गादीवर बसला. तोहि आपल्या बापाप्रमाणेंच व्यसनसागरांत निमग्न झाल्यामुळें राजास पदच्युत करून राजघराण्यांतील दुसऱ्या कुटुंबातील एक पुरुष नरसा ऊर्फ नरसिंह हा इ. स. १४८६ मध्यें राजा झाला. याला साळुव नरसिंह असें म्हणतात. साळुव ही सैनिकी पदवी आहे.

## साळुव राजघराणें

साळुव ही पदवी नरसिंहाच्या एका पूर्वजानें मिळविली होती. या वेळीं विजयनगरच्या राज्यांत जसे बखेडे सुरू झाले होते तसेच बहामनी राज्यांतहि सुरू झाले असल्यामुळें विजयनगरच्या दुफळीचा विशेष लाभ मुस्लिम सत्तेला घेतां आला नाहीं. याच सुमारास कलिंग प्रांतांत म्हणजे आजच्या ओरिसा प्रांतांत क्रांति होऊन कपिलेश्वर नांवाच्या राजानें गादी बळकाविली होती. कपिलेश्वर व त्याचा मुलगा पुरुषोत्तम यांनीं पूर्व किनाऱ्यानें राजमहेन्द्रीपर्यंतचा प्रदेश जिंकून नंतर कृष्णाकाठानें वर येत महत्त्वाचीं नाक्याचीं ठिकाणें ताब्यांत घेऊन ते दक्षिणेकडे विजयनगरपर्यंत राज्यांत उतरले व तिरुअण्णामलईच्या आसपासपर्यंत म्हणजे अर्काट जिल्ह्यापर्यंतचा प्रदेश त्यांनीं जिंकला. ओरिसाच्या कपिलेश्वराच्या ह्या स्वाऱ्या विजयनगर येथील क्रांतीच्या कांहीं दिवस पूर्वींच सुरू झाल्या होत्या. व त्यामुळेंच आपल्या राजाच्या दुबळेपणाची चीड येऊन साम्राज्याची पिछेहाट थांबविण्याच्या निश्चयानें साळुव नरसिंहानें साम्राज्याचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं होतीं. म्हणूनच ह्या राज्यक्रांतीच्या वेळीं विजयनगरची प्रजा साळुव नरसिंहाच्या पाठीशीं उभी राहिली. बहामनी

सुलतानांनींहि कपिलेश्वराप्रमाणें चढाई करून कृष्णा व तुंगभद्रा ह्या नद्यांमधील विजयनगरचा प्रदेश गिळंकृत केला होता. नरसिंहानें राज्यावर येतांच प्रथम कपिलेश्वरानें बळकाविलेला प्रदेश मोकळा केला. त्यामुळें विजयनगरचें लोकमत त्याला पूर्णपणें अनुकूल झालें. स्वतःचा मुलगा राज्यावर यावा अशी त्याची इच्छा होती. पण तो तितकासा कर्तृत्ववान् नव्हता. बहामनी सुलतानाकडून आपला गेलेला प्रदेश परत मिळविण्यापूर्वींच नरसिंहाला मृत्यूनें गांठलें. मृत्यूपूर्वी राज्यकारभार व युद्धें करण्याचें दायित्व आपला विश्वासू व शूर सेनापति नरसा नायक ह्याच्यावर त्यानें सोपविलें व मुलाला त्याच्या स्वाधीन केलें. नरसानेंहि आपल्या धन्याच्या मुलास गादीवर बसवून अनेक संकटें सोसूनहि धन्याची आज्ञा भक्तिपूर्वक पाळली. नरसाचा मुलगा नरसिंह हाहि आपल्या पित्याप्रमाणेंच शूर व कर्तृत्ववान् होता. त्यानें विजयनगरचा गेलेला बहुतेक प्रदेश परत मिळविला, पण दुबळ्या राजाच्या सिंहासनाला संभाळण्याचा व्यर्थ भार उचलण्याऐवजीं या घराण्याचा शेवटचा राजा इमडी नरसिंग याला पदच्युत करून इ. स. १५०४ मध्यें वीर नरसिंहराय हा स्वतःच गादीवर बसला. हा तुळुव राजवंशाचा पहिला पुरुष होय. यानें राज्यारोहणाच्या पहिल्याच वर्षी विजयनगरवर चालून आलेल्या बहामनी सुलतानाचा पराभव केला. तो इतका खरपूस होता कीं, सुलतान मोहम्मद शहाला दातीं तृण धरून पळून जावें लागलें. वीर नरसिंहाला आयुष्य मात्र फारच थोडें लाभलें. केवळ चारच वर्षे राज्यकारभार करून इ. स. १५०९ मध्यें तो दिवंगत झाला त्याच्या मागून त्याचा धाकटा बंधु कृष्णदेवराय हा १५०९ मध्यें गादीवर बसला. विजयनगरच्या हिंदुसाम्राज्याचें सुवर्णयुग म्हणजे कृष्णदेवरायाचा राज्यकाल होय. या साम्राज्याचा मध्याह्नकाल म्हणजे कृष्णदेवरायाचा राज्यकाल असें इतिहासकार वर्णन करतात. विजयनगरच्या साम्राज्याच्या स्थापनेचा संपूर्ण हेतु त्याच्या समयीं सफळ झाला, व पराक्रम, यश, वैभव, कला,

साहित्य, पांडित्य इत्यादि सर्व गोष्टींचा परमोत्कर्ष होऊन, समर्थ, वैभवशाली व कल्याणमय हिंदुराष्ट्राचें विकसित स्वरूप त्याच्या काळीं प्रकट झालें.

## सम्राट् कृष्णदेवराय

सम्राट् कृष्णदेवरायाचा राज्यकाल इ. स. १५०९ ते १५३० पर्यंत होता. पराक्रम, पांडित्य, प्रतिभा, राजकारण, प्रजावात्सल्य, गुणग्राहकता, शालीनता, कलात्मकता, व वैभव या अलौकिक व दुर्लभ गुणसमुच्चयाचें तें निवासमंदिर असून सम्राट् समुद्रगुप्त, हर्षवर्धन, अशोक, चंद्रगुप्त यांच्या योग्यतेचा तो होता. लोककल्याणाच्या कसोटीच्या दृष्टीनें त्यानें वेळोवेळीं काढलेल्या राजाज्ञा व त्याचे कांहीं उद्गार या दृष्टीनें मननीय आहेत. त्यांतील कांहीं येथें उद्धृत करतो. 'राजानें आपल्या उत्पन्नाचा चौथा हिस्सा दानधर्म व उपभोग यांत खर्च करावा. निम्म्या उत्पन्नांतून सैन्य ठेवावें व उरलेला चौथा हिस्सा खजिन्यांत जमा करावा.' 'हत्ती व घोडे विकत घेणें; त्यांना खाऊं घालणें, सैन्य बाळगणें, देव व ब्राह्मण यांची पूजा करणें व स्वतः जरूर त्या गोष्टींचा उपभोग घेणें या कामीं खर्च होणारा पैसा अनाठायीं जात नाहीं.' 'टाकी आणि तलाव बांधून सरकारनेंच पाण्याची सोय केली पाहिजे.' 'गरीब रयतेला जमिनी हलक्या दरानें द्याव्यात कारण त्यामुळेंच अखेर खजिन्यांत पैशाची भर पडेल.' प्रजापालन, धर्मपालन व इतरांना धर्माप्रमाणें वागावयास लावणें हीं राजाचीं कर्तव्यें होत.'

## पराक्रम व कर्तृत्व

सम्राट् कृष्णदेवरायाचा इतिहास फार त्रुटित स्वरूपांत मिळतो. त्याच्या पित्याचें नांव नरसा व आईचें नांव नागलादेवी. तो साम्राज्यसिंहासनावर येतांच त्याचें वर्चस्व झुगारून देण्यासाठीं जिकडे तिकडे मांडलिकांचीं बंडें उद्भवलीं. त्या वेळीं बहामनी

२८३३५ ६८९ ३०/७/५

राज्यांत अंतस्थ कलह चालू होते व ओरिसाचा राजा विजयनगर-वर चालून येण्याच्या सिद्धतेंत होता. कृष्णदेवरायानें प्रारंभींचीं दीड दोन वर्षे कसल्याहि प्रकारची हालचाल न करतां युद्धाच्या कडेकोट सिद्धतेंत घालविली. इ. स. १५१० मध्यें युसुफ आदिल शहाच्या मृत्यूनंतर त्याचा दिवाण कमालखान व अमीरबरीद यांनीं त्याच्या प्रदेशाची आपापसांत वाटणी करण्याचें कारस्थान चालविलें होतें. त्याची कुणकूण लागतांच उत्तरेकडील आपले सदाचे शत्रु असणाऱ्या बहामनी राज्याच्या तुकड्यांना शह बसविण्या-साठीं आदिलशहाच्या तावडींतून गोवा मुक्त करण्यासाठीं त्यानें पोर्तुगीजांशीं समान शत्रुमित्र-संधि करून त्यांना आपल्या बाजूला वळविलें व प्रथम साम्राज्यांतील अंतस्थ बंडाळी मोडून काढून त्यानें तें निर्वेध केलें. उम्मत्तूर ( म्हैसूर जवळ ) शिव-समुद्रम् (कावेरीच्या काठीं) इत्यादि ठिकठिकाणच्या बंडखोरांचा निःपात करून त्यानें श्रीरंगपट्टण जिंकून तेथें आपला प्रतिनिधि नियुक्त केला. याच सुमारास आदिलशाही प्रदेशाची वाटणी कर-ण्याचे कमाल व बरीद यांचे प्रयत्न फसून आपापसांत भांडणें सुरू झाल्याचें पाहून कृष्णदेवरायानें त्याचा लाभ करून घेण्यास्तव विजापूरवर चढाई केली. सम्राट् आलेला पाहतांच शिबंदी पटापट किल्ले सोडून पळून गेली व नेहमीच्या भांडणाचा विषय असलेले मुद्गल, रायपूर हे किल्ले व रायपूरचा दुआब केवळ दराऱ्यानें विजयनगरच्या अधीन झाला. उत्तरसीमेची पूर्ण व्यवस्था करून व ओरिसाच्या राज्यावर चढाई करून कृष्णदेवरायानें इ.स. १५१३-मध्यें उदयगिरीवर विजय मिळविला. इ. स. १५१४ मध्यें कल्याणी व कलबुर्गा जिंकून रायानें जमखंडी येथें निजामशहाला पराभवाची धूळ चारली, व १५१५ मध्यें कृष्णेच्या मुखाजवळील कोंडवीडचा दुर्ग जिंकून ओरिसाचा राजा गजपति प्रतापरुद्र याचा संपूर्ण पराभव केला. क्रमाक्रमानें बेझवाडा, कोंडापल्ली, राजमहेन्द्री हे दुर्ग जिंकून तो पश्चिम तेलंगण प्रांतांत शिरला, व इन्द्रकोंडा, नलकोंडा, देवरकोंडा इत्यादि महत्त्वाचे दुर्ग जिंकून वरंगळचा

सुभेदार शिकतखान याला रणांत धूळ चारली. ओरिसाचा राजा प्रतापरुद्र गजपति यानें कृष्णदेवरायाशीं निर्णायक युद्ध करण्यासाठीं पोट्टनूर येथें प्रबल सेना एकात्रित केली. पण ऐन वेळीं आपल्या सरदारांत फितुरी असल्याच्या संशयावरून युद्ध न करतां तो पळून गेला. हा अनपेक्षित विजयलाभ मिळाल्याचें स्मारक म्हणून कृष्णदेवरायानें त्या जागीं एक विजयस्तंभ उभारला. कृष्णदेवरायाशीं चालू असलेल्या संघर्षांत आपलें राज्यच संपूर्ण नष्ट होईल या भयानें प्रतापरुद्र गजपतीनें आपल्या मुलीशीं त्याचा विवाह करून नवें नातें जोडलें या नव्या संबंधानें रायानें कृष्णेच्या अलीकडील जिंकलेला सर्व प्रदेश आपल्या सासऱ्याला परत दिला या विजययात्रेंतील सफलतेविषयीं परमेश्वराचें उतराई होण्यास्तव धार्मिक हृदयाच्या या रायानें इ. स. १५१६ मध्यें रामेश्वरपर्यंत तीर्थयात्रा करून अपार दानधर्म केला.

रायचूर व मुद्गल हे किल्ले व रायचूरचा दुआब यांच्यावर स्वामित्व मिळविणें म्हणजे आजवर टिकून धरलेलें बहामनी राजांचें नाकच कापणें होतें. विजापूरच्या आदिलशहाच्या अंतःकरणांत हा पराजय कांट्याप्रमाणें सलत होता. त्यानें इ. स. १५२० मध्यें रायचूरवर मोठ्या सिद्धतेनिशीं स्वारी केली. पण कृष्णदेवरायानें या युद्धांत त्याचा सदाची आठवण राहण्यासारखा पराभव तर केलाच; पण त्याला विजयनगरच्या हिंदू सिंहासनाचें मांडलिक करावें म्हणून मुद्गलदुर्गाच्या मार्गानें रायानें विजापूरच्या सीमेंत आपलें सैन्य घुसविलें. वाटेंत फिरोजाबाद व सागर लुटून त्यानें राजधानी कलबुर्गा जिंकली. तीन राजपुत्रांना पकडून त्यांपैकीं एकाला सिंहासनावर बसवून दुसऱ्या दोघांना त्यानें आपल्याबरोबर विजापूरला नेलें व विजापूर जाळून सभोंवारचा प्रदेश उद्ध्वस्त केला. त्यानंतर कांहीं वर्षं रायाकडे ढुंकूनसुद्धां पाहण्याचें आदिलशहाला धैर्य झालें नाहीं. यानंतर इ. स. १५२९ मध्यें कृष्णदेवराय फार आजारी पडला. या स्थितींत तो युद्धाला येणार नाहीं अशा समजुतीनें आदिलशहानें पुनश्च रायचूरवर

स्वारी केली. पण रणांगणावर कृष्णदेवरायाला नुसतें उभें ठाकलेलें पाहतांच सारें अवसान गळून, एकहि शस्त्र उचललें गेलें नव्हतें तोंच आदिलशहा जीव घेऊन पळून गेला. विजयनगरच्या साम्राज्याकडे कोणीहि वक्र दृष्टीनें पाहूं नये असा दरारा कृष्णदेवरायानें आपल्या पराक्रमानें उत्पन्न केला होता व तो जिवंत असेपर्यंत तो कसा टिकून होता याचें उदाहरण म्हणजे हें आदिलशहाचें पलायन होय. पूर्वीचा संपूर्ण प्रदेश जिंकून त्यानें साम्राज्याची सीमा कृष्णातीराला तर भिडविलीच; पुढेंहि दिग्विजय करीत थेट सिंहाचलम् व कटकपर्यंत त्यानें आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. मुसलमानांना पराभूत करून त्यानें कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील प्रदेश मिळवून रायचूर दुआब खालसा केला व आपल्या वाटेस सहसा कोणी जाणार नाहीं इतका वचक निर्माण करून उत्तर सीमेसंबंधांत विजयनगरला त्यानें सुरक्षितता प्राप्त करून दिली ही त्याची सर्वांत महत्त्वाची कामगिरी होय. आपल्या पूर्वीच्या सम्राटांचें स्वप्न त्यानें या कृत्यानें साकार केलें. पश्चिम किनाऱ्याजवळच्या अंकोला नगरापासून रायचूरपर्यंत एक रेषा काढून ती कृष्णानदीच्या ओघाबरोबर तिच्या मुखापर्यंत मिळविली तर ती कृष्णदेवरायाच्या राज्याची उत्तर सीमा म्हणतां येईल. मलबार किनारा वगळून ह्या रेषेच्या दक्षिणेकडील द्वीपकल्प म्हणजे हें साम्राज्य होय. त्याच्या साम्राज्याचे स्वाभाविक तीन विभाग पडत. एक पश्चिम घाट आणि अरबी समुद्र यांमधील कानडी किनारा, दुसरा पश्चिम आणि पूर्वघाटांमधील दक्षिणचें पठार व तिसरा कारोमांडेल किनारा. कृष्णदेवरायाच्या राज्यांतील लोकसंख्या १ कोटी ८० लक्ष असावी असा संशोधकांचा तर्क आहे.

## व्यक्तिजीवन

पेस नांवाच्या तत्कालीन प्रवाशानें लिहिलें आहे : ‘ हा राजा साधारण मध्यम उंचीचा, गौरवर्णाचा असून त्याची शरीरयष्टि चांगली होती. त्याची गणना कृश माणसापेक्षां स्थूल माणसांतच होत

असे त्याच्या तोंडावर देवीचे वण असून त्याचा दरारा सर्व लोकांवर असे. त्याचा स्वभाव आनंदी व विनोदप्रिय होता. परकीय राष्ट्रांतील लोकांची चांगली बूज ठेवून त्यांची संभावना करण्याकडे त्याचा विशेष कल असे व अशीं माणसें कोणत्याहि श्रेणीचीं असलीं तरी त्यांची माहिती हा मोठ्या आस्थेनें विचारी असें सांगतात. ह्याची राज्यपद्धति व न्यायपद्धति विशेष चांगली होती.' ऐन तारुण्यांत त्याला व्यायामाचा नाद होता. कुस्ती व घोड्यावरील रपेट हे त्याचे विशेष आवडीचे व्यायामाचे प्रकार होत. पारिजातापहरण या काव्याचें महत्त्व विजयनगरचा इतिहास उलगडण्याच्या दृष्टीनें संशोधक जगतांत विशेष मानण्यांत येतें. त्या काव्यांत, रायाला पांडवांतील नकुलाइतकेंच अश्वविद्येचें ज्ञान होतें असें म्हटलें आहे. (स. ६ श्लो. ९२) सकाळीं सूर्योदयापूर्वी उठून तो अंगाला तेल लावी व तें तेल जिरेपर्यंत घोड्याची रपेट करी. कृष्णदेवरायाच्या व्यायामाचें पेस पुढीलप्रमाणें वर्णन करतो : 'राजा सकाळीं उठल्याबरोबर एक भांडें तिळाचें (जिजेलीचें) तेल पीत असे व सर्व अंगाला तेंच तेल लावी. नंतर मातीचे मोठमोठाले गोळे हातांत घेऊन तो लंगोट कसून वजन उचलण्याचा व्यायाम करी, व दांडपट्टा खेळून अंगाचें तेल जिरवी. हें झाल्यावर आपल्या पदरच्या एखाद्या पहिलवानाशीं हा कुस्ती खेळे व नंतर घोड्यावर बसून इकडे तिकडे रपेट करी. हें सर्व सूर्योदयाच्या पूर्वी व्हावयाचें. नंतर राजानें स्नानास उठावयाचें असा क्रम असे.' तिरुमलांबा, अन्नपूर्णा व कमला अशा त्याच्या तीन राण्या असून त्यांतील अन्नपूर्णा ही ओरिसाचा राजा प्रतापरुद्र गजपति याची कन्या होय. कृष्णदेवरायाच्या राहण्याच्या महालाचें नांव मलयकूट असें होतें. प्रासादाच्या उंचीवरून हें नांव पडलें असावें. त्याच्या राजसभेचें नांव भुवनविजय असें होतें. साधा व पांढरा शुभ्र पोशाख हें त्याचें वैशिष्ट्य होतें. त्याच्या अंगावर सोन्याचीं गुलाबाचीं फुलें असत व गळ्यांत हिऱ्याचा कंठा असे. डोक्याला जरतारी कापडाची पगडी असे.

## लोकप्रियता व औदार्य

कृष्णदेवराय हा आपल्या प्रजेचा अत्यंत आवडता राजा होता. त्याची प्रजा तामीळ, तेलगू व कर्नाटकी अशी त्रिविध होती. पण समानतेच्या पायावर साम्राज्यांतील सर्व घटकांचें त्यानें आदर्श एकसूत्रीकरण करून दाखविलें. आन्ध्र, कन्नड व तामीळ या तिन्ही लोकांना समानतेनें वागवून त्यांच्या सहविचारानें त्यानें राज्य चालविल्यामुळें आपल्या या सम्राटाचा गौरव करण्याची त्यांच्यामध्यें एक प्रकारें अहमहमिका लागून राहिलेली दिसते. तामीळ लोकांनीं त्याला आपला रायर, तेलगु लोकांनीं आपला रायलू व कर्नाटकी लोकांनीं त्याला आपला रायरू म्हणून आपापल्या वैशिष्टयपूर्ण भाषेंत संबोधिलें आहे. कृष्णदेवरायानें आपल्या राज्याच्या अंतर्गत व्यवस्थेचें धोरण आखतांना प्रजापालन, धर्मपालन, कर्तव्यपालन या संबंधांत सर्वांवर समान करडें नियंत्रण व दया आणि न्याय यांची व्यवहारांत योग्य सांगड घालणें हीं तत्त्वें आचरणांत आणलेलीं होतीं. त्याच्या दिग्विजयाच्या वेळच्या शत्रूंशीं झालेल्या व्यवहारांतहि त्याचा सांस्कृतिक आदर्श व त्याच्या हृदयाची श्रीमंती प्रत्ययास येतात. वारंवार आगळीक करणारा कलिंग देशाचा (ओरिसा) राजपुत्र वीरभद्र याला त्यानें पकडूनहि जीवदान दिलें व सभ्यतेनें वागविलें. उम्मतूर प्रदेश जिंकल्यावर तेथील राजवंश नष्ट न करतां आपले मांडलिक म्हणून त्यानें त्यांना पुनश्च त्यांच्या वंशपरंपरागत सिंहासनावरच सन्मानानें प्रतिष्ठापित केलें. त्याच्या हृदयाच्या उदात्ततेचें व औदार्याचें एक वर्णन रायचूरच्या लढाईच्या वेळीं न्युनिझ या परकीय प्रवाशानें केलेल्या वर्णनांत पहावयास सांपडतें. या युद्धांत बहामनी शत्रूंचा पराभव केल्यावर कृष्णदेवरायाच्या सेनानींनीं मुसलमानांचा पाठलाग नदीतीरापर्यंत करून त्यांची भयानक पारध सुरू केली. पण सम्राटाच्या दयापूर्ण हृदयाला ती गोष्ट बरी वाटली नाहीं. त्यानें तत्काळ तो संहार थांबविला. त्याचे सेनानी संधीचा लाभ घेऊन शत्रूचा संपूर्ण निःपात करण्याची आज्ञा द्यावयास त्याला आग्रह

करीत होते, पण त्यानें ती गोष्ट नाकारली. स्वतःच्या सामर्थ्याचा त्याला पूर्ण आत्मविश्वास होता. एका वेळीं सहा लक्ष पदाति, साठ सहस्र अश्वदळ, व दोन सहस्र गजसैन्य रणांगणावर उभें करण्याचें त्याचें सामर्थ्य होतें व त्याचा हा आत्मविश्वास त्यानें आजीवन खरा करून दाखविलेला आहे. त्यामुळें मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामचंद्राची परंपरा पुनरुज्जीवित करूं इच्छिणाऱ्या या सम्राटानें तें मानवताविरोधी कृत्य करावयास मुळींच संमति दिली नाहीं. कृष्णदेवरायाच्या राज्यकालाचा पूर्वार्ध साम्राज्य सुसंघटित करण्यांत गेला व उत्तरार्ध कला, वाङ्मय व शिल्प यांची अभिवृद्धि व राज्याचें वैभव वाढविणें यांत खर्ची पडला. तुंगभद्रा नदीवरचा पूल, साम्राज्यांतील पाटबंधाऱ्याचीं कामें, पाण्यासाठीं जागोजाग निर्माण केलेलीं विस्तीर्ण व खोल अशीं अनेक तळीं, हीं कृष्णदेवराय साम्राज्यांतील शेतीचीं साधनें व संपत्ति यांच्या समृद्धीसाठीं किती दक्षता घेत असे याचीं निदर्शकच होत.

नागलापूरच्या दक्षिणेस कृष्णदेवरायानें एक मोठा तलाव बांधलेला आहे. या तलावाची उपयुक्तता व सम्राटाची लोककल्याणाची तळमळ याचें वर्णन करतांना न्युनिझ म्हणतो : 'या पाण्यामुळें त्यानें शहरांत पुष्कळच सुधारणा केल्या व बागांना आणि भाताच्या शेतांना पाणी मिळण्यासाठीं पुष्कळ पाट बांधले. जमिनीच्या सुधारणेसाठीं राजानें लोकांना ९ वर्षें जमिनी फुकट दिल्या. त्यामुळें २० सहस्र परडोई इतका वसूल झाला.' कोरगाल येथें राजानें बांधलेल्या मोठ्या धरण व पाटांपैकीं बसवन्नापाट अजूनहि उपयुक्त व महत्त्वाचा आहे.

## भौतिक वैभवश्री

कृष्णदेवराय याच्या काळीं विजयनगरचें वैभव कळसास पोहोंचलें होतें. तत्कालीन भारत व युरोप यांच्यामधील औद्योगिक स्थितीविषयीं लिहितांना मूरलंड म्हणतो : 'माझ्या मतें हल्लींपेक्षां त्या वेळीं उद्योगधंद्यांचे बाबतींत हिंदुस्थान पश्चिम

युरोपपेक्षां बराच पुढें गेला होता याबद्दल वाद नाहीं.' कापडाचे समृद्ध कारखाने व विपुल खनिज संपत्ति यांचीं तत्कालीन चित्तवेधक वर्णनें आढळतात. रायाच्या राज्यसभेंतील नृत्यांगना फारच श्रीमंत होत्या. त्या डोक्यापासून पायापर्यंत हिऱ्यामोत्यांचे दागिने घालीत. प्रत्येक दागिन्याचें बारीक सारीक वर्णन करून पेसनें म्हटलें आहे, 'या स्त्रियांच्या अंगावरील दागिन्यांचें मूल्य कोण सांगू शकेल!' दागिने घालण्याचा प्रघात इतका होता कीं, घोडे व हत्ती यांनासुद्धां दागिन्यांनीं मढविण्यांत येई. रत्नजडित सोन्याचांदीचे पत्रे हत्तीघोड्यांच्या मस्तकांना लावीत असत. सैनिकांचीं धनुष्यें सोन्याचांदीच्या पत्र्यांनीं मढविलेलीं असत. सैन्याची दहा दहा व वीस वीस लक्ष संख्या ध्यानांत घेतली तर ह्या धातुकामामुळें किती माणसांना व्यवसाय मिळून त्यांचें सन्मानानें पोषण होई याची कल्पना करितां येते. सुगंधी द्रव्यें, फुलें व अत्तरें यांची लोकांना अतोनात आवड असून विजयनगर-मधील व्यापाऱ्यांचा तो महत्त्वाचा व्यवसाय होता. सैनिक व श्रमजीवी वर्ग यांचें वेतन तत्काळ देण्याच्या नियमामुळें कृष्ण-देवराय त्या वर्गांत अत्यंत लोकप्रिय होता. बारबोसा नांवाचा परकीय प्रवासी लिहितो, 'कृष्णदेवरायाच्या जवळ १६०० मोतद्दार, ३०० अश्वशिक्षक वं २००० इतर कारागीर म्हणजे लोहार गवंडी, सुतार, व परीट असत व त्यांना तो रोज पगार देत असे. राजवाड्याच्या दरवाज्यांत तो भत्ता देई.' विजयनगरमध्यें सुवर्णमान व सुवर्णचलन होतें. मुख्य नाणें 'वराह' हें असून त्याच्यावर भगवंताच्या वराहावताराचें चिन्ह होतें. तांबें व चांदी-चींहि हलकीं नाणीं असत. वस्तूंच्या किमती कमी असून स्वस्ताई होती. पेस म्हणतो, 'विजयनगर हें सर्व जगांतील संपन्न शहर असून तांदूळ, गहूं, धान्यें, ज्वारी, बार्ली, घेवडा, कडधान्यें, चणे व कित्येक स्वदेशीय बीजें यांनीं परिपूर्ण होतें. वस्तु फारच स्वस्त किमतींत मिळत. शहरांत एका व्हिटेमला (१.७ पेन्स, दीड आणा) तीन व बाहेर चार पक्षी मिळत. एका व्हिटेमला किंवा दीड आण्याला ६ ते ८ तित्तिर पक्षी किंवा १२ ते १४ कबूतरें

मिळत. एक फनम किंवा एक हण (आठ आणे) ला द्राक्षांचे तीन घड व दहा डाळिंबें मिळत. एका पार्डोआस (५ रुपये) शहरांत १२ मेंढरें व रानांत १४ ते १५ मिळत. विजयनगरमध्यें घोडा आणि दासी असलेला सरदार महिन्यास ४ ते ५ पार्डोआ किंवा २० ते २५ रुपयांवर राहूं शकत असे. राजाला दरवर्षी एक कोट प्रताप (एक सोन्याचें नाणें) शिल्लक टाकण्याची संवय होती. यावरून त्याच्या खर्चास लागणाऱ्या संपत्तीची व राज्याच्या उत्पनाची कल्पना येण्यासारखी आहे. शहरांतील घरें राजवाड्यासारखीं दिसत, असें पेसनें वर्णन केलें आहे. आपले आश्रित, कवि व सामान्य प्रजा यांच्यावर कृष्णदेवराय अनेक प्रसंगीं देणग्यांची खैरात करी. वसंतोत्सवांत प्रतिवर्षी तो कवींना पारितोषिकें देत असे. तुलापुरुषदानाचा विधि त्यानें अनेकदां केला. या प्रत्येक वेळीं तो आपल्या भारंभार सोनें व मोती प्रदान करी. हंपीच्या विरूपाक्षाच्या देवालयापासून नदीच्या काठानें जाणाऱ्या मार्गावर राजतुला नांवाचें स्थान आहे. तेथें राजानें आपली सुवर्णतुला केली होती. आपल्या अधिकाऱ्यांना तो जसें प्रसंगीं कठोर शासन करी, तसेंच त्यांच्या कामगिरीबद्दल प्रसंगीं विशेष गौरवही करी. कलिंग देशाशीं झालेलें युद्ध संपल्यावर कृष्णदेवरायानें आपला मुख्य प्रधान तिम्मरसु उपाख्य आप्पाजी याला गालिचाच्या बैठकीवर बसवून त्याच्या मस्तकावर सुवर्ण व रत्नें यांचा अभिषेक केला होता. शांतता प्रस्थापित झाल्यावर आपल्या राज्यव्यवस्थेंतील दोष शोधून ते नाहींसे करण्याकडे कृष्णदेवरायानें खास लक्ष पुरविलें होतें. प्रजेला जाचक वाटणारे कर त्यानें बंद केले. त्या वेळची दळणवळणाचीं साधनें ध्यानांत घेतलीं तर साम्राज्याचा विस्तार फार मोठा होता. ह्या सर्व प्रदेशावर योग्य नियंत्रण रहावें म्हणून त्याचे त्यानें सुभे पाडले होते. या सुभ्यांचेहि छोटे विभाग असून ते स्वयंशाशित असत. डॉ. एस. कृष्णस्वामी अय्यंगार म्हणतात, 'दहाव्या ते चौदाव्या शतकांत चोलांचें राज्य आलें व गेलें, मुसलमानांच्या स्वाऱ्याहि झाल्या, तरी राज्य

व्यवस्थेची ही रूपरेखा टिकून राहिली. देवरायानें तिला संघटित स्वरूप दिलें तेव्हांपासून कृष्णदेवरायापर्यंत तिकडे कोणी लक्ष दिलें नव्हतें. त्यामुळें ह्या वेळेपर्यंत मोठमोठे सुभे हे मांडलिक राज्येंच बनत चालले होते. अशा स्थितींत साम्राज्याच्या चौकटीस या सुभेदारांच्या स्वातंत्र्यलालसेचें मोठें भय होतें. कृष्णदेवरायानें या सर्व सुभेदारांवर आपला नीट वचक बसविला, व हें भय दूर केलें.'

—(विजयनगर स्मारकग्रंथ पृष्ठ १७)

## धार्मिकता

कृष्णदेवराय हा स्वभावत:च अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचा असून त्याच्या धार्मिकतेमुळें दक्षिणेंत विशुद्ध स्वरूपांत भारतीय शिल्प प्रकट झालें व विकसन पावलें. डॉ. अय्यंगार लिहितात :—

'कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीतील महत्त्वाचें कार्य म्हणजे मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळें उद्ध्वस्त झालेल्या देवळांच्या जीर्णोद्धाराकरितां त्यानें वेगळा काढलेला निधि. आपली उत्तरेची मोहीम संपवून आल्याबरोबर दहा हजार मोहरा ह्या धार्मिक कार्यासाठींच वेगळ्या काढून त्यानें हें काम सुरू केलें. लहान प्रमाणावर सुरू केलेला हा उपक्रम पुढें पुष्कळच वाढला व पडकीं देवालयें दुरुस्त करणें येवढ्यावरच तो न राहतां लहान देवालयें भव्य व विस्तृत करण्याचाहि उपक्रम सुरू झाला. अशा प्रकारें जणू काय हिंदुधर्म जिवंत ठेवणाऱ्या व त्याची जोपासना करणाऱ्या धार्मिक संस्थाच ठिकठिकाणीं स्थापन करण्यांत आल्या. दक्षिण हिंदुस्थानांत जागोजागीं मोठमोठीं गोपुरें आहेत. त्यांतील बहुतेकांना 'रायगोपुरम्' असें म्हणतात. हीं सर्वच जरी कृष्णदेवानें बांधलीं नसलीं तरी त्यानें सुरू केलेल्या उपक्रमाचें तें पर्यवसान म्हणून त्यांना 'रायगोपुरम्' म्हणून संबोधिण्यांत येत असावें. त्याची आणखीहि धार्मिक कृत्यें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. उदयगिरीचा किल्ला घेतल्यावर तेथील बाळकृष्णाची मूर्ति विजयनगरला नेऊन त्यानें तिची तेथें स्थापना केली. तसेंच विजयनगर येथें त्यानें एक

सर्वोत्कृष्ट विठ्ठलमंदिर बांधलें; पंढरपूरच्या ऐतिहासिक विठ्ठल मूर्तीला मुसलमानांचा बरेच वेळा उपद्रव झाला होता म्हणून ती मूर्ति पंढरपूरहून विजयनगरास नेऊन ह्या देवळांत तिची स्थापना करण्याचें त्यानें ठरविलें. ह्या त्याच्या प्रवृत्तीमुळें विजयनगरच्या सरहद्दीवर ज्या मुलुखांत मुसलमानांचा फार त्रास होत असे त्या भागांतील सर्व देवालयें कृष्णदेवरायानेंच बांधलीं असा सर्वसाधारण समज रूढ आहे.' —(विजयनगर स्मारकग्रंथ, पृ. १६ व १७)

कृष्णदेवरायानें अनेक देवस्थानांना देणगी म्हणून जडजवाहीर दिलें. या देणगीचें प्रमाण काय असे याची कल्पना येण्यास्तव एकच उदाहरण पुरेसें होईल. त्यानें कालहस्तीश्वराला एक रत्नहार, पूजेचीं उपकरणें व सोन्याची रत्नजडित प्रभावळी दिली असा उल्लेख आहे. त्याच्या आमुक्तमाल्यदा या नांवाच्या ग्रंथावर वैष्णव धर्माची छाया असल्याचें आढळून येत असल्यामुळें, तो वैष्णव धर्माचा होता असें म्हणतात. पण वैयक्तिक उपासनेच्या विषयांत तो कोणत्याहि सम्प्रदायाचा अनुयायी असला तरी महामुनि विद्यारण्यांनीं दिलेल्या समान हिंदुत्वाच्या अधिष्ठाना-पासून या 'सकळवर्णाश्रमधर्मप्रतिपालक' सम्राटानें आपलें सिंहासन रेसभरहि ढळूं दिलें नाहीं. तिरुमल येथील वेंकटनाथ ही त्याची कुलस्वामिनी देवता होती. कृष्णदेवराय व त्याच्या दोन राण्या यांच्या प्रतिमा वेंकटनाथाच्या देवालयांत आहेत. उत्तरे-कडील 'सिंहाचलम्' पासून तो दक्षिणेकडील 'रामेश्वरम्' पर्यंतच्या सर्व सम्प्रदायांच्या मंदिरांना त्याच्या औदार्याचा लाभ झालेला आहे. अभग शिलेची नरसिंहाची भव्य मूर्ति त्याच्या वेळींच निर्माण झाली. विरूपाक्षाचें गोपुर त्यानेंच बांधलें. जैन सम्प्रदायाच्या वाढीलाहि त्याच्या राज्यांत भरपूर संधि मिळाली. कृष्णदेवरायानें कनकाभिषेक करून वल्लभाचार्यांचा गौरव केला होता असा उल्लेख 'वल्लभाचार्यचरितम्' या ग्रंथांत आहे. त्यानें माध्वपंथाला प्रोत्साहन दिल्याचाहि उल्लेख 'व्यासयोगिचरित'

या ग्रंथांत आहे. त्याची धर्मदृष्टया महत्त्वाची कामगिरी म्हणजे दक्षिणेकडील गोपुरांची पद्धति होय. त्या त्या संप्रदायाच्या उपासना-मंदिरासमोर असलेलें हें भव्य गोपुर म्हणजे त्या त्या संप्रदायाच्या सांस्कृतिक स्वरूपाच्या इतिहासाचें संपूर्ण उघडलेलें पृष्ठच होय. त्या त्या गोपुरावर त्या त्या संप्रदायाच्या दैवतप्रकरणाचा, साधु-संतांचा व द्रष्टयांचा संपूर्ण इतिहास चित्रित अथवा टंकित केलेला असतो.

## पांडित्य, प्रतिभा, शालीनता व विद्वत्परामर्श

कृष्णदेवराय हा केवळ पराक्रमी, उदार व राजनीतिज्ञच होता असें नव्हे, तर तो स्वतः प्रतिभासंपन्न कवि व पंडित होता. ‘आमुक्तमाल्यदा’ या नांवाचा त्याचा प्रसिद्ध तेलगू भाषेंतील ग्रंथ असून या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत आपण स्वतः संस्कृत भाषेंत लिहिलेल्या ग्रंथांचीं नांवें त्यानें उल्लेखिलीं आहेत. तीं पुढीलप्रमाणें: (१) मदालसाचरित्र (२) सत्यवधूप्रीणनम् (३) सकल-कथासारसंग्रह (४) ज्ञानचिंतामणि व (५) रसमंजरी. या पांच ग्रंथांपैकीं पहिला ग्रंथ ओजस्वी लेखनशैलीबद्दल, दुसरा ग्रंथ ध्वनिप्रधानतेबद्दल, तिसरा पौराणिक कथांच्या संग्रहाबद्दल, चौथा त्यांतील समर्पक वाक्प्रयोगाबद्दल व पांचवा त्यांतील माधुर्याबद्दल प्रसिद्ध होता. कालाच्या ओघांत जसें हें साम्राज्य तसेंच हे ग्रंथहि आज केवळ स्मृतिशेष आहेत. याशिवाय ‘जांबवती कल्याणम्’ या नांवाचें एक नाटकहि त्यानें लिहिलें. या नाटकांत जांबवानाची मुलगी जाम्बवती हिच्या भगवान् श्रीकृष्णाशीं झालेल्या परिणयाचें कथानक वर्णिलें आहे. विजयनगरच्या सम्राटांचें कुलदैवत जें विरूपाक्ष त्याच्या चैत्र महिन्यांतील उत्सवप्रसंगीं या नाटकाचा प्रयोग करण्यांत आला होता.

अशा प्रतिभासंपन्न, विद्यासंपन्न, व स्वतःच प्रथम श्रेणीचा ग्रंथ-कार असणाऱ्या उदारधी सम्राटाभोवतीं तशीच प्रभावळ निर्माण

होणार हें उघडच आहे. सम्राटाचा अमात्य तिम्मरसु उपाख्य आप्पाजी हाहि जसा रणशूर व राजनीतिकुशल तसाच उज्ज्वल योग्यतेचा संस्कृत पंडित व ग्रंथकार होता. अगस्त्य नांवाच्या ग्रंथकर्त्याच्या 'बालभारतम्' नांवाच्या ग्रंथावर त्यानें मनोरमा या नांवाची टीका लिहिली आहे. कृष्णदेवरायाभोंवतीच्या साहित्यिक प्रभावळींत तेलगू, कानडी, तामीळ व संस्कृत या चारहि भाषांचे नामवंत ग्रंथकार व पंडित होते. वाङमयनिर्मितीच्या दृष्टीनें हा वैभवशाली काळ असून विद्वानांचा सत्कार करण्याच्या प्रवृत्तीमुळें त्याच्या राजसभेला 'भुवनविजयम्' असें नांव मिळालें होतें असें म्हणतात. नादिंडलगोप, युसदेच्छ, बंदम्लक्ष्मीनारायण, ईश्वरदीक्षित हे त्याच्या राजसभेचे संस्कृत पंडित असून बंदम्लक्ष्मीनारायण हा तर संगीतज्ञहि होता. त्यानें संगीतसूर्योदयम्' या नांवाचा ग्रंथ लिहून तो सम्राटाला अर्पण केला. कृष्णदेवरायानें त्याच्यावर औदार्याचा वर्षाव करून हत्ती, सोन्याची शिबिका, दोन शुभ्र मोत्यांचीं छत्रें व मलहारी वाद्यें हीं राजभूषणें वापरण्याची त्याला अनुज्ञा दिली. ओरिसाची राजकन्या ही कृष्णदेवरायाची एक राणी होती याचा उल्लेख मागें केलाच आहे. 'तुक्कादेवी' हें तिचें टोपण नांव असून ती संस्कृतज्ञ व कवयित्री होती. 'तुक्कापंचकम्' नांवाचें तिचें काव्य आहे. याशिवाय अल्लसानी पेदुन्न, नंदी तिमण्णा, मादय्यगारी मल्लन्न, धूर्जटी, अय्यल राजू रामभद्र, पिंगली सुरण्णा, रामराज भूषण, तेनलिरामलिंगम्, कंदुकुरु रुद्र, तल्लपक पेद्दु, तिम्मलय्या, तल्लपक चिन्नान्न, चितलपूडी बेल्लकवि व देवीकुमर मल्लम्मा हे नामवंत तेलगू साहित्यिक तिम्मण्णा, व्यासराय, पुरंदरदास, कनकदास, अभिनववादी विद्यानंद, मल्लणार्य, कुमार वाल्मीकि, छाटू विठ्ठलनाथ हे कानडी साहित्यिक; कुमार सरस्वती, मंडल पुरुष, ज्ञानप्रकाश, तत्त्वप्रकाशकवि, हरिहृदयदास हे तामिळ साहित्यिक कृष्णदेवरायाच्या राजसभेंत आकाशांतील नक्षत्रमंडळाप्रमाणें शोभत होते. त्यांची त्या त्या भाषेंतील रचना भारतीय साहित्याचें तेजस्वी रत्नभांडार होऊन राहिलेली आहे. कृष्णदेवरायाच्या साहित्यिक दृष्टीला साम्प्रदायिकतेचीं बंधनें नसल्यामुळें

त्याच्या या साहित्यिक प्रभावळींत सर्व सम्प्रदायांचे पंडित होते. राजा हा इतका गुणग्राहक व विनयसंपन्न होता कीं तेलगू साहित्यांतील 'पितामह' पेद्दन्नकवि याची पालखी स्वतःच्या खांद्यावर वाहून राजानें त्याच्या पायांत आपल्या हातानें सुवर्णालंकार घातला होता. कृष्णदेवरायानें आपल्या 'आमुक्तमाल्यदा' ग्रंथानें तेलगू वाङ्मयांत मोलाची भर घातलेली आहे या ग्रंथांतील चौथ्या सर्गांत शुक्रनीतीच्या धर्तीवर राजनीतीचीं सूत्रें सांगितलेलीं आहेत. राजमहेन्द्रीचे श्री. टेकुमल्ल अच्युतराव आपल्या तुळुव राजवंशावरील लेखांत म्हणतात, कृष्णदेवराय यानें आन्ध्र काव्यवाङ्मयांत एक नवीन प्रकार प्रचलित केला. त्याच्या पूर्वी आन्ध्रदेशीय कवि हे संस्कृत काव्यांचे अनुवाद करीत किंवा त्यांतील कल्पना घेऊन तिच्या पायावर आपल्या कवित्वाचे मनोरे उठवीत. कृष्णदेवराय याला असलें उष्टावणें आवडणें शक्यच नव्हतें. त्यानें स्वतःच्या उदाहरणानें संस्कृत काव्याच्या धर्तीवर पण निराळ्या वळणानें 'प्रबन्ध' लिहिण्याची प्रथा पाडली. संस्कृत काव्यांत अनेक सर्ग असतात व एका सर्गाला एकच वृत्त असतें. परंतु त्यानें असें प्रणीत केलें कीं आन्ध्र प्रबंधाची कमींत कमी सर्गसख्या तीन व अधिकांत अधिक सर्गसंख्या सात किंवा आठ असावी. शिवाय हे सर्ग गद्यपद्यात्मक असून पद्य हें विविधवृत्तांत असावें. अशा लेखनपद्धतीमुळें आन्ध्रप्रबंध हे अधिक वाचनीय व आनंदोत्पादक झाले त्यानें रचलेला 'आमुक्तमाल्यदा' हा प्रबंध म्हणजे प्रबंधवाङ्मयांतील शेखरीभूत ग्रंथ होय. कृष्णदेवराय हा वैष्णव होता. त्यानें द्राविड वैष्णव ग्रंथांतून आपल्या काव्यासाठीं विषय निवडून काढला. याशिवाय इतर वैष्णव ग्रंथांतील कथांचाहि त्यानें भरपूर उपयोग करून घेतला. त्यामुळें त्याचा ग्रंथ हें जसें काव्य तसेंच तें धर्मपुस्तकहि झालें आहे. कृष्णदेवरायानें प्रचलित केलेला प्रबंधप्रकार तेलगू वाङ्मयाला नवीन असला तरी संस्कृतला मात्र नवीन नाहीं. 'चम्पू' या नांवानें संस्कृत साहित्यांत तो फार पूर्वींच रूढ झालेला आहे. कृष्णदेवरायानें तो तेलगू भाषेंत प्रथमच प्रचलित केला असा याचा निष्कर्ष आहे.

## कलोत्कर्ष

साहित्याप्रमाणेंच चित्र, नृत्य, शिल्प, संगीत इत्यादि कलांतहि त्या वेळीं परमोत्कर्ष झालेला आढळतो. तत्कालीन प्रवासी पेस याच्या वर्णनावरून या कलोत्कर्षाची कल्पना येते. पेस म्हणतो :

'राजवाड्यांतील हस्तिदंती महालांत राज्यांतील सर्व लोकांच्या अगदीं पोर्तुगीजांच्यासुद्धां चालीरीतींचीं चित्रें एके ठिकाणीं काढलीं. होतीं हे लोक आपल्या देशांत कसे राहतात हें त्या चित्रांत इतक्या बारकाईनें दर्शविलें होतें कीं, त्यांच्यांतील आंधळे व भिकारी कसे असतात यांचींहि चित्रें सुटलेलीं नव्हतीं.' या योगानें बाहेरील जगाचें राजस्त्रियांना सहजासहजीं ज्ञान होई. परकीय लोकांच्या पद्धतीच्या चित्रणावरून कलाप्रियतेप्रमाणेंच कृष्णदेवरायाच्या ठिकाणीं किती खोल राजकीय बुद्धिमत्ता वसत असली पाहिजे हें स्पष्ट होतें. पेस लिहितो :—

'एका दालनाच्या बाहेरच्या बाजूस वीरस्त्रियांचे हातीं धनुष्य बाण दिलेल्या आकृति भिंतीवर कोरलेल्या आहेत. दुसऱ्या दालनाचें रंगाचें काम चालूंच आहे. तें बाकीच्या सर्व कामांपेक्षां सुरेख व्हावयाचें असून तेथील भूमि, छत, सर्व कांहीं सोन्याच्या पत्र्यानें मढविलें जावयाचें आहे असें बरोबरच्या लोकांनीं कळविलें.'

पशूंना शृंगारण्याकडेहि चित्रकलेचा उपयोग होत असे. स्वतः राजानें केलेल्या सैन्याच्या पहाणीचें वर्णन करतांना पेस लिहितो: 'हत्तीवर किनखापाच्या किंवा जरतारी काम केलेल्या मखमलीच्या झुली होत्या. त्यांना जाळ्या व झालरी लावलेल्या होत्या. शिवाय इतर रंगीबेरंगी कापड घातलेलें होतें. हत्तींच्या दोन्ही बाजूंना घंटा लोंबत होत्या. त्या घंटांच्या आवाजाचा प्रतिध्वनि जणूं काय भूमींतूनच उमटत होता. हत्तींच्या गंडस्थळावर राक्षसांचीं व इतर वन्यपशूंचीं चित्रें काढलीं होतीं'

राजवाड्याच्या प्रवेशद्वाराचें वर्णन करतांना पेस लिहितो : 'राजवाड्याच्या प्रवेशद्वाराबाहेर हुबेहूब जिवंत भासणारे दोन

पुतळे दृष्टीस पडतात. उजव्या बाजूचा पुतळा राजाच्या वडिलांचा आहे. वडिलांची मूर्ति काळी सांवळी, सुदृढ, उंच आणि भरदार बांध्याची दिसते ह्या पुतळ्यावर ते जिवंत असतांना घालीत असल्याप्रमाणें पोशाख चढविला आहे.' कृष्णदेव-रायकालीन चित्रकलेचा कल वास्तवतेचें चित्रण व नैसर्गिक रंगांचें अनुकरण याकडे होता.

## शिल्पकला

सम्राट् कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत कृष्णस्वामीचें, हजार रामाचें व विठ्ठल स्वामीचें अशीं तीन मंदिरें बांधिलीं गेलीं. या तिन्ही मंदिरांचें बांधकाम कठिण व ओबडधोबड कुरुंदी दगडाचें आहे. यशोमंदिराचें बांधकाम ज्या काळ्या मऊ दगडाचें आहे त्या जातीचा दगड कांहीं ठिकाणीं वापरला आहे, परंतु सामान्यत: पहिलाच दगड वापरला आहे. या दगडांच्या वजनामुळें देवळांच्या कळसासाठीं अथवा गोपुरांसाठीं त्याचा उपयोग केलेला नाहीं. कृष्णदेवरायकालीन शिल्प व खोदकाम यांच्या संबंधीं आपला अभिप्राय व्यक्त करतांना विजयनगरच्या इतिहासाचे विख्यात संशोधक श्री. आर्. एन्. सॅलेटोर लिहितात:—

" विजयनगरच्या कारागिरांचें कौशल्य देवळांच्या व इतर इमारतींच्या भिंतींवर दृष्टीस पडतें. दक्षिण हिंदुस्थानांत विजयनगर येथील खोदकामाच्या कौशल्याची बरोबरी दक्षिणेंत इतरत्र कोठेंही होऊं शकणार नाहीं. विजयनगर, श्रीशैलम्, वेलोर, मुडबिद्री व भटकळ येथें त्या काळचा सर्व सामाजिक इतिहास दगडावर कोरलेला दृष्टीस पडतो. विजयनगर येथील यशोमंदिरांत, परदेशच्या वकिलाची भेट घेत असलेले राजे लोक, नृत्यकलेची चढाओढ पहात असलेल्या राण्या व त्यांचे यजमान, अरण्यांत रानडुकरें व पशुपक्षी यांची शिकार करणारे व कित्येक ठिकाणीं धनुष्यबाण घेतलेल्या आपल्या स्त्रियांबरोबर असलेले सरदार, आरशांत पहाणाऱ्या स्त्रिया, नृत्यकलेचें शिक्षण घेत

असलेल्या मुली, राजासमोर आणलेले कैदी वगैरे विविध प्रसंगांचीं चित्रें दगडावर कोरलेलीं दिसतात. या सर्व कोरीव कामांत एक तऱ्हेची आकर्षक शक्ति दृष्टीस पडते. हीं चित्रें पहात असतां त्यांच्या स्वाभाविकतेमुळें तीं जणूं काय प्रत्यक्ष आपणांपुढें आहेत असा भास होतो. ह्या वेळच्या पुतळे करण्याच्या कलेबद्दल विशेष लिहितां येत नाहीं. कारण काळाच्या फेऱ्यापुढें फारच थोडे पुतळे आज अस्तित्वांत आहेत. तरी पण विठ्ठलस्वामींच्या देवळांत व इतर ठिकाणीं जे राजे व राण्या यांचे शिरकमल-विरहित पुतळे आहेत, त्यांवरून त्या वेळच्या कारागिरांच्या कौशल्याची कल्पना येते. विशेषत: लुगडें नेसलेल्या स्त्रियांचीं दगडावर काढलेलीं चित्रें फारच मनोरम आहेत."

—(विजयनगर स्मारक ग्रंथ पृ. १९६–१९७)

## संगीत व नृत्य

कृष्णपूरच्या शिलालेखांत राजा कृष्णदेवराय याचा संगीतांत हात धरणारा दुसरा कोणीहि नाहीं असें वर्णन केलें आहे. आपल्या एका संगीतज्ञ आश्रिताला त्यानें राजभूषणें दिलीं होतीं याचा मागें उल्लेख केलाच आहे. स्वत: कृष्णदेवराय हा नाटककार असून त्याच्या 'जांबवतीकल्याणम्' या नाटकाचे प्रयोग होत असत याचा उल्लेख मागें केलाच आहे. त्यावरून आधींच श्रेष्ठ असलेली भारतीय रंगभूमि त्याच्या काळीं चांगल्याच ऊर्जितावस्थेस आली असली पाहिजे हें उघडच होतें. नृत्यांगनांना व विशेषत: देव-दासींना विशेष मान होता, यांवरून नृत्यकलेची ऊर्जितावस्थाहि स्पष्ट होते. बारबोसा नांवाचा प्रवासी लिहितो : "वयाचे दहावे वर्षी मुलीचा पालक तिला मोठ्या समारंभानें एखाद्या वधूप्रमाणें नटवून सर्व नातेवाईकांसमवेत देवळांत घेऊन जातो. अशा रीतीनें त्या 'देवदासी' बनत. त्यांना अत्यंत आदरानें वागविण्यांत येत असे." पेसनें लिहिलें आहे : 'त्यांचीं घरें सुशिक्षित वस्तींत असत; प्रत्येक शहरीं त्यांचीं घरें शहराच्या उत्तम भागांत असत. सभ्य

व संभावित गृहस्थ त्यांच्याकडे जात येत. त्यांचे घरीं जाणें येणें दूषण समजलें जात नसे. त्या स्त्रियांना राजस्त्रियांच्या कडे जाण्याची सुद्धां अनुज्ञा असे. त्या त्यांच्याकडे जाऊन रहात व त्यांच्याबरोबर पानविडे खात. कोणाही सरदाराला—मग तो कितीहि उच्च असो— असें वागण्याची सवलत नसे. त्यांना सन्मान देण्यांत येई.' महानवमीच्या दिवशीं देवतेच्या 'यशोमंदिराचे' पायऱ्याजवळ जाण्याचा अधिकार केवळ त्यांनाच होता. अशा लोकाश्रयामुळें त्या चांगल्याच धनसंपन्न असत. पेस लिहितो, 'त्यांच्या अंगावरील दागिन्यांचें कोण वर्णन करूं शकणार आहे? त्यांच्या गळ्यांत मोतीं, माणकें, हिरे वगैरे रत्नें असलेले सुवर्णाचे हार व इतर अलंकार, बाहू, कोपरे व मनगटें ह्यांच्यामध्यें घातलेलीं तसेंच बाजूबंद व अनेक तऱ्हेचीं कांकणें, कमरेंतील रसना व कमरपट्टे, पायांत तोरड्या, पैंजण वगैरे इतर दागिने यांचें किती वर्णन करावें?' त्यांच्या मालकीच्या जमिनी असत, त्यांच्या दासदासी असत व त्या डोल्या नि मेणे यांतून हिंडत. त्यांच्या दासदासी व त्यांचे दागिने हजाररामाच्या मंदिरांतील व यशोमंदिरांतील कोरीव चित्रांवरून पहावयास सांपडतात.

नृत्यकलेचें शिक्षण प्राचीन भारतीय संस्कृतीप्रमाणें राजस्त्रियाहि घेत असत. त्यासाठीं खास शिक्षकाची योजना असे. या शिक्षणासाठीं बांधलेल्या नृत्यशाळेचें वर्णन करतांना पेस म्हणतो : 'ज्या महालांत राजवाड्यांतील स्त्रिया शिक्षण घेत असत तो महाल अरुंद पण लांब आहे. त्याच्यांतील खांबावर मूर्ति कोरलेल्या आहेत. ते खांब व त्या मूर्ति बाजूच्या भिंतीपासून सुमारें एक एक हात अंतरावर अशा सबंध दालनभर आहेत. खांबाखांबांमध्यें सुमारें दोन दोन हात अंतर आहे. त्या साऱ्या कामावर सुरेख मुलामा दिलेला आहे. खांबावरील टोपीच्या दगडांत हत्ती व इतर वनपशु मोकळे व उठावदार कोरले आहेत. त्यामुळें पलीकडील तशींच चित्रें दिसण्यास अडचण पडत नाहीं. आंतील बाजूस विवक्षित ध्यानमुद्रा दर्शविणाऱ्या मूर्ति आहेत; पाठीला पाठ

लावलेलीं माणसें व इतर प्राणी ह्यांचींहि चित्रें आहेत. दोन दोन खांबांवर एक एक असे बरेच अडवट (Cross Bar) दिलेले आहेत ते लाकडी तावदानाप्रमाणें तबकडीदार आहेत. तेथें हातभर उंच अशा वृद्ध माणसांच्या मूर्ति कोरून त्यांच्यावर मुलामा केला आहे. प्रत्येक तबकडीमध्यें एक एक ह्याप्रमाणें साऱ्या दालनभर मूर्ति बसविल्या आहेत. खांबावरहि अशाच मूर्ति लहान, त्यावर त्याहून लहान, त्याच्याहीवर त्याहून लहान याप्रमाणें उतरत्या प्रमाणांत थेट घुमटापर्यंत पोहोंचविलेल्या आहेत. त्यांच्या प्रमाणबद्ध सौंदर्याचें वर्णन कोठवर करावें ? या मूर्ति व खांब यांच्या दरम्यान वेलबुट्टीच्या आकाराचीं पानें कोरलेलीं आहेत. त्या साऱ्या पानांना मुलामा केलेला असून त्याच्या पाठीमागल्या बाजूस लाल व निळा रंग दिलेला आहे. ह्याशिवाय खांबावर हरिणादि वनचर प्राण्यांचीं चित्रें कोरलेलीं आहेत. हत्तीच्यावर व तबकड्यांच्यामध्यें अप्सरांच्या बैठ्या मूर्ति कोरलेल्या आहेत व त्या लहान लहान खंजिरा वाजवीत आहेत.

प्रत्येक नृत्यविशेषामध्यें अखेरीला नर्तकीला जो पवित्रा असावा लागतो, त्याची ह्या तबकड्यांवरील चित्रें द्योतक आहेत. प्रत्येक तबकडींत निरनिराळ्या नृत्याचा प्रकार दाखविला आहे. त्यावरून नृत्यकला शिकत असतां प्रत्येक तऱ्हेच्या शेवटीं कशा रीतीनें उभें राहिलें पाहिजे हें चटकन् दिसून येऊन नृत्याचा पाठ आपोआपच मिळतो.

या दालनाच्या टोकाला एकीकडे सुरेख रंगवून तयार केलेली जागा आहे. तेथें नृत्य शिकणाऱ्या स्त्रिया आपलें नृत्य उठावदार व सुबक दिसावें म्हणून व शरीरास लवचिकपणा यावा म्हणून निरनिराळ्या तऱ्हेचे हातापायांचे व्यायाम घेत असत. त्यांच्या समोरच्या टोकाला उजवीकडील जागेंत नृत्यशिक्षण चालू असतां तें पाहण्याची व्यवस्था खास राजासाठीं केली आहे. या जागेच्या जमिनी, भिंती वगैरे सोन्यानें मढविलेल्या आहेत. भिंतीच्या मध्यभागीं सुमारें बारा वर्षांच्या मुलीची सुवर्णमयी प्रतिमा आहे. तिचे

ह्यात एका विवक्षित प्रकारच्या नृत्याच्या अवसानाच्या वेळीं असावे तसे उंच केलेले आहेत.'

राणी गंगादेवी, चिक्कादेवी यांसारख्या सम्राज्ञींच्या पांडित्यावरून तत्कालीन स्त्रीजीवनाची व स्त्रीशिक्षणाची पातळी समजून येण्यासारखी आहे. स्वराज्यांत राष्ट्रजीवनाची सर्वच्या सर्व अंगें कशीं समृद्ध, विकसित, संपन्न व वैभवशाली होतात याचें प्रात्यक्षिकच सम्राट् कृष्णदेवराय याच्या वेळीं निर्माण झालें होतें यांत शंका नाहीं.

✦ ✦ ✦

प्रकरण आठवें

# साम्राज्याचा अध:पात व अंत

इ. स. १५३० मध्यें सौभाग्य, कर्तृत्व, पांडित्य, व धार्मिकता यांचें संगमस्थान असलेला वैभवशाली सम्राट् कृष्णदेवराय वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षीं आजारी पडून कालवश झाला व या हिंदू साम्राज्याच्या ऱ्हासाला प्रारंभ झाला. त्याच्यानंतर त्या सिंहासनावर आलेल्या राजांच्या व्यक्तिवादामुळें व नादानपणामुळें साम्राज्याच्या घटकांतील एकसूत्रता भंग पावली. तिच्यांतच या धर्मसाम्राज्याच्या विनाशाचीं बीजें होतीं.

कृष्णदेवरायानंतर त्याचा धाकटा बंधु अच्युतराय व जांवई रामराजा यांच्यांत कोणी गादीवर बसावें याविषयीं संघर्ष उत्पन्न झाला. स्वत: कृष्णदेवरायानें अच्युतरायालाच पुढचा वारस म्हणून नियुक्त केलें असलें तरी कांहीं सामंतांनीं रामराजाचा पक्ष उचलून धरला. या आपसांतील संघर्षामुळें शत्रूचें फावलें. इस्माईल आदिलशहानें या संधीचा लाभ घेऊन रायचूर व मुद्गल सर केले व प्रत्यक्ष

विजयनगरवर चाल करून त्याचें उपनगर नागलापूर भुईसपाट केलें. रायचूर तर गमवावेंच लागलें; पण राज्य वांचविण्यासाठीं अच्युतरायाला आदिलशहास पुष्कळ धन द्यावें लागलें. या प्रकारानें रामराजा शहाणा होऊन त्यानें गादीच्या संघर्षांतून आपलें अंग काढून घेतलें. राजा झालेल्या अच्युतरायानें प्रथम राज्यांतील बंडाळी मोडून काढली व रायचूरवर मोठ्या सिद्धतेनिशीं चढाई केली. पण अच्युतरायाचा एक विश्वासपात्र मुसलमान सेनानी आसदखान यानें ऐन युद्धाच्या वेळीं विश्वासघात करून शत्रूला साह्य केल्यामुळें अच्युतरायाला रायचूरचा नाद सोडावा लागला. याप्रमाणें सम्राट् कृष्णदेवरायाच्या मृत्यूनंतर चवथ्याच वर्षी विजयनगरची उत्तर सरहद्द पुन्हां धोक्यांत आली. कांहीं दिवसांनीं हा अच्युत स्वत: विलासांत दंग झाला व राज्यकारभार आपल्या तिरुमल नांवाच्या दोन मेव्हण्यांच्या स्वाधीन करून त्यानें त्यांत लक्ष घालण्याचें सोडून दिलें. या मेव्हण्यांचें त्याला मोलाचें साह्यहि होत असेल व ते फार धुरंधरहि असतील; पण विजयनगरच्या मानधन सामंतांना ही शालकांची सत्ता मुळींच आवडली नाहीं. राजाच्या वतीनें कां होईना, पण आपल्या बरोबरीच्या सरदारांच्या आज्ञा पालन करण्यांत त्यांना कमीपणा वाटूं लागला. या मेव्हण्यांनाहि नव्या अधिकारामुळें माज चढून त्यांनीं लोकांवर अत्याचार करण्यास व उद्दामपणानें वागण्यास प्रारंभ केला. याप्रमाणें धर्मराज्यांतील धर्म संपला व केवळ सत्तास्पर्धेचें केन्द्र असणारें राज्य तेवढें राहिलें. साम्राज्यांत ठिकठिकाणीं सामंतांचीं व सुभेदारांचीं बंडें उद्भवलीं. अच्युतरायाच्या या दोन्ही मेव्हण्यांचें तिम्म किंवा तिरुमल हें एकच नांव होतें व तें सलकम् तिम्मराजु किंवा तिरुमलराजु ह्या आडनांवानें ओळखले जात. सर्व सामंतांचीं मनें त्यांच्याविरुद्ध विटून कृष्णदेवरायाचा जांवई रामराजा याच्या नेतृत्वाखालीं त्यांच्या विरुद्ध एक मोठा प्रबल पक्ष संघटित झाला. या गोंधळांतच इ. स. १५४१ च्या डिसेंबर महिन्यांत सम्राट् अच्युतराय मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर वरदांबा नांवाच्या

त्याच्या राणीपासून झालेला त्याचा पुत्र वेंकटदेवराय हा गादीवर बसला. अच्युतरायाचा रंगराय या नांवाचा एक धाकटा भाऊ होता. त्यानें वेंकटदेवराय हा अच्युतरायाचा अस्सल वारस नसल्यामुळें आपणच खरे वारस आहोंत अशी वार्ता प्रसृत करून राज्यसाधनेसाठीं प्रयत्न चालविले. रामराजानें रंगरायाचा पक्ष उचलून धरिला व तिरुमल बंधूंनीं आपल्या भाच्याचा पक्ष उचलून धरिला. या दोन्ही पक्षांत रामराजाच्या अंतःकरणांत राष्ट्रप्रेमादि उदात्त भावना असल्याचें प्रत्ययास येतें; पण तिरुमल बंधु हे केवळ स्वार्थी नरराक्षस होते. त्यांनीं रामराजाच्या पक्षासमोर आपलें कांहीं चालणार नाहीं असें पाहून खूप संपत्तीचें आमिष दाखवून विजापूरच्या इब्राहिम आदिलशहास विजयनगरला येऊन आपणांस साहाय्य करण्याविषयीं पाचारण केलें. आयतें साम्राज्य घशांत येत असलेलें पाहून आदिलशहानें वेंकटरायास साह्य करण्यास येत आहोंत असा बहाणा करीत तो विजयनगरला आला व राजधानीपासून दोन मैलांवर त्यानें आपली छावणी थाटली. या स्वारीचे दूरगामी परिणाम रामराजा व त्याच्या पक्षाच्या इतर सामंतांनीं ओळखले, व स्वतःच पडतें घेऊन नि इब्राहिम आदिलशहाच्या घशांत पुष्कळ द्रव्य ओतून त्यांनीं त्याला परत पाठविलें.

आदिलशहा गेल्यावर रामराजानें वेंकटदेवरायाभोंवतीं स्वतःचें कडें उत्पन्न केलें, व राज्यांतील दक्षिणेकडचीं बंडें मोडून काढण्याच्या कामगिरीवर तो गेला. तिरुमल बंधु तो जाण्याची संधीच पहात होते. तो जातांच तिरुमल बंधूंनीं वेंकटदेवरायास पुन्हां आपल्या पकडींत घेतलें व राज्यकारभाराचीं सूत्रें ते चालवू लागले. रामराजाला हें कळतांच तो राजधानीकडे वळला. त्याबरोबर घाबरून जाऊन तिरुमल बंधूंनीं इब्राहिम आदिलशहाला पुन्हां निमंत्रण दिलें. रामराजा येऊन पोहोंचण्याच्या आंतच आदिलशहानें विजयनगरांत पदन्यास केला. त्याचें स्वागत तिरुमल बंधूंनीं कसें केलें असेल? त्या घरबुडव्या राष्ट्रद्रोह्यांनीं, स्वामी विद्यारण्यांच्या प्रतिभेंतून निर्माण झालेल्या व पुण्यश्लोक बुक्कराय नि सम्राट्

कृष्णदेवराय यांच्या पादस्पर्शानें पवित्र झालेल्या धर्मसाम्राज्याच्या त्या महनीय सिंहासनावर इब्राहिम आदिलशहाला बसविलें आणि एक सप्ताह विजयनगरमध्यें आनंदमहोत्सव केला. आतां त्या सिंहासनाला जगण्याचा कांहीं अधिकार होता काय? त्याची वास्तु-देवता किती रुष्ट झाली असेल? तिच्या रोषाचें प्रत्यंतर त्या पिढींतच आलें.

रामराजानें परत येतांच हा लाजिरवाणा प्रकार पाहून तो स्तंभितच झाला. त्यानें तिरुमल बंधूंची भेट घेऊन त्यांनाच कार-भार पहावयास सांगितलें; पण आदिलशहाची ही ब्याद लवकर घालवून देण्याविषयीं विनवणी केली. ती तशी रिक्त हस्तानें कशी जाणार? तिरुमल बंधूंनीं पन्नास लक्ष होन आदिलशहाच्या घशांत ओतल्यावरच त्यानें विजयनगर सोडलें. आदिलशहा परत गेल्या-वर व रामराजासारखा प्रबल प्रतिस्पर्धी, सत्तास्पर्धेच्या राज-कारणाला राज्य बुडण्याचीं कडू फळें येत असलेलीं पाहून आपण होऊन निवृत्त झाल्यावर तिरुमल बंधूंनीं आपली दृष्टि सिंहासना-वरचें केवळ बाहुलें असलेल्या गरीब बिचाऱ्या वेंकटदेवरायाकडे वळविली. भाच्याविषयींचें प्रेम म्हणून त्यांनीं त्याचा पक्ष घेतलाच नव्हता. संघर्षांतील सत्तास्पर्धेचें राजकारण त्याच्या नांवाच्या आधाराविना चालण्यासारखें नव्हतें म्हणूनच केवळ त्यांनीं त्याचा पक्ष घेतलेला होता. रामराजाच्या, उदात्त हेतूंस्तव पड खाण्यामुळें त्यांच्या मार्गांतील अडथळा दूर होतांच थोरल्या तिरुमलानें आपल्या भाच्याला–सिंहासनस्थ वेंकटदेवरायाला–ठार मारून गादी स्वतःच बळकाविली.

गादी बळकाविणें सोपें असलें तरी ती पचविणें अत्यंत कठीण होतें. कोणीहि डोकें वर काढूं नये म्हणून तिरुमल बंधूंनीं प्रजेवर अनन्वित अत्याचार चालविले. चैनीसाठीं खजिन्याची वारेमाप उधळपट्टी चालविली. त्यांना खरी भीति राजसभेंतील सामंतांची होती. म्हणून त्यांच्यापैकीं प्रमुखांना भेटीला बोलावून त्यांनीं मूर्ख-पणानें व क्रूरपणानें त्यांचे डोळे काढले. त्याचा परिणाम या बंधूंच्या

२७३३५ ... २८८ ... ३०/७/५८

पूर्ण विनाशांत झाला. सरदारांनीं आपला संघ करून रामराजाला नेतृत्वासाठीं पाचारण केलें व रामराजानें विजयनगरवर स्वारी केली. धाकटा तिरुमल ससैन्य चार कोस नगराबाहेर येऊन त्याच्यावर तुटून पडला. पण सारें सैन्य रामराजाला पाहतांच त्याला जाऊन मिळालें, व एकटचा पडलेल्या तिरुमलाला पकडून ठार मारण्यांत आलें. रामराजानें विजयनगरांत प्रवेश करतांच सम्राट् कृष्णदेवरायाच्या राण्यांनीं आपल्या लोकांना नगराचीं द्वारें मोकळीं करून रामराजाचें स्वागत करण्याची आज्ञा दिली. थोरल्या तिरुमलाला मृत्यु समोर पाहतांच वेड लागलें. संतापाच्या लहरींत त्यानें आपले सर्व हत्ती व घोडे यांचे डोळे काढविले. तसेंच हिरे, माणिक, मोतीं वगैरे राजवाड्यांतील सर्व रत्नें जात्यांत घालून भरडलीं व त्यांची पूड उधळून टाकली. शेवटीं आपल्या महालांतील खांबाला एक तलवार आडवी बांधून तिच्या टोकावर आपण स्वतः जाऊन जोरानें आदळला व ती तरवार त्याच्या छातींतून आरपार जाऊन या नरपिशाच्चाचा अंत झाला.

रामराजानें कृष्णदेवरायाचा सर्वांत धाकटा बंधु जो रंगराय त्याचा मुलगा सदाशिव देवराय याला इ. स. १५४३ मध्यें गादीवर बसविलें. हा मुलगा केवळ दीडवर्षांचाच असल्यामुळें राज प्रतिनिधि या नात्यानें रामराजा स्वतः राज्यकारभार पाहूं लागला. आपले बंधु तिरुमल व वेंकटाद्रि यांना क्रमानें मंत्रिपद व सेनापतिपद देऊन त्यानें विजयनगरच्या साम्राज्याच्या अंतर्गत संघटनेस प्रारंभ केला. सुदैवानें त्याला अत्यंत अनुकूल संधि मिळाली. ती संधि म्हणजे बहामनी सुलतानांचे आपसांत प्रारंभ झालेले झगडे ही होय.

सम्राट् कृष्णदेवरायाच्या वेळींच एका पातशाहीचे पांच तुकडे झालेल्या बहामनी शाहयांचे आपापसांत झगडे सुरू झालेले होते. रामराजाच्या वेळीं तर एका बाजूनें बुऱ्हाण निजामशहा व गोवळकोंड्याचा जमशीद कुतुबशहा आणि दुसऱ्या बाजूनें इब्राहिम आदिलशहा व बेदरचा अमीरबरीद यांच्यामध्यें चांगलेंच युद्ध

जुंपून अहमदनगर व गोवळकोंड्याच्या सुलतानांनीं रामराजाला साहाय्यार्थ बोलाविलें. या संघर्षाचा रामराजानें पूर्ण लाभ घेतला. युद्धांत रामराजाच्या साह्यामुळें निझामशहाचा विजय झाला व पराभूत पक्षाकडून रामराजाला पुष्कळ संपत्ति मिळाली. ह्या सुलतानांच्या आपापसांतील कलहामुळें रामराजाला विजयनगरच्या साम्राज्याचें एकसूत्रीकरण करावयास भरपूर वेळ मिळाला व तें कार्य होतांच त्यानें या सुलतानांचीं भांडणें भेदनीतीनें चांगलींच चेतवून कधीं या पक्षाला तर कधीं त्या पक्षाला मिळून बहामनी राज्याचे लचके तोडावयास व उत्तरेकडे आपलें साम्राज्य वाढवावयास प्रारंभ केला. इ. स. १५५० मध्यें रामराजानें निझामशहा व आदिलशहा यांच्या भांडणाचा लाभ घेऊन, रायचूर व मुद्गल जिंकलें व सम्राट् कृष्णदेवरायाच्या नंतर झालेली विजयनगरची हानि भरून काढली. यानंतर बहामनी सुलतान वारंवार रामराजाचें साह्य मागत व त्यांच्याकडून द्रव्य उकळून रामराजा त्यांना स्वतःच्या लाभाच्या दृष्टीनें साह्य करी. त्याची ही भेदनीति त्याच्या जीवनाच्या सायंकाळपर्यंत यशस्वी होत राहिली. पण या सततच्या यशानें ‘ अखड सावधानता ’ नष्ट होऊन मोठमोठ्या राजनीतिज्ञांचे प्रज्ञाचक्षूहि अंध करणारा अहंकार त्याच्या ठिकाणीं उत्पन्न झाला. आणि त्यानेंच त्याचा आणि त्याच्याच बरोबर विजयनगरच्या साम्राज्याचाहि अंत घडवून आणला.

इ. स. १५५६ मध्यें रामराजानें पोर्तुगीजांना पराभूत करून गोव्यांतील पुष्कळसा प्रदेश विजयनगरच्या साम्राज्यास जोडला. इ. स. १५५७ मध्यें अली आदिलशहानें रामराजाच्या साहाय्यानें हुसेन निझामशहावर चढाई केली. या युद्धांत कोंडापल्ली प्रांत रामराजानें विजयनगरच्या साम्राज्यास जोडला. रामराजाच्या चढाईनें हुसेन निझामशहानें घाबरून त्याच्याशीं संधीचीं बोलणीं प्रारंभ केलीं. रामराजानें त्याला अशा अटी घातल्या कीं त्यानें आदिलशहाला कल्याणीचा दुर्ग द्यावा व स्वतः राजसभेंत येऊन आपले पाय वंदन करावे. दुसरी अपमानास्पद वाटणारी अटहि

प्राणभयानें मान्य करून निझामशहानें रामराजाचें चरणवंदन केलें व आपली सुटका करून घेतली. या युद्धानें यादवगिरी व बागलकोट हे दोन प्रांत विजापूरकरांकडून विजयनगरला मिळाले. परततांना तेलंगणांत शिरून रामराजानें गोवळकोंड्याच्या कुतुबशहाचा पराभव केला व पानगल आणि गणपुरा हे दोन नवे प्रदेश जिंकून घेतले.

याप्रमाणें १५६३ पर्यंत विजयनगरच्या साम्राज्याचा वर्धिष्णु उत्कर्ष होत होता. या उत्कर्षामुळें व एकसारखें यशच मिळाल्यानें रामराजाला अहंकार उत्पन्न झाला व शत्रूंच्या व्यवहाराकडे, त्यांना कस्पटासमान समजून तो दुर्लक्ष करूं लागला. प्रदेश गेल्यामुळें आदिलशहा व कुतुबशहा आपल्या मनांत जळत होते व प्रत्यक्ष राजाचें नव्हे, तर राजप्रतिनिधीचें चरणवंदन करावें लागल्यामुळें निझामशहा तर दुखावलेल्या सापासारखा फुत्कार टाकीत होता. विजयनगरच्या साम्राज्याचा विनाश करणाऱ्या तालिकोटच्या युद्धापूर्वीची परिस्थिति व यावनी सत्तांचें त्यासाठीं झालेलें संघटन यांचें शब्दचित्र रेखाटतांना अली आदिलशहाच्या पदरीं नोकर असलेला तत्कालीन एक लेखक रफिउद्दीन शिराझी लिहितो : "तालिकोटच्या लढाईपूर्वी विजयनगरचें साम्राज्य कळसास पोहोंचलें होतें. विजयनगरच्या राज्याचा विस्तार आजूबाजूस चारशें मैलांवर असून त्या पलीकडेहि राज्याचा दरारा शेंकडो मैल पसरला होता. विजयनगरच्या साम्राज्याच्या सीमेवर असलेल्या मुसलमानी राज्यांपैकीं विजापूरचा अली आदिलशहा हा विजयनगरच्या रामराजाच्या हातचें केवळ एक खेळणें झाला होता. बहामनी राज्य एकत्र असतांना तेथील राजांनीं विजयनगरच्या राज्यावर हल्ले केले होते व त्यांत मुसलमानी बहामनी राजांचा कित्येक प्रसंगीं जयही झाला होता. परंतु बहामनी राज्याचे तुकडे झाल्यानंतर विजयनगरचें साम्राज्य बहामनी राज्याच्या या स्वतंत्र घटकांना पुरून उरलें होतें. विजापूरची

आदिलशाही व अहमदनगरची निझामशाही यांचें वांकडें असल्यामुळें आदिलशहानें विजयनगरच्या रामराजाचें साह्य घेऊन निझामशहाच्या राज्यावर स्वारी केली. विजयी रामराजाच्या सैन्यानें निझामशहाचा दौलताबादेपासून जुन्नरपर्यंतचा सर्व मुलूख उजाड करून टाकला. या वेळीं हिंदू सैन्यानें शत्रूच्या मुलुखांत पुष्कळ लूटमार केली. मशिदींची नासधूस केली व कुराणाचा अपमान केला. रामराजाही या विजयानें चढून गेला. त्यानें आपल्या दरबारीं असलेल्या मुसलमानी राज्यांच्या प्रतिनिधींना प्रहर प्रहर खोळंबून ठेवावें व त्यांचा अपमान करण्यांत डौल मानावा असें तो वागूं लागला. अली आदिलशहा हा त्याचा मित्र; पण त्यालाहि रामराजाचा हा चढेलपणा खपला नाहीं. निझामशहा हा आपल्या राज्याची वाताहत झालेली पाहून विजयनगरच्या रामराजावर फारच चिडला. या काफिर हिंदुराज्याचा नाश करण्यासाठीं खऱ्या मुसलमानांनीं एकत्र झाल्याशिवाय गत्यंतर नाहीं याची त्याला खात्री पटली. त्यानें आपल्या विश्वासांतल्या सरदारांची पुढील तयारीसाठीं बैठक भरवून सल्लामसलत घेतली. इस्लामचें अस्तित्व टिकविण्यासाठीं हिंदू राज्याबरोबर शेवटचा निकराचा सामना देण्याची वेळ आली आहे व तींत जगूं वा मरूं या निश्चयानेंच पडलें पाहिजे असाच या मसलतीचा निर्णय झाला. निझामशहाजवळ किश्वरखान लारी व तुराब शिराझी नांवाचे मोठे विश्वासू सरदार होते. त्यांनीं निझामशहाला सुचविलें कीं, रामराजा प्रबळ आहे, त्याच्याशीं एकट्या दुकट्यानें लढून धडगत नाहीं. सर्व मुसलमान राजांनीं एक झालें पाहिजे. विशेषतः रामराजाचा एके काळचा स्नेही अली आदिलशहा याला फोडून आपल्या बाजूस पक्कें बांधून घेतलें पाहिजे. हा विचार निझामशहास पसंत पडला. विजापूर व अहमदनगर यांच्या दरम्यान सोलापूरच्या किल्ल्याचा वाद होता. निझामशहानें विजयनगरच्या हिंदू साम्राज्याविरुद्ध दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा संघ करण्याचें निश्चित ठरविलें व त्यांत विजापूरच्या अली आदिलशहानें येऊन मिळावें

म्हणून पूर्वीचा वाद मिटविण्यासाठीं त्यानें आदिलशहाकडे सोलापूरच्या किल्ल्याची चावी धाडली व 'इस्लामच्या रक्षणासाठीं एकत्र या' असा निरोप धाडला. विजापूरच्या आदिलशहाला रामराजानें साह्य केलें होतें त्यामुळें आदिलशहा दडपला गेला होता. त्यानें ह्या संधीचा उपयोग करण्याचें ठरविलें. निझामशहा व आदिलशहा यांच्यामध्यें सलोख्याचीं बोलणीं होऊन विजयनगरच्या हिंदू राज्याविरुद्ध मुसलमानी राज्यांचा संघ करून हिंदू राज्यावर शेवटचा हल्ला करण्याचें ठरविण्यांत आलें. या समेटाला शेवटची पक्की गांठ परस्परांतील विवाहसंबंधानें मारावी असें नाजूक राजकारणही लढविण्यांत आलें. हुसेन निझामशहाची मुलगी चांदबिबी आदिलशहाला देण्यांत आली व आदिलशहाची बहीण हदियाबिबी हिचें लग्न निझामशहाचा मुलगा मूर्तझा याच्याशीं लावण्यांत आलें. या दोन्ही लग्नांचे आरसपरस समारंभ मोठ्या थाटानें साजरे झाले; व उभय राजकन्या आपापल्या सासरीं नांदू लागल्या. गोवळकोंड्याचा कुतुबशहा व बेदरचा बरीदशहा हेहि विजयनगरच्या जुलुमानें संत्रस्त झाले असल्यामुळें तेहि निझामशहाच्या संघाला येऊन मिळाले. वऱ्हाडच्या इमादशहाचें निझामशहाशीं बरें नसल्यामुळें तो मात्र या मुसलमानी संघांत सामील झाला नाहीं.

विजयनगरचा राजा लढाई स्वतः सुरू करणार नाहीं हें माहीत असल्यामुळें स्वतः होऊनच कुरापत काढण्याचें आदिलशहानें ठरविलें. आदिलशहानें "आमचे रायचूर व मुद्‌गल हे किल्ले आम्हांस परत करावे" असा निरोप वकिलाहातीं विजयनगरच्या रामराजाकडे पाठविला. रामराजानें हिंदू राज्याविरुद्ध चाललेला मुसलमानी राज्यांचा हा कट ओळखला व त्यानें आदिलशहाच्या वकिलाचा उपहास करून हांकलून लाविलें. इतकें झाल्यावर इस्लामच्या रक्षणासाठीं व काफिरांच्या नाशासाठीं सर्वांनीं आपले प्राण जाईपर्यंत तनमनधनें करून शिकस्त करावयाची अशा प्रकारचे करारमदार ह्या चारी मुसलमानी राजांचे झाले. लगेच

सर्वांच्या फौजा लढाईवर निघाल्या व त्यांनीं विजापूरकरांच्या ताब्यांतील तालिकोट येथें आपल्या छावण्या ठोकल्या. आदिल-शहानें या सैन्याचें मोठ्या प्रमाणांत उत्तम स्वागत केलें. या सैन्याला मेजवान्या दिल्या व दाणागोटा पुरविण्याची व्यवस्था केली. मुसलमानांचें सैन्य तालिकोटला पोहोंचल्याचें समजल्या-बरोबर रामराजानें आपला थोरला भाऊ तिम्मराज याच्या बरोबर वीस हजार घोडदळ, एक लाख पायदळ व पांचशें हत्ती आघाडीवर धाडले व कृष्णानदीचे सर्व उतार रोखून धरण्यास सांगितलें. ह्या अफाट हिंदू सैन्यानें तावडतोब कृष्णा नदीच्या सर्व उतारांवर पक्का बंदोवस्त ठेविला. ठिकठिकाणीं मोर्चे बांधून तोफा रोखण्यांत आल्या व मुसलमानांना कृष्णा पार होणें अशक्य करून टाकलें. रामराजानें सैन्यासाठीं लष्करभरती जारीनें सुरू केली व दुसऱ्या भावाबरोबर सैन्याचा दुसरा हप्ता आघाडीवर धाडला व स्वत: एक मोठें सैन्य घेऊन तो मुसलमानांवर चालून गेला. रामराजाचें एकंदर तीन तुकड्यांतील सैन्य एक लाख घोडेस्वार व पांच लाख पायदळ इतकें होतें. ( रामराजाचें सैन्यबल इतकें प्रचंड होतें कीं या पांचहि मुस्लिम राज्यांच्या एकजुटीची त्यानें केवळ थट्टा केली. आपले सर्व सरदार व सुभेदार एकत्रित करून त्यानें युद्धाची कल्पनातीत सिद्धता केली. " साठ बंदरें व अनंत वैभवशालीं शहरें व परगणे यांची संपत्ति खर्च करून सीलोनच्या सरहद्दीपासून विजयनगरसाठीं लढण्यास आलेल्या लोकांस युद्धसामग्री देण्यांत आली " असें वर्णन उपलब्ध आहे.) कृष्णा नदी ओलांडून जाण्याच्या सर्व जागा हिंदू सैन्यानें रोखून धरल्यामुळें मुसलमानी बादशहांना मोठी चिंता पडली. कृष्णा नदींत आणखी कांहीं उतार सांपडले पण ते अत्यंत अवघड होते. 'अवघड उतारांवरून मुसलमानी सैन्य नेण्यांत येणार असल्याची अफवा उठवावी व त्याप्रमाणें सैन्याची हालचाल करावी, ते पाहिल्यावर हिंदू सैन्य सोप्या उतारांची मोर्चेबंदी व बंदोबस्त सोडून आपल्या मागें धावेल, मग रात्रीं छापा घालून सोपे उतार

क़ाबीज करून सैन्य सोप्या उतारानें परतीरावर उतरवावें ' अशी मसलत ठरली; व हिंदू सैन्याच्या गाफीलपणामुळें सारें मुसलमानी सैन्य परतीरावर सुरक्षितपणें उतरूं शकलें !

## मुसलमानी सैन्याची रचना

सकाळ उजाडली. दोन्ही सैन्यें एकमेकांसमोर उभीं होतीं. आदिलशहा, निझामशहा, वगैरे मंडळींनीं एकत्र जमून लढाईची आंखणी केली. आपल्या सैन्यांत इमामांच्या नांवानें बारा निशाणें उभारली. व "अल्ला आमच्या मदतीस आहे. जय आपलाच आहे" असें त्या निशाणावर लिहिलें. त्यामुळें मुसलमानी सैन्यांत उत्साह व आवेश पसरला. उजवीकडे अली आदिलशहा, डावीकडे कुतुबशहा व अली बरीदशहा, मध्यें हुसेन निजामशहा, त्याच्यापुढें तोफांची रांग व सर्वत्र हत्ती अशी मुसलमानी सैन्याची मांडणी करण्यांत आली. मुसलमानी सैन्यानें आपली मांडणी व्यवस्थित केल्यावर अत्यंत निकराचा भयंकर हल्ला हिंदू सैन्यावर चढविला.

रामराजाला आपल्या सैन्याच्या प्रचंडत्वाचा व शौर्याचा मोठा गर्व होता. त्यानें आपलें असंख्य सैन्य पसरून ठेविलें. मुसलमानांचा पहिला जोराचा हल्ला हिंदू सैन्यास परतवितां आला नाहीं. त्यांची दाणादाण होऊं लागली. रामराजा सिंहासनावर बसून सैन्यास उत्तेजन देत होता. त्यास घोड्यावर बसून लढाईचें नेतृत्व स्वीकारण्यास त्याच्या सरदारांनीं सांगितलें असतां तें त्यानें झिडकारलें. थोड्याच वेळांत मुसलमानांच्या जोराच्या हल्ल्यापुढें हिंदू सैन्याची दाणादाण होऊं लागली. त्याबरोबर रामराजा एका सुवर्णखचित आसनावर बसला. त्यानें आपल्यापुढें सुवर्णाच्या नाण्यांचा व रत्नखचित हत्यारांचा व दागिन्यांचा ढीग रचला व शौर्य गाजविणारास मोठमोठीं बक्षिसें देण्याचें जाहीर केलें. हिंदू सैनिकांस जोराचा आवेश चढला. पन्नास हजार हिंदू तिरकमठेवाले व बंदुकवाले पुढें सरसावले व त्यांनीं मुसलमानी सैन्याच्या डाव्या बाजूचा पुरा धुव्वा उडविला.

## रामराजा सांपडला

आतां रामराजावर दोघांकडून हल्ला आला. मागील बाजूनें आदिलशहा व पुढील बाजूनें निझामशहा व कुतुबशहा चाल करून गेले. तोफखान्याचा मुख्य रुमीखान यासहि तोफखाना सुरू करण्यास हुकूम झाला. त्या वेळीं दोन्ही सैन्यांत भयंकर हाणामारी चालू होती. दोन्ही बाजूचे वीर निकरानें लढून एकमेकांचीं शिरकमलें गवत कापावें तशीं कापून आकाशांत उडवीत होते. सर्वत्र रक्तमांसाचा चिखल झाला होता.

हिंदू वीरांच्या शौर्यामुळें मुसलमानी सेनेचा धीर सुटलेला पहातांच 'मारीन किंवा मरेन' या इर्ष्येनें निझामशहानें आपला तंबू त्या रणमैदानांत ठोकला. त्याच्या कृतीनें मुसलमानी सैन्याला जोराचें अवसान चढलें. मुसलमानी सैन्याचा पाठलाग करणाऱ्या हिंदू सैन्यावर मुसलमानी सैन्य उलटलें व हिंदूंचा चारहि बाजूनें कोंडमारा करण्यांत आला. आदिलशहानें तिम्मराजाचा पराभव केला, व तो रामराजाकडे वळला. मुसलमानांच्या या निर्वाणीच्या माऱ्यापुढें हिंदू सैन्याचा टिकाव लागेना. ते सैरावैरा पळू लागले. आपल्या पळपुटच्या सैन्याला अडविण्याचें कार्य रामराजाला अशक्य झालें. ह्या पळपुटचा सैनिकांपैकीं एकाच्या वारानें रामराजा जखमी झाला व तो रणांगणावर उभा राहिला. त्याच्या सभोंवतालीं थोड्या हिंदू सैनिकांचा गराडा होता. निझामाच्या तोफखान्यावरील अधिकारी रुमीखान यानें पळत्या हिंदू सैनिकांवर तोफांचा भयंकर मारा करून हजारों हिंदूंस कंठस्नान घातलें. रुमीखान स्वतः हत्तीवर बसून रणांगणावर हिंडत असतां त्यानें रामराजाभोंवतीं जमलेल्या थोड्या हिंदू सैनिकांचा गराडा पाहिला व एकदम त्यांचेवर हल्ला चढविला. रामराजाचा एकनिष्ठ सेवक दिलपतराव ब्राह्मण होता. त्यानें ओरडून म्हटलें कीं, 'रामराजाला तुडवूं नका.' रामराजा जिवंत बघतांच रुमीखानानें त्याला हत्तीच्या सोंडेनें उचललें व तो त्याला घेऊन तडक निझामशहाकडे गेला व त्याच्यापुढें रामराजाला उभा केला.

'आतां कसें काय आहे!' निझामशहानें रामराजाला उपहासानें विचारलें. रामराजानें 'दुर्दैव आमचें' असें दर्शविण्यासाठीं कपाळाला हात लावला.

हिंदू सैन्याची लांडगेतोड चालू होतीच. निजामशहा रामराजाशीं बोलत असतां त्याचा एक सरदार हकीम कासीम बेगम ताबेझी तेथें आला व 'वेळ घालविला तर आदिलशहा येऊन रामराजाला घेऊन जाईल यासाठीं ताबडतोब त्याचें शिर कापावें असा त्यानें निझामशहाला आग्रह केला. ताबडतोब निजामशहाचे हुकुमानें रामराजाचें शिर कापण्यांत येऊन ते उंचावर धरण्यांत आलें. आपल्या राजाचें शिर पहातांच हिंदू सैन्याचा धीर सुटला व तें विजयनगरकडे धावूं लागलें. रणांगणापासून विजयनगरपर्यंत हिंदू सैन्याचा मुसलमानांनीं पाठलाग केला व हजारों हिंदू कापून काढले. लक्षावधि रुपयांची धनदौलत व शेंकडो दासदासी मुसलमानांनीं लूट म्हणून गोळा केलीं. शेंकडो हत्ती, निशाणें मुसलमानी बादशहांनीं जमा केलीं. रणांगणावर सोनें, रुपये, रत्नें अगणित पडलीं होतीं. त्यांचीहि लूट करण्यांत आली. त्यांपैकीं हत्ती, निशाणें व तोफा हीं सरकारजमा करण्यांत आलीं. पण सोनेंचांदीची केलेली लूट प्रत्येक शिपायास खासगी जमा करण्यास परवानगी दिली. या लढाईंत कामास आलेल्यांची नोंद करण्याचें काम बारा दिवस चाललें होतें. एकंदर दहा लक्ष सैनिक कामास आले असें म्हणतात.

## लढाईनंतर

लढाई संपल्यानंतर वीस दिवस मुसलमानांनीं रणक्षेत्रावर मुक्काम करून जखमी लोकांना उपचार केले. ह्या दिवसांत विजयनगरच्या भयभीत प्रजाजनांनीं पोबारा केला. कित्येक आपापल्या घरांत, कोठारांत, गुहांत लपले. कित्येक वर्षें परशत्रूंचा उपद्रव न झाल्यामुळें प्रचंड वैभवास चढलेलें विजयनगर! त्या शहरांत वीस दिवसानंतर मुसलमानांनीं प्रवेश केला व तेथें सहा महिने वास्तव्य केलें. विजयनगर व आसपास कित्येक मैल सर्वत्र जाळपोळ करण्यांत येऊन लूट करण्यांत आली. हजारों लोकांना

ठार करण्यांत आलें. कोटयवधि रुपयांची लूट झाली व विजयनगर साम्राज्याच्या साऱ्या वैभवाला आग लावून तें भस्मसात् करण्यांत आलें. निम्मराज पालकोंडयाच्या किल्ल्यांत व रामराजाचा मुलगा अनागोंदीपासून तीन मैलांवरच्या गुहेंत दडून राहिले.

या युद्धाच्या प्रारंभीं रामराजाला विजयाची इतकी निश्चिति वाटत होती कीं, आयत्या वेळीं त्याच्या प्रचंड सैन्यबलाकडे पाहून घाबरलेल्या अली आदिलशहानें येतांना घेतलेला प्रदेश परत देण्याच्या अटीवर त्याच्याशीं संधीच्या वाटाघाटी करण्यासाठीं निरोप पाठविला असतां त्यानें त्या गोष्टीला आपला स्पष्ट नकार दिला. अशा स्थितींत रामराजाचा पराभव कां झाला असेल? याचें खरें कारण आयत्या वेळीं झालेल्या त्याच्या विश्वासघातांत दडलेलें आहे. निर्वाणीच्या वेळीं प्रत्येकी साठ सहस्र सैन्य पाठीशीं असलेले त्याच्या पदरचे दोन मुसलमान सरदार स्वामिद्रोह करून मुसलमान सैन्याला जाऊन मिळाले. वस्तुत: या युद्धाचें स्वरूप नेहमीसारखें नसून ते हिंदू व मुसलमान असें झालें आहे हें रामराजाला कळावयास हवें होतें. पण त्याच्या अहंकारी स्वभावामुळें 'सावधपण सर्वविषयीं' हा राजकारणांतील महामंत्र तो विसरला आणि त्यानें आपला सर्वनाश ओढवून घेतला. निझामशहाच्या मनांत रामराजाविषयीं इतका विलक्षण दंश होता कीं, त्याच्या वधानंतर त्यानें त्याचें तोंड पेंढा भरून तें आपल्या राजधानीच्या मुख्य गटाराच्या तोंडाशीं लावलें व कित्येक दिवसपर्यंत त्यांतून गांवांतील सारें गटार वहावयास लावलें असें मुस्लिम इतिहासकार म्हणतात.

यानंतर यवनांनीं राजधानीचा जो भयानक विध्वंस केला त्याचें वर्णन करतांना विख्यात पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, 'जगाच्या इतिहासांत इतक्या वैभवशाली शहराचा एका रात्रींत इतका भयानक विध्वंस झाल्याचें दुसरें उदाहरण नाहीं. त्याचें वर्णन करतांना शब्द आठवत नाहींत

व जिव्हा मौनावते.' जें जें कांहीं सौंदर्यशाली व वैभवशाली होतें त्या प्रत्येकाचाच नाश करण्यांत आला. तीनशें वर्षें जगाचे डोळे दिपविणारी ही महान् राजधानी आज हृदयद्रावक भग्नावशेषांचें वसतिस्थान होऊन राहिली आहे!

याप्रमाणें तालीकोटच्या अथवा राक्षसतंगडीच्या युद्धानें विजयनगर धुळीला मिळालें तरी विजयनगरचें साम्राज्य मात्र आरवीड घराण्याच्या नेतृत्वाखालीं पुढें शंभर वर्षेपर्यंत कसेंबसें जीव धरून होतें. याचें कारण केवळ युद्धापुरता झालेला मुस्लिम सत्ताधाऱ्यांमधील एकोपा पुढें टिकून न राहतां त्यांची आपापसांतच पुनश्च भांडणें सुरू झालीं हें होय. विजयनगरचा खरा विद्वेष काय तो, चरणावर मस्तक ठेवावें लागल्यामुळें निझामशहालाच होता; बाकी कोणाला त्याची मोठीशी चीड नव्हती. रामराजाच्या पराभवाचें खरें कारण त्यानें ही एकच निर्णायक लढाई द्यावयाचें ठरविलें हें होतें. तशी त्यानें जर निर्णायक लढाई दिली नसती तर तात्पुरता एकोपा झालेले हे मुस्लिम सत्ताधारी लवकरच आपापसांत भांडून विजयनगरच्या परिसरांत हळूहळू समाविष्ट झाले असते असें मानावयास जागा आहे. विजयनगरच्या विनाशानंतर रामराजाचा धाकटा भाऊ तिरुमल यानें राजधानी बदलवून तीपेनुकोंडा येथें नेली व लवकरच साम्राज्याची स्थिति सुधारली. पुढें १००वर्षेपर्यंत हें राज्य कसेंबसें टिकून त्याचा शेवटचा अधिपति श्रीरंग नायक याच्या वेळीं त्या राज्याचा अंत झाला. बंडखोर सरदारांनीं मध्यंतरींच्या काळांत मूळ सत्तेला झुगारून देऊन आपापलीं स्वतंत्र अशीं नवीं राज्यें उभारलीं. म्हैसूरचें राज्य हें अशापैकींच एक होय. श्रीरंग नायकाच्या वेळीं आपापसांत युद्धें प्रारंभ होऊन ही सत्ता विस्कळीत झालीच होती. त्या नंतर विजापूरकरांच्या वतीनें छत्रपति शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे यांनीं विजयनगरच्या उर्वरित अवशेषांना जिंकून त्यांचा संपूर्ण पराभव केला व श्रीरंगनायक अज्ञातवासांत निघून गेला. पुढें श्रीरंगनायकाची राणी हिनें छत्रपति शिवाजी

महाराजांच्या दक्षिण दिग्विजयाच्या वेळीं त्यांना प्रार्थना केल्यामुळें या हिंदू साम्राज्याचें ऋण ओळखून महाराजांनीं तिला कांहीं नक्त नेमणूक करून दिल्याचा एका रौप्यमुद्रिकेंत उल्लेख आहे.

दक्षिण हिंदुस्थानांत मुसलमानी सत्तेचें आक्रमण सुरू झाल्यावर तें आक्रमण थोपविण्याचा व परतविण्याचा निकराचा प्रयत्न न झाला तर या हिंदू देशांत हिंदू संस्कृतीचें बीजसुद्धां शिल्लक उरणार नाहीं या प्रखर जाणिवेंतून व धगधगीत आवश्यकतेंतून विजयनगरचा जन्म झाला, व विजयनगरचें उद्दिष्ट पूर्णपणें सफळ होऊन दक्षिण भारतापुरतें तरी समर्थ, संपन्न व वैभवशाली हिंदू राष्ट्र तीनसाडेतीनशें वर्षेंपर्यंत तेथें नांदलें. या साम्राज्यानें तीनशें वर्षेंपर्यंत एक उज्ज्वल परंपरा निर्माण केली. पुढें तें कोसळलें, पण त्याची पार्श्वभूमीच शिवछत्रपतींच्या राष्ट्रपुनरुत्थानाच्या कार्याला प्रेरक झालेली आहे. विधिघटनेनें या साम्राज्याला शिवछत्रपतींच्या पराक्रमी पित्याच्या हस्तानेंच शेवटची तिलांजलि मिळालेली आहे. त्यामुळें पुष्कळ इतिहासकार शहाजीराजांना दोष देतात. शिवाजी व शहाजी महाराज यांची तुलना करतांना शिवछत्रपतींचे एक नवे चरित्रलेखक श्री. भावे यांनीं शहाजींना या संबंधांत दोष दिला आहे. सातारा येथील हिस्टॉरिकल म्यूझियमचे क्यूरेटर श्री डिकसळकर यांनीं या संबंधांत शहाजीराजांची कडक शब्दांत हजेरी घेतली आहे. श्री. डिकसळकर म्हणतात, '१६३७ ते १६६४ हा शहाजीच्या आयुष्याचा उत्तरभाग विजापूरच्या सुलतानाच्या वतीनें कर्नाटक जिकण्यांत, विजयनगरच्या सम्राटाचा मुलूख घेण्यांत व शेवटीं त्याचा निःपात करण्यांत खर्ची पडला. तो हिंदू असला तरी विजयनगरशीं त्याचा शेवटपर्यंत शत्रुत्वाचा संबंध होता. प्रथम कर्नाटकांतील राज्यें जिंकण्यास व पुढें विजयनगरचा नाश करण्यास शहाजीची कामगिरीच बहुतांशीं कारण झाली. ज्याच्या मदतीनें विजयनगरच्या हिंदू राज्याचें आणखी कित्येक वर्षें रक्षण झालें असतें असा शहाजी हा मोठा हिंदू सेनापति होता ही गोष्ट खरीच आहे. परंतु शहाजीच्या सर्व जीवितांत व्यापक

राष्ट्रीय किंवा धार्मिक कल्पना आपल्याला दिसत नाहींत. आपल्या धन्याचें काम करणें व त्याची कृपा संपादणें येवढाच त्याचा जीवितहेतु दिसतो. ही मनोवृत्ति एकट्या शहाजीचीच होती असें नाहीं. त्या काळचे बहुतेक सर्व हिंदू सरदार हीच गोष्ट करीत होते. विजयनगरचे मांडलिकहि एकमेकांविरुद्ध लढतांना दिसतात. शहाजीनें आपले धनी कसे बदलले हें प्रसिद्धच आहे. त्याच्या कामगिरीचें चीज कोणी करीना म्हणून त्याला ही गोष्ट करावी लागली. त्यानें विजापूरकरांची दीर्घकाळ व अखेरपर्यंत सेवा केली. पण त्यांनींहि त्याला दोनदा संशयावरून कैद केलें. अर्थातच शहाजी नोकरीसंबंधानें अत्यंत तिरस्कार दाखवितांना आढळतो. शहाजीनें विजापूरची नोकरी सोडून विजयनगरची सेवा स्वीकारली असती तर कर्नाटकच्या इतिहासास कदाचित् निराळेंच वळण लागलें असतें. कारण विजापूरची नोकरी करीत असतां त्यानें दक्षिणेकडे जो मराठी सत्तेचा पाया घातला तो त्याला विजयनगरची सेवा पत्करूनहि घालतां आला असता '

—(विजयनगर स्मारक ग्रंथ, पृष्ठ १११ व ११२.)

उपलब्ध ऐतिहासिक पुराव्याचा विचार केला तर शहाजी महाराजांवरील हे सारे आक्षेप निर्मूल आहेत असें दिसून येतें. ज्या विजयनगरची सेवा शहाजी राजांनीं करणें आवश्यक होतें असें श्री. डिकसळकर म्हणतात तें शहाजी राजांच्या या स्वाऱ्यांच्या वेळीं त्यांची आधारशिला बनण्याच्या अवस्थेंत तरी होतें काय? राज्य म्हणून त्याचें स्वरूप मोडकळीस आलेल्या व लवकरच भुईसपाट होणाऱ्या प्रासादासारखें झालें होतें. ज्या ध्येयवादावर विजय-नगरच्या साम्राज्याचें सिंहासन उभारण्यांत आलें होतें तो ध्येय-वाद शहाजी राजांच्या हृदयांत बद्धमूल झालेला असला तरी विजयनगरच्या तत्कालीन वारसदारांना त्याची पुसटती ओळखसुद्धां नव्हती. याचें एकच निदर्शन येथें देतों. शहाजीनें ज्याला बुडविलें असा आक्षेप आहे त्या श्रीरंग नायकानें दिल्लीच्या शहाजहान बादशहाला साहय मागितलें होतें, व हें साह्य मागतांना त्यानें जें

पत्र पाठविलें त्यांत विजयनगरचें स्वातंत्र्य अबाधित राखून साम्राज्य सुसंघटित करून दिल्यास त्या मोबदल्यांत आपण धर्मांतर करून मुसलमान व्हावयास सिद्ध आहोंत असें लिहिलें होतें. ज्या धर्माच्या संरक्षणासाठीं विजयनगरचें राज्य अस्तित्वांत आलें त्या धर्मावरच तेथील वारस तिलांजलि द्यावयास सिद्ध असल्यावर शहाजीनें त्यांना कशास्तव आश्रय द्यावयाचा व कशास्तव सेवा पत्करावयाची ? आपापसांतील यादवीमुळें विजयनगरचें राज्य सभाळणें त्याच्या वारसांनाच इतकें जड झालें होतें कीं आज या बंडखोरांच्या आश्रयास तर उद्यां त्या, अशा अवस्थेंत स्वत: श्रीरंग-नायकावरच भटकण्याची पाळी आली असें इतिहास सांगतो. ही परिस्थिति कांहीं शहाजीनें उत्पन्न केलेली नव्हती. शहाजीच्या स्वाऱ्यापूर्वींच ही परिस्थिति उत्पन्न झालेली होती. कोणत्याहि राष्ट्रांतील अथवा राज्ययंत्रातील ध्येयवाद सुटला कीं ही परिस्थिति उत्पन्न होतेच. कारण राज्यांतील अथवा राष्ट्रांतील व्यक्तिवाद-निरपेक्ष संघजीवनाचें अस्तित्व हें केवळ ध्येयवादावरच अवलंबून असतें. एकदां धर्मसंरक्षणाचें व मूल्यसंरक्षणाचें ध्येय संपलें म्हणजे मग राजकारणाला व राज्ययंत्राला सत्तास्पर्धेच्या व स्वार्थी संघर्षाच्या आखाड्याचें स्वरूप येतें, व संघजीवन क्षणभरहि टिकूं शकत नाहीं. विजयनगरची हीच अवस्था शहाजीच्या वेळीं झाली होती. त्यामुळें धर्मसंरक्षणासाठीं स्वतंत्र हिंदू राज्य प्रतिष्ठापित करण्याच्या शहाजीराजांच्या आकांक्षेला विजयनगरच्या पडत आलेल्या प्रासादाची डागडुजी करण्यानें कोणतीहि सफलता मिळ-णार नव्हती. प्रत्येक गोष्टीचे कामीं विशिष्ट दैवी कार्य असतें व तें संपल्यावर ती टिकूं शकत नाहीं असा इतिहासाचा संकेत आहे. विजयनगरचें कार्य संपलेलें होतें, तेथील जीवनरस आटलेला होता, त्याची जागा दुसऱ्या कोणी तरी घेणें आवश्यक होतें. शहाजीनें ती घेतली हें योग्यच झालें. कोणत्याहि अर्थानें विजयनगरच्या आधारावर शहाजीनें नवें मंदिर उभारण्यासारखी परिस्थितीच नव्हती व शहाजीच्या समोर जी परिस्थिति होती तिचा विचार

केला तर त्याची स्वातंत्र्याकांक्षा उघडपणें विजापूरकरांविरुद्ध बंड करून उठण्यानें सफळ होणारी नव्हती. म्हणून त्यानें मोडकळीस आलेलें व सांवरण्याची शक्यताच नसलेलें विजयनगरचें नाममात्र राज्य बाजूस सारून केवळ नाममात्र विजापूरचें अंकित असलेलें पण प्रत्यक्षांत स्वतंत्र असें हिंदू संस्कृतीचें संपूर्ण प्रतिनिधित्व करणारें राज्य तंजावरला स्थापन केलें. त्याची संपूर्ण उभारणी विजयनगरच्या संस्कृतिसंरक्षणाच्या कार्यातूनच मिळालेल्या स्फूर्तीतूनच उत्पन्न झालेली होती. म्हणून विजयनगरच्या ध्येय-वादाचा वारसा शहाजीनें प्रथम व नंतर खऱ्या विशुद्ध स्वरूपांत शिवछत्रपतींनीं चालविला. धर्मसिंहासनाची वारसदारी वंशा-वलम्बी नसून कार्यावलंबी व ध्येयावलंबी असते; व म्हणूनच डॉ. कृष्णस्वामी यांनीं " राज्याभिषेक करून घेण्यांत व दक्षिण दिग्विजय करण्यात शिवाजीचा हेतु विजयनगरच्या साम्राज्याचें पुनरुज्जीवन करून औरंगजेब बादशहासमोर त्या साम्राज्याचा सर्वमान्य वारस सम्राट् म्हणून उभें राहणें हाच असला पाहिजे, असे जे मर्मग्राही उद्‌गार काढले आहेत ते अत्यंत यथार्थ आहेत.

वस्तुत: विजयनगरचा शेवटचा वारस श्रीरंग याला शक्य तें साह्य करून वांचविण्याचाच प्रयत्न शहाजी राजांनीं केलेला आहे. दक्षिणेंत चालून आलेल्या विजापूरच्या सैन्याचें संपूर्ण नेतृत्व शहाजीकडे नसून तें रणदुल्लाखानाकडे होतें. शहाजी त्याच्या हाता-खालीं काम करीत होता. रणदुल्लाखान व मीरजुमला हे दोन मुस्लिम सेनापति अनुक्रमें विजापूर व गोवळकोंड्याच्या मुस्लिम सत्तांच्या वतीनें दक्षिणेंतील यच्चयावत् हिंदू संस्थानिकांना व विजयनगरच्या अवशिष्ट हिंदू पाळेगारांना संपूर्णपणें बुडवूं इच्छीत होते. शहाजीनेंच त्यांचे प्रदेश मर्यादित प्रमाणांत त्यांच्याकडे ठेवून त्यांना जीवदान दिलेलें आहे. श्रीरंगच्या संबंधांत तो हीच गोष्ट करूं इच्छीत होता. पण त्याचा डाव फसून त्याला राजद्रोही म्हणून मीरजुमल्याच्या कारस्थानानें विजापूरचा राजबंदी म्हणून रहावें लागलें. श्रीरंगासंबंधांत याहून अधिक कांहीं करण्याची त्याला शक्यताच नव्हती.

शहाजीला नोकरीचा तिटकारा होता असें स्वतः डिकसळकर मान्य करतात व तरीही ते त्याला धन्याची मर्जी राखावयास्तव धर्म, संस्कृति व राष्ट्र यांची ओळख न ठेवणारा ध्येयशून्य म्हणतात! ही दोन्ही परस्परविरोधीं विधानें आहेत. वयाच्या साठाव्या वर्षीं सुद्धां धन्याच्या रागाला न भितां स्वतःच्या रजपूतपणाचा अभिमान दर्शवीत नोकरीचा तिटकारा व्यक्त करणारा शहाजी श्रीरंग नायकाचा आधार न घेतां स्वतंत्रपणें कां राहिला व विजापूर-करांचें नाममात्र अंकितत्व त्यानें कां पत्करलें या प्रश्नाचा त्याच्या वर दोषारोप करण्याआधीं, अधिक गंभीर विचार करण्याची आवश्यकता आहे. राज्याच्या तुकड्यासाठीं मुसलमान व्हावयास सिद्ध असलेल्या श्रीरंगाचा विचार केवळ मीरजुमला हवा होता म्हणून मोगल बादशहा शहाजहाननें केला नाहीं. नाहींतर ज्याची सेवा स्वातंत्र्याकांक्षी शहाजीनें करावी असें हे संशोधक अपेक्षितात तो हिंदू म्हणून उरलाहि नसता. अशा स्वाभिमानशून्य मनुष्याचा शहाजीचें स्वप्न साकार होण्यासाठीं काय उपयोग होणार होता?

पण शहाजीराजे स्वातंत्र्याकांक्षी होते काय ? विद्यारण्यांनीं संस्थापिलेल्या व सम्राट् कृष्णदेवरायानें वैभवास आणलेल्या विजयनगरच्या धर्मसिंहासनाचा ध्येयवाद हृदयांत सांठविण्या इतकी पात्रता शहाजी राजांत होती काय? कीं डिकसळकर म्हणतात तसें 'शहाजीच्या सर्व जीवितांत व्यापक राष्ट्रीय किंवा धार्मिक कल्पना दिसत नसून आपल्या धन्याचें काम करणें व त्याची कृपा संपादणें येवढाच त्याचा जीवित हेतु' होता? मालोजीपासूनची शिवछत्रपतींची परंपरा पाहणें व शहाजीराजांच्या जीवनाचें समालोचन करणें या दृष्टीनें आवश्यक आहे.

✦ ✦ ✦

प्रकरण नववें

# शिवाजी महाराजांचे पूर्वज

प्रत्येक यशस्वी घटनेचा नीट उलगडा करावयास लागलें तर ती आपल्या मागच्या घटनेचा परिपाक असते असें जें एका विख्यात इतिहासकारानें म्हटलें आहे त्यांत पुष्कळच तथ्य आहे. शिवछत्रपतींच्या विभूतिमत्त्वानें यशस्वी झालेल्या कार्यमंदिराच्या उभारणीकडे पाहतांना या दृष्टिकोणाचा आश्रय केला तर त्या मंदिराची पायाभरणी त्यांचे वडील शहाजीराजे यांनीं करून दिलेली आहे; इतकेंच नव्हे, तर शहाजीराजांचे पुत्र म्हणूनच शिवछत्रपतींना आरंभींच्या यशस्वी हालचाली करण्याची शक्यता निर्माण झाली असें मानावयास अतिशय भक्कम प्रमाणें आहेत. ज्यांच्या आधारावर शिवछत्रपतींनीं स्वराज्यमंदिराचा पाया घातला ते त्यांचे पिंगळे, अत्रे, दादाजी पानसंबळ, रोझेकर, बांदल, जेधे प्रभृति प्रारंभीचे सहकारी शहाजी राजांच्या परिसरांतील सरदार व मुत्सद्दी होते. ज्या जहागिरींत स्वराज्याचे मनसुबे रचले जात होते ती शहाजीचीच होती. त्या जहागिरीच्या परिसरांतील शस्त्रसंग्रह, वाहनें व ठाण्यांठाण्यांतून असणारा सरंजाम शहाजी राजांचाच होता. या व शहाजी महाराजांकडून झालेल्या अन्य साहाय्याचा विचार केला तर इतिहासाचार्य राजवाडे यांचें पुढील म्हणणें यथार्थ असल्याचा प्रत्यय येतो. ते आपल्या राधामाधव विलासचंपूच्या प्रस्तावनेंत म्हणतात : 'आकाशांतून पडला आणि धावायला लागला अशांतला कांहीं प्रकार शिवाजीचा नव्हता. बापाच्या खांद्यावर उभा राहून शिवाजी पहिल्यांदा उच्चासनस्थ झाला.'

शिवचरित्राचा विचार करतांना स्वत: शिवाजीमहाराज व त्यांचे पूर्वज यांच्या विषयींचे पूर्वग्रह बाजूस सारणें हें प्रत्येक नव्या विचारकाचें एक महत्त्वाचें काम होऊन बसतें. सर जदुनाथ सरकार

यांच्यासारख्या विख्यात भारतीय इतिहासलेखकापासून तर ग्रँड डफसारख्या जुन्या पाश्चात्य लेखकापर्यंत अनेक जुन्या लेखकांनीं पुरेशा माहितीच्या अभावीं व हट्टाग्रहीपणानेंही शिवछत्रपतींच्या विषयीं अनेक विकृत समज पसरविले आहेत. 'शिवाजी हा निरक्षर होता या विधानापासून त्याचा आजा मालोजी हा स्वभावानें लबाड मनुष्य असून त्याचे पूर्वज हे साधे शेतीचा व्यवसाय करणारे पाटील होते व यशस्वी दरोडेखोरी करून ते राजे बनले येथपर्यंत अनेक प्रकारचे अपसमज या लोकांनीं पूर्वी तर पसरविलेच. पण जदुनाथासारख्यांनीं तर नवीं साधनें उपलब्ध असतां आपल्या पुस्तकाच्या पांचव्या आवृत्तींत सुद्धां पहिल्या आवृत्तीच्याच चुका जशाच्या तशा ठेवण्याची परिपूर्ण दक्षता (!) ठेवलेली आहे. उदाहरणार्थ, सर जदुनाथ म्हणतात :—

Shivaji was illiterate, he learned nothing by reading. He built up his kingdom and Government before visiting any Royal Court, civilized city or organised camp. He received no help or counsel from any experienced ministers or general but his native genius alone and unaided enabled him to found a compact kingdom and an invincible army and a grand and benificent system of administration.

(शिवाजी अशिक्षित होता. ग्रंथवाचनाच्याद्वारें त्यानें कोणतेंहि ज्ञान मिळविलें नाहीं. कोणत्याहि राजदरबारांत, सुधारलेल्या शहरांत, संघटित सैन्यांत वास करण्यापूर्वी त्यानें स्वराज्याची स्थापना केली व त्याचा कारभार चालविला. या कामीं त्याला कोणत्याहि अनुभवी राजकारणपटु अमात्याचा अगर सेनानायकांचा सल्ला मिळाला नाहीं. त्यानें आपल्या जन्मजात बुद्धिमत्तेनें कोणाचीहि मदत न घेतां स्वराज्याची स्थापना केली, अजिंक्य सेना जमविली आणि कल्याणकारक राज्यपद्धति निर्माण केली.)

शिवछत्रपतींच्या कार्याचें महत्त्व वर्णन करतांना ते निरक्षर होते या विधानाची वस्तुत: काहींहि आवश्यकता नव्हती. सर्वांत मजेची गोष्ट ही आहे कीं, शिवछत्रपतींचे वडील शहाजीराजे हे समस्यापूर्ति करण्याइतके व पंडितांना समस्या सांगण्याइतके उत्कृष्ट शिक्षण घेतलेले होते असें राजसभेंतील एक कवी जयरामदास पिण्डये यांच्या राधामाधवविलासचम्पूवरून सिद्ध होतें. शिवछत्रपतींचा धाकटा भाऊ व्यंकोजी हाहि उत्कृष्ट शिक्षण घेतलेला रसिक होता. शिवछत्रपतींचा ज्येष्ठ पुत्र संभाजी हा तर चांगलाच संस्कृतज्ञ असून त्याचा बुधभूषण या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. या सर्व उच्च शिक्षण घेतलेल्या लोकांच्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक प्रतिभेची झेंप असणारा आणि राज्यव्यवहारकोशासारखे कोश निर्माण करण्याची स्वतंत्र प्रज्ञा दाखविणारा शिवाजी मात्र अक्षरशत्रु होता! या विधानाचा समाचार घेतांना शिवछत्रपतींचे विचक्षण चरित्रलेखक डॉ. बाळकृष्ण हे जदुनाथ सरकारांना उत्तर देतांना म्हणतात :—

" It was hardly necessary to multiply such instances had not Sir J. Sarkar asserted that Shivajee was illiterate. He maintains that the Europeans never saw him write anything But we have shown above that the English, the Dutch, and the Portuguese have all testified that he could read and write. They received his autograph, letters and treaties personally signed by him. It is hoped that some of these letters will one day be discovered in the European Archives."

हीं असलीं अधिक उदाहरणें देण्याची आवश्यकता नाहीं. परंतु हीं उदाहरणें देण्याचें कारण असें आहे कीं, शिवाजी निरक्षर होता असें सर जदुनाथ यांनीं विधान केलें आहे. युरोपियनांनीं शिवाजीस लिहीत असतांना पाहिलें नाहीं असें जदुनाथांचें म्हणणें आहे. परंतु आम्ही वर असें दर्शविलें आहे कीं, इंग्रज, डच आणि

पोर्तुगीज यांनीं शिवाजीस लिहितां वाचतां येत होतें असें नमूद केलें आहे. शिवाजीचीं स्वदस्तूरचीं पत्रें व त्याची सही झालेले तह त्यांचेकडे येत असत आणि माझी अशी खात्री आहे कीं, युरोपियन राष्ट्रांच्या दप्तरखान्यांत त्यांच्या सहीचीं पत्रें कधीं काळीं खचित उपलब्ध होतील.

शिवछत्रपतींच्या जीवनपटाचा प्रत्यक्ष विचार करतांना या विषयींचीं अधिक प्रमाणें मी उल्लेखीनच. येथें केवळ विकृत समजांचें उदाहरण म्हणून मी रूढ गोष्टींचा निर्देश केला. हीच अवस्था शहाजीचें व शिवाजीच्या अन्य पूर्वजांचें चरित्र सांगणाऱ्या लेखकांची झालेली आहे. 'शिवाजीचे पूर्वज हे शेती करणारे व दरोडे घालणारे होते, ते भोसेगांवचे पाटील असल्यामुळें त्यांचें नांव भोसले पडलें, शिवाजीचा आजा मालोजी हा साधा शिपाई होता, रंगपंचमीच्या दरबारांत त्याचा मुलगा शहाजी व त्या वेळचा निझामशाहींतील एक तोलदार सरदार लखूजी जाधवराव याची मुलगी जिजाबाई हे दोघे खेळत असतां जाधवराव जोडा किती सुंदर दिसतो असें सहज म्हणाल्याबरोबर मालोजी स्वतःला जाधवरावांचा व्याही म्हणवूं लागला. जाधवरावाचें प्रस्थ कमी करण्यासाठीं निझामशहानें मालोजीला हातीं धरून वाढविलें, व शहाच्या मध्यस्थीनें मुलगी मालोजीच्या मुलाला मिळाली तरी अपमानाचें शल्य जाधवरावांच्या मनांत सदाचें राहून शहाजी व जाधवराव यांचें अखंड वैर सुरू होतें, इत्यादि सारे अपसमज या पूर्वग्रहविशिष्ट दृष्टिकोनांतूनच चालत आलेले आहेत. शहाजीवर जो स्वामिद्रोहाचा सतत आरोप करण्यांत येतो तो सुद्धां त्याच्या वंशाचें तें एक वैशिष्टचच होतें अशा पद्धतीचा आहे. ग्रँड डफ मालोजीविषयीं लिहितांना असें म्हणतो कीं :—

" Malojee appears, however, to have been crafty and preserving, little scrupulous about the means employed, so that his end could be attained. He retired to his village, where it is pretended, that the Goddess Bhawanee,

having appeared to him, he discovered a large treasure, at all events he and his brother Withojee became possessed of money in some secret manner, which in that troubled period of the Nizamshahi government, during the first years of the 17th century, was probably by robbery."

(मालोजी हा स्वभावानें लबाड होता. आपला हेतु साध्य करण्यास्तव कोणत्या भल्या बुऱ्या उपायांची योजना करावयाची याविषयीं त्याचें मन साशंक नसे. भवानी त्याचे स्वप्नांत येऊन तिनें मोठा द्रव्याचा सांठा तो ज्या खेड्यांत रहात होता तेथें त्याला दाखविला ही हकीकत बनावट दिसते. एवढी गोष्ट मात्र निश्चित आहे कीं तो व त्याचा भाऊ विठोजी या दोघांस फार मोठा द्रव्यसंचय मिळाला. निझामशाहीच्या सतराव्या शतकाच्या सुरवातीच्या त्या घालमेलीच्या काळांत वरील द्रव्याचा सांठा दरोडे घालून त्यांना मिळाला असावा हें संभवनीय वाटतें.)

शिवछत्रपतींच्या चरित्रासंबंधानें हल्लीं जी वादातीत अशी विश्वासार्ह साधनसामग्री उपलब्ध झालेली आहे तिचा विचार केला तर ग्रँड डफचें विधान पूर्णपणें चुकीचें आहे असें दृष्टोत्पत्तीस येतें. शिवछत्रपतीसंबंधीं उपलब्ध असलेल्या सामग्रींत शिवछत्रपतींच्या समकालीन असलेला कवि कवीन्द्र परमानंद याचा 'शिवभारत' ग्रंथ हा अस्सल प्रमाणांच्या मूर्धस्थानीं शोभणारा आहे. कवीन्द्र परमानंद याला स्वतःचें चरित्र लिहिण्याविषयीं स्वतः शिवाजीमहाराजांनीं आज्ञा केली होती व त्यांच्या आज्ञेवरून कवीन्द्रानें त्यांचें हें चरित्र लिहिलेलें आहे. कवीन्द्र म्हणतो :—

स एकदाऽऽत्मनिष्ठं मां प्रसाद्येदमभाषत ।
यानि यानि चरित्राणि विहितानि मया भुवि ॥
विधीयन्ते च सुमते तानि सर्वाणि वर्णय ।
मालभूपमुपक्रम्य प्रथितं मत्पितामहम् ॥

—(शिवभारत अ. १ श्लोक २५ ते २७)

(एकदां माझी निष्ठा पाहून मला प्रसन्न करून घेऊन शिवछत्रपति यांनीं असें सांगितलें कीं आजवर मी जें जें केलें व पुढें करणार आहे तें सर्व वर्णन करणारें माझें चरित्र तूं लिही. हें चरित्र माझे विख्यात पितामह मालोजी राजे यांच्यापासून वर्णन करावें. शिवछत्रपतींच्या आज्ञेनें त्यांच्या समोर त्यांच्या समकालीन ग्रंथकारानें लिहिलेल्या या चरित्राइतकें विश्वसनीय दुसरें काय असूं शकेल ? जेधे शकावलींतील उल्लेख व शिवभारतांतील उल्लेख यांतील आश्चर्यकारक साम्य पाहून त्याच्या प्रामाण्याविषयीं संशोधनजगतांत आतां संशय उरलेला नाहीं. त्याचप्रमाणें अलीकडे घोरपडे घराण्याचे कागदपत्र उपलब्ध झालेले आहेत. डॉ. बाळकृष्ण यांनीं त्या घराण्याचा व छत्रपतींच्या घराण्याचा एकात्मसंबंध सिद्ध केलेला असून त्या कागदपत्रांवरून त्यांनीं डफ व जदुनाथ सरकार यांची छत्रपतींच्या घराण्यासंबंधांतील विधानें कशीं चुकीचीं आहेत हें आपल्या "Shivaji the Great" या ग्रंथांत उत्कृष्ट रीतीनें सिद्ध करून दाखविलें आहे. त्यावरून आपला निष्कर्ष सांगतांना डॉ. बाळकृष्ण लिहितात :—

"Sarkar too relied upon the traditional account and made certain observations on Shivajee's ancestors which we hope will be revised by him in the light of these documents.

"Agriculture was their original occupation as with most Marrathas but the break up of the large monarchies of Western India (namely the Bahamani at the end of the 15 th century and the Nizamshahi at the beginning of the 17 th) opened to the ablest man among them, the chance of rising to the military power and lordship over land. The history of Shiwajee's family illustrated this transformation of the tiller of the soil by successive stages into the bandit, the captain of the mercinaries, the feudal Baron, and the Sovereign ruler, which was so frequent during the troubled times that followed the

down fall of the central powers like the Bahamani and of the Delhi Empire and ended only with the establishment of British Paramountancy and British peace.

" The farman clearly proves that the Bhosales were neither agriculturists nor bandists. They did not rise to power at the close of the Bahamani Dynasty but their fortune shone from its very beginning. Even in 1454 they possessed Jahageers in Mudhol, Raibag, Wai and Deogiree . . . . . . Thus it is now evident that Malojee Raja held two large estates . . . . . . one at Poona and its surrounding regions and the other in the several places of the Nizamshahi kingdom. He was an eminent Sardar even before migrating to Daulatabad, but his status must have been much improved by the acquisition of New Jahageers. "

(शेतकी हा त्यांचा इतर कित्येक मराठा घराण्यांप्रमाणें मुख्य धंदा होता; परंतु पश्चिम हिंदुस्थानांतील पंधराव्या शतकाचे शेवटीं बहामनी बादशहास व सतराव्या शतकाच्या सुरवातीस निजामशाहीस उतरती कळा लागल्यामुळें या घराण्यापैकीं कर्तृत्ववान् पुरुषास सैन्याच्या बळावर मोठमोठ्या प्रदेशावर आधिपत्य स्थापित करण्याची संधि मिळाली. बहामनी अगर मोगल घराण्यांसारख्या मध्यवर्ती राजसत्ता नष्ट होऊन त्या ठिकाणीं ब्रिटिश सत्ता व शांतता प्रस्थापित होईपर्यंत जो बेबंदशाहीचा काळ गेला, त्या काळांत शिवाजीच्या घराण्यासारख्या अनेक घराण्यांची जमीन नांगरणारे, दरोडे घालणारे, भाडोत्री फौजेचे सेनानी व मोठमोठ्या प्रदेशावर राजकीय सत्ता प्रस्थापित करणारे अशीं स्थित्यंतरें क्रमशः झाल्याचें आढळून येतें.

पण फरमानावरून असें स्पष्ट दिसतें कीं, भोसले घराणें हें शेती करणारें अगर दरोडे घालणारें नव्हतें. बहामनी बादशहाच्या ऱ्हासाचे काळीं हें घराणें उदयास आलें नाहीं, तर या घराण्याचा उत्कर्ष बहामनी बादशाहीच्या सुरवातीपासूनच सुरू झाला होता.

इ. स. १४५४ सालांत मुधोळ, रायबाग, वाई, देवगिरी या प्रदेशांत या घराण्यास जहागिरी होत्या. ····· यावरून हें स्पष्ट दिसून येतें कीं, मालोजीच्या दोन मोठ्या जहागिरी होत्या. एक पुणें व त्याच्या आसपासच्या प्रदेशाची, आणि दुसरी निजामशाही प्रदेशांतील इतर कित्येक ठिकाणची. दौलताबाद प्रांतांत जाण्या-पूर्वी तो एक नामांकित सरदार होता व त्याला नवीन जहागिरी मिळाल्यामुळें त्याची सांपत्तिक ऐपत विशेष वाढली असली पाहिजे.)

तात्पर्य, शिवछत्रपतींचे पूर्वज हे राजे असून बहामनी राज्याच्या सुरवातीपासून स्वतंत्रपणेंच ते तोलदारपणें वावरत होते. मालोजी हा स्वतंत्र राजा अथवा जहागीरदार असून निजामशहाच्या पदरचा तो सामान्य नोकर मुळींच नव्हता. कवींद्र परमानंद मालोजीच्या योग्यतेचें व त्याच्या स्थानाचें वर्णन करतांना असें म्हणतो कीं :—

दक्षिणस्यां दिशि श्रीमान्मालवर्मा नरेश्वरः ।
बभूव वंशे सूर्यस्य स्वयं सूर्य इवौजसा ॥ ४२ ॥
महाराष्ट्रं जनपदं महाराष्ट्रस्य भूमिपः ।
प्रशशास प्रसन्नात्मा निजधर्मधुरंधरः ॥ ४३ ॥
स पुण्यदेशे धर्मात्मा निवासं स्वमकल्पयत् ।
तन्वन् सौराज्यमधिकं नदीं भीमरथीमनु ॥ ४५ ॥
त्वङ्गत्तुरंगमखुरक्षुण्णभीमरथीतटः ।
समुद्यद्दुंदुभिध्वानविभ्रमक्षोभितार्णवः ॥ ४३ ॥
प्रतापतापिताऽरातिधराधिपतिमंडलः ।
सह्याद्रिखंडमखिलं बुभुजे स बली बलात् ॥ ४७ ॥

( स्वतः सूर्याप्रमाणें तेजस्वी असा श्रीमान् मालोजी राजा दक्षिणेंत सूर्यवंशांत होऊन गेला. क्षात्रधर्मधुरीण आणि प्रसन्नचित्त असा तो मराठी राजा महाराष्ट्रांत राज्य करीत होता. या धर्मा-त्म्यानें पुणें प्रांतीं आपलें वास्तव्य केलें आणि भीमानदीच्या कडेनें राज्य अधिक वाढविलें. ज्यानें भरधांव पळणाऱ्या आपल्या घोड्यांच्या टापांनीं भीमा नदीच्या कांठचा प्रदेश तुडविला,

ज्याच्या दुंदुभीपासून निघणाऱ्या ध्वनीच्या लहरींनीं समुद्र खळबळून टाकला, व ज्यानें आपल्या प्रतापानें शत्रुराजे जर्जर केले असा तो बलाढ्य राजा स्वसामर्थ्यानें सर्व सह्याद्रीच्या प्रदेशाचा स्वामी झाला.) शिवभारतांतील या वचनांवरून शिवाजी हा राजकुलाचा वंशज होता हें सिद्ध होतें.

मालोजी हा स्वतंत्र जहागिरदार असतांना त्याच्या परिसरांतील लोक सुखी असून त्याच्या धार्मिक प्रवृत्तीचा अनेकांना लाभ मिळत असे. भगवान् महादेवाचा तो भक्त असल्यामुळें त्यानें एक मोठा तलाव आपल्या इष्ट देवतेच्या स्मरणार्थ बांधला होता. अशा स्थितींत मालोजीला निझामशहाच्या अंकित कां व्हावें लागलें व त्याचा आणि निझामशहाचा संबंध कशा प्रकारें आला हे प्रश्न स्वाभाविकपणेंच वाचकांसमोर उभे राहतात. त्याचें उत्तर शिवभारतांत जें पहावयास सांपडतें त्याचा नीट विचार केला तर मालोजीच्या निझामशाहींतील स्थानाची व योग्यतेची कल्पना येते. शिवभारतकार लिहितात :—

एतस्मिन्नेव समये दुर्गं देवगिरिं श्रयन् ।
निझामशाहो धर्मात्मा पालयामास मेदिनीम् ॥ ५९ ॥
तमसेवन्त सततं यवनानामधीश्वरम् ।
सर्वे यादवराजाद्या दाक्षिणात्याः क्षमाभुजः ॥ ६० ॥
तदा येदिलशाहोऽपि पत्तने विजयाह्वये ।
निवसन् राज्यमकरोद्यवनो यवनैर्वृतः ॥ ६१ ॥
अथ केनापि कालेन निमित्तेन बलीयसा ।
येदिलेन निजामस्य विरोधः सुमहानभूत् ॥ ६२ ॥
तदा तं मालभूपालं कालं प्रतिमहीभृताम् ।
श्रुत्वा निजामो मेधावी साहाय्ये समकल्पयत् ॥ ६३ ॥
ततस्तस्य प्रियं तत्र कर्तुमप्रतिमद्युतिः ।
गत्वा देवगिरिं मालमहीपतिमुवास ह ॥ ६४ ॥
अथ विठ्ठलराजोऽस्य भ्राता भीमपराक्रमः ।
समेतः स्वपताकिन्या भेजे धारागिरीश्वरम् ॥ ६५ ॥

प्रीतात्मा च निजामोऽपि निजमन्तिकमागतौ ।
तावुभौ पूजयामास सामदानेन भूयसा ॥ ६६ ॥
ये ये निजामशाहस्य प्राभवन्परिपन्थिनः ।
तांस्तानुत्सादयामास मालवर्मा महाभुजः ॥ ६७ ॥
तथा विठ्ठलराजोऽपि निजामस्य चिकीर्षितम् ।
सहायीभूय सततं चक्रे शक्रपराक्रमः ॥ ६८ ॥
यद्यप्यासन्निजामस्य सहायास्तत्र भूरिशः ।
तथाऽपि मालवर्मैव सर्वेभ्योऽभ्यधिकोऽभवत् ॥ ६९ ॥
कुलक्रमागतं राज्यं निधाय निजमन्त्रिषु ।
दत्तं निजामशाहेन देशमन्यं शशास सः ॥ ७० ॥

याच वेळीं देवगिरी किल्ल्याचा आश्रय करून निझामशहा राज्य करीत होता. या मुसलमान राजाचे लखुजी जाधवराव वगैरे अनेक मातब्बर सामंत होते तसेंच विजापूरला आदिलशहा राज्य करीत होता. या दोन राजांच्या मध्यें विरोध उत्पन्न होऊन संघर्षाची ठिणगी पडली. (हा संघर्ष एका लग्नासंबंधानें होता. या वेळीं महंमद कुतुबशहाची बहीण मलिकाजहान हिच्याशीं विजापूरचा इब्राहिम आदिलशहा याचें लग्न होण्याचें ठरलें होतें. मूर्तजा निजामशहा या लग्नाच्या आड आला म्हणून त्याचा सूड घेण्यासाठीं इब्राहिम आदिलशहानें निझामशहावर स्वारी केली.) या संकटाचे वेळीं मालोजीचा पराक्रम आधींच कानावर असल्या-मुळें निझामशहानें त्याला साहाय्यास्तव पाचारण केलें. मालोजीनें तें निमंत्रण मान्य करून आपला भाऊ विठोजी व मोठी सेना बरोबर घेऊन निझामशहाला साह्य दिलें. या दोघाही बंधूंनीं निझामशहाच्या सर्व शत्रूंची खोडकी जिरविल्यावर त्यानें प्रसन्न होऊन त्यांना मोठी जहागीर दिली. स्वतःच्या वडिलोपार्जित जहागिरीचा कारभार आपल्या कारभाऱ्यावर सोंपवून मालोजी या नव्या जहागिरीची व्यवस्था पाहूं लागला. निझामाच्या सर्व सामन्तांत मालोजी सर्वांत अधिक योग्यतेचा होता. या मालोजी राजांना पुष्कळ दिवसपर्यंत संतान नव्हतें. धार्मिक श्रद्धेनुसार

त्यांनीं पुष्कळ दिवस भगवान् शंकराचें आराधन केल्यावर त्यांना दोन मुलें झालीं. वडील मुलाचें नांव शहाजी व धाकट्या मुलाचें नांव शरीफजी होतें. या वृत्तान्तावरून मालोजी दरिद्री होता किंवा सामान्य मनुष्य होता इत्यादि गोष्टी पार खोट्या ठरतात. शहाजी पांच वर्षांचा असतांना मालोजीला मृत्यूनें गांठलें. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे शहाजी व जिजाबाई यांच्या रंगपंचमींतील खेळाची व मालोजीच्या त्यांच्या विवाहाच्या घोषणेंतून जाधवरावांशीं निर्माण झालेल्या स्पर्धेची सगळीच घटना खोटी ठरते. या घटनेला इतिहासाच्या क्षेत्रात इतकें अपरंपार महत्त्व प्राप्त झालेलें आहे कीं राधामाधवविलासचंपूच्या प्रस्तावनेंत इतिहासाचार्य राजवाडे यांनींहि तिचा उल्लेख केलेला आहे. राजवाडे यांच्या प्रतिपादनाप्रमाणें "शहाजीचा जन्म झाला त्या वेळीं मालोजी चव्वेचाळीस वर्षांचा होता व मृत्युसमयीं त्याचें वय सत्तरीच्या जवळ जवळ आलेलें होतें. याचा अर्थ मालोजीचे मृत्यूचे वेळीं शहाजीचें वय सव्वीस वर्षांचें होतें. आणि जिजाबाईचा आणि शहाजीचा विवाह हा शके पंधराशें पंचवीस मधील म्हणजे मालोजीच्या जिवंतपणीं तो चोपन्न वर्षांचा असतांना व शहाजी नऊ वर्षांचा असतांना झाला. जिजाबाई आणि शहाजी यांच्या वयांत केवळ एक वर्षाचें अंतर होतें. या विवाहाच्या आधीं मोहित्यांच्या मुलीशीं शहाजीचा पहिला विवाह झाला होता. आणि रंगपंचमीचें वृत्त ज्या वेळीं घडलें त्या वेळीं शहाजी चार वर्षांचा व जिजाबाई तीन वर्षांची होती." पण हें सगळें रोमांचकारी वृत्त चुकीचें आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनीं हें वृत्त दिलें यांत त्यांचा दोष मात्र कांहीं नाहीं. याचें कारण त्या वेळीं शिवभारताचा शोध लागलेला नव्हता, व कांहीं लोकांस त्याची माहिती असली तरी जेधे शकावलि प्रकाशांत येईपर्यंत शिवभारताचें ऐतिहासिक प्रामाण्य संशोधन क्षेत्रांत मान्यता पावलेलें नव्हतें. मालोजीला मृत्यु समरांगणांत प्राप्त झालेला आहे व या त्याच्या अंतिम संग्रामाचें वृत्त शिवभारतकार शहाजीच्या वयाचा उल्लेख करूनच देतात. शिवभारतांत असें म्हटलें आहे.

प्रपेदे पञ्चमं वर्षं शरीफस्याग्रजो यदा।
तदा महोदारकर्मा मालवर्मा महिपतिः ॥ १ ॥
महत्या सेनया सार्धम् दधानोऽभ्यर्हितं धनुः ।
प्रस्थापितो निजामेन समरायेन्दरापुरम् ॥ २ ॥
तत्रात्यर्थं युध्यमानः सबलैरभियायिभिः ।
प्रभूतैः परिधीभूतैर्हन्यमानः समन्ततः ॥ ३ ॥
पदातिमत्तमातंगहयकीलालवाहिनीम् ।
प्रवर्त्यातीव महतीं तीव्रवेगां तरङ्गिणीम् ॥ ४ ॥
कृतान्त इव संक्रुद्धः समृद्धः स्वेन तेजसा ।
पुरोधाय प्रतिभटान्प्रययावमरावतीम् ॥ ५ ॥

ज्या वेळीं शहाजीला पांचवें वर्ष लागलें त्या सुमारास इंदापूरच्या संग्रामांत मालोजीला मृत्यु आला व शहाजीचें आणि शरीफजीचें पालनपोषण त्याचा चुलता विठोजी यानें केलें. उमा म्हणून शहाजीची पहिली बायको व मोहित्यांची मुलगी असा राजवाडे जिचा उल्लेख करतात ती वस्तुतः शहाजीची आई होती. मालोजीच्या जहागिरीचा वारसा निझामानें शहाजीलाच दिला व आपल्या पराक्रमानें हळू हळू वाढत तरुण शहाजी जेव्हां वैभवश्रीनें तळपूं लागला तेव्हां त्याची योग्यता व कर्तृत्व पाहून जाधवरावानें आपली मुलगी जिजाबाई ही शहाजीला दिली. हेंच शहाजीचें पहिलें लग्न होय. व तें जाधवरावांच्या पसंतीनेंच झालेलें आहे. त्यांत कोणताहि अस्वाभाविक प्रकार नाहीं. शिवभारतांत हें वर्णन पुढीलप्रमाणेंच दिलें आहे :—

निशम्यैतन्निजामोऽपि निधनं मालवर्मणः ।
पक्षहीनामिव निजां बत मेने पनाकिनीम् ॥३१॥
ततः शाहशरीफाह्वौ मालवर्मसुतावुभौ ।
समं विठ्ठलराजेन समानाय्य महामनाः ॥३२॥
सान्त्वयित्वा स्वयं दत्त्वा ताभ्यां तत्पितृवैभवम् ।
सत्कृत्य हेमाभरणैर्वासोभिश्च मनोहरैः ॥३३॥

अनर्घ्यमणिमालाभिस्तथा च गजवाजिभिः ।
विसृष्टवान्गृहानेतौ तुष्टो धारागिरीश्वरः ।।३४।।
अथ तेन पितृव्येण परिपालितयोस्तयोः ।
वपुषी बाल्यसंपृक्ते परां पुपुषतुः श्रियम् ।।३५।।
प्रशस्तलक्षणोपेते निकेते सर्वसंपदाम् ।
सोदरेऽथ शरीफस्य राजशब्दो व्यराजत ।।३६।।
तं बालमपि भूपालमणयः सर्व एव ते ।
मानयन्तो नमन्ति स्म महाभुजमुमात्मजम् ।।३७।।
ततः शरीरं शाहस्य प्रविष्टे नवयौवने ।
संसंबाधेव शिशुता संचुकोच शनैः शनैः ।।३८।।
करिपोतमिवोदञ्चन्मदराजिविराजितम् ।
व्यक्तीभवन्नवश्मश्रुलेखं लेखमनोहरम् ।।३९।।
कलाधरतिरस्कारि मनोहारि मुखं पुनः ।
जानुपर्यन्तविश्रान्तभुजमद्भुतविग्रहम् ।।४०।।
दानवीरं दयावीरं युद्धवीरं महौजसम् ।।
मालभूपसुतं शाहं वरलक्षणलक्षितम् ।।४१।।
दृष्ट्वा यादवराजेन राजराजसमश्रिया ।
दिष्टे दैवज्ञसंदिष्टे विशिष्टेऽभिमतैर्ग्रहैः ।।४२।।
कुलकन्या कुले धन्या कन्या कुवलयेक्षणा ।
दत्ता सदक्षिणा तस्मै जिजूर्विजयलक्षणा ।।४३।।
सा तं महाशयं प्राप्य बिभ्रती वपुरुज्ज्वलम् ।
गङ्गेव गुणगम्भीरा व्यराजत महोदधिम् ।।४४।।

--(शिवभारत अध्याय २)

( मालोजीच्या निधनाची वार्ता ऐकून निजामशहाला आपल्या सेनेचे पंख गळून पडण्याइतकें दुःख झालें. मुलांचें, व विठोजीचें सांत्वन करून त्यानें मालोजीची जहागीर त्याच्या मुलांना दिली. हळू हळू शहाजी तरुण झाला. एखाद्या बालगजाप्रमाणें तो दिसत असे. बालगजाच्या मदरेखेसारखी मिशीची कोर त्याच्या ओठावर दिसू लागली. तो आजानुबाहू शहाजी अत्यंत तेजस्वी

असून महापराक्रमी, उदार व दयापूर्ण स्वभावाचा होता. या तरुणाचें तळपतें तेज व कर्तृत्व पाहून लखूजी जाधवरावांनीं आपली सर्वसद्‌गुणसंपन्न कन्या जिजाबाई त्याला देण्याचें ठरविलें. ज्योतिषांच्या करवीं योग्य मुहूर्त पाहून त्या दोघांचा विवाह करण्यांत आला. या विवाहाचे वेळीं जाधवरावांनीं आपल्या कर्तृत्ववान् जावयाला पुष्कळ आंदण दिलें. गंगेच्या महासागराशीं होणाऱ्या संगमाप्रमाणेंच हा संगम शुभफलदायी होता.) प्रश्न असा येईल कीं जाधवरावांचें व भोसल्यांचें मग वाकडें कां आलें? त्याचें कारण रंगपंचमींत दडलेलें नसून तें पुढीलप्रमाणें आहे: विठोजीच्या निधनानंतर शहाजीच्या हातीं आपल्या जहागिरीचीं सूत्रें आलीं. संभाजी खेलोजी, मंबाजी, नागोजी, त्र्यंबकजी आदि त्याचे चुलत बन्धु व शरीफजी हा सख्खा धाकटा बंधु यांच्यासहित शहाजी निजामाच्या राज्यांत मलिकंबरच्या हाताखालीं काम करीत होता. भोसल्यांचें व जाधवरावांचे संबंध येथपर्यंत चांगले होते. अशा स्थितींत एके दिवशी निजामाचा दरबार संपल्यावर सगळे सरदार आपापल्या घरीं परतत असतांना वाहनांची व शिपायांची एकच गर्दी होऊन प्रत्येक सरदार पुढें जाण्यासाठीं वाट काढूं लागला. अशा स्थितींत खंडागळे नांवाच्या एका सरदाराचा हत्ती बेफाम होऊन तेथील लोकांना आपल्या पायाखालीं चिरडूं लागला. हें पाहतांच लखूजी जाधवरावांचा दत्ताजी नांवाचा मुलगा बरोबर कांहीं शिपाई घेऊन त्याचेवर चालून गेला. त्या हत्तीला दत्ताजीनें मारलें. पण एक प्रकारची ती लढाईच जुंपल्यामुळें दत्ताजी खंडागळ्यांच्यावर चालून गेला. त्याबरोबर नात्यापेक्षां मैत्री अधिक प्रभावी ठरून शहाजीचे चुलत बंधु संभाजी व खेलोजी हे खंडागळेच्या साहाय्यार्थ धावून गेले व त्या लढाईंत संभाजी भोसले व दत्ताजी जाधव यांचें युद्ध जुंपलें. त्या युद्धांत संभाजीनें दत्ताजीला ठार मारलें. तोंवर लखूजी जाधवराव हे बरेच पुढें निघून गेले होते. त्यांना ही वार्ता कळतांच पुत्रशोकानें त्यांचें देहभान हरपलें. त्यांनीं संभाजी भोसलेला ठार मारण्यासाठीं भोसल्यांच्या सैन्यावर हल्ला केला. तें पाहतांच नातें

विसरून चुलत बंधूच्या रक्षणासाठीं शहाजीनें आपल्या सासऱ्याविरुद्ध खड्ग उपसलें. या युद्धांत जाधवरावांच्या हातून शहाजीला त्याच्या बाहूवर भयंकर जखम झाली होती. जाधवरावांनीं शेवटीं संभाजी भोसल्याला ठार मारून आपल्या मुलाचा सूड उगविला. पुढें निझामानें मध्यें पडून हें युद्ध थांबविलें. पण भोसले व जाधव याच्या मनोमालिन्याला येथून सुरवात झाली. या वेळीं मालोजी मुळींच जिवंत नव्हता. व वैरांतून शहाजीचें जावईपण उत्पन्न झालें नसून आधीं जावईपण व नंतर मनोमालिन्य असा हा इतिहास आहे. कांहीं दिवसांनीं जाधवरावांचें प्रस्थ डोईजड होत चाललेलें पाहून निझामानें त्यांचा कपटानें घात करावयाचें ठरविलें. चाणाक्ष जाधवरावांनीं तें कपट ओळखून निझामाचा पक्ष सोडला व मोगल बादशहाची नौकरी धरली. जाधवरावांचें मोंगलाकडे स्वागतच झालें. पुढें मोंगल व विजापूरचे सुलतान यांनीं मिळून निझामावर हल्ला चढविला. परंतु या युद्धांत निझामाचा पक्ष वरचढ झाला. या युद्धांत शहाजीचा धाकटा भाऊ शरीफजी धारातीर्थी पडला. तरी पण शेवटीं विजय निझामाच्या पदरांत पडला. पुढें चुलत बंधु व शहाजी यांच्यांत स्पर्धा उत्पन्न होऊन शहाजीनें त्यांच्याच पक्षाला निझाम व मलिकंबर आहे हें पाहून तो पक्ष सोडला व विजापूरकरांचा आश्रय घेतला. शहाजी याप्रमाणें इतस्ततः आपल्या जहागिरीची व्यवस्था लावीत आपले पाय स्थिर करीत असतांनाच शिवछत्रपतींचा जन्म झालेला आहे. जिजाबाईंना एकंदर सहा मुलें झालीं, व त्यांतून वडील संभाजी व धाकटे शिवाजी हे दोघेच वांचले, असें शिवचरित्रकार सांगतात. 'शिवनेरीला जन्म झाल्यामुळें शिवाजी असें शिवाजी महाराजांचें नांव ठेवण्यांत आलें असें शिवभारतकारांनीं म्हटलें आहे.

यतः शिवगिरेर्मूर्ध्नि जातः स पुरुषोत्तमः ।
ततः प्रसिद्धा लोकेऽस्य शिव इत्यभिधाऽभवत् ॥

## शहाजीची स्वराज्याकांक्षा

शहाजी महाराजांचें सर्व चरित्र अनेक रोमांचकारी घटनांनीं आणि पराक्रमांनीं भरलेलें आहे. पण या सर्व पराक्रमांच्या पाठीशीं

असलेली प्रेरणा प्राप्त परिस्थितींत योग्य त्या मार्गांचा आश्रय करून शेवटीं हिंदू स्वराज्य प्रतिष्ठापित करणें ही होती कीं तत्कालीन अनेक स्वार्थी हिंदु जहागिरदार व सरदारांप्रमाणें कोणाशींहि तशी निष्ठा न ठेवतां व अन्तःकरणांत कोणताहि ध्येयवाद न बाळगतां जमेल त्या मार्गानें व मिळेल त्या सुलतानाचा आश्रय करून केवळ स्वतः केवळ वैभवसंपन्न होणें एवढीच होती हा महत्त्वाचा प्रश्न आहे. रा. डिकसळकर यांनीं आपल्या मतानुसार हा प्रश्न निकालांत काढून टाकला आहे व नवे शिवचरित्रकार रा. भावे यांनीं डिकसळकरांच्या पावलावर पाऊल टाकलें आहे. पण डिकसळकर किंवा भावे म्हणतात त्याप्रमाणें शहाजी जर स्वार्थापलीकडे असलेल्या कोणत्याहि प्रेरणेनें प्रेरित झाले नसतील तर शिवछत्रपतींना त्यांचें साहृय झालें त्याची व शिवछत्रपतींच्या प्रारंभींच्या जीवनांतील अनेक गोष्टींची कांहीं उपपत्ती लागू शकत नाहीं. शिवाजीमहाराजांच्या प्रयत्नांकडे दुर्लक्ष करणें हें सुद्धां शहाजी महाराजांचें त्यांना झालेलें अतिशय महत्त्वाचें साहृय आहे. शिवछत्रपतींच्या जीवनाच्या प्रारंभींच्या काळांत शहाजी राजांच्या केवळ स्वार्थाच्या दृष्टीनें पाहिलें तरी शिवाजीच्या प्रयत्नाकडे दुर्लक्ष करणें हें चुकीचें ठरणारें होतें.तरीही पण त्यांनीं तें केलें आहे. शिवछत्रपतींचीं प्रारंभींची राजमुद्रा स्वतः करून देण्याचें व अनेक कर्ते लोक प्रारंभींच्या काळांत त्यांच्या साहाय्यासाठीं देण्याचें शहाजी राजांना कांहींही कारण नव्हतें. तेव्हां या व अशा अनेक गोष्टींची उपपत्ति काय? शहाजीचे समकालीन त्याचेविषयीं काय म्हणतात हें पाहणें या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त ठरेल. शहाजीच्या दरबाराचा एक कवि व राधामाधव या काव्यप्रबंधाचा कर्ता जयरामदास पिण्डये यानें आपल्या अनेक भाषांतील कवितांत, शहाजीला लावलेलीं विशेषणें विचार करण्यासारखीं आहेत. शहाजीचें वर्णन करतांना जयरामदास पिण्डये म्हणतो :

"कारुण्यकल्लोलमाली वनमालीव भूभारसंहरणशील: समुन्मीलितनिजभुजदण्डकण्डूखंडनाय परमवलम्बितजगद्विजयविभ्रम: सौजन्यजन्यसंभावनाविर्भावितनलनहुषभगीरथहरिश्चंद्रादिविचित्रचरित्र: समुल्लसितभोसलकुलनरपालकृतसुकृतपारावारराकासुधाकर: शाहराजो नाम।"

या वर्णनांत नल नहुष भगीरथ हरिश्चंद्रादि अवतारी पुण्यश्लोक महापुरुषांशीं शहाजीची केवळ तुलनाच करून कवि थांबलेला नाहीं, तर श्रीकृष्णाप्रमाणें भूभारहरणाचें त्यानें व्रत घेतलें होतें असें हा कवि शहाजीचें वर्णन करतो. शहाजीच्या वेळचे हिंदू लोक ज्याला भूभार म्हणत तो मुसलमानांच्या आधिपत्याचाच भार होता हेंहि सिद्ध करण्याची आवश्यकता आहे असें कोणी म्हणणार नाहीं. श्रीकृष्णांनीं ज्याप्रमाणें दैत्यभार नाहींसा केला त्याप्रमाणेंच शहाजी महाराज करीत आहेत असें तत्कालीन लोकांचा एक प्रतिनिधि असलेला एक कवि म्हणतो; व असें कांहीं वर्णन कोणी दरबारांत केलें तर क्रोधाऐवजीं अथवा भीतीऐवजीं तें वर्णन करणाऱ्यांना पारितोषिक देण्याइतकी, इतकेंच नव्हे तर अशा लोकांना आपल्या राजसभेंत स्थान देण्याइतकी शहाजीराजांच्या हृदयांत आनंदाची ऊर्मि उठत असे हें स्पष्ट आहे. आणखी एका ठिकाणीं वर्णन करतांना शहाजीच्या दरबाराचा दुसरा एक कवि म्हणतो :—

राजा हो नृप शाहजी यवन करावे बाद!
हेजिब विधिसी बोलिला ऐसा द्विजसंवाद ।।
व्यापिली हे अवनी यवनी मुण वैदिकवाक सिणोन निजली।
यावरि साहेब कीर्तिची मूर्तिच आपलि हे जीव हेजिब केली।।

यवन बाद करण्यासाठीं शहाजी राजे हे राजे झाले असें या कवीनें त्यांच्या तोंडावर सांगून पारितोषिकें घेतलीं आहेत. यावरून त्यांच्या अंत:करणाची ठेवण दिसत नाहीं काय? ज्याच्याविषयीं अशा समजुती तत्कालीन लोकांत होत्या व त्या ऐकून ज्याच्या हृदयाला आनंद होत असे अशा पुरुषाच्या वर्तनाची उपपत्ति वेगळ्या प्रकारानें लावली पाहिजे हें उघड आहे. व तशी ती श्री.

दत्तोपंत आपटे व इतिहासाचार्य राजवाडे यांनीं लावून दाखविली आहे. शहाजीच्या चरित्राचें व कार्याचें समालोचन करतांना इतिहासाचार्य राजवाडे यांनीं केलेलें विवेचन अत्यंत उद्‌बोधक आहे. श्री. राजवाडे म्हणतात, "प्रकट स्वराज्य, प्रच्छन्न स्वराज्य, मांडलिकी स्वराज्य व स्वतंत्र स्वराज्य म्हणजे स्वतःचें व्यक्तिमात्राचें राज्य स्थापिण्याचे उत्तरोत्तर प्रयत्न करणें ही शहाजीची इतिकर्तव्यता होती. ही इतिकर्तव्यता अथपासून इतिपर्यंत विकास पावत असतां शत्रु, मित्र व उदासीन यांच्याशीं प्रसंगाला अनुकूल दिसेल तें शत्रुत्वाचें, मित्रत्वाचें किंवा उदासीनतेचें वर्तन ठेवणें हें शहाजीचें धरसोडीचें धोरण होतें. आणि हें धोरण अंमलांत आणण्याकरितां करोल सैन्य व सामुग्री ह्यांच्या साहाय्यानें त्यानें स्वतःचा पक्ष निर्मून साधनसंपत्तीची जोड केली होती. शहाजीच्या इतिकर्तव्यतेची ही अशी मीमांसा आहे. आतां ह्या इतिकर्तव्यतेचें तत्कालीन इतिहासांत कार्य काय त्याचा निर्णय करूं. शहाजीच्या हयातींत हिंदुस्थानांत एकंदर पांच स्वतंत्र मुसलमानी राज्यें होतीं. (१) दिल्लीची मोगलाई (२) दौलताबादची निजामशाही (३) विजापूरची आदिलशाही (४) गोवळकोंड्याची कुतुबशाही व (५) वेदरची बेरीदशाही. ह्या पांच मुसलमानी शाह्यांनीं तुंगभद्रेच्या तीरापासून हिमालयापर्यंतचा व आसामपासून इराणपर्यंतचा सर्व टापू आक्रमिला होता. तुंगभद्रेच्या दक्षिणेस कर्नाटकांत कांहीं क्षुद्र हिंदू पाळेगार तेवढे थोडेबहुत स्वतंत्र राहिले होते. त्यांचें स्वातंत्र्य निजामशहानें हरण करावें, कीं आदिलशहानें, कीं कुतुबशहानें, कीं दिल्लीवाल्यानें हरण करावें एवढाच काय तो मत्सराचा प्रश्न घुटमळत राहिला होता. बाकीचें सर्व भरतखंड यवनांच्या कवज्यांत जाऊन हिंदुत्वाच्या हयातीचें माप भरत आलें होतें. सहाशें वर्षे झगडतां झगडतां इस्लामच्या हातून आर्यसंस्कृतीचा पाडाव आणखी पांच पन्नास वर्षांत परिपूर्ण झाला असता. ह्या पांच पातशाह्या अन्योन्य मत्सरानें एकमेकांचें बल क्षीण न करत्या आणि स्नेहवृद्धीचे तह करून इस्लामी संस्कृतीचा विजय करणें हें एकच धोरण अक्षत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळ
24335
क्रमांक 6484 नों. दि.



पाळत्या, तर हिंदू संस्कृति पृथ्वीतलावरून उच्छिन्न होऊन गते-तिहासाचा करुण विषय झाली असती. इस्लामी धर्माचा प्रसार करण्याची प्रतिज्ञा प्रत्येक पातशहा करी; परंतु ती दुसऱ्याच्या हातून सफल न होतां आपल्या हातानें सफल व्हावी अशा अभिमानानें एक दक्षिणी शहा दुसऱ्या दक्षिणी शहाच्या उरावर बसे. सर्व दक्षिणी शहा शियापंथी पडल्यामुळें उत्तरेकडील सुनी मोगल त्यांना धर्मभ्रष्ट समजत व हिंदूंप्रमाणेंच त्यांचाहि उच्छेद करण्याचा पैगाम बांधीत. अशी दुफळी नव्हे, त्रिफळी नव्हे, पंचफळी मुसलमान पातशाह्यांमध्यें होती. तीहि झाली, तथापि देखील मुसलमान एका बाबीची खबरदारी घेते, तर हिंदू संस्कृतीचा त्यांच्या हातून नायनाट झाला असता. पंचफळीमुळें फार झालें तर पांच शाह्यांतून कोणत्या तरी एका शाहीच्या हातांत सर्व राजसत्ता जाती व त्या सार्वभौम यावनी राजसत्तेच्या द्वारां आर्यसंस्कृतीचा परिपूर्ण नाश होता. फक्त एका बाबीकडे त्यांनीं बिलकूल दुर्लक्ष्य करतां कामा नव्हतें. ती बाब ही कीं त्यांनीं कोणाहि हिंदुधर्मी लढवय्याला मनसबदारी किंवा सरदारी देऊन प्रबल बनूं द्यायचें नव्हतें. हें अनुभवसिद्ध सामान्य धोरण त्या काळीं मुसलमान पातशहांना माहीत नव्हतें असेंहि म्हणतां येत नाहीं. शहाजहान व औरंगजेब यांच्या तर तें मुखोद्गत होतें. दक्षिणेंतील शहांनाहि तें अवगत होतें. परंतु कोणतेंहि धार्मिक, वैयापारिक किंवा राजकीय धोरण कितीहि महत्त्वाचें असलें तथापि तें स्वसंरक्षणाच्या व खास बचावाच्या धोरणापुढें फिकें पडतें. अकबरानें जेव्हां निझामशाही घशाखालीं उतरविण्याचा घाट घातला व निझामशाहींतील दक्षिणी व परदेशी मुसलमानांचे दोन्ही पक्ष शहाच्या खांद्यावर कुरघोडी करूं लागले, तेव्हां निझामशहानें मालोजी भोसले या लढवय्याला मनसबदारी देऊन स्वसंरक्षणार्थ विश्वासूक असा मराठ्यांचा तिसरा पक्ष निर्माण केला. प्रथम मालोजीची मनसबदारी पंचहजारी अशी बेताचीच होती. परंतु धन्याचा विश्वास बसत बसत व लढाईच्या निमित्तानें वाढत वाढत, शहाजीच्या हाताखालीं ती

मनसबदारी एखाद्या शहाला शोभेल अशी तोलदार फौज बाळगणारी झाली. असल्या मनसबदारीला कह्यांत ठेवणें मोठें जिवावरचें, नाजूक व संकटाचें काम असतें. सुखाविली तर ती आयतीच प्रेमानें उरावर बसते व दुखविली तर रागावून प्राण घेते. सनातनधर्मी प्रबल मनसबदार जो शहाजी त्याला मलिकंबर व मूर्तिजाशहा ह्यांनीं ज्या दिवशीं दुखविलें त्या दिवशीं हिंदुस्थानांत सहाशें वर्षं बांधीत आणिलेल्या इस्लामच्या तटांत पहिलें भगदाड पडलें. आणि सनातन संस्कृतीवरील इस्लामच्या मगरमिठींतील पहिली गांठ मोकळी झाली. शहाजी संतापून निझामशाहींतून निघून गेल्यावर मलिकंबराला मूर्तिजानें ठार केलें, मूर्तिजाला फतेखानानें मारलें व फतेखानाला शहाजहानानें पकडलें. बेगमेनें शहाजीचें साह्य घेतांच निझामशाहीला पुन: जीव आला आणि तिनें शहाजीला सोडतांच निझामशाहीचा कायमचा अंत झाला. शहाजहानालाहि ह्या वेळीं शहाजीच्या प्राबल्याचा व करामतीचा अनुभव आला. शके १५५८ तील मोहीम पावसाळ्याचे आंत खलास करण्याचे शहाजहानाचे सर्व अंदाज शहाजीनें चुकविले आणि शहाजी म्हणेल त्या अटीवर मोहीम कशी तरी शहाजहानास संपवावी लागली. ह्यापुढें शहाजीचे वाटेस शहाजहान कधीं गेला नाहीं. आदिलशाहींत गेल्यावर शहाजीनें कर्नाटक कसें सर केलें, शहाजीला अटक केल्यामुळें कर्नाटकांत व पुणें प्रांतांत कसा धुमाकूळ उडाला, सुटल्यावर औरंगजेबाचा हस्तक व कुतुबशहाचा प्रधान जो मीरजुमला त्याला शहाजीनें कसा बेदम बडविला, बंगळूरास स्वराज्यस्थापन कसें केलें आणि पुणें प्रांतांतील स्वराज्यस्थापन शिवाजीकडून कसें करविलें, वगैरे कथानक मागें सविस्तर वर्णिलें आहेच. तात्पर्य एक हिंदुधर्मी प्रबल मनसबदार बनू देण्याच्या एका चुकीचा हा सर्व परिणाम झाला. त्या एका चुकीनें नुसती निझामशाहीच खाल्ली नाहीं, तर कुतुबशाही खांकेंत मारिली, आदिलशाहीचे लचके तोडले, बेरीदशाहीचा चकणाचूर होऊं दिला आणि शेवटीं दिल्लीची मोंगलाई रसातळास पोहोंचविली. औरंगझेबानें शिवाजीस निसटून जाऊं देण्याची एक चुकी

केली, तर त्याला सव्वीस वर्षें दक्षिणेंत वनवास भोगावा लागून शेवटीं हताश होऊन मरावें लागलें. शहाजीला मनसबदारी देण्याच्या एका चुकीनें त्याहूनहि घोर धक्का इस्लामला बसला. इस्लामी राज्यसत्ता हिंदुस्थानांतून कायमची बाद होण्याचा मार्ग खुला झाला. हिंदुस्थानच्या तत्कालीन राजकारणांत शहाजीच्या इतिकर्तव्यतेचें कार्य हें असल्या स्वरूपाचें म्हणजे यवनांची सत्ता खिळखिळी करून मोडण्याच्या पंथास लावण्याचें होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें तर शहाजी ह्या वेळीं हिंदुत्वाचा विजयी वाली बनला होता."

--(राधामाधवविलासचंपू, प्रस्तावना पान ११३–१५)

बिचाऱ्या शहाजीची अवस्था अडकित्त्यांतील सुपारीप्रमाणें झाली असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. तो जर एकनिष्ठपणानें कर्नाटकांत विजापूरकरांच्या राज्याची प्रतिष्ठापना करीत होता असें गृहीत धरलें तर इतिहासकार त्याला हिंदुद्रोही व यवन-पक्षपाती व म्हणूनच राष्ट्रद्रोही म्हणावयास तयार आहेत व जर तो स्वतंत्रपणें कांहीं राज्यप्रतिष्ठापनेचे उद्योग करीत होता असें सिद्ध झालें तर हेच इतिहासकार त्याला स्वामिद्रोही म्हणावयास तयार आहेत! इतिहासाचार्य राजवाडे यांनीं शहाजीच्या वर्तनाची जी मीमांसा केली आहे ती या दृष्टीनें उद्‌बोधक आहे. स्वतंत्र होऊं इच्छिणारा ध्येयनिष्ठ मनुष्य प्राप्त परिस्थितीचा लाभ घेतल्याशिवाय रहात नाहीं व तसा तो लाभ त्यानें घेतला तर त्याच्या ध्येयाचा विचार केल्यावर त्याबद्दल त्याला दोषहि देतां येत नाहीं. शहाजीचें ध्येय मुसलमानी सत्तेचें एकनिष्ठ सेवक होणें हें खात्रीनेंच नव्हतें. तसें तें त्या काळीं कोणत्याहि मराठे सरदारांत, इतकेंच काय, पण मुसलमानी सरदारांतहि असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. स्वतंत्र होण्याची शक्यताच नसेल तर हिंदूंना अधिकांत अधिक संरक्षण देतां यावें व बादशाही नांवाला मुसलमानांची असली तरी वस्तुतः तिच्या नाड्या हिंदूंच्या हातीं असाव्या हें शहाजीच्या एकंदर राजकीय व्यवहाराचें सूत्र दिसतें. या धोरणाचा

मदार आपले हातास आली असतां आधी तो आपले जातीचे लोक मराठे याला हाती धरून सरदारकी करून पोटें भरतात ते पादशाही वजीर करावे. पादशाही कामे याजकडून करवून नामोश होय, इज्जती थोर पावेत तें करावें.' म्हणून तुमचे बाप बाजी घोरपडे सरदारकी करून होते ते आणून पातशहास भेटवून पादशाही वजीर केले. त्या दिवसापासून तुमच्या बापाच्या हातें व तुमच्या हातें पादशाहीचीं कामें होत आली. पादशहानी तुमचें चालविलें. ऐशा तीन पिढ्या पादशहाच्या, दोनी पिढ्या तुमच्या जाल्या. ऐशियास महाराजानें तुमच्या बापास इतकें बरें केलें हें स्मरण न धरून, जेव्हां काही मुस्तुफाखानानें महाराजास दस्त करविला तेव्हां तुमचे बाप बाजी घोरपडे हमी होऊन महाराजास दस्त करून मुस्तुफाखानाचे हाती दिले. त्या दिवसापासून तुमचे घराणियाचा व आमचे घराणियाचा दावा वाढत चालिला."

—(शिवभारत प्रस्तावना– पृष्ठ ७२, ७३)

याप्रमाणें शहाजीनें विशिष्ट उद्देशानें निझामशाही सोडून विजापूर दरबारचा आश्रय घेतला असला तरी लवकरच त्याला तो दरबार सोडून निझामशाहींत परत यावें लागलें. ज्या इब्राहिम आदिलशहाच्या भरंवशावर शहाजी विजापूरकराकडे आला तो इ. स. १६२७ च्या सुमारास दिवंगत होऊन त्याच्या मुत्सद्द्यांच्या मध्यें त्याच्या दोन मुलांपैकीं कोणास गादीवर बसवावें यासंबंधांत तंटे सुरू झाले. इब्राहिम आदिलशहा कडवा मुसलमान नसल्यामुळें त्याच्या राज्यांत हिंदूंना बरेंच महत्त्व होतें. त्याचा धाकटा मुलगा सुलतान महंमद हा कडवा मुसलमान असून त्यानें गादीवर बसावें अशी दरबारांतील कडव्या मुसलमानांनीं खटपट चालविली. त्याचा परिणाम वडील मुलगा दरवेश याचे डोळे काढण्यांत होऊन हिंदू सामंतांना कैद करण्यांत आलें व सुलतान महंमद गादीवर बसला. शहाजीला कैद करण्याची शक्यता नव्हती. पण त्याचा महंमदाकडून अपमान झाला व आपलें धोरण साधण्यासारखें नाहीं हें पाहून अपमानित शहाजीनें आदिलशाही दरबार सोडला.

शिवभारतकारांनीं हें पुढीलप्रमाणें महमुदाच्याच तोंडून वदविलें आहे :—

पूर्वमस्यैवावलम्बादिभराम: पिता मम ।
विध्वस्ताऽरातिरध्यास्त निर्विशंक: स्वमानसम् ॥२६॥
सहसावमत: सोऽयं मतिमंदतया मया ।
मामुपेक्ष्य गतो मानादिभरामादनन्तरम् ॥२७॥
महामानी महाबाहुरसौ शाहमहीपति:।
कृत्वा मदधिकं स्नेहमिभरामेण वर्धित: ॥२८॥

(पूर्वी माझा बाप इब्राहिम शहा हा याच्याच साह्यानें शत्रूंचा विध्वंस करून निश्चित होता. पण त्याच्या मृत्यूनंतर म्यां मूर्ख-पणानें त्याचा एकाएकीं अपमान केल्यामुळें तो मानी शहाजी मला सोडून गेला. इब्राहिमशहानें या महामानी व पराक्रमी शहाजीवर मजपेक्षां अधिक प्रेम करून त्यास योग्यतेस चढविलें.)

शहाजी निझामशाहींत आल्यावर थोड्याच दिवसांत निझाम-शाहीवर मोंगली स्वारीची धाड येऊन कोसळली, व त्या धाडींत मोंगली पक्ष सोडून यापूर्वींच निझामास मिळालेला शहाजीचा सासरा लखूजी जाधवराव हा पुनश्च मोंगलास फितूर होईल अशा कल्पनेनें त्याचा खून करण्यांत आला. जाधवराव मारला गेल्या-पासून शहाजीचा निझामशाहीवरील विश्वास उडाला. व आदिल-शाही आणि निझामशाही या दोहोंतहि राहण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं हें ओळखून त्यानें स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला असें राज-वाडे म्हणतात. पण मोंगल, विजापूर व निझाम या तिन्ही शत्रूंशीं एकाच वेळीं लढण्याचें शहाजीजवळ सामर्थ्य नव्हतें. व त्याचा बाणा केवढाहि स्वाभिमानी रजपूती असला तरी व्यर्थ आत्मविनाश ओढवून घेण्याइतका तो अदूरदृष्टि नसल्यामुळें त्यानें मोंगलांची मनसबदारी पत्करून स्वसंरक्षणाचें धोरण स्वीकारलें. शहाजहानच्या बादशाही फर्मानानुसार त्याला पंचहजारी मनसब, खिलत व दोन लक्ष रुपये देण्यांत आले. शहाजीचा मुलगा संभाजी यालाहि मोंगलांच्या वतीनें पोषाख, दोन हजारांची मनसब व एक हजार स्वारांची तैनात देण्यांत आली होती. मोंगलांना जाऊन मिळण्यांत

शहाजीला दोन प्रकारें संरक्षण मिळालें. पहिलें म्हणजे आदिलशाही सेनानींच्या हातून मोंगलांच्या भयानें त्याला उपद्रव होण्याची शक्यता उरली नाहीं व स्वत:ची त्याची जहागीर पूर्णपणें सुरक्षित राहून त्याला हातपाय पसरण्यास मोकळी संधि मिळाली. त्याला आश्रय देण्यांत मोडकळीस आलेल्या निझामशाहीचा आधार काढून घेणें हा शहाजहानचा हेतु होता. मोंगलांच्या स्वारीचें संकट निझामशहा व आदिलशहा या दोघांनाहि सारखेंच होतें. त्यामुळें कांहीं काळ या दोन्ही शाहयांची मोंगलांविरुद्ध एकजूट झाली. त्या बरोबर मोंगली सरदारांनीं निझामशाहीला भेदनीतीनें वश करून घेण्याचा प्रयत्न चालविला व त्यांत त्यांना यशहि आलें. या भेदनीतीच्या वेळीं शहाजीवर मोंगलांकडून अन्याय झाल्यामुळें शहाजी मोंगलांचा पक्ष सोडावयास सिद्ध होता. शेवटीं त्यानें मोंगलांचा पक्ष सोडला व त्याच सुमारास निझामशाही मोंगलांनीं बुडविली. त्या वेळचा निझामशाहीचा अधिपति हुसेन निझामशहा हा फितुरीमुळें कैद झाला व दौलताबादचा किल्ला मोंगलांच्या स्वाधीन झाला. ही परिस्थिति पाहून शहाजीच्या अंत:करणांत निझामशाहीचा पुनरुद्धार करण्याचे विचार घोळूं लागले. त्याचें खरें कारण हें होतें कीं, निझामशाही बुडण्यांत एकछत्री मोंगली वर्चस्व दक्षिणेंत प्रस्थापित होणार होतें. त्यामुळें प्राप्त परिस्थितींत हिंदूंना जें स्वातंत्र्य होतें तेवढेंहि नव्या प्रबल सत्तेंत राहण्याची शक्यता नव्हती. निझामशाहीच्या या पडत्या काळांत अनेक सरदार शिरजोर झाले होते व प्रदेश बळकावून ज्या अन्य बादशाहीकडे जाण्यांत त्यांचा स्वार्थ साधणार होता तेथें जावयास सिद्ध होते. या स्थितींत पुन्हां निझामशाहीचें पुनरुज्जीवन करण्याचा विचार एकट्या शहाजीच्याच मनांत कां घोळत असेल ? निझामाच्याच धर्माचा सिद्दी रेहाल यानें सोलापूर घशाखालीं घालून सरळ विजापूरकरांचें अंकितत्व मान्य केलें व कऱ्हाड, कोल्हापूरच्या बाजूस एक लक्ष रुपये उत्पन्नाची नवी जहागीर विजापूरकरांकडून मिळविली. हिंदू सरदारांनीं या संधीचा हाच फायदा घेतलेला आहे. शहाजीच्या मनांतहि केवळ एवढेच विचार घोळत असते, तर त्यानें

हाच मार्ग अनुसरला असता. पण त्यानें वेगळा विचार चालविला व तो विचार म्हणजे नाममात्र निझामी आधिपत्य स्वीकारून निझामशाहीच्या पुनरुज्जीवनाच्या द्वारें जवळ जवळ स्वतंत्र अशी पेशवाई स्थापन करणें हा होता. तिचें रूपान्तर स्वराज्यांत पुढें मागें होणें फारसें कठीण नव्हतें. अशा स्थितींत शके १५५५ मध्यें शहाजीनें निझामशाहीच्या पुनरुद्धाराचा केलेला हा प्रयत्न म्हणजे प्राप्त परिस्थितींत त्यानें स्वतंत्र होण्याचा केलेला हा दुसरा प्रयत्न होय. मोंगली व आदिलशाही दरबारांत नवी नोकरी मिळविण्याची संधि सोडून शहाजीनें भीमगड येथें स्वतंत्र बादशाहीचें निशाण उभारलें; व पुणें, चाकण, जुन्नर, अहमदनगर, संगमनेर, नाशिक इत्यादि प्रदेश जिंकून घेतला. या वेळीं मोगल सेनापति इरादखान याला शहाजीच्या सामर्थ्याची कल्पना असल्यामुळें शहाजीच्या चुलत भावाकरवीं त्यानें त्याला फोडण्याचा उपक्रम सुरू केला. त्यासाठीं शहाजीचा ज्येष्ठ पुत्र संभाजी याच्या नांवें बावीस हजारी मनसब देण्याचें फर्मान व पोषाख शहाजहान बादशहाकडून मागविला. पण मोठ्या मनसबदारीपेक्षां स्वतंत्र राज्य उभारण्याच्या खटपटींत असलेल्या शहाजीवर या आमिषाचा परिणाम झाला नाहीं. त्यानें विजापूर दरबारशीं गुप्तपणें स्वतंत्र निझामी राज्याच्या उभारणीस्तव साह्य करण्याची मसलत चालवून समान संकटाची त्यांना जाणीव करून दिली. त्याप्रमाणें मुरारपंत नांवाच्या लढवय्या मुत्सद्द्याला शहाजीकडे पाठविण्यांत आलें. विजापूरकरांशीं संधि केल्यावर शहाजीनें भीमगड येथें स्वतंत्र मूर्तजा निझामशहाची गादी स्थापन करून मोठें लष्कर उभारलें व निझामशाहींतील सरदारांना पाचारण केलें. पण त्या वेळच्या निझामी सरदारांच्या ध्यानांत शहाजीचा खरा हेतु येऊन निझामशाहीच्या पुनरुज्जीवनाऐवजीं हें प्रच्छन्न शहाजीचेंच राज्य आहे या जाणिवेनें त्यांनीं नव्या निझामशहाची भेट सुद्धां घेतली नाहीं. शहाजीच्या या प्रयत्नास सुरुंग लावण्यासाठीं विजापूरकरावर मोंगलांनीं हल्ले चढविले. तेव्हां विजापूर व निझाम एक होऊन कांहीं दिवस हें युद्ध चाललें. पण लवकरच शहाजीला असें दिसून आलें कीं आपण हिंदू असल्यामुळें

केवळ हिंदू सरदार आपल्या बाजूला आहेत व हिंदु राज्य उभारण्या-साठीं शहाजी झटत आहे या कल्पनेनें मुसलमान सरदारच काय पण विजापूर दरबार सुद्धां शेवटीं मोंगलांना मिळेल. जो अनुभव राम-राजाला तालिकोटच्या लढाईंत आला तोच शहाजीलाहि आला असता. त्याचे विजापूर दरबारांतील सहाय्यक खवासखान व मुरार-पंत यांचे लवकरच खून पडले व मोंगलांच्या भेदनीतीला यश येऊन एकाकी पडलेल्या शहाजीवर पन्नास सहस्र सैन्य घेऊन बादशहा शहा-जहान यानें चढाई केली. या वेळीं विजापूरकर सरळपणेंच मोंगलांना जाऊन मिळाले. सर्वनाशाचा हा दुसरा प्रसंग पाहून शहाजीनें पुन्हां नक्की अयशस्वी होणाऱ्या त्या प्रसंगांतून स्वतःची सुटका करून घेतली. मात्र मोंगलांची नौकरी न पत्करतां त्यानें विजापूरकरांची पत्करली. विजापूरकरांनींच विशेष इतमामानें शहाजीला मोंगलां-कडे न जाऊं देतां स्वतःच्या पदरीं घेतलें असें दिसतें. श्री. आपटे म्हणतात : "शहाजी आपल्या नोकरीस यावा अशी खटपट मोंग-लांनीं मालोजी भोसल्यामार्फत कितीतरी वेळां केली. पण ती त्यानें मान्य केली नाहीं. तोच अनुभव याहि वेळीं आला. सारांश स्वतंत्र राज्याची उभारणी करण्याचें काम या वेळीं आपल्या आटोक्या-बाहेरचें आहे हें लक्षांत आल्यावर रणदुल्लाखानाचे द्वारां शहाजीनें विजापूरकरांची नौकरी मान्य केली." नौकरीविषयींचा तिटकारा, स्वराज्याची महत्त्वाकांक्षा व प्राप्त परिस्थितींत योग्य तें धोरण ठेवण्याची दूरदृष्टि या तीन सूत्रांतून गुंफलेलें शहाजीचें जीवन पाहिलें कीं हा दुसरा डाव जरी फसला तरी नाममात्र अंकित, पण खरें स्वराज्य निर्माण करण्याची शक्यता शहाजीला मोंगलांच्या मानानें कमी सामर्थ्यवान् व हिंदू सामंतांवर अधिक अवलंबून असलेल्या विजापूरच्या राज्यांतच होती, व मोंगलांचें अंकित होण्यांत ती नव्हती; त्याची ती आकांक्षा लवकरच फलद्रूप होऊन त्याचा तिसरा स्वराज्यप्रयत्न बहुतांशीं सफळ झाला व त्यांतूनच त्याचें साह्य असलेल्या शिवरायांच्या धर्मराज्याच्या मंदिराच्या उभारणीचा पाया सिद्ध झालेला आहे. कसें तें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

✦ ✦ ✦

## प्रकरण दहावें

# शहाजी राजांचें कार्य

शहाजी राजे यांचा तिसरा स्वराज्यप्रयत्न म्हणजे कर्नाटकांत त्यांनीं स्थापन केलेल्या मांडलिक स्वराज्याची संस्थापना होय. कर्नाटकच्या स्वारीवर रणदुल्लाखानाच्या नेतृत्वाखालीं दुय्यम म्हणून शहाजी राजांची नेमणूक करण्यांत साम्राज्यविस्ताराबरोबरच विजापूरकरांचा हेतु शहाजीची ब्याद आपल्या लगामीं ठेवून पण थोडीशी दूर ठेवणें हाच होता. ज्या वेळीं शहाजी राजे कर्नाटकांत गेले त्या वेळीं विजयनगरचें साम्राज्य नष्ट होऊन तेथील अवशेषांच्या अधिपतींच्या आपापसांत लढाया चालू होत्या. त्यांच्यांत निष्ठा कोणतीही उरली नव्हती याचा उल्लेख मागें केलाच आहे. शहाजीनें कर्नाटकांत स्वारी केली त्यावेळीं रणदुल्लाखानाचें धोरण कर्नाटकांतील अवशिष्ट हिंदू राजांना पूर्ण नष्ट करण्याचें होतें. शहाजीनें हें धोरण चालूं दिलें नाहीं. या स्वाऱ्यांच्या वेळीं विजयनगरच्या राजवंशाचा अंतिम वारस याचा अंमल सुदूर पश्चिमेकडील बेदनूर वगैरे विभागांतील पूर्वींच्या विजयनगरच्या अधीन असलेल्या विभागावरून पूर्णपणें उठलेला होता. म्हैसूर वगैरे मध्यभागांतील प्रदेशावर त्याचें स्वामित्व केवळ नाममात्र होतें. जिंजी, तंजावर व मदुरा या पूर्व भागांतील संस्थानिकांना मात्र त्याचें वर्चस्व थोडयाफार प्रमाणांत मान्य करावें लागलें. विजापूरकरांचा या विभागांत जो प्रवेश झाला तो विजयनगरच्या या निष्ठाशून्य, घरभेद्या व स्वार्थपरायण अवशिष्टांच्या बोलावण्यावरून झाला. बेदनूर येथें वीरभद्र या नांवाचा विजयनगरपासून स्वतंत्र झालेला एक मांडलिक राज्य करीत असून बसवापट्टणचा केंग हनुम नायक हा त्याचा मांडलिक होता. परंतु केंग नायकानें आपल्या स्वामीविरुद्ध बंड उभारलें व त्याचा परिणाम म्हणून वीरभद्रानें त्याला हाकलून देऊन त्याची जहागीर खालसा

केली. त्यामुळें भणंग झालेल्या केंग नायकानें विजापूरकडे साह्याची याचना केली. रणदुल्लाखान व शहाजी यांची या कारणास्तव रवानगी झालेली आहे. बुसातीने सलातीनकार या ग्रंथांत या स्वारीचें कारण देतांना म्हटलें आहे : "तमाम हिम्मत आदिल-शहाकी दीन इस्लाम फैलाने और काफरोंसे लडनेकी थी ; इस वास्ते उसने जिहादका झंडा खडा करके कर्नाटकके काफरोंपर लष्कर भेजनेकी तदबीर की; और रन्दोलेको उस लष्करकी सर-दारी देकर रायगिरी तरफ रवाना किया।" याचा अर्थ विजापूर-करांच्या मतें या युद्धाचें स्वरूप हिंदू विरुद्ध मुसलमान असें जिहादचें अथवा धर्मयुद्धाचें होतें. शहाजीसारख्या पुरुषाला या धर्मयुद्धांत मनापासून भाग घेण्याची इच्छा नव्हती. अर्थातच शक्य तोंवर तेथील अवशिष्ट हिंदू सत्तांना त्यानें संरक्षण देण्याचें धोरण स्वीकारलें. पहिल्या धडाक्याला वीरभद्राचा पराभव करून त्याच्या-कडून सोळा लक्ष रुपये खंडणीदाखल घेण्यांत आले. या वर्षी रणदुल्लाखानाची सरसेनापति म्हणून विजापूरच्या दरबारीं प्रतिष्ठा वाढली. पण पुढच्याच वर्षी वीरभद्रानें खंडणी देण्याचें नाकारल्यामुळें त्याचा सर्व प्रदेश जप्त करून विजापूरला जोड-ण्यांत आला. रणदुल्लाच्या या पहिल्याच स्वारींत बंगळूर व शिरे हे परगणे हस्तगत झाले, व शहाजीकडेच ते या स्वारींतील त्याच्या विशेष पराक्रमामुळें, संतुष्ट होऊन व्यवस्थेसाठीं सोंपविण्यांत आले. या युद्धांत शहाजीनें दाखविलेला पराक्रम व बंगलोरवर सुरू झालेलें त्याचें आधिपत्य याचें वर्णन शिवभारतांत पुढीलप्रमाणें केलें आहे :—

ततो बिंदुपुराधीशं वीरभद्रं मदौजसम् ।  
वृषपत्तनपालं च प्रसिद्धं केंगनायकम् ॥ ३७ ॥  
कावेरीपत्तनपतिं जगद्देवं महाभुजम् ।  
श्रीरंगपत्तनेंद्रं च क्रूरं कंठीरवाभिधम् ॥ ३८ ॥  
तंजापुरप्रभुं, चापि वीरं विजयराघवम् ।  
तथा तंजीपरिवृढं प्रौढं वेंकटनायकम् ॥ ३९ ॥

त्रिमल्लनायकाह्वं च मधुरानाथमुद्धतम् ।
पीलुगण्डाखंडलं च विकटं वेंकटाव्हयम् ॥ ४० ॥
धीरं श्रीरंगराजं च विद्यानगरनायकम् ।
प्रसिद्धं तम्मगौडं च हंसकूटपुरेश्वरम् ॥ ४१ ॥
वशीकृत्य प्रतापेन तथान्यानपि पार्थिवान् ।
शाहः संतोषयामास सेनान्यं रणदूहलम् ॥ ४२ ॥
कृत्वाऽथ वीरसंहारकारि युद्धमहर्दिवम् ।
युद्धशौंडात् किपगौडात् गृहीतं सुमनोहरम् ॥ ४३ ॥
रणदूलहखानेन पारिबर्हमिवार्पितम् ।
सोऽध्यास्त विजयी राजा बिंगरूळाभिधं पुरम् ॥ ४४ ॥

—(शिवभारत अध्याय ९)

बिंदुपूर (वेदनूर) चा महातेजस्वी वीरभद्र, वृषपत्तनचा (बेलूर?) राजा प्रसिद्ध केंग नाईक, कावेरीपत्तनचा राजा महाबाहू जगद्देव, श्रीरंगपट्टणचा राजा क्रूर कंठीरव, तंजावरचा राजा शूर विजयराघव, तंजीचा (खंजी) राजा प्रौढ वेंकट नाईक, मदुरेचा राजा गर्विष्ठ त्रिमल नाईक, पिलुगंडाचा राजा उद्धट वेंकटाप्पा, विद्यानगरचा (विजयनगर) राजा धीट श्रीरंगराजा, हंसकूटाचा (हास्पेट) राजा प्रसिद्ध तम्मगौडा यांना आणि इतरहि राजांना शहाजीनें आपल्या पराक्रमानें ताब्यांत आणून सेनापति रणदुल्लाखानास संतुष्ट केलें. मग रात्रंदिवस वीरांचा संहार करणारें युद्ध करून युद्धनिपुण किपगौडापासून घेतलेलें अतिशय रम्य बंगळूर नांवाचें शहर रणदुल्लाखानानें शहाजीला पारितोषिक म्हणून दिलें व त्या ठिकाणीं तो विजयी राजा राहूं लागला.

या स्वारीनंतर विजापूरच्या सैन्यानें श्रीरंगपट्टणच्या कंठीरव नरस नांवाच्या संस्थानिकावर स्वारी केली. पण या स्वारींत त्याला यश लाभलें नाहीं. दक्षिणेकडील या स्वाऱ्यांत कर्नाटक पायाघाट व कर्नाटक बालाघाट असे दोन प्रांत शहाजीच्या पराक्रमानें मिळाल्यावर ते शहाजीकडेच व्यवस्थेसाठीं सोंपविण्यांत

आले. त्यांपैकीं बंगळूरचा अंतर्भाव बालाघाट सुभ्यांत होत असे व तो शहाजीला जहागिरीदाखल मिळाल्यामुळें शहाजीनें बंगळूरला आपली राजधानी केली. शहाजीच्या कर्नाटकांतील राजनीती-संबंधीं श्री. दत्तोपंत आपटे यांनीं शिवभारताच्या प्रस्तावनेंत जे उद्गार काढले आहेत ते विचार करण्यासारखे आहेत. श्री. आपटे लिहितात :—

कर्नाटकांतील या वेळच्या विजापूरकरांच्या स्वाऱ्यांसंबंधीं एक विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट होती ती अशी कीं, त्यांत त्यांनीं ज्याचा मुलूख घेतला त्याला नेस्तनाबूद करण्याचें धोरण न स्वीकारतां त्याच्या ताब्यांतला सुपीक भाग खालसा करून बिन-वस्तीचा भाग पूर्वींच्या मालकाकडेच चालू ठेवला. या धोरणामुळें तिकडील पाळेगार खुनशी न बनतां जंगली भाग वहिवाटीखालीं आणण्यासाठीं झटूं लागले. उदाहरणार्थ, बसवायपट्टण खालसा केलें, पण तटिकेरी पाळेगाराकडे ठेवण्यांत आली. केंपगौडाकडून बंगळूर घेतलें, पण मागडी त्याच्याकडे ठेवली. त्याचप्रमाणें होस-कोटे खालसा केलें आणि आनेकल पाळेगाराकडे राहूं दिलें; हाच प्रकार कोलार, पुंगनूर व शिररत्नागिरी यासंबंधीं करण्यांत आला. अशा प्रकारें हिंदू पाळेगारांचीं राज्यें घेऊन देखील त्यांना नेस्तनाबूद करावयाचें नाहीं व त्यांचीं पाळेंमुळें खणून न काढतां त्यांना जगण्यास वाव ठेवावयाचा हें राजकीय धोरण शहाजीनें किंवा त्या वेळच्या विजापूरच्या अधिकाऱ्यांनीं पत्करलें असें राईस म्हणतो तें विचार करण्याजोगें आहे. विजापूरचा इतिहासकार म्हणतो त्याप्रमाणें कित्येक मुसलमानी मुत्सद्द्यांना ही कर्नाटकची मोहीम म्हणजे धर्मयुद्ध वाटत होतें हें खरें असेल तर त्यांनीं हिंदू राजे जाणून बुजून जिवंत ठेवण्याचें धोरण पत्करणें संभवत नाहीं. हिंदू पाळेगार व संस्थानिक यांचा निर्वंश कसा होईल हाच विचार प्रामुख्यानें त्यांनीं मनापुढें वागविणें स्वाभाविक होतें. परंतु शहाजीला मुसलमानांची धर्मयुद्धाची कल्पना पटण्याजोगी नव्हती. त्याला तिच्याविरुद्ध वागणें भागच होतें. आणि तो याप्रमाणें

हिंदूंना आंतून मदत करीत होता हाच आरोप त्याच्यावर विजापूरच्या अधिकाऱ्यांनीं ठेवला असें जेधे-करीना सांगतो. राचेवार नांवाचे मराठे राजे कर्नाटकांत होते त्यांना शहाजी अंतस्थ रीतीनें मदत पोचवितो अशा आरोपावरून शहाजीची चौकशी करण्यांत आली, पण आरोप शाबीत झाला नाहीं यामुळें तो सुटला अशी हकीकत जेधेकरीन्यांत दिलेली आहे. शिवभारतांत देखील वीरभद्र वगैरे राजे रणदुल्लानें काढून टाकले होते, ते शहाजीच्या साहाय्यानें पुन: स्थानापन्न झाले असें म्हटलें आहे. यावरून कर्नाटकांतील हिंदू राजांविषयीं आपलेपणाची भावना वागवून त्यांना जगविण्याची राजनीति कर्नाटकांत योजली गेली याचें श्रेय शहाजीसच द्यावें लागेल असें उपलब्ध पुराव्यावरून दिसते,"

—(शिवभारत प्रस्तावना पृष्ठें १०९, ११०)

शहाजीच्या या राजकीय धोरणाचा परिणाम त्याच्या भोंवतीं स्वत:चें असें स्वतंत्र मंडळ निर्माण होण्यांत झाला. रणदुल्लाखानाच्या मृत्यूमुळें विजापूरहून दूर अशा स्वतंत्र जहागिरींत त्याला आपलें स्वतंत्र स्वराज्य स्थापन करण्याचें स्वप्न साकार करण्याची संधि मिळाली. तिचा उपयोग करून घेऊन त्यानें तें स्वराज्य स्थापन केलें. स्वत:च्या राजधानीचें वैभव वाढवून ज्या प्रकारचें जीवन शहाजी बंगलोरला घालवीत होता, त्याचें शिवभारतांत केलेलें वर्णन व राधामाधवविलासचंपूंत जयरामदास पिण्डये यानें शहाजीच्या दिनचर्येचें केलेलें वर्णन पाहिलें म्हणजे त्याच्या हृदयांत स्वतंत्र हिंदू राजा म्हणून वावरण्याची केवढी विलक्षण आकांक्षा होती याची कल्पना येते. शहाजीच्या वैभवाचें वर्णन करतांना शिवभारतकार म्हणतात :—

"अथ तस्मिन्पुरवरे पटुप्राकार गोपुरे ।
सुधावदातसौधाग्रपताकोल्लिखिताम्बरे ।। ४५ ।।
तत्तत्कारुकलाकीर्णरम्यहर्म्यमयान्तरे ।
विटंकस्थितबंदिष्ठपारावतकृतस्वरे ।। ४६ ।।
वातायनोत्पन्ननीलकंठकूजितपूजिते ।
विस्तीर्णापणविन्यस्तपण्यवस्तुसमन्विते ।। ४७ ।।

प्रतिसद्योल्लसत्कूपे विकसद्दीर्घदीर्घिके ।
नैकशृंगारकोदंचज्जलयंत्रोच्छलज्जले ।। ४८ ।।
प्रफुल्लनिष्कुटकुटच्छायच्छन्नमहीतले ।
भित्तिविन्यस्तसच्चित्रलुभ्यल्लोकविलोचने ।। ४९ ।।
नानावर्णाश्मसंबद्ध स्निग्धसुंदरमंदुरे ।
विसंकटपुरद्वारकूटकुट्टिममण्डिते ।। ५० ।।
चयाट्टमस्तकन्यस्तनालायंत्रसुदुर्गमे ।
समीकनिपुणानीकप्रकरप्रतिपालिते ।। ५१ ।।
समन्तादनलस्पर्शपरिखावारिभासुरे ।
अपारसागराकारकासारपरिशीलिते ।। ५२ ।।
अनिलोल्लासितलता ललितोद्यानमंडले ।
कनकाचलसंकाशदेवतायतनांचिते ।। ५३ ।।
संवसन्वासवसमः स एष नृपसत्तमः ।
निजैः परिजनैः सार्धं विविधं मुदमाददे ।। ५३ ।।
स कदाचिन्मृगयया कदाचित् साधुसेवया ।
कदाचिदर्चयाशंभोः कदाचित्काव्यचर्चया ।। ५५ ।।
कदाचिन्नर्तकीनृत्यदर्शनोत्सवलीलया ।
कदाचिन्नैकविधया शरसंधानशिक्षया ।। ५६ ।।
कदाचिदायुधागारविन्यस्तायुधवीक्षया ।
कदाचिदात्मसंग्राह्यतत्तत्सैन्यपरीक्षया ।। ५७ ।।
कदाचित्पुष्पितोद्दामनगरोद्यानयात्रया ।
कदाचित्सारसाक्षीभिः शृंगाररसदीक्षया ।। ५८ ।।
कदाचिद्योगशास्त्रोक्तकलया योगमुद्रया ।
प्रभुस्तत्तद्रसमयं समयं समनीनयत् ।। ५९ ।।

"त्या शहराचा तट व वेशी मजबूत होत्या. चुन्याच्या योगें पांढऱ्याशुभ्र वाड्यांच्या शिखरावरील पताका गगनाला भेदीत होत्या. तें सर्व प्रकारच्या शिल्पानें– (कलाकुसरीनें) भरलेल्या रम्य हवेलींनीं व्यापून टाकलें होतें. तेथें खुराड्यांत बसलेले असंख्य पारवे घुमत असत. खिडक्यांतून उडणाऱ्या मोरांच्या

केकांनीं तें मनोहर होतें. त्यांतील विस्तीर्ण पेठेंत विक्रीचे पदार्थ मांडलेले असत; तेथें घरोघरीं आड होते. त्या शहरांत सुन्दर, विस्तीर्ण विहिरी होत्या. त्याचप्रमाणें अनेक चौक असून त्यांतील कारंज्यांमधून पाणी उडत असे. त्यांतील घरांच्या बागांतील फुललेल्या झाडांच्या छायेनें भूमि आच्छादित असे; त्यांतील वाड्यांच्या भिंतींवर काढलेल्या उत्कृष्ट चित्रांनीं लोकांचे नेत्र लुब्ध होऊन जात असत. त्यांत रंगाच्या दगडांनीं बांधलेल्या तुळतुळीत व सुंदर पागा होत्या. तें मोठमोठ्या वेशीच्या माथ्यावर फरसबंदीनें सुशोभित होतें. त्याच्या बुरुजांच्या माथ्यावर ठेवलेल्या तोफांनीं तें अत्यंत दुर्गम झालें होतें. युद्धनिपुण सेनासमूहानें तें रक्षिलेलें होतें. सभोंवतीं अगाध पाणी असलेल्या खंदकामुळें तें सुशोभित दिसत होतें. अपार सागराप्रमाणें विस्तीर्ण तलावानें त्याला शोभा आणली होती. त्यांत वाऱ्याच्या योगानें डुलणाऱ्या लतांनीं सुंदर अशीं उद्यानें होतीं. मेरु पर्वताप्रमाणें देवळांनीं तें शहर मंडित झालें होतें. अशा त्या नगरामध्यें वास करणारा इंद्रासारखा तो नृपश्रेष्ठ आपल्या परिजनांसह नाना प्रकारचा आनंद अनुभवीत असे. कधीं मृगयेंत, तर कधीं साधुसेवेंत, कधीं शंकराच्या पूजाअर्चेंत, तर कधीं काव्यचर्चेंत, कधीं नृत्यांगनांचे नाच पाहाण्याच्या आनंदांत तर कधीं अनेक प्रकारच्या शरसंधानांत, कधीं आयुधागारांत ठेवलेल्या आयुधांची पाहणी करण्यांत, तर कधीं आपल्या पदरीं ठेवण्यालायक अशा सर्व प्रकारच्या सैन्याची परीक्षा करण्यांत, कधीं पुष्पांनीं सुगंधित अशा नगरोद्यानांत हिंडण्यांत, तर कधीं सुंदर स्त्रियांबरोबर शृंगाररसाचा आस्वाद घेण्यांत, तर कधीं योगशास्त्रोक्त पद्धतीनें योगमुद्रेंत याप्रमाणें तो राजा सर्व प्रकारचा उपभोग घेण्यांत आपला काळ घालवीत असे."

कवि जयरामदास पिण्ड्ये यानें राधामाधवविलासचंपूंत शहाजी राजांच्या दिनचर्येचें जें वर्णन केलें आहे तें पुढीलप्रमाणें: पहाटेस शेजघराजवळ बाळसंतोष, कुडवुडचे जोशी व शाहीरलोक

भूपाळ्या वगैरेंचे मधुरालाप काढून राजाला सुखशय्येवरून उठवीत. इतक्यांत विश्वनाथभट्ट उच्च स्वरानें प्रातःस्मरण संस्कृत भाषेंत करीत. कित्येक ब्राह्मण पुण्याहवाचनाचें म्हणजे राजाला सुखाचा दिवस जावो अशा अर्थाचे मंत्र म्हणत. कित्येक विप्र ॐकारपूर्वक वेदपठन करीत. कित्येक स्वस्ति साम्राज्यादि मंत्रांनीं आशीर्वाद देत, व कित्येक अग्निहोत्री वषट्कारार्पणांत गुंतत. मंत्रपठनाच्या, भूपाळ्यांच्या व प्रातःस्मरणाच्या ह्या धांदलींत राजा शेजेवरून उठून अंगणांत येऊन आकाशाकडे पाहून अरुंधती, शची, देवसेना, व आकाशगंगा इत्यादि तारांगणांवर नजर फेकून आणि शिव, विष्णु, स्कंद ऊर्फ खंडोबा, ब्रह्मदेव, लोकपाल, इंद्रादि देव, होमशाळेंतील अग्नि इत्यादींचें दर्शन घेऊन दिशावलोकन करी. ह्याच सुमारास जंगम शंख फुंकीत, गुरव शिंग वाजवीत, व घडशी चौघडा सुरू करीत. ह्या मंगलध्वनींच्या निनादांत तुफान ऐरावत, सवत्स गाय, पुत्रिणी ब्राह्मणी, वर्धमान मानुष म्हणजे विदूषक, ठेंगू ब्राह्मण व पाण्यांतून नुकताच बाहेर निघालेला डुक्कर हे शुभचिह्नक प्राणी राजापुढून जात. नंतर वाड्याच्या समोरील पटांगणांत हजार पांचशें घोडेस्वार किंवा पाईक कवाईत करीत. त्यांची परेड देहली दरवाज्याच्या बाहेर येऊन पाहून, रथ, पालख्या, शिबिका, वगैरे वाहनांचें अवलोकन राजा करी. इतक्यांत दरवेशी एखाद दुसरा सिंहाचा बच्चा व थट्टीकामदार एखादा माजलेला पोळ राजापुढें नाचत वागडत आणीत. नंतर हंस, चाष, मत्स्य, यांचे शुभ शकुन घेत घेत व दरवाजावरील तोरणाकडे पहात पहात वाड्यापाठीमागील अश्वत्थ, औंदुबर वगैरे शुभवृक्ष व पारिजातकादि पुष्पवृक्ष यांच्या छायेखालून राजा जाई. शेवटीं दक्षिणावर्त शंखांतल्या तीर्थाचा नेत्रांना स्पर्श करून व वेळूच्या लंबायमान दांड्याच्या अग्रावर लटकत व फडफडत असलेल्या जरीपटक्याकडे सकौतुक दृष्टिक्षेप चढवून, राजा नाडीपरीक्षणार्थ आपला हात राजवैद्यापुढें करी. सवेंच एक ब्राह्मण एका हातांत तेलानें भरलेली रुप्याची

परात व एका हातांत तुपानें भरलेली रुप्याची परात राजापुढें आणी. त्यांत मुखाचें प्रतिबिंब पाहून व अष्टोत्तरशे मंगलांचा शुभ शकून घेऊन राजा स्नानोपहारादि सेवन केल्यावर सभामंडपांत प्रवेश करी. सभामंडपाला ऊर्फ दरबाराला नवगजी असें नांव असे. त्या नवगजींत राजे, उपराजे, संस्थानिक, परराष्ट्रीय वकील, व सरदार आधींच येऊन हजर असत. पंडित, कवि, शास्त्री, वैदिक इत्यादि सरस्वतीपुत्रांचाहि समुदाय राजदर्शनाची उत्कंठेनें वाट पहात असे. नंतर भालदारांच्या ललकाऱ्यांत व जनसंमर्दांतून वाट काढीत येणाऱ्या चोपदारांच्या ठणकाऱ्यांत महाराज हातांतील तरवारीचें अग्र जमिनीला टेकीत टेकीत सभास्थानांत गंभीर रुबाबानें प्रवेश करून सिंहासनारूढ होत. हा प्रातःकालीन कार्यक्रम झाला. भोजनोत्तर दोन प्रहरानंतरहि कधीं कधीं स्वारीशिकार नसल्यास पंडित व कारभारी यांच्या सभेंत बसून सायंकाळ पावेंतों राजकारण, ब्रह्मचर्चा, काव्यविनोद, दानधर्म, पंगुपरामर्श, न्याय-मनसुबी, जेठी-मल्लयुद्धें इत्यादि लघु किंवा जड व्यवहारांत महाराज गुंतलेले असत. सायंकर्म आटोपल्यावर उपहारोत्तर खलबतखान्यांत शेलक्या मुत्सद्द्यांच्या समवेत गुप्तकारवाई चाले."

— (राधामाधवविलासचंपू प्रस्तावना पृ. ३४।३५)

शहाजीच्या या वर्णनावरून त्याची धारणा व त्याचा ध्येयवाद स्पष्ट झाल्याविना रहात नाहीं. या त्याच्या ध्येयाची व त्याच्या कर्नाटकांतील वास्तव्याच्या तेथील हिंदुजीवनावर झालेल्या परि-णामाची त्याच्या समकालीन लोकांना पूर्ण कल्पना आलेली होती. त्याच्या दरबारांत एक सुबुद्धिराव या नांवाचा कवि कांहीं दिवस होता. हा कवि उत्तर प्रदेशांतील घाटमपूरचा राहणारा असून त्यानें उत्तरदेशी भाषेंत शहाजीचें वर्णन करतांना म्हटलें आहे : "शहाजी-मुळें दक्षिणेंतील सर्व हिंदूंची वूज राहिली. जसें श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत उचलून गोपांचें संरक्षण केलें, तसेंच शहाजीनें आपल्या छत्र-सिंहासनधारणानें सर्व हिंदूंचें संरक्षण केलें (इंदभयो सब हिंदुनको अरु आमुख मानयो छत्र कियो है। ज्योंहि गोवर्धन कृष्ण धऱ्यो तर

गोकुल वो कुल रोक जियो है ) प्रत्यक्ष छत्रसिंहासन धारणाचें भाग्य जरी शहाजीला लाभलें नसलें तरी कर्नाटकांतील हिंदूंना तो आपला त्राता वाटत होता यांत संशय उरत नाहीं. मुळांत असलेली शहाजीची ही आकांक्षा हिंदू संस्कृतीचे राज्यावशेष असलेल्या विजयनगरच्या परिसरांत चांगलीच पल्लवित झाली. त्याच्या दिनचर्येचें उपरिनिर्दिष्ट वर्णन बारकाईनें तपासलें तर असें आढळून येईल की, मुसलमानी राजांचे व तेथील वातावरणाचे कोणतेही संस्कार शहाजीला आकर्षक वाटत नव्हते. तत्कालीन उत्तर भारतांतील हिंदू राजे व महाराष्ट्रांतील हिंदू सरदार यांच्या संवयी, संस्कार व त्यांच्या सभोंवारचें वातावरण यांचा अंशतः सुद्धा संपर्क शहाजीला नको होता. त्याऐवजीं लहान सहान बाबींत सुद्धां कटाक्षानें विशुद्ध भारतीयता राखण्याचा त्याचा कटाक्ष होता. या दक्षिणेंतील स्वारींतच या प्रेरणा, विजयनगरनें निर्माण केलेल्या वातावरणांतून त्याला मिळाल्या असल्या पाहिजेत हेंच यावरून दिसून येतें. या प्रेरणांची दुसरी कोणतीहि उपपत्ति लागू शकत नाहीं. कारण दुसरें कोणतेंहि सांस्कृतिक स्फूर्तिकेन्द्र अस्तित्वांतच नव्हतें.

हातीं धरण्यासारखा विजयनगरचा कोणीहि अवशेष नसल्यामुळें व विजापूरशीं उघड विद्रोह करण्यांत आत्मनाश असल्यामुळें शहाजीनें आपलें अंकित स्वराज्य हळू हळू प्रत्यक्षांत आणावयास प्रारंभ केला. विजयनगरच्या अवशेषांना संरक्षण देऊन त्यानें स्वतः-भोंवतीं आपल्या साहाय्यकांचें प्रभावशाली वर्तुळ निर्माण केलें. त्याच्या या हालचालींनींच सावध होऊन विजापूर दरबारांत त्याच्यासंबंधीं भयशंकित वातावरण उत्पन्न झालें, व शहाजीच्या स्वतंत्र स्वराज्य प्रयत्नांसाठींच त्याला फसवून कैद करण्यांत आलें. पुष्कळ इतिहासकार शिवाजी महाराजांच्या स्वराज्यप्रयत्नांना पायबंद घालण्याचें एक अमोघ साधन म्हणून शहाजी राजांना बाजी घोरपड्याकरवीं कैद करण्यांत आलें असें म्हणतात. पण उपलब्ध पुराव्यावरून शहाजीची कैद शिवाजी महाराजांच्या

स्वराज्य प्रयत्नांतून उत्पन्न झालेली नसून शहाजीच्या स्वतःच्याच स्वराज्यप्रयत्नांतून ती उद्‌भवलेली आहे असें सिद्ध होतें.

## शहाजीची कैद

शहाजीच्या अटकेचें वृत्त हिंदू व मुसलमान दोन्ही तत्कालीन लेखकांनीं वर्णन केलेलें आहे. पण हे आपापल्या पक्षाचे पक्षपाती असणारे लेखक एका बाबतींत मात्र पूर्णपणें एकमत आहेत. ती बाब म्हणजे छत्रपति शिवाजी महाराजांच्या उठावाच्या प्रकरणाशीं शहाजी राजांच्या अटकेचा कांहीं संबंध नाहीं हें होय. विजापूरचा तत्कालीन सुलतान महम्मद आदिलशहा याचा महम्मद नामा हा एक अस्सल पुरावा आहे. या ग्रंथांत शहाजीच्या कैदेचें वर्णन करतांना असें म्हटलें आहे कीं, जिंजीचा वेढा बरेच दिवस रेंगाळत चालला असतां व युद्धाचें काम चालू असतां त्या कपटी शहाजीनें नवाब मुस्तफाखान याजकडे निरोप पाठवून 'माझ्या सैन्यास विश्रांतीची जरूरी असल्यामुळें मला सैन्यासह जहागिरीकडे जाण्याची परवानगी मिळावी' अशी विनंति केली. यावर नबाबानें उत्तर पाठविलें कीं 'या वेळीं तुम्ही निघून जाल तर वेढ्याच्या कामास व्यत्यय येईल. करितां तुम्ही जाऊं नये.' शहाजीनें पुन्हां दुसऱ्यांदा निरोप पाठविला कीं लष्करांत धान्याची अतिशय महागाई झाली आहे; यामुळें शिपायांना यापुढें उपासमार सहन होणार नाहीं व त्यांच्याकडून कामहि होणार नाहीं. त्या अर्थीं तुमच्या परवानगीची वाटहि न पाहतां मी आमच्या प्रांताकडे निघून जातों. यावरून शहाजी उद्दाम बनला आहे व त्याच्या मनांतून आपल्याशीं कुरापत काढण्याची इच्छा आहे अशी नबाबाची खात्री झाली आणि त्यानें त्याला इतक्या हुशारीनें व व्यवस्थितपणें कैद करविलें कीं त्याच्या मालाची यत्किंचित लुटालूट न होतां सुतळीच्या तोड्यासुद्धां सर्व माल सरकारांत जप्त झाला.

— (सरकारकृत शिवचरित्र पृ. ३८)

बुसातीने सलातीन नांवाच्या ग्रंथांत शहाजीची कैद अशी वर्णन केलेली आहे : "चंदीकडे मुस्तफाखान गेल्यावर सिद्दी रयहान व मुस्तफाखान यांचें लष्कर एके जागीं झालें. तेव्हां मुस्तफा व शहाजी यांचा बेबनाव होऊन शहाजी मुस्तफाची गोष्ट ऐकेनासा झाला. तेव्हां शहाजीला पकडण्याकरतां हिजरी १०५८ रजब रोजीं सकाळीं बाजी घोरपडे व यशवंतराव आसदखानी यांना मुस्तफानें पाठविलें. शहाजीनें गेली रात्र नाचरंगांत घालविली असल्यामुळें तो पहाटेच्या वेळीं निजला होता. घोरपडे वगैरे सरदारांची फौज आपल्यावर चालून आली असें समजतांच तो बेभान होऊन घोड्यावरून एकटाच निघाला. इतक्यांत बाजी घोरपडे यानें त्याचा पाठलाग करून त्याला पकडलें आणि नबाबापाशीं आणलें. शहाजीचे ३००० स्वार होते. ते सर्व पळून गेले व शहाजीचें सर्व लष्कर लुटलें गेलें. शहाजी कैद झाल्याची बातमी ऐकून आदिलशहानें दरबारांतून अफझलखानाची रवानगी केली व शहाजीला बंदोबस्तानें आणण्याचें काम त्याजकडे सोपविलें." (१५७० कार्तिक मार्गशीर्ष)

या दोन्ही खास मुस्लिम पक्षपाती ग्रंथांत शहाजीच्या अटकेचें कारण शिवछत्रपतींच्या स्वराज्यप्रयत्नांत दडलेलें नसून शहाजीच्याच मुस्तफाखानाशीं आलेल्या वाकडेपणांत व विजापूर दरबारला स्वतंत्रपणेंच शहाजीविषयीं वाटत असलेल्या भीतींत आहे असें स्पष्टच दर्शविलेलें आहे. पण हा मुस्तफाखान कोण? व त्याचे व शहाजीचे खरे मतभेद कोणत्या मुद्द्यावर होते? याचें कारण मुसलमानांनीं केलेल्या वर्णनांत नाहीं. तें कारण कर्नाटकच्या पार्श्वभूमीचा शिवभारताच्या प्रकाशांत नीट विचार केला तर समजून येणारें आहे. तें पुढीलप्रमाणें सांगतां येईल. विजयनगरचा शेवटचा नाममात्र सम्राट् श्रीरंगराय याची त्या वेळीं कसें बसें राज्य टिकविण्याची धडपड चालू असून त्याच्या, त्याच्या पूर्वीच्या मांडलिकांशीं लढाया चालू होत्या. त्या संघर्षांत जिंजी, मदुरा, व तंजावर येथील राजांवर त्यानें शस्त्र परजलें असतां मदुरेचा राजा त्रिमल नायक यानें स्वामिद्रोह करून गोवळकोंड्याच्या कुतुबशहाला

साहाय्यार्थ बोलाविलें. या सैन्यानें पेनुकोंडा हस्तगत करून श्रीरंगाला तर हांकलून दिलेंच; पण त्यानंतर परत न जातां जिंजीला वेढा दिला. त्यामुळें घाबरून तंजावरच्या राजानें गोवळ-कोंडेकरांशीं तह केला. ज्या त्रिमलनायकानें हें कुतुबशहाचें संकट स्वतः होऊन पाचारण केलें होतें त्याला हें स्पष्टपणें कळून आलें कीं, जिंजी हस्तगत होतांच या सैन्याचे पाश आपल्या मदुरेच्या गळ्याभोंवतीं आवळले जाणार. त्यानें मूर्खपणानें हें सकट टळावें म्हणून विजापूरकडे साह्य मागितलें. त्याप्रमाणें विजापूरच्या वतीनें मुस्तफाखान हा मोठें सैन्य बरोबर घेऊन मुख्यतः जिंजीचा वेढा उठवून गोवळकोंडेकरांना हांकलून लावण्यासाठीं म्हणून आला. पण येतांच आपल्या हिंदू मित्राला धुडकावून लावून कुतुब-शहाचा सेनापति मीरजुमला याच्याशीं सारी दक्षिणी संस्थानें धुळीस मिळवून हिंदू प्रदेश अर्धा अर्धा वाटून घेण्याचा मित्रत्वाचा करार त्यानें केला. तात्पर्य, एरवीं आपसांत भांडणाऱ्या मुस्लिम सत्ता एक होऊन व वंचकतेचा आश्रय करून हिंदू दक्षिण बेचिराख करण्या-स्तव कटिबद्ध झाल्या. त्या वेळीं शहाजी हें कर्नाटकांत 'बडें प्रस्थ' झालेलें असून त्याला मुस्तफाखानाच्या आधिपत्याखालीं लुटण्याची आज्ञा होती. निझामशाहीच्या पुनरुद्धाराच्या मिषानें केलेल्या स्वराज्यप्रयत्नाच्या वेळीं दिल्ली व विजापूर या आपापसांत भांडणाऱ्या राजसत्ता आयत्या वेळीं एक होऊन आपल्याविरुद्ध कशा उठल्या होत्या याचा शहाजीवरील संस्कार ताजा होता. त्रिमलनायकाचा मूर्खपणा साऱ्याच दक्षिणेला भोंवणार हें त्याला दिसून आलें, व हिंदू राज्यांची होणारी धूळधाण व मुस्लिम सत्तांची वंचकता त्याला मान्य होणारी नसल्यामुळें–किंबहुना त्याच्या अंकित स्वराज्याच्या मंदिराचा, हीं सत्ताकेन्द्रें टिकविणें हाच पाया होऊं शकणारा असल्यामुळें त्यानें मुस्तफाखानाच्या धोरणाशीं विरोध करावयास व हिंदू संस्थानिकांना संरक्षण द्यावयास प्रारंभ केला. विजापूर दरबारशीं व सेनापति मुस्तफाखानाशीं शहाजीचा जो विरोध उत्पन्न झाला त्याची कारणमीमांसा ही या स्वरूपाची

आहे. मुस्ताफाखानानें चालविलेला विश्वासघात शहाजीला घृणास्पद वाटल्यामुळें त्यानें जिंजीच्या वेढ्यांत भाग घेण्याचें नाकारलें. त्यांतील त्याचा भाव मुस्तफाखान व विजापूरचा सुलतान यांच्या ध्यानांत येतांच ते हादरले. कावेरीपट्टण, मदुरा, म्हैसूर, बेदनूर इत्यादि ठिकाणच्या हिंदु सत्ता शहाजीच्या लगामीं लागलेल्या ध्यानांत येतांच शहाजी शत्रुपक्षाला मिळण्यांत असलेलें संकट त्यांच्या ध्यानांत आलें, व या भीतींतूनच शहाजीच्या अटकेचें प्रकरण निर्माण झालें. शिवभारतकार म्हणतात :—

षाड्‍गुण्यस्य प्रयोगेण तत्तन्मंत्रबलेन च ।
वशीचकार सकलं शाहः कर्णाटमण्डलम् ।।३।।
प्रसूनमिव संप्राप्य प्रणयी प्रणतिस्पृशा ।
शिरसा प्रतिजग्राह जगद्देवोऽस्य शासनम् ।।४।।
दुर्धर्षोऽपि विधेयोऽस्य बभूव मधुराधिपः ।
प्रतिपेदे महाशूरः पतिरप्यस्य वश्यताम् ।।५।।
रणदूहलखानेन खलेनोपहृतं बलात् ।
भद्रासनं स्वमध्यास्तवीरभद्रोऽस्य संश्रयात् ।।६।।
तं तं मंत्रं तत्र तत्र प्रयुंजानस्य धीमतः ।
बहवोऽस्यानुभावेन जहुर्यवनजं भयम् ।।७।।
शाहराजस्य मंत्रेण भवन्नन्यसुदुःसहः ।
सर्वाणि स्वामिकार्याणि चकार रणदूलहः ।।८।।
अथ कालगतिं प्राप्ते सेनान्यां रणदूलहे ।
कार्णाटकान् नरपतीन् स्ववशीकर्तुमंजसा ।।९।।
यं यं सेनापतिं तत्र प्राहिणोत् किल येदिलः ।
स स तत्कांक्षिताकांक्षी शाहमेवान्ववर्तत ।।१०।।
ततो भृशबलं भूपं नियन्तुमनयं स्पृशन् ।
इभरामसुतो दर्पात् मुस्तुफाखानमादिशत् ।।११।।

— (शिवभारत अ.११)

(संधि, विग्रह, यान, आसन, संश्रय आणि द्वैध या सहा गुणांचा प्रयोग करून, त्याचप्रमाणें नाना प्रकारच्या मसलती लढवून शहाजीनें सर्व कर्नाटक प्रांत आपल्या ताब्यांत आणला. कावेरी-पत्तनाच्या जगद्देवानें शरण येऊन त्याची सत्ता पुष्पाप्रमाणें मस्तकांवर धारण केली. मदुरेचा अजिंक्य राजासुद्धां ह्याच्या आज्ञेंत वागूं लागला. म्हैसूरच्या राजानेंहि ह्याचा ताबा मान्य केला. दुष्ट रणदुल्लाखानानें बलात्कारानें घेतलेल्या आपल्या सिंहासना-वर वीरभद्र हा शहाजीच्या आश्रयानें पुन्हा बसला. निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या मसलती योजणाऱ्या चतुर शहाजीच्या प्रभावानें पुष्कळांनीं यवनांची भीति टाकली. दुसऱ्यांस अतिशय दुस्सह असणारा रणदुल्लाखान सर्व स्वामिकार्य शहाजीराजाच्या सल्लामसलतीनें करूं लागला. पुढें सेनापति रणदुल्लाखान कालवश झाल्यावर कर्नाटकांतील राजांना ताबडतोब आपल्या ताब्यांत आणण्यासाठीं ज्या ज्या सेनापतीस आदिलशहानें तिकडे पाठविलें तो तो सेनापति त्याचें इष्टकार्य सिद्धीस नेण्यासाठीं शहाजीच्याच तंत्रानें वागूं लागला. तेव्हां अनीतीचा आश्रय करणाऱ्या त्या इब्राहीम आदिलशहाच्या पुत्रानें घमेंडीनें भोसले राजास अटक करण्याची मुस्तफाखानास आज्ञा केली.

मुस्तुफाखानानें प्रथम वरकरणी स्नेह दाखवून शहाजी बेसावध असतांना त्याच्या शिबिरावर पहाटेच्या काळोखांत अठरा उप-सेनापतींसह हल्ला चढविला. बाजी घोरपडे यानें प्रत्यक्ष शहाजीच्या तंबूवर आक्रमण केलें; व अर्धवट झोपलेल्या या पुरुषसिंहाला कैद करण्यांत आलें. शहाजीला वस्तुत: मुस्तफाखानाच्या विश्वासघातकी स्वभावाची व स्वत:च्या अंगीकृत कार्याची पूर्ण कल्पना होती. त्यानें सावध रहावयास हवें होतें. स्वत:च्या असावधानतेमुळेंच शहाजीवर हा प्रसंग आला. याबद्दल पुढें शहाजी राजांना छत्रपति शिवाजी महाराजांनीं सोनोपंत डबीरांजवळ बोलतांना पुढीलप्रमाणें ठपकाहि दिलेला आहे :—

स्वयंनियंता विश्वस्य विश्वस्य बत वैरिषु ।
सुखं सुप्तो निजगृहे ततो निजगृहेऽरिभिः ।।७।।
नावज्ञेयाः खलुज्ञेन वराका अपि विद्विषः ।
प्रशाम्यते पतंगेन प्रज्वलन्नपि दीपकः ।।८।।
दीपं विनाशयन्नेव पतंगश्चेद्विनश्यति ।
तुल्यतां कस्तयोस्तर्हि जात्यंध इव पश्यति ।।९।।
ननं पिपीलिकोऽप्येकः प्रविश्य करिणः करम् ।
भवत्यंतकरस्तस्मादल्पं मन्येत नो परम् ।।१०।।
अहो महाबाहुरसौ जानानोऽपि महानयम् ।
गणयत्येव न परानस्य दोषो महानयम् ।।११।।

—(शिवभारत अ. १६)

(खरोखर विश्वाचा नियंता असून, शत्रूंवर विश्वासून आपल्या घरीं सुखानें निजला, म्हणून तो शत्रूकडून पकडला गेला! शत्रु क्षुद्र असले तरी शहाण्यानें त्यांची उपेक्षा करूं नये; कारण जळणारा दिवासुद्धां पतंगाकडून विझविला जातो. दिव्याचा नाश करतां क्षणींच जरी पतंग नाश पावतो, तरी एखाद्या जन्मांधाप्रमाणें कोण डोळस मनुष्य दोघांनाहि सारखें मानील? खरोखर एखादी मुंगी देखील हत्तीच्या सोंडेंत शिरून त्याचा अंत करते. म्हणून शत्रूंस केव्हांहि क्षुद्र मानूं नये. अहो, हा महाबाहु मोठा राजनीतिज्ञ असूनहि शत्रूंची मुळीं पर्वा करीतच नाहीं, हा याचा मोठा दोष होय.)

शहाजीला अटक होतांच त्याचा वडील पुत्र संभाजी यानें कर्नाटकांतून व छत्रपति शिवाजी महाराज यांनीं पुणें प्रांतांतून आदिलशाही मुलखांत त्याच्या शिक्षेचा सूड म्हणून एकच धमाल उडवून दिली. शिवाजीवर पाठविलेल्या सरदारांची त्यानें जी धुळधाण केली त्याचा महम्मद आदिलशहानें एक प्रकारें धाकच घेतला. शिवछत्रपतींनीं शहाजहानला मिळून आपण विजापुरी राज्याचे लचके तोडणार आहोंत असाहि देखावा उत्पन्न केला. त्याचा परिणाम होऊन शहाजीची सुटका करण्याचा आदिलशाही

दरबारांत विचार प्रारंभ झाला. ज्या मुस्तफाखानामुळें शहाजीवर अटकेचा प्रसंग आला, त्या मुस्तफाखानाचाहि याच अवधींत मृत्यु झाला. महंमद आदिलशहाला स्वत:ची अशी बुद्धि नव्हतीच. तो स्वतः दृढनिश्चयीहि नव्हता. मुस्तफाखानाच्या मृत्यूनंतर त्याच्या विरुद्धपक्षाच्या हातीं दरबारची सत्ता गेली. तेव्हां त्यांनीं शहाजीसारख्या प्रबल व्यक्तीला सोडून द्यावें व अकारण वैर पत्करूं नये असा सल्ला महंमदशहाला दिला. शेवटीं सिंहगड परत देण्याच्या अटीवर शहाजीची सुटका करण्यांत आली. शिव-छत्रपतींनीं सिंहगड घेतला हें आदिलशहाच्या मनाला फारच डांचत होतें. व आपला सुलतान म्हणून वरचष्मा रहावा अशी त्याला स्वाभाविक इच्छाहि होती. पित्याच्या शब्दासाठीं शिव-छत्रपतींनीं सिंहगड परत दिला असला तरी ती गोष्ट त्यांच्या मनांत पुष्कळ दिवस सलत राहिली. शहाजीची सुटका केल्यानंतर कांहीं दिवस तो महाराष्ट्रांत होता. पण पुन: कर्नाटकांत दंगेधोपे सुरू झाल्यामुळें त्याची तिकडे रवानगी करण्यांत आली. इस्लामी दरबारच्या इतक्या दिवसांच्या अनुभवामुळें शहाजीला त्यांच्या-विषयीं यत्किंचितहि प्रेम नव्हतें. शक्य तोंवर तेथून दूर रहावें हीच त्याची इच्छा होती. त्यानंतर लवकरच शहाजीनें कर्नाटकां-तील आपला व्याप स्वतंत्रपणेंच वाढविला. शहाजीला आपल्या घराण्याचा अभिमान किती होता, व नोकरीविषयीं त्याच्या अंत:करणांत तिटकारा किती होता हें सिद्ध करणारें त्याचें स्वत:-चेंच पत्र उपलब्ध झालेलें आहे. त्या पत्रांत आपल्या कर्नाटकांतील जहागिरींत अकारण ढवळाढवळ करणाऱ्या विजापूरकरांना दम देतांना तो म्हणतो, "तरी आपण रजपूत लोक अजी तलग पेश-जीहि दोघा चौ पादशाहींत खिदमत केली. असा गैरहिसाबी जाजती सोसुनु कमइजतीन व गैरमेहेरबानीन पेशजीहि खिदमत केली नाहीं व पुढेहि न करूं. उमेदीनें आपण आजी दीढ वर्षे जाजती सोसिली; ते याच दमा कीं थोरले हजरत साहेबाचे नवाजीस व हजरत साहेबीहि जहाबक्षी केली आहे व वक्तहि

एकवजाचा समजोनु आपण सबूरी करोनु तह्मूल करावयास तकसीर केली नाहीं. पेस्तर हजरत साहेबास आपली दरकार असेल तरी हिसाबी आपला सरंजाम सदरहु केला पाहिजे. आणि दरकार नसेल तरी खुषनुदीने रजा दिधली पाहिजे. आपल्यास असलाद पुन्याई मामल्याचीहि हवस कांहीं राहिली नाहीं. एखादं आपले हिंदूचे तीर्थी वसौनु हक तालाची बदगी करुनु हजरत साहेबास द्वा देउनु फर्जदभाई आहे. तियापासुनु खिदमत घेतली पाहिजे. अगर त्याहिपासुनु खिदमत घेणें नसेल तरी त्यासहि रजा द्यावी."

शहाजीच्या स्वामिनिष्ठेबद्दल जे आक्रोश करतात त्यांनीं हाहि विचार करणें आवश्यक आहे कीं, ज्यांच्याविषयीं त्यानें निष्ठा बाळगावी असे हे स्वामी होते काय ? शहाजीच्या समोरच मुरार-पंतांसारख्या निष्ठावंत सेवकाचा विजापूर दरबारांत झालेला खून व अशींच अन्य कृत्यें तो कसा विसरूं शकणार होता ? नाइलाज म्हणून परक्या राज्यकर्त्यांचें अंकितत्व पत्करावें लागलें तरी संधि सांपडेल तेव्हा सुटण्याचा प्रयत्न करणें हेंच त्याचें धोरण होतें व तें पारतंत्र्यांतील रानडे प्रभृति देशभक्तांच्या देशभक्तीच्या भावनेला पूर्णपणें धरून आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सुटकेनंतर त्याचें हें अंकित स्वराज्याचें ध्येय पूर्ण झालें. तेव्हां छत्रपतींचा महाराष्ट्रांत उदय होत असतांना शहाजीनें हें नाममात्र अंकितत्वहि कां झुगारून दिलें नाहीं ? असा प्रश्न उत्पन्न होईल. त्याला विख्यात संशोधक दत्तोपंत आपटे यांच्या शब्दांत आम्ही पुढील-प्रमाणें उत्तर देतों. "राजकारणांतले हे सगळे डाव खेळतां खेळतां शहाजी वृद्धावस्थेस पोंचला होता व आतां कोणतेंहि स्वतंत्र धाडस करण्याची उमेद बाळगण्याचें त्याचें वय राहिलें नव्हतें. तरी पण कोणत्याना कोणत्या तरी बादशहाला आपली गरज लागणार हें लक्षांत घेऊन तो असें बजावीत असे कीं अब्रूला धक्का लावून घेऊन मी कोणाचा बंदा नोकर म्हणून काम करणार नाहीं. तथापि प्रत्येक वेळीं त्याला कोणा ना कोणा तरी मुसलमानी सत्ताधीशावर

अवलंबून रहावेंच लागलें हा त्याच्या कालाचा व परिस्थितीचा परिणाम होय." --(शिवभारत प्रस्तावना पृष्ठ १९८)

तात्पर्य, विजयनगरपासून परिपूर्ण हिंदू जीवनाच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देऊन हिंदुत्वाचें पुनरुत्थान घडवून आणण्याची शहाजीला मिळालेली स्फूर्ति त्याच्या दरबारांत प्रत्यक्षांत त्यानें कशी आणली होती, हें आपण पाहिलें आहे व तो अयशस्वी झाला असला तरी, आणि अंकित स्वराज्याचीच कल्पना त्याला प्रत्यक्षांत आणतां आली असली तरी, त्याच्या हृदयाला पूर्ण स्वराज्याचीच खरी ओढ होती असें अनुमान काढतां येण्यासारखे पुरावेहि आपण पाहिले. शिवछत्रपतींच्या कार्याला पुढें तर त्यानें साह्य दिलेंच; पण शिवछत्रपतींची बालपणीं त्यांच्या वयाच्या बाराव्या वर्षी पुण्याला रवानगी करतांना शहाजीच्या अंतःकरणात त्यांच्या द्वारें स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न करावा असे विचार घोळत होते असें मानण्याजोगा पुरावा उपलब्ध आहे. शहाजी कर्नाटकमध्यें प्रथम गेले त्या वेळीं शिवछत्रपति आपल्या बालवयांत त्यांच्या जवळच होते. जिजाबाई इत्यादि परिवारासह शहाजी बंगलोरला होते. जदुनाथ सरकार प्रभृतींनीं असा उल्लेख केला आहे कीं, जिजाबाईचें तारुण्य संपल्यामुळें शहाजीनें कर्नाटकाला जाण्यापूर्वीच तिचा परित्याग केला होता. पण शिवभारतांतील उल्लेखावरून सरकार यांची ही मीमांसा खोटी ठरते. जिजाबाई व शिवाजी हीं कांहीं तरी नावडती होती व त्यामुळें आणि शिवाजीच्या स्वाभिमानातिरेकाचा प्रत्यय आल्यामुळें त्यांना शहाजीनें दूर केलें व तेंहि विजापूरपासूनच दूर केलें ही रूढ समजूत चुकीची आहे. कारण तसें असतें तर शहाजीनें वडील मुलगा संभाजी याला आपल्याजवळ ठेवून घेतलें नसतें व तोहि बापानें टाकलेल्या आपल्या आईला सोडून शहाजीजवळ खात्रीनेंच राहिला नसता. बंगलोरला शहाजीनें आपलें ऐश्वर्य उभारलें त्या वेळीं बाल शिवाजी आपल्या आईबरोबर त्याच्या जवळच होता व एखाद्या स्वतंत्र महाराजाप्रमाणें आपलें वृद्धिगत

होणारें ऐश्वर्य आणि प्रभुत्व हें शिवाजीच्याच पायगुणामुळें प्राप्त झालें आहे, असें वाटून पित्याचें आपल्या या पुत्रावरील प्रेम अधिकच वृद्धिंगत होत होतें. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत शहाजीच्या परिसरांतील संस्कार ग्रहण करीत शिवछत्रपति तेथें होते. त्यानंतर विशिष्ट हेतु मनांत धरून शहाजीनें त्यांच्या दीर्घ-दर्शी मातेसह त्यांची रवानगी पुण्याच्या जहागिरीवर केली. ती करतांना पुढच्या कामाच्या दृष्टीनें उपयोगी पडतील असे पेशवे इत्यादि पदाधिकारी म्हणून, आपले खास मुत्सद्दी, बाल शिवाजी-बरोबर त्यांच्या या पित्यानें पाठविले. शहाजीच्या मनांत अशी कांहीं कल्पना असल्यावांचून या एवढ्या सिद्धतेची कांहीं आवश्यकता सोपपत्तिक रीतीनें उलगडतां येण्यासारखी नाहीं. शिवभारतकार म्हणतात :—

जननी शंभुशिवयोस्तव यादवनंदिनी ।
जग्राह हृदयं पत्युः शुद्धान्ते सुमहत्यपि ॥६०॥
स तु शंभोः कनीयांसं गरीयांसं गुणाश्रिया ।
बहु मेने महाराजः शिवशर्माणमात्मजम् ॥६२॥
यदा प्रभृति संजातः स एव तनयः शिवः ।
तदाप्रभृति शाहस्य समृद्धाः सर्वसंपदः ॥६३॥
अतिष्ठन्द्वारि बहुशो मंदराचलसुंदराः ।
विजितांभोरुहरुचो मदवारिमुचो गजाः ॥६४॥
आसन्सहस्रशश्चापि मंदुरायां मनोहराः ।
वातो इवाशुगतयः सैंधवाः समरोद्धुराः ॥६५॥
ववृधे चाधिकं कोषस्तोषेण सह नित्यशः ।
प्रतापः पप्रथेऽत्यर्थं प्रभावश्च दिने दिने ॥६६॥

(शहाजीच्या पुष्कळ स्त्रिया असूनहि शंभू आणि शिवाजी यांची आई जी जाधवरावाची मुलगी (जिजाबाई) तिनें आपल्या पतीचें हृदय काबीज केलें होतें. शंभुजीपेक्षां वयानें धाकटा पण गुणांनीं मोठा असा आपला पुत्र शिवाजी यावर शहाजी राजाचें

फार प्रेम होतें. जेव्हां हा पुत्र शिवाजी जन्मला तेव्हांपासून शहाजीचें सर्व ऐश्वर्य वृद्धिंगतच होत राहिलें. मंदर पर्वताप्रमाणें सुंदर कमळांच्या कांतीला ज्यांनीं मागें टाकलें आहे व ज्यांच्या गंडस्थळांतून मदजल गळत आहे असे पुष्कळ हत्ती त्यांच्या द्वारीं उभे असत. वायूप्रमाणें वेगवान् आणि युद्धांमध्यें खंबीर असे हजारो सुंदर घोडे त्यांच्या पागेमध्यें होते. त्यांच्या संतोषाबरोबर त्यांचा कोषहि नित्य अधिक वाढूं लागला. त्यांचा प्रताप आणि दरारा हे दिवसेंदिवस अतिशय वाढत चालले."

--(शि. भा. अ. ९. श्लोक ६० ते ६६)

शिवछत्रपतींचें शिक्षण पित्याच्या देखरेखीखालीं बंगलोरलाच झालें. त्यांच्या रवानगीचें वर्णन करतांना शिवभारतकारानें असें म्हटलें आहे कीं, शहाजीला रात्रीं स्वप्नांत भगवान् महादेवांनीं दर्शन दिलें व पुढीलप्रमाणें संदेश दिला :--

सूर्यवंश्य महाबाहो शाहराज महामते ।
समाकर्णय मद्वाचमिमां कुशलमस्ति ते ॥१३॥
य एष भ्राजतेऽभ्यर्णे कनीयांस्तनयस्तव ।
तमेनं लक्षणोपेतमवेहि पुरुषोत्तमम् ॥१४॥
वर्धमानः क्रमेणैव त्वत्पुत्रोऽयमुरुक्रमः ।
समाक्रम्यावनीं सर्वां यवनान्निहनिष्यति ॥१५॥
इयं भगवती देवी गिरिजा भक्तवत्सला ।
समये समयेऽभ्येत्य तमिमं पालयिष्यति ॥१६॥
हर्ता धरित्रीभारस्य संहर्ता प्रतिभूभृताम् ।
मद्भक्त एष सर्वेषामप्यधृष्यो भविष्यति ॥१७॥
तस्मादमुं महाबाहुं महाशयशिवाह्वयम् ।
पुण्यदेशाधिपत्येन महनीयेन योजय ॥१८॥

—(शिवभारत अ. १०. श्लोक १३ ते १८)

(हे सूर्यवंशी महाबाहो, महामति शहाजी राजा, माझें हें भाषण ऐक. यांत तुझें कल्याण आहे. जो हा तुझा धाकटा मुलगा तुज-समीप शोभतो आहे तो सुलक्षणी मुलगा भगवान् विष्णु आहे

असें जाण. हा तुझा पुत्र विष्णु हळूहळूं वाढत जाऊन सर्व पृथ्वी पादाक्रान्त करून यवनांचा संहार करील. ही भक्तवत्सल भगवती पार्वती देवी वेळोवेळीं जवळ येऊन त्याचें रक्षण करील. पृथ्वीचा भार हरण करणारा व शत्रुपक्षीय राजांचा संहार करणारा असा हा माझा भक्त सर्वांना अजिक्य होईल. म्हणून हे महत्त्वाकांक्षी राजा, ह्या शिव नांवाच्या महाबाहूची पुणें प्रांताच्या मोठ्या अधिकारावर योजना कर. )

भगवान् श्रीशंकराच्या या आदेशानुरूप शिवछत्रपतींची शहाजीनें पुण्यास जी रवानगी केली ती केवढ्या सिद्धतेनिशीं केली याचें वर्णन करतांना शिवभारतकार म्हणतात :—

ततः कतिपयैरेव गजवाजिपदातिभिः ।
मौलैराप्तैरमात्यैश्च ख्यातैरध्यापकैरपि ॥२५॥
बिरुदैश्च ध्वजैरुच्चैः कोषेणापि च भूयसा ।
तथा परिजनैरन्यैरनन्यसमकर्मभिः ॥२६॥
समवेतममुं शाहभूपतिश्शोभने दिने ।
प्राहिणोत्पुण्यदेशाय पुण्यकारिणमात्मजम् ॥२७॥
ततः कतिपयैरेष दिनैर्दिनकृदन्वयः ।
अयाद्देशं महाराष्ट्रं तस्मात्कर्णाटमंडलम् ॥२८॥
सशक्तित्रिनयोपेतः समेतस्सैन्यसंचयैः ।
शिवस्स्वया श्रिया सार्धं पुण्याहं पुरमासदत् ॥२९॥
चक्रप्रियकरः सद्यः समुल्लासितमंडलम् ।
नावेदयदमुं लोकबंधुं लोको व्यलोकत ॥३०॥

—(शिवभारत अध्याय १० श्लो. २५ ते ३०)

( नंतर कांहीं हत्ती, घोडे व पायदळ, पिढीजाद व विश्वासू अमात्य, त्याचप्रमाणें विख्यात अध्यापक, बिरुदें, उंच ध्वज, विपुल द्रव्य त्याचप्रमाणें अद्वितीय कर्मे करणारे दुसरे परिजन या समवेत त्या पुण्यशील पुत्रास शहाजी राजानें शुभदिनीं पुणें प्रांतीं पाठविलें. मग कांहीं दिवसांनीं सूर्यवंशोत्पन्न (शिवाजी राजा) कर्नाटक प्रांताहून महाराष्ट्र देशास निघाला. प्रभाव, उत्साह, व मंत्र या तीन

शक्ति, सेनासमूह आणि स्वतःची राजलक्ष्मी यांनीं युक्त असा तो शिवाजी पुणें शहरास पोचला. (चक्रवाक पक्ष्यांचे) राष्ट्राचें हित करणारा आणि तत्काळ (पृथ्वीस प्रकाशित करणारा ) राष्ट्रास उल्हासित करणारा अशा ह्या (सूर्यास) लोकमित्रास लोकांनीं पाहिलें; परंतु जाणलें नाहीं.)

शिवछत्रपतींच्या बरोबर पाठविलेल्या अत्यंत बुद्धिमान् मुत्सद्द्यांची पदाधिकारावर योजना करूनच त्यांना पाठविण्यांत आलें. या दृष्टीनें इ. स. १६५७ च्या मार्च महिन्यांतील शिवचरित्र पत्रसारसंग्रहांत छापलेल्या पत्रांत शिवाजीच्या पदाधिकाऱ्यांची दिलेलीं नांवें पाहण्यासारखीं आहेत. तीं अशीं :- "शिवाजी राजे यांचे दरबारांत शामराज नीळकंठ पेशवे, सोनाजी विश्वनाथ डबीर, महादाजी सामराज सुरनीस, माणकोजी दहातोंडे सर-नौबत, नूरबेग सरनौबत, पाउलोक व शामराज पद्मनाभी सबनीस पाउलोक हे अधिकारी होते. हे पदाधिकारी येसाजी कंक अथवा तानाजी मालुसरे यांचेप्रमाणें शिवाजीनें नवे निर्माण केलेले नसून ते शहाजीच्याच दरबारचे मुत्सद्दी होते व त्यानें या विशिष्ट जागांवर त्यांची नेमणूक करूनच बंगलोरहून त्यांना शिवाजीबरोबर पाठविलें हें या उल्लेखावरून सिद्ध होतें. या मुत्सद्द्यांची योग्यता किती श्रेष्ठ होती, प्रसंगीं शिवाजीसारख्या प्रतिभासंपन्न व प्रदेशामागून प्रदेश जिंकीत चाललेल्या यशस्वी नेत्याचीहि ते कशी कानउघाडणी करून त्यांना मार्गदर्शन करीत व शिवछत्रपतींसारखा तडफदार तरुणहि त्यांचें म्हणणें कसें मुकाट्यानें मान्य करी हें त्यांतील सोनोपंत डबीरांचें जरी उदाहरण घेतलें तरी ध्यानांत येईल. शहाजीला झालेली अटक व त्यांतून सुटका होतांना शिवाजीला द्यावा लागलेला सिंहगड या प्रकरणांत शिवछत्रपतींना शहाजीचा अतिशय राग आला होता. त्या वेळीं शिवछत्रपति सोनोपंत डबीरां-जवळ आपलें मनोगत व्यक्त करीत असतांना सोनोपंतांनीं त्यांना दिलेला सल्ला व केलेलें मोलाचें मार्गदर्शन परमानंद कवींद्रानें वर्णन केलें आहे. तें या दृष्टीनें पाहण्यासारखें आहे. शिवछत्रपति आपलें पुढचें धोरण सोनोपंतांना सांगतांना म्हणतात :—

जानतामतिमूर्धन्यं यं धन्यं जानते जनाः ।
स मां नूनं न जानीते महाराजो महामनाः ।।३।।
सोऽज्ञास्यद्यर्हि मां तर्हि नादास्यत्सिम्हपर्वतम् ।
कोऽन्यथा तरसा जेष्यत्तमिमं मत्करस्थितम् ।।५।।
अप्रमत्तोऽपि यो मत्तो द्विषते सिम्हपर्वतम् ।
आदापयेद्येदिलाय किं वक्ष्ये तं महाव्रतम् ।।६।।
अरातिनिगृहीतेन शाहेन गुरुणा मम ।
यः प्राप्तश्चिररात्राय कारागारपरिश्रमः ।।१२।।
तस्य निर्यातनं कर्तुं संप्रवृत्तोऽस्मि सर्वथा ।
यवनान्तात्प्रवृत्ताद्यप्रभृत्यत्रास्तु मत्प्रथा ।।१३।।
यः परस्माद्बिभेत्युच्चैः परस्तस्माद्बिभेति च ।
न बिभेति परस्माद्यः परस्तमाद्विभेति च ।।१४।।

—(शिवभारत अध्याय १६ श्लोक. ३ ते १४)

शिवाजी म्हणतो, ज्या धन्य पुरुषाला लोक शहाण्या पुरुषांमध्यें अत्यंत श्रेष्ठ समजतात तो थोर मनाचा महाराजा शहाजी मला ओळखत नाहीं. जर तो मला ओळखत असतां तर त्यानें सिंहगड दिलाच नसता. नाहीं तर माझ्या हातचा हा गड बलानें कोण जिंकूं शकला असता बरें! शाहणासुरता असून सुद्धां ज्या वेड्यानें शत्रु आदिलशहास सिंहगड माझ्याकडून देवविला, त्या करारी पुरुषास मी काय म्हणूं? शत्रूंनीं पकडलेल्या माझ्या पिता शहाजीचे कारा-गृहामध्यें फार दिवस जे हाल झाले त्यांचा सूड घेण्यास मी अगदीं तयार झालों आहे; आणि आजपासून यवनांच्या नाशामुळेंच या लोकीं माझी कीर्ति होवो. जो शत्रूस भितो त्यासहि शत्रु भीत असतो. मग जो शत्रूस (मुळींच) भीत नाहीं त्याला शत्रु भितो हें सांगावयास नकोच.

यावर सोनोपंतांनी आत्मप्रशंसा व वडिलांची निंदा करणाऱ्या शिवछत्रपतींना प्रथम ठपका देऊन राजनीतिशास्त्राच्या दृष्टीनें शहाजीचें धोरण कोठें चुकलें त्यावर नेमकें बोट ठेवलें. ते म्हणाले,

दुरंतं बलवद्वैरं दुरंतः पापसंचयः ।
दुरंताभ्यर्हिता गर्हा दुरंता गुरुगर्हणा ॥१७॥
विधाय बलवद्वैरं मंत्रिणस्तस्य सुव्रताः ॥१९॥
तनुते यद्यलं वैरमबलीयान्बलीयसा ।
तर्हि तस्य पराभावे सर्वथा प्रभुरेव सः ॥२०॥
—(शिवभारत अध्याय १७ श्लो. १७ ते २०)

(बलवंताशीं वैर, पापाचा संचय, पूज्यांची व वडिलांची निंदा याचा परिणाम वाईटच होतो. बलवानाशीं वैर करून तुझा पिता भलता आग्रह धरून सावध राहिला नाहीं. यामुळें तो पकडला गेला हें योग्यच झालें. तो शहाजी महाराजा पराक्रमी आहे त्याचे मंत्रीहि कर्तृत्ववान् आहेत; तथापि त्यानें जें बलिष्ठाशीं वैर केलें तें राजनीतिदृष्ट्या चुकीचें झालें. जर दुर्बळ माणसानें प्रबळ माणसाशीं अतिशय वैर केलें तर त्याचा पराभव करण्यास तो सर्वथा समर्थ असतो.)

गिरयो नैव गुरवो गुरुरेव गुरुर्मतः ।
भवतात्र प्रभवता दत्तः सिम्हाचलस्ततः ॥४२॥
प्रदत्ते द्विषतेऽमुष्मिन् विमुक्तश्चेत् स पार्थिवः ।
तर्हि दत्तोऽपि भवता न दत्तः सिम्हपर्वतः ॥४३॥
यः सिम्हपर्वतं मेने समं शाहसुमेरुणा ॥
विंगरूरं च नगरं किं कृतं तेन वैरिणा ॥४४॥
—(शिवभारत अध्याय १६ श्लोक ४२, ४३, ४४)

(गडांची कांहीं मोठीशी किंमत नाहीं. पित्याचीच खरोखरी थोरवी आहे; म्हणून तुम्ही पराक्रमी असूनहि सिंहगड दिला तो शत्रूस देऊन जर राजाची (शहाजी) सुटका झाली आहे तर तो सिंहगड आपण देऊनहि न दिल्यासारखाच. ज्यानें सिंहगड आणि बेंगळूर शहर ही दोन्ही शहाजीरूपी मेरुपर्वताच्या तोडीची मानली त्या शत्रूनें विशेष तें काय केलें?

पश्य येदिलदिल्लीन्द्रौ विषयानंतरौ तव।
यवनौ बलिनौ तुभ्यं द्रुह्यतोऽर्हनिशं नृप ॥५७॥
अमू उभयतो यस्य द्वेषणौ रोषणौ तव ।
तस्य नूनमिह स्थाने स्थिति: स्थाने च संप्रति ॥५८॥
अतोऽतिदुर्गमं स्थानमास्थाय जगतीपते ।
यतस्व जगतीं जेतुं किमजय्यं शिवस्य ते ॥५९॥
कंठे कालेन कैलास: स मेरु: शंबपाणिना ।
अभ्यंतरमपां पत्यु: शिश्रिये दनुजारिणा ॥६०॥
न दुर्गं दुर्गमित्येव दुर्गमं मन्यते जन: ।
तस्य दुर्गमता सैव यत्प्रभुस्तस्य दुर्गम: ॥६१॥
प्रभुणा दुर्गमं दुर्गं प्रभुर्दुर्गेण दुर्गम: ।
अदुर्गमत्वादुभयोर्विद्विषन्नेव दुर्गम: ॥६२॥
सन्ति ते यानि दुर्गाणि तानि सर्वाणि सर्वथा ।
यथा सुदुर्गमाणि स्युस्तथा सद्यो विधीयताम् ॥६३॥
सुवर्णशर्मणो वाचमिमां श्रुत्वा नृपोत्तम: ।
माननीयोऽतिमहतां माननीयाममन्यत ॥६४॥

— (शिवभारत अ. १९ श्लोक ५७ ते ६४)

(महाराज, पहा. तुमच्या देशास लागूनच असलेले आदिलशहा व दिल्लीचा बादशहा हे बलाढ्य मुसलमान तुमचा रात्रंदिवस द्रोह करीत आहेत. हे दोघे शत्रु दोन्हीकडून ज्या तुमच्यावर क्रुद्ध झाले आहेत त्या तुमचें येथें राहणें हें सांप्रत खरोखर योग्य नाहीं. म्हणून महाराज, अत्यंत दुर्गम अशा स्थानीं राहून जग जिंकण्याचा यत्न करा. तुम्हां शिवाजीमहाराजांना अजिंक्य काय आहे? शंकरानें कैलासाचा, इंद्रानें मेरूचा आणि विष्णूनें समुद्राचा आश्रय केला आहे. दुर्गाला केवळ दुर्ग म्हणूनंच लोक दुर्गम मानीत नाहींत तर त्याचा स्वामी दुर्गम असणें हीच त्याची दुर्गमता होय. प्रभूमुळें दुर्ग दुर्गम होतो व दुर्गामुळें प्रभु दुर्गम होतो. दोघांच्याहि अभावीं शत्रूच दुर्गम होतो. तुमचे जे दुर्ग आहेत ते सर्व ज्यायोगें सर्वस्वी अत्यंत दुर्गम होतील असें ताबडतोब करा. सोनोपंतांचें हें

भाषण ऐकून अति मोठ्यांना सुद्धां माननीय अशा त्या नृपश्रेष्ठास तें पसंत पडलें.)

सोनोपंत डबीरांची राजकीय योग्यता या संवादावरून कळून आल्याविना राहात नाहीं. पुण्याच्या शहाजीच्या जहागिरीचे कारभारी व एका दृष्टीनें शिवछत्रपतींचे गुरु असलेले दादोजी कोंडदेव हेहि चांगले स्मृतिशास्त्रपारंगत असून त्यांनीं दिलेल्या कांहीं निवाड्यांत स्मृतिवचनांचे आधार दिलेले आढळतात. वस्तुतः त्यांनाच शिवाजीचे पेशवे म्हणून शहाजीनें नियुक्त केलें असतें. पण विजापूरच्या दरबाराकडून त्यांची पूर्वींच नेमणूक झालेली असल्यामुळे आपण असें कांहीं करणें अपशकुनाचें ठरेल असें वाटूनच शामराज नीळकंठ याची त्या पदावर नेमणूक झालेली आहे. हे मुत्सद्दी शहाजीनेंच नेमून पाठविल्याचा सभासदाच्या शिवछत्रपतींच्या चरित्रांत स्पष्टपणें उल्लेख आहे. तो असा :—

"शहाजी राजे यांसि दौलतेमध्यें पुणें परगणा होता. तेथें दादोजी कोंडदेव शहाणा चौकस ठेविला होता. तो बेंगळुरास महाराजांचे भेटीस गेला. त्याबरोबर राजेश्री शिवाजी राजे व जिजाबाई आऊ ऐशी गेली. ते समयीं राजियास वर्षें बारा होतीं. बराबर शामराव नीळकंठ म्हणून पेशवे करून दिले व बाळकृष्णपंत नारोपंत दीक्षितांचे चुलतभाऊ मुजुमदार करून दिले व सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ सबनीस, ऐसे देऊन दादाजीपंतास व राजे यांसि पुण्यास रवाना केलें. ते पुण्यास आले."

— (शिवछत्रपतींचें चरित्र सभासदकृत पान ७)

असा कांहीं जर शहाजीचा बेत नसता तर हे मुत्सद्दी खात्रीनें शिवराजाबरोबर पाठविण्याची गरजच नव्हती. पुण्यास आल्यापासून अवघ्या चार वर्षांनंतर छत्रपति ही पदवी त्यांना लावण्यास प्रारंभ झाला. त्याचें गूढ काय? शिवछत्रपतींच्या वयाच्या तेविसाव्या वर्षीं लिहिलेलें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यावर त्यांची

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते॥

ही मुद्रा आहे. ही अर्थपूर्ण व शिवछत्रपतींचें सारें जीवन उलगडणारी मुद्रा त्यांना कोणी तयार करून दिली असेल ? याच पत्रावर "श्रीशिव नरपति हर्षनिदान । सामराजमतिमत्प्रधान" अशी पेशवे शामराज नीळकंठ यांचीहि मुद्रा आहे. पुण्यांत पाय स्थिर होतांच निश्चित योजनेनुसार शिवछत्रपतींच्या नेतृत्वाखालीं हें जें स्वराज्यस्थापनेचें कार्य प्रारंभ झालें त्याची योजना या मुत्सद्द्यांनींच आखली असली पाहिजे व ती बालशिवाजीला बंगलोरहून आणतांनाच सिद्ध झालेली आहे. अर्थात् ही बनविणाऱ्यांत राजे शहाजी प्रमुख होते हें स्पष्ट आहे. त्यानंतरहि शहाजी राजांनीं विजापूरचे सुलतान व शिवछत्रपति यांच्यांत स्वतंत्र राजा या नात्यानें शिवाजीची भूमिका सांभाळून तह करून दिलेला आढळतो. शिवदिग्विजयांत त्याचा उल्लेख आहे. शहाजी राजे शिखर शिंगणापूरच्या शंभु महादेवाच्या दर्शनास येण्याच्या निमित्तानें आपल्या पुत्राच्या स्वराज्यांतहि येऊन गेले. पितापुत्रांच्या या रोमहर्षक भेटीच्या प्रसंगीं "आमच्या वंशांत जन्म घेऊन तुम्ही बेचाळीस पिढ्या उद्धरल्या, धर्मस्थापना करून वर्णाश्रम पुनरुज्जीवित केले, यवनाक्रान्त पृथ्वीचे क्लेश निवारण करून जगदंबेचा वर आमच्या प्रत्ययास आणून दिला असे समाधानाचे उद्गार काढून आपल्या अवतारी पुत्रास पित्यानें अंतिम आशीर्वाद दिले. शहाजीचा मन:पिण्ड व स्वराज्यनिर्मितींतील त्याचें हें स्थान शिवचरित्राचा उलगडा करतांना ध्यानांत घेतल्यावांचून शिवचरित्राची नीट उपपत्ति लागत नाहीं. शिवचरित्राच्या लेखकांनीं या गोष्टीकडे केवळ वरच्या देखाव्यावरून दुर्लक्ष केलें ही त्यांची मोठीच चूक होय. मग ते जदुनाथ सरकार असोत, किंवा अकारण शहाजीवर दोषारोप करणारे डिकसळकर असोत वा भावे असोत.

शिवछत्रपतींची अष्टप्रधान संस्था, त्यांचे प्राचीन राजनीतिशास्त्रांत वर्णिलेले "स्वामी, अमात्य सुहृत्, कोश, राष्ट्र, दुर्ग व सैन्य असें सप्तांगसिद्ध राज्य व त्यांची राजनीति ही विशुद्ध

भारतीय राजनीतीच्या मुशींतून तयार झालेली होती. त्या वेळीं उत्तर भारतांत व महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या यावनी राजनीतीशीं तिचा कांहींहि संबंध नव्हता. विख्यात इतिहाससंशोधक कै. भास्कर वामन भट यांनीं आपल्या "शिवाजीची राजनीति" या विवेचक प्रबंधांत प्राचीन भारतीय राजनीतीच्या मुशींतून शिवछत्रपतींचा मनःपिण्ड कसा तयार झाला होता याचें अत्यंत उत्कृष्ट विवेचन केलेलें आहे. अथवा तेंच कशाला? उपरिनिर्दिष्ट सोनोपंत डबीर तरुण शिवाजीला राजनीतीचा उपदेश करतांना जें म्हणतात तें जर शुक्रनीति, महाभारतांतील राजधर्मप्रकरण, कौटिलीय अर्थशास्त्र या प्राचीन भारतीय राजनीतिशास्त्रावरील ग्रंथांशीं ताडून पाहिलें तर, व त्याच्या प्रकाशांत शिवछत्रपतींचें सगळें जीवन पाहिलें तर शिवछत्रपतींनीं प्राचीन भारतीय राज्यशास्त्राचे व राजनीतिशास्त्राचेंच पुनरुज्जीवन, यावनी संस्काराचा लेशमात्रहि संपर्क होऊं न देतां, केलेलें आहे असें आढळून येईल. शिवछत्रपतींच्या समक्ष त्यांचें चरित्र लिहिणारा कवीन्द्र परमानंद सोनोपंतांचे तोंडीं राजनीतिशास्त्र व राज्यशास्त्र यांच्या स्वरूपदिग्दर्शनपर पुढील महत्त्वाचे उद्गार काढतो :—

राजा तावत्ततो मन्त्री सुहृदो विपुलं धनम् ।
राष्ट्रं दुर्गाणि सैन्यानि राज्यस्यांगानि सप्त च ॥४६॥
एतैरविकलैर्युक्तं राज्यं सद्भिः प्रशस्यते ।
एकेनापि विहीनां तदितरैरुपहस्यते ॥४७॥
मौलिर्नृपो मुखं मंत्री धनसैन्ये भुजद्वयम् ।
राष्ट्रमन्यद्वपुस्सर्वं सुहृदस्संधयो दृढाः ॥४८॥
दुर्गाणि तु दृढान्युच्चैस्तदस्थीनि तदंतरा ।
एवमंगानि राज्यस्य सप्तोक्तानि मनीषिभिः ॥४९॥
सप्तांगस्यास्य राज्यस्य धर्म आत्माभिधीयते ।
मंत्रः प्राणो बलं नीतिरनीतिरसमर्थता ॥५०॥
दंडो यथोचितः शौर्यमधर्मो रिपुरुद्धतः ।
मदः परस्परं भेदो दीर्घमायुरभेद्यता ॥५१॥

जनरंजनमुत्कर्षो दर्शनं दीर्घदर्शिता ।
प्रतापः प्रोज्ज्वलं रूपं विमला बुद्धिरायुधम् ॥५२॥
तथैव बलवद्वैरमंतरायः प्रकीर्तितः ।
प्रमादस्तु भवेन्निद्रा प्रबोधः सावधानता ॥५३॥

—(शिवभारत अ. १६ श्लोक ४६ ते ५३)

प्रथम राजा, नंतर मंत्री, मित्र, विपुल धन, राष्ट्र (प्रजा) गड आणि सैन्य हीं राज्याचीं सात अंगें होत. ज्या राज्याचीं हीं अंगें अव्यंग आहेत त्या राज्याची चांगले लोक प्रशंसा करितात. तेंच जरी एका अंगानें कमी असलें, तरी इतरांकडून त्याचा उपहास होतो. राजा हें मस्तक, मंत्री हें मुख, धन आणि सैन्य हे भुज; बाकीचें सारें राष्ट्र (प्रजा) हें शरीर, मित्र हे सांधे आणि दुर्ग हीं त्यांमधील अत्यंत दृढ हाडें होत. याप्रमाणें शहाण्या लोकांनीं राज्याचीं सात अंगें सांगितलीं आहेत. त्या सप्तांगात्मक राज्याचा धर्म हा आत्मा होय. मसलत हा प्राण, नीति हें बल आणि अनीति हें दौर्बल्य होय. यथोचित दंड हें शौर्य, शत्रु बेफाम होऊं देणें हा अधर्म, परस्परांतील फूट हा मद आणि दृढैक्य हें दीर्घायुष्य, लोकरंजन हा उत्कर्ष, दूरदर्शित्व ही दृष्टि, प्रताप हें उज्ज्वल रूप, आयुध ही विमल बुद्धि, तसेंच बलवानाशीं वैर हें विघ्न होय. असावधपणा ही निद्रा आणि सावधानता हा जागेपणा होय.

शिवछत्रपतींनीं ही प्राचीन भारतीय राज्यसंस्थेच्या विशुद्ध पुनरुत्थानाची जी स्फूर्ति घेतली ती बंगलोरच्या परिसरांतूनच होय. ती पल्लवित करणारे त्यांचें सल्लागार मंडळ तेथलेंच होय हें यावरून सिद्ध होतें. बंगलोरला शहाजी व त्यांच्या भोंवतालच्या वातावरणांत या आकांक्षा विजयनगरनें पल्लवित केल्या म्हणून तीनशें वर्षे इस्लामी आक्रमण थोपवून धरून परिपूर्ण वैभवशाली हिंदू अस्मितेचें पुनरुत्थान घडविणाऱ्या विजयनगरच्या कार्याचा शिवछत्रपतींच्या चरित्राच्या घडणीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. या दृष्टीनें विजयानगरच्या साम्राज्याचे खरे वारस छत्रपति शिवाजी महाराज हेच होत हें अय्यंगार यांचें विधान शंभर टक्के यथार्थ आहे.

✦ ✦ ✦

प्रकरण अकरावें

# महाराष्ट्रांतील संतांचें कार्य

शिवछत्रपतींच्या व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी कोणत्या आधारानें व कशी झाली तें आपण आतांपर्यंत पाहिलें. शिवछत्रपतींच्या लोकोत्तर कार्याचा विचार करतांना आणखी एक विशेष गोष्ट ध्यानांत येते. ती ही कीं, त्यांच्या प्रयत्नाला धर्माचें अधिष्ठान होतें. त्या अधिष्ठानानें एक महान् क्रांति घडवून आणण्यासाठीं ते अग्रेसर होतांच सर्वसामान्य जनतेच्या पाठिंब्याची पार्श्वभूमि त्यांना मिळाली. म्हणून महाराष्ट्रांत ती क्रांति विलक्षण वेगानें यशस्वी होऊं शकली. त्या वेळची परिस्थिति अशी होती कीं, महाराष्ट्र सोडून अन्य ठिकाणीं ही क्रांति यशस्वी झाली नसती. कारण या महान् नेत्याच्या ध्येयवादाच्या भूमिकेवर येण्याइतपत त्या वेळीं तरी अन्य प्रांतांतील सर्वसामान्य जनतेची सिद्धता झाली असल्याचें दिसून येत नाहीं. शिवचरित्राचा विचार करतांना महाराष्ट्राची या भूमिकेवर येण्यासाठीं, जी वर्षानुवर्षें मशागत चाललेली होती, तिची पार्श्वभूमि पुष्कळ लोक ध्यानांत घेत नाहींत, व त्यामुळें तो इतिहास नीटपणें उलगडला जात नाहीं. शिवाजी महाराजांचे प्रयत्न यशस्वी कां झाले व त्यानंतर मराठे साम्राज्य निर्माण करण्यांत यशस्वी कसे झाले याची मीमांसा करतांना ग्रँड डफ प्रभृति जुन्या व कांहीं नव्याही लेखकांची हीच चूक झालेली आहे. त्यामुळें शिवाजीचें वर्णन "साम्राज्याच्या पडत्या काळांत अक्कलहुषारीनें स्वत:चें राज्य निर्माण करणारा यशस्वी दरोडेखोर" यापलीकडे ते करूं शकले नाहींत. मराठी साम्राज्याच्या यशस्वी निर्मितीची कारण-मीमांसा करतांना सुद्धां या लोकांनीं तिचें कारण असें दिलें आहे कीं, औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्याच्या पडत्या काळाचा फायदा घेऊन हैदर, टिपू, निझाम उल्मुल्क प्रभृति

साम्राज्याचे लचके तोडणाऱ्या तत्कालीन यशस्वी राज्यापहारकां-प्रमाणेंच मराठेहि होते, व ते अधिक व्यापक प्रमाणावर यशस्वी झाले. पण ही मांडणी करणारे लोक ही गोष्ट विसरतात कीं असे राज्यापहारक कांहीं क्षणापुरते अथवा त्यांच्या काळापुरते यशस्वी झाले, तरी ते खऱ्या अर्थानें यशस्वी होऊं शकत नाहींत. कारण कीं, त्यांची परंपरा वर्धिष्णुपणानें टिकून राहात नाहीं. हैदरचा इतिहास हेंच सांगतो, व निझामादि लोकांचाहि इतिहास याहून वेगळा नाहीं. शिवछत्रपतींच्या टीचभर स्वराज्यप्रयत्नांचा पुढें भारतव्यापी वटवृक्ष झालेला आहे. पिढ्यान् पिढ्या विलक्षण स्वरूपाचें राष्ट्रीय सामर्थ्य या प्रयत्नांत दृष्टोत्पत्तीस येतें. ध्येय-वादानें लोकांचीं अंतःकरणें अत्यंत प्रज्वलित झालेलीं दिसतात. याची उपपत्ति काय ? उदाहरणच द्यावयाचें झालें तर तें छत्रपति संभाजी महाराजांच्या क्रूर वधानंतर औरंगजेबासारख्या प्रबल शत्रूशीं महाराष्ट्रीय जनतेनें जें भीषण लोकयुद्ध चालविलें त्याचें देतां येईल. हिंदूंच्या व मुसलमानांच्याहि जुन्या लढायांचा सर्वसामान्य इतिहास असें सांगतो कीं, नेता युद्धांत मारला गेला, नुसता पायउतार झाला, अथवा कोणत्याहि कारणास्तव दिसेनासा झाला कीं, केवढीहि सिद्धता व सामुग्री असली तरी, हातातोंडाशीं आलेलें यश तसेंच टाकून देऊन सैनिक व सरदार पळून जात. पराजय पदरांत पडे, व अल्पसंख्य शत्रुपक्ष सहस्रावधि लोकांचा संहार करून, यशस्वीपणें लूट घेऊन जाई. कारण लढणाऱ्या लोकांना व सरदार-सामंतांना तीं युद्धें आपलीं अशीं कधींच वाटत नसत. युद्धें राजाचीं, तोच नसल्यावर कोणासाठीं लढा ? असे आक्रोश सुरू होत असत. तालीकोटच्या लढाईचें जें स्वरूप या ग्रंथांत यापूर्वीं विवेचिण्यांत आलें आहे त्यांतहि हेंच दिसून येतें. रामराजा नुसता पालखींत बसतांच, तो दिसेनासा झाल्यामुळें धीर सोडून सगळे सैनिक पळून गेले, व विजयी होत आलेल्या हिंदु सैन्याचा पार धुव्वा उडून साम्राज्य धुळीस मिळालें. पानिपतच्या युद्धाचा इतिहाससुद्धां वेगळा नाहीं. विश्वासराव पेशवे

गोळी लागून ठार झाल्यावर भाऊसाहेबांना प्रेत अंबारीशीं बांधून ठेवावें लागलें. कारण ते मुख्य धनीच गेल्यावर लढायचें कोणास्तव असें सैनिकांना वाटेल याची भाऊसाहेबांना खात्री होती. पानिपतच्या पराभवाचें कारण भाऊसाहेबांचें हत्तीवरून घोड्यावर स्वार होणें हेंहि आहे हें कांहीं कोणास सांगावयास नको. 'धनी मेला, लढतां कशास? हा आक्रोश करीत मल्हारराव होळकरांनीं या रणांतून, हिंदू सैन्य विजयी होत आलें असतां सुद्धां पळ काढला. पण शिवाजीच्या तिसऱ्या पिढींत याहून अगदीं वेगळा प्रकार दिसून येतो. एक लाख सैन्य घेऊन अलमगीर बादशहासारखा चाणाक्ष, हृदयहीन, हट्टी व तडफदार पुरुष महाराष्ट्रांत ठाण मांडून बसला असतां, व कातडें सोलून क्रूरपणें राजाचा वध झाला असतांहि महाराष्ट्रीय जनतेनें युद्ध सोडलें नाहीं. तात्पुरता नेता राजाराम परागंदा झाला होता. राजमाता राजपुत्रासह शत्रूच्या बंदिवासांत होती. राज्यसिंहासन भंगलें होतें. छत्रचामरें फाटून त्यांचे तुकडे झाले होते. राजधानी शत्रूच्या अधीन झाली होती. तरीहि आकाश मंडपाचें छत्र, जो समोर होईल तो नेता, व मिळेल तें शस्त्र हातीं घेऊन महाराष्ट्रीय जनता समोर झाली. जणूं घराघरांतून शिव-छत्रपति निवसत होते. त्यांनीं औरंगजेबाचें ससैन्य दफन महाराष्ट्र भूमींतच करून दाखविलें. इतकेंच नव्हे तर बादशहाच्या जिवंत-पणीं त्याच्या तंबूचे सोन्याचे कळस कापून त्याला प्रत्यक्ष जीवन्मृता-वस्थेचा अनुभव दिला. शिवाजीनें आरंभ केलेलें युद्ध लोकयुद्धांत कां पर्यवसित झालें? त्याचें राज्य जनतेनें आपलें राज्य कां मानलें? हा विलक्षण आवेश लोकांच्या अंगीं ध्येवादाशिवाय उत्पन्न झालेला नाहीं. सारें राष्ट्र अशा ध्येयवादानें भारलेलें होतें, हें लक्षांत घेतल्या-वांचून व या ध्येयवादाची नीट उपपत्ति सांगितल्यावांचून शिवा-जीचा व मराठ्यांचा इतिहास उलगडू शकणार नाहीं. या दृष्टीनें मराठी इतिहासाकडे प्रथम ज्यांनीं पाहिलें असे मर्मग्राही थोर पुरुष कै. न्यायमूर्ति माधवरावजी रानडे हे होत. माधवरावजी आपल्या Rise of the Maratha Power या ग्रंथांत म्हणतात :

Freebooters and adventurers never succeed in building up empires, which last for generations and permanently alter the political map of a great continent. Unlike the great Subhedars of provinces, who became independent after the death of Aurangzeb, the founder of the Maratha power and his successors for two generations bore the brunt of the attack of the moghul Empire at the zenith of its splendour. The military adventurers named above were not backed up by any national force behind them, and their power perished with the individuals who founded it. In the case of the Maratha confederacy how ever it was far otherwise. For ten generations a succession of great leaders sprang up to fill up the place of those who died in the struggle, and the confederacy not only outlived opposition but derived greater strength from the reverses it sustained from time to time, rising phœnix-like in greater splendour from the very ashes of its apparent ruin. This tenacity showed clearly that the underlying principles had stronger vitality than can be explained by the standard theory of adventure and free booting, or the illustration of a sudden conflagration.

—(The rise of the Maratha power pages 3,4)

शिवछत्रपतींनीं प्रारंभ केलेल्या व त्यानंतरच्या पिढ्यांनीं दक्षिणेस जिंजी, तंजावर व उत्तरेस अटकपर्यंत वाढविलेल्या हिंदूंच्या साम्राज्याची घटना ही प्राप्त परिस्थितीचा लाभ घेणाऱ्या अपहारक वृत्तींतून उत्पन्न झालेली नसून जीवनार्थ पुनरुत्थान घडवूं इच्छिणाऱ्या एका महान् राष्ट्राच्या रसरसणाऱ्या जीवनशक्तीचा तो प्रकट आविष्कार होता. या आविष्कारात्मक अंतःप्रवाहाची शिवछत्रपतीचें चरित्र उलगडण्याच्या दृष्टीनें कशी नितान्त आवश्यकता आहे, हें न्यायमूर्तींच्या या विवेचनावरून स्पष्ट होईल, वस्तुतः महाराष्ट्रांत ही जी पुनरुत्थानाची लाट उसळली, ती केवळ

राजकीय पुनरुत्थानाची नसून संपूर्ण राष्ट्रीय अस्मितेच्याच पुन-रुत्थानाची होती, व राजकीय संघर्ष आणि पुनरुत्थान हा तिचा केवळ एक भाग होता, हें न्यायमूर्तींनीं अतिशय उत्कृष्ट रीतीनें मांडून दाखविलेलें आहे. ते म्हणतात :—

One more feature of the history has entirely escaped the observation of European writers, though it constitutes perhaps the strongest ground why study possesses peculiar more interest to the historical student. It was not a mere political revolution that stirred Maharastra towards the close of the sixteenth and the commencement of the seventeenth century. The political revolution was preceded, and in fact to some extent caused by a religious and social upheaval which moved the entire population. The popular idea that it was religious persecution which agitated Maharastra and strengthened the hand of Shivaji and his comrades, is not wholly wrong, but it represents only a partial truth. The Mahomedan Rulers of the Deccan in the fifteenth and sixteenth centuries were not bigotted fanatics. Aurangzeb was no doubt a fanatic, but his fanaticism could not explain the rise of a power which struggled with him on equal terms and secured victory in the end. The fact was that, like the Protestant Reformation in Europe in the sixteenth century there was a religious, social and literary revival and reformation in India, but notably in the Deccan in the fifteenth and sixteenth centuries. This religious revival was not Brahmanical in its spirit of protest against forms, ceremonies and class distinctions based on birth,and ethical in its prefereence of a pure heart and of the law of love, to all other acquired merits and good works. This rligious revival was the work also of the people, of the masses, and not of the classes. At its head were saints and prophets, poets and philosophers, who sprang chiefly from

the lower orders of society—tailors, carpenters, potters gardeners shopkeepers, barbers and even Mahars more than Brahmans. The names of Tukaram, of Ramdas, of Wamen Pandit and Eknath were names to conjure with, and after a lapse of two hundred years, they still retain their ascendency over the minds of the people of Maharastra. The political leaders acted in concert with these religious leaders of the people. Shivaji's chief adviser was Ramdas, who gave the colour to the national flag and introduced a new form of salutation, which displayed at once the religious character of the movement and the independence of the spirit which promted it. The first Bajirao Peshwa derived his inspiration from the Swami of Dhawadshi. Vithal Shivdeo, the founder of the Vinchurkar family, was similarly inspired by his preceptor. Shivaji's character and his motive springs of action have been more correctly delineated by colonel Medows Taylor in his novel than by the historian of the Marathas. Shivaji felt that he had a direct inspiration from the goddess Bhawani, and in the great crises of his life, he always guided himself by what this inspiration suggested to him in moments of intense possession. These influences deserve special study because they have left their mark up to the present day on the aspirations and faith of the people. What Protestantism did for Western Europe in the matter of civil liberty, was accomplished on a smaller scale in Western India. The impulse was felt in art, in religion in the growth of vernacular litereture, in communal freedom of life, in increase of self-reliance and toleration and the interest of the study is on this account greatly heightened both to the native student and the foreign inquirer (pages 9, 10, 11).

महाराष्ट्रांतील चळवळीकडे पाहण्याचा हा दृष्टिकोन कै. रानडे सोडून अन्य मोठमोठ्या इतिहासकारांच्याहि ध्यानांत आल्याचें दिसत नाहीं. शिवछत्रपतींच्या आंदोलनाच्या मागें ध्येयदृष्टि असल्याचें मान्य करूनही अशी राष्ट्रोद्धारक ध्येयदृष्टि केवळ संत मंडळींपैकीं समर्थ रामदासांच्या ठिकाणींच असून इतर सर्व संत निराशावादी दृष्टिकोणाचे व व्यक्तिगत मुक्तीच्या मागें लागलेले राष्ट्रबुडवे 'संताळे' होते असें इतिहाससंशोधक कै. वि. का. राजवाडे यांनींही प्रतिपादन केलें आहे. राधामाधवविलासचंपूच्या प्रस्तावनेंत श्री. राजवाडे म्हणतात :—

"शहाजी हा प्राधान्येकरून व्यवहारचतुर मुत्सद्दी होता. केवळ कल्पनातरंगावर वाहवत जाणारा शेख महंमद नव्हता. त्याच्या आधीं व त्याच्या काळीं राष्ट्र सुधारण्याचे प्रयत्न करणारे शेख महंमद थोडे थोडके झाले नव्हते. कली मातला, सबब समाजाला दैन्य आलें व तें भोगल्याखेरीज गत्यंतर नाहीं, असें रडगाणें गाऊन स्वस्थ बसणारे ऐदी किती तरी होते. विठोबा सर्व कांहीं योग्य वेळीं नीट करील, त्याला जनतेची काळजी आहे असें समाधान करून घेणारे भक्तिमार्गी तर असंख्य होते. मुसलमानी पेहराव, मुसलमानी चालीरीति, मुसलमानी भाषा व मुसलमानी धर्म स्वीकारून समाजाच्या यातना बंद करूं पाहणारे किती तरी हिंदू प्रांतोप्रांतीं पीर होऊन बसले होते. यवनांवर रुसून त्यांच्याशीं व्यवहार बंद करून त्यांचें मुखावलोकन न करणारी दासोपंतादि मंडळीहि आपल्याकडून यवनांच्या पारिपत्याचे प्रयत्न करीतच होती. यवनसेवा करून जनतेचा परामर्ष घेऊं पाहणारे दामाजीपंतहि अनेक होऊन गेले. यवनांविरुद्ध बंड करून स्वराज्य मिळविणारेहि कांहीं वेडे निपजले. मंत्रतंत्रांनीं यवनांना स्तंभित करण्याचा कित्येकांचा खटाटोप होता. यज्ञयागांचा व देवदेवालयांचा जीर्णोद्धार करून धर्मसंरक्षण करण्यांत कित्येकांनीं सर्वस्व खर्चिलें. गोरक्षण करून प्रजेंत जोम उत्पन्न करूं पाहणारे गोरखनाथीहि देशांत वावरत होते. कथाकीर्तनें व रामायण-भारतें

देशभाषेंत बनवून देशांतील लोकांच्या अंगीं स्फुरण चढवूं पाहणारे कीर्तनकार व ग्रंथकार तर त्या कालीं शेंकड्यांनीं मोजावे लागत. असे नाना प्रकारचे भलेबुरे उपाय जो तो आपापल्या परी करीतच होता. परंतु असले हे सर्व उपाय तीनशें वर्षें करूनहि यवनांचें काडीमात्र कोणी नुकसान करूं शकलें नाहीं. तेव्हां जो तो समाधान असें करून घेई कीं, बी रुजत घातलें आहे, तें योग्य वेळीं अंकुरित होऊन त्याला फळ आल्याशिवाय राहणार नाहीं. ही भविष्यवादी विचारसरणी निरुत्तर करणारी असल्यामुळें, भविष्यकाळीं तिची सफलता अनुभवावयास यावयाची असल्यामुळें व भविष्यकाळाला अंत नसल्यामुळें तीनशें वर्षें निघून गेलीं तरीहि ह्या आशेची निराशा कधींच झाली नाहीं.”

राजवाडे यांचा समर्थांविषयींचा दुर्दान्त अभिमान एक प्रकारें संतांच्या विद्वेषांत पर्यवसित झालेला आहे. श्री. रानडे यांच्या उपर्युक्त मताला उत्तर देऊन त्यांनीं यासंबंधींचें स्वतःचें मत “ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ४ था ” याला लिहिलेल्या सविस्तर प्रस्तावनेंत मांडलेलीं आहेत. ते लिहितात :—

“बौद्ध धर्माचें प्राबल्य उत्कट होऊन सर्व भारतवर्ष त्या धर्माच्या आवरणानें गुरफटून जात असतां, श्रीमच्छंकराचार्यांचा उदय होऊन सनातन धर्माची स्थापना इसवी सनाच्या सहाव्या, सातव्या व आठव्या शतकांत हिंदुस्थानच्या व महाराष्ट्राच्या बऱ्याच भागांत झाली. ह्या तीन शतकांत भारतवर्षांतून बौद्ध धर्माचें निष्कासन यद्यपि बहुतेक झालें, तथापि बौद्ध धर्मासारखाच जो जैन धर्म तो गुजराथेच्या उत्तरेस व महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील कोल्हापूर वगैरे प्रांतांत दहाव्या व अकराव्या शतकापर्यंत बराच प्रबल होता. बाराव्या शतकाच्या सुमारास जैन धर्माच्या विरुद्ध लिंगायतांचा पंथ व मानभावांचा पंथ महाराष्ट्रांत सुरू झाला. जैनांच्या, लिंगायतांच्या व मानभावांच्या संसर्गानें सनातन धर्माच्या गोटांतील लोकांच्या मनावर कांहीं परिणाम झाले, व त्यांपैकीं कांहींनीं भक्तिमार्ग, उपासनामार्ग ह्या नांवाखालीं

मोडणारी सनातनधर्माची एक निराळीच शाखा स्थापली. ह्याच शाखेला संतमंडळींचा किंवा संताळ्यांचा भक्तिपंथ म्हणून म्हणतात. जैन, लिंगायत व मानभाव यांत कमजास्त प्रमाणानें जातिभेद व्यवहारांत मानीत नाहींत. संताळ्यांत विठोबाच्या मंदिरांत तेवढा जातिभेद मानीत नाहींत, व्यवहारांत मानतात. ह्या भक्तिपंथाची स्थापना महाराष्ट्रांत तेराव्या शतकांत झाली. संताळ्यांची ही स्थापना झाल्यावर कांहीं काळानें देवगिरी येथील मराठ्यांचें राज्य नष्ट झालें व यवनांची सत्ता महाराष्ट्रांत तीनशें वर्षें, म्हणजे शके १२४० त देवगिरी घेतल्यापासून शके १५४०त अहमदनगरची मनसबदारी शहाजीला मिळेपर्यंत, बहुतेक अव्याहत चालली. ह्या तीन शतकांत संताळ्यांचेंच प्राबल्य महाराष्ट्रांत फार होतें. संत म्हटला म्हणजे अत्यंत पंगूपणाचा केवळ मूर्तिमंत पुतळाच होय. संताला खाणें नको, पिणें नको, वस्त्र नको, प्रावरण नको, कांहीं नको. एक विठोबा मिळाला म्हणजे सर्व कांहीं मिळालें. ऐहिक सुखदुःखें, ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार, यांच्यांत मन घालणें संतांचें काम नव्हे. इहलोक हा संताचा नव्हेच. राजा कोणी असो, सारा कोणी घेवो, संताला त्याचें कांहीं नाहीं. असल्या या संतमंडळींच्या हातीं विचाराची दिशा जाऊन महाराष्ट्र तीन शतकें पंगू बनून राहिला. सनातन धर्माला त्रासून महाराष्ट्रांतील लोकांनीं जी धर्मक्रांति केली तिचें स्वरूप हें असें होतें. ह्या धर्मक्रांतीनें धर्मोन्नति, राष्ट्रोन्नति होण्याचें एकीकडेच राहून उलटी धर्मावनति, राष्ट्रावनति मात्र झाली. कालांतरानें यवनांच्या अमलाखालीं पायमल्ली झालेली पाहून मराठ्यांचे डोळे उघडले. ह्या पंगू संतांळ्यांचा त्यांना वीट आला. आणि सनातन धर्माकडे, गोब्राह्मण प्रतिपालनाकडे व चातुर्वर्ण्याकडे त्यांनीं पुन्हां धाव घेतली. ह्या उपरतीच्या वेळीं रामदास स्वामी, रंगनाथ स्वामी, मोरया देव वगैरे सनातन धर्माभिमानी विचारी साधु पुरुष झाले व महाराष्ट्रास महाराष्ट्रधर्माचा उपदेश करते झाले. ह्या सनातन धर्माभिमानी साधुपुरुषांच्या वेळीं संताळे आपला संतमार्ग आक्रमीतच होते. परंतु

इहलोकींचे अर्थ साधण्यास संताळयांचा उपयोग कांहीं नाहीं हें तुकाराम पूर्णपणें जाणून होता. शिवाजी तुकारामाकडे उपदेश घेण्याकरितां गेला असतां त्या प्रामाणिक साधूनें आपल्यासारख्या पंगू माणसाकडे न येतां समर्थांच्याकडे जाण्यास शिवाजीस उपदेश केला. संताळयांतील पंगुत्वाला उपरोधूनच समर्थ हें नांव अस्तित्वांत आलें. हें लक्षांत घेतलें असतां, तुकारामाच्या उपदेशाचें महत्त्व व त्यानें स्वतः स्वीकारलेल्या पंथाचें लघुत्व कळून येईल. संताळयांच्या उपदेशानें महाराष्ट्रांत नवीन जोम आला म्हणून न्यायमूर्ति रानडे म्हणतात, तो खरा प्रकार नसून समर्थांनीं काढलेल्या नवीन रामदासी पंथाच्या उपदेशानें तो चमत्कार घडून आलेला आहे. निवृत्तीकडे ज्यांचे डोळे लागले त्या संतांच्या हातून हें प्रवृत्तिपर कृत्य व्हावें कसें? "समर्थाचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळीं कोण आहे!" असली धमकी देणाऱ्या समर्थांच्याच महोपदेशाचा तो परिणाम होय.

"समर्थांनीं नवीन बनविलेल्या महाराष्ट्रधर्म या शब्दाचा नीट अर्थ न कळल्यामुळें, न्यायमूर्तींनीं रामदासांच्या महाराष्ट्रधर्माची व संतांच्या भक्तिमार्गाची तद्रूपता कल्पिली व एकाच्या गुणाचा आरोप दुसऱ्यांवर केला. या अवस्त्वारोपामुळें न्यायमूर्तींची कार्यपरंपरा चुकली व असमर्थ कारणांपासून समर्थ कार्याची उत्पत्ति झाली असें चमत्कारिक विधान त्यांच्या हातून पडलें गेलें. श्रीमदाचार्यप्रणीत सनातन धर्माच्या कठोर आचाराला कंटाळून त्याच्याविरुद्ध झालेली जी धर्मक्रांति ती संताळयांचा भक्तिमार्ग होय. ह्या पंगू भक्तिमार्गाच्या किंचित् विरुद्ध झालेली जी धर्मशुद्धि ती म्हणजे समर्थांच्या प्रवृत्तिपर महाराष्ट्रधर्माच्या साह्यानें पुनरुज्जीवित झालेला सनातनधर्म होय. (१) श्रीमदाचार्यप्रणीत सनातन धर्म, (२) संतप्रणीत भक्ति मार्ग व (३) श्रीसमर्थप्रणीत महाराष्ट्रधर्मोज्जीवित सनातन धर्म, अशी खरी परंपरा आहे. प्रवृत्तिपर धर्माला सोडून मराठ्यांनीं निवृत्तिपर भक्तिमार्गाचा जेव्हां अवलंब केला तेव्हां त्यांची राज्यावनति झाली;

व निवृत्तिपर भक्तिमार्ग किंचित् सोडून प्रवृत्तिपर सनातन धर्माला पुन्हां येऊन मिळण्याचा प्रयत्न जेव्हां त्यांनीं केला तेव्हां त्यांची राज्योन्नति झाली, असा ह्या परंपरेचा अर्थ आहे. संतमार्गानें मराठ्यांच्या अंगीं राजकीय जोम येणें अशक्य होतें हें अन्य तऱ्हेनेंहि सांगतां येण्यासारखें आहे. तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत संताळ्यांच्या ऐन उमेदींत महाराष्ट्रांत गाई होत्या, ब्राह्मण होते, सनातन धर्म होता, वर्णाश्रम होते, सर्व कांहीं होतें. एकच गोष्ट मात्र नव्हती. ह्या वस्तूंविषयीं आस्था, उत्कट अभिमान नव्हता. सहिष्णुता हें संतांचें व्रत पडलें. तेव्हां गाईचा वध झाला, ब्राह्मणांचा छळ झाला, धर्माचा उच्छेद झाला, तरी संतांची सहिष्णुता कांहीं चळली नाहीं. सर्वस्वाचा नाश झाला तरी आपलें कांहीं गेलें नाहीं ही संतांची बालंबाल खात्री. अशांच्या हातून राष्ट्राची राजकीय उन्नति व्हावी कशी? तर समर्थांचा उदय होण्याच्या सुमारास काय प्रकार झाला तो पहा. आपल्याला कांहीं मिळवावयाचें आहे, गोब्राह्मणांचें प्रतिपालन करावयाचें आहे, सनातन धर्म स्थापावयाचा आहे, स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा करावयाची आहे, असें प्रवृत्तिपर विचार लोकांच्या मनांत उत्कटतेनें बाणूं लागले व राजकीय उन्नति होण्यास प्रारंभ झाला. या राज्यक्रांतीला समर्थांनीं उपदेशिलेला महाराष्ट्रधर्म कारण झाला. संतांचा निवृत्तिमार्ग कारण झाला नाहीं."

—(मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें पृष्ठें ११० ते ११३)

राजवाडे यांचेच एक अनुयायी श्री. भास्कर वामन भट यांनींहि राजवाडे यांचीच री ओढून पण थोड्याशा वेगळ्या पद्धतीनें आपल्या "श्रीसमर्थरामदास आणि रामदासी संप्रदाय यांचें अभिनव दर्शन" या ग्रंथांत मतें मांडलेलीं आहेत. श्री. भट लिहितात कीं, "ज्ञानेश्वर कालापासून तो समर्थांच्या कालापावेतों महाराष्ट्रीय संत पुढारी व त्यांची अनुयायी महाराष्ट्रीय जनता या सर्वांच्या

मनावर कलियुगाच्या कल्पनेची जबरदस्त पकड बसली होती. त्यामुळें महाराष्ट्रीय जनतेवर जी जी आध्यात्मिक व आधिभौतिक संकटें कोसळलीं तीं निमूटपणें सहन करून तीं दूर करण्याचा प्रयत्न करण्याच्या कामीं कोणास यश येणार नाहीं असा सर्वत्र दृढ समज होऊन बसला होता. या समजामुळें आध्यात्मिक व आधिभौतिक संकटांतून महाराष्ट्रीय जनतेस सोडविण्याचा महाराष्ट्रीय संत पुढाऱ्यांपैकीं कोणीच प्रयत्न केला नाहीं, किंवा करण्याचें कोणीच मनांत आणलें नाहीं. समाजाची धूळधाण, नीतिन्यायाचा उच्छेद व पापाचरण या सर्व गोष्टी कलियुगांत व्हावयाच्या हें निश्चित असल्यामुळें कलियुगाची समाप्ति होईपर्यंत स्वस्थ बसून त्या निमूटपणें सहन करणें हाच शहाणपणाचा मार्ग अशी वारकरी संप्रदायाच्या संतांची दृढ समजूत होती." (पृष्ठ ५६)

"श्रुतिस्मृत्युक्त धर्माच्या पुन:स्थापनेस्तव छत्रपति शिवाजी महाराजांनीं स्वराज्याची ऊर्फ रामराज्याची स्थापना करण्याचें कार्य चालविलें होतें. त्याचें मुख्यांग जें वर्णाश्रमधर्म त्याची पुन:स्थापना करणें, तें सिद्ध करणें हें श्रीसमर्थ अवताराचें ध्येय होतें. श्रीसमर्थांच्या शिकवणीचें हें वैशिट्य वारकरी संप्रदायाच्या शिकवणींत आढळून येत नाहीं. श्रीसमर्थांनीं या शिकवणीचें मूलभूत तत्त्व " वर्णानां ब्राह्मणो गुरुः " हें प्रस्थापित करून अन्य वर्णांचा गुरु केल्यानें समाजांत वर्णाश्रमाविरुद्ध प्रचलित झालेल्या आचारांचा बीमोड केला व श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माची पुन:स्थापना, श्रीजगद्गुरु आद्य शंकराचार्य यांनीं जशी केली त्याचप्रमाणें केली. वारकरीसंप्रदाय व समर्थसंप्रदाय यांच्यांत उपास्यदैवतांबाबत फार मोठा फरक आहे. श्रीसमर्थांचा अवतार होण्यापावेंतों श्री ज्ञानेश्वरकालापासून वारकरीसंप्रदायाचें उपास्य दैवत पंढरपूरचा श्री विठ्ठलदेव होय. प्रस्तुत काळींहि वारकरी संप्रदायाचें हेंच उपास्य दैवत आहे. श्रीसमर्थांचें स्वत:चें व त्यांच्या संप्रदायाचें उपास्य दैवत पट्टाभिषिक्त राम होय. श्री समर्थ हे रामाचे व रामराज्याचे नि:सीम भक्त होते. पंढरपूरच्या श्रीविठ्ठलदेवाच्या

दर्शनास श्री समर्थ गेले असतां त्यांना मोठा विस्मय वाटला व या विस्मयांतूनच 'हे श्रीरामा, हातांतील धनुष्य बाण टाकून देऊन तू आपले हात कटेवर कां ठेवले ? श्री सीतादेवीच्या ठिकाणीं श्री राही रुक्मिणी उभ्या कां दिसतात ? अयोध्येच्या ऐवजीं श्री पंढरी नगरी व शरयू, गंगेच्या ऐवजीं चंद्रभागा कां दिसते ? त्याचप्रमाणें तुझें वानरदळ कोठें गेलें व त्याऐवजीं गोपाळांचा मेळा कां दिसतो ?' अशा प्रकारचे सहज विस्मय व्यक्त करणारे उद्‌गार त्यांच्या मुखावाटे निघाले. श्रीरामभक्तीविषयींची त्यांची निःसीमता या उद्‌गारांवरून स्पष्ट होते. श्रीकृष्ण व श्रीराम या दोघा परमेश्वराच्या अवतारांत फार मोठी तफावत आहे. राक्षसांचा संहार करून देवांना रावणाच्या बंदिवासांतून मुक्त करण्याचें व रामराज्याची स्थापना करण्याचें महत्कार्य श्रीरामानें केलें व चौदा वर्षांच्या वनवासानंतर स्वतःस अयोध्या नगरीचा राजा म्हणून पट्टाभिषेक करून घेतला. श्री रामाच्या अवताराचें हें वैशिष्टय श्रीकृष्णाच्या अवतारांत दिसून येत नाहीं. श्रीकृष्णाचे काळीं भरतखंडांतील अनेक राजे उन्मत्त होऊन दैत्यासारखें आचरण करूं लागले होते. त्या सर्वांचें श्रीकृष्णानें निर्दालन केलें असें जरी असलें, तथापि श्रीरामानें राक्षसराष्ट्राचा अधिपति रावण व त्याचे अनुयायी यांचे बरोबर युद्ध करून त्या राष्ट्राचा जसा समूळ उच्छेद केला व सर्वत्र न्यायनीतिसंपन्न रामराज्याची स्थापना केली तशा प्रकाची कामगिरी श्रीकृष्णाचे अवतारांत आढळून येत नाहीं." (पृष्ठें ६७, ६८)

श्री. भट हे तर राजवाडे यांच्यापेक्षांहि अधिकच वाहवले आहेत. भावनेच्या भरांत वारकऱ्यांना दोष देतां देतां ते त्यांच्या देवापर्यंत घसरले व तेहि विठ्ठल या देवतेऐवजीं धर्ममूल्यासाठीं आपल्या पुत्रांचाही वध करण्यास सिद्ध झालेल्या पूर्णावतार भगवान् श्रीकृष्णाविरुद्ध ते अज्ञानानें लिहावयास प्रवृत्त झाले. एक साधी गोष्ट त्यांच्या लक्षांत आली नाहीं कीं, श्रीकृष्णांच्या वेळीं

रामचंद्राच्या वेळच्या प्रमाणें राक्षस राष्ट्राच्या आक्रमणाची विपत्ति भारतावर नसून स्वधर्मांत व स्वजातींत उत्पन्न झालेल्या स्वकीय नरराक्षसांचीच धर्माला व राष्ट्राला भीति उत्पन्न झाली होती. जें संकट नसेल त्याच्या विरुद्ध उपाययोजना करतात कीं जें संकट असेल त्याविरुद्ध उपाययोजना करतात? श्रीकृष्णानें रामाप्रमाणें रावणाला मारलें नाहीं म्हणून त्याला दोष देणें म्हणजे छत्रपति शिवाजी महाराजांनीं ब्रिटिशांच्या विरुद्ध गांधीजीप्रमाणें आंदोलन केलें नाहीं अथवा सुभाषचंद्र बोसाप्रमाणें ब्रिटिश सत्तेशीं लढत घेतली नाहीं, म्हणून त्यांना हीन समजण्यासारखेंच करंट्या अज्ञानाचें लक्षण आहे. याच गतीनें विचार करावयाचा तर समर्थ रामदासांनीं हूणांविरुद्ध अथवा ब्रिटिशांविरुद्ध प्रचारतंत्र उभारलें नाहीं म्हणून त्यांना दोष देणें योग्य ठरेल ! रामासमोर जो प्रश्न होता तो रामांनीं जितक्या समर्थपणें सोडविला तितक्याच समर्थ-पणें श्रीकृष्णासमोर असलेला प्रश्न श्रीकृष्णांनीं सोडविला कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. या दृष्टीनें विचार केला तर श्रीकृष्णा-समोरचा प्रश्न रामचंद्रापेक्षां अधिक बिकट होता. कारण रामांना उघड शत्रूशीं लढावयाचें होतें; तर श्रीकृष्णांना साऱ्या भावना जिंकून स्वराष्ट्राचेंच शुद्धीकरण करावयाचें होतें. हा साधा विवेक जर न केला तर रावणसुद्धां शेवटीं अग्निहोत्रादि विशिष्ट वैदिक संस्कृतीचाच अनुयायी असल्यामुळें त्याचें व रामचंद्रांचें युद्ध हें शेवटीं यवनांच्या शिवाजीशीं झालेल्या युद्धाच्या पातळीवर येत नाहींच. सांप्रदायिकता विवेकाचे डोळे अंध करते ती अशी !

पण भट व राजवाडे अथवा खरें म्हणजे राजवाडे यांना निदान शिवछत्रपतींच्या कार्यामागें एक ज्वलंत ध्येयात्मक प्रेरणा होती ही गोष्ट मान्य आहे व ती त्यांनीं प्रकटपणें मांडून दाखविली आहे हेंही त्यांचें शिवचरित्राच्या उलगड्याच्या दृष्टीनें एक महत्कार्यच होय. मग ती प्रेरणा समर्थांनीं उत्पन्न केलेली असो वा अन्य कोणी उत्पन्न केलेली असो. आम्हांला असें म्हणावयाचें आहे कीं या कार्यामागची प्रेरणा ही केवळ समर्थ काळापुरती मर्यादित

नसून तिचा प्रारंभ त्यापूर्वी पुष्कळच आधीं दिसून येतो. तें दिग्दर्शित करण्यापूर्वी राजवाडे प्रभृतींच्या एकान्तिकतेंतून जन्म पावलेल्या एका प्रतिक्रियेचेंही येथेच दिग्दर्शन करणें आवश्यक आहे. जगांत क्रियेला नेहमी प्रतिक्रिया असतेच. श्रुतिस्मृति-पुराणोक्त धर्माच्या विरुद्ध वारकरी संतांनीं उठाव करून राष्ट्राचा जो तेजोवध केल्याचा राजवाडे प्रभृतींनीं संतांवर आक्षेप घेतला तोच महाराष्ट्रांतील जात्युच्छेदनाच्या चळवळीच्या आजच्या पुरस्कर्त्यांनीं भूषण मानून त्याबद्दलच संतांचा गौरव करावयास प्रारंभ केला व आपल्या आजच्या चळवळीशीं त्यांचें नातें जोडलें. वस्तुत: वर्तमानकाळाच्या घोषणांच्या समर्थनासाठीं इतिहासाचा असा वापर करणें चुकीचें आहे. कांहीं समस्या कालसापेक्ष असतात तशीं त्यांचीं उत्तरेंही कालसापेक्षच असतात. आज एक विशिष्ट गोष्ट राष्ट्रहिताच्या दृष्टीनें आवश्यक म्हणून मी करतों असें खुशाल म्हणावें. त्याला इतिहासनिरीक्षकांचा विरोध नसतो. पण मी जें करीत आहे त्याला ज्ञानेश्वर तुकारामांचाहि पाठिंबा आहे असें म्हटलें म्हणजे स्वाभाविकपणेंच ज्ञानेश्वरी व गाथा धुंडाळण्याचा प्रसंग उद्भवतो. संतांच्या संबंधीं झालेल्या या प्रति-क्रियेचें स्वरूप संतकार्याला व संतसाहित्याला भरपूर प्रमाणांत भोवलें आहे. त्यांचीं कांहीं नमुनेदार उदाहरणेंच द्यावयाचीं तर श्री. प्रभाकर रामकृष्ण भांडारकर यांचा पुढील अभिप्राय सांगतां येईल. ते म्हणतात :—

'वस्तुत: भागवतधर्माच्या बहुतेक शाखांचें व त्यांतहि वारकरी पंथाचें एक ध्येय जातिभेद मोडणें हें होतें, असें प्रत्येक नि:पक्षपाती मनुष्याच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे. अतिशूद्राखेरीज सर्व जातींच्या लोकांना विठोबाच्या मूर्तीस प्रत्यक्ष स्पर्श करण्याची परवानगी असणें, ब्राह्मणानें शूद्राच्या पाया पडणें, एकाच माणसानें एकाच स्वयंपाकांतून वाढलेलें अन्न निरनिराळ्या जातींच्या माणसांनीं एकाच स्थळीं जेवणें, ब्राह्मणानें चांभाराच्या हातचें— तीर्थ म्हणून कां होईना— पाणी पिणें, श्राद्धासाठीं तयार केलेलें

अन्न अंत्यज्यास वाढणें, हे प्रकार व्यवहारांत जातिभेद अवश्य पाळला पाहिजे असें म्हणणारांकडून होणें कधीं तरी संभवनीय आहे काय? या सत्पुरुषांनीं परमार्थ व व्यवहार असा खोटा भेद कधींच केला नाही व तो त्यांजवर लादणें म्हणजे आपल्या जोडीस त्यांना बसविण्यासारखें आहे. सारांश, भागवतधर्म व त्याचे अनुयायी चांभाराच्या हातचें तीर्थ घेणारे देवमुरारी, मलिंगाबरोबर एकान्तांत जेवणारे जनार्दनपंत, श्राद्धाचें अन्न अंत्यजास वाढणारे एकनाथ व त्यांची अनुकूल पत्नी गिरिजाबाई, मूर्तिपूजेचे उच्छेदक विसोबा खेचर, आधी मूर्तिपूजक व नंतर मूर्तिपूजेविषयीं उदासीन तुकोबा, हिंदुमुसलमानांच्या धर्माविषयीं समभाव असलेले बहिरंभट, हेडीच्या स्त्रीबरोबर विवाह करणारे मालोपंत, स्वजातींतच मुलींचीं लग्नें करून देणारे तुकोबा इत्यादि मंडळी यांच्यांत व अलीकडील धर्म-सुधारकांत पूर्ण साम्य आहे आणि त्यांच्यामध्यें भेद दाखविण्याचा खटाटोप व्यर्थ आहे '

— (नवयुग मार्च १९२१ डॉ. प्र. रा. भा.)

जसे एका बाजूला आपल्या आजच्या चळवळीसाठीं संतांच्या कार्याचें विडंबन करणारे भांडारकरांसारखे लोक आहेत तसेंच अतिरेकी अभिमानांतून संतकार्याचें समालोचन करणारेहि लोक निर्माण झाले आहेत. डॉ. कोलते, वळुंजकर प्रभृति लोक राम-दासांचें कार्य हें केवळ ब्राह्मणापुरतें व म्हणून मर्यादित तर संतांचें कार्य हें बहुजनसमाजाच्या हितासाठीं म्हणून खरें कार्य होय असें प्रतिपादन करतात. संतकार्याकडे पाहणारे सुंठणकरांसारखे कांहीं कम्युनिस्ट लेखक प्रचलित परिस्थितीच्या प्रभावी उपाययोजने-विषयींच्या अज्ञानांतून उत्पन्न झालेल्या नैराश्यांतून संतांचा अध्यात्मवाद निघाला असें म्हणतात; तर त्याच्या उलट कम्यु-निस्ट लेखकांचा एक दुसरा वर्ग संत हे क्रांतिकारक होते व त्यांनीं जुन्या भेदभावांवर आधारलेल्या दृष्टिकोणाविरुद्ध समानतेच्या पायावर नवसमाजरचना केली असें प्रतिपादन करतात. पंढर-पूरच्या संशोधन मंडळाचे अध्यक्ष श्री. भा. पं. बहिरट यांनीं तर

आपल्या सांप्रदायिकतेची तार इतकी विलक्षण खेचली आहे कीं, संतांनीं प्रवर्तित केलेला धर्म व वैदिक धर्म यांत मुळांतच तफावत असून तमःप्रकाशासारखा परस्परविरोध आहे, असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. ते लिहितात :—

"वैदिक धर्माचें ध्येय मोक्ष हें आहे. त्याकरितां व्यावहारिक दशेंत चातुर्वर्ण्याचे नियम पाळून कर्माचरण करावयाचें व शेवटीं पारमार्थिक अवस्थेंत झोपेंतून जागे झाल्याप्रमाणें सर्व जगाचा मिथ्यात्वानें अनुभव घेऊन जन्ममरणांतून मुक्त व्हावयाचें अशी त्याची विचारसरणी आहे. शंकराचार्याखेरीज भिन्न मतांचे आचार्य आहेत; पण त्या सर्वांचें मोक्ष हेंच ध्येय आहे. सायुज्जता, सरूपता, समीपता, सलोकता, यांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी मुक्तीचा त्यांनीं पुरस्कार केलेला आहे. याच्या उलट संतांच्या भागवतधर्माची शाश्वत सुखाची व्याख्याच भिन्न आहे. भक्ति हीच शाश्वत सुखदायिनी आहे असें त्यांनीं कंठरवानें प्रतिपादन केलें आहे. तिचा अनुभव काल्पनिक परलोकांत घ्यावयाचा नसून याच जन्मीं याच काळांत संसारांत राहून घेतां येतो हें त्यांनीं साधार पटवून दिलें आहे. मोक्षधर्म हा अनैसर्गिक असून भक्तिधर्म हाच जीवाचा मूळचा धर्म आहे व त्यांतच जीवाचें परम कल्याण साठविलेलें आहे ही गोष्ट संतांनीं तळहातावरील आवळचाइतकी स्पष्टपणें व सुबोधपणें मांडली आहे. अशा परिस्थितींत समन्वय करण्याचा एकच उपाय आहे. तो म्हणजे दोहोंपैकीं कोणीतरी आपलें ध्येयच बदललें पाहिजे. परंतु ही गोष्ट शक्य नाहीं. तेव्हां दोहोंचा समन्वय होणेंहि शक्य नाहीं. वैदिक धर्म हा आपल्या मोक्षाचें ध्येय सोडून देईल तरच त्याचा भागवत धर्माशीं सलोखा होईल. नुसतें औपचारिकरीत्या तुमचें आमचें एक असा कितीही गलबला केला तरी त्यांची मैत्री होणार नाहीं."

—(संतवाणीचा अमृत कलश पान ५१, ५२)

'मोक्षाच्या कल्पनेवर संतांनीं स्पष्ट व निर्भीड टीका केली आहे. भक्तिसुखापुढें असली काल्पनिक मुक्ति तुच्छ होय. कनिष्ठ

ध्येय पुढें ठेवणारा धर्मही संतांच्या बोधदृष्टीनें कनिष्ठ ठरतो, व त्याचा समन्वय श्रेष्ठ ध्येयाच्या श्रेष्ठ धर्माशीं होऊं शकत नाहीं. मोक्ष हा भक्तीचें साधन होऊं शकत नाहीं. एवढेंच नव्हे तर तो भक्तीस विरोधी आहे. त्यामुळें मोक्ष व भक्ति यांचें एकीकरण करण्याचा प्रयत्न म्हणजे अंधार व उजेड यांना एकत्र आणण्याच्या प्रयत्नाप्रमाणें होय. कनिष्ठ ध्येयाप्रमाणेंच वैदिक धर्माच्या आचाराची कल्पनाही कनिष्ठतेचीच आहे. स्त्री, शूद्रादिकांकडे पाहण्याची त्याची दृष्टिही अनुदारतेची आहे. वैदिक धर्मांत निरनिराळे संस्कार सांगितले आहेत. या संस्काराचा हेतु म. म. श्री. काणे यांनीं "धर्मशास्त्रविचार" या ग्रंथांत वर्णिला आहे. "गर्भाधानापासून अंत्येष्टीपर्यंतचे संस्कार द्विजांचे बाबतींत वैदिक कर्मांनीं करावेत, त्यांच्या योगानें या लोकीं तसेंच परलोकीं पाप सर्व नाहींसें होतें. 'अपहतपाप्मा' म्हणजे पाप नष्ट झालेला जो आत्मा असेल तोच मोक्षाचा अधिकारी होतो. या पुरुषार्थाची पात्रता अंगीं आणणें हा संस्कारांचा हेतु सांगितला आहे." स्त्रिया व शूद्र यांच्याविषयीं याच ग्रंथांत पुढें म्हटलें आहे : "त्रैवर्णिकांचे सर्व संस्कार समंत्रक व्हावयाचें, पण त्यांत स्त्रियांचे बरेच संस्कार मंत्रहीन करावेत असें सांगितलें आहे. "स्त्रीशूद्राश्च सधर्माणः" स्त्रिया व शूद्र यांना कित्येक धर्मशास्त्रकारांनीं समान ठरविलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे देह हा पातकांचा गोळा असल्यामुळें पापक्षालनार्थ संस्कार करावयास पाहिजेत व सदर संस्कार समंत्रक करावयाचा अधिकार त्रैवर्णिकांनाच आहे. व स्त्री, शूद्रादिकांना नाहीं, ही वैदिक धर्माच्या मुळाशीं असलेली कल्पना होय."

—(संतवाणीचा अमृतकलश पान ५२, ५३)

श्री. बहिरट व तत्सम प्रतिक्रियावादी लेखक यांनीं राजवाड्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून समर्थ रामदासांच्यावरही हीन भूमिकेवरून असेच चमत्कारिक आक्षेप घेतले आहेत. त्यांचा विचार स्वतंत्रपणें समर्थांच्या कामगिरीचा विचार करतांना मी

करणारच असल्यामुळें येथें त्याचा ऊहापोह करीत नाहीं. तात्पर्य, शिवछत्रपतींच्या हातून यशस्वी झालेल्या कार्याला जी राष्ट्रीय प्रेरणेची पार्श्वभूमि होती, तिचें अस्तित्व मान्य करूनहि तिचें जनकत्व केवळ समर्थांकडेच असल्याचा राजवाडे प्रभृतींचा दावा आहे, व त्याच्या उलट पूर्वीच्या संतांनीं केवळ राष्ट्र बुडविण्याचेंच काय तें काम केलें असा त्यांचा आक्षेप आहे; उलट संतसाहित्याचा अभिमान वाहणारे लोक, त्यांनीं नवधर्म प्रतिष्ठापित केला असें म्हणण्यांत त्यांनीं राष्ट्रीय अस्मितेच्या पुनरुज्जीवनाचें कार्य मुळींच केलेलें नाहीं; त्यांनीं जर कांहीं केलें असलें तर तें एक स्वतंत्र संप्रदायप्रवर्तनाचें कार्य केलें आहे असेंच पर्यायानें ते सिद्ध करीत आहेत. मला कै. रानडे यांच्याप्रमाणेंच असें म्हणावयाचें आहे कीं राष्ट्रीय अस्मितेच्या पुनरुत्थानाचें हें कार्य समर्थांनीं प्रारंभ केलेलें नसून त्याचा प्रारंभ भागवतधर्ममंदिराचे प्रतिष्ठापक श्रीज्ञानदेव यांच्या हस्तें झाला आहे व शिवछत्रपतींच्या राजकीय उत्थानाचें स्वरूप त्या पुनरुत्थानाच्या कार्याचाच एक भाग असून समर्थ-शिवरायांच्या अवतारानें हें कार्य पूर्ण झालेलें आहे. हें प्रमेय सिद्ध करण्याआधीं या उपरिनिर्दिष्ट आक्षेपकांच्या आक्षेपांचें समालोचन करणें आवश्यक आहे. यांपैकीं प्रथम आपण राजवाडे संप्रदायाच्या आक्षेपकांकडे वळूं.

रा. राजवाडे यांनीं भक्तिमार्गाची जी उपपत्ति मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या चौथ्या खंडाला प्रस्तावना लिहितांना दिलेली आहे ती अत्यंत चुकीची आहे. जैन, लिंगायत व मानभाव यांच्या संसर्गानें जर भक्तीचा अथवा उपासनासंप्रदायाचा अथवा खरें म्हटलें तर भागवतधर्माचा जो प्रादुर्भाव झाल्याचें राजवाडे सांगतात, तो प्रभाव जर या उपासनासंप्रदायांचा संतांच्या भागवत धर्मावर असता तर, भागवत धर्माचा कळस असलेल्या तुकाराम महाराजांनीं या पंथांवर कोरडे ओढले नसते. राजवाडे ज्याला "संताळ्यांचा भक्तिमार्ग" असें म्हणतात तो मार्ग ऋग्वेदा-

इतका प्राचीन आहे. परमेश्वराचें नामस्मरण हें उद्धाराचें महत्त्वाचें साधन असून ईश्वराच्या नांवाची वारंवार आवृत्ति केल्यानें मनुष्यजीवाचें सर्वस्वी कल्याण होतें हा भागवतधर्माचा सिद्धान्त ऋग्वेदाच्या पुढील ऋचांमधून मांडलेला आहे.

" तमु स्तोतारः पूर्व्यं यथाविद ऋतस्य गर्भं जनुषा पिपर्तन ।
आस्य जानन्तो नाम चिद्विक्तन महस्ते विष्णो सुमतिं भजामहे ।।

—(ऋ. सं. द्वितीयाष्टक, द्वितीयाध्याय. मंडल १–२१–१५६)

ऋग्वेदांतील इंद्रसूक्तें वाचलीं तर वारकरी संतांच्या पांडुरंगाविषयींच्या भावनेंत व ऋग्वेदीय ऋषींच्या इंद्रविषयक भावनेंत कांहींही फरक नाहीं असें आढळून येईल. वाजसनेयी संहितेंतील "तं पत्नीभिरनुगच्छेम देवाः पुत्रैर्भ्रातृभिरुत वा हिरण्यैः ।" या धारणेंत व "देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगासी तुटी ।" अथवा " प्रल्हादे जनक, बिभीषणे बन्धु । राजमाता निन्दु भरतें केली ।।' या धारणेंत तत्त्वतः काय भेद आहे? उपनिषदांतूनहि भक्तिमार्गाचें उत्कृष्ट वर्णन आहे. श्रीमन्महाभारतांतील नारायणीय धर्म हा भागवत धर्मच होय. श्रीमद्भगवद्गीतेंतील बाराव्या अध्यायांत 'यो मद्भक्तः स मे प्रियः' या श्लोकपादाची वारंवार केलेली पुनरावृत्ति, व अकराव्या अध्यायांतील

नाहं वेदैर्न तपस्या न दानेन न चेज्यया ।
शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ५३ ।।
भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेष्टुं च परंतप ।। ५४ ।।

"ज्या प्रकारें तूं मला पाहिलेंस त्या प्रकारें वेदपठनानें, तपानें, दानानें अथवा यज्ञानें (देखील) मी (कोणाला) दिसणें शक्य नाहीं. पण हे शत्रुनाशना अर्जुना, अशा स्वरूपाचा जो मी, त्या मला अनन्यभक्तीच्या योगानें जाणणें, पहाणें आणि मत्स्वरूपानें माझ्यामध्यें लीन होणें शक्य आहे" हे सगळे उल्लेख, भगवद्गीता

भागवतधर्माचा सुस्पष्ट पुरस्कार करते हेंच सिद्ध करीत नाहींत काय ? लोकमान्यांनीं ज्याला पुष्टिदायक पुरणपोळी असें म्हटलें आहे तें श्रीमद्भागवत पुराण व श्रीमद्भगवद्गीता हेच भागवत धर्माचे अथवा संताळच्यांच्या भक्तिमार्गाचे आधारग्रंथ होत. ऋग्वेदापासून भागवत पुराणापर्यंतचे सर्व ग्रंथ, व भागवताचा विषय विवाद्य म्हणून सोडून दिला तरी गीतेपर्यंतचे सर्व ग्रंथ हे महावीराचा जैन पंथ, बसवेश्वराचा लिंगायत पंथ अथवा चक्रधराचा मानभाव पंथ या सर्वांहून प्राचीन आहेत, असें इतिहासाचें म्हणणें आहे. इतिहासाचार्य राजवाड्यांना जरी अनेक अलौकिक साक्षात्कार होत असत तरी या पंथानंतर ऋग्वेद, गीता व महाभारत यांचा जन्म झाला असल्याचा साक्षात्कार त्यांच्या चरित्रांत दिलेला नाहीं. त्यामुळें भक्तिमार्गाच्या निर्मितीचें मूळ राजवाडे म्हणतात तसें जैन, लिंगायत व मानभाव यांच्या संप्रदायांत नाहीं. त्यांच्या मीमांसेचें अनैतिहासिकत्व जसें स्पष्ट आहे तसेंच अशास्त्रीयत्वहि स्पष्ट आहे. कोणत्याहि एका उपासनासंप्रदायांतून दुसरा उपासनासंप्रदाय निघाला हें विधान शास्त्रीय दृष्टीनें सत्य ठरावयास एकच मार्ग मोकळा आहे; व तो हा कीं, त्या दोन्ही संप्रदायांचें तत्त्वज्ञान व देवताविज्ञान एक असल्याचें दाखविणें. असें राजवाडे यांना दाखवितां आलेलें नाहीं व कोणालाही तें तसें दाखवितां येणार नाहीं. सारे संत एकजात अद्वैतवादी आहेत असें दाखवितां येतें. श्रीज्ञानदेव हे स्वतःच्या तत्त्वज्ञानाला "अद्वयानंदवैभव" असें म्हणतात, व त्याच्या स्वरूपाची यथार्थ कल्पना देतांना "अथवा हें विश्वचि माझें घर। ऐसी मति जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला ॥" असे उद्गार काढतात. ज्यानें पाया रचिला त्याच्या या उद्गारांचें प्रतिबिंब, ज्यानें या भागवतधर्ममहामंदिराचा कळस स्थापिला त्या श्रीतुकारामांच्या उद्गारांतहि उमटलेलें आढळून येईल. श्रीतुकाराम म्हणतात, "गोडपणें जैसा गूळ। तैसा देव झाला सकळ। अणोरणीया थोकडा। तुका आकाशाएवढा ॥" याच्या उलट

लिंगायत, जैन व मानभाव हे एकजात सारे द्वैतवादी आहेत. जसा तत्त्वज्ञानाच्या संबंधांत तसाच देवताविषयक विज्ञानासंबंधांतहि उभय पंथांत विलक्षण भेद आहे. मानभाव तर अनेक देवतावादी आहेत. ज्ञानदेवांनीं या गोष्टीची चांगलीच थट्टा केलेली असून ज्ञानदेवापासून तुकारामापर्यंतची संतपरंपरा 'एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति' या वैदिक देवताविज्ञानाच्या रहस्याचाच पुरस्कार करणारी होती, हें 'तुका म्हणे जे जे बोला। ते ते साजे या विठ्ठला।।' या तुकाराम महाराजांच्या साध्या उद्गारावरूनहि दिसून येतें. यानंतर राजवाडे यांच्या दुसऱ्या आक्षेपाकडे वळूं.

संत दुबळे होते, बावळट होते व इहलोकाकडे त्यांचें बिलकूल लक्ष नव्हतें हेंहि म्हणणें चुकीचें आहे. 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारें' हा उपदेश व्यवहारविमुखतेचा खास नाहीं. समर्थांप्रमाणें त्यांनीं देशद्रोही तितुके कुत्ते। मारोनि घालावे परते।।' हा उपदेश कां केला नाहीं? असेंच जर म्हणावयाचें असेल तर त्याचें उत्तर आजच्याहि एखाद्या उदाहरणांतून देतां येईल. प्रखर तेजस्वी असलेल्या लोकमान्य टिळकांनीं सुभाषचंद्र बोसांच्या प्रमाणें 'चलो दिल्ली' असा उद्घोष करीत ब्रिटिशांच्यावर चाल कां केली नाहीं, या प्रश्नाचें काय उत्तर देतां येईल? त्याचें हेंच उत्तर असूं शकेल ना कीं टिळक व सुभाष यांच्या काळांतील परिस्थितींत पडलेला फरक. हेंच उत्तर ज्ञानदेवानंतरच्या काळांतील समर्थपूर्वीच्या संतांच्या कार्यावरील आक्षेपासंबंधीं देतां येण्यासारखें आहे. याचें फार मोठें उदाहरण श्रीएकनाथांच्या सहनशीलतेसंबंधीं प्रसिद्ध असलेल्या एका गोष्टींत पहावयास सांपडतें. या गोष्टींत असें सांगितलें आहे कीं, एक यवन एकनाथांच्या अंगावर थुंकला असतां त्यांनीं मुकाट्यानें जाऊन स्नान केलें. त्यावरोबर त्यांना चिडविण्यासाठीं अनेक वेळां त्यांच्या अंगावर त्यानें थुंकी टाकली व तितके वेळां एकनाथांनीं स्नानें केलीं. या गोष्टींत एका बाजूला जशी एकनाथांची सहनशीलता दिसते, तशीच दुसऱ्या बाजूला परिस्थितीची ही अवशताहि दिसून येते.

नाथांसारख्या श्रेष्ठ पुरुषाला असें अपमानित केल्यावरहि खळबळ होण्याइतका समाज मुळींच जागृत झाला नव्हता. अशा स्थितींत 'अतृणे पतितो वह्निः' प्रमाणें केवळ तेजस्वी घोषणांचा काय उपयोग होणार होता? राजवाड्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर शहाजी जसा शेख महंमद नव्हता, तसेंच संतही परिस्थितीची ओळख न ठेवतां, केवळ तेजस्वी घोषणा करीत बसणारे शेख महंमद निश्चितच नव्हते. समर्थांच्या वेळीं निष्ठावंत राष्ट्र व शिवछत्रपतींसारखे समर्थ नेतृत्व दिसल्यामुळें त्यांना 'देव मस्तकीं धरावा। अवघा हलकल्लोळ करावा।' असे सार्थ उद्गार काढतां आले. जोंवर असें सामर्थ्य दृष्टोत्पत्तीस येत नव्हतें तोंवर कलियुगाच्या परिभाषेंत संतांनीं जी अवशता प्रकट केली तीच अवशता समर्थांनींहि आपल्या पुढील उद्गारांतून प्रकट केली आहे. 'दास म्हणे रे भगवंता किती पाहसी सत्त्व। काय वांचोनी वांचोनी रे परतें जीवित्व। किती धरावें धरावें धरावें तें सत्त्व। जाली शरीरें शरीरें शरीरें निःसत्त्व॥'

'काय तुम्ही येथें नसालसे झाले' या श्रीतुकारामांच्या उद्गारांत व समर्थांच्या उपर्युक्त उद्गारांत काय फरक आहे? समर्थांच्या कार्याचें स्वतंत्रपण कुठें आहे हें मी पुढें दाखवीनच. पण संतांवर नसते आक्षेप घेणें योग्य नाहीं. निष्ठाशून्य राष्ट्रांत निष्ठा उत्पन्न करणें हें संतांचें मुख्य काम होतें व तें त्यांनीं केलें. निष्ठावंत राष्ट्रांत तेजस्वी प्रेरणा निर्माण करणें हें कार्य समर्थांकरवीं झालें आहे. पण मूळ निष्ठाच नसती तर तेजस्वी प्रेरणा निर्माण करतां येण्याची शक्यता तरी होती काय? मराठेशाहीच्या उत्तरार्धांत मराठी राज्यांत तेजस्वितेची वाण होती असें नाहीं. पण समष्टिजीवनाला एकसूत्रित करणाऱ्या निष्ठेचा मात्र संपूर्णपणें अभाव होता. म्हणूनच अटकेपार झेंडे फडकूनही शेवटीं राज्य धुळीला मिळालें. येऊन जाऊन संतांनीं वैराग्याचा, भक्तिमार्गाचा व अद्वैत वेदान्ताचा पुरस्कार केला म्हणूनच त्यांना नांवें ठेवावयाचीं असलीं तर ज्या श्रीशंकराचार्यांना राजवाडे यांनीं उचलून धरलें

आहे त्यांनींच तर या तिन्ही गोष्टी जवळ जवळ प्रवर्तित केल्या असून समर्थांनींहि त्यांचाच पुरस्कार केला आहे. न्या. रानडे या आक्षेपाला उत्तर देतांना म्हणतात, "सर्व माया संकल्पावी, देवापायीं संसार वहावा व त्याच्यावर भार घालावा' असें ज्या थोर भक्तीचें तुकाराम बोवांनीं वर्णन केलें आहे अथवा मुख्य लक्षण मानलें आहे ती भक्ति पंगुपणा अथवा जडता उत्पन्न करील कीं सामर्थ्य व तेज देईल याचा स्वतंत्रच विचार केला पाहिजे. ज्या भाग्यवान् पुरुषाला साधूच्या उपदेशानें किंवा परमेश्वराच्या अनुग्रहानें ही श्रेष्ठ भक्ति प्राप्त झाली आहे, परमेश्वराच्या ठायीं निर्धारबुद्धि उत्पन्न झाली आहे तो पंगु, असमर्थ होईल काय? हल्लींच्या किंवा जुन्या काळच्या थोर व्यक्तींचें उदाहरण घेऊन पहा. त्यांचे ठायीं मानसिक व्यवहारांत निश्चयाचा किंवा दाढर्याचा भाग किती विशेष रीतीनें दिसतो! ज्यांना भक्तीच्या द्वारें सिद्धि बऱ्याच अंशानें प्राप्त झाली आहे, जे केवळ निर्धाराचे पुतळे बनले आहेत, त्यांना पंगु म्हणणें म्हणजे कसरतीनें किंवा तालीम करण्यानें शरीरास शिथिलता येते अथवा ज्ञानार्जनाच्या साधनांनीं व अभ्यासानें मनास दौर्बल्य येतें असें म्हणण्यासारखेंच आहे. देवावर भार घालणें म्हणजे आपण मुळींच भार वहावयाचा नाहीं, असें नाहीं; तर हें परमेश्वराचें कार्य आहे अशा बुद्धीनें ओझें वहावयाचें व उद्योग करावयाचा. देवाचा डांगोरा पिटण्याकरितांच आम्ही येथें आलों आहोंत असें तुकारामबोवांनीं म्हटलें आहे. ईश्वरप्रेरित म्हणून केलेल्या कार्याची महती अशी आहे कीं इतर गोष्टी त्याच्या पासंगासहि पुरावयाच्या नाहींत. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां, भक्तिमार्गाचा उपदेश अत्यंत सामर्थ्यदायी नाहीं काय?"

—(न्या. मू. रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें पृ. १५७–१५९)

महाराष्ट्राचे विख्यात तत्त्वज्ञ कै. रानडे म्हणतात, "ज्या संतांस परमार्थाचें बिकट वर्म कळतें, त्या संतांस व्यवहार कळणार नाहीं असें होणें शक्य नाहीं. तुकाराम इतके मोठे सत्पुरुष होते, तथापि त्यांचें व्यवहारचातुर्यहि फार अलौकिक होतें."

—(तुकाराम वचनामृत पृ. २४)

संतांनीं राष्ट्राला पंगूपणाची शिकवण दिली असें ज्यांना म्हणावयाचें आहे त्यांनीं एकवार संतवाङमयाचें परिशीलन केलें तर त्यांचें म्हणणें चुकीचें असल्याचें त्यांनाच आढळून येईल. भागवत धर्ममन्दिराचे महाराष्ट्रांतील प्रतिष्ठापक श्रीज्ञानदेव आदर्श पुरुषाचें वर्णन करतांना असे उद्गार काढतात कीं :–

कां फेडित पापताप । पोखीत तीरीचे पादप ।
समुद्रा जाय आप । गंगेचे जैसे ॥१९९
कां जगाचे आंध्य फेडित । श्रियेची राउळें उघडित ।
निघे जैसा भास्वत । प्रदक्षिणें ॥२००
तैसी बांधिली सोडित । बुडाली काढित ।
सांकडी फेडित । आर्तांचिया ॥२०१
किंबहुना दिवस राती । पुढिलांचे सुख उन्नति ।
आणित आणित स्वार्थी । प्रवेशिजे ॥२०२
वांचूनि आपुलिया काजालागी । प्राणिजातांच्या अहित भागी ।
संकल्पाची ही आडवंगी । न करणें जे ॥२०३

––(ज्ञानेश्वरी अ. १६ श्लोक ३)

ज्ञानदेवांनीं यांत ज्या पुरुषाचें चित्र रेखाटलें आहे तो पंगु आहे, कीं अखिल मानवतेचा उद्धारक, नि:स्वार्थी असा नेता आहे? असे पुरुष ज्या विज्ञानानें अथवा विचारप्रणालीनें निर्माण व्हावे अशी संतांची अपेक्षा आहे त्या विचारप्रणालीनें राष्ट्राला पंगु केलें हें म्हणणें किती चमत्कारिक आहे! 'वरी पडलिया आकाश। बुद्धीचे डोळे मानस । झांकीना ते परियेस । धैर्य जेथे ॥' आणि 'पाणी हो भलतेतुके । परी ते जिणोनि पद्म फाके। कां आकाश उंचिया जिंके । आवडे तयाते ॥ आदित्याची झाडे । सदासन्मुख सूर्याकडे । तेवी समोर शत्रूपुढे । होणें सदा ॥ माहेवणी प्रयत्नेसी । चुकविजे शेजे जैसी । रिपू पाठी नेदिजे तैसी । समरांगणी ॥' हे शब्द राष्ट्रांत बुळेपणा उत्पन्न करण्यासाठीं बद्धपरिकर झालेल्या व्यक्तीनें लिहिले आहेत काय? भागवत धर्ममंदिराचा कळस असणारे श्रीतुकाराम महाराज आपल्या पायिकीच्या अभंगांत म्हणतात:––

पाइकपणें जोतिला सिद्धान्त । शूर धरी मात वचन चित्ती ।।
पाइकीवांचून नव्हे कधीं सूख । प्रजामध्ये दु:ख न सरे पीडा ।।
तरि व्हावे पाईक जीवाचे उदार । सकळ त्याचा भार स्वामी वाहे ।।
पाइकीचें सुख जया नाहीं ठावे । धिग् त्यांनीं जावें वायावीण ।।
तुका म्हणे एका क्षणाचा करार । पाइक अपार सुख भोगी ।।
येती गोळ्या बाण साहिले भडिमार । वर्षतां अपार वृष्टी करी ।।
स्वामीपुढे व्हावें पडतां भांडण । मग त्या मंडण शोभा दावी ।।
जातीचा पाईक ओळखे पाईका । आदर तो एका त्याचे ठायी ।।
धरीतील पोटासाठी हतियारे । कळती ती खरे वेठीचीशी ।।
जातीचें तें खरें असें डायघाय । पारखिया काय पाशी लाड ।।

या तुकोबांच्या उपदेशांत पंगूपणाचा कोठें भास आहे काय ? राजवाडे व त्यांचे सांप्रदायिक असें सांगतात कीं संत हे सनातन धर्म व चातुर्वर्ण्य यांच्या विरुद्ध होते. पण त्यांच्या निवृत्तिपर भक्तिमार्गांत समर्थांच्या इतकेंच चातुर्वर्ण्याला स्थान होतें हें संत-वाङ्मयाच्या थोड्याशाही परिशीलनानें ध्यानांत येतें. श्रीज्ञानदेव म्हणतात :—

"म्हणोनि अग्निसेवा न सांडितां । कर्माची रेखा नोलांडितां ।
आहे योगसुख स्वभावतां । आपण पांचि ।।
अगा स्वधर्म हा अपुला । जरी कां कठिण जाहला !
तरी हाचि अनुष्ठिला । भला देखें ।।
या स्वधर्मातें अनुष्ठितां । वेचु होईल जीविता ।
तोहि निका वर उभयतां । दिसत असे ।।"

म्हणवूनि स्वधर्म जो सांडील । तयातें काळ दंडील ।
चोर म्हणूनि हरील । सर्वस्व तयाचें ।।
हें संपत्तिजात आघवें । हवनद्रव्य मानावें ।
मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदिपुरुषी ।।
तुम्हा वर्ण विशेष वशें । आम्हीं हा स्वधर्म विहिला असे ।
याते उपासा मग आपैसे । पुरती काम ।।"

२३३५ ६५६ ३०।१२

या सगळ्या ओव्यांत श्रुतिस्मृत्युक्त वर्णाश्रमधर्माचाच प्रचार नाहीं काय? श्रीतुकाराम महाराज म्हणतात :--

" भलताहि धर्म योनिसंभव कर्म । उत्तमे उत्तमें अनुष्ठिजे ॥
स्वधर्मी जे मेले घेत रमा शेजे । परधर्मी रिघे वाया जाय ॥
वधूचें कुरूप ज्याचें तया सुख । परावीया वीख होवुनी ठाके॥
तुका म्हणे धर्म कर्मेचि वर्तावे । परधर्मी पावावे पतनालागी ॥

याप्रमाणें प्रत्यक्ष संतवाङमयांत पाहिलें तर राजवाडे सांप्रदायिकांच्या विरुद्धच पुरावे उपलब्ध होत असून या प्रत्यक्ष प्रमाणावरून राजवाडे सांप्रदायिकांचे आक्षेप किती पोकळ आहेत याची कल्पना येते. या आक्षेपांची जी प्रतिक्रिया तीहि तितकीच विकृत आहे. प्रार्थनासमाजिस्टांच्या व बहिरटांच्या प्रतिपादनानें तर या विकृत प्रतिक्रियेची एक प्रकारें सीमाच गांठली आहे.

प्रार्थनासमाजिस्टांनीं स्वतःच्या पतनाच्या समर्थनार्थ वारकरी संतांना ओढणें अत्यंत चुकीचें आहे. पंढरीच्या विठोबापूर्वीपासून श्रीजगन्नाथाच्या मंदिरांत भेदाभेद नाहींत. पण याचा अर्थ तेथील वैष्णव अथवा येथील वारकरी हे वर्णाश्रमसंस्थेचे विरोधक आहेत असें म्हणतां येत नाहीं. आपल्या जोडीस त्यांना कां बसवावें? संतांच्या चरित्रांतील घटना त्यांनीं पुरस्कृत केलेल्या अनुभूतींच्या शास्त्रावर तपासून पाहिल्या पाहिजेत, व त्यांचे प्रत्यक्ष उद्‌गार हेच त्यांच्या अंतरंगाचे खरे साक्षीदार मानले पाहिजेत. नाहीं तर तें संतांच्या पदरीं, वागणें एक व उपदेश दुसरा, असा दुटप्पीपणाचा, अप्रामाणिकपणाचा, वंचकतेचा व सामाजिक संकेतांना घाबरण्याच्या भ्याडपणाचा आरोप बांधणें होईल. भांडारकरांनीं हेंच केलें आहे. जनार्दनपंत मलंगाबरोबर जेवीत नव्हते तर दत्तात्रेयाबरोबर जेवीत होते. नाहीं तर एकान्तांत जेवण्याचें त्यांना कारण नव्हतें. नाथांच्या घरीं श्राद्धाला अंत्यज बोलाविले जात नव्हते, तर अंत्यजांची वासना गेल्यामुळें तें अन्न श्राद्धाला चालत नाहीं ही त्यांची भावना होती. विसोबा खेचर मूर्तिपूजेचे उच्छेदक नव्हते तर आकारांतच अडकून राहणाऱ्या नामदेवाच्या डोळ्यांत त्यांना

झणझणीत अंजन घालावयाचें होतें. नाहीं तर या सर्व संतांनीं प्रार्थना समाजिस्टांप्रमाणें आठवड्यांतून एकदां डोळे मिटून निराकारांत निमग्न व्हावयाचें व उरल्या वेळांत वर्णाश्रम संस्थेवर हल्ले चढवावयाचें असें धोरण स्वीकारलें असतें. वेदनिष्ठा व वर्णाश्रम संस्थेला उचलून धरणें हे संतसाहित्याचे दोन विशेष भांडारकरांच्या म्हणण्याला चपखल उत्तर होय. बहिरटांनीं वैदिक धर्मांत व भागवत धर्मांत विरोध असल्याचें प्रतिपादन करून जें आकांडतांडव केलें आहे त्याला आम्ही ज्ञानदेव, तुकाराम व बहिणाबाई या भागवतधर्मीय संतांच्या शब्दांतच उत्तर देतों. म्हणजे त्यांच्या प्रमाणहीन प्रतिपादनासंबंधीं अधिक विवेचन करण्याचें कारण उरणार नाहीं. वेदाला तर ज्ञानदेव "वेदे बापे" असेंच म्हणतात.

"तैसा अशेषाही पुरुषार्थां । जो गोसावी हो म्हणे पार्थां ।
तेणें श्रुतिस्मृति माथां । बैसणें धापे ॥५९
शास्त्र म्हणेल सांडावे । तें राज्यही तृण मानावें ।
जें घेववी तें न म्हणावें । विषही विरु ॥६०
ऐसिया वेदैकनिष्ठा । जालिया तरी सुभटा ।
तरी कें आहे अनिष्टा । भेटणें गा ॥६१
पैं अहितापासूनि काढिती । हित देउनी वाढविती ।
नाहीं श्रुतिपरौती । माउली जगा ॥६२
म्हणौनि ब्रह्मेसि मेळवी । तव हें कोणें न संडावी ।
अगा तुवांही ऐसीचि भजावी । विशेषेसी ॥६३

— (ज्ञानेश्वरी अध्याय १६ श्लोक २४)

श्रीतुकाराम महाराज म्हणतात, "धर्म रक्षावयासाठीं करणें आटी आम्हासी । वाचा बोलो वेदनीति करूं संतीं केलें तें ॥"

श्री. बहिरट यांच्यापेक्षां तुकाराम महाराजांचें हृद्गत अधिक जाणणाऱ्या त्यांच्या साक्षात्कारी शिष्या बहिणाबाई या तर आपल्या गुरूच्या पावलावर पाऊल टाकून पुढीलप्रमाणें कडक शब्दांत आपलें मनोगत व्यक्त करतात :—

"वेदासी विरुद्ध नव्हे आत्मज्ञानी । पडला तो पतनी रौरवाचे॥

ऐसे ते चांडाल न पडावे दृष्टी । जयाने हे कष्टी उभय कुळ ।।
वेदासी विरुद्ध असतां सर्वथा । अनर्थ परमार्था हाचि एक ।।
बहिणाई म्हणे जळो त्याचें ज्ञान । जेणें नारायण वैरी केला ।।

वारकरी धर्माचे अध्वर्यू म्हणतात तें खरें कीं बहिरट म्हणतात तें खरें मानावयाचें ?

असो. महाराष्ट्रांत प्राचीन वैदिक धर्माच्या व भारतीय राष्ट्राच्या अस्मितेवर जें यावनी आक्रमण येऊन तिचें अस्तित्वच धोक्यांत आलें होतें त्याविरुद्ध सांस्कृतिक पुनरुत्थानाचें जें आंदोलन सुरू झालें त्याचा सूत्रनिपात केवळ समर्थांपासून झालेला नाहीं, तर तो त्यांच्या कितीतरी वर्षें पूर्वी श्रीज्ञानदेवांनीं केला व श्रीज्ञानदेवरूपी गंगोत्रीपासून उगम पावलेल्या स्वधर्मनिष्ठेच्या व स्वराष्ट्रनिष्ठेच्या गंगेचा प्रवाह सप्तस्रोतस्विनीचें विशाल रूप धारण करून महाराष्ट्रांतील समाजाच्या सर्व थरांतून व सर्व घरांतून वेगानें वाहूं लागला. या बहुमुख पुनरुत्थानाच्या पायावरच स्वधर्माचें व स्वराष्ट्राचें मंदिर उभारण्यांत शिवछत्रपति यशस्वी झाले. हा पाया सुदृढ नसता तर या राज्यक्रांतीच्या स्वरूपांत स्वधर्माची प्रखर प्रेरणा नांदलीच नसती. यावर एक प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, ज्ञानदेवांच्या काळीं राष्ट्राच्या अस्मितेवर आलेलें हें आक्रमण केवळ उत्तर भारतापुरतें मर्यादित होतें. ज्ञानदेवांना याची कल्पना असण्याचें कांहीं कारण नव्हतें. स्वतःच्या वेळच्या वस्तुस्थितीचें वर्णन करतांना श्रीज्ञानदेव म्हणतात :—

तेथ यदुवंशविलासु । सकळ कळानिवासु ।
न्यायाते पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्रु ।।

याचा अर्थ यादवांचें हिंदु राज्य त्या वेळीं महाराष्ट्रांत नांदत होतें असा आहे. म्हणून ज्ञानदेवापासून प्रारंभ झालेला हा प्रवाह राष्ट्रीय अस्मितेच्या प्राणसंकटांतील तिचा संरक्षक प्रयत्न म्हणून कसा म्हणतां येईल? व मुळांत त्याची सुरवातच जर या कारणासाठीं नसेल तर पुढचें त्याला जें स्वरूप प्राप्त झालें, तें हेतुगर्भ होतें असें कसें म्हणतां येईल? या प्रश्नाचें उत्तर आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

✦ ✦ ✦

## प्रकरण बारावें

# श्रीज्ञानेश्वर

भागवत धर्म महामंदिराचा पाया घालण्याच्या रूपानें ज्यांनीं महाराष्ट्रांत हिंदुराष्ट्राच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाचा पाया सिद्ध केला व समाजाला देवनिष्ठा, धर्मनिष्ठा व श्रद्धाजीवन यांचा वारसा दिला ते श्रीज्ञानेश्वर महाराज होत. श्रीज्ञानेश्वर महाराजांचा अद्भुत जीवनक्रम सर्वांच्याच परिचयाचा आहे. श्री ज्ञानदेव व त्यांचे बंधु निवृत्तिनाथ, सोपान व बहीण मुक्ताबाई यांचा जन्म आळंदीऐवजीं आपेगांवला झाला असें आजवर समजत असत. पण स्वतः नामदेवांनींच असें म्हटलें आहे कीं 'नामा म्हणे पूर्णब्रह्म ज्ञानेश्वर। घेतसे अवतार अलंकापुरी ॥' नामदेव हे ज्ञानदेवांच्या समकालीन असल्यामुळें त्यांचा पुरावा अधिक ग्राह्य आहे. ज्ञानदेवीचें पहिलें शुद्धीकरण करणारे महापुरुष श्री एकनाथ महाराज यांनींही असें म्हटलें आहे कीं, 'अर्जुना संकट पडतां जडभारी। गीता सांगे हरि कुरुक्षेत्रीं ॥ तोचि अवतार धरि अलंकापुरी। ज्ञानाबाई सुंदरी तारावया ॥'

त्यांच्या जन्मस्थानाविषयीं हाच निर्णय निश्चित करतांना आपल्या ज्ञानदेवीच्या प्रस्तावनेंत प. पू. सोनोपंत दांडेकर यांनीं हेंच मत मांडलें असलें तरी यासंबंधांत मतभेद असू शकतो असें ध्वनित केलें आहे. ज्ञानदेवांच्या व त्यांच्या भावंडांच्या जन्म-शकाविषयीं नामदेवाची दासी संत जनाबाई हिचा पुढील अभंग प्रसिद्ध आहे :—

शालिवाहन शके अकराशे नव्वद। निवृत्ति आनंद प्रगटले ॥
त्र्याण्णवाच्या साली ज्ञानेश्वर प्रगटले। सोपान देखिले शाण्णवांत ॥
नव्याण्णवाच्या साली मुक्ताबाई देखिली। जनी म्हणे केली मात त्यांनीं ॥ तात्पर्य, शके अकराशेनव्वदमध्यें निवृत्तिनाथ, शके अकराशे त्र्याण्णवमध्यें ज्ञानदेव, शके अकराशे शहाण्णवमध्यें सोपानदेव व

शके अकराशे नव्याण्णवमध्यें मुक्ताबाई यांचा जन्म झाला. हीं चारही भावंडें संन्याशाचीं मुलें असल्यामुळें त्यांना मौंजीबंधनाचे अधिकार तत्कालीन ब्राह्मणवर्गानें दिले नाहींत. पण अशा स्थितींतच त्यांनीं आध्यात्मिक विकसनाची चरमसीमा गांठली. त्यांच्या मातापित्यांना, ते समाजबंधनाविरुद्ध वागल्यामुळें विलक्षण हाल सोसावे लागले. शेवटीं आपल्याला पावन करून घेऊन मुलांना मौंजीबंधनाचे अधिकार द्यावे म्हणून त्यांनीं आळंदीच्या ब्रह्म-वृन्दांना प्रार्थना केली. त्या ब्रह्मवृन्दानें देहान्त प्रायश्चित्ताचा निर्णय दिल्यावर ज्ञानदेवांच्या मातापित्यांनीं देहत्याग केला. त्या आधींच ज्ञानदेवांचे गुरु व वडील बंधु श्रीनिवृत्तिनाथ हे सिद्ध पुरुष झाले होते. वडिलांबरोबर तीर्थयात्रा करीत असतां उग्र तपश्चर्या करून परमपदाची प्राप्ति करून घ्यावी म्हणून श्री निवृत्तिनाथ हे गोदावरीचें उगमस्थान असलेल्या ब्रह्मगिरी पर्वतावर जाऊन त्याला प्रदक्षिणा घालूं लागले. एके दिवशीं ही प्रदक्षिणा घालीत असतां पाठीस लागलेल्या वाघाच्या भयानें त्यांनीं एका गुहेंत प्रवेश केला. तों त्या गुहेंत योगीन्द्र गोरख-नाथांचे शिष्य गहिनीनाथ यांच्या दृष्टीस ते पडले. गहिनीनाथांनीं निवृत्तींच्या अंतःकरणांतील तीव्र जिज्ञासा व त्यांचा शुद्ध भाव पाहून त्यांना आपल्या नाथपंथांत समाविष्ट करून घेतलें व 'पिंडे पिंडाचाचि ग्रासू । तो हा नाथपंथीचा दंशू ।।' ही शक्तिपातरहस्य दीक्षा देऊन त्यांना आध्यात्मिक साधनें करावयास्तव आपल्या जवळ ठेवून घेतलें. असें सांगतात कीं याच गुहेंत गहिनीनाथांच्या कृपेनें त्यांना नाथपंथाचे प्रवर्तक श्रीमत्स्येन्द्रनाथ व गोरक्षनाथ यांचें दर्शन होऊन त्यांचा उच्छिष्ट प्रसाद मिळाला. निवृत्तिनाथ जे गुहेंतून बाहेर पडले ते 'घरा येवो पा स्वर्ग । का वरी पडो वाघ । परी आत्मबुद्धीसी भंग । कदा नोहे ।।' अशा ब्राह्मी स्थितीच्या ऐश्वर्यानें संपन्न होऊनच बाहेर पडले. जीवनांतील अंतिम प्राप्तव्य गांठलेले गुरु ज्ञानदेवांना घरच्या घरींच मिळाले ते हे असे. निवृत्ति-नाथांनींच ज्ञानदेवांना शक्तिपातदीक्षा देऊन श्रीभगवान् महेशांनीं

प्रवर्तित केलेल्या नाथसंप्रदायांत घेतलें व परिपूर्ण केलें. निवृत्तिनाथांचीं सारींच भावंडें त्यांच्याच कृपाप्रसादानें पारमार्थिक पूर्णावस्थेस पोहोचलीं होतीं. आध्यात्मिक दृष्टीनें याच कारणास्तव श्रीज्ञानदेव स्वतःची ओळख पटवून देतांना स्वतःला 'महेशान्वयसंभूते' व 'श्रीनिवृत्तिनाथसुते' असें म्हणतात, व आपली गुरुपरंपरा सांगतांना ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायांत ती पुढीलप्रमाणें सांगतात :—

क्षीरसिंधु परिसरी । शक्तीचा कर्ण कुहरी ।
नेणो कैं श्री त्रिपुरारी । सांगितले जे ॥ ५१
तें क्षीरकल्लोळा आंतू । मकरोदरी गुप्तु ।
होता तयाचा हातु । पैठे जाले ॥ ५२
तो मत्स्येन्द्र सप्तशृंगी । भग्नावयवी चौरंगी ।
भेटला कीं तो सर्वांगी । संपूर्ण जाला ॥ ५३
मग समाधि अव्यत्यया । भोगावी वासना यया ।
ते मुद्रा श्रीगोरक्षराया । दिधली मीनी ॥ ५४
तेणें योगाब्जिनी सरोवरू । विषयविध्वंसैकवीरू ।
तिये पदी का सर्वेश्वरू । अभिषेकिले ॥ ५५
मग तिही तें शांभव । अद्वयानंद वैभव ।
संपादिलें सप्रभव । श्री गहिनीनाथा ॥ ५६
तेथें कळी कळितू भूतां । आला देखोनि निरुतां ।
ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥ ५७
ना आदिगुरु शंकरा-। लागौनि शिष्यपरंपरा ।
बोधाचा हा संसारा । जाला जो आमुतें ॥ ५८

—(ज्ञानेश्वरी अध्याय १८)

ज्ञानदेव कृतकार्य झाले असले तरी त्यानंतरचें प्राप्त पुरुषांचें लोकोद्धार हें एक कार्य असतें असें त्यांचें मत होतें, हें मागच्या प्रकरणांत त्यांच्या आदर्श पुरुषासंबंधीं आम्ही उल्लेखिलेल्या ओव्या ध्यानांत घेतल्या तर दिसून येईल. त्यामुळें आपण सामाजिक

संकेतांना पाळून शुद्धिपत्र घ्यावें व स्वतःचें योग्य तें स्थान मिळवून हें कार्य करावें असें त्यांना वाटूं लागलें. आळंदीच्या ब्राह्मणांनीं पैठणच्या ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र घेऊन यावयास त्यांना सांगितलें. श्रीनिवृत्तिनाथांना नामरूपातीत परब्रह्म तत्त्वाशीं एकरूप झाल्यामुळें अशा शुद्धिपत्राची व तें घेऊन पुनः कर्मबंधनांत पडण्याची कांहीं एक आवश्यकता वाटत नव्हती. पण लोकोद्धाराचें कार्य करूं इच्छिणाऱ्या ज्ञानदेवांना लोकसंग्रहाचे दृष्टीनें ही गोष्ट अत्यवश्य वाटत होती. यासंबंधीं या दोन बंधूंचा अथवा गुरु-शिष्यांचा झालेला संवाद नामदेवांनीं हृदयंगमपणें वर्णन केला आहे. ते म्हणतात :—

विधिवेद विरुद्ध संपर्क संबंध । नाही भेदाभेद स्वस्वरूपी ॥१
अविधि आचरण परम दूषण । वेदो नारायण बोलियेला ॥२
स्वधर्म अधिकार जातीपरत्व भेद । उचित तें शुद्ध ज्याचें तया ॥३
म्हणोनिया सन्ती अवश्य आचरावे । जना दाखवावें वर्तोनिया ॥४
कुळीचा कुळधर्म अवश्य पाळावा । सर्वथा न करावा अनाचार ॥५
प्रत्यवाय आहे अशास्त्री चालतां । पावन अवस्था जरी झाली ॥६
ज्ञानदेव म्हणे ऐका जी निवृत्ति । बोलिली पद्धति धर्मशास्त्री ॥७
— (नामदेव अ. ९०३)

शेवटीं ज्ञानदेवांच्या आग्रहानुसार हीं चारही भावंडें पैठणला गेलीं. तेथील ब्रह्मवृंदाच्या प्रत्ययाला ज्ञानदेवांनीं आपलें योगसामर्थ्य आणून दिलें. रेड्याकडून त्यांनीं वेद बोलविले. त्यांच्या अलौकिक सामर्थ्यानें सर्वांचे डोळे दिपले. तेथील पंडित म्हणूं लागले, 'हे परलोकीचें तारू देवत्रय यासी । प्रायश्चित्त काय यासी द्यावें कोणीं ।' या ठिकाणींच त्यांनीं आपल्या जगदुद्धाराच्या कार्याला प्रारंभ केला. त्यांचा कार्यक्रम नामदेवांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केला आहे :—

अध्यात्म ग्रंथ पहाती पैठणी । गीता संबोधनी जवळी असे ॥
भोगावती स्नान कालिका दरूशन । वेदान्त आख्यान परिमिती ॥
सांगती पुराण रात्री हरिकीर्तन । ( नामदेव अ. ९०७ )

ज्ञानदेवांचें हें लोकोद्धाराचें कार्य (१) कीर्तन, प्रवचनद्वारां उपदेश, (२) ग्रंथरचना, व (३) तीर्थयात्रेच्या मिषानें जनजागृति असें त्रिविध होतें. त्यांनीं चांगदेवाला आश्चर्यचकित करण्यासारखे जे अनेक लोकोत्तर चमत्कार केले, त्यांनींच नव्हे तर त्यांच्या अलौकिक वाक्सामर्थ्यानें सहस्रावधि लोक त्यांच्या भोवतीं गोळा होऊं लागले, व त्यांनीं त्यांच्यांत आध्यात्मिक मूल्यांचा प्रसार केला. ज्ञानदेवांनीं लिहिलेल्या सर्व ग्रंथांत त्यांच्या श्रीमद्भगवद्-गीतेवरील 'भावार्थदीपिका' या टीकेनें सर्व लोकांच्या हृदयाची विलक्षण पकड घेतली आहे. तिला तिच्या मूळच्या नांवाऐवजीं ज्ञानेश्वरी या नांवानेंच लोक ओळखतात, व वारकरी संप्रदायांत तर माउली म्हणूनच तिचा निर्देश होतो. अनुभवामृत व चांगदेव पासष्टी, अभंगांचा गाथा व हरिपाठ हें त्यांचें सर्वच वाङमय अलौकिक असलें तरी त्यांची ज्ञानेश्वरी हीच लोकांच्या हृदय-सिंहासनावर खरी विराजमान झालेली आहे. व या महनीय ग्रंथाला उद्देशूनच 'प्रबंध व्याजे जगा रक्षिले जाणा' असे उद्गार बाहेर पडले आहेत. ज्ञानदेवांनीं लोकजागृतीचें व लोकोद्धाराचें हें जें कार्य प्रारंभ केलें त्याचें साधन जें त्यांचें वाङमय तें जगांतील अक्षरवाङमयाच्या मूर्धस्थानीं शोभण्यासारखें आहे.

## ज्ञानदेवांचा आत्मप्रत्यय

योगी, ज्ञानी, भक्त, सिद्ध अशा एकाहून एक अलौकिक भूमिकेवर अग्रस्थानीं विराजमान होणारे ज्ञानदेव रससिद्ध कवीश्वरांचेहि मुकुटमणि होते. त्यांच्याइतका प्रत्ययपूर्ण भूमिकेचा, सौंदर्य-सृष्टीचा निर्माता, शब्दशिल्पकारांच्या परंपरेंत दुसरा सहसा उपलब्ध होण्याची शक्यता नाहीं. प्रतिभासंपन्न मनुष्याला येणारी सौंदर्याची अनुभूति व्यक्त करावयास कोणतें तरी माध्यम लागतें. कोणी ती रंग व छाया यांच्या मीलनांतून व्यक्त करतो, कोणी ती पाषाणांतून व्यक्त करतो, तर कोणी ती नादाच्या अथवा शब्दांच्या साह्यानें व्यक्त करतो. रंग व छाया यांच्या साह्यानें

या सौंदर्यप्रत्ययाचा आविष्कार करणाऱ्याला चित्रकार असें म्हणतात. शिलाखंडांतून हा आविष्कार करणाऱ्याला शिल्पकार असें म्हणतात. तर शब्दांच्या माध्यमाद्वारें हा आविष्कार करणाऱ्याला रससिद्ध कवीश्वर असें म्हणतात. पण या सर्व माध्यमांत नादाचें माध्यम हें अन्य माध्यमांपेक्षां अधिक सामर्थ्यशाली आहे असा स्वतःचा अभिप्राय सर हेन्री थॉमस यांनीं आपल्या 'The Living World of Philosophy' या ग्रंथांत दिला आहे. ते म्हणतात —

The writer is an artist in words, just as the musician is an artist in tones, and the painter in colours and lines. Words however, are more difficult to use than tones and colours ..... yet in spite of this drawback, the artist in words has an advantage over his fellow ... artists in other fields. For, a word produces not only a sound but an image and an image and thought. The skilful artist in words can thus be a musician and a painter and a writer in one. A good poem sings and paints and philosophizes. (Page 209)

अशा दिव्य शब्दशिल्पकारांचे अग्रणी म्हणून ज्ञानदेवांचें नांव विश्वाच्या साहित्यांत चिरंतन झालें आहे. संस्कृत भाषेंतून या तऱ्हेचें विलक्षण शब्दशिल्प दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या श्रेष्ठ कृति आहेत; पण त्यांत आश्चर्य नाहीं. कारण लोकोत्तर प्रतिभेच्या कवीला आवश्यक तें उत्कृष्टांतले उत्कृष्ट शब्द पुरविणारें संस्कृतचें भांडागार तसेंच समृद्ध आहे. पण त्या मानानें तितकें वैभव नसलेल्या मराठींतून ज्ञानदेवांनीं हा हृदयंगम चमत्कार निर्माण केला हें त्यांचें कसब केवळ अद्वितीय होय. कुठल्याहि शलाका परीक्षेंत सर्व दृष्टींनीं अद्वितीय ठरावी अशी त्यांची साहित्यसृष्टि आहे. उत्कृष्टांतल्या उत्कृष्ट कृतींत सुद्धां कांहीं निकृष्ट भाग असतोच. पण ज्ञानदेवींत असा भाग शोधूनहि सांपडणार नाहीं. सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, अशी शब्दसृष्टि निर्माण करण्याचें विलक्षण सामर्थ्य आपल्या ठिकाणीं आहे असा ज्ञानेश्वरांना

परिपूर्ण आत्मप्रत्यय आहे. त्यांचा तो आत्मप्रत्यय पाहून, तो परिपूर्ण झालेला अनुभवून, चौदा पंधरा वर्षांची त्यांची मूर्ति डोळ्यांसमोर आणली तर मन स्तिमित व मुग्ध झाल्याविना रहात नाहीं. आपण जी सृष्टि निर्माण करणार तिचें स्वरूप सांगतांना ते म्हणतात :—

माझा मराठाचि बोलु कौतुके । परि अमृतातेहि पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।। १४
जिथे कोवळिकेचेनि पाडे । दिसती नादीचे रंग थोडे ।
वेधे परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ।। १५
ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा ।
बोले इंद्रिया लागे कळंभा । एकमेकां ।। १६
सहजे शब्दु तरी विषो श्रवणाचा । परि रसना म्हणे हा रसु आमुचा ।
घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल ।। १७
नवल बोलतीये रेखेची वाहणी । देखतां डोळ्याही पुरों लागे धणी ।
ते म्हणती उघडली खाणी रूपाची हे ।। १८
जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनचि धांवे बाहिरे ।
बोलु भुजाही आविष्करे । आलिंगावया ।। १९
ऐशी इंद्रियें आपुलालिया भावी । झोंबती तो सरिसेंपणेंचि बुझावी ।
जैसा एकला जग चेववी । सहस्रकरू ।। २०
तैसे शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण ।
पाहातया भावज्ञां फावती गुण । चिंतामणीचे ।। २१
हे असोतु या बोलाची ताटें भली । वरी कैवल्यरसे वोगरली ।
ही प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासी ।। २२
आता आत्मप्रभा नीच नवी । तेचि करूनि ठाणदिवी ।
जो इंद्रियांते चोरूनि जेवी । तयासीचि फावे ।। २३
येथ श्रवणाचेनि पांगे-। वीण श्रोतया व्हावया लागे ।
हे मनाचेनि निजांगे । भोगिजे गा ।। २४

ज्ञानदेवांच्या या विलक्षण कलेचें श्री. डब्ल्यू. बी. पटवर्धन यांनीं विल्सन फायलॉलॉजिकल लेक्चर्स सीरिजमध्यें दिलेल्या

व्याख्यानांत इतकें उत्कृष्ट वर्णन केलेलें आहे कीं, कै. रामभाऊ रानडे यांनीं आपल्या 'Mysticism in Maharashtra' या विख्यात ग्रंथांत त्याचें बुद्धया अवतरण घेतलें आहे. तें अवतरण मननीय आहे. पटवर्धन म्हणतात :--

'With Jnanadeva, the ovi trips, it gallops, it dances, it whirls, it ambels, it trots, it runs, it takes long leaps or short jumps, it halts or sweeps along, evolves a hundred and one graces of movement at the master's command. In the music of sound too it reveals a mysterious capacity of manifold evolution. The thrill, the quiver, the bellow, the murmur, the grumble, in fact, every shade of sound it wields when occasion demands. It is an instrument that he has only to touch, and it responds to any key high or low and to any note and tune.'

'Unparralleled in Marathi literature, Jnaneshwari is so exquisite, so beautiful, so highly poetic in its metaphors and comparisons, similes and analogical illustrations, so perspicuous and lucid in style, so lofty in its flights, so sublime in tone, so melodious in word music, so original in its concepts, so pure in taste ..... that notwithstanding the profundity, the recondite nature of the subject, and the inevitable limitations attendant upon the circumstances that the author's main object was to make the original intelligible rather than add any thing new, the reader is simply fascinated, floats rapturously on the crest of the flow, and is lost in the candence of rhythm and the sweet insinuating harmonies till all is thanks-giving and thought is not.

रससिद्ध कवीश्वरांचे अग्रणी श्रीज्ञानदेव यांनीं रसराज शृंगारा-ऐवजीं शान्त हा आपला मुख्य रस कल्पून

'सहजे मलयानिळु मंदु सुगंधु । तया अमृताचा होय स्वादु ।
आणि तेथेंचि जोडे नादु । जरी दैवगत्या ॥

तरी स्पर्शे सर्वांग निववी । स्वादे जिह्वेते नाचवी ।
तेवीचि कानांकरवी । म्हणवी बापु माझा ।। '

असें काव्य निर्माण केलें यांतच त्यांचें महाकवित्व सिद्ध होणारें आहे. आपल्या वर्ण्य रसासंबंधीं लिहितांना ते म्हणतात :--

' जेथ शांताचिया घरा । अद्भुत आला पाहुणेरा ।
आणि येरांही रसां पांतिकरां । जाहला मानु ।। '

' अहो वधुवरांचिये मिळणी । जैशी वराडियांही लुगडी लेणीं ।
तैसे देशियेचां एकासनीं । मिरविलें रस ।। '

श्रीज्ञानदेवांनीं आपल्या कलेचा सर्वोत्कृष्ट आविष्कार ज्ञानेश्वरींत केलेला आहे. इतक्या अमोघ सामर्थ्यानिशीं पुढें आलेल्या ज्ञानदेवांच्या ठिकाणीं मानवताप्रेम व विश्वात्मवादी धारणा स्वत:सिद्ध होती. त्यांनीं केलेल्या कार्याला समर्थ अशी भूमिका त्यांच्या व्यक्तिमत्त्वांतच सिद्ध होती.

## ज्ञानदेवांची योग्यता व प्रवृत्ति

श्रीज्ञानदेव हे नाथ संप्रदायाचे होते. त्यांची गुरुपरंपरा मागेंच उल्लेखिली आहे. तेच आपल्या एका अभंगांत म्हणतात:–

' जगामाजी श्रेष्ठ संप्रदाया नाना । कीर्ति त्रिभुवनामाजी फार ।।
आम्ही एक दीन जाण नाथपंथी । नीचाहुनी आथी अतिनीच ।।

या नाथपंथाचा व महाराष्ट्राचा संबंध ज्ञानदेवपूर्व कालापासून तर होताच; पण प्रत्यक्ष ज्ञानदेवांच्या वंशाशींहि ज्ञानदेवांच्या जन्मापूर्वीपासूनच त्यांचा संबंध येतो. ज्ञानदेवांचे पणजे त्र्यंबकपंत यांना प्रत्यक्ष 'योगाब्जिनी सरोवरु' श्री गोरखनाथांनीं कृतार्थ केलें होतें व ज्ञानदेवांचे आजे गोविंदपंत आणि आजी मीराबाई यांना गोरखांचे शिष्य श्रीगहिनीनाथ यांचा अनुग्रह होता. हा पंथ संपूर्ण भारतवर्षांत पसरलेला असून साध्या गृहास्थाश्रमी माणसांपासून तर महान् योग्यांपर्यंत त्याच्या अनुयायांत शेंकडो लोक आढळतात. ज्ञानदेवांचें घराणें हें एक प्रकारें नाथपंथी होतें

असें म्हटलें तरी चालेल. या पंथाला सिद्ध मत, सिद्ध मार्ग, योग-बीज, सिद्ध कौल संप्रदाय इत्यादि विविध नांवें आहेत. त्याचे मूळ प्रवर्तक मत्स्येंद्रनाथ हे असले तरी त्याचा खरा प्रभाव श्रीगोरख-नाथांनीं वाढविला. विक्रम संवताच्या दहाव्या शतकांत गोरक्ष-नाथांचा प्रादुर्भाव झाला. प. पू. सोनोपंत दांडेकर यांनीं आपल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत असें म्हटलें आहे कीं, 'श्री शंकरा-चार्यांनंतर इतके प्रभावशाली व महिमान्वित महापुरुष भारत वर्षांत अजूनपर्यंत कोणी अवतरले नाहींत असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. गोरक्षनाथ आपल्या युगाचे सर्वांत श्रेष्ठ धार्मिक पुढारी होते."

— (ज्ञानेश्वरी प्रस्तावना पृष्ठ ४३)

श्रीज्ञानेश्वरांच्या वाङमयावर नाथपंथाची छाया असणें अर्थातच स्वाभाविक आहे. नाथ म्हणजे योग, भक्ति व ज्ञान या तिन्हींत परिपूर्णता मिळविलेला पुरुष. ज्ञानदेवांचे अद्वयानंद वैभव म्हणजे अर्थात् नाथपंथाचें तत्त्वज्ञान होय हें उघड आहे. नाथ-पंथाचें तत्त्वज्ञान खास त्याच्या प्रवर्तकाच्याच शब्दांत पाहणें या दृष्टीनें उचित होईल. आपल्या मोक्षाच्या कल्पनेसंबंधीं 'अमरौघ-शासनम्' नांवाच्या ग्रंथांत श्रीगोरखनाथ म्हणतात :—

'अहो मूर्खता लोकस्य । केचिद्वदन्ति शुभाशुभकर्मविच्छेदनं मोक्षः। केचिद्वदन्ति वेदपाठाश्रितो मोक्षः। केचिद्वदन्ति निरालम्बन-लक्षणो मोक्षः । केचिद्वदन्ति ध्यानकलाकरणसंबद्धप्रयोगसंभवेन रूपबिन्दुनादचैतन्यपिण्डाकाशलक्षणो मोक्षः । केचिद्वदन्ति पूजा-पूजकमद्यमांसादिसुरतप्रसंगाननुलक्षणो मोक्षः । केचिद्वदन्ति मूलकरोल्लसितकुण्डलसंचारलक्षणो मोक्षः । केचिद्वदन्ति सुसमद-विनिपातलक्षणो मोक्षः । इत्येवंविधः भावनाश्रितलक्षणो मोक्षो न भवति । अथ मोक्षपदं कथ्यते यत्र सहजसमाधिक्रमेण मनसा मनः समालोक्यते स एव मोक्षः । (पृ. ८-९)

सहजसमाधीच्या मार्गानें मनानेंच अमनीभाव साधणें हा मोक्ष होय. हें सांगतांना गोरखनाथांनीं नाथपंथाच्या योग या

साधनामार्गाचाहि निर्देश केला आहे. जें ब्रह्मांडांत आहे तें सूक्ष्म प्रमाणांत पिण्डांत असल्यामुळें पिण्डांतील कुण्डलिनी शक्ति जागृत करून शिवशक्तीचें ऐक्य साधणें हें नाथपंथाचें साधनस्वरूप आहे. Gorakhnath and Medieval Hindu Mysticism या ग्रंथांत डॉ. मोहनसिंग यांनीं गोरक्षमताचें थोडक्यांत सार दिलेलें असून आपल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत प. पू. दांडेकर यांनीं त्याचा पुढीलप्रमाणें मराठींत भावार्थ सांगितलेला आहे :—

"मिथ्या असत् जीवनाचा त्याग करून शाश्वत जीवन जगणें हें गोरखपंथाचें ध्येय आहे. आणि हें त्याच वेळेला शक्य आहे कीं, ज्या वेळेला साधक मन, प्राण व काम हा जो अशुद्ध वर्ग आहे त्याच्यावर ताबा मिळवून शुद्ध आत्मस्वरूप होऊन राहतो. हा जो अविद्या वर्ग आहे त्याला जिंकण्यासाठीं या प्रत्येकाची मदत तर लागतेच. प्राणायामानें काम जिंकले जातात. मनाला जिंकण्याचा उपाय म्हणजे ध्यान. मनाची वृत्तिद्वारां बाहेर धावण्याची जी संवय आहे तिचा संयम, व विचारानें अंतर्मुखता प्राप्त करून घेऊन आत्मशोधन, यायोगें मनच मनावर ताबा मिळवितें व अमनीभावाजवळ येतें. हा संयम सहज मार्गानेंच करणें सुखकर. या अभ्यासमार्गानें अमनीभाव प्राप्त होऊं शकतो. त्या ठिकाणीं कामत्रयीचा प्रवेश नाहीं. ही स्थिति म्हणजे शून्य नव्हे. ही स्थिति सच्चिदानंदानें परिपूर्ण भावरूप अशी आहे. या सच्चिदानंदालाच शब्द, रस, ज्योति असें नांव आहे. जागृति गिळून जागणें, निद्रैपरौते निजणें, मनानें मनाला गिळून राहणें अशी ही स्थिति आहे.

"केवल कुंभकानें प्राणावर जय मिळवितां येतो. गुरूनें सांगितलेल्या मंत्राचा (अजपा) जप केला कीं काम आवरला जातो. विषय बाहेर दवडून मनाला मोकळें रिकामें करण्यानें व ध्यानानें मन ताब्यांत येतें. स्पृहा मनांतच नाहींशी झाली, मनामाजी मन आलिंगू सरले, द्वंद्वातीत अवस्था प्राप्त झाली कीं समदृष्टित्व प्राप्त होतें, व या भावालाच असंप्रज्ञात समाधि, कैवल्य, सहज समाधि, तूर्यावस्था, महाशून्य अशीं वेगवेगळीं नांवें आहेत. हा मार्ग म्हणजे

नादानुसंधानाचा मार्ग आहे. यास गुरूपदिष्ट नाममंत्राचें शांत ध्यान करणें, नादानुसंधान हा मार्ग म्हणतात व यानें आत्म्यांत समरस होणें हें ध्येय आहे. हाच आत्मयोग. हाच अंतर्मार्ग. याच-करितां बाह्य आसनादिक करावयाचे असतात. कुंभारीबोवा म्हणतात त्याप्रमाणें हाच सिद्धान्त योग.

"या योगास ब्रह्मचर्याची आवश्यकता खरी; पण योग्य संयम पाळून गृहस्थाश्रमांतहि हा करतां येतो. भिक्षुवृत्ति अथवा संन्यास याची आवश्यकता आहे असें नाहीं. बौद्धांसारखी आत्मपीडा यांत नाहीं. तांत्रिक मार्गांतील भोगातिशय यांत नाहीं. गोरक्षनाथांचा मार्ग म्हणजे उपनिषदांनीं सांगितलेला राजयोगच आहे असें म्हणा-वयास हरकत नाहीं. याचा सर्वांना अधिकार आहे. याच्या साधकास नीतियुक्त आचार व वैराग्य यांची गरज आहे. इतर मार्गांनीं जें साध्य होतें तें खऱ्या गुरूच्या शब्दानें साधकास प्राप्त होतें. चमत्कार करण्याची शक्ति—ज्यांना सिद्धि म्हणतात—मग त्या नऊ अथवा बारा प्राप्त होणें, हें योगाचें ध्येय नव्हे. हें योगमार्गांतील विलोभन, विघ्न आहे. साधकानें याच्या पलीकडे जाणें अवश्य आहे.

"तंत्र, हठ अथवा रसशास्त्र हीं शरीर अमर करण्याचा प्रयत्न करणारीं शास्त्रें आहेत. गोरक्षनाथांचा पंथ हा आत्म्याचें अमरत्व अनुभवणें, नादमधूचा आनंद भोगणें व शिवशक्तीच्या सामरस्याचा आनंद भोगणें याकरितां आहे आत्म्याचें मंदिर जें शरीर त्याचें नुसतें शोषण हें त्याचें ध्येय नव्हे. आत्म्याचें अमरत्व भोगणें हेंच त्या मार्गाचें उद्दिष्ट आहे."

नाथपंथाच्या या कैवल्योपासनेंतील वैशिष्ट्यपूर्ण मार्ग सोडला तर शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानांत व नाथपंथाच्या अद्वयानंद वैभवांत तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें कांहींहि फरक नाहीं. पण हल्लीं ज्ञानदेवांचें तत्त्वज्ञान कोणतें यासंबंधीं अनेक वर्षांपासून मोठें वादंग माजून राहिलें असून कै. हुपरीकर, कै पांडुरंग शर्मा, डॉ. पेंडसे, ज्ञानदेवोपासक श्री. गुलाबराव महाराज, वेदान्तकेसरी श्री. बाबाजी महाराज पंडित आदि अतिरथी महारथी निरनिराळ्या

दृष्टिकोणांतून या वातावरणांत उतरले असल्याचें आढळून येईल. ज्ञानदेव चिद्विलास असें जगाला म्हणून 'असीकी वस्तुप्रभा' असें त्याचें वर्णन करतात. ते विचारतात 'विभाति यस्य भासा । सर्व-मिदं हा ऐसा । श्रुति काय वायसा । ढेकर देती ।'

श्रीमदाद्यशंकराचार्यांनीं निर्विकल्पानुभवाच्या भूमिकेवरून 'यस्यैव स्फुरणं सदात्मकमसत्कल्पार्थकं भासते' या व एतत्सदृश वचनांनीं हेंच दाखविलें आहे. श्री दक्षिणामूर्ति स्तोत्रांत ते म्हणतात :—

भूरम्भांस्यनलोऽनिलोऽम्बरमहर्नाथो हिमांशुः पुमान् ।
इत्याभाति चराचरात्मकमिदं यस्यैव मूर्त्यष्टकम् ।
नान्यत्किञ्चन विद्यते विमृशतां यस्मात्परस्माद्विभोः ।
तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये ।।

श्री ज्ञानेश्वरांप्रमाणें श्रीमदाचार्य हे चिद्विलासवादी आहेत व आत्मसत्तावादी आहेत हें यावरून दिसून येईल. ज्ञानदेवांनीं हा अनुभव 'किंबहुना चराचर आपण जाहला' ह्या शब्दांत व्यक्त केला आहे. श्रीमदाचार्य आपलें म्हणणें लोकांना समजावून सांगण्या-साठीं मायावादाचा अंगीकार करतात. ज्ञानदेवहि मायावाद मानतात असें ज्ञानेश्वरीचें वरवर निरीक्षण केलें तरी आढळून येईल. त्यांच्या पुढील ओव्याच पहा :—

हे उपजे आणि नाशे । तें मायावशे दिसे ।
येऱ्हवीं तत्त्वता वस्तु जे असे । ते अविनाशचि ।।५
जैसें पवनें तोय हालविलें । आणि तरंगाकार जाहलें ।
तरी कवण कें जन्मलें । म्हणों ये तेथ ।।६
तेंचि वायूचें स्फुरण ठेले । आणि उदक सहज सपाटलें ।
तरी आतां काय निमालें । विचारी पां ।।७

—(अध्याय २ रा श्लो १२)

येर मध्ये जें प्रतिभासे । तें निद्रिता स्वप्न जैसे ।
तैसा हा आकारू मायावशें । सत्स्वरूपी ।

ना तरी पवनें स्पर्शिलें नीर । पढियासे तरंगाकार ।
का परापेक्षां अलंकार- । व्यक्ति कनकी ॥६७
तैसे सकळ हें मूर्त । जाण पां मायाकारित ।
जैसे आकाशी बिंबत । अभ्रपटळ ॥६८
तैसे आदीचि जें नाहीं । तयालागी तूं रूदसि कायी ।
तूं अवीट तें पाहीं । चैतन्य एक ।६९॥

--(अ. २. श्लो. २८)

ज्ञानदेव व श्रीमदाचार्य यांच्यांतील मोठा भेद म्हणून श्रीमदाचार्य हे केवळ साधन म्हणून भक्तीला मानतात तर ज्ञानदेव हे

अथवा हें विश्वचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाहला ॥

असे ज्ञाननिष्ठ असूनहि शिवाय--

मग येतुलेयावरी पार्था । माझिया चरणी निष्ठा ।
तयातें मी माथां । मुकुट करी ॥

असें म्हणणारे ज्ञानोत्तर भक्तिवादी आहेत.

चहूं पुरुषार्थां श्री । भक्ति जैसी ॥

असें तर त्यांनींच स्पष्ट म्हटलें आहे. पण आचार्य सुद्धां ज्ञानोत्तर भक्तिमार्गी आहेत. आपल्या षट्पदींत प्रबोध सुधाकरांत व अनेक प्रकरण ग्रंथांत आचार्यांनीं जे उद्गार काढलेले आहेत, त्यांवरून हें दिसून येईल. उदाहरण पहावयाचें असलें तर त्यांचे कांहीं उद्गारच पहा :--

सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ।
सामुद्रो हि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः ॥
भूतेष्वन्तर्यामी ज्ञानमयः सच्चिदानंदः ।
प्रकृतेः परः परात्मा यदुकुलतिलकः स एवाथम् ॥

जरी आपल्यांतील भेद नष्ट झाला असला तरी, हे नाथ, मी तुझा आहे. तूं माझा नाहींस. तरंग समुद्राचा असतो. समुद्र

तरंगाचा नसतो. जो सर्व प्राणिमात्रांच्या हृदयांत अंतर्यामी स्वरूपानें राहतो तो ज्ञानमय, सच्चिदानंद, प्रकृतीच्या पलीकडे राहणारा परमात्मा म्हणजेच हा यदुकुलतिलक श्रीकृष्ण होय.' उत्कट भक्तीचें लक्षण करतांना श्रीमदाचार्य म्हणतात :--

अंकोलं निजबीजसंततिरयस्कान्तोपलं सूचिका ।
साध्वी नैजविभुं लता क्षितिरुहं सिंधुः सरिद्वल्लभम् ॥
प्राप्नोतीह यथा तथा पशुपतेः पादारविन्दद्वयम् ।
चेतोवृत्तिरुपेत्य तिष्ठति सदा सा भक्तिरित्युच्यते ॥

तात्पर्य; श्रीमदाचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानांत व नाथपंथीयांच्या आणि श्रीज्ञानदेवांच्या अद्वयानंदवैभवांत तत्त्वतः कांहीं फरक नाहीं. नाथपंथाचें इतर पंथाहूनचें खरें वैशिष्टच ज्ञानदेवांनीं स्वतःच पुढीलप्रमाणें उल्लेखिलेलें आहे. 'पिंडें पिंडाचाचि ग्रासू। तो हा नाथपंथीचा दंशु ॥' हें तें रहस्य होय. पिंडे पिंडाचा ग्रास करणें म्हणजे शक्तिपाताच्या अथवा शक्तिप्रदानाच्या मार्गानें शिष्याच्या शरीरांतील कुंडलिनी शक्ति जागृत करून त्याला आपल्या सामर्थ्यानें गुरूनें आध्यात्मिक अनुभूति देणें होय. या शक्तिपाताचे अनेक प्रकार असतात. स्पर्शदीक्षा, दृष्टिदीक्षा, वेधदीक्षा इत्यादि विविध प्रकारांनीं, कुठें तर नुसतें दर्शन, शब्द अथवा संकल्पानेंहि हा शक्तिपात सामर्थ्यशाली सिद्ध आपल्या शिष्यांचे ठिकाणीं करतात. कुलार्णव तंत्रांत या शक्तिपाताचें स्वरूप पुढीलप्रमाणें वर्णन केलेलें आहे :--

'यथा पक्षी स्वपक्षाभ्यां शिशून्संवर्धयेत् शनैः ।
स्पर्शदीक्षोपदेशश्च तादृशः कथितः प्रिये ॥
स्वापत्यानि यथा मत्स्यो वीक्षणेनैव पोषयेत् ।
दृग्भ्यां दीक्षोपदेशश्च तादृशः परमेश्वरी ॥
यथा कूर्मः स्वतनयान्ध्यानमात्रेण पोषयेत् ।
वैधदीक्षोपदेशश्च मानुषश्च तथाविधिः ॥
शक्तिपातानुसारेण शिष्योऽनुग्रहमर्हति ।
यत्र शक्तिर्न पतति तत्र सिद्धिर्न जायते ॥

गुरोरालोकमात्रेण स्पर्शात्संभाषणादपि ।
सद्यः संज्ञा भवेज्जन्तोर्दीक्षा सा शांभवी मता ॥
दर्शनात्स्पर्शनात् शब्दात् कृपया शिष्यदेहके ।
जनयेद्यः समावेशं शांभवं स हिः देशिकः ॥

(ज्याप्रमाणें पक्षी आपल्या पंखाखालीं आपल्या छोट्या पिलांना घेऊन हळूहळू त्यांचें संवर्धन करतो त्याप्रमाणें स्पर्शदीक्षा असते. या दीक्षेंत स्पर्शाच्या साहाय्यानें गुरु शिष्यशरीरांत शक्तिसंचार करतो. ज्याप्रमाणें मत्स्य आपल्या पिलांची वाढ व पोषण केवळ स्वतःच्या दृष्टिपातानें करतो त्याप्रमाणें दृष्टीनें जेथें गुरु शक्तिसंचार घडवितो त्याला दृष्टिदीक्षा म्हणतात. ज्याप्रमाणें कासव केवळ संकल्पमात्रानें आपल्या अपत्यांचें पोषण करतो त्याप्रमाणें केवळ संकल्पमात्रानें शक्तिसंचार घडविणाऱ्या दीक्षेस वेधदीक्षा असें म्हणतात. गुरु जसजसा शक्तिपात करील तसतसा शिष्याच्या जीवनांत बदल होत जातो. जेथें जेथें गुरु असा शक्तिपात अथवा शक्तिसंचार करीत नाहींत तेथें शिष्याला आध्यात्मिक सिद्धि लाभत नाहीं. गुरुच्या केवळ पाहण्यानें, स्पर्शानें, संभाषणानें जेथें असा शक्तिसंचार होतो अथवा शब्द आणि नुसती कृपा यानेंहि जेथें असा शक्तिसंचार होतो त्या दीक्षेला शांभवी दीक्षा असें म्हणतात. )

आधुनिक काळीं सुद्धां अशा शक्तिपाताचीं विलक्षण उदाहरणें दृष्टोत्पत्तीस येतात. श्रीमद्रामकृष्ण परमहंसांनीं श्रीमद्विवेकानंदांची या शक्तिपातदीक्षेनें जी विशिष्ट अवस्था केली तिचें वर्णन करतांना श्रीविवेकानंद म्हणतात :—

‘But in the twinkling of an eye he placed his right foot on my body. The touch at once gave rise to a novel experience within me. With my eyes wide open, I saw the walls and everything in the room, whirled rapidly and vanished into nought and the whole universe together with my individuality was about to merge in an all encompassing mysterious void! I was terribly

frightened and thought that I was facing Death, for the loss of individuality meant nothing short of that. Unable to control myself I cried out, 'what is this that you are doing to me? I have my parents at home!' He laughed aloud at this and stroking my chest said, 'All right, let it rest now. Everything will come in time!' The wonder of it was that no sooner had he said this than that strange experience of mine vanished. I was myself again and found everything within and without the room as it had been before.'

— (Life of Ramkrishna Page 376-377)

श्रीज्ञानदेवांचा शांभव नाथपंथ तो हाच होय. ज्ञानेश्वरींतील हठयोग या विशिष्ट धोरणानेंच वर्णिलेला आहे. तेथें क्रियायोग नाहींत. सर्व कार्य गुरुकृपेनें आपोआप व्हावयाचें आहे. या मार्गांत गुरु सन्निध नसले तरी दूर अंतरावरून शिष्याच्या शरीरावर ताबा चालवितां येईल अशा समर्थ गुरूची आवश्यकता आहे. या विशिष्ट मार्गानें ज्ञानदेवांना 'सप्रभव अद्वयानंद वैभव' निवृत्तिनाथाकडून प्राप्त झालें. त्यांच्या मनावर या आपल्या विशिष्ट सिद्धिमार्गाचा इतका विलक्षण पगडा आहे कीं मूळ गीतेंत भगवंतांनीं अर्जुनाला केवळ उपदेश केल्याचें वर्णन असूनहि ज्ञानदेवांनीं स्पर्शदीक्षेनें श्रीकृष्णांनीं अर्जुनांत असा शक्तिसंचार घडविल्याचें वर्णन गीतोपदेशाच्या शेवटीं केलेलें आहे. ते म्हणतात :—

'ऐसे स्वरूप रूपसें। सर्व दृष्टि डोळसे।
सर्व देशनिवासें। बोलिलें श्रीकृष्णें ॥१७
मग सांवळा सकंकणु। बाहु पसरोनि दक्षिणु।
आलिंगिला स्वशरणु। भक्तराजु तो ॥१८
न पवतां जयातें। काखे सुनि बुद्धीतें।
बोलणें मागौतें। वोसरलें ॥१९
ऐसे जें कांहीं एक। बोला बुद्धिसीही अटक।
तें द्यावया मिख। खेवाचें केलें ॥२०

हृदया हृदय येक जालें । ये हृदयींचें ते हृदयीं घातलें ।
द्वैत न मोडितां केलें । आपणाऐसें अर्जुना ।।२१
दीपें दीप लाविला । तैसा परिष्वंगु तो जाला ।
द्वैत न मोडितां केला । आपण पें पार्थु ।।२२

याप्रमाणें ज्ञानदेव हे अध्यात्माच्या चरमसीमेवर केवळ ज्ञानाच्याच नव्हे तर अनुभूतीच्याहि दृष्टीनें पोहोचलेले प्राप्त पुरुष होते. पण ज्ञानदेवांची प्रवृत्ति प्राप्त स्थितींतला आनंद केवळ स्वतःच भोगणें एवढीच नव्हती, तर समाजाचें विकसन घडवून आणणें आणि कर्तव्यकर्माची दीक्षा सर्वांना देऊन, कर्तव्यासाठीं कर्तव्य या स्वाभाविक प्रेरणेचे कर्मयोगी उत्पन्न करणें ही होती. पूर्ण पुरुषासंबंधींची व त्यानें करावयाच्या कार्यासंबंधींची त्यांची धारणा त्यांच्याच शब्दांत पुढीलप्रमाणें सांगतां येईल :—

जो अंतरी दृढ । परमात्मरूपी गूढ ।
बाह्यतरी रूढ । लौकिक जैसा ।।
तैसा संसर्गामाजी असे । सकळासारिखे दिसे ।
जैसे तोय संगे आभासे । भानुबिंब ।।
तैसे सामान्यत्वे पाहिजे । तरी साधारणचि देखिजे ।
येरव्ही निर्धारिता नेणिजे । सोय जयाची ।।
मार्गाधारें वर्तावे । विश्व हे मोहरें लावावें ।
अलौकिक नोहावें । लोकाप्रति ।।
येथ वडील जे जे करिति । तयां नांव धर्म ठेविती ।
तेचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ।।
हें ऐसें असें स्वभावें । म्हणौनि कर्म न सांडावें ।
विशेषें आचरावें । लागे संतीं ।।
तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा ।
पूजा होय अपारा । तोषा लागी ।।
परिस पां सव्यसाची । मूर्ति लाहोनि देहाची ।
खंती करिती कर्माची । ते गांवढे गा ।।

ज्ञानदेवांच्या या उद्गारांवरून व मागें उल्लेखिलेल्या निवृत्तिनाथांना मौंजीबंधनासंबंधांत त्यांनीं दिलेल्या उत्तरावरून त्यांना विशिष्ट पद्धतीनें लोकांना मार्गी लावावयाचें होतें, हें स्पष्ट आहे. तात्पर्य, लोकोद्धारणकार्य हा त्यांचा स्थायी भाव होता. त्यासाठीं आवश्यक ती अलौकिक योग्यता त्यांनीं प्राप्त करून घेतलेली होती, व त्यासाठीं आवश्यक तें सामर्थ्यशाली व हृदयाचा ठाव घेणारें उत्स्फूर्त सारस्वताचे जनक होण्याचें स्वयंसिद्ध सामर्थ्य त्यांच्यापाशीं होतें. अशा या पुरुषानें नाममंत्राचा व भक्तिमार्गाचा प्रसार महाराष्ट्रांत करून देवधर्मनिष्ठा उत्पन्न केली. ही देवधर्मनिष्ठा उत्पन्न करतांना 'मार्गाधारे वर्तावें' व 'विश्व हें मोहरें लावावें' हा त्यांचा बाणा होता. याचा अर्थ वैदिक अथवा हिंदू राष्ट्राची निष्ठाशून्यता घालवून त्यांना दास्यामुळें जीवनमरणाच्या संकटांत सांपडलेली राष्ट्रीय अस्मिता दृढतेनें पुनर्जागृत करावयाची होती असाच होतो.

## ज्ञानदेवांचें कार्य

आपल्या वाङ्मयनिर्मितीच्या व भागवतधर्माच्या प्रसाराच्या या कार्याचें कारण स्वत: श्रीज्ञानदेवांनीं पुढीलप्रमाणें उल्लेखिलें आहे :—

तैसा प्रबंधु हा श्रवणीं । लागतखेंवो समाधि आणी ।
ऐकिलि याहि वाखाणी । काय व्यसन न लावी ।।४३
तैसे अध्यात्मशास्त्री इये । अंतरंगचि अधिकारिये ।
परी लोकु वाक्चातुर्ये । होईल सुखिया ।। ४९
तैसें श्रीनिवृत्तिनाथांचें । गौरव आहे जी साचें ।
ग्रंथु नोहे हें कृपेचें । वैभव तये ।। ५०
तेणें कळि कळितू भूता । आला देखोनि निरुता ।
ते आज्ञा हा संसारा । जाला जो आमुते ।। ५८
तो हा तूं घेऊनि आघवा । कळी गिळितयां जिवा ।
सर्व प्रकारी धावा । करी पां वेगी ।। ५९

आधींच तंव तो कृपाळू । वरी गुरु आज्ञेचा बोलू ।
जाला जैसा वर्षाकाळू । खवळणें मेघा ।। ६०
एवं गुरुकृपें लाधलें । समाधि धन जें आपुलें ।
तें ग्रंथें बोधौनि दिधलें । गोसावी मज ।। ६३
वांचूनि पढे ना वाची । ना सेवाही जाणे स्वामीची ।
ऐसिया मज ग्रंथाची । योग्यता कें असे ।। ६४
परि साचचि गुरुनाथें । निमित्त करूनि मातें ।
प्रबंध व्याजें जगातें । रक्षिलें जाणा ।। ६५

—(अ. १८ श्लो. ७८ ओव्या १७४४ ते १७६५)

श्रीज्ञानदेवांनीं गुरूची आज्ञा म्हणून व संप्रदायाचें परंपरा-प्राप्त कर्तव्य म्हणून 'कळि गिळितया जीवा' वांचवायला, 'कळि कळितू भूतां' पाहून हृदय भरून आल्यामुळें अशा लोकांच्या रक्षणासाठीं आपल्या कार्याची उभारणी केली. ज्या कलियुगाच्या प्रभावाची त्यांना एवढी खंत वाटली तें केवळ पौराणिक कलि-युग नव्हतें, तर प्रत्यक्षच ते अनुभवीत असलेल्या युगासंबंधीं 'न देखवे डोळा ऐसा हा आकांत।' अशी त्यांच्या मनाची स्थिति झालेली होती. आतां हें कलियुग म्हणजे काय हा अलीकडे निष्कारणच विवाद्य प्रश्न होऊन बसलेला आहे. डॉ. कोलते प्रभृति लोकांचें असें म्हणणें आहे कीं, हें कलियुग म्हणजे त्या वेळीं महाराष्ट्रांत प्रभावशाली होत असलेला श्रीचक्रधराचा मान-भाव पंथ होय. पण हें म्हणणें टिकण्यासारखें नाहीं. ज्ञानदेवांनीं खंडण करावें असें या पंथाचें कोणतेंही तत्त्वज्ञान नाहीं. या पंथाची वैदिकधर्मीय लोकांनीं भीति घ्यावी, असा त्याचा महाराष्ट्रांत कोणताही प्रचार नव्हता. एक अनाचारी मनुष्य म्हणून त्या वेळच्या राजसत्तेनें चक्रधराला देहदंड दिल्यामुळेंच त्याच्या लोक-प्रियतेचें काल्पनिक स्वप्न अनेकांनीं निष्कारण चित्रित करण्यास प्रारंभ केला आहे. चक्रधराचा स्वतःचा एकहि ग्रंथ नाहीं. मानभाव-पंथी लोक थोडेसे विचारांत घेण्याच्या परिस्थितींत चक्रधरानंतरच आलेले आहेत. अर्थात् ज्ञानदेवांच्या काळीं प्राणिमात्रांचा ग्रास

करणारें संकट म्हणून बिचाऱ्या चक्रधराच्या मूठभर अनुयायांना समजण्याचें कोणतेंहि कारण नव्हतें. शिवाय ते अत्याचारी व तसे उपद्रवी नव्हते. तेव्हां संकट वाटण्याइतकें व तेंहि ज्ञानदेवासारख्या दीर्घदर्शी, प्रतिभासंपन्न पुरुषाला संकट वाटण्याइतकें महत्त्वाचें असें दुसरेंच कोणतें तरी दृश्य ज्ञानदेवासमोर असलें पाहिजे हें निर्विवाद आहे. हें दृश्य कोणतें असेल? या संबंधांत इतर कोणाच्याहि साक्षीपेक्षां नामदेवरायांची साक्ष अत्यधिक महत्त्वाची आहे. कारण श्रीनामदेव हे ज्ञानदेवांचे मित्र, त्यांच्या शिष्याचे शिष्य, त्यांच्या बरोबर राहिलेले व त्यांचें अंतरंग-सहकारी आहेत. त्यामुळें अनुमानधक्क्याऐवजीं त्यांच्या उद्‌गारांना प्रत्यक्ष प्रामाण्याचें स्वरूप आहे. श्रीनामदेव ज्ञानदेवांच्या अवतार-कार्यासंबंधानें म्हणतात कीं, 'हीं चार भावंडें शिव, विष्णु, ब्रह्मदेव व मूळ माया यांचे अवतार असून

राजे यवन भ्रष्ट झाले । ठायी ठायी दोष जडले ॥
मग इही अवतार घेतले । कलिदोष हरावया ॥
नामा म्हणे पुढें हे जन । यवनसंसर्गें कठिण ॥
होता गाती हरिचे गुण । उद्धरती सर्वथा ॥

याचा अर्थ सरळच आहे. मुसलमानांचें राज्य उत्तर भारतांत दृढमूल होऊन, लोक आत्मप्रत्ययशून्य व राजे धर्मभ्रष्ट अशी अवस्था प्राप्त होऊन देव, धर्म संकटांत सांपडल्यामुळें ज्ञानदेवादिकांनीं अवतार घेतला व निष्ठाशून्य भारतीय समाजाला देवनिष्ठेची व धर्मनिष्ठेची दीक्षा दिली. 'जग तारिलें कीर्तनें।' असें नामदेवांनीं म्हटलें आहे. यावर एकच प्रश्न उद्‌भवतो कीं, ज्ञानदेवांच्या काळीं महाराष्ट्रापर्यंत मुसलमानांचें लोण आलें होतें काय? ऐतिहासिक परिस्थितीचा आढावा घेतला तर त्याचें उत्तर होकारार्थीच द्यावें लागेल. ज्ञानदेवांच्या काळीं महाराष्ट्रांत रामदेवराव यादवाचें राज्य होतें. एवढ्यावरून येणाऱ्या परिस्थितीचें ज्ञानदेवांना ज्ञान होणें दुरापास्त होतें असें समजण्याचें कांहीं कारण नाहीं.

## ज्ञानदेवकालीन परिस्थिति

ज्ञानदेवकालीन परिस्थितीचा आढावा घेतांना प्रा. फाटक यांनीं आपल्या "ज्ञानेश्वर वाङ्मय आणि कार्य" या ग्रंथांत अतिशय सुंदर मीमांसा करून श्रीनामदेवांच्या उपरिनिर्दिष्ट विधानाचा अर्थ विशद करून सांगितला आहे. ज्ञानेश्वरीच्या निर्मितीनंतर अवघ्या चारच वर्षांनीं अल्लाउद्दीन खिलजीची दक्षिणेंत स्वारी झाली असून त्या स्वारीनें एकदम रामेश्वरपर्यंत धडक मारली आहे. अल्लाउद्दीनच्या या स्वारीच्या पूर्वीं या देशाचें भवितव्य काय वाढवून ठवलेलें आहे याची तत्कालीन द्रष्टया लोकांना परिपूर्ण कल्पना होती असें मानावयास पुष्कळ जागा आहे. श्री. फाटक यांनीं आपल्या ग्रंथांत केलेलें परिस्थितीचें दिग्दर्शन पूर्ण साधार असल्यामुळें व त्याच्याशीं मी पूर्ण सहमत असल्यामुळें त्यांच्याच शब्दांत तत्कालीन परिस्थितीचें स्वरूप येथें देतों.

"सिंध प्रांतांत इस्लामी लष्करानें जी चढाई केली ती पहिली यांत संशय नाहीं. परंतु अरब आणि भारतीय यांचे संबंध इस्लाम जन्मास येण्याच्या आधींपासून होते. भारताच्या पूर्व पश्चिम किनाऱ्यानें प्रवास करून येथील जिन्नस बाहेरदेशीं नेण्याची कामगिरी अरब व्यापारी हे इस्लाम धर्माची दीक्षा घेण्याच्या पूर्वींपासून बजावीत होते. सातव्या शतकांत त्यांनीं इस्लामचा अंगीकार केला व ते इस्लामी या नात्यानें हिंदी किनाऱ्यावर फिरूं लागले. त्यांचा व्यापार हें राज्याची तिजोरी भरण्याचें एक साधन असल्यामुळें धर्म बदलला तरी त्यांच्यासंबंधीं हिंदू राजांची अनुकूलता ऱ्हास पावली नाहीं. इस्लामचे अनुयायी म्हणून येथें येणारे व राहणारे अरब व्यापारी आपल्या तंटयाबखेडयांचा न्यायनिवाडा आपल्या धर्माच्या न्यायाधीशानें करावा, आपल्या मृतांना पुरण्यासाठीं स्वतंत्र सुरक्षित जागा असावी; प्रार्थनेकरतां मशिदी बांधण्याची परवानगी मिळावी, अशी इकडील राजांकडे मागणी करूं लागले; व इकडील राजे त्यांना मागणीप्रमाणें सवलती देत

राहिले. स्वधर्मप्रसार हें एक मुसलमानांचें उद्दिष्ट असल्यामुळें अरब व्यापारी इस्लामचा उपदेश आसपासच्या हिंदूंना करीत असत, व हिंदु राजांची त्यांच्या धर्मप्रसाराला आडकाठी नव्हती. इतकेंच नव्हे, तर इतिहासाची झडती घेतल्यास इस्लामी धर्म आपल्या प्रजेनें स्वीकारावा, असें येथील राजांकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उत्तेजन दिलें जात होतें, अशीं उदाहरणें दाखविणें कठीण नाहीं. सिंधपासून सिंहलद्वीपापर्यंत इस्लामी व्यापाऱ्यांच्या समुद्रालगत लहानमोठ्या वसाहती पसरलेल्या होत्या. व वसाहतींतील उत्साही मुसलमान आपल्या धर्माचें संख्याबळ संततीच्या व बाटवाबाटवीच्या साहाय्यानें वाढवीत होते."

—(पृष्ठ ३१ व ३२)

इस्लामी व्यापारी सिंध, गुजराथ, खंबायत, कोंकण, मलबार या समुद्रकिनाऱ्याच्या प्रदेशांत फिरत होते. कोंकणापैकीं ठाणें बंदराचे उल्लेख अरबांच्या ग्रंथांतून पुष्कळदां आलेले आहेत व त्यांतील अनेक ज्ञानेश्वरपूर्वकालीन आहेत. ठाण्याच्या भागांत उत्कृष्ट प्रतीचें कापड तयार होत असे व तें परदेशीं नेऊन खपविण्याचें काम अरब व्यापारी करीत असत. हिंदुस्थानांतील तलवारींना अरबस्तानांत मोठा मान होता. त्यांची निर्यात होत असे. या इस्लामी अरब व्यापारी लोकांना येथील स्त्रियांच्या संबंधापासून जी प्रजा झाली ती अर्थात् इस्लाम होती. कोंकणांतील या नव्या मुसलमान प्रजेला 'नवैत' किंवा 'नटिया' या नांवानें व मलबारांतील प्रजेला 'मापिल्ला' किंवा 'मोपला' या नांवानें ओळखीत असत. ही मोपल्यांची जात खिलाफत चळवळीच्या दिवसांत आपल्या बंडाळीनें १९२१ मध्यें एकदम प्रसिद्धीस चढल्याचें वृत्त अलीकडील राजकारणाच्या इतिहासज्ञांना सांगायला नको. कोंकणांतील नवे मुसलमान केवळ समुद्रकिनाऱ्याला चिकटून राहिलेले नव्हते. ते महाराष्ट्रामध्यें अन्यत्र व्यापारनिमित्तानें हिंडत होते हें सहज कळणारें आहे. इस्लामी व्यापाऱ्यांच्या मागोमाग इस्लामचे विद्वान् धर्मप्रसारक इकडे येऊं लागले. इस्लामचें

उत्तरे-कडील लष्करी आक्रमण यशस्वी होऊन त्याचा दरारा वाढल्यावर अशा धर्मप्रसारकांचा उत्साह वाढला. (पृष्ठें ३२–३३)

गझनीच्या महमुदानें इ. स. १००१ ते १०३० या लहानशा कालावधींत हिंदुस्थानांत ज्यांच्याबद्दल निश्चितपणें बोलतां येतें अशा १० वेळां स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यांच्या धडाक्यांत त्यानें दक्षिणेकडे द्वारका, शंखोद्धार तीर्थापर्यंत व पूर्वेस मथुरा, ग्वाल्हेर, कनोज, कलिंजर, माणेक म्हणजे बिहारच्या सरहद्दीपर्यंत मजल मारून संपन्न शहरें व क्षेत्रें लुटलीं. क्षेत्रांतील देवळांचा विध्वंस केला, व हजारों हिंदूंना यमलोकीं पाठविलें व हजारोंना गुलाम बनवून आपल्या देशांत नेलें. त्याच्या मागून सुमारें दीडशें वर्षांनीं घोरी घराण्याच्या महंमदानें आपला मोर्चा हिंदुस्थान जिंकण्यासाठीं वळविला. इ. स. ११९२ सालीं त्यानें पृथ्वीराज चव्हाणाचा पराजय आणि वध करून ११९३ मध्यें कनोजच्या सत्तेचा धुव्वा उडविला व पृथ्वीराजाच्या अजमीर शहराचा ताबा घेतला. ११९६ सालीं ग्वाल्हेरचा किल्ला पादाक्रान्त करून त्यानें गुजराथची राजधानी अहिलवाडा पाटण व तिच्या आसपासचा मुलूख फस्त केला. इ. स. १२०२ मध्यें बुंदेलखंडाच्या राजाला जिंकून कलिंजर किल्ला ताब्यांत घेतला, व त्याबरोबरच यमुनेकांठच्या काल्पी शहरावर इस्लामी सत्तेचें निशाण फडकलें. ११९७ मध्यें महंमद घोरीचा एक सरदार महंमद बखत्यार खिलजी यानें बिहारकडे धांव मारली. तेथें पाल वंशाचें राज्य होतें व बौद्ध धर्म भ्रष्ट स्वरूपांत लोकांवर प्रभुत्व गाजवीत होता. खिलजीला बिहारचा मुलूख अगदीं मोकळ्या रानासारखा सांपडला. लढाया न करतांच त्यानें बिहारांत इस्लामी सत्तेची हिंदूंच्या कत्तलीसह द्वाही फिरविली. महंमद घोरी १२०६ मध्यें कालवश झाला व गुलाम घराण्याचें सिंहासन दिल्लीस स्थापन झालें.

उत्तरेस हा धुमाकूळ चालला असतां लोकांनीं दक्षिण प्रदेश इस्लामी सत्तेबाहेरचा व लांब म्हणून सुरक्षित या समजुतीनें

तिकडे पळ काढावा हें स्वाभाविक आहे. महंमद बखत्यार खिलजीनें बिहारमध्यें कत्तली आरंभिल्या, तेव्हां जीव बचावण्यासाठीं तेथील लोकांनीं नेपाळ, तिबेट व दक्षिण भारत या प्रदेशांत आश्रय केला ही गोष्ट इतिहासांत नमूद आहे. कित्येकांना नेपाळ तिबेटाबद्दल संशय नाहीं. दक्षिणेकडे लोक पळाले असतील कीं नाहीं, असा प्रश्न कांहीं इतिहासकारांना सुटत नाहीं. पण मुसलमान इतिहासलेखकांना याविषयीं शंका नाहीं. जी पळापळ बाराव्या शतकाच्या शेवटीं झाली तीच पुढेंहि चालत राहिली. (पृ.३४-३५)

ज्ञानेश्वरीच्या काळापूर्वी उत्तरेला मुसलमानांचें राज्य स्थिरावून हिंदूंचा देव-धर्म फोडीत बुडवीत विस्तार पावतां पावतां महाराष्ट्रासमीप नर्मदेच्या कांठीं येऊन भिडलें असतां, देवधर्माच्या स्थितीचें चिंतन मनन करणाऱ्या ज्ञानेश्वरांना त्याची जाणीव सुद्धां नव्हती, अशी कल्पना उराशीं बाळगणें दुराराध्य, दुर्विदग्ध, ते खेरीज इतर रीतीनें साधणारें नाहीं. ज्ञानेश्वरांना उत्तरेस इस्लामी राज्यकर्त्यांनीं चालविलेला देवाधर्माचा विध्वंस कसा कळला असेल याची ही मीमांसा पुरेशी आहे. ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा नाथपंथांतील होती. नाथ पंथाचा जन्म उत्तरेस झालेला असल्यामुळें त्याच्या द्वारें उत्तरेकडील देवाधर्मासंबंधांत चाललेली उलथापालथ ज्ञानेश्वरांना समजण्याचा गुरुपरंपरा हा एक मार्ग होता. (पृष्ठ३८-३९) आजच्याप्रमाणें ज्ञानेश्वरकाळीं जनतेचें पोट संकटांत नव्हतें. इस्लामी परचक्रानें देव आणि धर्म धोक्यांत टाकलेला होता. इकडे लक्ष दिल्यास ज्ञानेश्वरांनीं देवाधर्माचें निरूपण कां केलें असावें याचा उलगडा होतो. त्या काळांत सुखाची चंगळ होती, स्वराज्य होतें, वगैरे कल्पना उराशीं बाळगून ज्ञानेश्वरीबद्दल काढले जाणारे निष्कर्ष अज्ञानाचेच समजावे लागतात. (पृ. ४६)

याप्रमाणें इस्लामच्या वावटळीमुळें संकटांत आलेले देवधर्म जसे ज्ञानदेवांना दिसत होते त्याचप्रमाणें वैदिक धर्माच्या अनुयायी वर्गांत व हिंदु समाजांत उत्पन्न झालेली शिथिलताहि त्यांना स्पष्ट

दिसत होती. त्या काळीं बौद्ध, जैन इ. विकृतींनीं धर्माच्या अस्मितेवरची समाजाची मूलभूत निष्ठा धोक्यांत आलेली होती. तीनशें साठ दिवसांत करावयाच्या तीनशें पासष्ट व्रतांच्या फापटपसाऱ्यांनीं उदात्त तत्त्वज्ञानाचें, वैदिक धर्माचें अंग विकल झालेलें असून भिन्न भिन्न देवतांच्या नांवावर स्थापन झालेल्या समाजांतील संप्रदायांनीं एकतेचें मूलभूत सूत्र पार नष्ट केलें होतें व समाजांत विघटनकारी प्रवृत्ति उत्पन्न झालेल्या होत्या. अशा वेळीं संपूर्ण समाजाला एकतेच्या सूत्रांत आणण्याची व धर्माच्या अस्मितेसंबंधीं यथार्थ दृष्टि देण्याची आवश्यकता होती. ज्ञानदेवांनीं स्वधर्माचें मूळ अधिष्ठान सुटलेल्या व त्याचें केवळ ढोंग माजविणाऱ्या लोकांचें जें शब्दचित्र ज्ञानेश्वरींत रंगविलेलें आहे, तें या दृष्टीनें चिंतनीय आहे.

"एकादशीच्या दिवशी । जे तुला पाड आम्हासी ।  
तें तुलाचि नागासी । पंचमीच्या दिवशी ।।८१८  
चौथ मोटकी पाहे । आणि गणेशाचाचि होये ।  
चउदसीं म्हणे माये । तुझाचि वो दुर्गे ।।८१९  
नित्य नैमित्तिक कर्मे सांडी । मग बैसे नवचंडी ।  
आदित्यवारी वाढी । बहिरवां पात्रीं ।।८२०  
पाठी सोमवार पावे । आणि बेलेंसी लिंगा धावे ।  
ऐसा एकलाचि आघवे । जोगावी जो ।।८२१  
ऐसा अखंड भजन करी । उगा नोहे क्षणभरी ।  
अवघेन गांवद्वारी । अहेव जैसा ।।८२२

या निष्ठाशून्य अवस्थेंत धर्म ही कांहीं विशिष्ट लोकांच्या आचाराची बाब होऊन सर्वसामान्यांचीं जीवनपुष्पें ज्यांत गुंफतां येतील असें समष्टिजीवनाला आधारभूत ठरणारें एकही सूत्र समाजजीवनांत नव्हतें. अशा स्थितींत प्रत्यक्ष इस्लामी आक्रमणाची धाड महाराष्ट्रावर कोसळल्यावर काय अवस्था होईल हें सहजच ध्यानांत येण्यासारखें होतें. राष्ट्रीय अस्मितेवरील हें जीवघेणें संकट ध्यानांत घेऊन ज्ञानदेवांनीं चतुर्विध पायावर भागवत

धर्म महामंदिराची उभारणी करून राष्ट्रीय अस्मितेचें पुनरुत्थान करण्याचा सूत्रनिपात केला. त्यांतील पहिला पाया तत्त्वज्ञान हा होय. तत्त्वज्ञानाच्या भक्कम आधारावांचून कोणतीहि समाजरचना अथवा कोणत्याहि नीतिमूल्यांचें मंदिर स्थिरपद राहूं शकत नाहीं. ज्ञानदेवांनीं धर्माच्या अवनतीच्या काळांत अमृतानुभव, चांगदेव-पासष्टि व भावार्थदीपिका या ग्रंथांच्या द्वारें सूक्ष्म बुद्धीची भूक शमविणाऱ्या व अनुभूतीचीं दारें सर्वांसाठीं मोकळीं असलेल्या भक्कम तत्त्वज्ञानाचा पाया भारतीय अस्मितेला दिला. जें कार्य बौद्ध पाखंडाच्या काळांत श्रीमच्छंकराचार्यांनीं आपल्या प्रस्थान-त्रयीच्या द्वारें केलें तेंच कार्य ज्ञानदेवांनीं आपल्या ग्रंथत्रयीच्या द्वारें महाराष्ट्रापुरतें केलेलें आहे. आजच्याहि काळांत आर्थिक मूल्यावर समाजरचना करूं इच्छिणाऱ्या लोकांना सुद्धां विरोध-विकासी जडवादाच्या प्रक्रियेच्या साच्यांत आपलीं समाजमूल्यें व अर्थमूल्यें बसविण्याची आवश्यकता वाटते; यावरूनच जीवन-मूल्यांना व नीतिमूल्यांना तत्त्वज्ञान हें कसें प्राणभूत ठरतें, हें ध्यानांत येईल. या भक्कम तत्त्वज्ञानाच्या आधारामुळें बुद्धीच्या व अनुभूतीच्या क्षेत्रांत भारतीय अस्मितेची स्वाभिमानपूर्ण निष्ठा लोकांच्या हृदयांत टिकूं शकली. दुसऱ्याचा धर्म व उत्पन्न होणारीं पाखंडें खड्गाच्या व अन्य साधनांच्या भरंवशावर आज आपल्या-वर कुरघोडी करतांना दृष्टीस पडत असली तरी आपल्याला त्यांच्यासमोर स्वत:ला कमी लेखण्याचें अथवा हिणकस समजण्याचें कारण नाहीं असा आत्मविश्वास मराठी जनतेच्या अन्त:करणांत या तत्त्वज्ञानाच्या आधारानेंच फुलविण्यांत आला. उलट असा कांहीं आधार नसलेल्या लोकांपेक्षां आपण श्रेष्ठ आहोंत ही जाणीवहि त्यामुळें प्रखर झाली. राष्ट्राच्या पडत्या काळांत राष्ट्रांत बौद्धिक अराजक माजूं नये व स्वत:च्या अस्मितेवरील निष्ठा टिकून राहावी म्हणून या गोष्टीची नितान्त आवश्यकता होती. ज्ञानदेवांनीं या तत्त्वज्ञानाबरोबरच आपापल्या भूमिकेवर उभे राहून निस्स्वार्थ बुद्धीनें, फलाशाविरहित, ईश्वरार्पण बुद्धीच्या

कर्मयोगाची प्रेरणा दिली. किंबहुना केवळ षोडशोपचार पूजेऐवजीं ही स्वकर्मकुसुमांची पूजाच ईश्वराला आवडते असें निःसंदिग्धपणें उद्घोषून समाजांतील अधिकारश्रेष्ठतेच्या पायावर उत्पन्न होणाऱ्या विघटनात्मक कल्पनांपासून समाजाला वांचविलें. सर्व-सामान्य लोकांची कुवत ओळखून, इतर सर्व मार्गांचा जरी त्यांनीं आदर केला व स्वतः जरी ते योगमार्गी होते, तरी सर्वांचा समावेश सर्व दृष्टींनीं करणाऱ्या भक्तिमार्गाचाच त्यांनीं प्रसार केला व 'रामकृष्ण गोविंद। या नामांचे निखिल प्रबन्ध' लोकांच्या हातीं देऊन त्यांनीं नाममंत्राच्या सूत्रांत समान पातळीवर समाजांतील सर्व थरांना एकात्म केलें. पंढरीच्या पांडुरंगाचें केंद्रस्थान कल्पून सर्व महाराष्ट्रांतील भाविक लोकांना प्रतिवर्षीच्या वारीच्या निमित्तानें एकत्रित करण्याचा प्रयत्न केला. यन्त्रयुगालाहि पुरून उरणाऱ्या या भागवत धर्माची उपयुक्तता वस्तुतः कोणास सांगावयास नको. ज्ञानदेवांचे शिष्योत्तम नामदेव यांनीं त्यांच्या-पासून हा मंत्र घेऊन तो पुढें सुदूर पंजाबापर्यंत नेला.

## एक निरर्थक वाद

अलीकडे कांहीं लोकांनीं एक निरर्थक वाद प्रारंभ केलेला आहे. तो वाद असा कीं भागवत धर्माची प्रतिष्ठापना ज्ञानदेवांनीं केलेली नसून ती नामदेवांनीं केलेली आहे. इतकेंच नव्हे तर मूळचे ज्ञानमार्गी ज्ञानेश्वर हे नामदेवापासूनच स्फूर्ति घेऊन भक्तिमार्गी बनले. भागवतधर्माचा पाया रचणें व उभारणी करणें हीं दोन्ही कार्यें एकट्या नामदेवांचींच होत. नागपूरचे डॉ. कोलते व श्री. वळुंजकर यांनीं या मताचा आविष्कार केलेला आहे. श्री. वळुंज-कर यांच्या शब्दांत त्याचें म्हणणें देणें उचित होईल. "श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ ही नाथसंप्रदायाची शिकवणच होती व आहे. श्रीज्ञानेश्वरीमध्यें प्रेम-भक्तीविषयीं अत्यंत सुंदर असा ऊहापोह आहे. परंतु तो भागवतधर्माची शिकवण म्हणून नाहीं तर श्रीमद् भगवद्गीतेंतील भक्तिमार्ग प्रकरणाची टीका म्हणून आहे. श्रीमद्

भगवद्‌गीतेंत भक्तियोगाबद्दल काय म्हटलें आहे हें श्रीज्ञानेश्वरींत येणें क्रमप्राप्त होतें. वरीलप्रमाणें श्रीज्ञानेश्वरी हा ग्रंथ भागवत धर्माच्या प्रचाराकरितां लिहिलेला नसून श्रीनाथसंप्रदायाचे शिकवणीचा एक भाग म्हणून लिहिला गेला असें म्हणणें सयुक्तिक होईल. प्रेमभक्तीचें ज्ञान श्रीज्ञानेश्वरास होतें. भक्तीचें वर्णन ज्ञानेश्वरीमध्यें सुंदर आलें आहे; पण भक्तिसुखाचा अनुभव त्यांनीं घेतलेला नव्हता. प्रेमभक्तीचा अनुभव त्यांनीं श्रीनामदेव महाराजांपासून घेतला." "ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया" यांत ग्रथित केलेली समजूत भाविक व भोळ्या वारकऱ्यांची तर आहेच. परंतु ती सुशिक्षित विद्वानांचीहि आहे असें दिसतें. याबाबत फक्त दोन अपवाद आहेत. ते म्हणजे प्रा. ह. भ. प. सोनोपंत दांडेकर व नागपूरचे डॉ. वि. भि. कोलते हे होत. या दोघांच्या मतें या देवालयाचा पाया व उभारणी श्री नामदेव महाराजांनीं केली. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं नाहीं." नामदेव महाराज भक्तिप्रेम अनुभवीत होते तर ज्ञानेश्वर महाराज भक्तिप्रेम जाणत होते. त्यानंतर नामदेव-कुवाचा प्रसंग घडून आला व भक्तिप्रेमाचा महिमा श्रीज्ञानेश्वर महाराजांस अनुभवण्यास मिळाला. व तेथून पुढें ज्ञानी व योगी श्रीज्ञानेश्वर महाराज वारकरी संप्रदायी झाले असावेत. तीर्थयात्रेस जाण्याचे अगोदरपासून तर श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीनंतरहि सुमारें ५४ वर्षेपर्यंत श्रीनामदेव महाराज भागवत धर्माचा व वारकरी पंथाचा प्रचार करीत होते. संत बहिणाबाईचे अभंगांत नमूद केलेलीं भागवत धर्माच्या देवालयाच्या रचनेबाबत वगैरे केलेलीं विधानें वस्तुस्थिति दाखवीत नाहींत असें म्हणतां येईल. व त्यामुळें श्री नामदेव महाराजांचें संतमंडळींतील स्थानहि निश्चित होईल."

डॉ. कोलते यांनीं थोडचा अधिक असमंजस भाषेंत हेंच म्हणणें मांडलें आहे. त्यामुळें त्याचा वेगळा विचार करण्याचें कारण नाहीं. वस्तुस्थिति काय होती व आहे हें या ठिकाणीं स्वतः ज्ञानदेव व नामदेव यांच्या शब्दांत पहाणें अधिक उचित ठरेल.

श्रीनामदेव हे पूर्वी कच्चे भक्त असून विसोबा खेचर यांच्या कृपेनें ते परिपूर्ण झाले हें प्रसिद्धच आहे. स्वत: नामदेव या संबंधांत विसोबा खेचर यांच्यासंबंधीं जे उद्‌गार काढतात त्यावरून विसोबा खेचरांवर त्यांची किती विलक्षण निष्ठा होती हें स्पष्ट होतें. नामदेव म्हणतात,

कृष्णभक्तिवीण तरला आहे कोण। द्यावा निवडून एक तरी ॥
कार्य आणि कारण लटिकाचि शीण। वर्म न कळोन वाया गेले॥३
वर्म एक आहे दृढ धरी भाव। अहर्निशी देव आठवावा ॥ ३
नामा म्हणे माझी खेचर माउली। कृपेनें दाविली वाट मज॥४
सुखाचें सुख रूप घेउनी जा तरी। विठ्ठल नामें भरी तिन्ही लोक॥
खेचर विसा म्हणे येथूनी काढले। तें तुज दिधलें जा रे नाम्या॥

हे विसोबा खेचर स्वत: ज्ञान व भक्ति अशा दोन्ही विषयांत श्रीज्ञानदेवांचे शिष्य होते. खेचर स्वत: ज्ञानदेवांविषयीं लिहितात,

महाविष्णूचा अवतार। श्रीगुरु माझा ज्ञानेश्वर ॥ १
विश्व तारावया आले। खेचर वंदितो पाऊलें॥ २

तात्पर्य, या परंपरेप्रमाणें पाहिलें तर स्वत: नामदेवाचे ज्ञानदेव हे आजेगुरु ठरतात. नामदेवांनीं ज्ञानदेवासंबंधीं 'महाविष्णूचा अवतार। सखा माझा ज्ञानेश्वर' असें म्हटलें असून 'प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति' या शब्दांत त्यांचा निर्देश केला आहे. याच पंथांतील श्री. बंका हेहि परंपरा सांगताना म्हणतात,

ज्ञानियाचा राजा ज्ञानेश्वर माउली। खेचरा वोळली कृपासिंधु॥
ज्ञानदेवाचरणीं खेचर शरण। नामदेवा पूर्ण कृपा केली।
नामदेवें हात चोखयाचें शिरीं। विठ्ठल ती अक्षरीं उपदेशिलें॥

वस्तुत: ज्ञानेश्वर महाराजांचें ज्ञानाप्रमाणेंच भक्तिमार्गाचेहि गुरु श्रीनिवृत्तिनाथ हेच होते. नामदेव जर त्यांचे गुरु असते अथवा त्यांचें स्फूर्तिस्थान असते तर तें स्पष्टपणें उल्लेखावयास ज्ञानेश्वर महाराजांनीं कधीहि मागें पुढें पाहिलें नसतें. पण आपल्या भक्तिमार्गाच्या गुरुचा निर्देश श्रीज्ञानदेव निवृत्तिनाथ या नांवानेंच करतात. गाथेत ते म्हणतात :–

तो भज व्हावा तो मज व्हावा। वेळोवेळा व्हावा पांडुरंग।
बाप रखुमादेवीवरु न विसंबे सर्वथा। निवृत्तीनें तत्त्वतां सांगितलें॥
बाप रखुमादेवीवरु विठ्ठलराज। निवृत्तीनें बीज सांगितलें॥

वस्तुत: ज्ञानदेवांची भक्तिपरंपरा ही नाथपंथाची असून ती गहिनीनाथापासून गुरुपरंपरेनें त्यांच्याकडे आलेली आहे, व नामदेवादिकांकडे तो प्रवाह ज्ञानेश्वरापासूनच गेलेला आहे. आपल्या नामभक्तिपरंपरेचा उगम ज्ञानदेवांनीं निवृत्तिनाथापासून, व निवृत्तींनीं गहिनीनाथापासून सांगितलेला आहे. ज्ञानदेवांच्या गाथेंतील पुढील उल्लेख पहा :—

जनांसी तारक विठ्ठल हेंच एक। केलासे विवेक सनकादिकीं ॥१
तें रूप पंढरी ओळलेंसे देखा। द्वैताची पैं शाखा तोडियेली ॥ २
उगवलें बिंब अद्वैत स्वयंभ। नाम हें सुलभ विठ्ठलराज ॥ ३
निवृत्तीचें गूज विठ्ठल सहज। गयनीराजे मज सांगितलें ॥४

श्रीज्ञानदेवांचे जसे ज्ञान व योग यांचे तसेच भक्तिप्रेमाचेहि गुरु श्रीनिवृत्तिनाथ महाराज हेच होत ही गोष्ट या सर्व प्रमाणावरून सिद्ध होणारी आहे. तात्पर्य, नामदेवांचा ज्ञानदेवाविषयींचा प्रत्यक्ष अभिप्राय पाहिल्यावर नामदेवांच्या या समर्थकांच्या मनांत केवळ जातीयवादाचें भूत थैमान घालीत आहे हेंच उघड होतें. विशेषत: डॉ. कोलते यांच्या मनांत तर या पिशाच्चाचें अखंड तांडव चालू असतें. ज्ञानदेव संकुचित व ब्राह्मणधर्माचे पुरस्कर्ते होते हाहि त्यांचा एक जांवई शोध आहे. पण परस्पर नामदेवांनीं ज्ञानदेवांना आपले जीवनगुरु मानून कोलते प्रभृतींना पहिला धक्का दिला आहे. व ज्या तुकारामांना तें उचलून धरतात त्यांनींच

ज्ञानियांचा राजा गुरु महाराव। म्हणती ज्ञानदेव ऐसे तुम्हां॥
मज पामरा हें काय थोरपण। पायींची वहाण पायीं बरी॥

या उद्‍गारांनीं या सर्वच वावदूकांना झणझणीत चपराक लगावलेली असल्यामुळें या वावदूकांचा विशेष विचार करण्याचें कारण नाहीं. दांडेकरांच्या संबंधांत मात्र या वावदूकांनीं निव्वळ थापेबाजी केली आहे. कारण स्वत: दांडेकर जें लिहितात तेंच

त्यांचें मत मानलें पाहिजे. आपल्या आषाढी, कार्तिकी या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत दांडेकर यांनीं असें म्हटलें आहे कीं, "भागवत धर्म मंदिराचा पाया रचणारे श्रीज्ञानदेव आणि त्याचा विस्तार करणारे श्री नामदेव आहेत." तात्पर्य,

ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिलें देवालया।
नामा तयाचा किंकर। तेणें केला हा विस्तार॥

हें बहिणाबाईचें म्हणणें शंभर टक्के ऐतिहासिक सत्य आहे.

येथें एक गोष्ट लक्षांत घेणें आवश्यक आहे. ती ही कीं ज्ञानदेवांनीं आपल्या कार्याचा सूत्रपात कोणाच्याहि खंडनमंडनासाठीं केलेला नसून स्वधर्माचें व स्वराष्ट्राच्या अस्मितेचें विशाल व विश्वमंगल स्वरूप प्रकट करणें हीच त्यांची आंतरिक तळमळ होती. या विधायक धारणेंतून त्यांचें कार्य विस्तारलेलें आहे. ज्ञानेश्वरीच्या शेवटीं त्यांनीं ईश्वराला जें मागणें मागितलेलें आहे त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. आपल्या विख्यात पसायदानांत ते म्हणतातः—

"आतां विश्वात्मके देवे। येणें वाग्यज्ञे तोषावे।
तोषोनि मज द्यावें। पसायदान हे॥
जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रतीं वाढो।
भूतां परस्परे जडो। मैत्र जीवांचे॥
दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।
जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात॥
वर्षत सकळ मंगळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूतळी। भेटो तया भूता॥
चला कल्पतरूंचे अरव। चेतना चिंतामणीचे गांव।
बोलते जें अर्णव। पीयूषाचे॥
चंद्रमे जें अलांछन। मार्तंड जें तापहीन।
तें सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु॥
किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होवोनि तिन्ही लोकी।
भजि जो आदिपुरुखी अखंडित॥

वैदिक धर्म हा विश्वधर्म आहे हा आत्मविश्वास लोकांत निर्माण करून ज्ञानदेवांनीं या विश्वधर्माचें पुनरुज्जीवन केलें व समाजांतील सर्व लोकांना मोक्षाचें द्वार खुलें करून आत्मविश्वास-प्रधान जागृतीची एक विलक्षण लाट महाराष्ट्रांत निर्माण केली. तिच्या सामर्थ्याचें वर्णन करतांना लो. टिळक गीतारहस्याच्या उपसंहारांत पुढीलप्रमाणें उद्गार काढतात: "हिंदुस्थानांतून वैदिक धर्महि 'समूलं च विनश्यति' होण्याची वेळ आली होती पण बौद्ध धर्माच्या ऱ्हासानंतर वेदान्ताबरोबर गीतेंतील भागवतधर्माचें जें पुनरुज्जीवन झालें त्यामुळें आमच्याकडे हा दुष्परिणाम घडून आला नाहीं. दौलताबादचें हिंदु राज्य मुसलमानांनीं बुडविण्या-पूर्वीं कांहीं वर्षें आमच्या सुदैवानें श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं भगवद्गीतेस देशीकार लेणें करून मऱ्हाटियेच्या नगरी गीतेंतील ब्रह्मविद्येचा सुकाळु करून सोडला." ज्ञानेशांच्या या कामगिरीचें कवच लाभल्यामुळेंच विपरीत काळांत राष्ट्रीय अस्मिता टिकून राहिली असा लोकमान्यांच्या या म्हणण्याचा अर्थ आहे.

या कार्याच्या उभारणीनंतर ज्ञानदेवांनीं प्रत्यक्ष तीर्थयात्रा करून भागवत धर्माचा कांहीं दिवस प्रसार केला. त्या कार्याची त्यांनीं मुहूर्तमेढ रोवल्यानंतर आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता पूर्ण झाली असें त्यांनीं ठरविलें व एकदां नामदेवाबरोबर तीर्थयात्रा करून आल्यावर त्यांनीं वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षी जीवत् समाधि घेतली. नामदेवांनीं म्हटलें आहे: 'त्यानंतर प्रत्यक्ष पांडु-रंगाचाच त्यांनीं या समाधीसाठीं निरोप घेतला. जीवनाचा ध्येयवाद समजणें जितकें अवघड आहे, त्याहूनहि अधिक अवघड त्या ध्येय-वादाच्या सिद्धीचें साधन असलेलें शरीर कार्य संपल्यावर तुच्छ समजणें हें आहे. ज्ञानदेवांनीं देहात्मवादाच्या या वातावरणाला आपल्या प्रत्यक्ष जीवन्समाधीनें चांगलाच धक्का दिला. नामदेवांनीं विठ्ठलाचा निरोप घेतांना ज्ञानदेव काय म्हणाले याचा जो उल्लेख केला आहे तो या दृष्टीनें पाहण्यासारखा आहे. आतां जगदुद्धारार्थ जें सांगणें आवश्यक तें सांगितल्यावर स्वस्वरूपीं मिळण्याची आपली इच्छा आहे हें व्यक्त करतांना ते म्हणतात :—

अमृतानुभव आनंदलहरी । ग्रंथसिंधु केला ज्ञानेश्वरी ।।
संस्कृत प्राकृत वैखरी । वदविली माझी ।।
आता मोक्षाचिया वाटा । पाहिला षट्चक्र चोहटा ।।
आज्ञा द्यावी वैकुंठा । ज्ञानदेव म्हणे ।।

आपलें कार्य पुढें चालविणारे नामदेवासारखे अनेक शिष्य व अनुयायी ज्ञानदेवांनीं उत्पन्न केलेले होते कार्तिक वद्य एकादशीला ज्ञानदेवांनीं समाधि घेतली. त्यांचे गुरु निवृत्तिनाथ हे सुद्धां स्थितप्रज्ञता भंग पावून त्या प्रसंगीं गहिवरले होते. ज्ञानेशांच्या समाधीचें वर्णन करतांना नामदेव म्हणतात :—

निंब आणि नारळ गोण्याची पोफळे । उदंड ति ही केळे आणियेली ।।
आणिक बहुतापरी घेतली सामुग्री । पीत पीतांबर मृगच्छाला ।।
भगवी आभरणें घेतले भस्म, ।
चिद्रत्न आसन उन्मनीची धुनी । समाधी सज्जनी पाहियेली ।।
धुवट वस्त्राची घडी ते अमोल । तुळसी आणि बेल आंथरले ।
दूर्वा दर्भावरी टाकिले मोकळे । पुष्पें ही सकळे समर्पिली ।।
गंध आणि अक्षता पुष्प परिमळ । आणियेले जळ भागीरथीचे ।
जाउनी ज्ञानेश्वर बैसले आसनावरी । पुढे ज्ञानेश्वरी ठेवियेली ।।
ज्ञानदेव म्हणे सुखी केले देवा । पादपद्मी ठेवा निरंतर ।।
तीन वेळा तेव्हां जोडिले करकमळ । झाकियेले डोळे ज्ञानदेवें ।।
भीममुद्रा डोळा निरंजन मैदान । झाले ब्रह्म पूर्ण ज्ञानदेव ।।
नामा म्हणे आतां लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ ।।

ज्ञानदेवानंतर अवघ्या आठ महिन्यांत सोपानदेव, मुक्ताबाई व निवृत्तिनाथ हीं त्यांचीं भावंडें समाधिस्थ झालीं. ज्ञानदेवांच्या मागून दक्षिण भारतावर यावनी आक्रमण कोसळलें त्या वेळीं त्यांनीं दिलेली शिकवण महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेर श्रीनामदेवरायांनीं अतिशय परिश्रमपूर्वक पसरविली. त्यांच्या उद्योगानेंच त्या काळांत धर्मनिष्ठा व देवनिष्ठा टिकली व भागवत धर्माच्या नौकेंत विपत्तीच्या प्रचंड लाटांतून हिंदू धर्म जिवंत राहूं शकला. भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत फडकविणारे नामदेव यांनीं

आपलें गुरुऋणच नव्हे तर धर्मऋण व राष्ट्रऋण फेडलें यांत शंका नाहीं. ज्ञानदेवांनीं प्रवर्तित केलेलें हें पुनरुत्थानाचें कार्य त्यांच्यानंतर साडेतीनशें वर्षें अगदीं छत्रपति शिवाजी महाराजांच्या काळापर्यंत एकसारखें भरभराटत गेलें. इतकेंच नव्हे तर आजच्या यंत्रयुगानें उत्पन्न केलेल्या धर्मजीवनाच्या प्रश्नचिन्हावरहि योग्य अमृतसंजीवनीचा तोडगा त्यांच्या शिकवणींतूनच मिळाल्यासारखा आहे, इतकें तिचें स्वरूप शाश्वत आहे. ज्ञानदेव, नामदेवानंतर दोनशें वर्षें इस्लामी राज्यांतहि ही देवनिष्ठा व धर्मनिष्ठा समाजांतील खालच्या थरापर्यंत सर्व वर्गांत पसरत राहिली. पुन्हां तिचें उज्ज्वल स्वरूप तितक्याच तेजस्वीपणें प्रकट करणारा महापुरुष दोनशें वर्षांनीं लाभला. तो महापुरुष म्हणजे श्रीएकनाथ महाराज होत. पुन्हां त्यांनीं भागवत धर्माची ध्वजा फडकावून कालौघांत किंचित् मंदावत चाललेल्या त्या ध्वजेला कसें तेजाळलें तें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

✦ ✦ ✦

प्रकरण तेरावें

# श्रीएकनाथ ते श्रीतुकाराम

श्रीएकनाथांच्या पूर्वी व श्रीज्ञानेश्वर महाराजांनंतर श्री नरसिंह सरस्वती याच्या दत्तसंप्रदायाचा महाराष्ट्रांत प्रादुर्भाव झाला होता. श्री एकनाथ हे ज्ञानदेवापासून प्रवर्तित झालेली भागवत धर्माची मन्दाकिनी व श्री नरसिंहसरस्वती यांच्यापासून प्रवृत्त झालेली दत्तसंप्रदायाची यमुना यांचें मनोहर संगमस्थान होतें. महाराष्ट्रांतील या दत्तसंप्रदायाचें एक विशिष्ट कार्य आहे. त्याचा उल्लेख करणें हेंहि अनिवार्य आहे.

श्रीनरसिंह सरस्वती म्हणजे सरस्वती गंगाधरानें लिहिलेल्या श्रीगुरुचरित्राचे अधिनायक होत. त्यांना दत्तात्रेयांचा अवतार असें मानण्यांत येतें. श्रीनरसिंह सरस्वतींच्या दत्तोपासना संप्रदायाचें एक मोठें वैशिष्ट्य हें आहे कीं वैदिक संस्कृतींतील ब्राह्मणाच्या कडकडीत आचारधर्माचा त्या संप्रदायानें कडकपणें प्रचार व प्रवर्तन केलें आहे. गुरुचरित्र वाचलें तर दत्तसंप्रदायाचा आचारधर्मावर व विशेषत: ब्राह्मण्यावर केवढा विलक्षण कटाक्ष आहे याचा प्रत्यय येतो. राष्ट्रामध्यें सर्वसामान्य निष्ठाजागृतीचे प्रयत्न जसे आवश्यक असतात त्याचप्रमाणें निष्ठावंत मनासमोर भारतीय संस्कृतीसारख्या प्राचीनतम व सनातन संस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठीं सर्वसामान्य जनतेसमोर सांस्कृतिक मूल्यें प्रत्यक्ष जीवनांतून आविष्कृत करणाऱ्या महान् जीवनादर्शांना प्रत्यक्ष उभे करणेंहि आवश्यक असतें. त्याशिवाय आपल्या ध्येयवादाची जशी समाजाला खरी कल्पना येऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें त्यांच्यांत खरा कडवेपणाहि येऊं शकत नाहीं आणि गुलामींतून सुटका होण्यासाठीं समाजजीवनांत ज्या तीव्र अभिमानाचें पोषण होणें आवश्यक असतें तो अभिमान अशा कडकपणाच्या द्वारेंच वस्तुत: पुष्ट होतो. ज्ञानदेवांच्या संप्रदायानें पहिली गोष्ट उत्पन्न केली असली तर दत्तसंप्रदायानें राष्ट्रजीवनांत दुसरी कामगिरी पार पाडलेली आहे. गुरुचरित्रांतील लहान-सहान गोष्टींवर दिलेला कडवा भर पाहून पुष्कळांना आश्चर्य वाटतें. पण जीवन घडावयाचें तें अशा लहान सहान गोष्टींतून स्वाभिमानपूर्ण असणाऱ्या कडक आग्रहीपणानेंच घडत असतें. दत्तसंप्रदायांत अशा प्रकारची तेजस्वी शिकवण देण्यांत येत असे. हें गुरुचरित्रांतील एका छोटयाशा घटनेवरूनहि ध्यानांत येईल. सायंदेव नांवाचा शिष्य मुसलमान बादशहाचा नोकर असतो. तो नरसिंह सरस्वतीकडे नमस्काराला आला असतां श्री नरसिंह सरस्वती त्याला असें सांगतात कीं आमच्यासमोर एकदां वाकलेलें मस्तक कोणत्याहि कारणास्तव यवनासमोर वांकवितां येणार

नाही. सायंदेव ती गोष्ट मान्य करतो व यवनांचें दास्य सोडून स्वत:ला सर्वस्वी नरसिंह सरस्वतींच्या सेवेला वाहून घेतो. या ब्राह्मण्यालाच उद्देशून, वैदिक धर्माच्या संकटकाळांत त्याचें संरक्षण कसें होईल ? याचें उत्तर देतांना भगवत्पूज्यपाद श्रीमदाद्य शंकराचार्य पुढीलप्रमाणें उद्‌गार काढतात : 'ब्राह्मणत्वस्य हि रक्षणेन रक्षितः स्यात् वैदिको धर्मः' ब्राह्मण्याच्या संरक्षणानेंच वैदिक धर्माचें संरक्षण होईल. ब्राह्मण्य म्हणजेच वैदिक धर्माचा अथवा भारतीय संस्कृतीचा आदर्शवाद होय. दत्तसंप्रदायानें हें कार्य केलें. एकनाथांचे गुरु श्रीमज्जनार्दनस्वामी हे दत्तसंप्रदायाचे होते. परंपरेनें नाथांना या संप्रदायाचा वारसा मिळाला.

श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या काळीं प्रवृत्त झालेल्या भागवत-धर्माच्या प्रवाहावर त्यांच्यानंतर कित्येक वर्षांनीं एक मोठी औदासीन्याची लाट आली. ती लाट अडीचशें वर्षांनंतर श्रीएकनाथांनीं आपल्या विभूतिमत्त्वानें परतविली. श्रीएकनाथांचें पुण्यशील जीवन म्हणजे वैफल्य व नैराश्य यांतून भक्तिसंप्रदायाची व अध्यात्मवादाची संतांना प्रेरणा मिळाली असें प्रतिपादन करणाऱ्या संतसाहित्याच्या आजच्या साम्यवादी निरीक्षकांना चपखल उत्तरच होय.

## शुचीनां श्रीमतां गेहे

श्रीएकनाथ महाराज ज्या घराण्यांत जन्म पावले तें घराणें भगवद्‌भक्तांचें व गर्भश्रीमंतांचें होतें. त्यांचे पणजे भानुदास महाराज हे पंढरपूरच्या विठ्ठलाचे परमभक्त असून एकदां विजय-नगरच्या साम्राज्याचा अधिपति कृष्णदेवराय यानें पांडुरंगाची मूर्ति विजयनगरला नेली असतां भानुदासांनीं तेथें जाऊन व राजाचें मन वळवून ती मूर्ति पंढरपूरला परत आणण्याची विकट कामगिरी पार पाडली होती असें म्हणतात. या कर्तृत्ववान् भगवद्‌भक्तांच्या कुळांत श्रीएकनाथांचा शके १५४० सालीं जन्म झाला. लहानपणापासूनच परमेश्वरदर्शनाची उत्कट

तळमळ त्यांच्या ठिकाणीं वास करीत होती. त्यांच्या घराण्याला एक मोठी जहागीर असे. श्रीमंत व शुचितम घराण्यांत जन्म पावलेल्या एकनाथांचा धगधगीत वैराग्य हाच स्थायी भाव होता. श्रीतुकाराम अथवा श्रीज्ञानदेव यांच्याप्रमाणें कौटुंबिक व सामाजिक विपत्ति, मानखंडना व संकटें यांचा संस्पर्शहि एकनाथांच्या जीवनाला झालेला दिसत नाहीं. बाह्य परिस्थितीमुळें संसाराचा वीट यावा, प्रयत्नांची विफलता व संकटांची परंपरा यांच्यामुळें नैराश्य वाटावें, व एक प्रकारच्या आश्रयहीन परिस्थितींत मानवी असामर्थ्याची पुरेपूर जाणीव होऊन मन परमेश्वराचा आश्रय घ्यावयास वळावें असें श्रीएकनाथांच्या जीवनांत कांहींहि नव्हतें. तरीहि ईश्वरदर्शनाची ओढ त्यांना लागली. याचाच अर्थ अध्यात्मप्रवणता व ईश्वरोपासना यांचा जीवनवैफल्याशीं व निराशावादाशीं कांहीं संबंध नाहीं असा आहे या तळमळीचें समाधान घरीं होण्यासारखें नाहीं व तसें समाधान करूं शकणारे दौलताबादचे अथवा देवगिरीचे किल्लेदार श्री जनार्दनस्वामी हे एकच महापुरुष आहेत अशी निश्चिति पटल्यामुळें बालक एकनाथ श्रीजनार्दनस्वामींच्या आश्रयास गेले. त्या बालकाच्या चेहऱ्यावरील निरागस भाव व जीवनसूत्राचा साक्षात्कार घेण्याच्या त्याच्या तळमळींतून व्यक्त होणारी अलौकिकता यांमुळें जनार्दनस्वामींचें अंतःकरण भरून आलें. त्यांनीं नाथांच्या जीवनाला आकार दिला. प्रत्यक्ष श्रीदत्तात्रेयांचा साक्षात्कार घेऊन व शक्ति आणि ज्ञान यांनीं संलग्न होऊन एकनाथ आपल्या घरीं आले.

## श्रीज्ञानेश्वर व श्रीएकनाथ

नाथांचे आध्यात्मिक गुरु श्री जनार्दनस्वामी असले तरी त्यांचें स्फूर्तिकेन्द्र श्री ज्ञानदेव हेच होते. ज्ञानेश्वरीचा पुनरुद्धार नाथांनींच केला. तिच्यांतील अपपाठ दूर करून शके १५६२ मध्यें साक्षेपानें त्यांनीं तिची शुद्ध प्रत तयार केली. ते लिहितात :—

श्रीशके पंधराशे बारोत्तरी । तारणनाम संवत्सरी ।।
एका जनार्दने अत्यादरी । गीता ज्ञानेश्वरी शुद्ध केली ।।
जो ज्ञानेश्वरीचिये पाठी । ओवी करील मराठी ।।
तेणें अमृताचिये ताटी । जाण नरोटी ठेविली ।।

ज्ञानदेवांच्या साहित्याचा एकनाथांच्या विचारांवर, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या काव्यपद्धतीवर खोल परिणाम झालेला आहे. ज्ञानेश्वरीचा नाथ भागवतावर इतका विलक्षण परिणाम झाला आहे कीं, नाथ भागवताला श्रीज्ञानेश्वरीचा भाष्यग्रंथ म्हटलें तरी चालेल उपमा–दृष्टान्तापासून तर सद्‌गुरुनिष्ठेपर्यंत सर्व बाबतींत नाथांनीं ज्ञानदेवांचें अनुकरण केलें आहे. एकनाथी भागवतांत ज्ञानेश्वरींतील कित्येक ओव्या पाठभेदानें आलेल्या आहेत. भावार्थ रामायणाची व ज्ञानेश्वरीची प्रारंभीची ओवी पाहिल्यास हें विलक्षण साम्य कळून येईल. ज्ञानेश्वरीची पहिली ओवी पुढीलप्रमाणें आहे :–

ॐ नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या । जयजया स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।

भावार्थ रामायणाची ओवी पुढीलप्रमाणें आहे :—

ॐ नमोजी आद्या । वेद वेदान्तवेद्या । वंद्याही परमवंद्या । स्वसंवेद्या श्रीगणेशा ।।

ज्ञानदेवाविषयींच्या आपल्या उत्कट भावना व्यक्त करतांना श्रीनाथ आपल्या अभंगांतून म्हणतात :—

कैवल्याचा पुतळा प्रगटला भूतळा । चैतन्याचा जिव्हाळा ज्ञानोबा माझा ।। ज्ञानदेव ज्ञानदेव वदतां वाचे । नाहीं कळिकाळाचे भेद जीवा ।। ज्ञानदेव चतुराक्षरी । जप हा करी तूं सर्वदा ।। भाव धरूनियां वाची ज्ञानेश्वरी । कृपा करी हरि तयावरी ।।

वस्तुत: श्रीएकनाथ हे दत्तपरंपरेंतील श्री जनार्दनस्वामींचे शिष्य होत. "दत्तजनार्दन श्रीएकनाथ" हें भजन तर सुप्रसिद्धच

आहे. मग ज्ञानेश्वरांच्या परंपरेचा व त्यांचा संबंध काय? त्याचें उत्तर श्रीएकनाथांनींच पुढीलप्रमाणें दिलेलें आहे.

आदिगुरू शंकर। ब्रह्मज्ञान खूण। बाणली पै पूर्ण। मत्स्येंद्रनाथी ।। मत्स्येंद्र बोळला। गोरख बोधिला। ब्रह्मज्ञान त्याला। कथियेले ।। गोरक्षे संपूर्ण। निवेदिले गहिनी। तेणें निवृत्ति लागूनि। उपदेशिले ।। निवृत्तिनाथें। ज्ञानदेवासी दिधलें। परंपरा आलें। ऐशापरी ।। एका जनार्दनी। तयाचा मी दास। उच्छिष्ट कवळास। भक्षीतसे ।।

श्रीएकनाथांची व श्रीज्ञानदेवांची गुरुपरंपरा नाथसांप्रदायिक होती. नाथसंप्रदायाचा पारंपारिक उपदेश ज्ञानदेवानंतर श्री. जनार्दनस्वामींना झाला, व नाथ त्यांचे शिष्य असल्यामुळें ज्ञानदेवांना आपल्या गुरुपरंपरेंतील अवतारी पुरुष म्हणून ते गुरुस्थानीं मानतात असें दिसतें. अशी एक सांप्रदायिक गोष्ट आहे कीं, नाथ आळंदीला गेले असतांना तेथें त्यांचा गळा सुजून आला व औषधोपचार करूनहि बरा होईना. तेव्हां एके दिवशीं ज्ञानेश्वर महाराजांनीं त्यांच्या स्वप्नांत येऊन त्यांना असा दृष्टान्त दिला कीं माझ्या मानेला अजान वृक्षाच्या मुळीचा गळफांस लागला असून तो काढ म्हणजे घसा बरा होईल. स्वतः एकनाथ म्हणतात :—

'श्रीज्ञानदेवे। येउनी स्वप्नांत। सांगितली मात। मजलागी ।। दिव्य तेजःपुंज। मदनाचा पुतळा। परब्रह्म केवळ। बोलतसे ।। अजानवृक्षाची मुळी। कंठास लागली। येउनी आळंदीस्थळीं। काढ वेगी ।। ऐसें स्वप्न होतां। आलो अलंकापुरी। तंव नदी माझारी। देखिलें द्वार ।। एका जनार्दनी। पूर्व पुण्य फळलें। श्रीगुरु भेटले। ज्ञानेश्वर ।। आदिनाथ शंकरे। केला उपकार। ठेवणें निर्धार। प्रगट केलें ।। तोचि महाराज। निवृत्ति अवतार। केला उपकार। जयालागी ।। निवृत्तीनें गूज। सांगितले ज्ञानदेवा। होता जो ठेवा। गुह्य कांहीं ।। ज्ञानदेवें केले ठेवणें प्रगट। एका जनार्दनी नीट। मार्ग सोपा ।।

श्रीएकनाथ महाराजांनीं येथें असें स्पष्ट सूचित केलें आहे कीं, गहिनीनाथांनीं निवृत्तींना जगदुद्धारार्थ ज्या दैवी कार्याची प्रेरणा दिली, तेंच कार्य ज्ञानदेवांनीं स्वतःच्या जीवनभर करून तेंच पुढें चालविण्याची श्री एकनाथांना प्रेरणा दिली. म्हणूनच ज्ञानदेव हे नाथांचें स्फूर्तिस्थान आहेत हें उघड आहे.

## लोकशिक्षकांचे अग्रणी

ह्या सान्त सृष्टींत अनुस्यूत असणाऱ्या अनंतत्वाचा, नानात्वाच्या पसाऱ्यांत अनुस्यूत असणाऱ्या एकत्वाचा गुरुकृपेनें प्रत्यक्ष साक्षात्कार घेतल्यावर व "तुज सगुण म्हणूं कीं निर्गुण रे। सगुणु निर्गुणु एकु गोविंदू रे॥" अशी स्थिति अनुभविल्यावर, केलेंच पाहिजे असें स्वतःच्या जीवनसाफल्याचा दृष्टीनें, नाथांच्या जीवनांत कांहीं उरलें नव्हतें. तरीहि "न देखवे डोळा ऐसा हा आकांत। परपीडे चित्त दुःखी होतें।" या प्रखर सामाजिक जाणिवेच्या प्रेरणेनें समाजधारणेच्या महनीय क्षेत्रांत पदन्यास करावयाचें त्यांनीं ठरविलें. एकनाथांच्या काळीं श्रीज्ञानदेवांच्या काळाहून भिन्न परिस्थिति होती. ज्ञानदेवांच्या काळीं सर्वग्रासी यावनी लाट महाराष्ट्रावर येऊन कोसळणार अशीं नुसतीं पदचिन्हें दिसत होतीं, तर एकनाथांच्या काळीं महाराष्ट्र त्या लाटेखालीं आकंठ बुडून त्याचा आत्मप्रत्यय पार भंगलेला होता. भौतिक बळानें ही लाट परतविण्याची तर शक्यताच नव्हती. पण या महनीय परिवर्तनाची पूर्वसिद्धता म्हणजेच स्वत्व अथवा राष्ट्रीय आत्मप्रत्ययाचें पुनर्निर्माण करणें व कणखर आणि निराशेला पचवून टाकण्याइतकें सश्रद्ध जीवन निर्माण करणें हें एकच त्या काळीं अवश्य असलेलें कार्य होतें. श्रीएकनाथ महाराजांनीं त्या कार्याला हात घातला. स्वतःचें जीवनच लोकांसमोर आदर्श म्हणून ठेवून हें लोकशिक्षणाचें कार्य त्यांना साधावयाचें होतें. म्हणून त्यांनीं गृहस्थाश्रमाचा स्वीकार करून प्रपंच परमार्थाच्या समन्वयाचा आविष्कार आपल्या जीवनांतून करून दाखविला.

श्रीनाथ हे दया, क्षमा, शांति व समता यांची केवळ मूस होते. याप्रमाणें जीवनांतून आदर्शवादाचा आविष्कार करीत हरिभजन, कथाकीर्तन व ग्रंथलेखन यांच्या द्वारें त्यांनीं लोकसंग्रहाचें व लोकजागृतीचें कार्य प्रारंभ केलें.

## नाथांचें साहित्य

चतुःश्लोकी भागवत व श्रीमद्भागवताचा एकादश स्कंध यांवरील विस्तृत मराठी टीका, रुक्मिणी स्वयंवर व भावार्थ रामायण हे दोन कथात्मक ग्रंथ, हस्तामलक, आनंदलहरी, स्वात्मसुख इत्यादि कांहीं छोटे प्रकरणग्रंथ व सहस्रावधि अभंग, पदें इत्यादि रचना ह्या सर्वांचा विचार केला तर नाथांची कविता एकंदर पाऊण लक्ष आहे. त्यांच्या साहित्याला प्रसन्नगंभीर हें विशेषण यथार्थतेनें शोभेल. त्यांची भाषा रसाळ व हृदयाला जाऊन भिडणारी असून त्यांचें एकनाथी भागवत तर नवरसाची खाण आहे. श्रीज्ञानदेवांप्रमाणेंच त्यांच्याहि काव्याचा मुख्य अंगी रस शांत असून इतर रस अंगांगी भावानें प्रकट झाले आहेत. लोकशिक्षक नाथांनीं लोकभाषेंत ग्रंथरचना केली. ती मराठींत आहे म्हणून तिला नांवें ठेवणाऱ्या अहंमन्य पंडितांना ते विचारतात :—

मोलें भूमि खणतां वैरागरी। अवचटें अनर्घ्य रत्न लाभें करी। तें रत्न सांपडल्या केरीं। काय चतुरीं सांडावें॥ संस्कृत भाषा निंदा केली। तरी तें काय पावन जाहली। प्राकृत भाषा हरिकथा केली। तें वृथा गेली म्हणवेना॥ वेदासी नाहीं भाषाभिमान। संस्कृत प्राकृत त्या समान। ज्या वाणी जाहलें ब्रह्मकथन। त्या भाषा श्रीकृष्ण संतोषे॥ जो जो भाषाभिमान। तो तो वक्त्यासि बाधतो पूर्ण। ज्या भाषा केलें ब्रह्मकथन। तें होय पावन हरिचरणीं॥

## रससिद्ध कवीश्वर

उद्धव श्रीकृष्णांचा निरोप घेऊन बदरिकाश्रमीं जावयास निघतो त्या प्रसंगीं अथवा श्रीकृष्णनिर्याणानंतरच्या देवकीच्या विलापप्रसंगीं नाथांनीं छेडलेल्या कारुण्याच्या तारा आजहि

डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वहावयास लावितात. श्रीकृष्णावतारांतील कार्याचा आढावा घेतांना त्यांनीं प्रकटविलेला वीररस, रुक्मिणीस्वयंवरासारख्या प्रकरणांतून अध्यात्माच्या पार्श्वभूमीवर विलसणारा रसराज शृंगाराचा ध्वनिगर्भ आविष्कार, सिद्धीच्या व विभूतिवर्णनाच्या प्रकरणांतून प्रकट होणारा अद्‌भुत रस, यादवांच्या संहाराच्या वेळीं प्रकट होणारे भयानक व रौद्र रस, ते कसे रससिद्ध कवीश्वर होते हें सिद्ध करावयास पूर्णपणें समर्थ आहेत. नाथांचा हास्य रस तर अतिशय प्रभावी आहे. एकनाथी भागवतांतील कृपण मनुष्याचें पुढील वर्णन पहा. "पोटा खाय कदन्न। तेंही नाहीं उदरपूर्ण। तेथ स्त्रीपुत्रादि दासीजन। जठरतर्पण न पावती॥ कवडी एक लाभू पाहे। तै मातापित्यांचें श्राद्ध आहे। तें सांडूनि अंत्यज गृहा जायें। न मनीं भय स्पर्शाचें॥ भिकारी सांडिले त्याचें द्वार। अतिथी डावलिले निरंतर। पाहुणा दुरी पाहे बिढार। निराश पितर सर्वदा॥ दारा नये कोरान्न कर। घर सोडोनि गेले उंदीर। काउळी ओसंडिलें तें घर। चिडिया साचार न मिळे दाणा॥ ऋतुकाळें फळें येती पूर्ण। त्यासी दृष्टिभेटी हरी जाण। परी जिह्वेसी आलिंगन। प्राणांती आपण हों नेदी॥ मातेचें स्तनपान सेविलें। तेचि क्षीर रसना चाखिले। पुढें दूधचि वर्जिलें। व्रत धरिलें धनलोभें॥

श्रीनाथवाङ्मयांतील उपमा, उत्प्रेक्षा, मालारूपक, दृष्टान्त इत्यादि अर्थालंकारांची सृष्टि श्रीज्ञानदेवांप्रमाणेंच शारदेचें लावण्यभांडार असून श्रीज्ञानदेवांच्या साहित्याला प्राचीनत्वामुळें आलेली दुर्बोधता नाथवाङ्मयांत अंशतः सुद्धां नाहीं. नाथांनीं एकादश स्कंधावर केलेलें पुढील मालारूपक पहा :—

"हा एकादश नव्हे जाण। एकतीस खणांचें वृंदावन। येथ नित्य बसे श्रीकृष्ण। स्वानंदपूर्ण निजसत्ता॥ एक पंधरा शते जे श्लोक। तेंचि अत्यंत पानें चोख। माजी ज्ञानमंजरीचे घोख। अतिसुरेख शोभती॥ तेथें घालिती निजजीवन। ते होती परमपावन। स्वयें ठाकिती श्रीकृष्णसदन। ब्रह्मपरिपूर्ण स्वानंदे॥

केवळ नाथ भागवताचें वाचन केलें तरी नाथांच्या प्रतिभेची सुपूर्तता शेती, वैद्यकशास्त्र, ग्रहगति यांच्यासारख्या विषयांपासून तर ध्वनिशास्त्रासारख्या विषयाचें सूक्ष्म ज्ञान, सूक्ष्म निरीक्षण-शक्ति, प्रगल्भ पांडित्य व मानवी मनोवृत्तीशीं तन्मय होण्याची तरल सहसंवेदना यांचा प्रत्यय येऊन मन स्तिमित होतें. आणि या सर्वांत भरून राहिलेला मानवतेविषयींचा अपूर्व जिव्हाळा व जड जीवाविषयींचें वात्सल्य पाहून हृदय भरून येतें.

श्रीएकनाथांनीं वैदिक तत्त्वज्ञानाचाच पुरस्कार व प्रचार केला असला तरी एक स्वतंत्र सिद्धान्त त्यांनीं अद्वैताच्या भूमिकेवरून मांडलेला आहे, व तो म्हणजे ईश्वर शरीर अपांचभौतिक व नित्य असून तें त्याच्या इच्छाशक्तीचें कार्य आहे हा होय. त्यांच्या पूर्वी मराठींत हा सिद्धान्त कोणीही मांडलेला नाहीं. सगुण, निर्गुण परमेश्वराची एकरूपता जरी भागवतधर्मांत प्रतिपादन केलेली असली तरी परमेश्वर स्वरूपाची नित्यता व तीही शास्त्रीय परि-भाषेंतून नाथांच्या पूर्वी कोणीहि मराठींत तरी इतक्या ठामपणें मांडलेली नाहीं. या आपल्या प्रमेयाच्या सिद्धीसाठीं ते जो दृष्टान्त वापरतात तो तर फारच बहारीचा आहे. ते म्हणतात:—

तो अमूर्त मूर्ति धारणू। की सकल लोक लालनू।
शोभा शोभवी श्रीकृष्णू। सौभाग्य संपूर्ण साजिरा।।
घृत भिजलें आणि विघुरलें। परी घृतपणा नाहीं मुकलें।
तेंचि अमूर्त मूर्ती विसावले। परी तें सांचलें परब्रह्म।।
घृत भिजलें तेंचि विघुरलें। तैसे सगुण निर्गुणत्वा आलें।
या नांव योगाग्निधारण बोलिलें।कृष्ण देह दाहिले हें कदा न घडे।।
कृष्णस्वरूप परिपूर्ण। तो कां करील योगाग्निधारण।
त्याचा लीलाविग्रही देह जाण। करावें दहन कशाचें ?।।

श्रीनाथांचा हा सिद्धान्तच श्रीगुलाबराव महाराजांच्या मधुराद्वैत तत्त्वज्ञानाच्या मुळाशीं असून 'अनध्यस्त विवर्ताच्या' शास्त्रीय परिभाषेंतून त्यांनीं तो आपल्या 'प्रेमनिकुंज' या ग्रंथांत

मांडलेला आहे. श्रीगुलाबराव महाराजांचे सच्छिष्य वेदान्त-केसरी बाबाजी महाराज पंडित यांनीं हा सिद्धान्त आपल्या अमृतानुभव कौमुदीच्या भूमिकेंत सविस्तर मांडलेला जिज्ञासूंना पहावयास मिळेल.

## नाथांचा हृदयाविष्कार

श्रीएकनाथांनीं भागवत धर्माचा ध्वज उभारून सर्व जनतेला निष्ठाजीवनाच्या सूत्रांत सूत्रित करण्याचें कार्य जीवनभर केलें. इस्लामी आक्रमणाच्या सर्वभक्षक विपत्तींत देवनिष्ठा, धर्मनिष्ठा जीवननिष्ठा उत्पन्न करून त्यांना संपूर्ण समाजांत स्वाभिमानानें जगण्याची आकांक्षा उत्पन्न करावयाची होती. पण उघडपणें तसें करणें त्यांच्या काळीं केवळ अशक्य झालें होतें. राज्य धर्मान्ध सत्ताधाऱ्यांचें होतें. खड्गाच्या जोरावर त्यांची कुरघोडी सतत चालू होती. डोकें वर काढलें कीं तें ठेंचलें जावें अशी विलक्षण परिस्थिति सभोंवार होती. श्री समर्थांना लाभला असा शिव-छत्रपतींच्यासारखा कोणीहि सामर्थ्यशाली पुरुष त्या वेळीं दिसत नव्हता. इस्लामी वर्चस्व तर इतकें विलक्षण होतें कीं, कोणत्याहि प्रकारचा प्रकट प्रचार त्यांना करतां येण्याची शक्यता नव्हती. त्या वेळच्या समाजस्थितीचें उद्बोधन करणारी एक विलक्षण गोष्ट श्रीएकनाथांच्याच चरित्रांत आहे. या गोष्टीचा उल्लेख आम्ही मागें केलाच आहे. त्यामुळें तिची पुनरावृत्ति येथें करीत नाहीं. पण लोक जरी यवनाचें थुंकणें सहन करण्याच्या या गोष्टीचा नाथांची सहनशीलता प्रकट करण्यासाठीं उपयोग करीत असले तरी त्यावरून दुसराहि एक निष्कर्ष निघतो व तो सर्वांत महत्त्वाचा आहे. तो असा कीं, एकनाथांच्या सारख्या सर्व दृष्टींनीं प्रतिष्ठापद पावलेल्या व जनतेकडून सदैव सन्मानित असणाऱ्या गुरुतुल्य श्रेष्ठतम व्यक्तीच्या तोंडावर थुंकण्याइतका तिचा सार्वजनिक अपमान करणें ही गोष्ट राज्यकर्त्यांच्या धर्माच्या लोकांना अगदीं सहज होती. त्याबद्दल कोणत्याहि

प्रकारचा जनक्षोभ होऊं शकत नव्हता. व एवढ्या मोठ्या व्यक्तीलाहि मुकाट्यानें स्नान करून मोकळें होण्यापलीकडे दुसरें कांहींहि करतां येण्याची शक्यता वाटत नव्हती. समाज, ह्या अवस्थेंत असतांना त्याच्या मनांत आशावाद फुलवावयाचा होता. केव्हां तरी या विपन्न स्थितीचा विनाश करून ईश्वरच धर्म-राज्याची प्रतिष्ठापना करील व तशी ती त्यानें करावी अशी इच्छा किंबहुना हें स्वप्नरंजन त्यांना व्यक्त करावयाचें होतें. आपण जरी आज छळले जात असलों तरी देव आपल्या पाठीशीं आहे, पूर्वींही असे प्रकार होऊन त्यांतून पुन्हां आपण डोकें वर काढलें आहे, आणि आतांही पुनश्च तसें तें निश्चित काढूं शकूं, कधीं तरी आपले दिवस येतीलच असा विश्वास त्यांना जनतेच्या मनांत निर्माण करावयाचा होता. हें कार्य केवळ श्रीकृष्णांच्या बाललीला वर्णन करण्यानें होणार नव्हतें. एकादश स्कंधा-सारख्या गूढ आध्यामिक प्रकरणावर प्रकाश पाडणारीं भाष्यें लिहून पीडित समाजाच्या मनांत हा आशावाद निर्माण करतां येण्या-सारखा नव्हता. म्हणून सर्व प्रकारची साहित्यनिर्मिति झाल्यावर आपल्या जीवनाच्या सायंकाळीं परिणतप्रज्ञ अवस्थेंत नाथांनीं या प्रेरणेच्या निर्मितीसाठीं, रामचंद्राच्या चरित्राचा आश्रय घेतला. किंबहुना असें कांहीं न केलें तर, सामाजिक कल्याणाच्या दृष्टीनें त्यांचें कार्य विफल होईल म्हणून स्वतः श्रीरामचंद्रांनींच त्यांना पतित राष्ट्रांत पुनरुत्थानाचा प्रवाह पसरविणारें व स्वकीयांच्या मनांत जीवनाकांक्षा पल्लवित करणारें आपलें चरित्र गाण्यासाठीं प्रवृत्त केलें. एकनाथ म्हणतात :—

तूं कैसा झालासि वक्ता। पुसाल माझी योग्यता।
तेंही मी सांगेन तत्त्वतां। सावध श्रोतां परिसावी॥
मी नेणें मुळीच्या संस्कृतासी। मूर्खपण माझें मिरासी।
त्या मूर्खाच्या मुखासी। श्रीराम ऐसी कथा वदवी॥
माझे अंगीं मूर्खपण। माझें मी जाणें संपूर्ण।
न करी म्हणतां रामायण। श्रीराम आपण कथा प्रेरी॥

प्रेरिताहि मी न करी जाण। तव स्वप्नामाजी रामायण।
श्रीराम विस्तारी संपूर्ण। ऊण खूण ग्रंथाची।।
जागृतीमाजी वर्तता। पुढें प्रकाशे रामकथा।
दुश्चितपणें ठेवो जातां। राम तत्त्वतां रामायण दावी।।
करूं जाता फुकट गोष्टी। त्यामाजी रामकथा उटी।
रामे पुरविली पाठी। खिळिली दृष्टि रामायणी।।
ऐसियांत न करी म्हणतां। राम चढे मीपणाचे माथा।
मग तो आपुलिये निजसत्ता। वदवी कथा बलात्कारे।।
मी निजलों असतां जाण। राम थापटी आपण।
म्हणे उठी करी रामायण। तेथें मी कोण न करावया।।

—(भावार्थ रामायण बालकांड अ. ४ ओ. ८ ते १५)

भावार्थ रामायणाची रचना करतांना जरी श्री नाथांनीं मुख्यत: वाल्मीकीय रामायणाचा आधार घेतला असला तरी, त्यांना आवश्यक वाटणाऱ्या अनेक ग्रंथांचे आधार घेऊन, कर्तव्याची प्रेरणा त्यांतून मिळेल अशी बुद्धिपुरस्पर योजना त्यांनीं केली आहे. जे लोक एकनाथादि संतांना केवळ टाळकुटे व निष्कर्मी भजनानंदांत रममाण होण्याचा संदेश देणारे समजतात त्यांनीं हें भावार्थ रामायण लक्षपूर्वक वाचण्याची आवश्यकता आहे. सर्वसामान्य जनतेलाच काय, पण निष्कर्मी राहण्याबद्दल समाधि स्थितींत असणाऱ्या ज्ञाननिष्ठांनाही नाथांनीं पर्यायानें दोष दिलेला असून निजानंदीं निमग्न असणाऱ्या सिद्धांचेही, लोककल्याण, दुष्टदंडन व धर्मस्थापना हेंच खरें कर्तव्य असून त्यासाठीं त्यांनीं आपली निजानंदाची स्थिति सोडून, कर्तव्याच्या रणांत उतरलेंच पाहिजे, असें स्पष्टपणें सांगितलें आहे. प्रत्यक्ष वाल्मीकि रामायणाशीं संबद्ध नसलेला योगवासिष्ठ हा ग्रंथ आधाराला घेऊन त्यांतील रामचंद्रांच्या औदासीन्याची कल्पना, वसिष्ठांनीं त्यांना केलेला लोककल्याणाचा उपदेश, त्यांनीं आपल्या भावार्थ रामायणांत गुंफलेला आहे. समाधिमग्न रामचंद्राला उद्देशून वसिष्ठ सांगतात:—

ऐक बापा रघुनाथा । तुज कायसी समाधि अवस्था ।
तूं काळाचा आकळिता । चिदानंदता स्वस्वरूपें ।।
परिसे आजानुबाहू महाभुजा । हा समाधि काळ नव्हे तुझा ।
तू त्रैलोक्याधिराजा । देवसमाजा समग्रा सुखी करी ।।
सुखी करी साधुसंत । सुखी करी निजभक्त ।
सुखी करी लोक समस्त । अवतार चरित्रानुक्रमें ।।
अवताराचें सामर्थ्य पूर्ण । प्रपंच परमार्थी सावधान ।
उभयतां दिसो नेदी न्यून । तें निजचिन्ह अवधारी ।।

ताटकावधाच्या व मारीच आणि सुबाहूंच्या पराभवाच्या पौरुषशाली कृत्यांची पार्श्वभूमि म्हणून श्री नाथांनीं हा योग-वासिष्ठांतील प्रसंग चित्रित करतांना काव्यात्मतेप्रमाणेंच यथार्थ औचित्यहि प्रकट केलें आहे. ज्यांनीं आपल्या देवधर्माचें निखंदन चालविलें आहे, त्यांच्या पशुप्रवृत्तीवर रावणाच्या वर्णनाच्या मिषानें त्यांनीं टाकलेला प्रकाश त्यांच्या अंतःकरणांत चालू प्रकारा-संबंधीं केवढी प्रखर जागरूकता होती हें सिद्ध करावयास पुरेसा आहे. तरीहि संतांना परिस्थितीचें ज्ञान नव्हतें असें म्हणतातच ! रामचंद्रांच्या नुसत्या जन्माबरोबर लंकेच्या झालेल्या अवस्थेचें श्रीनाथांनीं जें वर्णन केलें आहे तशी अवस्था त्यांच्या वेळच्या आक्रमक रावणांची व्हावी अशी त्यांच्या अंतःकरणाची उसळी होती. ते म्हणतात :—

'श्रीराम जन्मला अयोध्यापुरी । तंव वीज पडे लंकेवरी ।
भूस्फोट नगरद्वारी । भूकंपा नगरी त्रिकुटेसी ।।
रावण जंव भद्री चढे । तव मुकुट पायरीवरी पडे ।
वायुघाते छत्र मोडे । सभेचे दुडे खचोनि पडती ।।
कुंभकर्णाच्या घरावरी । दिवाभीत भू भू करी ।
इंद्रजित आरशाभीतरी । देखे अशिर शरीर ।।
मंदोदरीची गळसरी । तुटूनि पडे अग्नीभीतरी ।
तीते काढी जंव सुंदरी । तंव भस्म करी हुताशन ।।

कौसल्येच्या डोहाळ्याचें वर्णन करतांना ते म्हणतात :—

‘ नांव ऐकोनि रावण । येरी म्हणे दे दे धनुष्यबाण ।
मारू राक्षस दारूण ।। ’
‘ मारू रावणा अति दुष्टा । रुंधीत स्वधर्म वाटा ।। ’
‘ राक्षसांच्या शिरकमळीं । खेळू लंकेपुढें चेंडूफळी ।
साजुक रुधिरांच्या कल्लोळी । तृप्त कंकाळी करू आजी ।। ’

ज्या रावणाच्या संबंधीं नाथांनीं हे तीव्र उद्‌गार काढले आहेत, त्या रावणाचें त्यांनींच वर्णन केलेलें स्वरूप पाहिलें म्हणजे नाथांचा रावण कोण ? याची यथार्थ कल्पना आल्यावांचून रहात नाहीं. सीतेला भय दाखवून वश करण्याचे प्रयत्न करतांना नाथांनीं रावणाच्या तोंडीं पुढील उद्‌गार घातले आहेत :—

‘परदारा स्वये भोगिता । पाप लागेल लंकानाथा ।
राक्षसांची स्वधर्मता । ऐक आता जानकिये ।।
आम्ही हरोनि परनारी । बळेंचि भोगाव्या निजघरी ।
परराज्याची थोरी । बळेंचि करी हरावी ।।
दैत्य दानव मानव । बळेंचि विभांडोनि सर्व ।
स्त्रियादि अपूर्व वैभव । आम्ही स्वयमेव भोगावे ।।

त्या वेळीं चाललेल्या जुलुमांचें हें जिवंत शब्दचित्र आहे. तत्कालीन एक कवि विष्णुदास नामा याचेविषयीं माहिमचे बखरीमध्यें असें म्हटलें आहे कीं, ‘ एके दिवशीं यवन बादशहानें नामदेवास भेटीस बोलावलें व त्याच्यापुढें गोमांस खावयास ठेवलें. पण नामदेवाच्या सामर्थ्यामुळें त्या गोमांसाचीं फुलें झालीं. महाराष्ट्र सारस्वतकार श्री. भावे आपल्या ग्रंथांत असें लिहितात कीं, ‘ कोणी सांगतात कीं, यानंतर बादशहानें त्याला त्याच्या कुटुंबासहित ठार मारलें. ’ (महाराष्ट्र सारस्वत, पृष्ठ २८८) या तत्कालीन वातावरणाचा विचार केला तर एकनाथांच्या रावणाची यथार्थ उपपत्ति लागते.

## एकनाथांचें कार्य

राष्ट्रपुनरुत्थानासाठीं दोन गोष्टींची खरी आवश्यकता असते. उज्ज्वल चारित्र्याच्या आदर्शाची निर्मिति व श्रद्धाजीवनाच्या

सूत्रानें एकत्र गुंफलेलें समाजसंघटन. महाराष्ट्रांत श्री नृसिंह सरस्वतींच्या दत्तसंप्रदायानें पहिली गोष्ट केली तर ज्ञानदेवांनीं वारकरी संप्रदायाच्या रूपानें दुसऱ्या कार्याचा सूत्रनिपात केला. श्री एकनाथांच्या जीवनांत दोन्ही संप्रदायांचें एकसूत्रीकरण झालें होतें. जागृतीचें लोण बहुजन समाजाच्या हृदयापर्यंत पोहोंचविण्यासाठीं त्यांच्या या मोठ्या ग्रंथांनीं भागण्यासारखें नव्हतें. त्यासाठीं त्यांनीं भारूड, बाजेगारी, नानक, जोगी गारुडी, दरवेशी, फकीर, जोगवा, वासुदेव, मानभाव, माळी, कोल्हाटी, डोंबारी इत्यादि अनेक लोकनाट्याचे प्रकार उपयोगांत आणून लोकांच्या हृदयापर्यंत आपला संदेश पोहोंचविला. नाथांच्या पूर्वी प्रचाराचें हें तंत्र कोणी उपयोगांत आणलें नव्हतें. या साहित्यांतून त्यांनीं दलित समाजाच्या अंतःकरणांत, राज्यकर्त्यांपेक्षां आपला धर्म श्रेष्ठ असून विवादांत ते आपल्यासमोर फिके आहेत; व तसा प्रसंगच आला तर खऱ्या आत्मोद्धारासाठीं त्यांना आपल्या समोर नमल्याशिवाय गत्यंतर नाहीं हें बिंबवून, त्यांच्यांत स्वधर्माविषयींचा विश्वास व अभिमान उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे. या दृष्टीनें त्यांचा हिंदु तुर्क संवाद अभ्यासण्यासारखा आहे. त्यांतील युक्तिवाद सर्वसामान्य लोकांच्या हृदयाची पकड घेण्यासारखा आहे. प्रकाण्ड पण्डित व ब्रह्मज्ञानी एकनाथ त्यांत नाहींत. तर धोरणी, व्यवहारी लोकसेवक व बहुजन समाजांतील एकनाथ त्यांत दृष्टोत्पत्तीस येतात. त्यांतील कांहीं युक्तिवाद पहा :—

‘ हिंदुकू तुरक कहे काफर । तो म्हणे विटाळ होईल परता सर ।
दोन्हींशी लागली करकर । विवाद थोर मांडिला ।।
खुदा माना पश्चिमेकडे । येर अवघे कां वोस पडे ।
मौजूद म्हणा चहूंकडे । हेही धडफुडे तुम्ही नेणा ।।
पांच बखत खुदाचे झाले । बाकी बखत काय चोरी नेले ।
तुमचें शास्त्र तुम्ही नेले । देवासी केले एकदेशी ।।
अम्हासी म्हणतां पूजितां फत्तरे । तुम्ही कां मुड्यावर ठेवितां चिरे।
दगडाचे पूजितां हाजीरे । पीर खरे ते माना ।।

केवळ जें कां मेलें मढें । त्यांची जतन करितां हाडें ।
फूल गलफ फतरियावरी चढे । उदसो तुम्ही पुढें जाळा ।।
हिंदू मुसलमान दोई । खुदाने पैदा किया भाई ।
तुर्ककी निष्ठा पाई । हिंदुकू पकडकर मुसलमान करो ।।
हिंदू करतां खुदा चुकला । त्याहून थोर तुमच्या अकला ।
हिंदूस मुसलमान केला । गुन्हा लाविला देवासी ।।
ब्राह्मण म्हणे अहोजी स्वामी । वस्तुतां एक तुम्ही आम्ही ।
विवाद वाढला न्यातिधर्मी । जाता परब्रह्मी असेना ।।
तुर्क कहे एक बात सही । खुदाकू तो जात नही ।
सर्वधर्म ज्याचा निमाला । मनोधर्म तुर्क ऐकला ।।
ते वेळीं केलें नमन । येरे दिधलें आलिंगन ।
दोघासी जाहलें समाधान । आनंदे संपूर्ण निवालें ।। '

येथें हिंदुधर्माच्या विशाल स्वरूपांत सर्वांनाच आत्मोद्धारार्थ विलीन व्हावें लागतें हें बहुजन समाजाच्या भाषेंत सांगितलें आहे. ८विधमय होऊं लागलेल्या महाराष्ट्रांत स्वधर्माला लागलेला राजयक्ष्मा पाहून नाथांनीं राष्ट्रीय अस्मितेच्या संजीवनी मंत्राचा समाजाच्या सर्व थरांत प्रयोग करून स्वधर्मनिष्ठेचें व स्वत्वाचें जें पुनर्जागरण केलें तें केवळ अलौकिक होय. त्यांच्या विशुद्ध जीवनाचा, लोककल्याणकारी भूमिकेचा व सामर्थ्यशाली प्रतिभेचा प्रभाव प्राचीन तुकारामापासून मोरोपंतापर्यंत व अर्वाचीन विद्वत्-कुलशेखर कृष्णशास्त्री चिपळूणकरांपासून तर ‘सर्वज्ञः स हि माधवः’ या शब्दांनीं लोकमान्यांनीं ज्यांना वर्णिलें त्या माधव-रावजी रानड्यांपर्यंत सर्वांच्या हृदयावर सारखाच आढळून येतो यांत त्यांचें अलौकिक विभूतिमत्त्व प्रकट होतें.

## श्रीतुकाराम महाराज

श्रीएकनाथांच्या विभूतिमत्त्वानें पुनर्जागृत व स्वाभिमानाच्या पायावर पल्लवित होत चाललेल्या देवनिष्ठेला व धर्मनिष्ठेला श्रीतुकाराम महाराजांनीं बहुजन समाजाच्या हृदयांत स्थिरपद

करून ज्ञानदेवांनीं प्रारंभ केलेलें कार्य पूर्णावस्थेस नेलें. म्हणूनच संत श्री बहिणाबाई सिऊरकर यांनीं 'तुका झालासे कळस' असें त्यांचें यथार्थ वर्णन केलें आहे. श्रीतुकाराम महाराजांचें जीवन हें अनेक दृष्टींनीं अपूर्व आहे. सामान्य जीवनांत अखंड परिश्रमानें 'ब्रह्मरूपकाया' होऊन सिद्धावस्थेची कशी प्राप्ति होते याचें ते ज्वलंत उदाहरण आहे. हिंदू अस्मितेचें चरमसाध्य, त्यासाठीं करावी लागणारी अखंड साधना व कठोर कर्मयोग यांचा त्रिवेणीसंगम त्यांच्या जीवनांत जसा झाला आहे असा अन्यत्र ठळकपणें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. त्यांचें जीवन हें टांकीचे घाव सोसून मिळविलेल्या देवपणाचें ज्वलंत उदाहरण असून सामान्य जीवनाला त्यांतून अपूर्व आश्वासन मिळतें. स्वतः त्यांनींच आपली लौकिकांतून अलौकिकतेंत परिणत झालेली जीवनगाथा वर्णिलेली आहे. ती पुढीलप्रमाणें:–

## तुकोबांचें आत्मचरित्र

याति शुद्र वंश केला वेवसाव । आदि तो हा देव कुळ पूज्य ।।
नये बोलो परी पाळिले वचन । केलियाचा प्रश्न तुम्ही संती ।।
संवसारे झालो अति दुःखे दुःखी । मायबाप सेखी क्रमिलिया ।।
दुष्काळें आटिले द्रव्यें गेला मान । स्त्री एकी अन्न करितां मेली ।।
लज्जा वाटे जीवा त्रासलो या दुःखे । वेवसाय देखें तुटी येतां ।।
देवाचें देऊळ होते ते भंगले । चित्तासी जे आले करावेसे ।।
आरंभी कीर्तन करी एकादशी । नव्हते अभ्यासी चित्त आधी ।।
कांहीं पाठ केली संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करोनिया ।।
गाती पुढें त्यांचे धरावे ध्रुपद । भावें चित्त शुद्ध करोनियां ।।
संतांचें सेविलें तीर्थपायवणी । लाज नाहीं मनी येऊं दिली ।।
टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हे शरीर कष्टवूनि ।।
वचन मानिले नाही सुहृदांचें । समूळ प्रपंचें वीट आला ।।
सत्य असत्यासी मन केलें ग्वाही । मानियेले नाही बहुमता ।।
मानियेला स्वप्नी गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामी ।।

यावरि या झाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्ती विठोबाचे ।।
भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसें कळो आले ।। "

इहलौकिक जगांत श्रीतुकाराममहाराजांचें कोणीहि गुरु नाहींत. त्यांना स्वप्नामध्यें आपल्या सद्गुरूचा साक्षात्कार व मंत्रोपदेश झालेला आहे. ते म्हणतात:—

सद्गुरूराये मज कृपा केली । परी नाही घडली सेवा कांहीं ।।
भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ।।
राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण माळिकेची ।।
बाबाजी आपले सांगितले नाम । मंत्र दिला रामकृष्ण हरी ।।
माघ शुद्ध दशमी पाहूनि गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ।।

बाबाजी चैतन्यासारख्या अधिकारी व विमुक्त सिद्धानें आपण होऊन अनुग्रह करावा इतका आध्यात्मिक अधिकार दृढव्रती तुकोबांनीं आपल्या नामनिष्ठेनें प्राप्त करून घेतला होता. नाथ-संप्रदायाचें असें म्हणणें आहे कीं शिष्याला गुरु शोधावा लागत नसून त्याची तितकी योग्यता झाली कीं सद्गुरु स्वत: होऊनच त्याचा शोध करीत येतात व त्याला कृतार्थ करतात. श्रीज्ञानदेव म्हणतात "ऐसी कर्मं साम्यदशा । होय तेथवी रेषा । मग श्रीगुरू आपैसा । भेटेचिगा ।। " हा सिद्धान्त तीनशें वर्षांपूर्वीं श्रीतुकाराम महाराज व आधुनिक कालखंडांत श्री रामकृष्ण परमहंस या दोघांच्या चरित्रांत पूर्णपणें प्रत्ययास आलेला आहे. हा सिद्धान्त प्रत्ययास यावयास आवश्यक तो अधिकार संपादन करण्याचा दोघांचा साधनमार्गहि एकच असल्याचें प्रत्ययास येतें. आपल्या नामोपासनेसंबंधांत श्रीतुकारामांनीं म्हटलें आहे:—

पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न करी तीर्थव्रत ।।
व्रत एकादशी राहीन उपवासी । गाईन अहर्निशी तुझे नाम ।।
विठो तुझे नाम गाईन मी वाचे । बीज कल्पान्तीचें तुका म्हणे ।।

केवळ नाममंत्राच्या साधनानें दृढ धारणेनें दिव्यत्वाचीं दारें ठोठावणाऱ्या तुकाराम महाराजांना 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा

ठाणे. स्थळप्रत
दि: ........


दि: ..........

प्रसंग' असा आपल्या उफाळणाऱ्या अंतःप्रवृत्तीशीं घनघोर अंतः-संघर्ष करावा लागला.

त्यांच्या हृदयांत, साधनानुष्ठानानें, तीव्र संवेग उत्पन्न होऊन ईश्वराच्या प्रत्यक्ष दर्शनाविषयीं तळमळीचें प्रचंड तुफान माजून राहिलें होतें. ते म्हणतातः—

"कन्या सासुरासी जाये । मागे परतूनि पाहे ॥
तैसे झाले माझ्या जीवा । केव्हां भेटू गा केशवा ॥
जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥"
माझिये मनीचा जाणा हा निर्धार । जिवासी उदार झालो आता ॥
"चुकलिया माये । बाळ हुरूहुरु पाहे ॥"

"तीव्रसंवेगानामासन्नः" म्हणजे ज्यांच्या हृदयांत ईश्वरदर्शनाची तळमळ खऱ्या उत्कटतेनें प्रकट होते त्यांना ईश्वराचें दर्शन दूर नाहीं." या भगवान् पतञ्जलींच्या सिद्धान्ताचा प्रत्यय तुकाराम महाराजांना लवकरच आला. त्यांना झालेल्या सगुण व निर्गुण साक्षात्काराचें वर्णन त्यांच्याच शब्दांत पुढीलप्रमाणेंः—

"भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसें कळो आले ॥"
"पैल आले हरी । शंखचक्र गदा करी ॥"
"गोडपणे जैसा गुळ । तैसा देव झाला सकळ ॥"
"जेथे देखे तेथे उभा । अवघ्या गगनाचा गाभा ॥"
"झाला माझा आता प्रेतरूप भाव"
"आपुले मरण पाहिले म्या डोळा ॥"
"तुका म्हणे गंगासागर संगमी"
अवघ्या झाल्या उर्मी एकमय ॥"
"अणोरणीया थोकडा । तुका आकाशाएवढा ॥"

श्रीतुकाराम महाराजांनीं याप्रमाणें केवळ स्वतःच्या प्रयत्नांनीं सामान्य जीवनांतूनही ब्राह्मी स्थिति अथवा दिव्यत्व प्राप्त करून घेतलें तरी "नैर्गुण्यस्था रमन्ते स्म गुणानुकथने हरेः" या सिद्धान्ता-प्रमाणें ते ज्ञानोत्तर प्रेमभक्तीचा पुरस्कार करतांना दिसतात. देवापाशीं मागणें मागतांना ते म्हणतातः—

"नको ब्रह्मज्ञान । आत्मस्थिति भाव ॥
मी भक्त तूं देव । ऐसे करी ॥
नलगे हें मज । तुझें ब्रम्हज्ञान ॥
गोजिरें सगुण । रूप पुरें ॥

तात्पर्य, श्रीतुकारामांनीं आपल्या जीवनांत भारतीय संस्कृतीचा ध्येयभूत जो मोक्ष हा परम पुरुषार्थ तो तर प्राप्त करून घेतलेलाच होता; पण त्याचबरोबर श्रीज्ञानदेव जिला 'चहूं पुरुषार्थां शिरी' असें वर्णितात ती ज्ञानोत्तर भक्ति त्यांच्या रोमरोमांतून प्रगट होऊन ते भागवतधर्मीयांचे मुकुटमणि होऊन राहिले होते. याप्रमाणें स्वतःच्या जीवनाचें परिपूर्ण साध्य मिळविल्यावर ज्ञानदेवांच्या परंपरेंत वाढलेल्या तुकाराम महाराजांनीं आपली दृष्टि जगाकडे—भारतवर्षाकडे वळविली. यवनांकित भारताचें आध्यात्मिक, नैतिक व लौकिक अधःपतन पाहून त्यांचें हृदय कळवळलें. व शेष जीवन त्यांनीं पतित भारताचीं अस्मिता पुनरुज्जीवित करण्यास्तव वेंचलें. आपली हृदयव्यथा व जीवित कार्य सांगतांना श्रीतुकाराम महाराज म्हणतात "न देखवे डोळा ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होते ॥ काय तुम्ही येथें नसालसें झालें । आम्ही न देखिले पाहिजे हे ॥" प्रत्यक्ष परमेश्वरालाच त्याचें अस्तित्व सिद्ध करणारा पुरावा देण्याची गळ घालणारे श्रीतुकाराम राष्ट्राचें सर्वांगीण अधःपतन पाहून किती उद्विग्न झाले असतील याची त्यांच्या वरील उद्गारांनीं निश्चिति पटल्याविना रहात नाहीं.

## श्रीतुकारामांचा ध्येयवाद

सभोंवतालच्या या परिस्थितींत परिवर्तन घडवून आणण्याचा एकच मार्ग श्रीतुकारामांनीं निश्चित केला, व तो म्हणजे श्रीज्ञानदेव एकनाथांच्या पावलावर पाऊल टाकून राष्ट्राची अस्मिता पुनरुज्जीवित करणें हा होय. मागें श्रीज्ञानदेवांच्या संबंधींच्या प्रकरणांत उल्लेखिल्याप्रमाणें प्रार्थना समाजिस्ट वा कम्युनिस्ट

आदि पक्षांध विवेचक म्हणतात त्याप्रमाणें नवनिर्माणाची घोषणा न करतां शाश्वत चिरंतन अशा प्राचीन भारतीय जीवनमूल्यांच्या पुनरुत्थानाची म्हणजे भारतीय राष्ट्राच्या अस्मितेच्या पुनरुज्जीवनाचीच श्रीतुकारामांनीं घोषणा केलेली आहे. ते म्हणतात :—

"आम्ही वैकुंठवासी। आलो याचि कारणासी ॥
बोलिले जे ऋषी। साच भावे वर्ताया ॥
धर्म रक्षावयासाठी। करणें आटी आम्हासी ॥
वाचा बोले वेद नीती। करूं संती केले ते ॥
तीक्ष्ण उत्तरें। हाती घेउनि बाण फिरे ॥
नाही भीड भार। तुका म्हणे सान थोर ॥
हेंचि आम्हा काम। बीज वाढवावे नाम ॥"

" वेद बाह्यलंड तो बोले पाषांड। त्याचें काळे तोंड संतामध्यें।

तात्पर्य, युगधर्मानुरूप नामसंकीर्तनाच्या सूत्रांत समाजजीवन गुंफून त्या द्वारें प्राचीन मूल्यांची समाजजीवनांत प्रतिष्ठापना करणें व निःश्रद्ध राष्ट्रांत श्रद्धाजीवन निर्माण करणें हेंच श्रीतुकारामांचें त्यांच्या शब्दांतून सिद्ध होणारें जीवितकार्य आहे. हें जीवितकार्य पार पाडावयास लागणारी धमक व आत्मप्रत्यय त्यांच्या ठिकाणीं परिपूर्ण होता. श्री तुकारामांचा आत्मप्रत्यय ज्ञानदेवाप्रमाणेंच मन आश्चर्यानें स्तिमित करणारा आहे.

## तुकारामांचा आत्मप्रत्यय

श्रीतुकाराम म्हणतात :—

" तोंवरी तोंवरी शोभतील गारा। जंव नाहीं हिरा प्रकाशला ॥
तोंवरी तोंवरी शोभती दीपिका। नुगवता एका भास्करासी ॥
तोंवरी सांगती संताचिया गोष्टी। जव नाही भेटी तुक्यासवें ॥"

"घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहाती। मुक्ता आत्मस्थिति सांडवीन॥
ब्रह्मीभूत होते कायाच कीर्तनी। भाग्य तरी ऋणी देव ऐसा ॥
तीर्थ भ्रामकासी आणीन आळस। कडु स्वर्गवास करीन भोग॥
सांडवीन तपोनिधी अभिमान। यज्ञ आणि दान लाजवीन ॥
धन्य म्हणवीन इह लोकी लोका। भाग्य आम्ही तुका देखियेला ॥"

"वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा। येरांनीं वहावा भार माथा ॥"

या आध्यात्मिक आत्मप्रत्ययाप्रमाणेंच त्यांच्या सरळ व हृदयाला जाऊन भिडणाऱ्या काव्यशक्तींत अपूर्व तेज, भव्य कल्पनाशक्ति व प्रसाद यांचा आश्चर्यजनक संगम झालेला होता. त्यांचे दृष्टान्त व उपमा ज्ञानदेवाप्रमाणेंच हृदयाचा ठाव घेणारे आहेत त्यांच्या कल्पनाशक्तीची व दृष्टान्ताचीं कांहीं उदाहरणेंच पहा :—

"वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरें। पक्षीही सुस्वरे आळविती ॥
आकाशमंडप पृथिवी आसन। रमे तेथें मन क्रीडा करी ॥
हरिनाम भोजन परवडी विस्तार। करूं या प्रकार सेवूं रुची॥"
"सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें। भक्षावया दिले श्वानालागी ॥
मुक्ताफळ हार खरासी घातला। कस्तुरी सूकरा चोजविली ॥
तुका म्हणे ज्याचें तोचि एक जाणें। साधूचें महिमान साधू जाणें॥"
" न लगे चंदना सांगावा परिमळ। वनस्पती मेळ हांकारूनी ॥
तुका म्हणे मेघ नाचवी मयूरें। लपविता खरें येत नाहीं ॥"

तुकारामांच्या 'चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती'अथवा 'द्वारपाळ विनंति करी। हारी उभें राउळी' अशासारख्या कांहीं अभंगातून तर अपूर्व मंत्रसामर्थ्य असल्याचा सांप्रदायिकांचा संकेत आहे. त्यांचें भावकाव्य मराठी साहित्याचा अमर अलंकार होय. ज्ञानदेवांची अथवा नाथांची कविता सुसंस्कृत हृदयाचा ठाव घेते परंतु तुकोबांच्या कवितेनें भागवतधर्माला खऱ्या अर्थानें जनहृदयाचा धर्म बनविलें. त्यांच्या कवितेंतील वक्तृत्व व वेधकता केवळ अपूर्व असून इतकी साधी, इतकी हृदयाला जाऊन भिडणारी, इतकी उत्कट व इतकी हृदयंगम मराठी कविता दुसरी कोणाचीहि नाहीं. त्यांची कित्येक वाक्यें श्रुतिवाक्याप्रमाणें बहुजन समाजाच्या तोंडांत सदाचीं घोळणारीं आहेत. उदाहरणार्थ,

'जोडोनिया धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेंच करी ॥'
'भिक्षापात्र अवलंबिणे। जळो जिणें लाजिरवाणे ॥'
'सुखे करावा संसार'
'पराविया नारी माउली समान'

'आर्तभूता द्यावे अन्न । खरे पुण्य त्या नांवें ।।
'जेणें वाढे अपकीर्ति । सर्वार्थी ते सोडावे ।।
'असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।।'
'तुका म्हणे ऐशा नरा । मोजोनि माराव्या पैजारा ।।'

अशीं किती तरी मौक्तिकें येथें मांडून दाखवितां येतील.

## श्रीतुकारामांचें कार्य

श्रीतुकाराम महाराज हे बहुजन समाजासाठीं व बहुजन समाजाच्या भाषेंत बोलले आहेत. सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक क्षेत्रांतील दंभ दूर करून समाजांत निर्मळ श्रद्धा-जीवन निर्माण करतांना त्यांनीं कोणाचीहि तमा बाळगलेली नाहीं. त्यांचें 'आर्त' जसें हृदयाला जाऊन भिडतें तसेंच त्यांच्या आसुडाचे फटके पाठीचें धिरडेंहि करूं शकतात; अभिजाततेच्या परिभाषेंत क्वचित् ग्राम्य ठरतील असेहि उद्‌गार, आपलें म्हणणें बहुजनसमाजाच्या गळीं उतरविण्यासाठीं ते काढतात. "शाक्त गधडा एकदेसी" अथवा "चिरगुटे बांधोनी वाढविलें पोट। गव्हार बोभाट जनामध्यें" हे त्यांचे त्या मानानें अगदीं सौम्य वाक्प्रयोग होत असें म्हटलें तरी चालेल. हिंदू धर्माचें चरम साध्य त्यांनीं प्रत्यक्ष साक्षात्कारानें अनुभविलें होतें. महाराष्ट्राच्या घराघरांतून त्याची अनुभूति वाटून त्यांनीं धर्म व श्रद्धेच्या क्षेत्रांत घराघरांतून आत्मप्रत्यय निर्माण केला. श्रीतुकाराम महाराजांच्यामुळेंच पंडित-अपंडित, शूद्र-अतिशूद्र यच्चयावत् बहुजन-समाज देवनिष्ठेच्या व धर्मनिष्ठेच्या सूत्रांत उपनिबद्ध होऊन पंढरीच्या पांडुरंगाच्या केन्द्राभोंवतीं एकात्म भूमिकेवर आला. श्रीतुकारामांच्या ठिकाणीं स्वतंत्र संप्रदायप्रवर्तकाचें सामर्थ्य होतें. पण विश्वकल्याणाची चिंता वाहणाऱ्यांना व्यक्तित्व व अहंकाराच्या भावनांचा संस्पर्शहि नसतो. ज्ञानदेवांच्या प्रतिभेच्या हिमाचला-पासून प्रवर्तित झालेल्या गंगोत्रीचेंच सप्त स्रोतस्विनी विशाल भागीरथींत प्रवर्तन करण्यांत त्यांनीं धन्यता व जीवितसाफल्य मानलेलें आहे. ज्ञानदेवांच्या चरणीं त्यांची इतकी नम्र निष्ठा आहे कीं, एका ठिकाणीं त्यांचें वर्णन करतांना ते म्हणतात :--

ज्ञानियांचा राजा गुरुमहाराव । म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हां ।।
मज पामरा हे काय थोरपण । पायींची वहाण पायीं बरी ।।

आपला अवतार प्राचीन धर्ममूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठींच आहे अशी त्यांना, ब्राह्मी स्थितीनंतर, स्वतःच्या जीवितकार्याची पुरेपूर ओळख पडलेली होती. विश्वकल्याणासाठीं वैश्विक अधिष्ठानावर उभारलेल्या भारतीय धर्माला ज्ञानदेवांनीं चढविलेल्या भागवत धर्माच्या अभेद्य कवचाची ओळख बहुजनसमाजाच्या मनाला त्यांनीं करून दिली. तें कवच खऱ्या अर्थानें त्यांनीं महाराष्ट्राला लेवविलें. आजच्या यंत्रयुगांतहि या कवचाच्या सामर्थ्यानें भारतीय संस्कृति व वैदिक धर्म टिकूं शकेल. तुकारामांचें नांव घेत घेतच पण कालचे व आजचे सुधारक भेद मोडण्यावर जोर देऊन समता प्रस्थापित करूं पाहतात. पण त्यांत कालच्यांना यश आलें नाहीं, आजच्यांना तें येण्याचा संभव नाहीं. त्यांची एक नवी जात निर्माण होण्यांत मात्र त्यांचे प्रयत्न पर्यवसित झाले आहेत – होत आहेत. श्रीतुकाराम महाराजांनीं भेद मोडण्यावर जोर न देतां उच्च जीवनध्येयाच्या सूत्रांत समाज एकरूप केला व समतेच्या पायावर एकसूत्रित समष्टिजीवन उभारून दाखविलें. म्हणूनच ते भागवत धर्ममहामंदिराचे कळस होत. त्यांनीं प्रवृत्त केलेल्या भागवतधर्माच्या स्रोतस्विनींत मुसलमान सुद्धां एकरूप झाल्याचीं उदाहरणें आढळतात.

याप्रमाणें श्रीशिवपूर्व काळांत श्रीज्ञानदेवांपासून राष्ट्राला श्रद्धाजीवनाचें अधिष्ठान देण्याचें, राष्ट्राच्या पतनावस्थेंत सर्वांत अधिक आवश्यक असलेलें कार्य प्रारंभ होऊन तें श्रीतुकारामांच्या मुळें पूर्ण झालें. राष्ट्राच्या पायाभरणीचें हें कार्य मूलभूत स्वरूपाचें असल्यामुळें युगावतार शिवछत्रपतींच्या कार्याचें स्वरूप त्याशिवाय खऱ्या अर्थानें स्पष्ट होत नाहीं. संतांनीं महाराष्ट्रांतील समाजजीवनाच्या सर्व थरांत श्रद्धाजीवन उत्पन्न करून ही जी राष्ट्रजीवनाची भूमिका सिद्ध केली तिच्यांत पुनरुत्थानाचें तेज ओतणारा, त्यासाठीं योजनाबद्ध कार्याची आंखणी करणारा व नव्या युगाच्या आगमनाची साद घालणारा महामांत्रिक हवा होता, तो महाराष्ट्राला श्रीसमर्थांच्या रूपानें मिळाला.

✦ ✦ ✦

प्रकरण चौदावें

# श्रीसमर्थ रामदास

महाराष्ट्रांत संतपरंपरेनें निर्माण केलेल्या निष्ठाजीवनांत तेज व पुनरुत्थानाची आकांक्षा निर्माण करणारे अवतारी पुरुष श्रीसमर्थ रामदास हे होत. ते श्रीतुकाराममहाराजांच्या समकालीनच होते. समर्थ हे छत्रपति शिवप्रभूंचे आध्यात्मिक गुरु म्हणून राजगुरु या नात्यानें तर त्यांचें महत्त्व आहेच; पण त्याचबरोबर व्यासानंतरचे लोकशिक्षक व राष्ट्रगुरु म्हणून त्यांचें महत्त्व अनन्यसामान्य आहे. ज्याच्याविषयीं अतिरिक्त प्रशंसा व तोल सोडून केलेली निंदा ऐकूं येते त्याला यथार्थतेनें श्रेष्ठ पुरुष म्हणावें असें कांहीं जीवनशास्त्राच्या अभ्यासकांचें मत आहे श्रेष्ठ पुरुषाचें हें लक्षण श्रीसमर्थांच्या जीवनाला यथार्थतेनें लागू पडतें. श्रीसमर्थांच्या विषयीं उत्कटतेनें लिहिणारे राजवाडे, भट प्रभृति एकांगी विचारसरणीचे लोक जसे आहेत तसेच या प्रशंसेचे उलट टोक गाठणारे प्रा. फाटक, बहिरट प्रभृतीहि लोक आहेत. समर्थांच्या राजवाडे प्रभृति प्रशंसकांनीं केलेली वारकरी संप्रदायाची टवाळी कशी अयथार्थ आहे हें आपण यापूर्वीं पाहिलेंच आहे. श्रीसमर्थांचे फाटकांच्या सारखे निर्गल निंदक व बहिरटांच्यासारखे भावनाविवश टीकाकार यांचें लेखनहि असेंच अयथार्थ आहे. श्रीसमर्थांच्या कार्याचें समालोचन करण्यापूर्वीं त्यांच्या अद्भुत व अलौकिक चरित्राच्या घडणीकडे पाहणें आवश्यक आहे.

## श्रीसमर्थांचें अद्भुत चरित्र

श्रीसमर्थांच्या वडिलांचें नांव सूर्याजीपंत ठोसर आणि आईचें नांव रेणाबाई असें होतें. सूर्याजीपंत भगवान् सूर्यनारायणाचे निष्ठावंत उपासक असून त्यांच्या कडकडीत सूर्योपासनेचेंच फळ त्यांना श्रीसमर्थांच्या रूपानें शके १५३० चैत्र शु. ९ मी ला मध्यान्हकाळीं जांब येथें मिळालें. या दांपत्याला दोन मुलें झालीं.

जेष्ठ पुत्र गंगाधरपंत अथवा श्रेष्ठ व धाकटे चिरंजीव नारायण अथवा श्रीसमर्थ. वडील पुत्र गंगाधरपंत यांनीं आपल्या जीवनांत श्रीएकनाथ महाराजांप्रमाणेंच प्रपंच व परमार्थ यांची सांगड घालून दाखविली; तर धाकटे साऱ्या राष्ट्राचा प्रपंच उभारण्या-साठीं अग्रेसर झाले. श्रीसमर्थचरित्रविषयक साहित्य हल्लीं पुष्कळ उपलब्ध झालें असून त्यांचीं अनेक चरित्रें लिहिलीं गेलीं आहेत व लिहिलीं जात आहेत. प्रस्तुत ग्रंथांत श्रीशिवचरित्राच्या पार्श्वभूमीला आवश्यक इतकाच त्यांच्या चरित्राचा परामर्श घेण्यांत यावयाचा आहे. वैराग्य हा श्रीसमर्थांचा स्थायीभाव असून ईश्वरदर्शनाच्या तळमळीचें तांडव त्यांच्या हृदयाकाशांत फार लहानपणापासून माजून राहिलें होतें. त्यांचे वडील फार लहानपणींच निवर्तले. आईच्या आग्रहास्तव त्यांच्या जेष्ठ बंधूंनीं त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्या लग्नाचा घाट घातला. पण ऐन लग्नसमारंभांत 'सावधान' हे शब्द ऐकतांच त्यांनीं बोहल्यावरून खालीं उडी घेतली व मंडपांतून ते पळून गेले. त्या वेळीं तेथें काय कहर उडाला असेल याची कल्पनाच केलेली बरी! त्यानंतर त्यांनीं टाकळी येथें बारा वर्षें गायत्री मंत्राचें व तेरा कोटी राम-नाम मंत्राचें पुरश्चरण करून ईश्वरी साक्षात्कार करून घेतला असें त्यांच्या बहुतेक चरित्रकारांनीं लिहिलेलें आहे. पण या संबंधांत श्रीसमर्थसाहित्याचे निष्ठावंत अभ्यासक व उपासक कै. शंकर श्रीकृष्ण उपाख्य नानासाहेब देव यांनीं वेगळें विवेचन, प्रमाणें उद्धृत करून केलेलें आहे. समर्थ साहित्यावरील नाना-साहेबांचा अधिकार लक्षांत घेतां तें यथार्थ मानावयास प्रत्यवाय असूं नये. कै. नानासाहेब लिहितात, "श्रीसमर्थांनीं पुरश्चरण कशाचें केलें, गायत्री मंत्राचें कां त्रयोदशाक्षरी मंत्राचें, असा प्रश्न आहे. मला वाटतें त्यांनीं पुरश्चरण केलें असावें गायत्रीमंत्राचें व त्रयोदशाक्षरी मंत्र एरव्हीं अखंड जपला असावा. या माझ्या वाटण्याला एका पदांत, दूरचा कां होईना, पण किंचित् आधार मिळतो.

वंश रघुनाथजीचा । प्रगट प्रताप जयाचा ।। धृ० ।। गि. ११०
पुण्यपरायण धार्मिक राजे । काय वदावें वाचा ।।१
सत्वधीर माहावीर बळाचें । बोधचि थोर नीतीचा ।।२
दास म्हणे मज ध्यास तयाचा । खडतर सूर्य तपाचा ।।३
याप्रमाणें श्रीसमर्थांनीं खडतर तप केलें."

—(श्री समर्थ हृदय पृ. ५५२)

श्रीसमर्थांना झालेल्या श्रीरामचंद्रांच्या सगुण साक्षात्कारा-'संबंधानें श्री. नानासाहेब देव यांनीं लिहिलें आहे :–

## भेट कोणी करविली

सोडविल्या देवफौजा । आला वैकुंठीचा राजा ।।
संहारिले रजनीचर । देवभक्ताच्या काजा ।।
दास मी समर्थाचा । मज कोणी जाणेना ।
मुळीची कुळदेव्या हे । तिणें रक्षिलें मला ।। धृ० ।।
अजिंक ते संहारिले । भूमिभार फेडिला ।।
ऐसा हा समर्थाला । जिणें वर दिधला ।।२।।
ते सोय धरूनिया । गेलों तुळजेच्या ठायां ।
तिणें मज आश्वासिले । भेटविलें रामराया ।।३।।

'मज कोणी जाणेना' अशा काळांतील म्हणजे आरंभींच्या काळांतील हें पद दिसतें. तुळजापूरच्या देवीनें रामाला वर दिला होता, हें ऐकून श्रीसमर्थ तुळजापुरास गेले असतां देवीनें श्रीसमर्थांस रामरायाची भेट करविली. भेट झाली व कृतार्थ झाले.

"फावलें रे हरिसुख फावलें रे ।। धृ० ।।
राया दशरथा नृपासी । माते कौसल्ये जननीसी ।
नगरवासियां लोकांसी । सुख फावलें रे ।।१।।
जें सुख फावलें त्रिबका । जें सुख फावलें वाल्मीका ।
तें रामदास रंका । सुख फावलें रे ।।२।। " आणि मग
"दास उदास फिरे विवरे । चित्त निवालें रे ।।"

'करीं चापबाण' हें श्रीसमर्थांच्या रामाचें वैशिष्ट्य होय. स्वाभाविक आहे. साधूंचें रक्षण आणि दुष्टांचा संहार हेंच ज्यांच्या अवतारकार्याचें स्वरूप तें अखंड सुसज्ज असणार हें उघड आहे.

"तेथें माझें तन मन धन ॥ धृ० ॥
परम सुन्दर रूप मनोहर । करीं धरुनि धनुर्बाण ॥१
राम लक्ष्मण जनकतनया । वामभागीं शोभताहे ॥२
पीत पीतांबर कासिला कासे । शोभतसे दिव्य ठाण ॥३
भीम भयानक सन्मुख मारुति । कर जोडुनि वाट पाहे ॥४

त्यांच्या हृदयांत रामाचें जें ठाण बिंबलें होतें त्यांत रामाच्या हातीं धनुष्यबाण कायमचें होतें. उपास्याच्या स्वरूपावरून उपासकाच्या हृदयाची परीक्षा करणें योग्य होत असेल तर, श्रीरामाचें हें ध्यान पाहून श्रीसमर्थहृदयाची कल्पना करतां येते."

— (श्रीसमर्थहृदय पृ. ५३५ व ५३६)

श्रीसमर्थ व श्रीतुकाराममहाराज या दोघांच्याहि चरित्रांत एका बाबतींत विलक्षण साम्य दृष्टोत्पत्तीस येतें व तें म्हणजे दोघांनाही लौकिक अर्थानें कोणी समकालीन व्यक्ति गुरु म्हणून स्वीकारण्याचें कारण पडलें नाहीं. श्रीतुकाराम महाराजांना स्वप्नांत मंत्रोपदेश व सिद्ध साक्षात्कार झाल्याचें आपण मागें पाहिलेंच आहे. श्रीसमर्थांनीं आपल्या तपस्येनें श्रीरामचंद्रांचा साक्षात्कार घेऊन त्यांनाच आपले गुरु केलें. श्री. नानासाहेब देव म्हणतात, "श्रीराम मंत्र हा उघडा मंत्र आहे. तो आम्हांस श्री समर्थांपासून मिळाला आणि त्यांना तो श्रीरामचंद्रांपासून मिळाला होता. त्यांचे गुरु श्रीराम, याविषयीं शंका नको. याला प्रत्यक्ष त्यांच्याच वचनांचा आधार आहे.

पंकजीं मन मुरे सद्‌गुरुपादपंकजी मन मुरे ॥ धृ० ॥
मनीं मनपण सर्वहि आपण । तेणें गुणें हांव पुरे ॥१
परब्रह्मीं भार होता अगोचर । तेणें गुणें माया विरे ॥२
निजपदीं मन जडता अभिन्न । निखळ सुख उरे ॥३

हेंचि हें साधन आत्मनिवेदन । मीपण तेंहि नुरे ।।४
रामदासीं रामरूप निजधाम । पावतां निःसंग रे ।।५

हें जें गिरिधरलिखित पूर्वार्धांतील श्री समर्थांचें पांचवें सुंदर पद त्यांतून हाच अर्थ निघत नाहीं काय कीं, श्रीसमर्थ श्रीरामालाच आपला गुरु मानीत आहेत? इच्छा करणें हा ज्या मनाचा धर्म तें सद्गुरुचरणकमलीं भृंगवत् जडून बसेल तर इतर सर्व वासनांचा क्षय होणार नाहीं काय? परब्रह्माच्या ठिकाणीं आपण लीन होऊन राहिल्यावर आपल्यापुढें माया आपलें डोकें वर तरी काढूं शकेल काय? आपल्या मूळ स्वरूपाशीं मन एकरूप होऊन गेल्यावर ब्रह्मानंदाशिवाय दुसरी कोणतीहि वृत्ति शिल्लक राहील काय? असे तीन दृष्टान्त देऊन जेव्हां श्री समर्थ म्हणतात कीं, सद्गुरु-पादपंकजीं आपलें मन लीन होऊन गेलें आहे आणि रामाचें स्वरूप हेंच आपलें निजधाम व तें प्राप्त करून घेऊन आपण निस्संग झालों आहोंत, तेव्हां या त्यांच्या वचनांतून श्रीराम हेच त्यांचे गुरु होत असा अर्थ निघत नाहीं काय? पण अशा एखाद्या वचनाचा अर्थ लावीत बसण्याची इतकी पंचाईत हवी कशाला? ज्या समासांत श्री समर्थांनीं सर्व सांप्रदायिकांना यावच्चंद्रदिवाकरौ मंत्रोपदेश करून ठेवला त्या समासांतच ते आपल्या शिष्याला स्पष्ट शब्दांत म्हणत आहेत कीं :–

"राम स्वामी जाण माझा। तरी तो तुज होये आजा ।। "

तूं माझा शिष्य, तेव्हां माझे स्वामी श्रीराम हे तुझे आजोबा लागतात! येथें आतां काय शंका उरली कीं श्रीसमर्थांचे गुरु श्रीराम होत?

हनुमंत आमुची कुळवल्ली । राम मंडपा वेल गेली ।
श्रीराम भक्तीनें फळली । रामदास बोलें या नांवें ।।१
आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचें मुख्य दैवत ।
तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धीतें न पवे की ।।२
साह्य आम्हांसी हनुमंत । आराध्य दैवत श्री रघुनाथ ।
सद्गुरु श्रीराम समर्थ । काय उणें दासासी ।।३

दाता येक रघुनंदन । वरकड लंडी देईल कोण ।
तया सोडोन आम्ही जन । कोणाप्रती मागावें ।।४
म्हणोन आम्ही रामदास । रामचरणीं आमुचा विश्वास ।
कोसळोन पडो रे आकाश । आणिकाची वासना पाहू ।।५
स्वरूप संप्रदाय अयोध्यामठ । जानकी देवी श्रीरघुनाथ दैवत ।
मारुती उपासना मार्ग नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासी ।।६

या सहा ओव्यांवरून श्रीराम हे समर्थांचे गुरु होत, हें तर सिद्ध होतच आहे, पण त्याशिवाय श्रीरामांवर त्यांचा किती अढळ विश्वास होता आणि त्यांचा निर्धारहि किती दांडगा होता, हें आपल्या निदर्शनास येत आहे."

—(श्रीसमर्थ संप्रदाय पृ. ११९ व १२१)

## देशस्थितीचा अभ्यास

याप्रमाणें नरदेहांत येऊन भारतीय संस्कृतीप्रमाणें जें मिळवावयास पाहिजे तें मिळवून सिद्ध झाल्यावर लोककल्याणाच्या कार्याकडे त्यांनीं दृष्टि वळविली. ज्यांच्या कल्याणाच्या कार्यास्तव आपलें शेष जीवित वेचावयाचें, त्यांची स्थिति प्रत्यक्ष पाहिल्यावांचून आपल्या कार्याचा प्रारंभ करणें उचित नाहीं असें त्यांना वाटलें व त्यासाठीं त्यांनीं संपूर्ण भारताची यात्रा केली. प्रत्यक्ष साऱ्या देशभर हिंडून व समाजनिरीक्षण करून लोकस्थितीचा अभ्यास करावा व नंतरच कार्याची पद्धति ठरवावी असा सर्वंकष स्वरूपाचा विचार समर्थांपूर्वी प्रत्यक्ष कोणाच्या आचारांतून तरी दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. श्रीसमर्थांचा संचार कोठें कोठें झाला याची कल्पना देणारीं दोन प्रकरणें श्री समर्थ वाग्देवता मंदिरांतील बाडांक ६१८ मध्यें आहेत. त्यांवरून एकंदर अयोध्या ते कन्याकुमारी अशा दक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम भरतखंडांतील १०२९ गांवीं त्यांनीं पदयात्रा केल्याचें आढळून येतें. बारा वर्षें तपस्या करून त्यांनीं आध्यात्मिक शक्तीची परिपूर्णता जशी संपादन केली त्याचप्रमाणें या भारतयात्रेंत बारा वर्षें लोकस्थितीच्या अभ्यासाची गाढ तपश्चर्या करून त्यांनीं राष्ट्रावरील विपत्तीचें यथार्थ

निदान केलें. प्रत्यक्ष भारतीय राजकारणांत पदन्यास करण्यापूर्वी गांधीजींनींहि असेंच देशस्थितीचें निरीक्षण केलें होतें हें त्यांच्या चरित्राच्या वाचकांना माहीतच आहे. या निरीक्षणांत जे भयंकर प्रकार समर्थांनीं पाहिले त्यामुळें त्यांचें अंतःकरण जळून गेलें; व भयाण निराशेचा पडदाच स्वतःभोंवतीं पसरला असल्याचें पाहून एकदां तर त्यांना या अपरिवर्तनीय अवस्थेंत जगण्याऐवजीं मृत्यु कवटाळावा असें वाटूं लागलें. राष्ट्रजीवनाच्या या अभ्यासकाळांत श्रीसमर्थांनीं स्वतः कशांतहि भाग घेतला नाहीं कीं या पदयात्रेंत झालेल्या कष्टांना दाद दिली नाहीं. ते म्हणतात :—

फिरे दास ऊदास लोकांस पाहे ।
मनामाजि थक्कीत होऊनि राहे ।।
पथीं चालतां सूख दुःखा शमावें ।
महामंडळी काय कीती पहावे ।।
म्हणे दास हें दृश्य नाना परीचें ।
किती होत जाते कळाकूसरीचें ।।
न जावेंचि तेथेंचि लागेल जावें ।
न खावेंचि जें तेंचि लागेल खावें ।।
वदावेंचि ना तेंचि लागे वदावें ।
स्वभावेंचि निर्माण केलेंचि देवें ।।
प्रसंगे घडे तेंचि मानून घ्यावें ।
अहंतागुणें दुःखशोका न घ्यावें ।।
पुढें काय होईल तें तें पाहावें ।
विवेकेंचि ज्ञानेंचि सूखें रहावें ।।
म्हणे दास ऊदास कांहीं न व्हावें ।
बरें वोखटें सर्व साहोनि न्यावें ।।

अपार कष्ट सहन करून त्यांनीं राष्ट्राच्या अवनतीची कारण-मीमांसा केली. या अवनतीचें चित्र रेखाटतांना ते म्हणतात :—

पदार्थमात्र तितुका गेला । नुस्ता देशचि उरला ।
येणें करितां बहुतांला । संकट जालें ।।

माणसा खावया अन्न नाहीं । आंथरूण पांघरूण तेंही नाहीं ।
घर कराया सामग्री नाहीं । काय करिती ॥
कित्येक अनाचारीं पडिली । कितेक याति भ्रष्ट झाली ।
कितेक ते आक्रंदली । मुलेंबाळें ॥
कांहींच पाहतां घड नाहीं । विचार सुचेना कांहीं ।
अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडले लोक ॥
येक म्हणती कोठें जावें । येक म्हणती काय करावें ?
विदेशा जाऊनी काय खावें । वेंच नाहीं ॥
तथापि मार्गचि चालेना । भिक्षा मागतां मिळेना ।
अवघे भिकारीच, जना । काय म्हणावें ?
प्राणिमात्र जाले दुःखी । पाहतां कोण्ही नाहीं सुखी ।
कठिण काळें वोळखी । धरीनात कोण्ही ॥

या अस्मानी विपत्तीच्या काळांत राजसत्ता प्रजाजनांचें संरक्षण करीत असते. पण ती स्वकीय असली तर ! परकीय दैत्यसदृश राजसत्तेंत या अस्मानीला उलटी सुलतानीची साथ मिळून एकच कहर उसळत असतो. समर्थ म्हणतात :--

देश नासला नासला उठे तोचि कुटी ।
पिकें होतांचि होतांचि होते लुटालुटी ॥
काळाकरितां जिवलगां जाली तुटातुटी ।
अवघ्या कुटुंबा कुटुंबीं होते फुटाफुटी ॥
कैचा आधार आधार नाही सौदागार ।
कांहीं चालेना चालेना उदीम व्यापार ॥
सर्व सारिखे सारिखे झाला एकंकार ।
काळ कठीण कठीण कैसा पावे पार ॥
जनी ईजती हुरमती पाहों जातां कैची ।
दुनिया जाली रे जाली रे जाली रे बळाची ॥
काय होणार होणार होणार टळेना ।
पुण्य गेले रे गेले रे कांहींच फळेना ॥

सुडके पटकर पटकर न मिळे पांघराया ।
शक्ती नाही रे नाही रे खोपट कराया ।।
वाट फुटेना फुटेना विदेशी भराया ।
आवघी बैसलो बैसलो बैसलो मराया ।।
नदी भरतां भरतां घालुनिया घेती ।
वीख घेउनी घेउनी उदंड मरती ।।
अग्नी लावोनी लावोनी जळोनियां जाती ।
मोठी फजीती फजीती सांगावे ते किती ।।
येक पळाले पळाले दूरी देशा गेले ।
बहू कष्टले कष्टले तेथ नागवले ।।
फिरोनि आले रे आले रे घरींचे लोक मेले ।
कोठें उपाय दिसेना कासावीस झालें ।।
उदंड चाकरी चाकरी मिळेना भाकरी ।
लोक नीलंड नीलंड काढुनि नेती पोरी ।।
न्याय बुडाला बुडाला जाहाली शिराजी ।
पैक्या कारणे कारणे होते मारामारी ।।

मूळ यावनी सत्ता लुटारूंची व त्यांतच ध्येयशून्य असे हिंदू पाळेगार व सरदार यांचीहि भर पडलेली ! परकीय यवन, पोर्तुगीजांसारखे लुटारू, स्वकीय पुंड पाळेगार इत्यादि तत्कालीन अत्याचाऱ्यांच्या अत्याचारांचें समर्थांनीं जसें बारकाईनें वर्णन केलें आहे असें कोणीहि केलेलें नाहीं. कारण राष्ट्रजीवनाच्या विपत्तीचें स्वरूप पाहण्यांत व निदान करण्यांत त्यांच्या जीवनाचें पूर्ण एक तप खर्ची पडलेलें आहे. ते म्हणतात :—

किती येक ग्रामेंचि ते वोस जाली ।
पिकें सर्व धान्येंचि नाना बुडाली ।।
किती येक धाडीवरी धाडि येती ।
द्वयां सैनिकाचे नि संहार होती ।।
किती येक ते मेघही मंद जाले ।
अनावृष्टि स्थळोस्थळीं लोक मेले ।।

किती येक अन्नाविसीं भ्रष्ट जाले ।
किती येक लोकीं जनीं प्राण दिल्हे ।।
किती येक ते तांब्र बंदीच गेले ।
किती येक मार्‍हाष्ट्र बंदी निमाले ।।
किती येक ते छंद ना बंद कांहीं ।
किती येक बेबंद ते ठाइंठाईं ।।
किती येक ते घ्राण कर्णेचि घेती ।
किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीती ।
किती मोट बांधूनि ते बूडवीती ।
पिछोडेचि बांधोनि हीरोनि नेती ।।

अशा स्थितींत भारतीय समाजरचनेंत नेतृत्वाचा ज्यांच्याकडे परंपरागत वारसा व ज्यांनीं तो अनेक शतकें त्याग, वैराग्यानें चालविला त्यांनीं समोर येऊन व कष्ट सोसून समाजाला आश्वासन देणें व मार्गदर्शन करणें आवश्यक होतें. श्रीसमर्थांनीं आपल्या समाजजीवनाच्या अभ्यासांत या वर्गाचीहि सूक्ष्म तपासणी केली व ते अधिकच निराश झाले. उद्वेगानें ते म्हणतात:—

'ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ।।
कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती ।
कित्येक तुरुक होती । आपुले इच्छेने ।।
राज्य नेले म्लेंच्छक्षेत्री । गुरुत्व नेलें कुपात्रीं ।
आपण आरत्री ना परत्री । कांहींच नाही ।।
ब्राह्मणास ग्रामणीनें बुडविलें । विष्णूनें श्रीवत्सास मिरविले ।
त्याच विष्णूनें श्रापिलें । परशुरामें ।।
आम्हीहि तेचि ब्राह्मण । दु:खें बोलिलो हें वचन ।
वडील गेले ग्रामणी करून । आम्हां भोंवती ।।
आतांचें ब्राह्मणी काय केलें । अन्न मिळेना ऐसें जालें ।
तुम्हां बहुतांचें प्रचीतीस आले । किंवा नाहीं ।।

त्यांतल्या त्यांत उपदेशकाचा धंदा पत्करलेल्या लोकांचें अधः-पतन पाहून तर त्यांना अधिकच उद्विग्नता वाटली. ते म्हणतात :—

ये कलियुगीं आत्मबोध । तयाचा मांडिला विनोद ।
चवढ जाली उदंड खेद । वर्ण संकर आरंभिला ।।
दुष्काळ पडला भावार्थाचा । विश्वास दृढ कैचा ।
विवेक आणि वैराग्याचा । फड मोडोनि गेला ।।
भक्ति अवघी बुडाली । आणि अभक्ती ठाकली ।
आणि ती येतां निघोनि गेली । नीतिमर्यादा ।।
शब्दज्ञान उदंड जालें । कवित्व घरोघरीं केलें ।
समाधान निःशेष गेलें । हारपोनिया ।।
हरिदासीं साहित्य वाढविलें । हरिदास्य सांडोनि कलावंत जाले ।
देव सांडोनि फिरो लागले । मनुष्यां भोवतें ।।

शेवटीं तर या सर्व परिस्थितीला कलाटणी देण्याचें सामर्थ्य असलेल्या ईश्वरी शक्तीची सहनशक्ति पाहून किंचित् चीड येऊन समर्थ म्हणतात :—

पुण्य क्षेत्रें ती मोडावी । आणि ब्राह्मण्यें पीडावी ।
पुण्यवंत ते मरावें । पापी चिरंजीव व्हावें ।
धर्मप्रवृत्ति बुडावी । शास्त्रमर्यादा उडावी ।
**रामदास म्हणें देवें । बौद्ध होऊनी बैसावें** ।।
भक्त भाविक तितुके निमाले । सत्वाचें सज्जन विश्रांति पावले ।
**ईश्वरेंहि डोळे झांकिले । बौद्ध होवोनि बैसला** ।।

या सर्व परिस्थितींत शक्य तितकें लवकर परिवर्तन घडून येणें आवश्यक आहे असें त्यांना वाटूं लागलें. ईश्वराचा प्रत्यक्ष साक्षात्कार असल्यामुळें त्याच्या अस्तित्वासंबंधीं व सामर्थ्या-विषयीं त्यांना काडीचीहि शंका नव्हती. मग धर्मग्लानीच्या, अधर्माच्या उत्कर्षाच्या व सज्जनांच्या संकटाच्या वेळीं अवतार धारण करावयाचें वचन देणारा ईश्वर या सर्व गोष्टी सहन करीत बौद्ध होऊन (म्हणजे मौन धारण करून) कां बसला आहे

हें त्यांना कळेना व ईश्वरानेंहि जर दुर्लक्ष केलें तर भारताला विनाशाशिवाय दुसरें काय गत्यंतर आहे हें त्यांना आकळेना. आपल्या हृदयाची ही व्यथा परमेश्वराजवळ व्यक्त करतांना ते म्हणतात :—

हुजुर दम निघेना, अंतरी कोंडनाना ।
तिळभरि स्थळ कोठे पाहतांही दिसेना ।।
बहुत विषम काळें दाटणी थोर जाली ।
म्हणउनी चरणाब्जीं वृत्ति गुंतोनि ठेली ।।
बहुतचि सुकुमारा । स्वस्थ नाही शरीरा ।
निशिदिनि जन चिंता लागलीसे उदारा ।।
सकळ जन सुखावें तो कसा काळ फावे ।
भजन जन उकावें सर्व आनंद पावें ।।

शवटीं या आनंदाची पर्वणी राष्ट्रजीवनांत येणेंच अशक्य असें वाटून ते जीविताविषयीं निराश झाले. ते म्हणतात :—

कांहीं मिळेना मिळेना मिळेना खायाला ।
ठाव नाही रे नाही रे नाही रे जायाला ।
हौस कैंची रे कैंची रे कैंची रे गायाला ।
कोठें जावें रे जावें रे जावें रे मागायाला ।।
दास म्हणे रे भगवंता ! किती पहासी सत्व ।
काय वांचोनी वांचोनी ? ने परते जीवित्व ।
किती धरावें धरावें धरावें तें सत्व ।
जालीं शरीरें शरीरें शरीरें नि:सत्व ।।

जीवाचें देवत्वापर्यंत विकसन करण्याचें सामर्थ्य असलेली कर्मभूमि ज्यांना देश म्हणून लाभली, अध्यात्म व जीवनमूल्यांचा प्रकाश सर्व जगाला वितरण करून जे विश्वगुरु ठरले, परमेश्वराला वारंवार अवतार घ्यावा असें वाटावें असें आकर्षण ज्यांच्या राष्ट्र-जीवनानें निर्माण केलें त्यांची ही असीम दुर्दशा संपविण्याचा मार्ग जर आपल्याला सांपडत नसेल तर त्यापेक्षां मरून गेलेलें काय वाईट असें या तपस्व्याला वाटूं लागलें. मनुष्यजीवनाला

व्यक्तिजीवन व सामाजिक जीवन अशा परस्परावलंबी व परस्पर संपृक्त दोन बाजू असतात. जर सामाजिक जीवनाची दुर्दशा व अधःपात थांबवितां येत नसेल तर आपल्या साक्षात्कारी जीवनाचा व आध्यात्मिक विकसनाचा आपल्या राष्ट्राला लाभ कोणता असें त्यांना वाटूं लागलें. प्रत्यक्ष परब्रह्म जर या संस्कृतीच्या संरक्षणाच्या कळवळ्यानें स्वतः निर्गुण, निराकार, निरवयव असतांनाहि सगुण साकार, सावयव होऊन अवतार घेतें तर ईश्वरनिष्ठांना व ब्रह्मनिष्ठांना तरी त्याच संस्कृतीच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या अधःपतनाच्या काळांत केवळ निजानंदांत निमग्न होऊन कसें राहतां येईल ? परमेश्वरी नियमाचें तें उल्लंघनच नव्हे काय ? पण समर्थांना सभोंवर दारुण निराशा वाटावी अशी अगतिकता प्रत्ययास आली, व त्या भरांत हिमाचलाच्या परिसरांत ते हिमकुंडांत आत्महत्या करावयास प्रवृत्त झाले. त्यांचे सद्‌गुरु व उपास्य दैवत श्रीरामचंद्र यांनीं त्यांना सावरून कृष्णातटाकीं कार्य प्रारंभ करण्याचा आदेश व तें सफळ होईल असें आश्वासन दिलें असें म्हणतात. समाजजीवनाच्या या एक तपावर केलेल्या मनन-निरीक्षणानें त्यांची अशी धारणा झाली कीं स्वराज्यावांचून स्वधर्म व स्वराष्ट्र यांचें संरक्षण व विकसन केवळ अशक्य होय. भारतीय राष्ट्राला आपल्या संरक्षणासाठीं व संवर्धनासाठीं स्वतःच्या सामर्थ्याच्या खड्गानें म्लेच्छसत्ता संपूर्ण उखडून टाकल्यावांचून दुसरें गत्यंतर नाहीं. सामर्थ्याच्या पार्श्वभूमीवांचून अध्यात्माला महत्त्व नाहीं. जीवनाला प्रतिष्ठा नाहीं व नीतिमूल्यांना स्थिरता नाहीं. " शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिन्ता प्रवर्तते" शस्त्रसामर्थ्यानें राष्ट्र-संरक्षणाचा प्रश्न सदाचा सुटल्यावरच शास्त्रचिंतेला अवसर असतो. हें भारतीय राष्ट्राचे चिरंतन द्रष्टे श्रीमद्वेदव्यास यांनीं सांगितलेलें सत्य समर्थांच्या हृदयांत प्रकाशलें. ते म्हणतात :—

शक्तीनें पावती सूखे। शक्ती नसता विटंबना।
शक्तीनें नेटका प्राणी। वैभवें भोगितां दिसे।।
कोण पुसे अशक्ताला। रोगीसे बराडी दिसे।
शक्ती तो सर्वही सुखे। शक्ती आनंद भोगवी।।

सारा संसार शक्तीनें । शक्तीनें शक्ति भोगिजे ।
शक्त तो सर्वही भोगी । शक्तीवीण दरिद्रता ।।
शक्तीनें मिळती राज्ये । युक्तीने यत्न होतसे ।
शक्ति युक्ति जये ठायीं । तेथें श्रीमंत (परमेश्वर) धांवती ।।
उदंड खस्तिची कामें । मर्द मारूनि जातसे ।
नामर्द काय ते लंडी । सदा दुश्चित लालची ।।

स्वधर्माच्या आणि स्वसंस्कृतीच्या मागें स्वराष्ट्राचें जागतें खड्ग जो उभारील असा कोणी आहे काय ? समर्थांनीं सारा देश पायाखालीं घातला. पण त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर कैपक्षी परमार्थी असा कोणी राजा त्यांना आढळेना. अशा मनाच्या अवस्थेंत समर्थ हिंडतां हिंडतां श्रीपरशुरामक्षेत्रीं आले व तेथें महापराक्रमी परशुरामांच्या कृत्यांची आठवण होऊन ते त्यांनाच स्वधर्मरक्षणार्थ परशु परजण्याची प्रार्थना करूं लागले. समर्थांचें स्वतःचें गोत्र जमदग्नि होतें. त्यामुळें महापराक्रमी जामदग्न्याशीं सलगी करण्याचा त्यांना अधिकारहि होता. जमदग्नि व जामदग्न्य यांना परशुरामक्षेत्रीं अष्टकांतून आवाहन करणाऱ्या समर्थांचें हृदयाविष्करण करतांना कै. नानासाहेब देव म्हणतात :—

"श्रीछत्रपति शिवाजी महाराज उदयाचलावर येण्यापूर्वी श्रीसमर्थांचें परशुरामक्षेत्रीं आगमन झालें होतें, त्या वेळीं त्यांनीं परशुरामापुढें आपलें हृदय खुलें करून आपल्या अंतरींची व्यथा परशुरामास जाणविली होती. बारा वर्षे तीर्थाटनाच्या निमित्तानें त्यांना देशाटन घडलें होतें. देशाच्या अवनतीची त्यांना पूर्ण कल्पना झाली होती. स्वराज्याशिवाय धर्मरक्षण होणें नाहीं हा त्यांचा निश्चय झाला होता. धर्मावरील संकटें दूर होऊन देशाच्या अवनतीचा शेवट व्हावयाचा म्हणजे स्वधर्मीय राजा पाहिजे."

"ऐसा पाहिजे कीं राजा कैपक्षी परमार्थी ।।"

ही आपली इच्छा विसाव्या अष्टकांत श्रीसमर्थांनीं आपल्या अत्यंत आतुर बोलण्यानें व्यक्त केली आहे. एरव्ही श्रीसमर्थ आपल्या

हृदयाचा थांग सहसा कोणास लागू देणारे नाहींत. पण या अष्टकाच्या द्वारें आपणांस त्यांच्या हृदयांत प्रवेश मिळत आहे. श्रीसमर्थांचें गोत्र जमदग्नि जमदग्नीचा मुलगा जामदग्नि म्हणजे परशुराम. फक्त दुसरा श्लोक बापाला उद्देशून दिसतो, बाकीचे चारहि मुलालाच उद्देशून आहेत. जमदग्नीला श्रीसमर्थ विनवितात, आपला मुलगा चिपळुणास असतो, मी आपल्याच गोत्रांतला असून तो माझी कांहींच काळजी किंवा विचारपूस करीत नाहीं. तरी मधून मधून माझा परामर्श घेत जावा असें त्यास आपण कांहीं कृपा करून सांगा. तो मला अनुकूल होईल असें कांहीं करा. त्याला अनुकूल करून घेऊन मला काय मिळवावयाचें आहे, असें विचाराल तर आम्हांस राज्य पाहिजे आहे असें श्रीसमर्थांनीं अति कळवळ्यानें ध्वनित केलें आहे. श्रीसमर्थहृदयींचे हें आर्त उघड करून दाखणारें हें अष्टक सर्वांना मुखोद्गत असावें.

महाकोप अग्नी ऋषी जामदग्नी ।
समर्था तया जाणिजे सर्व सूज्ञी ।।
सदा सर्वदा घेतसे नाम तुझें ।
वरिष्ठा स्वभावेंचि हें गोत्र माझें ।। १

वसे सागराचे तिरी सूत तूझा ।
समाचार तो घेत नाहींच माझा ।।
तयाला बहूतांपरी सीकवावें ।
स्वभावेंचि वोढेल ऐसें करावें ।। २

किती येक मागें बहू युद्ध केलें ।
किती वेळ या ब्राह्मणा राज्य दिल्हें ।।
अकस्मात सामर्थ्य तें काय झालें ।
युगासारिखें काय नेणों विशालें ।। ३

चिरंजीव आहेसि ऐसी वदंती ।
समर्था तुझे चित्त काठिण्य कीती ।।
तुझे नामधारी तुला हें कळेना ।
कृपाळूपणें चित्त कैसें वळेना ।। ४

नको रे उदासीन हें वाक्य मानी
समर्था असावें बहू साभिमानी।
करावी दिनानाथ हे सत्य वाचा।
तुला चिंतितो दास मी राघवाचा ।। ५

श्रीसमर्थांना स्वराज्यस्थापनेची तळमळ लागली होती, असा या अष्टकाचा सरळ अर्थ होतो. आपलें हें कोड पुरविलें गेल्याबद्दल त्यांनीं नंतर अनेक ठिकाणीं कृतज्ञतेचे उद्‌गार काढले आहेत.

मनाच्या अशा अवस्थेंत श्रद्धावंताच्या दृष्टिकोनांतून श्रीरामचंद्राच्या आज्ञेप्रमाणें अथवा विशुद्ध भौतिक दृष्टिकोनाप्रमाणें अनुकूलतेचीं कांहीं पदचिन्हें कार्याच्या उभारणीच्या दृष्टीनें दिसलीं म्हणून श्रीसमर्थ वयाच्या ३६ व्या वर्षीं शके १५६६ तारणनाम संवत्सरीं महाबळेश्वर व मसूर-शहापूर-कऱ्हाड विभागांत कृष्णातटाकीं गेले व तेथेंच हेतुपुरस्सर स्थिरावले. महाराष्ट्रांत कार्याचा प्रारंभ करतांना त्यांची खरी इच्छा जेथें त्यांनीं तपस्या केली त्या नाशिक पंचवटी विभागांत असावें अशीच होती. पण कांहीं विशेष हेतूस्तव त्यांनीं मसूर विभाग निवडला. तेथें राहूनहि त्यांचें मन नाशिक पंचवटीकडे कसें ओढ घेत होतें हें त्यांनीं, या विभागांत राहण्याचें निश्चित केल्यावर व चाफळला श्रीरामाची स्थापना करण्यापूर्वीं, पंचवटीच्या परिसरांतील लोकांना उद्देशून जें पत्र पाठविलें आहे त्यावरून स्पष्ट होतें. तें पत्र असें :--

जन्मस्थान गोदातटी। परमपावन पंचवटी।
जेथें पडली कृपादृष्टी। रघोत्तमा रामाची ।।१
तेथील राम उपासक। त्यांच्या सेवकांचा सेवक।
तुम्हांमध्यें मी येक रंक। सरतें करावे ।। २
तुम्ही निकट देवापाशीं। आणि मी पडलों दुरी देशी।
कृपाळुपणें रघुनाथाशीं। माझी करुणा भाकावी ।। ३
म्हणावें ते अनाथ। समर्था तूं दीनानाथ ।।
म्हणावें ते पतित। तूं पतितपावनू ।।४

म्हणावें ते परम किंकर । देवा तू करुणाकर ।
म्हणावें ते निराधार । आधार इच्छी ॥५
सत्य मिथ्या तुझा म्हणवी । त्याची चिंता असो द्यावी ।
ऐसी हे करुणा करावी । नाना प्रकारी ॥६
तुम्हां दासांमध्यें मी हीन । माझे कोटयावधि अवगुण ।
परंतु आहे अनन्य । सेवक रघुनाथाचा ॥७
पुढे म्या ऐसेचि असावें । माझें मन न पालटावें ।
इतुकें देवाशीं मागावें । तुम्ही बंधुवर्गी ॥८
प्रत्यही माझा नमस्कार । देवाशी करावा निरंतर ।
मज कारणे शरीर । इतुके कष्टवावे ॥९
बालवृद्ध नरनारी । सकल भक्त कुमार कुमारी ।
समस्तांसी नमस्कारी । कृष्णातीरवासी ॥१०
शुद्ध उपासना विमल ज्ञान । वीतराग आणि ब्राह्मण्यरक्षण ।
गुरुपरंपरेचें लक्षण । शुद्ध मार्ग ॥११
ऐसे हे पंचधा बोलिले । इतुके पाहिजे यत्ने केले ।
म्हणिजे सकळहि पावले । म्हणे दासानुदास ॥१२

प्रस्तुत पत्रांत श्रीसमर्थ स्वतःला निराधार असल्याची ग्वाही देत असल्यामुळें चाफळला श्रीरामचंद्राची स्थापना होण्यापूर्वी त्यांनीं हें पत्र लिहिलेलें आहे हें उघड आहे. तसेंच पंचवटीविषयीं मनांत उत्कट ओढ असतांना 'पडलों दूर देशीं' या शब्दावरून कोणाच्या तरी प्रेरणेनें अथवा कांहीं विशिष्ट कारणास्तव मला येथें राहणें भाग पडत आहे असें समर्थ सुचवीत आहेत. मनांतील इच्छा बाजूला सारून समर्थांनीं महाबळेश्वरच्या पंचक्रोशींत हें जें आपलें ठाणें दिलें त्याच्या कारणाचें विवेचन करतांना कै. नानासाहेब देव म्हणतात, या 'पडलों' शब्दाच्या मागें थोडासा इतिहास दडलेला दिसतो. ३००–३२५ वर्षांमागच्या तत्प्रांतीय स्थितीचें आज आपल्याला बरोबर आकलन होणें कठीण आहे. असें दिसतें कीं, विजापुराहून निघून उत्तर कोंकणांत उतरावयाचें तर मार्गांत मसूरचें ठाणें बरेंच महत्त्वाचें होतें. [illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वि: ...
अनुक्रम ...
नों: दि: ...

देशमुखी मूळची जगदाळे यांची. या जगदाळे घराण्यांतील एकसष्ट कागद 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १५ वा' यांत प्रकाशित झालेले आहेत. त्या कागदपत्रांवरून असें दिसतें कीं, मसूरची देशमुखी जगदाळ्यांकडून काढून शहाजीराजे यांनीं स्वतः-कडे घेतली होती. ती परत मिळावी म्हणून जगदाळ्यांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली. शहाजी राजांच्या पश्चात् श्रीशिवाजी महाराजांकडेहि त्यांनीं माता जिजाई यांच्या मार्फत रदबदली करून पाहिली. परंतु महाराजांनीं स्पष्ट फर्माविलें कीं, दुसरें कांहीं मागा पण मसूरच्या देशमुखीची गोष्टसुद्धां काढू नका. इतकें ज्या स्थानाचें महत्त्व, नेमके त्याच भागांत जाऊन श्रीसमर्थ तळ देऊन राहतात, यांत कांहीं राजकारण नसेलच असें कसें म्हणावें? श्रीसमर्थ नाशिक पंचवटी भागांत ज्या काळांत पुरश्चरणार्थ राहिले होते, त्या काळांत नाशिक, त्र्यंबक हा टापू शहाजी राजाच्या ताब्यांत होता व त्या भागांत त्यांचें वास्तव्यहि होत असे. त्यावरून साहजिक मनांत येतें कीं, या दोघा महापुरुषांच्या भेटीगांठी होऊन व संकेत ठरूनच श्रीसमर्थांचें मसूरकडे जाणें झालें असावें. नाहींपेक्षां, मी तर असा दूर येऊन पडलों आहे, या श्रीसमर्थांच्या म्हणण्याला कांहीं अर्थच राहत नाहीं! पंचवटीच्या रामाकडे इतकें चित्त लागलें असून श्रीसमर्थांना पंचवटी सोडून मसूर भागांत राजकारणानें नेलें असें म्हणावें लागतें."

—(श्रीसमर्थ संप्रदाय पृष्ठ १०१ व १०२)

श्री. देव यांच्या प्रस्तुत तर्काला साहाय्यक अशीं प्रमाणें स्वतः समर्थांच्याहि उद्‌गारांतून निघतात. मसूर, शहापूर चाफळ, कऱ्हाड हा भाग शहाजी राजांच्या वतनदारींत मोडत होता. शहाजी राजांचा स्वतंत्र बाणा समर्थांना त्यांच्या पुरश्चरणाच्या काळापासूनच माहीत होता व देवाधर्मावरील संकट दूर करावयास्तव समर्थ राजपुरुष पाहण्याचें व लोकांच्या अंतःकरणांत पुनरुत्थानाची प्रेरणा निर्माण करण्याचें कार्य अशा स्वतंत्र बाण्याच्या राजपुरुषाच्याच परिसरांत शक्य होतें. मसूरला स्थिरावल्यानंतर

श्रीसमर्थांनीं आपल्या कार्याची दिशा निश्चित केली व शके १५६७ मध्यें श्रीरामनवमीचा उत्सव प्रारंभ करून त्या निमित्तानें त्यांनीं जनजागृतीच्या कार्यास प्रारंभ केला. श्रीरामचंद्रांचाच उत्सव त्यांनीं कां योजिला याचें उत्तर स्वत: त्यांनींच 'रक्षिता देव देवांचा । त्याचा उत्साव योजिला ।' या शब्दानें दिलेलें आहे. ईश्वराचे सर्वच अवतार सारखे असले तरी भक्त आपल्या इच्छेनुरूप अथवा खरें म्हटलें तर उद्दिष्टानुरूप त्याचें ध्यान व उपासना-पद्धति यांचा स्वीकार करीत असतो. संपूर्ण भारत संकटांत सांपडलें असतां त्याच्या दयनीय स्थितीनें हृदयाला घरें पडलेले समर्थ, ह्या राष्ट्राला व धर्माला वैभवशाली व सामर्थ्य-संपन्न कसें करतां येईल या एकाच विचारांत गढून गेलेले होते. त्यासाठीं आवश्यक ती सामाजिक मनोवृत्ति निर्माण करावयास धर्मरक्षणासाठीं पराक्रमाची स्फूर्ति उत्पन्न होईल असें नवें श्रद्धा-केन्द्र समाजाला देण्याची आवश्यकता त्यांना वाटली; व म्हणून श्री. तात्यासाहेब करंदीकर यांच्या शब्दांत सांगावयाचें तर रामानें बंदिवासांतून देव सोडविले, त्याप्रमाणें या वेळींहि भारताची पर-चक्राच्या बंदींतून सुटका व्हावी यासाठीं भुवनकंटक अशा रावणाचें निर्दालन करणाऱ्या व रामराज्य स्थापून त्याबरोबरच धर्मसंस्थापना करणाऱ्या रामाचें ध्येय डोळ्यांपुढें असावें म्हणून आणि स्वत: समर्थांना रामप्रभूनेंच कृष्णातीरीं जाऊन धर्मस्थापना करण्याला साहाय्य करण्याचा आदेश दिला होता म्हणून आणि इतर सर्व देवांपेक्षां 'कथा थोर या राघवाची' म्हणून रामनवमीचाच उत्सव समर्थांनीं योजिला. मसूरास शहाजीचें ठाणेंच होतें. यास्तव शहाजीच्या सल्ल्यानेंच ही जागा मुक्रर झाली असावी. याला समर्थांच्या लेखाचाच आधार मिळतो. 'अंतरी कल्पना केली । एकांती बोलली बहू ।' यांत समर्थांनीं आपल्या मनांत रामाचा उत्सव करण्याची कल्पना उदय पावल्यावर एकान्तांत इतरांशीहि पुष्कळ वाटाघाट केली असें म्हटलें आहे. ही वाटाघाट शहाजीशीं झाली असावी हें उघड आहे. कारण ज्याच्या ठाण्यांत उत्सव सुरू

करावयाचा त्या शहाजीचा परिचय झाल्यावर त्याच्याशीं एकान्तांत हें कारस्थान शिजविलें जाणें संभवनीय आहे. अर्थातच 'एकान्ती बोललों बहु ।' या वचनावरून शहाजीराजांशीं चर्चा करून हा निर्णय ठाम करण्यांत आला असें म्हणण्यांत दूरान्वय होत नाहीं.'

कृष्णाकांठीं समर्थांनीं वयाच्या ३६ व्या वर्षी जें कार्य प्रारंभ केलें, त्या पूर्वी राष्ट्रीय परिस्थितीचें निरीक्षण, चिंतन व मनन करण्यासाठीं त्यांनीं आपल्या जीवनांतील संपूर्ण एक तप घालविलें असल्यामुळें जशी राष्ट्राच्या परिस्थितीची त्यांची कल्पना वस्तुनिष्ठ होती त्याचप्रमाणें तिच्यावर त्यांची उपाययोजनाहि वस्तुनिष्ठ होती. त्यांच्या पूर्वी राष्ट्रपुनरुत्थानाचें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून व त्यासाठीं वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाचा आश्रय करून योजनाबद्ध कार्याची उभारणी करणारा अन्य कोणी आढळत नाहीं. व्यक्तिजीवन व राष्ट्रजीवन या दोहोंच्याहि प्रत्येक अंगाच्या विकसनासंबंधांत त्यांनीं सुसूक्ष्म मार्गदर्शन केलेलें आहे. या दृष्टीनें समर्थांचें कार्य त्रिविध स्वरूपाचें होतें व तें त्यांनीं परिपूर्ण केलें. (१) संपूर्ण समाजजीवनाचें सर्वांग परिपूर्ण मार्गदर्शन; (२) पुनरुत्थानाची आकांक्षा राष्ट्रजीवनांत उत्पन्न करणारा ध्येयवादी, वैराग्यसंपन्न, निष्ठावंत, तेजस्वी, चारित्र्यसंपन्न व कर्मयोगी प्रचारकवर्ग निर्माण करून त्यांच्या द्वारें सुसंघटित राष्ट्रजीवनाची निर्मिति करण्याचा राष्ट्रव्यापी प्रपंच; व (३) स्वधर्माचें राज्य निर्माण करण्यासाठीं अग्रेसर झालेल्या ईश्वरी प्रेरणेच्या राजपुरुषाचें प्रत्यक्षाप्रत्यक्ष मार्गदर्शन व त्याच्या प्रयत्नांत त्याला सर्वतोपरि साहाय्यप्रदान, हें त्यांच्या राष्ट्रव्यापी कार्याचें त्रिविध स्वरूप होय. त्यांच्या कार्याचें हें स्वरूप ध्यानांत घेतलें तर त्यांच्या नांवामागें **राष्ट्रगुरु** हें विशेषण कां लावण्यांत येतें याचें रहस्य स्पष्ट झाल्याविना रहात नाहीं. समर्थांच्या या त्रिविध स्वरूपाच्या कार्याचा श्रीशिवचरित्राच्याच नव्हे तर स्वराज्य-मंदिराच्या उभारणीसहि प्रत्यक्ष उपयोग झालेला असल्यामुळें त्या कार्याचें समालोचन प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें ठरतें.

## श्रीव्यासानंतरचा महान् लोकशिक्षक

श्रीसमर्थांच्या त्रिविध कार्यांपैकीं पहिलें कार्य जें संपूर्ण समाजजीवनाचें सर्वांगपरिपूर्ण मार्गदर्शन, त्याचा जर विचार केला तर श्रीमद्वेदव्यासानंतरचे महान् लोकशिक्षक व राष्ट्रजीवनाचे महान् शिल्पकार असें त्यांना यथार्थतेनें म्हणतां येईल. स्वत:ला मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्रांचे दास म्हणविणाऱ्या समर्थांनीं आपल्या काळांतील लोकांना प्रत्यक्ष बोध करतांना कोणत्याहि ग्रंथाचें बंधन स्वत:वर लादून घेतलेलें नाहीं. समर्थांचा दासबोध कोणत्याहि प्राचीन लोकप्रिय संस्कृत ग्रंथावरील टीकाग्रंथ नसून स्वतंत्र ग्रंथ आहे. या ग्रंथांतून व समर्थांच्या अन्य प्रचंड वाङमयप्रपंचांतून केवळ पारमार्थिकच नव्हे, तर जीवनाच्या सूक्ष्मातिसूक्ष्म बाबींसंबंधीं देखील स्पष्ट मार्गदर्शन आहे. संतपरंपरेप्रमाणें पारमार्थिक व आध्यात्मिक उपदेश तर त्यांनीं केलेलाच आहे. पण पारमार्थिक विचारांच्या कक्षेंत न येणाऱ्या पण समाजजीवनाचें व व्यक्तिजीवनाचे अनिवार्य घटक होऊन बसलेल्या अनेक बाबींचा त्यांनीं विचार केलेला आहे. राष्ट्रजीवनांत कोणत्याहि प्रकारचा गैदीपणा व गबाळेपणा त्यांना नको होता. 'जन आणि जनार्दन। यासी नाहीं भिन्नपण' या शब्दांत समर्थांनीं जनसेवेसंबंधींची भूमिका स्पष्ट केलेली आहे. त्यांच्या उपदेशांत 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' बरोबरच 'बरें दांत घासोनि तोंडा धुवावे ॥' येथपर्यंतचे सगळे विषय आहेत. इतर संतांप्रमाणेंच समर्थ अध्यात्माचा प्रसार व त्यासंबंधांत मार्गदर्शन करणें हें आपलें कर्तव्य समजतात. नरदेहाचें महत्त्व ठिकठिकाणीं सांगून त्यांनीं हा देह मिळाल्यावर ब्रह्मप्राप्ति करून जो त्याचें सार्थक करीत नाहीं त्याला मूर्ख म्हटलें आहे. नरदेहाची महती वर्णन करतांना समर्थ म्हणतात :—

"धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो।
जो जो कीजे परमार्थ लाहो। तो तो पावे सिद्धीते ॥१

या नरदेहाचे नि आधारे । नाना साधनांचे नि द्वारें ।
मुख्य सारासार विचारें । बहुत सुटले ॥८
या नरदेहाचे नि संबंधे । बहुत पावलें उत्तम पदें ।
अहंता सांडून स्वानंदे । सुखी जाले ॥९
संत महंत ऋषि मुनी । सिद्ध साधु समाधानी ।
भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी । नरदेहीच झालें ॥१०
म्हणोनिया नरदेह श्रेष्ठ । नाना देहामध्यें वरिष्ठ ।
जयाचे नि चुके अरिष्ट । यमयातनेचें ॥११
नरदेह हा स्वाधीन । सहसा नव्हे पराधीन ।
परंतु हा परोपकारी झिजवून । कीर्तिरूपें उरवावा ॥२२॥"

या नरदेहाचें सार्थक करावयाचें तर अद्वैत तत्त्वज्ञानानुसार स्वतः विश्वरूप व ब्रह्मरूप झालें पाहिजे असें समर्थ सांगतात. जीवनांतून अद्वैताचा आविष्कार प्रत्ययपूर्ण कसा होतो याचें वर्णन करतांना समर्थ म्हणतात :—

तत्त्वरूप सकळभासे । विवेक पाहतां निरासे ।
प्रकृतिनिरासे आत्मा असे । आपण कैंचा ॥
यैक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु ।
तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मध्यें ॥
पाहतां तत्त्व विवंचना । पिंड ब्रह्मांड रचना ।
विश्वाकारें व्यक्ति नाना । तत्त्वें विस्तारली ।
तत्त्वें साक्षित्वें वोसरती । साक्षित्व नुरे आत्मप्रचीती ।
आत्मा असे आदिअंती । आपण कैंचा ॥
आत्मा एक स्वानंदघन । आणि अहमात्मा हें वचन ।
तरी मग आपण कैंचा भिन्न । उरला तेथें ॥
त्वं पद तत्पद असिपद । निरसुनि सकळ भेदाभेद ।
वस्तु ठाईंची अभेद । आपण कैंचा ॥

या ब्राह्मी स्थितीच्या प्राप्तीविना जीवन व्यर्थ होय. ही स्थिति प्राप्त करून घेण्यासाठीं कर्म, उपासना व ज्ञान या तिन्ही मार्गांचा समर्थांनीं पुरस्कार केलेला असून त्यांचें सूक्ष्म विवरण केलें आहे.

या सर्व मार्गांत भक्तिमार्ग सर्वश्रेष्ठ असून भक्तीचें साध्य सांगतांना समर्थ म्हणतात :—

"चारी देह निरसावे । साधकें देहातीत व्हावें ।
देहातीत होतां जाणावें । अनन्य भक्त ।। १०–१०–४७
देहमात्र निरसुनी गेला । तेथें अंतरात्मा कैसा उरला ।
निर्विकारी विकाराला । ठाव नाही ।।४८
पृथ्वीमध्यें जितुकी शरीरे । तितुकी भगवंताचीं घरें ।
देऊळ म्हणिजे नाना शरीरें । तेथें राहिजे जीवेश्वरें ।
नाना शरीरें नाना प्रकारें । अनंत भेदें । १७–१–१३
चालती बोलती देउळें । त्यामधें राहिजे राउळे ।
जितुकी देउळें तितुकी सकळें । कळली पाहिजे ।।१४
नारायण असे विश्वी । त्याची पूजा करीत जावी ।
याकारणें तोषवावी । कोणी तरी काया ।।१५–९–२५
उपासना शोधून पाहिली । तों ते विश्वपाळिती जाली ।
न कळे लीळा परीक्षिली । न वचे कोणा ।। २६
देवाची लीळा देवेंविण । आणीक दुसरा पाहे कोण ।
पाहाणें तितुकें आपण । देवचि असे ।।२७
उपासना सकळा ठाईं । आत्माराम कोठे नाही ।
याकारणें ठाइं ठाई । रामें आटोपिलें ।।२८
ऐसी माझी उपासना । आणितां न ये अनुमाना ।
नेऊनि घाली निरंजना । पलीकडे ।।२९"

श्रीसमर्थ हे ज्ञानोत्तर भक्तीचा पुरस्कार श्रीज्ञानदेवाप्रमाणेंच करतात. "जग म्हणिजे असिकी वस्तुप्रभा ।" या ज्ञानदेवांच्या सूत्राचें आत्मानुभवी समर्थांनीं जें हृदयंगम भाष्य केलें आहे तें प्रत्येकानें कंठस्थ करण्याच्या योग्यतेचें आहे. तें असें :—

"प्राप्त झालें अद्वैत ज्ञान । अभिन्नपणें जें विज्ञान ।।
तेंचि जाण आत्मनिवेदन । जेथें मी तूं नाही ।।
ऐसी स्थिति जया पुरुषाची । तया पुनरावृत्ति कैंची ।।
जाणोनि भक्ति केली दास्याची । देवासी अत्यंत ।।

पूर्वी दास्य होते केलें । त्याचें स्वामित्व प्राप्त झालें ।
आणि तयाचें महत्व रक्षिलें । तरी थोर उपकार ।।
एवं ज्ञाता समाधानी । प्रारब्धयोगें वर्तें जनी ।
परी अनुसंधान मनीं । वेगळेंचि असे ।।
वृत्ति मुळाकडे पाहे । तंव रामचि दिसताहे ।
स्तब्ध होऊनिया राहे । तरी रामचि अवघा ।।
मन मुरडे आलिया वाटे । तंव मार्गीं रामचि भेटे ।
मागें पुढें प्रगटे । रामचि अवघा ।।
दाही दिशा अवलोकितां । रामचि भासे तत्त्वतां ।
वदन चुकवूं जातां । सन्मुख राम ।।
राम जालिया सन्मुख । कल्पांती नव्हे विन्मुख ।
नेत्र झांकिता अधिक । रामचि दिसे ।।
मग विसरोनि पाहिले । तव ते रामचि जाले ।
जीवनसर्वस्व वेधिले । संपूर्ण रामे ।।
रामेवीण सर्वथा कांहीं । अणुमात्र रिते नाही ।
दृश्य द्रष्टा दर्शन तेही । रामचि जाले ।।
ऐसा राम प्रगटला । दृश्य पदार्थ लोपला ।
असताच नाहीसा जाला । सद्गुरुप्रतापे ।।
ऐसी खूण सकळास । सांगोनि गेला रामदास ।
सत्संगे जगदीश । नेमस्त भेटे ।। "

ह्या समर्थांच्याच उताऱ्यावरून श्रीसमर्थ हे ज्ञानदेवापासून तुकारामापर्यंतच्या भागवतधर्मीय संतांप्रमाणेंच अद्वैत तत्त्वज्ञानाचा, आत्मानुभवाचा व सिद्ध आणि साध्य अथवा ज्ञानोत्तर आणि ज्ञानपूर्व अशा द्विविध भक्तीचा पुरस्कार करणारे होते असें आढळून येईल. समर्थांच्या आणि वारकऱ्यांच्या तत्त्वज्ञानांत व दृष्टिकोनांत कांहींहि भेद नाहीं. या तत्त्वज्ञानाप्रमाणेंच प्रपंचांत राहून परमार्थ साधत नाहीं अशाच स्पष्ट मताचे समर्थहि आहेत. ते स्पष्ट शब्दांत सांगतात:—

"अरे जयासी परमार्थ व्हावा । तेणें प्रपंच त्यजावा ।
प्रपंची परमार्थ करावा । तो ठाकेना सर्वथा ।।
परमार्थ नव्हे सोपा । ज्ञानगोष्टी व्यर्थचि बापा ।
जरी होय ईश्वरकृपा । तरीच हा प्रपंच सुटे ।।
जयास वाटे वैराग्य करावे । तेणें कांहींच न विचारावे ।
उठोनि वाटेचि लागावे । दिगंताप्रति ।।"

याप्रमाणें समर्थांनीं स्वतः आपलें आचरण केलें होतें. पण इतकें धगधगीत वैराग्य प्रत्येकाच्याच अंगीं नसल्यामुळें प्रपंच सोडावयाचें ध्येय समोर ठेवून त्याला आवश्यक ते गुणविशेष संपादन करण्यासाठीं नीट प्रपंच करा असें समर्थ सांगतात. प्रपंच सत्य आहे असें समर्थ कोठेंहि म्हणत नाहींत. परमार्थसाधक प्रपंच करावा असें ते सांगत आहेत. ते म्हणतात :—

"आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थविवेका ।
येथे आळस करू नका । विवेकी हो ।।
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणे तुम्ही कष्टी व्हाल ।
प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ।।
प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंटचाला । परमार्थ कैचा ।।
परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तूं यमयातना भोगिसी ।
अंती परमकष्टी होसी । यमयातना भोगिता ।।
म्हणोनि सावधपणे । प्रपंच परमार्थ साधणें ।
ऐसे न करिता भोगणें । नानादुःखें ।।

तात्पर्य, "विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोऽभयं सह । अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ।।" या औपनिषदिक सिद्धान्ताचे श्रीसमर्थ पुरस्कर्ते होते. कांहीं एकांतिक टीकाकारांनीं त्यांच्यावर आक्षेप घेतांना ते केवळ विशिष्ट अवताराचे व तदितर गोष्टींना तुच्छ समजणारे संकुचित दृष्टीचे होते असें अज्ञानानें प्रतिपादन केलेलें आहे. उदाहरणार्थ, श्री. बहिरट हे अमृतकलश या नांवानें महाराष्ट्रासमोर ठेवलेल्या त्यांच्या विषकलशांत म्हणतात, "संतांचें

वर्णन निळोबारायांनीं आपल्या अभंगांत केलें आहे. 'तेचि संत तेचि संत । ज्यांचा हेत विठ्ठली । नेणती कांहीं टाणाटोणा । नामस्मरणावांचूनि ।' याचा सरळ अर्थ, श्रीविठ्ठलाच्या ठायीं ज्यांचें अंतःकरण रमलें आहे ते संत होत व त्याच्या नामस्मरणानें त्याची प्रीति भोगणें याखेरीज अन्य भानगडी त्यांचे ठिकाणीं नसतात. रामदासस्वामींचें अंतःकरण त्या जातीचें नाहीं. विठ्ठलाच्या प्रेमाशीं ते समरस होऊं शकले नाहींत, म्हणून एकदां ते पंढरींत आल्या वेळीं समोर श्रीपंढरीराय असून त्यास 'रामा, इथें कां उभा,' म्हणाले. असेंच तुळजापूरच्या देवीवर सुद्धां पद्यें रचिलीं, पण विठ्ठलावर अभंग लिहिला नाहीं. उलट विठ्ठलाविषयीं विकार धरून 'विठ्ठनें शिरी वाहिला देवराणा' विठ्ठलाच्या डोक्यावर शिवास बसवून तो शिवसुद्धां रामराम म्हणतो तेव्हां तुम्ही राम रामच म्हणा असें मनाच्या श्लोकांत सांगितलें." (अमृत-कलश पान ५६) आम्ही बहिरटांना इतकेंच सांगूं इच्छितों कीं, भागवत धर्ममंदिराचे कळस श्रीतुकाराम महाराज यांची संताची व्याख्या याहून वेगळी आहे. तुकाराम महाराज म्हणतात, "तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात।" व "संत तोचि जाणा । जे देही उदास । गेले आशापाश विसरोनी ।।" श्रीसमर्थांच्या चरित्रांत या गोष्टी इतक्या उत्कटतेनें आढळतात कीं, त्यासंबंधीं विवेचनाची आवश्यकता नाहीं. तुकारामांचा विठ्ठल व समर्थांचा राम हे वस्तुतः एकच आहेत. परमेश्वराच्या नांवाचा व भक्तीचा ज्यानें त्यानें आपल्या स्थायीभावाप्रमाणें अंगीकार केलेला आहे. विठ्ठल सोडून अन्य देवांवर तुकारामांचीं पदें आहेत. बहिरट त्याला व्यभिचारी निष्ठा म्हणणार आहेत काय? असेंच समर्थांनींहि जसें रामाचें तसेंच भगवान् श्रीकृष्णांचें म्हणजेच श्रीविठ्ठलाचें महत्त्व वर्णिलें आहे. ते म्हणतात :—

श्रीकृष्ण जन्मला गुणी । करी जनासि मोहिनी ।<br>
हरीचरित्र साजिरे । सगूण रूप गोजिरे ।<br>
अखंड रूप लोचनी । चटक लाविली मनी ।

अनेक भाव भाविती। तमाळनीळ दाविती।
श्रीकृष्ण कृष्ण हे वदा। तुटोनि जाति आपदा।।
नको कदा देहे मदा। तरीच पावसी पदा ।।

समर्थ श्रीकृष्णभक्तींत किती तन्मय झाले होते याचें हें स्पष्ट उदाहरणच नव्हे काय? पण बहिरटांच्या कानांवर तें गेलेलें नाहीं.

असो. समर्थांनीं मनाच्या श्लोकांसारख्या स्फुट प्रकरणापासून तर ग्रंथराज दासबोधापर्यंत आपल्या विशाल वाङमयांतून अद्वैत तत्त्वज्ञान, ज्ञानोत्तर भक्ति व साधनमार्ग यांचा पुरस्कार व प्रचार केलेला आहे. औपनिषदिक सिद्धान्त त्यांनीं अत्यंत सुलभ रीतीनें व रसाळपणानें मांडले. उदाहरणार्थ, छांदोग्योपनिषदांतील आत्मतत्त्वाचें वर्णन व त्याचें श्रीसमर्थकृत स्पष्टीकरण पहा :–

**छांदोग्य** :– यदिदमस्मिन्ब्रह्मपुरे दहरं पुंडरीकं वेश्म दहरोऽस्मिन्नन्तराकाश: किं तदत्र विद्यते । यदैतज्जरा वाऽऽप्नोति प्रध्वंसते वा किं ततोऽतिशिष्यते । यावान्वा अयमाकाशस्तावानेषोऽन्तर्-हृदय आकाश: । न चास्य जरयैतज्जीर्यति न वधेनास्य हन्यते ।।"

**श्रीसमर्थ** :––

नभीं वावरे जो अणूरेणु कांहीं।
रिता ठाव या राघवेवीण नाहीं ।।
तया पाहतां पाहतां तेंचि झालें।
तेथें लक्ष आलक्ष सर्वें बुडाले ।।
अती जीर्ण विस्तीर्ण तें रूप आहे ।
तेथें तर्क संपर्क तोही न साहे ।।
अती गूढ तें दृढ तत्काळ सोपें ।
दुजेवीण जे खूण स्वामी प्रतापें ।।

साक्षात्कारी तत्त्वज्ञ कै. रामभाऊ रानडे यांनीं आपल्या पद्धतीप्रमाणें संतांचें वर्णन करतांना ज्ञानदेवांना Intellectual Mystic (ज्ञानी साक्षात्कारी) नामदेवांना Democratic Mystic (लोकाभिमुख साक्षात्कारी) एकनाथांना Synthetic Mystic (समन्वयदृष्टीचे साक्षात्कारी) तुकोबांना Personal Mystic (वैयक्तिक

उत्कट भावनायुक्त साक्षात्कारी व समर्थांना Active Mystic (कर्मयोगी साक्षात्कारी) अशीं यथार्थ नांवें देऊन पुढें असें म्हटलें आहे कीं :—

" It is not without reason that many a later mystic acknowledges that the foundation of that mystical edifice was laid by Jnaneshwar, above which Namdeva and other saints later erected the divine sanctuary of which Tuka became the pinnacle. And while a continuous tradition goes from Jnaneshwar to Namdeva and from Namdeva to Ekanath and from Eknath to Tukaram, Ramadas like Heraclitus stands somewhat apart in his spiritual isolation. His is a new Sampradaya altogether; it is not the Sampradaya of Varkaris. It is for that reason that the Varkaris have looked askance at the great spiritual work of Ramadas. But we, who stand for no Sampradaya whatever, and who like bees, want to collect spiritual honey, wherever it may be found, recognize, from the mystical point of view, no distinction of any kind between the Sampradaya of the Varkaris and the Sampradaya of Dharkaris. The Sampradaya of the Symbol and the Sampradaya of the Sword.– (Mysticism in Maharashtra PP. 19–20)

(ज्ञानेश्वरांनीं ज्या धर्ममंदिराचा पाया घातला त्यावरच नामदेवादि संतांनीं इमारत बांधली व तुकोबा तिचेच कळस होत, असें पुढील संतमंडळींनीं वर्णिलें आहे तें सकारणच आहे. ज्ञानदेवां-पासून नामदेवांपर्यंत, नामदेवांपासून एकनाथ व एकनाथांपासून पुढें तुकोबांपर्यंत एक अखंड परंपरा दिसून येते. परंतु रामदास मात्र या परंपरेपासून निराळे राहिलेले दिसतात. त्यांचा संप्रदाय स्वतंत्रच आहे, व तो वारकरी संप्रदायाहून भिन्न आहे. त्यामुळें वारकरी हे रामदासांच्या आध्यात्मिक कार्याकडे संशयित दृष्टीनें पहात आले आहेत. आम्ही कोणत्याहि संप्रदायास न चिकटतां

जेथें जेथें आध्यात्मिक अनुभव मिळेल तेथें तेथें तो सेवन करावा अशा मधुकरवृत्तीचे असल्यामुळें आम्हांस साक्षात्काराच्या दृष्टीनें वारकरी व धारकरी या दोन्हींत फरक आढळून येत नाहीं.)

आपला आध्यात्मिक अनुभव 'अवघाचि संसार सुखाचा करीन' या संतप्रतिज्ञेनुरूप समर्थांनीं साधनसंपत्तीसह जगाला वाटण्यासाठीं ग्रंथराज दासबोधापासून तर अनेक छोटया प्रकरणापर्यंत पुष्कळ वाङमय लिहिलें. चौदा ओवीशते, षड्रिपु, पंचीकरणयोग चतुर्थमान, मानपंचक, पंचमान हीं अष्टाक्षरी पांच लघुकाव्यें, शतावधि अष्टाक्षरी प्रकरणें, रामायण, करुणाष्टकें, मनाचे श्लोक, पूर्वारंभ, जुनाट पुरुष, अंतर्भाव, आत्माराम पंचसमासी, सप्तसमासी, सगुण ध्यान, निर्गुण ध्यान, मानसपूजा, एकवीस समासी जनस्वभाव, ग्रंथराज दासबोध व अवांतर प्रासंगिक प्रकरणें आणि जवळ जवळ एक सहस्र पदपदांतरें एवढा त्यांचा प्रचंड वाङमयोदधि आहे. अनेक स्फुट प्रकरणें त्यांनीं अध्यात्मज्ञान सोप्यांत सोपें करून प्रत्येक मराठी हृदयांत ठसावें म्हणून रचिलीं. उदाहरणार्थ, पूर्वारंभ या प्रकरणांतील त्यांचें विवेचन पहा :—

शिष्य—शिष्य बोले लडिवाळपणे । म्यां संसार घेतला कोण्या गुणे ।
मज हें दुःख भोगणें । किंनिमित्त घडलें ।।१
गुरु—विषयलोभे भगवंता । नेणोनि जालासि दुश्चिता ।
तेणें गुणें मागुता। आलासी जन्मा ।।२
शिष्य—तरी हा जन्म कैसा तुटे । मज भगवंत कैसा भेटे ।
भवसागरु वोहटे । कोण्या गुणें दातारा ।।३
गुरू—जन्मा तुटे संतसंगे। देव भेटे अंतरंगे ।
दृढ भक्तीचेनि योगें । भवसिंधु आटे ।।४
शिष्य—दृढ भक्ति करूं कैसी । काये धरावें मानसी ।
सांगा स्वामी अज्ञानासी । मार्ग कांहीं ।।५
गुरु—सद्‌गुरूसी जावें शरण । मनीं धरावें तें वचन ।
तेणें तुझें अज्ञान । जाईल बापा ।।७
जें अत्यंत गहन । माझ्या स्वामीचें वचन ।
जेणें माझें समाधान । अत्यंत जालें ।।५–६–४१।।

शिष्य—सद्गुरु कैसा ओळखावा । तो मज दातारें सांगावा ।
कवण उपदेश घ्यावा । तयापासी ॥८
गुरू—ऐक सद्गुरूची खूण । क्रियेसहित ब्रम्हज्ञान ।
आशारहित निरभिमान । तयासी मोक्ष मागावा ॥९
शिष्य—मोक्ष कवणासी म्हणावें । हें मज स्वामीनें सांगावें ।
दयासिंधु देवाधिदेवें । मज उपेक्षूं नये ॥१०
गुरु—अधिकारेवीण सांगणें । अलभ्य होये तेणें गुणें ।
म्हणोनिया आधी शाहाणे । अधिकार पाहाती ॥११
शिष्य—तरी त्या अधिकाराची खूण । जी मज करावी श्रवण ।
गुरु—ऐक बापा लक्षण । अधिकाराचे ॥१२
जेथे विश्वास आणि विरक्ति । नाही संसारी आसक्ति ।
जया आवडे गुरुभक्ति । अंतरापासुनि ॥१३
तेंचि अधिकाराचें स्थळ । ज्ञान उपतिष्ठे प्रबळ ।
फिटे भ्रांताचें पडळ । सद्गुरुबोधें ॥१४
शिष्य—स्वामी पतितपावन । ऐकोनि आलो जी शरण ।
न विचारितां दोषगुण । मज बोध करावा ॥१५
गुरु—माया सत्य जयासी वाटे । त्याचें ज्ञान परम खोटे ।
माईक दृष्टीनें भेटे । परमात्मा केवी ॥२८
शिष्य—माया मिथ्या कैसी म्हणावी । प्राणिमात्रासी वेढा लावी
सकळ रूप आपुले दावी । प्रत्यक्ष आता ॥२९
गुरु—प्रत्यक्षासी प्रत्यक्ष दिसे । अप्रत्यक्षा कोठें असे ।
अप्रत्यक्षेंविण नसे । पूर्ण समाधान ॥३०
शिष्य—पूर्ण समाधान तें कोण । मायेचें कैसे लक्षण ।
ऐसें हें मज निरूपण । केलें पाहिजे ॥३१
गुरु—आभिन्न तेंचि समाधान । मायेचें मिथ्या लक्षण ॥
आत्मनिवेदनी खूण । पावशील बापा ॥३२
सद्गुरुवचन अंजन त्याला । माया भयानक न दिसे त्याला ।
अभिन्नपणें आत्मयाला । सर्वत्र देखे ॥
गेले होतें ज्याचे शुद्धीसी । पाहें तंव तें आपणाचि पासी ।
मग तें विस्मित मानसी । आश्चोर्य करी ॥ ५३

जयासी इतुकें धुंडाळिलें । तें जवळीच देखिलें ।
आपणाकडे पाहों गेलें । तव तेंचि आपण ।। ५४
लवण अवघें सिंधु जालें । तैसें स्वरूपीं विरलें ।
तेणें गुणें जोडलें । धनासी धन ।। ५५
ऐसी ही स्वरूपाची स्थिति । स्वानुभवी ते जाणती ।
ऐसिये वस्तूची प्राप्ति । सद्‌गुरुबोधें ।। ५६

श्रीतुकाराम महाराजांप्रमाणेंच समर्थांना आध्यात्मिक क्षेत्रांतील ढोंगांचा कंटाळा होता. गुरुकृपेवांचून मोक्षप्राप्ति नाहीं हें जसें त्यांनीं सांगितलें त्याप्रमाणेंच गुरूच्या संबंधांत शिष्याला त्यांनीं सावध रहावयास सांगितलें आहे. तुकारामाप्रमाणेंच समर्थहि शब्दांचा वापर "हातीं घेऊन बाण फिरे"। अशा थाटानेंच करतात. ते सांगतात :--

अद्वैतनिरूपणें अगाध वक्ता । परी विषयी लोलंगता ।
ऐसिया गुरूचेनि सार्थकता । होणार नाही ।।७
जें जें मन अंगीकारी । तें तें स्वयें मुक्त करी ।
तो गुरू नव्हे भिकारी । झडें आला ।।८
शिष्यास न लाविती साधन । न करविती इंद्रियदमन ।
ऐसे गुरू अडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे ।।९
जो गुरु भीडस्तारू । तो अधमाहून अधम थोरू ।
चोरटा मैंद पामरू । द्रव्यभोंदू ।।१०
तैसा गुरू नसावा । जेणें अंतर पडे देवा ।
भीड करूनिया गोवा । घाली बंधनाचा ।।११

## समर्थ आणि प्रवृत्तिमार्ग

श्रीसमर्थ हे दैववाद, निराशावाद व केवळ निजानंदी निमग्न होऊन राहणें या प्रवृत्तींच्या पूर्ण विरोधी आहेत. प्रपंच, परमार्थ अथवा प्रवृत्ति, निवृत्ति यांची वैदिकधर्माच्या तत्त्वानुसार योग्य सांगड घालून त्यांनीं ज्ञानोत्तर कर्माचा पुरस्कार केलेला आहे. आळशी करंटेपणाला त्यांनीं जागजागीं नांवें ठेवलेलीं आहेत. एका ठिकाणीं तर सृष्टीची उत्पत्तिप्रक्रिया सांगून श्रीसमर्थ म्हणतातः--

आहे निराकार निर्मळ निश्चळ । तेथुनी चंचल प्रेत्न जाला ।।
प्रेत्न जाला आधी म्हणोनिया थोर । प्रारब्धविचार ऐलीकडे ।।
ऐलीकडे कर्म पाहातां भूतळी । प्रेत्न अंतराळी मूळारंभ ।।

कित्येक ठिकाणीं त्यांनीं महाभारतकाराप्रमाणें स्पष्ट शब्दांत प्रवृत्तीची प्रेरणा दिली असून आळस आणि करंटेपण हीं एकार्थक नांवें असल्याचें सुचविलें आहे. ते म्हणतात, " प्रयत्न हा देव व आळस हा राक्षस आहे. त्यांचे पुढील उद्गार पहा :—

केल्याने होत आहे रे । आधी केलेंचि पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ।।४
अचूक यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे ।
न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया ।।५
सावधु देव जाणावा । उन्मत्तु दैत्य बोलिजे ।
साक्षेपी वंश देवाचे । आळसी वंश दानवी ।।६
देव सर्वांस सांभाळी । तदंश जाणिजे तसा ।
दैत्य ते पीडिती लोका । तदंश त्याचिसारिखे ।।७

प्रयत्नालाच देव समजून कर्तव्यासाठीं कर्तव्य या धारणेनें भारलेलें, शीलसंपन्न, चारित्र्ययुक्त, तेजस्वी असें राष्ट्र निर्माण करण्याचा समर्थांनीं आटोकाट प्रयत्न केला. त्यांनीं कोणत्याहि एका वर्णाची, एकांगीपणानें तळी उचलून धरलेली नसून समाजांतील प्रत्येक घटकानें आपलें जीवन आदर्श घडवावें व कर्मयोगी बनावें यासाठीं प्रत्येकाला त्याच्या त्याच्या क्षेत्रांत सर्वांगपूर्ण मार्गदर्शन केलें आहे व म्हणूनच ते राष्ट्रगुरु ठरले. हें मार्गदर्शन त्यांनीं कसें केलें तें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

✦ ✦ ✦

प्रकरण पंधरावें

# राष्ट्रगुरु व राजगुरु

समर्थांनीं केवळ ब्राह्मणांसाठींच उपदेश केला व ब्राह्मण्य-रक्षणावर जोर दिला असा आक्षेप करून त्यांना संकुचित वृत्तीचे ठरविण्याचा प्रयत्न डॉ. कोलते प्रभृति कांहीं संकुचित वृत्तीच्या लोकांनीं केलेला आहे. ब्राह्मण म्हटलें कीं अकारण मस्तकशूलाची व्यथा होणें हा त्यांचा स्वभावधर्म दिसतो. वारकरी सम्प्रदायाची गंगोत्री जे ज्ञानदेव तेहि ब्राह्मणांविषयीं "वर्णांमाजी छत्रचामर। स्वर्ग जयांचें अग्रहार। मंत्र विद्येचें माहेर। ब्राह्मण जे ॥" असें म्हणतात. श्रीतुकोबांनींहि ज्यांच्याविषयीं 'पायींचि वहाण पायीं बरी' असे स्वत:विषयीं उद्‌गार काढून लीनता दर्शविली त्यांना ही मंडळी काय म्हणणार? 'विश्वजन उद्धरावा संसर्गमार्गे' 'सकळां राखणे राजी हे मुख्य भक्ति जाणिजे' अशा धारणेचे समर्थ कोणत्याहि एका वर्गाचे अभिमानी नव्हते. राष्ट्रांतील सर्व घटक वर्ग कर्तव्यासाठीं कर्तव्य या धारणेचे असावे असा त्यांचा कटाक्ष होता. ते म्हणतात : "रायांनीं करावें राजधर्म। क्षत्रीं करावें क्षात्रधर्म। ब्राह्मणीं करावें स्वधर्म। नानाप्रकारें ॥" या दृष्टीनें प्रत्येक राष्ट्रघटकाचे गुणावगुण सांगून त्यांनीं वर्णविहित आदर्शवादाचा पुरस्कार केलेला आहे. वैदिक संस्कृतीचें म्हणजे भारतीय राष्ट्राच्या अस्मितेचें पुनरुत्थान घडविणें हा ज्यांचा ज्यांचा जीवनहेतु त्या त्या भारतीय द्रष्टयांनीं जें केलें तेंच समर्थांनीं केलें. भगवान् श्रीकृष्णांच्या पावलावर पाऊल टाकून ज्ञानदेव, एकनाथ, तुकोबांनीं हेंच केलें हें आपण पूर्वीं पाहिलें आहे. समर्थांनीं तें अधिक स्पष्ट शब्दांत व अधिक हिरिरीनें सांगितलें. केवळ चातुर्वर्ण्याचा सर्वसामान्य उल्लेख न करतां प्रत्येक समाजघटकाच्या कर्तव्यक्षेत्राचा विचार त्यांनीं मांडला. ब्राह्मणांवर त्यांचा विशेष कटाक्ष असण्याचें कारण तो या राष्ट्राचा मार्गदर्शक वर्ग होता, व मार्गदर्शकानेंच कर्तव्यविन्मुख

होणें यांत राष्ट्राचा सर्वांगीण अधःपात होण्याचें बीज सांठलेलें असल्यामुळें समर्थांचें अंतःकरण जळत होतें. त्यांचा ब्राह्मण्यावर कटाक्ष आहे; नाममात्र ब्राह्मणाचे ते पुरस्कर्ते नाहींत. पतित नेतृवर्गाला फटके मारावे तसें त्यांनीं ब्राह्मणांना शब्दप्रतोदांनीं आघात केलेले आहेत. सर्व राष्ट्रघटकांना समर्थांनीं जें कर्तव्य-परायणतेचें मार्गदर्शन केलेलें आहे तें त्यांच्याच सामर्थ्यशाली शब्दांत पाहणें उचित ठरेल. समर्थ म्हणतात :—

## ब्राह्मण व समर्थ

स्नानसंध्या प्रदक्षिणा नमस्कार । श्राद्धपक्ष थोर सांडूं नये ।।
ब्राह्मणांसी वैश्वदेव उपासना । करावें तर्पण आदरेसी ।।
करावें आलोडणें वेद आणि शास्त्रें । मंत्र स्तुतिस्तोत्रें नानापरी ।।
तपें पुरश्चरणें ध्यानस्थ बैसावें । सांग संपादावें देवार्चन ।।
दान दया धर्म करावा स्वधर्म । चुकवावें वर्म संसाराचें ।।
अनाचारें ज्ञान कदा निवळेना । इहलोक कळेना परलोक ।।
सांडा मार्गें बंड पाषांड थोतांड । चिंतावा अखंड गुणातीत ।।
उपासना कर्म हे आधीं पाळावें । मग सांभाळावें ब्रह्मज्ञान ।।
ब्राम्हणू ब्रम्ह वेत्ता तो । ब्राम्हणू ब्रम्हनिश्चयी ।
ब्राम्हणू ब्रम्हस्थितीचा । ब्राम्हणू म्हणिजे गती ।।
देवाकडे मन लागतां उन्मन । सोवळा ब्राम्हण तोचि एक ।।

## क्षत्रिय व समर्थ

क्षत्रियाचें वर्णन करतांना कविकुलगुरु कालिदासानें रघुवंश महाकाव्यांत म्हटलें आहे कीं,

क्षतात्किल त्रायत इत्युदग्रः।
क्षत्रस्य शब्दो भुवनेषु रूढः ।

'जो दुःखांतून स्वतःच्या सामर्थ्यानें स्वराष्ट्राचें संरक्षण करतो तो खरा क्षत्रिय होय.' समर्थ म्हणतात :—

अल्प स्वल्प संसार धर्म । मागां बोलिले राजधर्म ।
आतां ऐका क्षात्रधर्म । परम दुर्लभ जो ।।
जयास जिवाचें वाटे भयें । तेणें क्षात्रकर्म करूं नये ।।
कांहींतरी करून उपाये । पोट भरावे ।।
विन्मुख मरणीं नरक होती । वांचून येतां मोठी फजीती ।
इहलोक परलोक जाती । पढ़ानाका ।।
मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ।।
जैसा भांड्याचा गलोला । निर्भय भारामध्यें शिरला ।।
तैसा क्षत्री रिचवला । परसैन्यामध्यें ।।
ऐसे अवघेच उठतां । परदळाची कोण चिंता ।
हरणें लोळवी चित्ता । देखत जैसा ।।
मर्दे तकवा सोडूं नये । म्हणिजे प्राप्त होतो जय ।
कार्य प्रसंग समय । वोळखावा ।।
देवमात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यू भला ।
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ।।
मरण हांक तो चुकेना । देह वांचवितां वांचेना ।
विवेकी होऊन समजाना । काय करावें? ।।
देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावें परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाहीं ।।
देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुख बडवा कां बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं ।।

श्रीसमर्थांनीं एखाद्या प्राचीन ग्रंथांतील क्षात्रधर्माचें रूपांतर केलेलें नसून प्रत्यक्ष त्यांच्या काळच्या रणमर्द मराठ्यांना राष्ट्ररक्षणाच्या व परसत्तेच्या निखंदनाच्या महत्कार्यासाठीं येथें तेजस्वी आवाहन केलेलें आहे हें या उताऱ्यावरून चाणाक्ष वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. शिवछत्रपतींच्या अवतारी नेतृत्वाखालीं राष्ट्र स्वतंत्रतेस्तव जीवनाचा होम करावयास सज्ज झालेल्या तरुण वीरांना जसें हें स्फुरणदायी आवाहन आहे, त्याचप्रमाणें या पुनरुत्थानापासून दूर असलेल्यांना हे प्रेरणागर्भ संदेश आहेत.

## राजधर्म व समर्थ

राज्यसंस्था ही नेहमींच समाजाची नेतृसंस्था असते. समर्थांच्या काळीं या संस्थेचें 'राजा' हें प्रतीक होतें. त्यांनीं राजा कसा असावा व कसा नसावा याचें जें विवेचन केलें आहे तें राज्ययंत्र कसें असावें व कसें नसावें या गोष्टीचेंच वस्तुत: विवेचन आहे. त्यामुळें तें सर्वकाळीं उपयुक्त ठरणारेंच आहे; मग राज्यसंस्थेचें स्वरूप कसेंहि असो. समर्थ दक्ष राज्यसंस्थेचें स्वरूप पुढीलप्रमाणें सांगतात :—

शक्तीनें मिळती राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ।
शक्ती युक्ती जये ठायीं । तेथें श्रीमंत धावती ।।
युक्तीने चालते सेना । युक्तीनें युक्ति वाढवीं ।
संकटी आपणा रक्षी । रक्षी सेना परोपरी ।।
कांहीं येक परीक्षावें । शोधावें बहुतांपरी ।
नेटके कार्य साधावे । रोधावें कुटिळा जना ।।
असो हे बोलणे झाले । युक्तीवीण कामा नये ।
युक्तीला पाहिजे शक्ति । तस्मात् शक्ति प्रमाण हे ।।
खबर्दार बरा राजा । विवेकी सर्व साक्षपी ।
आज्ञेनें सर्वही चाले । तेणें सौख्य बहू जना ।।
पोरांला माय जाणेना । तें पोरें वांचती कशी ।
गुराखी राखतो गुरें । धणीं दोहींस पाळतो ।।
अस्त्र बोलिलो ऐसे । येणे न्याये परत्रही ।
प्रत्ययो शोध शोधावा । सावधान चहूंकडे ।।
सर्वत्र राखणे राजी । सुख दुःख जाणोनिया ।
सर्वांची वाहावी चिंता । बुद्धिवंत करावया ।।
लोकांसी राखणे राजी । ते राज्य प्रबळे बळे ।।
बंद बेबंद जाणावे । ताबे ताबे परोपरी ।।
खळ खोंचर काढावे । तंदुळासारिखे खडे ।
खरें ते आदरें घ्यावें । खोटें सर्वत्र टाकिती ।।

याच्या उलट अव्यवस्थित राज्यसंस्थेचें वर्णन "म्हैसमंगळ" या अन्वर्थ शब्दानें करून तिचें वर्णन करतांना श्रीसमर्थ म्हणतात:—

मोठें तें पाप लोकांचें। प्रभू तो जाणता नव्हे।
वर्तंतो शिकविल्या बोले। तो काय म्हैसमंगळू।।
हिशेबी कोण पाहातो। धामधूम चहूंकडे।
नीती ते राहिली पर्ती। तेथें कैंची विवंचना।।
लांच चोरी बहू झाली। घालाघाली परस्परें।
धण्याला नेणवें कांहीं। बेबादी नगरी पहा।।
धणीं तो राहिला मागें। कारभारीच नासती।
पाप हें थोर लोकांचें। सांगावें कवणापुढें।।
फितव्यानें बुडती राज्यें। खबर्दारी असेचिना।।
युक्ति ना शक्ति ना बेगी। लोक राजी असेचिना।।
बेदादी बेकैद सेना। कारभारीच चोरटे।
धण्यासी राखणे राजी। कदा काळीं घडेचिना।
चोरटी होरटी तुंदे। नासके लांच इच्छिती।
लौंढीचे दुरी घालावें। मारावें राजकारणें।।
सेवकां आवरूं नेणे। तो राजा मूर्ख जाणिजे।
मूर्खाचें राज्य राहेना। कोणाचें कोण ऐकतो।।
प्रपंच नासतो ऐसा। भाग्य जातें निघोनिया।
यालागी सर्व सांभाळी। तोचि साहेब नेटका।।

## रामराज्य व समर्थ

राम हा शब्द भारतीय संस्कृतीप्रमाणें पूर्णत्वाचा निदर्शक आहे. रामराज्य या शब्दाचा आजहि परिपूर्ण आदर्श राज्य अशा अर्थानेंच वापर होत असतो. जेथें कर्तव्यासाठीं कर्तव्य व पावित्र्यासाठीं पावित्र्य अशा धारणेचें व 'एकमेकां साह्य करूं' अशा व्यवहाराचे सर्वच्या सर्व लोक आहेत त्याला रामराज्य म्हणतात. साम्यवाद्यांनींहि Withering away of the State या सूत्रानें हीच कल्पना मांडलेली आहे. खरें म्हणजे त्यांनीं ही भारतीय कल्पनेचीच अर्धवट उसनवारी केलेली आहे. असो. हें रामराज्य भूतलावर निर्माण व्हावें हा समर्थांचा ध्येयवाद होता व तें भारतीय संस्कृतीच्या रक्षणानेंच होणारें असल्यामुळें त्यासाठींच त्यांना

धर्मराज्याची निर्मिति आवश्यक वाटत होती. आपली रामराज्याची कल्पना मांडतांना श्रीसमर्थ म्हणतात :—

"राम विश्राम देवांचा। रामभक्तांसि आश्रयो।
रामयोगी मुनिध्यानी। राम रक्षी ऋषिकुळां॥
कीर्ति या रघुनाथाची। पाहतां तुळणा नसे।
येक बाणी येक वचनी। येक पत्नीच धार्मिकु॥
राज्य या रघुनाथाचें। कळिकाळासि नातुडे॥
बहुवृष्टि अनावृष्टि। हें कदा न घडे जनीं॥
उद्वेग पाहतां नाहीं। चिंतामात्र नसे जनीं॥
व्याधि नाहीं रोग नाहीं। लोक आरोग्य नांदती॥
युद्ध नाहीच अयोध्या। राग ना मत्सरू नसे॥
वंद निर्बंधही नाहीं। दंड दोष कदा नसे॥
कुरूपी पाहतां नाहीं। जरा मृत्यु असेचिना॥
आदरू सकळै लोकां। सख्य प्रीति परस्परें॥
बोलणें सत्य न्यायाचें। अन्याय सहसा नसे॥
अनेक वर्तती काया। येक जीव परस्परें॥
चढता वाढता प्रेमा। सुखानंद उचंबळे॥
संतोष समस्तै लोकां। रामराज्य भूमंडळी॥

## सामान्य धर्म व समर्थ

समाजजीवनांतील कोणतेंहि क्षेत्र समर्थांच्या दृष्टिकोणांतून सुटलेलें नाहीं. सेवकधर्म सांगतांना त्यांनीं दिलेल्या सूक्ष्म सूचना पहा :—

स्वामींनी जे बोलावें। तेंचि सेवकी प्रतिष्ठावें।
वेळ चुकवूनि बोलावें। विनीत होउनी॥
मी शाहाणा ऐसें कळलें। तरी स्वतंत्र पाहिजे केलें।
स्वतंत्र होता मिरवलें। शहाणपण॥
ज्याकरितां प्राणी वाढले। त्यासीच अडवूं लागले।
ते कैसे म्हणावें भले। नीतिवंत॥

सेवक तोचि जो अडेना। शब्द भुईस पडेना।
काम चुकले हे घडेना। कदाकाळीं।।
आप स्वार्थ उदंड करणें। आणि स्वामीकार्य बुडवणें।
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें। सेवकांची ।।
श्रेष्ठाचें केलें मोडावें। आपुलेंचि प्रतिष्ठावें।
तरी मग लागे भ्रष्टावें। वैभवापासुनी।।

परमेश्वरानें मनुष्यमात्राला बुद्धिशक्तीची अपूर्व देणगी दिलेली असून तिचा उपयोग करून जो आदर्श जीवन घडवीत नाहीं त्याला श्रीसमर्थ करंटा म्हणतात. सर्वसामान्य जनतेचें उद्बोधन करतांना ते म्हणतात :—

रूप लावण्य अभ्यासितां नये। सहज गुणास न चले उपाये।
कांहीं तरी धरावी सोये। आगंतुक गुणाची।।
काळें माणुस गोरे होईना। वनाळास यत्न चालेना।
मुक्यास वाचा फुटेना। हा सहज गुण ।।
अवगुण सोडितां जाती। उत्तम गुण अभ्यासितां येती।
कुविद्या सांडून सिकती। शहाणे विद्या ।।
मूर्खपण सांडितां जाते। शहाणपण सिकतां येते।
कारबार करितां उमजतें। सकळ कांहीं।।
सकळ अवगुणांमध्यें अवगुण। आपले अवगुण वाटती गुण।
मोठें पाप करंटेपण। चुकेना कीं।।

या दृष्टीनें सामान्य जीवनाचा स्तर आंतरिक विकसनाच्या दृष्टीनें उंचावण्यासाठीं श्रीसमर्थ किती काळजी घेत आहेत व किती सूक्ष्म मार्गदर्शन करीत आहेत हें ज्यांना अभ्यासावयाचें असेल त्यांनीं श्रीदासबोधांतील मूर्खांचीं व पढतमूर्खांचीं लक्षणें अवश्य अभ्यासावीं. करंटेपणा, झोंपाळूपणा, आळस, भाबडट-पणा, दुश्चितपणा, मूर्खता, पढतमूर्खता, कुतर्क, अविवेक, अहंकार, काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ, इत्यादि अवगुणांचें विस्तारपूर्वक वर्णन करून त्यांची हेयता मनावर ठसविण्यासाठीं व उत्तमगुण...

सदेवपण, लीनता, शांति, दिव्यता, व सत्कीर्ति यांचेंहि विस्तारपूर्वक वर्णन करून ते अंगीं बाणविण्याची प्रवृत्ति सर्वसामान्य लोकांत निर्माण करण्यासाठीं त्यांनीं जे समासचे समास खर्ची घातले आहेत ते पाहिले म्हणजे सामान्य जनतेविषयीं त्यांच्या अंतःकरणांत असणारा असीम कळवळा प्रत्ययास येऊन मन आदरानें, श्रद्धेनें व आश्चर्यानें भरून गेल्याविना रहात नाहीं. 'मलिन वस्त्र नेसो नये' 'जाणाऱ्यास पुसों नये। कोठें जातो म्हणोनी' 'आपले ओझे घालूं नये कोणी एकासी' 'तोंडी शिवी असो नये, दुसऱ्यास देखोन हांसों नये, बहुत अन्न खावूं नये' इतक्या बारीक सारीक सूचना देखील आईच्या भूमिकेवरून 'मुलाच्या चालीनें चालावें। मुलाच्या बोलीनें बोलावें' या सूत्राप्रमाणें ते कळवळ्यानें देत आहेत. आदर्श गृहस्थाश्रम कसा असावा याचें चित्र रेखाटतांना समर्थांनीं जी दिनचर्या सांगितलेली आहे ती पाहण्यासारखी आहे :—

प्रातःकाळीं उठावें। कांहीं पाठांतर करावें।
यथाशक्ति आठवावें। सर्वोत्तमासी॥
मग दिशेकडे जावे। जें कोणासीच नव्हे ठावें।
शौच आचमन करावें। निर्मळ जळें॥
मुखमार्जन प्रातःस्नान। संध्या तर्पण देवतार्चन।
पुढें वैश्वदेव उपासन। यथासांग॥
कांहीं फलाहार घ्यावा। मग संसार धंदा करावा।
सुशब्दें राजी राखावा। सकळ लोक॥
ज्या ज्याचा जो व्यापार। तेथें असावें खबर्दार।
दुश्चितपणें तरी पोर। वेढा लावी॥
याकारणें सावधान। येकाग्र असावें मन।
तरी मग जेवितां भोजन। गोड वाटे॥
पुढें भोजन जालियावरी। कांहीं वाची चर्चा करी।
एकांती जाऊनि विवरी। नाना ग्रंथ॥
ऐके सदेवपणाचें लक्षण। रिकामा जाऊं नेदी क्षण।
प्रपंच व्यवसायाचें ज्ञान। बरें पाहे॥

कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ।
शरीर कारणी लावी । कांहीं तरी ॥
कांहीं धर्मचर्चा पुराण । हरिकथा निरूपण ।
वाया जाऊं नेदी क्षण । दोहींकडे ॥
ऐसा जो सर्व सावध । त्यास कैंचा असेल खेद ।
विवेकें तुटला संबंध । देहबुद्धीचा ॥
आहे तितुके देवाचें । ऐसें वर्तणें निश्चयाचें ।
मूळ तुटे उद्वेगाचें । येणे रीती ॥

## बालसृष्टि व समर्थ

मोठमोठ्या द्रष्टया पुरुषांनीं व तत्कालीन संत-महंतांनीं सर्वसामान्य जनांपैकींहि प्रौढांना भरपूर उपदेश केलेला आहे. समर्थांनीं केवळ प्रौढच नव्हे तर बालसृष्टि व विद्यार्थी वर्ग यांनाहि अत्यंत सूक्ष्म मार्गदर्शन केलेलें आहे. तें इतकें उत्कृष्ट आहे कीं आजहि विद्यार्थी वर्गाला तें मार्गदर्शक होऊं शकेल. उदाहरणार्थ, त्यांचे पुढील कांहीं उद्‌गार पहा :—

बरें सत्य बोला यथातथ्य चाला ।
बहू मानिती लोक येणें तुम्हाला ।
धरा बुद्धि पोटीं विवेकी मुलें हो ।
बरा गूण तो अंतरामाजि राहो ॥१
बरें दांत घासोनि तोंडा धुवावें ।
कळाहीण का शूद्रमूखी नसावें ।
सदा सर्वदा प्रेत्न सांडू नको रे ।
बहू साल हा खेळ कामा नये रे ॥२
दिसामाजि कांही तरी तें लिहावें ।
प्रसंगे अखंडीत वाचीत जावें ।
वयें श्रेष्ठ ते दास्य त्यांचें करावें ।
बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥३

भला रे भला बोलती तें करावें ।
बहुतां जनांच्या मुखें येश घ्यावें ।
पुढे शेवटीं सर्व सांडोनि जावें ।
मरावें परी कीर्तिरूपें उरावें ।।४
शिका रे शिका फिका जन्म जातो ।
नका रे नका तुका घात होतो ।।

श्रीसमर्थांनीं लिहिणें, वाचणें, संगति करणें, भाषण करणें, अभ्यास करणें, व शुद्ध सत्यानें राहणें या संबंधांत देखील बारीक सारीक सूचना केल्या आहेत. अक्षर कसें असावें यासंबंधीं ते म्हणतात :—

' ब्राह्मणें बाळबोध अक्षर । घडसुनी करावें सुंदर ।
जें देखतांचि चतुर । समाधान पावती ।।
वाटोळें सरळें मोकळें । वोतलें मसीचें काळें ।
कुळकुळीत वळी चालिल्या ढाळे । मुक्तमाळा जैशा ।।
अक्षर मात्र तितुके नीट । नेमस्त पैस काने नीट ।
आडव्या मात्रा त्याहि नीट । आर्दुली वेलांटचा ।।
पहिलें अक्षर जे काढिलें । ग्रंथ संपतों पाहात गेलें ।
येका टांकेचि लिहिलें । ऐसें वाटे ।।
शुद्ध नेटकें ल्याहावें । लेहोन शुद्ध शोधावें ।
शोधून शुद्ध वाचावें । चुको नये ।।

विद्यार्थ्यांनीं मित्रता कोणाशीं करावी यासंबंधींच्या सूचना देतांना ते म्हणतात :—

'जैसा कागद येकचि आहे । परी जे वस्तूची संगति लाहे ।
ते वस्तूचि सारिखा पाहे । परिमळ तया कागदासी ।।
मित्र तो पाहिजे ज्ञानी । विवेकी जाणता भला ।
श्लाघ्यता पाहिजे तेथें । इहलोक परत्रहि ।।
उगाचि वेळ घालाया । नासके मित्र पाहिले ।
कुबुद्धि कुकर्मी दोषी । त्यांचें फळ भोगावया ।।

## समर्थ व समाजकारण

ज्ञानी मनुष्यानें केवळ निजानंदांत निमग्न होऊन राहणें ही गोष्ट समर्थांना आवडणारी नव्हती. ते एका ठिकाणीं म्हणतात :–

आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें ।
परंतु वाया दवडणें । हा धर्म नव्हे ।।
तैसे ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावें ।
तरतेन बुडो नेदावें । बुडतयासी ।।

अशा ज्ञानी पुरुषानें समाजाचें नेतृत्व स्वीकारून त्याला वळण लावणें व त्यासाठीं आपल्या भोंवताली समाज गोळा होईल आणि आपला शब्द तो श्रद्धेनें ऐकेल असें स्वतःचें व्यक्तिमत्त्व आकर्षक करण्याविषयीं त्यांचा कटाक्ष आहे. ते म्हणतात : ‘कुग्रामे अथवा नगरें । पहावीं घरांचीं घरें । भिक्षामिषें लहान थोरे । परीक्षोन सोडावे । उदंड समुदाये करावें ।।’ त्यासाठीं आवश्यक ती गुणसंपत्ति ज्याच्याजवळ आहे त्यालाच समर्थ असें म्हणतात. हें नेतृत्व ज्याला सांभाळावयाचें असेल त्याच्या ठिकाणीं पुढील तीस गुण असले पाहिजेत असें समर्थांचें म्हणणें आहे.

(१) स्नान संध्या देवार्चन, (२) येकाग्र करावें जपध्यान, (३) हरिकथा निरूपण, (४) शरीर परोपकारी लावावें, (५) आडलें जाकसलें जाणावें, (६) मृदुवचनें बोलत जावें, (७) दुसऱ्याच्या दुःखे दुखवावे, (८) परसंतोषें सुखी व्हावें, (९) बहुतांचे अन्याय क्षमावे, (१०) बहुतांचे कार्यभाग करावे, (११) आपल्या परीस व्हावे पारखे जन, (१२) दुसऱ्याचें अंतर जाणून, तदनुसार वर्तावें, (१३) लोकांस परीक्षित जावें, (१४) नेमकेचि बोलावें, (१५) तत्कालचि प्रतिवचन द्यावें, (१६) कदापि रागास न यावें, (१७) आलस्य अवघाच दवडावा, (१८) यत्न उदंडचि करावा, (१९) शब्दमत्सर न करावा कोणी येकाचा, (२०) उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा,

(२१) शब्द निवडून बोलावा, (२२) सावधपणें करीत जावा संसार आपुला, (२३) मरणाचें स्मरण ठेवून हरिभक्तीस नेहमी सादर असावें, (२४) मरोन कीर्तीस उरवावें, (२५) चळों नेदावी शांति, (२६) ज्ञानवैराग्यें शोभावें (२७) स्वयें आपण कष्टून बहुतांचें सोसावें, (२८) परांतरास न लावावा ढका, (२९) प्रसंगी कामास चुकवूं नये आणि (३०) आपणावरून दुसऱ्याला राखत जावें.

या गुणांबरोबरच अशा सामाजिक नेतृत्वाच्या ठिकाणीं वाणी व संकेतांत विशिष्ट प्रबोधशक्ति असण्याची नितान्त आवश्यकता असते. समर्थांच्या मताप्रमाणें ही प्रबोधशक्ति केवळ दैवानें मिळणारी नसून तिच्यासाठीं विशिष्ट पद्धतीचें आचरण आवश्यक आहे. ते सांगतात :--

'प्रबोध शक्तीची अनंत द्वारें । जाणें सकळांची अंतरें ।
निरूपणें तदनंतरें । चटक लागे ॥
जेणें बहुतांस घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ति ।
बहुतांचे मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ॥
बोलण्यासारखें चालणें । स्वयें करूनि बोलणें ।
तयाची वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥
जें जें जनास मानेना । तें तें जनहि मानीना ।
आपण एकला जन नाना । सृष्टिमध्यें ॥

पण केवळ एवढ्यानेंहि जनताजनार्दन राजी राखला जाणार नाहीं. म्हणून बहुताला राजी राखावें. असें समर्थांचें कटाक्षानें सांगणें आहे. आपल्याला चिमटा घेतला तर जसें दुःख होतें तसेंच तें दुसऱ्यालाहि होतें हा न्याय सांगून निःस्पृह पण समाजकार्य-कुशल नेत्यानें ---

"मुलाचे चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ।
तैसें जनास शिकवावें । हळुहळु ॥
मुख्य मनोगत राखणें । हेंचि चातुर्याचीं लक्षणें ।
चतुर तो चतुरांग जाणें । इतर तीं वेडीं ॥

वेड्यास वेडे म्हणों नये । वर्म कदापि बोलों नये ।
तरीच घडे दिग्विजये । निस्पृहासी ॥"

म्हणून मृदु भाषण ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. समर्थ आणखी असें सांगतात कीं, या निःस्पृह समाजनेत्यानें लोकांजवळून कशाचीहि अपेक्षा न करतां अखंड त्यांच्यासाठीं खपलें पाहिजे. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर :—

"तो परोपकार करीतच गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।
मग काय उणें तयाला । भूमंडळी ॥
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ॥
जंवर चंदन झिजेना । तंव तो सुगंध कळेना ।
चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ॥
झिजल्यावांचुनि कीर्ति कैंचि । मान्यता नव्हे की फुकाची ॥

समाजकारण व राजकारण यांत वस्तुतः कांहीं भेद नाहीं. समर्थांना सभोवार पसरलेल्या म्लेच्छ सत्तेंत आपलें समाजपुनरुत्थानाचें काम करावयाचें होतें. म्हणून अखंड सावधानता या कार्यांतील समाजनेत्यांनीं बाळगणें आवश्यक आहे. हें त्यांनीं वारंवार सांगितलेलें आहे. या समाजनेत्यांना समर्थांनीं ज्या स्पष्ट शब्दांत सूचना दिल्या त्यांचें संकलन कै. नानासाहेब देव यांनीं पुढीलप्रमाणें केलेलें आहे :—

(१) जो कोणी आमचा शिष्य, ज्ञानी आणि निःस्पृह आहे. आणि ज्याला समुदाय करण्याचा हव्यास आहे, त्यानें अखंड एकान्त सेवावा. एकान्तांत अनेक मार्ग सुचतात आणि कोण कसा, कोण कसा, याची बरोबर कल्पना होते. आपलें दिवाळें निघूं नये म्हणून सावकारास हिशेबाच्या कामांत जशी दक्षता बाळगावी लागते,त्याचप्रमाणें राजकारणी पुरुषानें अखंड चाळणा केली पाहिजे तसें तो न करील तर खरा कोण आणि खोटा कोण, कोणावर भरंवसा टाकावा किंवा टाकूं नये, हें त्यास समजणारच नाहीं.

(२) दुसऱ्याचा खोटेपणा आपल्या आधींच लक्षांत आला म्हणजे त्याचें खोटेपण आपोआपच खुंटते.

(३) एकाच ठिकाणीं फार दिवस राहिल्यानें अति परिचय होतो. अति परिचयाचें पर्यवसान अवज्ञेंत होतें. यासाठीं सारखें एकाच ठिकाणीं राहूं नये.

(४) आळस करूं नये. आळसानें काम नासतें; घात होतो. आपल्या अनुयायांच्या अंतरंगाकडे सारखें लक्ष असावें.

(५) अनुयायांनाहि रिकामपण सांपडूं देऊं नये. त्यांच्या मागें सारखीं कामें लावून दिलेलीं असावीं. लबाडया आणि खोडया करण्याला त्यांना सवडच सांपडूं देऊं नये.

(६) चोराच्या हातींच भांडाराच्या किल्ल्या द्याव्या. घसरूं लागला तर त्यास शुद्धीवर आणावें, आणि याप्रमाणें हळू हळू त्याला चोराचा साव करून सोडावें.

(७) यांत आम्ही कांहीं नवीन सांगत आहोंत असें नव्हे. कोणालाहि कष्टी न होऊं देतां, सर्वांना राजकारणामध्यें गोवून घ्यावें.

(८) आपला संशय न येईल अशा रीतीनें नष्टाला नष्टाकडूनच ताळ्यावर आणावें व बडबड्याचें तोंड बडबड्याकडूनच बंद पाडावें.

(९) भांडखोरपणाचा आव आपणावर न येऊं देतां, कांट्यानें कांटा काढावा त्याप्रमाणें भांडखोराला भांडखोराकडूनच उडवावा.

(१०) एकादी मसलत केली असतां ती षट्कर्णी झाली असतां स्वाभाविक बिघडते. कोणास न कळतां कार्य केलें तर तें तत्काळ साधतें.

(११) आपले जे सेवक असतील त्यांच्या कानावर आपल्या गोष्टी जाऊन त्यांना आपल्याविषयीं प्रेम वाटावें, जवळ आल्यानें तें प्रेम दृढ व्हावें व सलगीनें त्यांचें आणि आपलें सेव्यसेवकपणाचें नातें कायम व्हावें.

(१२) आज करावयाचें काम उद्यावर टाकूं नये. असला ढिलेपणा मुळींच नसावा. जें करावयाचें तें तत्काळ करावें. तें एकदां मागें पडलें कीं, कायमचेंच मागें पडतें.

(१३) जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला। जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ।।

(१४) सर्वांच्याच कानावर सर्व कांहीं गोष्टी जाऊं लागल्या, म्हणजे समजावें, यांतलें कांहींच होणें नाहीं. असें होऊं देऊं नये.

(१५) मुख्य सूत्र आपल्या हातीं ठेवून इतराहातून कामें घ्यावीं. सुष्ट, दुष्ट, सर्वांनाच राजकारणामध्यें राबवावें. ज्याचा जितका उपयोग तेवढा करून घ्यावा.

(१६) दुर्जन झाले म्हणून काय, राजकारण आडून पडूं द्यावें. त्या सर्व बोलक्यांना, पहिलवानांना, भांडखोरांना वठणीवर आणून कामास लावावें.

(१७) गांवोगांवीं गांवगुंड असतात. त्यांचें वर्म ओळखून त्यांना अगदीं जेरीस आणावें, पण अजिबात नाहींसें करूं नये, अखेरीस सांवरून धरून कामास लावावें.

(१८) लोक दुष्ट आहेत, म्हणून काय राजकारण सोडून द्यावयाचें असतें? तसें केलें तर उलट आपली बाजूच लंगडी पडून आपणच उघडे पडूं.

(१९) तंबू ताणून धरणारे दोर जितके मजबूत तितकी तंबूला बळकटी जास्त, त्याप्रमाणें आपला समुदाय प्रचंड असावा, अशी महत्त्वाकांक्षा असेल तर आपला अनुयायी वर्गहि खंबीर असला पाहिजे, व आपणहि स्वतः मठपतीच्याच तोऱ्यांत न राहतां सर्वत्र नजर पुरविली पाहिजे.

(२०) दुर्जन नसतात कोठें? पण आपण त्यांना ओळखतों हें त्यांना कळूं देऊं नये, इतकेंच नव्हे तर उलट आपण त्यांना सज्जन समजतों, असाच त्यांचा ग्रह होऊं द्यावा. तूं दुर्जन आहेस असें एखाद्यास म्हटलें म्हणजे तें भांडणाला आमंत्रण दिल्यासारखें होणार. त्या वाटेसच जाऊं नये.

(२१) गनीमांच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा। ऐसा पाहिजे की राजा । कैपक्षी परमार्थी ।। २५ ।। तयास देखतां

दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे । बंडपाबांडाचे वाखे । सहजचि होती ।।

(२२) हीं कामें सोपीं नाहींत. फार सावधगिरीनें आणि हुषारीनें केलीं पाहिजेत. हें राजकारण आहे, तें शिस्तीनें झालें पाहिजे. त्यांत ढिलेपणा मुळींच नसावा.

(२३) सर्व गोष्टी करवाव्या, पण आपण मात्र लोकांच्या नजरेस न पडावें. लोक आपल्या गोष्टी मोठ्या कौतुकानें बोलत रहावेत! आपली वाणी इतकी गोड, मोहक, भारदस्त असावी कीं, तिनें सर्वांचीं मनें आकर्षून घ्यावीं.

(२४) जगांत हुंबे आहेत, टोणपे आहेत, लौंद आहेत. धट असतात, उद्धट असतात, खटनट असतात; या सर्वांच्या तोंडीं कोणी लागावें? त्यांच्यासारख्यांशींच त्यांची गांठ घालून द्यावी म्हणजे बरें; एरव्ही ते वठणीवर येणें शक्य नव्हे. जशास तसा भेटला म्हणजेच रंग चढतो आणि निकाल लागतो. हें सारें घडवावें, पण हें कोण घडवून आणतो, त्याचा पत्ता नसावा! "इतुकें होतें परी धनी कोठें। दृष्टीस न पडे ॥" तो धनी, तो महापुरुष, तो सूत्रचालक कोठें तरी खनाळांत सर्वत्रांची चिंता करीत बसलेला आढळतो.

तात्पर्य, समर्थांनीं केलेल्या या सर्वांगीण व सर्व राष्ट्रघटकांना व्यक्तिशः व वर्गशः केलेल्या कळकळीच्या मार्गदर्शनाकडे पाहिलें तर समर्थांना राष्ट्रगुरु असें कां म्हणतात हें सहज स्पष्ट होईल. सर्वतोपरि पतित झालेल्या समाजाला ऐहिक आणि पारमार्थिक कर्तव्याची दिशा त्यांनीं सुस्पष्ट रीतीनें दाखविली आहे. आपल्या घरकुलाहून दृष्टि अधिक उंचावून त्यांनीं ती समाजाभिमुख करण्यावर कटाक्ष दिलेला आहे. लहान, मोठे, संसारी, परमार्थी व सहा वर्षांच्या मुलांपासून तो साठ वर्षांच्या वृद्धापर्यंत सर्व लोकांना त्यांनीं समाजाभिमुख, राष्ट्राभिमुख व कर्तव्याभिमुख होण्यासंबंधीं हें जें मार्गदर्शन केलें तें शाश्वत स्वरूपाचें व अपूर्व आहे. केवळ एवढेंच जरी समर्थांनीं केलें असतें तरीहि ते

राष्ट्रगुरु ठरले असते. पण एवढ्यावर न थांबतां त्यांनीं स्वतंत्र संप्रदाय निर्माण करून विशिष्ट हेतूनें परीक्षून एकेक मनुष्य घडविला,व त्या काळीं राष्ट्रपुनरुत्थानाला आवश्यक असें नेतृत्वाचें जाळें निर्माण करून त्यागी, तपस्वी, धैर्यशील व ठिकठिकाणचे समाज एकसूत्री करण्याची धमक असलेल्या कार्यकर्त्यांची एक भारतव्यापी संघटना निर्माण केली. त्यांच्या त्रिविध कार्यापैकीं हा दुसरा भाग फारच महत्त्वाचा होता व तो त्यांच्या काळीं अन्य कोणाला सुचलेला नाहीं. त्यांच्या कार्याच्या या विशिष्ट बाजूचें निरीक्षण करणें अत्यंत आवश्यक आहे. कारण शिवछत्र-पतींच्या जीवनाशीं व त्यांच्या चंद्रधवल यशाशीं त्याचा अत्यंत निकटचा संबंध आहे.

## समर्थांचें राष्ट्रनिर्माण कार्य

समर्थांनीं केवळ संत निमाण केले नाहींत; तर महंत निर्माण करून त्यांचें जाळें साऱ्या देशभर पसरविलें. महंत हा संत असलाच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होताच; पण केवळ संत नसून तो राष्ट्रपुनरुत्थानाच्या आंदोलनाचा प्रचारक व लोकनेता होता. त्यानें आपल्या विभागाचें नेतृत्व करावें व समर्थांच्या विशाल संघटनयंत्रांतील एक अनुशासनबद्ध कीलक म्हणून काम करावें अशी त्यांची योजना होती. त्यासाठीं अनेक लोक हातीं धरून त्यांनीं त्यांची परीक्षा घेतली, व त्यांतील निवडक लोक वेंचून काढून त्यांच्यावर संस्कार करून हे उत्तम गुणांचे संघटक निर्माण केले. श्रीसमर्थांचे उद्धव या नांवाचे शिष्य त्यांच्या कल्याणाइतकेच विख्यात आहेत. उद्धव हे समर्थांच्या सान्निध्यांतच लहानाचे मोठे झाले असून त्यांच्याकडे समर्थांनीं नाशिकजवळची टाकळी व तेलंगणांतील इंदूरबोधन या दोन मठांची महंती दिलेली होती. त्यांनीं तेलंगणांतून एकदां ७०० तरुण कार्यकर्ते समर्थांच्या भेटीला आणले होते असा उल्लेख आहे. उद्धवांना समर्थांनीं शिवराम (कल्याणकारी राम) असें टोंपण नांव दिलेलें होतें. समर्थांनीं माणसें कशीं घडविलीं याचें वर्णन करतांना हे उद्धव म्हणतात:—

पाषाणीं अवेव नाना कमावीले । तैसे लोक केले समर्थींही ॥
काष्ठीही अवेव नाना कमावीले । तैसे लोक केले समर्थींही ॥
धातूला अवेव नाना कमावीले । तैसे लोक केले समर्थींही ॥
लोकही पाषाण जड जीव जाण । कमाऊन पूर्ण नीट केले ॥
आम्हीहि पाषाण श्रींनी कमाविलो । शिवराम जालों पावनचि ॥

कारागिरानें आपलें सर्वस्व ओतून, जड व ओवडधोवड दगडा-लांकडांतून, अंगप्रत्यंगांतून दिव्य लावण्याचा आविष्कार करणारी मूर्ति तयार करावी, त्याप्रमाणें मनुष्यांतून आदर्श देवजीवन घडविणारे श्रीसमर्थ हे श्रेष्ठतम शिल्पकार होते; असा त्यांच्या या शिष्योत्तमाच्या अभिप्रायाचा स्पष्ट अर्थ आहे. इतकें विलक्षण कृपादान देणाऱ्या सद्गुरूविषयीं त्यांच्या शिष्यांच्या अन्तःकरणांत विलक्षण आदर असला तर त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं. समर्थांचे एक थोर शिष्य दिनकर हे आपल्या सद्गुरूचें वर्णन करतांना म्हणतात :—

"पाहा सद्गुरू समर्थासारिखे । कोण पां आणिक असे सखे ।
जेणें अनेक संसार दुःखे । कृपाकटाक्षें वारिली ।
सद्गुरु देव धर्म तीर्थ व्रत । सखा सोयरा साह्यकर्ता समर्थ ।
इष्ट मित्र सुहृद बंधुत्वें विख्यात । मायबाप निजांचा ।
त्यापरतें आणिक थोर दैवत । नाही नाही सहसा इत्थंभूत ।
ऐसिया समर्थासी उत्तीर्ण उचित । काइसेन पै व्हावें ॥

या सर्व शिष्यांची एकंदर संख्या किती होती हें सांगणें फार कठीण आहे. समर्थांनीं एक सहस्राच्या वर गांवें आपल्या संचारांत पायाखालीं घातलीं होतीं. याचा उल्लेख मागें केलेलाच आहे. त्यांचें मुख्य कार्यक्षेत्र महाराष्ट्र असलें तरी त्या कार्याचा व्याप संपूर्ण देशभर पसरलेला होता. बदरीनारायणापासून रामेश्वरापर्यंत व जगन्नाथपुरीपासून सोरटी सोमनाथापर्यंत त्यांचे मठ पसरलेले होते. गिरिधर आपल्या समर्थप्रतापामध्यें समर्थांच्या शिष्यांच्या विषयीं लिहितात :—

कित्येक शिष्य सदाचारी । कित्येक शिष्य राज्याधिकारी ।
कित्येक शिष्य राज्यधारी । देशाधिकारी कित्येक ।।
नाना पर्वतुदुर्गी शिष्य केले । नाना सिंधुदुर्गी शिष्य केले ।
नाना भूमिदुर्गी शिष्य केले । सद्गुरूनाथ समर्थे ।।
गुप्त प्रगट भरतखंडी । महापुरुष असती उदंडी ।।
यावद् मायाविस्तार ब्रह्मांडी । तावत् परंपरासामर्थ्ये ।।
समर्थे कित्येक गुप्त शिष्य केले । ते ते समर्थांसी विदित भले ।।

समर्थांनीं महंत म्हणून ज्या शिष्यांची विविध ठिकाणीं स्थापना केली, त्यांची एक यादीच श्रीसमर्थ प्रताप ग्रंथामध्यें गिरिधरांनीं दिली आहे. त्यांतील कित्येक महत्त्वाचीं नांवें "दासायन" ग्रंथांत श्री अनंतदास रामदासी यांनीं दिलेलीं आहेत. त्यावरून समर्थांच्या एकंदर व्यापाची कल्पना येते. ती यादीच आम्ही येथें उद्धृत करतों:—

| स्थळ | शिष्य | स्थळ | शिष्य |
|---|---|---|---|
| अथणी | – निरंजन गोस्वामी | एलिचपूर | – भोळाराम |
| अनंतशयन | – बलभीम | ओंकारेश्वर | – ब्रह्मदास |
| अयोध्या | – रामकृष्ण | ओंढ्या नागनाथ | – बल्लाळ |
| अरुणाचलम् | – अनंत मौनी | अंतर्वेद | – हरिचंद्र |
| अवंतिका | – गंगाधर | कव्हेरी | – वासुदेव पंडित |
| आपचंद | – शिवराम | कऱ्हाड | – निरंजन देव |
| इंदूर बोधन | –उद्धव ऊर्फ शिवराम; माधव | करवीर | – १ पाराजी बरवाजी पंत पारडगांवकर कुलकर्णी सुभेदार २ गोपजीपंत देशपांडे |
| ईट | – गिरधर उर्फ गिरमाजी | | |
| उज्जैनी | – रघुनाथ | | |
| उत्तर प्रांत | – विश्वनाथ पंडित | कर्नाटक | – जयराम |
| उदंबर ( उंबरज की औदुंबर )— | – हरिदास | कारंजें | – (१)वाळकराम (२)प्रल्हाद |
| | | कांती (कांची) | – भगवंत |

| स्थळ | शिष्य |
|---|---|
| काशी | – रामचंद्र |
| कुडाळ (सातारा) | – देशपांडे |
| कृष्णातीर | – नरसिंह |
| केज | – उद्धव |
| कोंकण | –, पिलाजीबावा |
| कोनूर (तंजावर प्रांत) | – राघवस्वामी व शिष्य माधव माधवनंदर |
| गोकर्ण | – भैरव |
| गोमांतक | – गोविंद |
| गंगासागर | – हरिवंश |
| घृष्णेश्वर (वेरूळ) | – आनंद |
| चिकोडी | – नाईक |
| चिपळूण | – सीताराम |
| टाकळी | – उद्धव उर्फ शिवराम |
| डोमगांव | – कल्याण |
| तडवळे | – जगन्नाथ |
| तळबीड | – मोहिते |
| तापीतीर | – नबाबाई |
| तापीपूर | – कृष्ण |
| तिसगांव | – दिनकर उर्फ बहिणाजी गोसावी |
| तुळजापूर | – साठे रविराऊ |
| तेगूर प्रा(कित्तूर) | -- निरंजन गो. |
| तंजावर | – भीम |
| दसकपंचक | – गिरधर व पत्नी अन्नपूर्णाबाई |

| स्थळ | शिष्य |
|---|---|
| दक्षिणप्रांत | – जयराम |
| दादेगांव | – देवदास |
| देवगड | – दामोदर |
| देवगिरि | – रामकृष्ण साऊ |
| द्वारका | – हरि |
| नाशिक | – गिरि गोसावी |
| नीलंगे | – अण्णाप्पा ऊर्फ आनंद |
| परळी (वैजनाथ) | - मल्हारी |
| पांगरी | – रामाजीबुवा |
| पारगांव | – शंकर गोसावी |
| पाली (खंडोबाची) | – रंगोबा अडसूळ |
| पिलीव | – दत्तोबा न्हावी |
| पुरी (जगन्नाथ) | – पद्मनाभ |
| प्रयाग (त्रिवेणी) | – वेणीमाधव |
| बद्रिकेदार | – दयाळ |
| बारामती | – रामाजी |
| बाहे | – (मुरारी) नारायणपिता |
| बेदर | – राम |
| भालगांव | – त्रिंबक |
| भीमाशंकर | – गोपाळ |
| मथुरा | – हरिकृष्ण |
| मनपाडळें | – जयराम |
| मन्यारगुडी | – मेरुस्वामी |
| मल्याळ | – मारुतीदास |
| महाबळेश्वर | – अनंतकवि दिवाकर |
| मायापुरी | – जयकृष्ण |
| मिरज | – वेणाबाई |

| स्थळ | शिष्य |
|---|---|
| मुधोळ | यज्ञेश्वरराव कोटणीस |
| मेथवडे | अंतोबा |
| रामटेक | श्रीधर |
| राजापूर | मुंजे |
| रामेश्वर | हनुमंत |
| राशिवडे | अंबिकाबाई |
| सप्तशृंग | उदास |
| सोरटी (सोमनाथ) | विश्वंभर |
| वऱ्हाड | महारुद्र, जयवंत |
| वाई | चित्राव, थिटे, पिटके |
| वाळवें | अंबिकाबाई |
| विजापूर | नारायणपंत |
| शहापूर | बाळकृष्णपंत, गोपाळपंत, अंबाजी |
| शिरगांव | दत्तात्रय माता रखमाबाई |
| शिरवळ | बाजी गोसावी तांबे |
| शिराळे | हरि व बंधु महादेव, तुकोबा बिडवी |
| श्रीरंगपट्टण | शकर |
| श्रीशैल्य | कोदंडराम |
| सज्जनगड | रायाजीपंत, सबनीस राम, जीवन |
| सगर रायचूर प्रांत | सदाशिव |
| सुरत | जनार्दन |
| हेळवाक | तुकोबा |

शिवाय कल्याण, दिवाकर, वेणाबाई इत्यादि विख्यात शिष्य त्यांच्याजवळ विशिष्ट कार्याचा पत्कर घेऊन असतच. त्यांच्या अनुशासनबद्ध अनुयायांची संख्या ठिकठिकाणीं कशी विखुरलेली असेल याचें एक मोठें उदाहरण हें आहे कीं अयोध्येच्या श्रीराम-मंदिरावर औरंगजेबाच्या सैन्यानें हल्ला केल्यावेळीं त्याचा प्रतिकार करणारे दहा सहस्र गोसावी श्रीसमर्थांचे अनुयायी होते. या शिष्यांना अथवा महंतांना समर्थांनीं अत्यंत कडक शिस्तींत वागवून जसें तयार केलें होतें तसेंच ठिकठिकाणीं स्वयंपूर्णहि केलें होतें. त्या त्या विशिष्ट स्थानीं मठस्थापना करून व साधु म्हणून राहून भिक्षेवर उदरनिर्वाह करावा, अशी त्यांना स्वावलंबी जीवन जगण्याची समर्थांची स्पष्ट आज्ञा होती. ही भिक्षा हे महंत पोट जाळण्यासाठीं मागत नव्हते. " भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ।" हें तुकाराम महाराजांनीं पोटभरू भिक्षेकऱ्यांसाठीं म्हटलें आहे. भिक्षा मार्गाचें प्रवर्तन करणाऱ्या व ज्ञानदेवांचे

आजेगुरु असलेल्या, योगाब्जिनी सरोवरू गोरखनाथांना तुकाराम नांवें ठेवतील हें शक्य नाहीं. समर्थांचा प्रत्येक महंत स्वतंत्र व्यवसाय करून तथाकथित प्रतिष्ठित जीवन सहज घालवूं शकत होता. पण राष्ट्रसेवेसाठीं त्यानें ही फकिरी पत्करली होती. अशा संघटनकार्यार्थ उद्युक्त झालेल्या माणसानें व्यावसायिक जीवन पत्करणें शक्य नव्हतें. जनसेवेशिवाय अन्य व्याप त्यांच्या मागें नव्हता व राष्ट्रसेवेसाठीं फकिरी पत्करल्यावर रोज एका ठिकाणीं जेवण्यानें अथवा वार लावण्यानें येणारी परतंत्रता अथवा ओशाळेपणा समर्थांना संपूर्णपणें अमान्य होता. समर्थ भिक्षेचें वर्णन करतांना म्हणतात––

"दत्त गोरक्ष आदि करुनी । सिद्ध भिक्षा मागती जनी ।
निस्पृहता भिक्षेपासुनी । प्रकट होय ।।
वार लावूनि बैसला । तरी तो पराधीन झाला ।
तैसीच नित्यावळीला । स्वतंत्रता कैंची ।।
अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटेना परदेश ।
जिकडे तिकडे स्वदेश । लोकत्रयी ।।
भिक्षेने वोळखी होती । भिक्षेने भ्रम चुकती ।
सामान्य भिक्षा मान्य करिती । सकळ प्राणी ।।
कांही भिक्षा आहे म्हणावें । अल्पसंतोषी असावें ।
बहुत आणितां घ्यावें । मुष्टि येक ।।
भिक्षा म्हणिजे निर्भय स्थिति । भिक्षेनें वाढे महंती ।
स्वतंत्रता ईश्वरप्राप्ती । भिक्षागुणें ।।

या शिष्यांनीं स्वतःच्या, मागें उल्लेखिलेल्या लोकनेतृत्वाच्या अपूर्व गुणावर, ही संघटना अधिकाधिक वाढवीत न्यावी असें समर्थांचें त्यांना निक्षून सांगणें असे व हें कार्य करतांना सभोंवारच्या क्रूर, म्लेंच्छमय व दानवी वातावरणाचा स्वतःला उपसर्ग पोंचू नये म्हणून अत्यंत गुप्त रूपानें हें कार्य झालें पाहिजे असा समर्थांचा कटाक्ष होता. त्यावांचून त्या तशा भयंकर काळांत कोणतेंहि काम करतां येणें शक्य नव्हतें. त्यांनीं म्हटलें आहे––

'उदंड समुदाव करावे । परी गुप्त रूपें ।। महंते महंत करावे । युक्तिबुद्धीने भरावे । जाणते करून विखरावे । नाना देशी ।।'

पण हें करतांना बुद्धिपुरस्सर समाजाच्या अंतरंगांत प्रवेश करावा लागतो. हा प्रवेश करतांना वैचारिक संघर्षाचे व वादविवादाचे अनेक प्रसंग येतात. मनुष्यप्राणी हा स्वभावतःच इतका क्षुद्र व अहंकारी आहे कीं आत्माभिमानाच्या खोटचा कल्पनेपायीं मानापमानांच्या कल्पनांचा वाऊ करून जीवेभावे उपकार करणाऱ्यांवरहि तो वक्रगतीचा डंख मारल्याशिवाय रहात नाहीं. निःस्पृह वृत्तीनें राहणाऱ्या या प्रचारकांना तर विवादप्रसंगीं आत्माभिमानाच्या या कल्पनेनें पछाडल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहींच नाहीं. पण कार्यैकबुद्धीनें संयम राखण्यावर समर्थांचा कटाक्ष आहे. हट्टी, तामसी, वावदूक व आपल्याला न पेलण्याच्या सामर्थ्याचे असे जे लोक त्यांच्याशीं झटे घेण्याचा प्रयत्न मुळींच न करतां नम्रतेनें दुर्जनांवरहि उपकार करून सर्वांचीं मनें प्रेमानें जिंकावीं व युक्तीनें समाजाच्या अंतरंगांत संघटकानें प्रवेश मिळवावा, असें समर्थांचें सांगणें आहे. म्हणूनच ते साफ सांगतात कीं, एवढी हिम्मत असल्यासच या कार्यांत या. नाहींतर आपल्या घरीं स्वस्थ वसा. समर्थ म्हणतात :--

"महंती सुखाची नाही । येथें दुःख उदंड ही । उदंड दुःख लोकांचें । ऐकतां ऊर फूटतो ।। अखंड सर्व सोसावे । भलेपणाचि कारणें । परंतु सुख तो नाही । कांही कांही क्वचितहि ।। "

अशा पद्धतीनें मनाची तयारी करून कामगिरीवर निघाल्यावर आपल्या संघटनात्मक कार्यास कोणत्या पद्धतीनें प्रारंभ करावा याचें समर्थांनीं आपल्या महंत प्रचारकांना लिहिलेल्या एका आज्ञापत्रांत जें तपशीलवार सूचनात्मक वर्णन केलें आहे तें संघटन कार्याचा पत्कर घेतलेल्या आजच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या दृष्टीनें हृदयावर कोरून ठेवण्यासारखें आहे. समर्थ त्यांत म्हणतात,

"विवेक जालिया देवाचा योग । मग होणार नाही वियोग ।
देव सर्वांचें अंतरंग । अखंडित भेटी ।।
या समाधाने असावे । निरुपणी विवरावे ।
मानसपूजने आठवावें । सकळ कांहीं ।।
ऋणानुबंधे भेटी होईल । परस्परें समाचार कळेल ।
सहज वर्तमान निवळेल । ते प्रसंगी ।।
कांही समुदाव करणें । येविशी आलस्य न करणें ।
आलस्य करितां उदंड उणें । दिसेल परमार्थी ।।
पोहोणारें बुडते तारावे । सामर्थ्ये बुडो नेदावे ।
मूर्ख ते शाहाणे करावे । विवेकी पुरुषें ।।
आपणाहून जो धींग । त्यासी करूं नये प्रसंग ।
आपणाधीन जो प्रसंग । तोचि करावा ।।
सोयिऱ्या धायिऱ्यांचीं मुलें । तीक्ष्ण बुद्धीची सखोले ।
तयासी वोलणें मृदु बोलें । करीत जावें ।।
त्यांचा संसार समाचार । पुसत जावा विस्तार ।
उदंड सांगतां तत्पर । होवूनि ऐकावें ।।
दुःख ऐकतां दुःख जातें । त्याचें दुःख हळू होते ।
मग तें सवेंचि धरितें । मित्रभाव ।।
निकट मित्रि बरी होतां । मग त्यासी न्यावें एकांता ।
म्हणावें रें भगवंता । कांही तरी उपासावे ।।
पूर्वी देव पूजिला नव्हता । म्हणोनि आली दरिद्रता ।
या कारणें अनंता । कांही तरी भजावे ।।
मान्य होतां जप सांगावा । मग तो इकडे पाठवावा ।
मग तयाचा सकळ गोवा । उगवूं आम्ही ।।

या आज्ञापत्रांतील शेवटची ओळ अत्यंत महत्त्वाची आहे. सर्वगुणसंपन्न कुशलसंघटक याप्रमाणें ठिकठिकाणीं संघटना करूं लागला कीं पुष्कळदां त्याच्या ठिकाणीं व्यक्तिमत्त्वाचा भाव उत्पन्न होऊन सारें कार्य स्वतःभोवतीं केन्द्रित करण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते. त्याला व्यापक राष्ट्रहिताचा विसर पडतो, व आपलें महत्त्व वाढविण्यासाठीं संघटनेचा उपयोग करावा अशी लालसा उत्पन्न

होते. एकसूत्रितपणाच्या दृष्टीनें ही एक अत्यंत विघातक गोष्ट आहे. ती टाळण्यासाठीं समर्थ असें लिहितात कीं, तुमचें काम एखाद्या लग्नांतील मध्यस्थासारखें आहे. मध्यस्थानें फक्त वधू-वरांना सर्व प्रयत्नें करून मंडपांत एकत्रित आणावयाचें असतें. पुढच्या त्यांच्या सहजीवनाशीं त्याचा कांहीं संबंध नसतो. त्याप्रमाणें राष्ट्रव्यापी संघटनेंतील त्या त्या विभागसंघटकांचें, प्रचारकांचें व कार्यकर्त्यांचें काम समाजांतील वेगवेगळ्या लोकांना संघटनेंत आणणें एवढेंच आहे. पुढचें काम संघटनेंतील अखिल भारतीय नेतृत्व आपल्या योजनेप्रमाणें करील. त्याच्याशीं त्या संघटकाचा तसें विशिष्ट अनुशासन नसलें तर कांहीं संबंध नसावा. म्हणून समर्थ कामाचें केंद्रीकरण नष्ट करून विकेंद्रीकरणाचें सूत्र डोळ्या-समोर ठेवून असें सांगतात : "मग तो इकडे पाठवावा । मग तयाचा सकळ गोवा । उगवूं आम्ही" ॥ म्हणजे त्याची योग्यता पाहून पुढें त्याला संघटनेंत कोणतें काम द्यावयाचें, कोठें पाठवा-वयाचें व त्या दृष्टीनें त्याची मानसिक, शारीरिक व आध्यात्मिक सिद्धता कशी करावयाची हें आम्ही ठरवूं. तुम्ही केवळ त्याला आमच्याकडे पाठवून द्यावें. तात्पर्य, युक्तियुक्तीनें "जीवांत जीव घालावा, आत्म्यांत आत्मा मिसळावा" या मार्गानें "बहुत जनास चालवी । नाना मंडळे हालवी । ऐसी हे समर्थ पदवी । विवेकें होते ॥" अशी समर्थ पदवी त्यांनीं प्राप्त करून घेतली होती. याविषयीं त्यांची प्रत्येक शिकवण शाश्वत स्वरूपाची असून त्यांचें प्रत्येक बोलणें अनुभवाचें आहे. ते म्हणतात, "हें प्रचीतीचें बोलिले । आधी केलें मग सांगितलें । मानेल तरी पाहिजे घेतले । कोणी एके" ॥ मनुष्य तयार करतांना, त्याच्यावर संस्कार कर-वितांना समर्थांची शिस्त अत्यंत कडक होती. वाटेल त्याला महंत होतां येत नसे. "दासविश्रामधामाचे" कर्ते आत्माराम महाराज यांनीं महंत म्हटला म्हणजे तो समर्थांचा प्रचारक कसा असे याचें उत्कृष्ट अनुभूत वर्णन केलेलें आहे. ते म्हणतात,

दासरायाची ऐसी पद्धती । क्षणुही रिकामा जाऊ न देती ।
सांप्रदायी ते सावध असती । परमार्थ साधनी ॥

मुबारदाराचें नव्हे कीं काम । संपादूनि अश्वद्वें वोहदेचें कर्म ।
अपूर्तिपणाला मानूनि संभ्रमें । हिणवोन वंदू दुजयासी ।।
अवघेहि जाणती लिहिणें वाचणें । प्रबोधू रिझवूं कथा कवने ।
शरीर झिजवूं पाकसिद्धी करणें । चालणें वोलणें गाऊं नटूं ।।
गायनकळा जाणती सुस्वरें । असे जयाला बहु पाठांतरे ।
राजकारणाची जाणती द्वारें । देऊळ रचाया सर्व वोहदे ।।
पाइकाहूनि चालती अधिक । भय नसे अणु ज्या भूतप्रेतादिक ।
सद्‌गुरुमर्जी राखिति मुख्य । दोषादिकलंक न लगे जया ।।
जिकडे तिकडे पावती मान । उत्तम गुणानें भूषिलें बळानें ।
निंदिती व्यसना शोभायमान । दिसती होती पूज्यस्थ ।।

शिस्त न पाळल्यास त्याला कडक शासन होत असे. एकदां एका महंतानें आपली वाचा सैल सोडून असावधपणें मंत्रभेद केल्याबद्दल समर्थांनीं त्या शिष्याला वेतानें झोडपून काढलें होतें. (कोण्ही एके महंते मंत्रभेद केलें । समर्थें येकांति वेत्रें ताडिले ।। समर्थप्रताप) 'स्वदेशी शिष्य तीन वर्षें न येती । श्रीगुरुपदीं ते विघ्न पडती ।। विदेशी अकरा वर्षें दर्शन न घेती । ते ते संप्रदायी वेगळे' या शिष्यांवर व प्रांतोप्रांतीच्या साम्प्रदायिक प्रचारकावर देखरेख ठेवून त्यांचें काम नीट चाललें आहे कीं नाहीं व मनाची कार्यनिष्ठा कशी आहे हें पाहण्यास्तव कल्याणांसारखे लोक नियुक्त केलेले असत. दासविश्रामधामांत (अ. ७४) म्हटलें आहे :—

"कल्याण दाता तो चातूर्यनिधी । निष्ठा जयाची श्रीगुरुपदी ।
बोलावून तया दास दयाब्धी । प्रभुत्व विलोकूं आज्ञापिले ।। ९५
जे जे स्थळीं देव स्थापिलेती । पुण्यवंत जे स्थळीं करिती महंती ।
तेथील पाहोन दंडकस्थिती । बंदोवस्त कराया धाडिले ।।९६
सर्वज्ञ शिष्य तो विश्वासनिधी । गुरुदर्शनाहून शेवटावधी ।
तिळमात्र न चुकले सेवाविधी । कोप कीं शिक्षांत न गवसले ।।
वरकड शिष्यही असती धन्य । परी प्रौढ न झालें शिक्षिल्याविण ।
अचुक न जाणती सेवा विधान । पुसती कल्याणा गुरु आज्ञे।। "

श्रीकल्याणांचीहि एकदां समर्थांनीं झणझणीत कान उघाडणी केलेली आहे. ज्याच्यावर जें काम सोंपविलेलें असे तेंच त्यानें केलें पाहिजे असा समर्थांचा दंडक होता, व अनुशासनबद्धतेचा हाच खरा प्राण होय. त्यांच्या कार्यांतील वेगवेगळ्या विभागांची त्यांनीं जी विभागणी केलेली होती तिच्यांत शिवछत्रपतींच्या दरबाराशीं संबद्ध व एकंदर राजकीय कामें दिवाकर गोसावी नांवाच्या आपल्या शिष्यावर सोंपविलेलीं होतीं. शके १६०४–५चे सुमारास कल्याणस्वामींनीं लिहिलेल्या एका पत्रांत यासंबंधींचा उल्लेख पुढीलप्रमाणें आहे. "संतोष होऊन नळ नाम संवत्सरीं श्रीशिवथरचे घळीस असतां आज्ञा सर्वत्रांस केली जे हा महाबळेश्वरकर आहे, बुद्धीही महाबळ आहे, राजद्वारी कित्येक प्रसंगीं पाठवावयास योग्य असे; प्रस्थान पारपत्या योग्य, याच्या हस्तें श्रींचें संस्थान जोपर्यंत कार्यकर्तव्य वंशपरंपरेनें घ्यावें ऐसें बोलोन श्रींनी (त्यास) तांबूल दिधला." यानंतर श्रीसमर्थांनीं छत्रपति शिवाजी महाराजांना सोयीसाठीं दिलेली आज्ञा वाग्देवता मंदिरांतील समर्थविषयक कागदपत्रांच्या चौपन्नाव्या लेखांकांत असलेल्या श्री. गणेशभट चाफळकर यांच्या पत्रांत पुढीलप्रमाणें आढळते. "राजश्री (श्रीशिवछत्रपती) स्वमुखें आज्ञा केली. दिवाकर गोसावी यावेगला श्रीकडील प्रयोजन हुजूर सांगेल, मागेल तो आपला नव्हे. रायगडास गेले ते समयीं श्रींनी स्वहस्तें धरून राजश्रीच्या हस्ती श्रींच्या कार्यभागासंबंधे तुम्हांस (दिवाकरास) दिल्हे." असें असतां एका अगदीं क्षुद्र बाबतींत पण राजदरबारांतील काम कल्याणांनीं स्वतंत्रपणें केल्यामुळें समर्थ त्यांच्यावर रागावले. तो प्रसंग स्वतः कल्याणांच्याच शब्दांत श्री. अनंतदास रामदासी यांनीं पुढीलप्रमाणें वर्णिलेला आहे.

श. १५९८ या वर्षी सातारा येथें शिवछत्रपति बरेच आजारी होते. हें समर्थांस समजतांच त्यांनीं कल्याणास आज्ञा केली कीं, तुझें नांव कल्याण आहे. कल्याणार्थ प्रसाद घेऊन जाणें. त्याप्रमाणें कल्याण साताऱ्यास राजवाड्याच्या दरवाजाशीं जाऊन पोहोंचले. त्याच वेळीं तिकडे शिवछत्रपतींस स्वप्नसाक्षात्कार झाला कीं

श्रीकडून कल्याण गोसावी कल्याणार्थ 'प्रसाद घेऊन आले. जागे होऊन त्यांनीं दरवाज्यावर हुजऱ्या पाठविला तों कल्याण तेथें नुकतेच जाऊन बसले होते. त्या राजसेवकाच्या बोलण्यावरूनच कल्याणास राजांच्या या स्वप्नाविषयींचें वर्तमान कळलें. बिऱ्हाड तेथेंच ठेवून कल्याण सेवकाबरोबर आंत गेले; त्यांस पहातांच 'राजश्री पलंगावरून उठून उभे राहून पुढें येऊन वंदनपूर्वक प्रसाद घेतला आणि बोलले कीं, श्रीचा प्रसाद कल्याण गोसावी याबरोबर आला. आतां कल्याण आहे म्हणून त्रिवार बोलिले. आणखी काय आज्ञा म्हणून विचारले. कांहीं आज्ञासंकेत होता तो निवेदन केले. ते प्रसंगीं उंबरजकडे धांवणी घेऊन गुरें वाळून आणली होतीं, तीं साताऱ्याचे दक्षिणभागीं सोनेगांवीं खिलार होतें त्यांमध्यें सिरगांवीं अकरा गायी होत्या त्या खिलारांत आणिल्या, हें वर्तमान राजश्रीस विदित केलें. तेंही हुजूरच्या भृत्या बरावरी पत्र देऊन अकरा गाई व अकरा वत्सें देवविलीं तीं सिरगांवीं नेऊन ठेविलीं.' नंतर परत येऊन समर्थांस सर्व वर्तमान सविस्तर निवेदन केलें. समर्थ त्या वेळीं पारमाचीजवळ नवलवाडीयाचा कोड येथें जांभळीच्या चौथऱ्यावर बसले होते. कल्याणांचे मुखानें सातारा–शिरगांवचें वृत्त सविस्तर ऐकून "श्रीचे इच्छेस काय आलें, तें बोलिले कीं, तुम्ही निःस्पृह, हें प्रयोजन तुम्हांस बोलिलें नाहीं, हा श्रीचे स्थलचा सर्व पारिपत्याधिकार दिवाकर गोसावी यास श्रीचे स्थलचा कृपेनें प्राप्त जाला; तो दिवाकर गोसावी म्हणजे दुरांखीं मोहरा, वैदिक भला व श्रीच्या कृपेनें महत्त्वही आहे; तो श्रीचे कार्यभाग यथायोग्य संपादितो, तें श्रीस मानलें व त्याला हें बरें अवगत आहे. अवघीयांस मान्य आहे. आर्जववृत्तीनें मागणें निःस्पृहाचा धर्म नव्हे व आणीकही कोणास त्याचें कर्तव्य नाहीं. याउपर श्रींचे स्थलची नित्य व वार्षिक महोत्सव व राजगृही प्रसाद नेणें, कार्यभाग संपादून घेणें हें सर्व दिवाकर गोसावी यानें करणें ऐशी श्रीची आज्ञा नल संवत्सर कार्तिक वद्य प्रतिपदा परिछिन्न जाली

या उपरी (तुम्ही) निःस्पृह व आधिक कोणी या प्रयोजनांत मन न घालणें, शक्तिनुसार भक्ति श्रीची करून सुखें असणें." याप्रमाणें सद्‌गुरु समर्थांची दिवाकरांविषयीं झालेली आज्ञा स्पष्ट सांगून कल्याण म्हणतात, यापूर्वीं मी वेळप्रसंगीं श्रीचे कार्यभागीं 'राजगृहास जाणें येणें करीत होतों तें यावरून सोडलें, निःस्पृह-वृत्तीनें सुखरूप झालो.'

श्रीरामदास आणि रामदासी ग्रंथमालेंतील नवव्या भागांत प्रसिद्ध झालेल्या श्रीसंप्रदायाच्या कागदपत्रांत पन्नासाव्या लेखांकांत हें वृत्त आहे.

तात्पर्य, याप्रमाणें नुसता उपदेशच करून न राहतां श्रीसमर्थांनीं प्रचंड संघटना उभारली. हें त्यांचें राष्ट्रनिर्माणकार्य म्हणतां येईल. समर्थांनीं उभारलेल्या या देशव्यापी संघटनेचा शिवछत्रपतींना कसा विलक्षण उपयोग झाला याचें एक महत्त्वाचें निदर्शन त्यांच्या आग्र्याहून झालेल्या सुटकेच्या प्रकरणांत पहावयास सांपडतें. प्रत्यक्ष आपल्या बंधूंच्या गळ्यावरून सुरी फिरवून बापाला बंदिवासांत टाकणाऱ्या विलक्षण धूर्त पुरुषाशीं त्यांचा संबंध आला होता. पण त्याहि प्रसंगांतून आपल्या बुद्धिमत्तेनें शिवछत्रपति बाहेर पडले व सुखरूप महाराष्ट्रांत परत आले. श्रावण वद्य द्वादशीला ते औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन निसटले व बैराग्याच्या वेषांत मार्गशीर्ष शुद्ध पंचमीला म्हणजे सव्वा तीन महिन्यांचा प्रवास करून राजगडास पोंचले. शिवछत्रपति निसटणें ही औरंगजेबाच्या दृष्टीनें मोठीच भयावह घटना होती. त्यांचा त्यानें घारीसारखा पाठलाग सुरूं केला होता. त्यामुळें आग्र्याहून दक्षिणेकडे सरळपणें येणें त्यांना शक्य नव्हतें. त्यामुळें ते आग्र्याहून उत्तरेस मथुरा, तेथून पूर्वेकडील गंगा-यमुनेचा दुआब व नंतर अयोध्या, प्रयाग, काशी, गया, जगन्नाथ, गोंडवन, भागानगरच्या पूर्वेकडून विजापूरच्या दक्षिणेकडून, गोकर्णावरून सह्याद्रीच्या कडेकडेनें राजगडावर आले. हा वाकडा तिकडा प्रवास अनेक प्राणसंकटांनींहि भरला होता. या अनोळखी

लांवच्या प्रदेशांतून त्यांचे मार्गदर्शक वाटाडे कोण असतील ? या प्रत्येक ठिकाणीं समर्थांचे मठ होते व त्या मठांतून शिवछत्रपतींना साहाय्य झालेलें आहे हें उघड आहे. त्यांच्या येण्याच्या मार्गावर व मार्गाच्या अंवतीभोवतीं समर्थांचे असलेले मठ व मठपति त्यांचीं नांवें येथें उल्लेखितो, " मथुरेस हरिकृष्ण, अंतर्वेदींत हरिश्चंद्र, अयोध्येस रामकृष्ण, प्रयाग येथें वेणीमाधव, काशींत रामचंद्र, गंगासागरकडे हरिवंश, जगन्नाथपुरीस पद्मनाभ, सागर व रायपूर प्रांतीं सदाशिव, रामटेकास श्रीधर, वऱ्हाडांत बालकृष्ण, महारुद्र व जयवंत गोसावी, कारंजे येथें प्रल्हाद व बालकराम, तेलंगणांत उद्धव ऊर्फ शिवराम, परळी वैजनाथ येथें मल्लारी, बेदर प्रांतीं राम, अण्णाप्पा, मुसळराम, श्रीशैल्यास कोंदडराम, कर्नाटकांत जयराम व निरंजन गोसावी, गोमांतकांत गोविंद, गोकर्णप्रांतीं भैरव, सावंतवाडीस शंभु,कोंकणांत पिलाजीबावा, दंडा राजापुरीस त्रिंबक गगनी, चिपळुणास सीताराम असे समर्थशिष्यांचे मठ शिवरायांच्या मार्गावर किंवा त्या मार्गाच्या अवतीभोवतीं होते."

श्रीशिवछत्रपतींचे प्राण हेच त्या वेळीं हिंदुराष्ट्राचे प्राण होते, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे समर्थांच्या या संघटनेकडून केवढें महत्त्वाचें कार्य झालेलें आहे याची कल्पना येते. समर्थांनीं प्रत्यक्ष राजकारणांत भाग घेतला काय ? घेतला असल्यास त्याचें स्वरूप कोणतें ? व शिवछत्रपतींच्या स्वराज्यसाधनांत समर्थांचें स्थान काय ? याचा विचार पुढील प्रकरणांत करून या विषयाचा समारोप करूं.

✦ ✦ ✦

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

प्रकरण सोळावें

# उपसंहार

राजकारण व धर्मकारण या दोन गोष्टी तमःप्रकाशासारख्या परस्परविरोधी असून राजकारणाचा कार्यभाग करणाऱ्यानें धर्मकारणाशीं आपला संबंध जोडूं नये व धर्मकारणांत भाग घेणाऱ्यानें राजकारणाला दुरूनसुद्धां स्पर्श करूं नये असा अलीकडे कित्येक लोकांचा आग्रह असतो. या आग्रहाच्या मुळाशीं गेल्या दीडशें वर्षांचा पाश्चात्यांचा सहवास, पाश्चात्य शिक्षणप्रणालीचे संस्कार व आपल्या जीवनदृष्टीविषयींचें पद्धतशीरपणें निर्माण झालेलें अज्ञान या गोष्टी आहेत. समर्थ, शिवछत्रपति यांच्या काळीं आपली ही आजची धारणा नव्हती. आपण धर्म म्हणजे Religion असें समजतों व Religion आणि Politics या दोन भिन्न गोष्टी असल्यामुळें विरोध असला पाहिजे असें आग्रहानें प्रतिपादन करतों. पण धर्म व रिलिजन या गोष्टी एक नाहींत. धर्म ही जीवनदृष्टीची परिभाषा होय. धर्माचें लक्षण सांगतांना श्रीमन्महाभारतकार म्हणतात :—

'धारणाद्धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजाः ।
यत्स्याद्धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः ॥

(धारण करीत असल्यामुळें धर्म हा शब्द रूढ झालेला आहे. धर्म प्रजांचें धारण करीत असतो. ज्या ज्या गोष्टींनीं प्रजांचें धारण होतें ती ती गोष्ट म्हणजे धर्म होय.) धर्म शब्दाचा हा अर्थ ध्यानांत घेतला तर धर्मकारणांतच राजकारण अंतर्भूत होतें हें सहज ध्यानांत येईल. समर्थांच्या काळीं या देशांत दृढमूल झालेल्या सत्तेनें भारतीयांचें केवळ राजकीयच नव्हे तर धार्मिक व सांस्कृतिक अस्तित्वच धोक्यांत आणलेलें होतें हें आपण या पूर्वींच पाहिलें आहे. त्यामुळें या सत्तेला उलथून टाकून भारतीय जीवनाचें संरक्षण करण्याचा प्रत्येक प्रयत्न हा धर्मकारणांतच

अंतर्भूत होता. त्यामुळें राजकारण हें समर्थांच्या वस्तुनिष्ठ दृष्टीला धर्मकारण म्हणूनच आवश्यक वाटलें असल्यास तें योग्यच होय. दासायन ग्रंथाच्या द्वितीय खंडाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत लोकनायक अणे यांनीं यासंबंधांत केलेलें विवेचन सर्वांना मान्य होण्यासारखें आहे. श्री. अणे लिहितात :— 'साधूनें राजकारण करूं नये असा निदान वैदिक संस्कृतीचा तरी सिद्धान्त नाहीं. ज्या चौदा पुण्यपरम भागवतांच्या नांवांचा उच्चार बहुधा देवपूजेच्या अंतीं करण्याचा महाराष्ट्रांत व विदर्भांत प्रचार आहे, त्यांत पहिलें नांव प्रल्हादाचें आहे. त्यानें आपल्या पित्याच्या वधानंतर भगवंताच्या आज्ञेनें राज्य केलें. अंबरीषानें राज्य केलें. भीष्माचार्यांनीं कौरव वंशाचें साम्राज्य चालविण्याचा भार आपल्या खांद्यावर घेण्याची प्रतिज्ञाच केली होती व त्याच कर्तव्याच्या पूर्तीस्तव त्यांनीं आत्मसमर्पण केलें. रघुवंशाचें धार्मिक पौरोहित्यच नव्हे तर सर्व कठिण प्रसंगीं मार्गदर्शन करण्यांत वसिष्ठांचें आयुष्य गेलें. रुक्मांगद व अर्जुन हे अनुक्रमें राजे व राजकारणी पुरुष होते. बिभीषण राजकारणी होता व शेवटीं लंकेचा राजाहि झाला. त्यामुळें ह्यांपैकीं कोणाच्याहि भगवद्भक्तींत खंड पडला नाहीं व 'परमभागवत' या त्यांच्या पदवीस बाधहि आला नाहीं. जे खरे ज्ञानी आहेत त्यांनींच राजकारण करायला पाहिजे असा समर्थांचा सिद्धान्त आहे.

'मुख्य तें हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण।
तिसरें तें सावधपण। सर्व विषयीं ॥'

हें ज्ञात्यांकरितां सांगितलें आहे. राजकारण हा गव्हारांचा म्हणजे अज्ञान्यांचा विषय नव्हे. राजकारण हा स्थितप्रज्ञांचा विषय आहे, हें भगवंतांनीं जनकादिकांचे दृष्टान्त देऊन गीतेंत सिद्ध केलें आहे. तेव्हां रामदासस्वामी साधु होते म्हणून ते राजकारणी असणें शक्य नाहीं या विधानांत कांहीं अर्थ नाहीं.

समर्थांच्या टीकाकारांपैकीं त्यांनीं राजकारण केलें नाहीं असें आकसानें प्रतिपादन करणारे टीकाकार प्रा. नरहर रघुनाथ फाटक

हे होत. फाटक हे या विषयांतील वादरणांत जेव्हां प्रथमच उतरले तेव्हां तर त्यांना समर्थांचें संतत्वहि मान्य नव्हतें. पण आतां त्या भूमिकेंत परिवर्तन करून त्यांनीं आपल्या नव्या ग्रंथांत समर्थांचें संतत्व मान्य केलें आहे. मात्र इतर संतांइतकीच श्रीसमर्थांची संत या नात्यानें योग्यता मान्य करतांना त्यांच्या राजकारणविषयक कर्तृत्वाला त्यांनीं आपला विरोध आग्रही-पणानें चालूंच ठेविला आहे. राजकारणाशीं अंशमात्रहि संबंध ज्यांच्या प्रत्यक्ष उद्‌गारांवरून प्रस्थापित करणें केवळ दुरापास्त आहे त्या श्रीज्ञानदेवांच्या केवळ 'आज्ञापक होआल' या उद्‌गारांवरून त्यांच्या माथीं राजकारण मारण्या-साठीं जिवाचा आटापिटा करणारे प्रा. फाटक प्रत्यक्ष राजकारण शब्दाचा अनेक वेळां स्पष्ट उच्चार करणाऱ्या व राजकीय स्वरूपाच्या अनेक सूचना व प्रेरणा तत्कालीन कर्त्या राजकीय पुरुषांना देणाऱ्या समर्थांचा मात्र राजकारणाशीं दूरान्वयानेंहि संबंध नाहीं असें अट्टाहासानें प्रतिपादन करतात हें आश्चर्यकारक होय. अथवा आश्चर्य तरी कसलें? प्रसिद्धीस्तव हेतुपूर्वक मूर्ति-भंजनाचें धोरण स्वीकारणाऱ्याला न्याय-अन्याय व सत्यासत्याची चाड रहात नाहीं हेंच खरें. रा. फाटकांनीं स्वीकारलेल्या मूर्ति-भंजनाच्या धोरणामुळें त्यांना केवढी विलक्षण मनोविकृति जडलेली आहे हें नुकत्याच झालेल्या ५७ च्या स्वातंत्र्यसमराच्या शताब्दि-महोत्सवाच्या वेळीं स्पष्ट झालेंच आहे. अप्रामाणिक प्रतिपादन, गालिप्रदानास्त्राचा अनिर्बंध वापर, अहंगंड व हेकेखोरपणा हीं त्यांचीं खास वैशिष्टचें आहेत. समर्थांच्या संबंधीं लिहितांना व विशेषतः त्या लेखनांत श्री. ज. स. करंदीकर व कै. नानासाहेब देव यांच्यावर टीका करतांना त्यांचीं हीं सारीं वैशिष्टचें उफाळून आलेलीं आहेत. त्यांच्यासारख्या वृथा आग्रही व्यक्तींचा नुसता उल्लेख हें देखील पुरेसें खंडन होय. पण अनेक कारणांस्तव व कांहीं प्रसंगीं त्यांनीं केलेल्या भरीव कामगिरीमुळें त्यांच्याविषयीं लो कभ्रम उत्पन्न झालेला आहे. म्हणूनच केवळ त्यांच्या एक दोन ग्रंथांचा येथें परामर्श घेणें उचित होईल.

प्रा. फाटक यांनीं आपल्या समर्थविषयक ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं श्रीसमर्थांच्या काळीं राजकारणाला उद्देशून राजकारण हा शब्द वापरीत नसून 'राजकी' असा शब्द वापरीत असत; व म्हणून समर्थांनीं राजकारण हा शब्द ज्या अर्थी योजलेला आहे त्याअर्थी त्याचा कांहीं तरी वेगळा अर्थ असला पाहिजे आणि समर्थांनीं चातुर्य या अर्थी या शब्दाची योजना केलेली आहे. पण श्री. फाटक यांचें हें म्हणणें चुकीचें आहे. राजकी हा शब्द त्या काळीं राजकारणाला उद्देशून वापरीत नसून'राजकीय'अंदाधुंदीला उद्देशून तो वापरीत असत. श्रीशिवछत्रपतींच्या दक्षिण दिग्विजयाच्या वेळीं त्यांनीं लिहिलेलीं जीं अनेक पत्रें प्रसिद्ध आहेत त्यांतच 'राजकारण प्रसंगे कुतुबशहाचें भेटीस्तव' आल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. शिवछत्रपतींच्या पत्रांतील या शब्दाचा 'चातुर्य' असा अर्थ करणें किती अर्थशून्य अथवा मूर्खपणाचें ठरेल हें कांहीं रा. फाटक यांना सांगण्याची आवश्यकता नाहीं. त्या काळीं अन्य कोणाच्या पत्रव्यवहारांत राजकारण शब्दाचा वापर राजकारण या अर्थींच होत असला तरी समर्थांनीं जेथें जेथें तो वापरलेला आहे तेथें तेथें तो चातुर्य या अर्थींच वापरलेला आहे असें फाटक यांचें म्हणणें असलें तरी तेंही टिकण्यासारखें नाहीं. समर्थांच्या विशाल साहित्यसागरांतील कांहीं ओव्याच आम्ही येथें उद्धृत करतों. त्या ओव्यांतील राजकारण शब्दाचा अर्थ सरळ राजकारण न घेतां चातुर्य असा घेतला तर त्या किती निरर्थक ठरतात तें पहा :—

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्वविषयीं ॥२॥

येथील हरिकथा निरूपण म्हणजे धर्मकारण होय ही गोष्ट स्पष्ट आहे. रा. फाटक यांच्या चातुर्याचा समावेश सावधपणांत होतो. उर्वरित राजकारण शब्दाचा राजकारणाविना दुसरा काय अर्थ निष्पन्न होऊं शकतो? शिवछत्रपतींचें कार्य प्राथमिक अवस्थेंत

असतांना, पुनरुत्थानाची प्रेरणा राष्ट्रांत निर्माण करण्याचें कार्य समर्थांनीं आपल्या महंतांवर सोंपविलेलें होतें. तें अर्थातच त्यांना अत्यंत गुप्तपणें करणें भाग होतें. त्यासंबंधीं श्रीसमर्थांनीं आपल्या या प्रचारकांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केलेलें आहे. त्यांतील पुढील ओव्यांतील राजकारण शब्दाकडे पहा. श्री समर्थ म्हणतात :—

**राजकारण** बहुत करावें । परंतु कळोंचि नेदावें ।
परपीडेवरी नसावें । अंतःकरण ।।
लोक पारखून सांडावे । राजकारणें अभिमान झाडावें ।
पुनः मेळवून घ्यावे । दुरीदोरे ।।
हिरवटासि दुरी धरावे । कचरटासि न बोलावे ।
समंध पडतां सोडून जावे । येकीकडे ।।
ऐसें असो **राजकारण** । सांगतां तें असाधारण ।
सुचित अस्ता अंतःकरण । **राजकारण** जाणे ।
अवघड स्थळीं कठीण लोक । तेथें राहणें नेमक ।।
सृष्टीमध्यें सकळ लोक । धुंडीत येती ।।
तेथें कोणाचे चालेना । अणूमात्र अनुमानेना ।
कट्ट घालून **राजकारणा** । लोक लावी ।।
लोक लोकीं वाढविले । तेणें अमर्याद झाले ।
भूमंडळी सत्ता चाले । गुप्तरूपे ।।

राजकारणाचा अर्थ केवळ चातुर्य येवढाच घेतला तर 'कळोचि नेदावे' या सूचनेचें काय महत्त्व? चातुर्य ही कुणाला न कळू देण्याची गोष्ट आहे काय? कुणाला न कळू देतां गुप्तपणें राजकारण करावयास अंगीं चातुर्य असावें लागतें हें मात्र खरें. तात्पर्य, फाटक यांच्या मनोविकृतीचें स्वरूप हें अशा प्रकारचें आहे. स्वतःच्या गृहीत कृत्यांना ते सिद्धान्त समजतात व उग्रट नि उद्धत लेखन-शैलीच्या आश्रयानें त्यांचा आग्रह धरून बसतात. पण ही 'अहो-जुक्तिः' आतां शिळी झालेली आहे. श्रीसमर्थांच्या वाङमयसागरांतील सहस्रावधि राजकीय स्वरूपाच्या सूचना व प्रेरणांचा विचार केला तरी राजकारणापासून ते अलिप्त होते असें समजणें किती चुकीचें आहे हें ध्यानांत येतें.

## प्रमाणेंच पहा

शिवछत्रपतींच्या निर्याणानंतर उग्रप्रकृति छत्रपति संभाजी महाराजांच्या धोरणामुळें स्वराज्य संकटांत सांपडलें होते. तेव्हां संभाजी महाराजांच्या राज्यारोहणप्रसंगीं श्रीसमर्थांनीं कर्तव्यबुद्धीनें राजांना वस्तुस्थितीची जाणीव करून देणारें एक महत्त्वपूर्ण पत्र पाठविलें होतें. स्वराज्याचें संरक्षण व्हावें अशी इच्छा बाळगणाऱ्या कोणत्याहि राजसत्तेला तें आजहि मार्गदर्शक ठरण्याइतकें महत्त्वाचें आहे. येवढें हें एक पत्रसुद्धां श्रीसमर्थांच्या ठिकाणीं असलेल्या राजकीय धारणेचा व त्यांच्या, राजकारणाशीं असलेल्या प्रत्यक्ष संबंधाचा प्रत्यय आणून द्यावयास पुरेसें आहे. श्रीसमर्थांचें तें पत्र पुढीलप्रमाणें :—

अखंड सावधान असावे । दुश्चित कदापि नसावें ।
तजविजा करीत बैसावें । येकांतस्थळीं ।।
कांहीं उग्रस्थिति सांडावी । कांहीं सौम्यता धरावी ।
चिंता लागावी परावी । अंतर्यामी ।।
मागील अपराध क्षमावे । कारबारी हाती धरावें ।
सुखी करूनि धाडावें । कामावरी ।।
पाटांतील तुंब निघेना । तरी मग पाणीच चालेना ।
तैसें जनाच्या मना । कळलें पाहिजे ।।
जनाचा प्रवाहो चालिला । म्हणिजे कार्यभाग आटोपला ।
जन ठाईं ठाईं तुंबला । म्हणिजे खोटे ।।
श्रेष्ठीं जें जें मेळविलें । त्यासाठीं भांडत बैसले ।
तरी मग जाणावें फावले । गनीमासी ।।
ऐसें सहसा करूं नये । दोघा भांडण तिसऱ्या जय ।
धीर धरूनि महत्कार्य । समजोनि करावें ।।
आरंभीच पडिली धास्ती । म्हणिजे कार्यभाग होय नास्ती ।
या कारणें समस्ती । बुधी शोधावी ।।
राजी राखतां जग । मग कार्याची लगबग ।
ऐसें जाणोनि सांग । समाधानें करावी ।।

सकळ लोक येक करावें । गनीम लाटून काढावें ।
येणें करितां कीर्ति धांवे । दिगांतरी ।।
आधीं गाजवावे तडाखे । तरी मग भूमंडळी धाके ।
ऐसें न होतां धके । राज्यासी होती ।।
समयप्रसंग वोळखावा । राग निपट न संडावा ।
आला तरी कळों नेदावा । जनामध्यें ।।
राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देउनी करावे शोक ।
लोकांच्या मनामध्यें धाक । उपजोंचि नये ।।
बहुत लोक मेळवावे । येक विचारें भरावे ।
कष्टें करूनि घसरावें । म्लेच्छावरी ।।
आहे तितुके जतन करावें । पुढें आणीक मेळवावें ।
मऱ्हाष्ट राज्यचि करावें । जिकडे तिकडे ।।
लोकीही ही मती धरावी । शर्थीची तरवार करावी ।।
चढती वाढती पदवी । पावाल येणें ।।
शिवराजासी आठवावें । जीवित्त्र तृणसमान करावें ।
येह लोक परलोकीं तरावें । कीर्तिरूपें ।।
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा साक्षेप ।
शिवराजाचा आठवावा प्रताप । भूमंडळी ।।
शिवराजाचें कैसें बोलणें । शिवराजाचें कैसें चालणें ।।
शिवराजाची सलगी देणें । कैसी आहे ।।
सकळ सुखाचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्य साधावया लगबग । तैसी करावी ।।
त्याहून करावें विशेष । तरीच म्हणावें पुरुष ।
या उपरी आतां विशेष । काय ल्याहावे ।।

या पत्राचें नीट मनन केलें तर विजिगीषु राजनीतिशसात्राचे सिद्धान्त श्रीसमर्थांनीं हिंदुराज्य संस्थेच्या तत्कालीन नेत्याला स्पष्ट शब्दांत सांगितले आहेत असें दिसून येतें. उदाहरणार्थ, (१) विजिगीषु राज्यसंस्थेनें सैन्य व मुत्सद्दी यांच्या प्रवाहाला काम न देतां अडवून ठेवलें म्हणजे सांचलेल्या पाण्यासारखी

त्यांच्या शक्तीची अवस्था होऊन ती विनाश पावते; म्हणून सैन्य व मुत्सद्दी अथवा कर्ते पुरुष यांना नवीं नवीं पराक्रमाचीं कार्यक्षेत्रें सतत उघडून देणें हें विजिगीषु राज्यसंस्थेचें प्रथम कर्तव्य होय. हा सिद्धान्त श्रीसमर्थांनीं या पत्रांतील "जनाचा प्रवाहो चालिला। म्हणिजे कार्यभाग आटोपला। जन ठाईं ठाईं तुंबला। म्हणिजे खोटे॥" या ओवींत सांगितलेला आहे. (२) जेवढें पूर्वज संपादित अथवा अधिकारानें आपणांस प्राप्त झालेलें राज्य तेवढ्यावरच संतुष्ट असणें, अथवा त्यांतील कांहीं भागासाठीं आपसांत भांडत बसणें म्हणजे शत्रुपक्षाचा लाभ व स्वतःची हानि करणें असून स्वपराक्रमानें नवीं नवीं ऐश्वर्यक्षेत्रें स्वराष्ट्रास प्राप्त करून देणें हें राष्ट्रनेत्याचें वास्तविक कर्तव्य होय. हा सिद्धान्त श्रीसमर्थांनीं "श्रेष्ठीं जें जें मिळविलें। त्यासाठीं भांडत बैसले। तरी मग जाणावें फावले। गनीमासी॥" या ओवींत सांगितलेला आहे. (३) राष्ट्रसंरक्षणाचा खरा उपाय केवळ स्वसंरक्षणाची सिद्धता अथवा आक्रमण झाल्यावर त्याचा प्रतिकार हा नसून शत्रुराष्ट्रावर अथवा जेथून संभाव्य संकट असेल तेथें स्वतःच प्रथम आक्रमण व तेंहि कंबरडें मोडणारें जोरकस आक्रमण करणें हाच स्वराष्ट्रसंरक्षणाचा खरा उपाय होय, हें श्रीसमर्थांनीं "आधी गाजवावे तडाखे। तरी मग भूमंडळी धाके। ऐसें न होतां धके। राज्यासी होती॥" या ओवींत सांगितलेलें आहे. (४) "बहुत लोक मेळवावें। एक विचारें भरावें। कष्ट करूनि घसरावें। म्लेंच्छावरी॥" या ओवींत श्रीसमर्थांनीं स्वराष्ट्रसंघटन व शत्रुमित्रविवेकाचा स्पष्ट संकेत केलेला आहे. या पत्राचें स्वरूप राजकीय नाहीं तर काय पारमार्थिक आहे? 'पापी औरंग्या' बुडाल्यानें हृदयाला आनंद होणारे व 'देशद्रोही तितुके कुत्ते। मारोनि घालावे परते॥" असा स्पष्ट आदेश देणारे राष्ट्रगुरु श्रीसमर्थ राजकारणाशीं संबद्ध होते हें सत्य त्यांच्या वाङ्मयाचें अंशतः वाचन केलें तरी स्पष्टपणें प्रत्ययास येतें तें असे. पण समर्थांनीं राजकारण केलें म्हणजे काय केलें?

## श्रीसमर्थांचें द्विदल राजकारण

श्रीसमर्थ रामदास शिवछत्रपतींचे राजगुरु होते; पण चंद्रगुप्त मौर्याचे गुरु असलेल्या आर्य चाणक्यांनीं अथवा विजयनगरच्या राज्यसंस्थापकांचे सद्‌गुरु असलेल्या श्रीमद्विद्यारण्यांनीं ज्याप्रमाणें प्रत्यक्ष मंत्रिपद हातांत घेऊन राज्यकारभार केला त्याप्रमाणें श्रीसमर्थांनीं केलेलें नाहीं अथवा श्रीकृष्ण, भीष्म अथवा अर्जुनाप्रमाणें त्यांनीं प्रत्यक्ष सेनापतित्वहि केलेलें नाहीं. पण या दोनच राजकारणाच्या कक्षा नाहींत. राजनीतिशास्त्रामध्यें राजकारणांत उपयोगी पडणाऱ्या अथवा प्रभाव गाजविणाऱ्या तीन शक्ति सांगितलेल्या आहेत. त्या तीन शक्ति पुढीलप्रमाणें :– "शक्तय: तिस्र: प्रभावोत्साहमंत्रजा:" प्रभाव आणि उत्साह यांच्या इतकीच किंबहुना त्यांहूनहि अधिक मंत्रशक्ति श्रेष्ठ आहे. मंत्र म्हणजे मसलत, मार्गदर्शन, विचारप्रदान व ध्येयदर्शन होय. श्रीसमर्थांनीं हें मंत्रशक्तीचें राजकारण केलें. मंत्रशक्तीचें सामर्थ्य तिच्या गुप्तपणांतच वस्तुत: असतें. 'षट्‌कर्णो भिद्यते मंत्र:' हें वचन सुप्रसिद्धच आहे. श्रीसमर्थांचा गुप्तपणें राजकारण करण्यावर व आपल्या प्रचारकांनीं गुप्तपणें साऱ्या कामाची उभारणी करण्यावर केवढा विलक्षण कटाक्ष होता हें प्रसिद्धच आहे. 'गुप्तरूपें केलें पाहिजे सर्व' 'उदंड समुदाव करावे । परि गुप्तरूपें' 'पाहों जाता कोठेंचि नाहीं' 'काय करितो ते कळेना' 'उदंड करी गुप्तरूपें' 'भूमंडळी सत्ता चाले गुप्तरूपें' 'जातो स्थळ तें सांगेना। सांगितलें तेथें तरी जायेना। आपुली स्थिति अनुमाना । येवोंचि नेदी ॥' हे सारे समर्थांचे उद्‌गार त्यांच्या मंत्रगुप्तीसंबंधाच्या दक्षतेचीं उदाहरणेंच होत. माणुसकीच्या सर्व गुणांस पारखी झालेली विधर्मी राजसत्ता व प्रचारक यांच्या वेढ्यांत त्यांना जें राष्ट्रीय सामर्थ्य निर्माण करावयाचें होतें त्याला हा गुप्तपणा आवश्यक होता. त्यांच्या कार्याचें स्वरूप किंचित्‌हि राजकीय व राष्ट्रीय नसतें तर त्यांना या गुप्तपणाच्या कटाक्षाच्या पुरस्काराची कांहीं एक आवश्यकता नव्हती. श्रीतुकारामप्रभृति संतांनीं

असा गुप्ततेचा पुरस्कार केलेला नाहीं. कारण त्यांच्या कार्याचा तत्कालीन राजकारणाशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नव्हता. समर्थांनीं हें जें मंत्रशक्तीचें राजकारण केलें त्याचें स्वरूप द्विविध होतें. शिवछत्रपतींच्या स्वराज्याच्या आन्दोलनाला प्रत्यक्षाप्रत्यक्ष सर्वतोपरी साह्य करणें व त्या प्रयत्नांना देवाधर्माचें अधिष्ठान देऊन त्या ध्येयवादानें साऱ्या महाराष्ट्रीय जनतेचीं अंत:करणें भारून टाकणें.

## शिवछत्रपति व समर्थ

श्रीसमर्थ मसूरला येऊन त्यांनीं चाफळला श्रीरामचंद्राचा उत्सव सुरू करण्याच्या वेळींच त्यांचें शिवछत्रपतींच्या कार्याकडे लक्ष वेधलें होतें. मसूरला शहाजी राजांच्या जहागिरींत येऊन शक १५६७ मध्यें समर्थांनीं जो रामनवमीचा उत्सव केला त्याला शिवाजी महाराज आले होते. तेव्हांपासून या अद्भूत धारणेच्या तरुण राजपुरुषानें त्यांचें मन वेधून घेतलें होतें. त्यानंतर तीन वर्षें त्यांनीं या राजपुरुषाच्या हालचालीचें सूक्ष्म निरीक्षण चालविलें होतें. चंद्रराव मोऱ्यांची शिवछत्रपतींनीं केलेली अवस्था, मावळच्या जहागिरीची त्यांनीं कर्तेपणानें केलेली व्यवस्था, शिरवळला बाळाजी हैबतराव व पुरंदरवर मुसेखान या आदिलशाही अधिकाऱ्यांचा पराभव करून त्यांनीं त्यांना घातलेलें कंठस्नान, फत्ते खानाचा केलेला पराभव या साऱ्या गोष्टी समर्थांच्या तेथील वास्तव्यांतच घडल्या. व त्यांच्या मननांतून 'या भूमंडळाचे ठायीं। धर्म रक्षी ऐसा नाहीं' या निराशेच्या गडद अंधारांत दीपस्तंभ उजळल्याचा त्यांना साक्षात्कार झाला. त्यांनीं तीन वर्षांनंतर स्वत: होऊनच शिवछत्रपतींना गौरवाचें पत्र लिहिलें व महाराष्ट्र-भूमीवर ब्रह्मक्षत्रांचा अपूर्व संगम राष्ट्रपुनरुत्थानास्तव या पत्रानंतर घडून आला. समर्थांच्या या पहिल्याच पत्रांत त्यांच्या शिवाजी महाराजांकडे पाहण्याच्या दृष्टीचा साक्षात्कार होतो. श्रीसमर्थ या पत्रांत लिहितात :–

निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी ।
तयाच्या गुण महत्वासी । तुळणा कैची ।।
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।
धीर उदार आणि सुंदर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ।।
तीर्थे क्षेत्रें ते मोडली । ब्राह्मणें स्थानभ्रष्ट झाली ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।
देवधर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ।।
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हा कारणें ।।
आणिकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊन कित्येक असती ।
धन्य धन्य तुमची कीर्ती । विश्वी विस्तारली ।।
कितेक दुष्ट संहारिला । कितेकासि धाक सुटला ।
कितेकासी आश्रय झाला । शिवकल्याण राजा ।।
तुमचे देसीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाही घेतले ।
ऋणानुबंधें विस्मरण झालें । काय नेणों ।।
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तयांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळिली पाहिजे ।।
राजकारण उदंड दाटले । तेणें चित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केलें पाहिजे ।। ”

या पत्रानंतर श्रीशिवराय समर्थांच्याकडे आकर्षिलें गेले. व त्यानंतर लवकरच त्यांनीं समर्थांचा अनुग्रह घेतला. अफजुल-खानाचा वध, शहाजीच्या सुटकेच्या प्रकरणानंतर शिवछत्रपतींचें अडलेलें राजकारण गतिमान् करणें, आग्र्याहून परत येण्याचा जिवावरचा प्रसंग इत्यादि अनेक लहानमोठ्या प्रसंगांत श्रीसमर्थांच्या मंत्रशक्तीचें व त्यांच्या संघटनेचें शिवछत्रपतींना मोलाचें साह्य

झालेलें आहे. 'तुझा तूं वाढवी राजा । सीघ्र आम्हाचि देखता' असें जगदंबेला विनवितांना त्यांनीं जे कळवळयानें उद्गार काढलेले आहेत त्यावरून स्वराज्यसिंहासनाच्या या प्रतिष्ठापनेची त्यांच्या अंतःकरणांत किती उत्कट इच्छा होती हें दिसून येतें. निळो सोनदेव मुजुमदार, बाळाजी आवजो चिटणीस, रामचंद्रपंत अमात्य हुकमत पन्हा हे शिवछत्रपतींचे अंतरंग अधिकारी श्रीसमर्थांचे शिष्य होते. गणेशपंत, प्रल्हादपंत, नानाजीपंत, बाळकृष्णपंत शहापूरकर, अंताजी गोपाळ वाकनवीस, अनंतभट महाबळेश्वरकर, आनंदराव देशपांडे इत्यादि शिवछत्रपतींचे लहानमोठे अधिकारी श्रीसमर्थांचे शिष्य होते. मोरोपंत पिंगळे, नारो नीलकंठ सुभेदार, मोरेश्वर पंडितराय, नारो त्रिमल, पंताजी गोपीनाथ वाकेनवीस, अण्णाजीपंत सुरनीस, निराजी रावजी, अण्णाजी दत्तो इत्यादि शिवछत्रपतींच्या भोंवतालचें अधिकारी मंडळ समर्थांपासूनच धर्मराज्याच्या उभारणीची स्फूर्ति घेतलेले होते असें मानावयास जागा आहे. समर्थांच्या एकांतवासाच्या जागांची रचना नीट पाहिली तर केवळ ब्रह्मचिंतनाऐवजीं या जागांची निवड राजकारणासाठींहि झाली असण्याची शक्यता मनाला पटते. उदाहरणार्थ,जेथें श्रीसमर्थांनीं ग्रंथराज दासबोधाची रचना केली तो सुंदर मठ अथवा शिवथरची घळच घ्या. कसबे शिवथरच्या जवळील दक्षिणेकडील डोंगरांत ही घळ लोकवस्तीपासून नैर्ऋत्य दिशेस मैलभर दूर आहे. ही एकांत घळ अथवा सुंदर मठ, तोरणा, राजगड, रायगड, प्रतापगड, महाबळेश्वर, बिरवाडी इत्यादि शिवकालीन महत्त्वाच्या राजकीय स्थानांच्या मध्यभागीं असून हीं सारीं ठिकाणें घळीपासून पांचसात कोसांचे आंत आहेत. शिवछत्रपति व समर्थ यांच्या धारणांचा व कार्यपद्धतीचा विचार केला तर या घळीची निवड निर्हेतुक वाटत नाहीं. श्रीसमर्थांच्या राजकीय प्रकरणांवर प्रकाश टाकणारे चिटणिसांच्या बखरींतील कांहीं उल्लेख पहा :—अफझलखानाच्या वधाचें वृत्त देण्यापूर्वी चिटणीस लिहितात " श्रीरामदासांची कृपा होऊन उपदेश व्हावा. इच्छिलें तेहि मनोरथ सिद्धीस गेले." इ. स. १६६६ मध्यें शिवछत्रपति आग्र्याला गेले. त्या पूर्वीचें

वृत्त सांगतांना चिटणीस लिहितात " श्रीरामदासस्वामींचें दर्शन घेऊन सर्व वृत्त निवेदन करून ' दिल्लीस जाणें प्राप्त; कसें करावें ' विचारलें. ' जावे, फत्ते पावाल, संकट दूर होईल, तूर्त प्रसंगें जाणेंच प्राप्त आहे. ऐसी आज्ञा जाली" कास्मड गार्डा या परकीय लेखाचा या विधानाला पाठिंबा आहे. शिवछत्रपतींच्या दक्षिण दिग्विजया-नंतरचें वृत्त सांगतांना चिटणीस लिहितात : " कर्नाटकांतील दिग्विजय करून महाराज तोरगळ प्रांतांतून पनालियावरून सातारा प्रांतीं येऊन श्रीस्वामींचें दर्शन घेऊन प्रतापगडीं श्रीदेवीचें दर्शन केलें आणि रायगडावर येऊन पावले." इ.स. १६७४ मध्यें राज्या-रोहणाची जी घटना घडली तिचें वृत्त सांगतांना चिटणीस लिहितात "श्रीरामदास स्वामींकडे ( महाराजांनीं ) कारकून पाठविले, विनंति केली, त्यांनीं अनुमोदन दिल्हे." संभाजी दिलेर-खानाकडे गेला असतांना त्याला लिहिलेल्या पत्रांत शिवाजी महाराज लिहितात "तुम्ही यवनास मिळाला. यवनांचे घरांत राज्य घालण्याची बुद्धि तुम्ही धरली. तरी आम्हांस या उपरि कांहीं कर्तव्य नाहीं. एखादे क्षेत्रीं वास करूं किंवा श्रीरामदास-स्वामींचेपासों येऊन वसो." महाराजांच्या दैनंदिन जीवनाचें चित्र रेखाटतांना चिटणीस लिहितात " महाराज दोन घटका रात्रीं जपध्यान करून कांहीं पुराण व दासबोध दोन समास श्रवण करून भोजन करीत." चिटणिसांसारख्या व्यक्तीनें शिवसमर्थांच्या संबंधाचें हें जें चित्र रेखाटलें आहे त्यावरून त्यांचीं जीवनें पर-स्परांत किती एकात्मता पावलीं होतीं याची साक्ष पटते. समान धारणा व परस्परपूरक कार्य असल्यावांचून ही एकात्मता उत्पन्न होत नसते. इतकाहि साधा विवेक ज्या दुराराध्यांना नाहीं त्यांना मनोविकृतीनें पछाडलेले म्हणून सोडून देणेंच भाग आहे.

भारतांतील प्राचीन शुक्र, बृहस्पति, नारद, श्रीकृष्ण, कौटिल्य, अथवा भारताबाहेरच्या प्लेटो, ॲरिस्टॉटल, मार्क्सप्रभृति राज्य-शास्त्र व राजनीतिशास्त्र विचारकांच्या मालिकेंत शोभण्यासारखे श्रीसमर्थ हेच या कालखंडांतील महान् राजकीय विचारक होत.

त्यांच्या विशाल वाङ्मयोदधींतून राज्यशास्त्र व राजनीतिशास्त्राची पुढील प्रमेयरत्नें निघतात.

## श्रीसमर्थांचें राजनीतिशास्त्र

(१) धर्म हें राज्याचें अधिष्ठान होय.

(२) नेतृत्व सर्व दृष्टींनीं आदर्श असावें.

(३) राष्ट्रांतून कलहाचीं बीजें नष्ट करून एकात्मता वाढवावी. त्यासाठीं समान ध्येय व समान संकटाची जाणीव नेतृत्वाला असावी व ती त्या नेतृत्वानें सर्व राष्ट्रघटकांत रुजवावी.

(४) नेतृत्व निश्चयी, न्यायी व सर्वांस कल्पवृक्षाप्रमाणें आधारभूत असावें.

(५) राष्ट्रघटकांना नवीं नवीं कार्यक्षेत्रें सतत उपलब्ध करून देऊन अखंड कार्यांत ठेवलें पाहिजे. तुंबलेल्या शक्ति शेवटीं राष्ट्राचाच घात करीत असतात.

(६) माणसांची योग्य परीक्षा राष्ट्रनेत्याला करतां आली तरच सुक्षम राज्ययंत्राची उभारणी करतां येते. अन्यथा नाहीं.

(७) राष्ट्रद्रोही फितुऱ्यांना सर्वांत उग्र शासन असावें.

(८) कर्तृत्ववान् कार्यकर्त्यांच्या हातून कांहीं चुका घडल्या तरी उदार हृदयानें त्यांना जवळ करण्याचें धोरण असावें. मात्र त्यांना मनांतून जरब वाटेल अशी वागणूक असावी. 'अधृष्य' व 'अभिगम्य' या भारतीय राजनीतिशास्त्रांतील नेतृत्ववर्णनांतील परिभाषेचाच समर्थांनीं या सूत्रांत पुनश्च आविष्कार केलेला आहे.

(९) निरहंकारीपणा व अखंड सावधानता.

(१०) नीट परीक्षेंत उतरल्यावांचून केवळ लोकसंग्रहाच्या खोटया कल्पनेच्या आहारीं जाऊन उगाच कोणालाहि अंतरंगांत ओढूं नये.

(११) गुप्तता व इंद्रियजय.

(१२) शक्तीनें मिळती राज्यें। युक्तीनें यत्न होतसे।
शक्तियुक्ति जयें ठायीं। तेथें श्रीमंत नांदती ॥

श्रीसमर्थांच्या या राजनीतिशास्त्राच्या तत्त्वांचा आविष्कार श्रीशिवछत्रपतींच्या जीवनांतून झालेला आहे. भारतीय इतिहासांतील प्राचीन कालखंडापासून तर इंग्रजी राज्याच्या प्रतिष्ठापनेपर्यंत ज्या ज्या राज्यकर्त्यांनीं या तत्त्वप्रणालीचा अंगीकार केला ते ते यशाचे धनी ठरले आहेत. व ज्यांनीं ज्यांनीं तसें केलें नाहीं ते ते अपयशाचे धनी ठरले आहेत. प्रस्तुत ग्रंथाच्या उत्तरार्धात शिवछत्रपतींच्या जीवनाचें विश्लेषण करतांना आम्ही हीं प्रमेयें त्यांच्या जीवनाशीं कशीं संबद्ध आहेत हें प्रत्यक्षच दिग्दर्शित करूं.

शिवछत्रपतींच्या स्वराज्यउभारणीच्या कार्यातील महत्त्वाच्या प्रसंगीं श्रीसमर्थांनीं केलेल्या मंत्रशक्तीच्या साह्यापेक्षांहि अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या कार्याला समर्थांनीं देवाधर्माच्या रक्षणाचें म्हणजे स्वधर्म व स्वसंस्कृति संरक्षणाचें महान् अधिष्ठान प्राप्त करून दिलें. श्रीसमर्थ शिवछत्रपतींच्या जीवनांत आले नसते तर व त्यांनीं आपलें समर्थ प्रचारतंत्र उभारलें नसतें तर हें अधिष्ठान इतक्या प्रखरतेनें या कार्याला लाभलें नसतें व जनहृदयांत रुजलें नसतें. राजकारण हें स्वधर्मकारणाचें अंग होऊन त्यांत पावित्र्य निर्माण झालें तें समर्थांच्यामुळेंच होय. श्रीसमर्थांच्या या कार्याचें विश्लेषण करतांना लोकनायक बापूजी अणे लिहितात "राजकारण करणाऱ्यांना युक्तायुक्ततेचा किंवा सूक्तासूक्ततेचा विचार करण्याची जरुरी नाहीं अशी समर्थांची विचारप्रणालि नव्हती. युद्धकालीं शत्रूचें निर्दालन निर्भयपणें करणें हें जसें कर्तव्य, तसेंच 'न्यायसीमा उल्लंघूं नये' हीहि त्यांची शिकवण होती; आणि तिचें परिपालन आपल्या सैनिकांनीं करावें म्हणून छत्रपति शिवाजी महाराज दक्ष असत. याचीं कित्येक उदाहरणें दाखवितां येतील. समर्थ हे जसे सांसारिकांनीं प्रपंच नेटका करून परमार्थाचा लाहो घ्यावा असें आग्रहानें प्रतिपादीत होते, तसेंच राजपुरुषांनीं न्यायानें राज्य करून धर्मस्थापनेचें कार्य करावें व तद्द्वारां निर्वाणपदाची प्राप्ति करून घ्यावी असा उपदेश करीत होते."

श्रीसमर्थांनीं स्वराज्यनिर्मितीच्या कार्याला स्वधर्माचें हें जें महान् अधिष्ठान प्राप्त करून दिलें त्याचा उल्लेख शिवछत्रपतीं-च्याच प्रत्यक्ष व्यवहारांतून सांपडतो. समर्थांनीं आपणांस काय दिलें याचा चाफळ संस्थानला दिलेल्या सनदेंत स्वतः शिवछत्रपतींनींच निर्देश केलेला आहे. ती सनद पुढीलप्रमाणें:—

॥ श्री ॥

शक १६०० आश्विन शु. १०

श्रीसद्गुरुवर्य, सकळतीर्थरूप, श्रीकैवल्यधाम श्रीमहाराज स्वामीचे सेवेशीं

चरणरज शिवाजी राजे यांनीं चरणांवर मस्तक ठेवून विज्ञा-पना जे मजवर कृपा करून सनाथ केलें. आज्ञा केली कीं "तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करून धर्मस्थापना, देवब्राह्मणांची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पाळण, रक्षण करावें. हें व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा. तुम्ही जें मनीं धराल तें श्री सिद्धीस पावील. त्याजवरून जो जो उद्योग सुरू केला व दुष्ट तुरुख लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्य करून राज्यपरंपरा अक्षय चाले ऐसी स्थळें दुर्घट करावीं ऐसें जें जें मनीं धरलें तें तें स्वामींनीं आशीर्वादा-प्रमाणें मनोरथ पूर्ण केलें.

या उपरीं राज्य सर्व संपादिलें. तें चरणीं अर्पण करून सर्वकाळ सेवा घडावी ऐसा विचार मनीं आणिला. तेव्हां आज्ञा जाली कीं 'तुम्हांस पूर्वी धर्म सांगितले तेच करावे. तीच सेवा होय.' ऐसें आज्ञापिलें. यावरून निकटवास करून, वारंवार दर्शन घडावें; श्रीची स्थापना कोठेंतरी होऊन सांप्रदाय, शिष्यभक्ति विस्तीर्ण घडावी ऐसी प्रार्थना केली. तेहि आसमंतात् गिरिगव्हरीं वास करून, चाफळी श्रीची स्थापना करून सांप्रदाय शिष्य दिगंत विस्तीर्णता घडली. त्यास चाफळी श्रीची पूजा, महोत्सव, ब्राह्मण भोजन ,अतिथि इमारत सर्व यथासांग घडावें. जेथें जेथें श्रीच्या मूर्ति स्थापन जाहल्या तेथें उत्सव, पूजा घडावी. यास राज्य संपादिलें त्यांतील ग्रामभूमि कोठे काय नेमावी ते आज्ञा व्हावी. तेव्हां

आज्ञा जाली कीं 'विशेष उपाधीचें कारण काय? तथापि तुमचे मनी श्रीची सेवा घडावी हा निश्चय जाहला. त्यास यथावकाशें जे नेमावेसें वाटेल तें नेमावें आणि पुढें जसा साम्प्रदायाचा व राज्याच्या वंशाचा विस्तार होईल तसें करीत जावें. या प्रकारें आज्ञा जाहली. यावरून देशांत सांप्रदाय व श्रीच्या स्थापना जाहल्या, त्यास ग्रामभूमीचीं पत्रें करून पाठविलीं. श्रीसंन्निध चाफळी १२१ गांव सर्वमान्य व १२१ गांवीं आकरा विटे (बिघे) प्रमाणें भूमि व आकरा स्थळीं श्रीची स्थापना जाहाली तेथें नैवेद्य, पूजेस भूमि, आकरा बिघेप्रमाणें नेमिली आहे. ऐसा संकल्प केला. तो परंपरेनें शेवटास न्यावा ऐसी आज्ञा जाहाली. त्यावरून साम्प्रत गांव व भूमि नेमिले." (पुढें तपशील आहे. तो येथें उद्धृत करण्याचें कारण नाहीं.) या सनदेवरून श्रीसमर्थांच्या स्वराज्य मंदिराच्या उभारणींतील प्राणभूत कार्याची जशी कल्पना येते त्याचप्रमाणें शिवसमर्थ संबंधावरहि अधिकृत प्रकाश पडतो. शिवरायांना वेळोवेळीं समर्थांचें मार्गदर्शन कसें लाभलें, त्यांच्या भेटी महत्त्वाच्या प्रसंगीं कशा होत व शिवरायांच्या हातून व्हावयाच्या महत्कार्यासाठीं त्यांना समर्थांच्या सान्निध्याची कशी आवश्यकता वाटे याचा उलगडा या सनदेनें पूर्णपणें होतो. श्रीसमर्थांच्या टीकाकारांनीं, ही सनद जरी काळजीपूर्वक तपासली तरी त्यांना त्यांच्या शंकांची योग्य उत्तरें मिळतात.

समर्थांच्यामुळेंच महाराष्ट्र राज्य याचा अर्थ देवाब्राह्मणांचें म्हणजेच धर्माचें राज्य असा झाला. समर्थांच्या या महान् देणगीची जाणीव शिवरायांच्या नंतरच्या स्वराज्याच्या सूत्रचालकांनाहि होती. छत्रपति राजारामकालीन अस्सल कागदपत्रांतील पुढील उल्लेख या दृष्टीनें पाहण्यासारखे आहेत.

शक १६१८ मार्गशीर्ष वद्य २

आनाजी जनार्दन देशाधिकारी व लेखक
प्रांत वाई यांस
क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति
यांजकडून

. . . श्री (रामदासस्वामी) चे कृपेकरून महाराजांचे राज्य-वृद्धीतें पावले. या उपरी श्री (रघुनाथदेवा) चा समारंभ विशेष चालवीला पाहिजे ये विशी पूर्वी श्री (रामदासस्वामी) चे वचन राजश्री (श्रीशिवछत्रपति) कैलासवासी यासी आहे कीं श्रीदेवाचा चढता वाढता महोत्सव चालवावा तैसेच चढते वाढते राज्य अभि वृद्धीतें पावेल हे श्रीचे कृपापूर्वक आशीर्वादरूप वाक्य आहे . . . . श्रीसत्पुरुषाचें देवस्थान बहुत थोर व '**हे महाराष्ट्र राज्य म्हणजे देवाब्राह्मणांचें आहे.**'

शक १६१८ मार्गशीर्ष वद्य ५

आणाजी जनार्दन देशाधिकारी व
देशलेखक प्रांत वाई यास
शंकराजी नारायण सचीव
यांजकडून

. . . "देवस्थान परमथोर व स्वामी सत्पुरुष बहुत थोर. हे **राज्य देवाब्राह्मणाचे आशीर्वादाचे आहे** . . ."

शक १६१८मार्गशीर्ष वद्य १०

उधो आबाजी हवालदार व कारकून सबतनीब यासी अनाजी जनार्दन सुभेदार कारकून सुभाप्रा वाई
याजकडून

. . . हे मऱ्हाठे राज्य म्हणिजे देवाब्राम्हणांचें आहे . . .

शक १६१८ फाल्गुन शुद्ध ३

भानजी गोपाल मुख्य देशाधिकारी व लेखक
प्रांत कऱ्हाड यांस
रामचंद्र नीलकंठ अमात्य
यांजकडून

... उतरोतर चढता वाढता श्री (रघुनाथदेवा) चा भक्ति महोत्सव चालवावा तैसेंच चढतें वाढतें राज्य अभिवृद्धीतें पावेल हें श्री (रामदासस्वामीचे) कृपापूर्वक आशीर्वाद वाक्य आहे तरी हे **धर्मराज्य** श्रीचे कृपेकरून वृद्धीतें पावलें ... श्रीसत्पुरुषांचें देवस्थान बहुत थोर आणि हें **महाराष्ट्र राज्य म्हणजे देवाब्राह्मणांचें** आहे.

शक १६१८ फाल्गुन शुद्ध ३

माहादाजी शामराज नामजाद व लेखक
प्रांत जाउली यांसी

क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपती यांजकडून ... **हे राज्य म्हणजे देवाब्राम्हणांचें आहे. धर्मस्थापना विशेषात्कारे चालवणे हे स्वामीस अगत्य आहे** ...

शक १६१९ ज्येष्ठ वद्य १४

खंडो आपाजी हवालदार व कारकून सा। बारामुरे
यासी माहादाजी सामराज नामजाद
व कारकून सुभा जावली याजकडून

... 'हे महाराष्ट्र राज्य म्हणजे देवाब्राम्हणाचे ...'

श्रीसमर्थांच्या कार्याचें हें स्वरूप ध्यानांत घेतलें तर त्याच्या भव्यतेची खरी कल्पना येते. प्रत्येक मराठी मन त्यांनीं या धर्मराज्याच्या ध्येयवादानें भारून टाकलेलें होतें. आजच्या परिभाषेनुसार व्यक्तित्वाचा, राष्ट्रीयत्वाच्या, समष्टिस्वरूप जीवनांत समर्थांनीं विलय घडवून दाखविलेला आहे. त्यामुळेंच शिवछत्रपति ही व्यक्ति राहिलेली नसून साऱ्या राष्ट्राच्या ज्वलंत आकांक्षेचाच

तो हुंकार झाला होता. राज्य शिवाजी व त्याचे वंशज यांचें उरलेलें नव्हते. तें सर्व जनतेचें झालें होतें. या धारणेचा जगाच्या—भारताच्या इतिहासांतील अभूतपूर्व आविष्कार शिवछत्रपतींच्या निधनाच्या दारुण आघातानंतर प्रत्यक्ष दिसून आला. तीन लक्ष सैन्य व अगणित संपत्ति घेऊन स्वराज्य बुडविण्यासाठीं बादशहा औरंगजेब, शिवछत्रपतींच्या निर्याणानंतर महाराष्ट्रांत उतरला. छत्रपति संभाजीनें अविवेकी क्रोधानें स्वराज्यांतील कर्त्या थोर पुरुषांना ठार मारून स्वराज्याच्या सामर्थ्याचे पंख कापलेले होते. तरीहि स्वराज्याशीं कृतघ्नता पत्करून स्वार्थ अथवा अन्यायाच्या सुडासाठींहि कोणी छत्रपतींची पाठ सोडली नव्हती. बाळाजी आवजी चिटणिसांसारख्या स्वराज्य मंदिराचा स्तंभ असलेल्या व्यक्तीला संभाजीनें हत्तीच्या पायाशीं बांधून अन्यायानें ठार केलें. पण खंडो बल्लाळांच्या स्वामिनिष्ठेला पित्याचा हा वध अंशतः सुद्धां विचलित करूं शकला नाहीं. हीं दिव्य जीवनें श्रीसमर्थांच्याच अमृत संजीवनी मंत्रानें घडविलीं. नऊ वर्षें उघडया मैदानावर औरंगजेबासारख्या शत्रूशीं छत्रपति संभाजीमहाराजांनीं जें युद्ध करून त्याला जेरीस आणलें तें महाराष्ट्रीय जनतेच्या श्रीसमर्थांनीं निर्माण केलेल्या राष्ट्रनिष्ठेच्या भरंवशावरच होय. जनतेला क्रूरकर्मा संभाजी दिसत नव्हता. पुनरुत्थानाच्या आकांक्षेनें भारलेल्या राष्ट्राच्या इच्छाशक्तीचें प्रतीक म्हणूनच ती छत्रपतींच्या सिंहासनाकडे पहात होती. पुढें तर त्याहूनहि बिकट प्रसंग आला. स्वराज्याचे छत्रपति संभाजीमहाराज औरंगजेबाच्या तावडींत सांपडले. धर्मांतर की मृत्यु या समस्येंत त्यांनीं मृत्यूला आलिंगन देऊन शिवरायांचें नांव अधिकच उज्ज्वल केलें. संरक्षणाच्या बलिवेदीवर राजमस्तकाचाच होम झाला. त्यांच्या क्रूर हत्येनंतर महाराष्ट्रांत निर्णायक परिस्थिति उत्पन्न झाली. राणी येसूबाई व बाल शाहू मोंगलांच्या कैदेंत गेली. छत्रपति राजाराम जिंजीकडे गेला. छत्र नाहीं, नेता नाहीं व मार्गदर्शन नाहीं अशा अवस्थेंत तीन लक्ष सैन्यासह स्वराज्याचें निखन्दन करण्यासाठीं आलमगीर

मराठी ... ठाणे. स्थळप्रत. परिग्र...
अनुक्रमांक २४३३५ वि. ६५६ नों. दि.


बादशहा महाराष्ट्रांतील जनतेसमोर उभा ठाकला असतांना जनतेनें आव्हान स्वीकारलें. घरांघरांतून शिवाजी दिसूं लागला. व स्वराज्याऐवजीं महाराष्ट्रांत औरंगजेबाचेंच ससैन्य दफन झालें. जी गोष्ट मराठेशाहीच्या वैभवाच्या काळांत पानपतला शक्य झाली नाहीं ती या संकटकाळांत कशी शक्य झाली? समर्थांनीं केलेल्या राष्ट्रसंजीवनीचाच हा उद्रेक होता. समर्थांच्या कार्याचें हें स्वरूप आहे. कै. लोकमान्य टिळक श्रीसमर्थांना श्रद्धांजलि अर्पण करतांना इ. स. १९०८ मध्यें केलेल्या एका भाषणांत म्हणतात: 'पारतंत्र्यमग्न महाराष्ट्राच्या सोडवणुकीकरितां परमेश्वरानें पाठविलेल्या थोर विभूतींमध्यें पहिलें स्थान श्रीरामदासांनीं दिलें पाहिजे. लोकस्थिति व परिस्थिति यांस अनुलक्षून परमेश्वर निरनिराळे अवतार घेतो. अर्थात् महाराष्ट्र वर काढण्याकरितां ज्या गुणांची आवश्यकता होती, तशा गुणांनीं परिपूर्ण अशी ही विभूति त्या कालीं अवतीर्ण झाली. देशास पारतंत्र्य आलें म्हणजे धर्म, उद्योगधंदे, व्यापार, इत्यादींचा त्राता कोणीं राहात नाहीं. केवळ धर्माची ग्लानि ज्या वेळेस झाली तेव्हां श्रीशंकराचार्यांचा अवतार झाला. पण धर्माबरोबर इतरहि अनेक गोष्टींची हानि होत असते. अशा वेळीं केवळ एकाच दिशेनें विचार करणारा अवतार होऊन चालत नाहीं. महाराष्ट्राच्या विपन्नकाळीं आवश्यक अशा अनेक विशिष्ट गुणांनीं युक्त असा हा महापुरुष निर्माण होऊन त्यानें त्या वेळीं देशाचें रक्षण केलें, येवढेंच नव्हें तर महाराष्ट्राचें आज जें कांहीं नांव आहे तें त्या पुरुषाच्या परिश्रमाचें व तपोबलाचेंच चीज आहे. श्री समर्थांचा उत्सव धार्मिक व श्रीशिवाजी महाराजांचा उत्सव राजकीय मानतात. पण धार्मिक व राजकीय उत्सव हे विभक्त करतां येणार नाहींत. शरीराच्या डाव्या-उजव्या अंगाप्रमाणें ते एकमेकांस चिकटलेले आहेत. धर्म व राजकारण दोन नाहींत. **रामदासांनीं राष्ट्राचीं मनें तयार करण्याचें काम केलें.** शिवाजी महाराजांनीं सेना व प्रजा निर्माण केली. रामदासांनीं व त्यांच्या शिष्यांनीं

शाळा काढून लिहा वाचायला शिकविलें नसेल; पण राष्ट्राचा-अभ्युदय कशानें होईल, तें संपन्न कसें होईल हें शिकविलें.'

राष्ट्रगुरु श्रीलोकमान्यांनीं राष्ट्रगुरु श्रीसमर्थांच्या कार्याचें केलेलें हें मूल्यमापन समर्थांच्या जीवनकार्यावर परिपूर्ण प्रकाश टाकणारें असून त्याला कोणतीहि नवी पुस्ती जोडण्याचें कारण नाहीं. शिवचरित्राचा विचार करतांना श्रीशिवरायांच्या नेतृत्वाखालीं झालेल्या राष्ट्रपुनरुत्थानाचें स्वरूप समजावून घेतांना समर्थांच्या विभूतिमत्त्वाचा व कार्याचा विचार करणें या दृष्टीनेंच अनिवार्य होय. कारण राज्यसंस्थापक म्हणूनच केवळ नव्हे तर राष्ट्रसंजीवक व धर्मपुनरुज्जीवक म्हणून पुण्यश्लोक छत्रपति श्री शिवाजी महाराजांच्या जीवनाला जें दिव्य व मंगल अधिष्ठान प्राप्त झालें आहे तें श्रीसमर्थांच्या मुळेंच होय.

पुण्यश्लोक श्रीशिवछत्रपतींच्या चरित्राच्या विवरणाच्या संकल्पित योजनेचा पूर्वार्ध येथें संपला. या पूर्वार्धांत शिवछत्रपतींच्या अवताराची पार्श्वभूमि, त्यांच्या मनोभूमिकेंत भारतीय अस्मितेच्या विशेषांचें जें विशुद्ध स्वरूप प्रकट झालें होतें त्याची कारणमीमांसा, जनतेच्या आकांक्षेचें स्वरूप म्हणून त्यांचें व्यक्तित्व जें प्रगट झालें त्याची संतचळवळीनें केलेली सिद्धता व त्यांच्या आणि श्रद्धाजीवनाची बैठक उत्पन्न झालेल्या महाराष्ट्राच्या जीवनांत ध्येयपूर्ण पुनरुत्थानाची आकांक्षा प्रज्वलित करणारें श्रीसमर्थांचें अवतारकार्य यांचें समालोचन करण्यांत आलेलें आहे. आम्ही हें प्रारंभींच उल्लेखिलें आहे कीं शिवछत्रपतींना केवळ राज्यसंस्थापक मानणें हें त्यांच्या महत्तेला सीमित करण्यासारखें आहे. त्यांच्या कार्याचें स्वरूप एखाद्या राज्यसंस्थापकांहून अधिक व्यापक होतें, व तें म्हणजे समाजजीवनांत मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना करणें, धर्माचें पुनरुज्जीवन, संस्कृतीचें संरक्षण व चिरंजीव अस्मितेच्या एका महान् राष्ट्राचें पुनरुत्थान करणें हें होय. प्रदीर्घकाळ जीवन-मरणाच्या संकटांत सांपडलेल्या एका महान् राष्ट्राच्या जीवनाकांक्षेचें शिवछत्रपति हे प्रतीक असल्यामुळें

त्या जीवनाकांक्षेची उत्पादक पार्श्वभूमि ध्यानांत यावी म्हणून भारतांतील इस्लामी सत्तेच्या संकटाचें स्वरूप आम्ही प्रथम विशद केलें. इस्लामी संस्कृतीनें भारताच्या राष्ट्रीय अस्मितेचा उत्तर भारतांत पूर्ण ग्रास करून दक्षिणेंत धडक मारली असतांहि शिवछत्रपतींच्या हृदयांत मात्र ती विशुद्ध स्वरूपांत कशी प्रकट झाली तें स्पष्ट करण्यासाठीं शिवछत्रपतींच्या अंतःकरणावर संस्कार करणाऱ्या विजयनगरच्या धर्म साम्राज्याच्या स्वरूपाचें आम्ही सविस्तर समालोचन केलें. प्रथम श्रद्धाजीवन निर्माण झाल्यावांचून स्वधर्म व स्वराज्याच्या ध्येयानें कोणतेंहि राष्ट्र पुनरुत्थानाची प्रेरणा घेऊं शकत नाहीं. महाराष्ट्रांत शिवछत्रपतींच्या काळीं या प्रेरणेला आवश्यक तें श्रद्धाजीवन कसें निर्माण झालें होतें हें दर्शविण्यासाठीं तें निर्माण करणाऱ्या श्री ज्ञानदेव ते तुकाराम महाराजांपर्यंतच्या संतांच्या कार्याचें आम्ही येथें समालोचन केलें. राष्ट्रांत श्रद्धाजीवन निर्माण झालें तरी पुनरुत्थानाची आकांक्षा प्रज्वलित करणें आवश्यक असतें.

'बहुत लोक मेळवावे । एक विचारें भरावें ।<br>
कष्टें करून घसरावें । म्लेच्छावरी ॥<br>
देवद्रोही तितुके कुत्ते । मारोनि घालावे परते ।<br>
देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाही ॥'

या तेजस्वी मंत्रानें हें संजीवन घडविणाऱ्या व खड्गाला धर्माचें अधिष्ठान निर्माण करणाऱ्या राष्ट्रगुरु समर्थ रामदासांच्या जीवनकार्याचें समालोचन करून महाराष्ट्रांत ही आकांक्षा कशी प्रज्वलित झाली होती याचें आम्ही विवेचन केलें. या पार्श्वभूमीवर श्रीशिवछत्रपतींच्या विभूतिमत्त्वाच्या रूपानें जें दिव्य तेज तळपलें त्याचें दर्शन या ग्रंथाच्या उत्तरार्धांत घडविण्याचें आश्वासन देऊन आम्ही हा पूर्वार्ध संपवितों.

स्थळप्रत.
अनुक्रम २४३३५ वि:
क्रमांक ... नों: दि: ...

90393

REFBK-0010313